# १

# भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

**घटक रचना :**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी

१.४ भारतीय राज्यघटनेची निर्मिती

१.५ भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ

## १.१ उद्दिष्टे

१. भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.

२. भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया समजून घेणे .

३. भारतीय राज्यघटनेची मुख्य तत्वे यावर चर्चा करणे .

## १.२ प्रस्तावना

२६ जानेवारी १९५० पासून भारत प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र म्हणून उदयास आले. त्या अगोदर भारतावर ब्रिटिशांची सत्ता होती. ब्रिटिशांनी १७५७ मध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर प्रशासनिक घडी बसवण्यासाठी कायद्याचे राज्य या संकल्पनेचा उपयोग केला. त्यासाठी वेळोवेळी कायदे करून प्रशासनात सुधारणा घडवून आणल्या. त्याची सुरुवात 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्ट पासून होते. सुरुवातीला गव्हर्नर जनरलच्या मदतीसाठी काही व्यक्तींची नियुक्ती केली जात असे. या व्यक्तींच्या मदतीने गव्हर्नर प्रशासनाच्या संदर्भात निर्णय घेत असे. परंतु एखाद्या निर्णयासंदर्भात वाद निर्माण झाल्यास बहुमताच्या आधारे निर्णय घेतल्या जात असे. यामध्ये आपल्याला भारतीय लोकशाहीची व कायद्याच्या राज्याची बीजे दिसून येतात. कायद्यापुढे जात, धर्म, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक देणे हे कायद्याच्या राज्याचे प्रमुख तत्व असते. आधुनिक शिक्षणामुळे भारतीयांना लोकशाही सारख्या आधुनिक संस्था आणि कायद्याचे राज्य यांची ओळख झाली. या आधुनिक संस्थांची ओळख झालेल्या भारतीयांनी आपलाही

munotes.in

प्रशासनामध्ये सहभाग असावा म्हणून ब्रिटिश सरकारकडे वेळोवेळी त्यासंबंधी मागण्या केल्या. त्याचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी भारतीयांना टप्प्याटप्प्याने प्रशासनामध्ये सहभागी करून घेण्यासाठी वेळोवेळी घटनात्मक सुधारणांचा हप्ता दिला. त्यातूनच ब्रिटिश काळात अनेक कायदे निर्माण होऊन भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी तयार झाली. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना स्वतंत्र भारताची घटना स्वतः भारतीयांनी तयार करावी म्हणून ब्रिटिश सरकारने घटना समितीच्या निवडणुका घेतल्या. या घटना समितीने स्वतंत्र भारतासाठी प्रदीर्घ आणि लिखित घटना तयार केली. जगामधील विविध देशांच्या घटनांमधून जे जे चांगले तत्व असतील ते घेऊन भारताच्या संदर्भात त्याचा अंतर्भाव आपल्या या घटनेमध्ये करण्यात आला आणि २६ जानेवारी १९५० पासून ही राज्यघटना भारतासाठी लागू करण्यात आली. या राज्यघटनेच्या आधारेच भारतामध्ये कायद्याच्या राज्याची स्थापना होऊन लोकशाहीची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे.

## १.३ भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी

ब्रिटिशांनी भारतामध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर कायद्याचे राज्य ही संकल्पना राबवण्यास सुरुवात केली. याबरोबरच भारतात लोकशाही, स्वातंत्र, समता आणि बंधुता यासारख्या आधुनिक संस्था आणि मूल्य रुजण्यास सुरुवात झाली. आधुनिक शिक्षणामुळे भारतातील मध्यमवर्गीयांना या संस्थांची ओळख झाल्यामुळे त्यांनी आपल्या न्याय हक्कासाठी १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. काँग्रेसने भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी ब्रिटिश सरकारकडे या आधुनिक संस्था आणि मूल्य यांची मागणी केली. त्याचाच परिणाम म्हणून ब्रिटिशांनी भारताला टप्प्याटप्प्याने घटनात्मक सुधारणा आणि राजकीय हक्क दिल्याचे दिसून येते.

ब्रिटिशांनी या घटनात्मक सुधारणांची सुरुवात '१७७३च्या नियामक कायद्याने' केली. या कायद्यानुसार भारतातील ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण घातले गेले आणि गव्हर्नर जनरल व चार कौन्सिलर यांचे कार्यकारी मंडळ स्थापन करून बहुमताने निर्णय घेण्याचे बंधन टाकण्यात आले. '१८३३च्या चार्टर कायद्या' नुसार कायदे करताना सल्ला देण्यासाठी गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये कायदा सदस्य नियुक्त करण्याची तरतूद केली गेली. त्याचबरोबर भारतीय कायद्यांचे संहितीकरण करण्यासाठी एक विधी आयोग नियुक्त करण्यात आला. '१८५३ च्या चार्टर कायद्या' मध्ये कायदा करण्यासाठी कौन्सिलची बैठक होईल त्यावेळी दोन न्यायाधीश आणि बंगाल, मद्रास, मुंबई व वायव्य प्रांताचा प्रत्येकी एक सदस्य असे सहा अतिरिक्त सदस्य घेण्याचे सुचवण्यात आले. '१८६१च्या कौन्सिल कायद्या'ने अतिरिक्त सदस्यांची संख्या १२ केली, तसेच या कायद्यानुसार भारतात मंत्रिमंडळ पद्धतीचा पाया घातला गेला. '१८९२च्या कौन्सिल कायद्या' नुसार मर्यादित प्रमाणात निवडणुकीचे तत्व स्वीकारण्यात आले. 'भारतीय कौन्सिल कायदा १९०९' म्हणजेच मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा. याकायद्यानुसार केंद्रीय तसेच प्रांतीय कायदेमंडळांचा विस्तार करून त्याच्या सत्तेतही वाढ करण्यात आली. या कायद्यानुसार मर्यादित मताधिकार देऊन अप्रत्यक्ष निवडणूक घेण्याचीही तरतूद केली गेली. '१९१९चा भारत सरकार कायदा' म्हणजेच मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यानुसार केंद्रीय स्तरावर राज्य परिषद (Council of State) आणि केंद्रीय विधानसभा (Central Legislative Assembly) असे द्विसदनी कायदेमंडळ स्थापन करण्यात आले. या दोन्ही सदनांमध्ये

निर्वाचित सदस्यांचे बहुमत होईल एवढी संख्या करण्यात आली. परंतु या निर्वाचित सदस्यांना निवडून देणाऱ्या मतदारांची संख्या मात्र खूपच कमी होती. या कायद्यानुसार विषयांची केंद्रीय विषयसूची आणि प्रांतीय विषयसूची असे वर्गीकरण करण्यात येऊन प्रांतामध्ये दुहेरी शासन व्यवस्था म्हणजेच राखीव महत्त्वाची खाती गव्हर्नरकडे आणि सोपी व कमी महत्त्वाची खाती भारतीय सदस्यांकडे देण्यात आली. एकूणच भारत सचिव माँटेग्यू याने म्हटल्याप्रमाणे “भारत सरकारच्या प्रत्येक विभागात भारतीयांचा संबंध दिवसेंदिवस वाढत जावा आणि स्वयंशासित संस्थांचा हळूहळू विकास व्हावा आणि जबाबदार शासनपद्धती भारतात स्थापन व्हावी” या उद्देशाने हा कायदा बनवण्यात आला होता . त्याचा बराचसा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर दिसून येतो.

यापुढील घटनात्मक सुधारणा देण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२७ मध्ये 'सायमन कमिशन' भारतामध्ये पाठवले. या कमिशनला १९१९च्या कायद्याचे मूल्यांकन करून पुढे कोणत्या प्रकारच्या घटनात्मक सुधारणा द्यायच्या, याची शिफारस करायची होती. या कमिशनच्या अहवालाच्या आधारेच १९३० ते १९३२ या कालखंडात इंग्लंडमध्ये तीन 'गोलमेज परिषदा' झाल्या. या गोलमेज परिषदांमध्ये झालेल्या चर्चेच्या आधारे १९३३मध्ये एक 'श्वेतपत्रिका प्रसिद्ध' केली. या श्वेतपत्रिकेच्या आधारे १९३४मध्ये सर सॅम्युअल यांनी एक विधेयक तयार केले. जबाबदार शासनपद्धती देण्याच्या उद्देशाने सरकारला काही ठोस पावले उचलणे भाग होते. त्याचीच परिणीती म्हणून१९३५चा कायदा केला गेला. हा ‘१९३५चा भारत सरकार कायदा' म्हणजे स्वातंत्र्योत्तर भारताच्या राज्यघटनेचा गाभा होय. या कायद्यानुसार भारताला संघराज्याचे स्वरूप दिले गेले. भारतातील विविध प्रांत आणि संस्थाने मिळून ‘भारतीय संघराज्य' बनणार होते. केंद्रीय कायदेमंडळ, राज्य परिषद आणि संघसभा असे द्विसदनी असणार होते. केंद्रसूची, राज्यसूची आणि समवर्तीसूची असे विषयाचे वाटप करण्यात आले. प्रांतातील दुहेरी राज्यव्यवस्था आता केंद्रात लागू केली होती. प्रांतांमध्ये विधानसभा व विधान परिषद असे द्विसदनी कायदेमंडळ असणार होते.प्रांतातील कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळाला जबाबदार असणार होते. विधानसभेतील सर्व सदस्य जनतेकडून प्रत्यक्ष मतदान पद्धतीने निवडून दिले जाणार होते. त्याचबरोबर या कायद्यानुसार एक संघ न्यायालय स्थापन करण्यात आले व न्यायालयाला संविधानाची व्याख्या करण्याचा अधिकार देण्यात आला. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेल्हेकर : ४७३)* अशाप्रकारे भारतीय राज्यघटनेचामुख्य आधार हा १९३५चा कायदा होता.या कायद्याच्या आधारे भारतीय राज्यघटनेची संरचना करण्यात आलेली आहे.म्हणजेच ब्रिटिशांनी घटनात्मक सुधारणा करून भारतीयांना प्रशासनामध्ये प्रतिनिधित्व देण्यासाठी वेळोवेळी जे सुधारणा कायदे केलेयातूनच भारतीय राज्यघटनेची पायाभरणी झालेली दिसून येते.

## १.४ भारतीय राज्यघटनेची निर्मिती

१९२७ मध्ये भारतीयांना पुढील टप्प्यातील घटनात्मक सुधारणा देण्यासाठी सायमन कमिशनची नियुक्ती करण्यात आली. या कमिशनमध्ये एकही सदस्य भारतीय नसल्यामुळे भारतीयांनी सायमन कमिशनला कडाडून विरोध केला. म्हणून ब्रिटिश सरकारने भारतीय नेत्यांनाच असे आव्हान केले की, तुम्ही सर्वांनी मिळून सर्वांना मान्य होईल अशी अंतर्गत स्वायत्तता असलेली घटना तयार करावी. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत

सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली 'नेहरू समिती' स्थापन केली. या समितीने सांगोपांग विचार करून आपला अहवाल 'नेहरू रिपोर्ट'च्या स्वरूपात १९२८ मध्ये सरकारला सादर केला. त्याला मोहम्मद अली जिना यांनी विरोध करून आपला १४ कलमी कार्यक्रम स्वीकारण्याचा दुराग्रह धरला. हा कार्यक्रम राष्ट्रीय काँग्रेसला मान्य नसल्यामुळे नेहरू रिपोर्ट यशस्वी होऊ शकला नाही. परंतु हा भारतीयांनी घटना निर्मिती विषयी केलेला पहिला प्रयत्न होता. सायमन कमिशनच्या अहवालाच्या आधारावरच पुढे ब्रिटनमध्ये तीन गोलमेज परिषदा होऊन १९३५चा घटनात्मक सुधारणा कायदा अस्तित्वात आला. जो भारतीय राज्यघटनेचा मुख्य आधार समजला जातो. या कायद्याच्या आधारे निवडणुका होऊन १९३७ मध्ये विविध राज्यांमध्ये भारतीयांचे प्रतिनिधीत्व असलेली मंत्रिमंडळे राज्यकारभारात आली.१७३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाल्यानंतर भारतीयांना विचारात न घेता भारताला युद्धात सामील करून घेतले म्हणून  काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. परीणामी भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी ब्रिटिशांनी १९४० मध्ये ऑगस्ट प्रस्ताव भारतीय नेत्यांपुढे ठेवला. यामध्ये युद्धसमाप्तीनंतर  भारताचीघटना तयार करण्यासाठी एक समिती निर्वाचित  करण्यात येईल अशी तरतूद करून भारताची घटना बनविण्याचा अधिकार भारतीयांचा आहे हे सर्व प्रथम १९४०च्या ऑगस्ट प्रस्तावद्वारे मान्य करण्यात आले होते. परंतु काँग्रेसला ही व्यवस्था तात्काळ हवी होती म्हणून काँग्रेसने हा प्रस्ताव मान्य केला नाही. १९४२ मध्ये दुसऱ्या महायुद्धाची तीव्रता वाढल्यामुळे भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी 'क्रिप्स प्रस्ताव 'भारतीयांपुढे ठेवण्यात आला. यामध्येही युद्धसमाप्तीनंतर घटना समितीची निवडणूक कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा पद्धतीनुसार होईल असे सांगण्यात आले.त्यात भारतीय संस्थानांचा सहभाग असण्याची देखील व्यवस्था केली होती. परंतु महात्मा गांधीजींनी या व्यवस्थेला "*बुडत्या बँकेचा पुढील तारखेचा धनादेश*", म्हणतही योजना नाकारली.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटिशांविरुद्ध भारतात दाटलेला तीव्र असंतोष व शस्त्रबळावर भारतावरील पकड टिकून धरण्याची ब्रिटनची असमर्थता यामुळे भारतातून लवकरच काढता पाय घ्यावा लागणार हे ब्रिटिशांना कळून चुकले होते. म्हणून भारताच्या सत्ता हस्तांतरणासाठी१९४६ मध्ये 'त्रिमंत्री योजना अर्थात कॅबिनेट मिशन'ची स्थापना करण्यात आली. या कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावामध्ये घटना समितीची रचना स्पष्ट करण्यात आली होती. त्यानुसार घटना समिती  प्रांतीय विधानसभांद्वारे निवडली जाणार होती. प्रौढ मताधिकाराद्वारे घटना समिती निवडण्याची कल्पना बाजूला सारली कारण त्यामुळे फार विलंब झाला असता. प्रांतिक विधानसभेच्या सदस्यांना सामान्य, मुस्लिम आणि शीख अशा तीन भागात विभाजित करण्यात आले. प्रत्येक भागातील सदस्यांना आपले प्रतिनिधी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने निवडायचे होते. गव्हर्नर प्रांतात हे प्रमाण दहा लक्ष लोकसंख्येला एक प्रतिनिधी असे होते. यामध्ये ब्रिटिश भारतामधून २९२ प्रतिनिधी निवडून येणार होते तर ४ सदस्य मुख्य आयुक्त प्रांतातून आणि ९३ सदस्य भारतीय संस्थानातून मनोनित होणार होते. काहीशा अनिच्छेने काँग्रेस व  मुस्लिम लीगने त्रिमंत्री योजनेला स्वीकृती दिली. यानंतर घटना समितीसाठी झालेल्या निवडणुकीत २१४ साधारण जागांपैकी काँग्रेसला २०५ जागा मिळाल्या. शिवाय काँग्रेसला ४शिख सदस्यांचे देखील समर्थन होते. ७८ मुस्लिम जागांपैकी लीगला ७३

जागा मिळाल्या. अशाप्रकारे घटना समितीत पूर्णतः काँग्रेसचे बहुमत प्रस्थापित झाल्याने जिना अस्वस्थ झाले आणि २९ जून १९४६ रोजी मुस्लिम लीग त्रिमंत्री योजना फेटाळून लावत आहे असे जाहीर करून घटना समितीमध्ये सामील होण्यास लीगने नकार दिला.तरीही घटना समितीचे पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे सुरूझाले या अधिवेशनाला एकूण २०७ सभासद हजर होते.या अधिवेशनात श्री सच्चिदानंद सिन्हा यांची घटना परिषदेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नेमणूक झालीतर ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीची कायम अध्यक्ष म्हणून निवड झाली.

घटना परिषदेचे एकूण ११ अधिवेशने झाली. त्यातील स्वातंत्र्यापूर्वी चार व स्वातंत्र्यानंतर पाच अधिवेशने झाली.पहिल्या अधिवेशनात १३डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरूंनी घटनेची ध्येय आणि उद्दिष्टांचा ठराव मांडला. दुसऱ्या अधिवेशनात २२ जानेवारी १९४७ रोजी हा ठराव मान्य करण्यात आला. या ठरावानुसार घटनेमध्ये पुढील ध्येयांचा व उद्दिष्टांचा प्रामुख्याने स्वीकार करण्यात आला. स्वतंत्र सार्वभौम गणराज्याची निर्मिती, मूलभूत हक्कांची निर्मिती, जनतेचे सार्वभौमत्व, भारतीय संस्थाने आणि प्रांतांना सभासदत्व, अल्पसंख्यांक आणि मागासलेल्या वर्गांना खास सवलतींयांचा यात समावेश होता. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेल्हेकर : ४९०)* घटना परिषदेने आपल्या कामकाजाच्या सोयीसाठी काही समित्या नियुक्त केल्या होत्या त्यात संघशक्ती समिती, न्यायालय समिती, संघीय घटना समिती, मूलभूत हक्क समिती, अल्पसंख्यांक समिती आणि वित्त समिती यांचा समावेश होता. या सर्व समित्यांनी आपला अहवाल घटना परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात सादर केला. घटना परिषदेचे पाचवे अधिवेशन १४ ऑगस्ट १९४७ रोजी बोलवण्यात आले. या अधिवेशनात पाकिस्तान मध्ये गेलेल्या प्रदेशातील सभासद घटना परिषदेतून बाहेर पडले.ह्या अधिवेशनापासून घटना परिषदेला सार्वभौमत्व प्राप्त झाले. कारण १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. यानंतर घटना परिषदेचे सभासद कायदेमंडळ आणि भारताची राज्यघटना परिषद अशी दुहेरी कार्य करू लागले. या अधिवेशनापासून घटना परिषदेला फक्त तात्विक स्वरूप न राहता व्यवहारीक स्वरूप प्राप्त झाले.

घटना परिषदेला सार्वभौमत्व प्राप्त झाल्यानंतर घटनेच्या मसुदा तयार करण्यासाठी घटनातज्ञांची एक समिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आली. तिलाच 'मसुदा समिती' असे म्हणतात. या मसुदा समितीत डॉ. आंबेडकरांसह सात सभासद होते. त्यात श्री गोपाल स्वामी आयंगार, श्री अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, डॉ. के एम मुंशी, सय्यद मोहम्मद सदुल्ला, श्री एन माधवराव, श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांचा समावेश होता. मसुदा समितीचे सल्लागार म्हणून बी. एन. राव यांची नेमणूक झाली होती. घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर सहासभासदांशिवाय घटना समितीत अनेक विद्वान आणि घटना तज्ञांचा समावेश होता. त्यात पंडित नेहरू, सरदार पटेल, चक्रवती राजगोपालचारी, डॉ. राधाकृष्णन, फिरोजखा नून, डॉ. पुरुषोत्तमदास टंडन व सरोजिनी नायडू इत्यादी प्रमुख होते. घटना परिषदेत कृषीम्माचारी सारखे मध्यमवर्गीय व्यापारी, डॉक्टर राधाकृष्णन, एचसी मुखर्जी आणि केजी शहा सारखे प्राध्यापक, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर सारखे निष्णात वकील, कन्हैयालाल मुन्सी सारख्याविद्वानांचे

प्रतिनिधित्व घटना परिषदेत होते. याव्यतिरिक्त श्रीमती सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, बेगम रसूल आदी स्त्रियांनाही घटना समितीत प्रतिनिधित्व मिळाले होते, स्वातंत्र्य संग्रामातील मौलाना अबुल कलाम आजाद, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यासारखे मान्यवर नेते घटना समितीवर होते.

मसुदा समितीने देशातील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात घेऊन व जगातील प्रमुख देशांच्या घटनांचा अभ्यास करून घटनेचा मसुदा तयार केला . तो ३० सप्टेंबर १९४७ रोजी घटना समितीत सादर केला. या मसुद्यात ३१५ कलमे आणि ८ परिशिष्टे होती. यानंतर घटनेच्या कलमांची चर्चा आणि घटनेची कलमे कशी मान्य करावी याबाबत निर्णय होऊन घटना परिषदेचे सहावे अधिवेशन २७ जानेवारी १९४८ला भरले. एका दिवसाच्या कामकाजानंतर फेब्रुवारी १९४८ मध्ये मसुदा समितीचा मसुदा जनतेच्या माहितीसाठी आणि चर्चेसाठी जाहीर करण्यात आला. जनतेकडून यावर विविध प्रकारच्या दुरुस्त्या सुचवण्यात आल्या. ४ नोव्हेंबर १९४८ पासून मसुद्यावर आणि जनतेने पाठवलेल्या सूचनांवर चर्चा करण्यात आली. जनतेच्या ६७३५ सूचनांपैकी ५४७३ सूचनांवर चर्चा करण्यात आली. ही चर्चा साधारणपणे दोन महिन्यांपर्यंत चालली.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेचे अंतिम वाचन झाले. त्यावर साधक-बाधक चर्चा झाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी घटनेवर स्वाक्षरी करून घटना संमत झाल्याचे जाहीर केले. *(डॉ. सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१५: पृ. १७)* २६ जानेवारी १९५० रोजी ही घटना भारतासाठी लागू करण्यात आली आणि भारत हा प्रजासत्ताक म्हणून जगाच्या क्षितिजावर उदयास आला .

## १.५ भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत भारताच्या घटनेची उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत. कायद्याच्या दृष्टीने ही प्रस्तावना म्हणजे घटनेचा भाग नसला तरी ती भारतीय राज्यघटनेची आधारशिला आहे . स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भारतीय नेत्यांनी जे आदर्श जोपासले होते त्यांचा आविष्कार राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत झालेला आहे. ***"आम्ही भारताचे लोक भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक बनवण्यासाठी तसेच त्याच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म व उपासनचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व संधीची समानता देण्याकरिता व त्या सर्व लोकांची प्रतिष्ठा,राष्ट्राचे ऐक्य व अखंडता सुनिश्चित करणारा बंधुभाव वाढवण्यासाठी दृढ संकल्प होऊन आपल्या या घटनेला आज २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीत अंगीकृत, अधिनियमित आणि आत्मार्पित करीत आहोत"***. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेल्हेकर : ५०७)* अशा प्रकारे भारताच्या राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत भारताच्या मानवतावादी आदर्शांचे प्रतिबिंब उमटलेले आहे. माणसामाणसातील उच्च-नीच हा भेदभाव नष्ट करून सर्वांना समान पातळीवर आणण्याचे उद्दिष्ट त्यावरून स्पष्ट होते. शिवाय राष्ट्राच्या घटनेचे उगमस्थान कोणते, राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे राहणार व त्या राज्यव्यवस्थेचा प्रमुख उद्देश कोणता हे ही त्यावरून स्पष्ट होते. त्या अनुषंगाने भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१ प्रदीर्घ लिखित घटना**:

भारताची राज्यघटना इंग्लंडच्या घटनेप्रमाणे अलिखित नसून ३९५ कलमे व ८ परिशिष्ट यांची मिळून एक प्रदीर्घ लिखित घटना आहे. इंग्लंडची राज्यघटना अलिखित आणि उत्क्रांत आहे. मॅग्नाचार्टा पासून आज पर्यंत वेळोवेळी झालेल्या कायद्यातून, रूढी प्रथा-परंपरेतून त्या देशाचा राज्यकारभार चालतो म्हणून ती अलिखित आहे. मात्र आपली भारतीय राज्यघटना मुद्दाम जाणीवपूर्वक तयार करण्यात आली म्हणून तिचे स्वरूप लिखित आहे. जगातील इतर देशांच्या घटनांची तुलना केल्यावर असे लक्षात येते की भारताची घटना प्रदीर्घ आहे. चीनची राज्यघटना १०७ कलमांची, ऑस्ट्रेलियाची १२४, कॅनडा १४७, अमेरिकेची ७ कलमांची आणि दक्षिण आफ्रिकेची १५४ कलमांची राज्यघटना आहे. त्यामानाने भारताची राज्यघटना खूपच प्रदीर्घ स्वरूपाची आहे कारण घटक राज्यांना स्वतःच्या घटना नाहीत, त्यांच्या प्रशासनाचा समावेश एकाच घटनेत करण्यात आलेला आहे. तसेच लोकसेवा आयोगापासून निर्वाचन आयोगापर्यंत सर्व माहिती यात तपशिलाने दिली आहेत. राज्यांनी कोणकोणती कामे करावी त्याचाही उल्लेख यात आहे. अधिकारांचे उल्लंघन झाले तर कोणत्या घटनात्मक उपयोजना आखाव्यात याचेही तपशीलवार वर्णन घटनेमध्ये केलेले आहे. नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्यांचेही विस्तृत वर्णन आपल्या राज्यघटनेत केलेले आहे. संकटकाळात कोणता मार्ग काढावा याचाही भाग घटनेत आला आहे . त्यामुळे तिचे स्वरूप विस्तृत झाले आहे . एकूणच केंद्र व राज्य सरकार यांचे स्वरूप, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, न्यायपालिका, संघ व घटक राज्यांच्या अधिकारांची विभागणी, निर्वाचन आयोग इत्यादी सर्वच बाबींचा खुलासेवार तपशील घटनेत असल्याने भारताची घटना कोणत्याही राष्ट्राच्या राज्यघटनेपेक्षा प्रदीर्घ अशी आहे.

**२. विविध देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव**:

भारतीय राज्यघटना तयार करत असताना त्यावर विविध देशांच्या राज्यघटनेचा प्रभाव पडलेला दिसून येतो. संसदीय लोकशाही इंग्लंडच्या धर्तीवर आधारलेली आहे तर मूलभूत हक्कांचा आधार हा अमेरिकन राज्यघटना आहे. राज्यांची मार्गदर्शक तत्वे ही आयर्लंडच्या घटनेवरून घेतलेली आहे. जर्मनीच्या राज्यघटनेतून आणीबाणी विषयक तरतुदींचा समावेश भारतीय राज्यघटनेत करून कठीण परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा याची तरतूद केलेली आहे. कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्याकडील रचनेप्रमाणे आपण विकेंद्रात्मक स्वरूपाचे संघराज्य स्वीकारले असून केंद्र आणि राज्यांच्या अधिकारांची व कामाची वाटणी केलेली आहे.अमेरिकेच्या अध्यक्षांप्रमाणे भारताचा राष्ट्रपती हा राष्ट्रप्रमुख असला तरी तो शासन प्रमुख नाही. तो इंग्लंडच्या राजाप्रमाणे नामधारी राष्ट्रप्रमुख असून राष्ट्राच्या ऐक्याचे प्रतीक आहे. अशाप्रकारे भारताची परिस्थिती व आकांक्षा यांचा संदर्भ लक्षात घेऊन घटनेचे स्वरूप निश्चित करण्यात आले आहे.

**३. संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार**:

भारतीय घटनेनुसार भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. ब्रिटिशांच्या राजकीय व्यवस्थेकडून आपण ही पद्धती स्वीकारलेली आहे. ब्रिटिशांच्या काळात ही व्यवस्था आपल्याकडे विकसित झाली. या व्यवस्थेनुसार केंद्र आणि राज्यात दोन्ही ठिकाणी जनतेद्वारे निवडलेल्या बहुमत असलेल्या पक्षाचे सरकार सत्तेवर येते. केंद्रामध्ये

पंतप्रधान व राज्यामध्ये मुख्यमंत्री हेशासनाचे वास्तविक प्रमुख असतात. त्याचप्रमाणे राष्ट्रपती आणि राज्यपाल ही घटनात्मक नामधारी प्रमुख असतात. कार्यकारी मंडळ विधानमंडळाला म्हणजेच लोकप्रतिनिधींना जबाबदार असते म्हणजे खरी सत्ता लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या हाती असते. लोकप्रतिनिधींची निवड सार्वत्रिक प्रोढ मताधिकार व गुप्त मतदान पद्धतीने केली जाते.१८ वर्षावरील सर्व भारतीय नागरिकांना कोणत्याही प्रकारे वंश, धर्म, जात, स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता मतदान करण्याचा अधिकार दिला गेला आहे. *(डॉ.सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५: पृ. २४)*

**४. संघराज्यात्मक शासनपद्धतीचा स्वीकार:**

भारतीय राज्यघटनेने संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक विविधता असलेल्या आणि प्रचंड भूभाग असलेल्या देशाला संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारावी लागते. या पार्श्वभूमीवर भारताने संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारली आहे. विकेंद्रातमक प्रवृत्तीतून संघराज्य निर्माण होत असते.आज भारतात एक केंद्र सरकार आणि २९ घटक राज्य आहे. भारताचा भूप्रदेश फार मोठा असल्यामुळे भारतात संघराज्य पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. संघराज्यात एक केंद्र सरकार व अनेक घटक सरकारे असतात. केंद्र व राज्यात अधिकाऱ्यांचे वाटप झालेले असते. भारतात केंद्र सूची, राज्य सूची आणि समवर्ती सूची द्वारे अधिकार व कामाचे वाटप झालेले आहे. केंद्राला अधिक अधिकार तर राज्यांना कमी अधिकार आहेत. देशाच्या परिस्थितीच्या संदर्भातून विचार केल्याने ही रचना अधिक फायदेशीर ठरली आहे. संघराज्यात केंद्र व राज्य यांच्यातील तंटे मिटवण्यासाठी निपक्षपाती अशी संस्था म्हणजे सर्वोच्च न्यायालय असते. ही सर्व वैशिष्ट्ये भारतीय राज्यघटनेत दिसून येतात, म्हणून ही संघराज्य पद्धती आहे. राज्यघटना, केंद्र व घटक राज्य यांच्यात अधिकार विभागणी, स्वतंत्र न्यायपालिका ही भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये संघात्मक असली तरी शक्तिशाली केंद्र, केंद्र व घटक राज्य यांची समान घटना, एकेरी न्यायव्यवस्था व एकेरी नागरिकत्व, संकटकालीन घोषणा करण्याचा किंवा घटक राज्यांच्या सीमेत बदल करण्याचा संसदेला असलेला अधिकार ह्या गोष्टी एकात्मकतेच्या द्योतक आहे. म्हणजेच भारतीय राज्यघटनेचे स्वरूप संघात्मक असले तरी मूळ गाभा मात्र एककेंद्रात्मक आहे. *(डॉ.सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१५: पृ. २६)*

**५. लोकांचे सार्वभौमत्व:**

भारतीय घटनेने लोकांचे सार्वभौमत्व हे तत्त्व प्रस्थापित केले आहे. घटनेची सुरुवात भारतीय जनतेच्या नावाने करण्यात आली आहे. भारत हे प्रजासत्ताक गणराज्य असेल असे त्यात स्पष्ट केले आहे. राज्यकारभारातील संपूर्ण अधिकार जनतेच्या हाती देण्यात आले आहेत. भारतात सरकार जनतेच्या प्रतिनिधींचे असेल, लोकांचे कल्याण हेच शासनाचे ध्येय असेल, राष्ट्र प्रमुखांची निवडणूक जनतेचे प्रतिनिधी करतील, घटनेत बदल करण्याचा अंतिम अधिकार जनतेच्या प्रतिनिधींचा असेल, या सर्वच तत्त्वांमूळे भारतीय राज्यघटनेने लोकांचे सार्वभौमत्व स्वीकार केलेले आहे.

### ६. धर्मनिरपेक्षता :

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती केली आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध किंवा अधार्मिकता नव्हे किंवा धर्मावर विश्वास नसणे हा अर्थ नसून राज्याने कोणत्याही धर्माशी विशेष संबंध न ठेवणे होय. भारतीय घटनेने सर्व धर्मांना समान संधी व वागणूक दिली. धर्माच्या आधारावर येथे कोणताही भेदभाव पाळला जाणार नाही. प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य व उपासना स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतता समितीने भारतातील सर्वधर्मसमभावाचे कौतुक करून या तत्त्वाला उत्तेजन दिले आहे. घटनेनुसार प्रत्येकाला सार्वजनिक ठिकाणी मुक्त प्रवेश करता येईल. प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार आचार, विचार व शिक्षणाचे स्वातंत्र्य असेल. हेच घटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप होय. आमची राज्यघटना धर्मविरोधी किंवा धर्मदिष्टीत नाही तर धर्मनिरपेक्ष आहे म्हणजेच विशिष्ट धर्म हा राज्याचा आधार नाही, यावरून हे सिद्ध होते की,राज्य कोणाच्याही धर्मात ढवळाढवळ करणार नाही. तरी पण नागरिकांच्या व्यापक हितासाठी आवश्यक वाटल्यास राज्य काही बाबतीत हस्तक्षेप करू शकेल. ४२व्या घटना दुरुस्तीनंतर धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा समावेश घटनेच्या उद्देशपत्रिकेतच करण्यात आल्यामुळे जगाच्या मोजक्या धर्मनिरपेक्ष देशात भारताचा समावेश झाला आहे.

### ७. मूलभूत अधिकार :

भारतीय राज्यघटनेतील कलम १२ ते ३५ नागरिकांच्या मूलभूत हक्काविषयी आहे. भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत अधिकारावर भर देण्यात आला आहे. म्हणून ग्रॅनव्हिल आस्टिनने मूलभूत हक्कांना भारतीय घटनेचा आत्मा मानले आहे. नागरिकांना मिळत असलेल्या मूलभूत अधिकारावरूनच राज्याची उपयुक्तता लक्षात येत असते. या मूलभूत अधिकाराने प्रत्येकाला सुरक्षितता, समता व प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणारे हे हक्क असून घटनादुरुस्ती केल्याशिवाय हेमूलभूत अधिकार कोणालाही काढून घेता येत नाही. मुख्य म्हणजे मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी खास घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे. समतेचा अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार, शोषनाविरुद्धचा अधिकार, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, सांस्कृतिक अधिकार आणि शेवटचा घटनात्मक उपाययोजना. यासात मूलभूत अधिकारांचा निर्देश घटनेत करण्यात आला आहे. पहिल्या सहा अधिकारांच्या रक्षणाकरता सातव्या अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना दिलेली मान्यता लोकशाहीतील जनकल्याणाची हमी मानले जाते.

### ८. राज्यांची मार्गदर्शक तत्त्वे:

देशाचे शासन जास्तीत जास्त लोककल्याणकारी स्वरूपाचे असावे या हेतूने मार्गदर्शक तत्वे राज्यघटनेत नमूद करण्यात आली आहे. ही तत्त्वे निश्चित करताना आयर्लंडच्या घटनेचा प्रामुख्याने आधार घेतलेला आहे. भारताने कल्याणकारी राज्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार जनतेच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना कार्यान्वित कराव्या लागतात. सामाजिक न्याय, समान संधी, समता व समाजवाद या कल्याणकारी मूल्यांची हमी घटनेच्या उद्देशांमध्ये दिलेली आहे. या तत्त्वाला अनुसरून धोरणे आखावी लागतात व त्याची कार्यवाही करावी लागते. ऐवढे प्रचंड कार्य केवळ केंद्र सरकारकडून पूर्ण होऊ शकत

munotes.in

नाही, म्हणून जनकल्याणाची भूमिका गृहीत धरून राज्यांनी काही कामे करावीत या उद्देशाने राज्यघटनेच्या चौथ्या प्रकरणात राज्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्य, समता, संधी, सामाजिक न्याय यांची पूर्तता करण्यासाठी या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग होतो. जनतेच्या इच्छा आकांक्षा यातून साकार होऊ शकतात, समाजाची व त्यातून राष्ट्राची प्रगती करण्याची ते एक साधन ठरू शकते, सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचा पाया यातून मजबूत केल्या जाऊ शकतो. मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी राज्यांच्या इच्छेवर असून त्याबाबत सक्ती करता येत नाही, म्हणजे मार्गदर्शक तत्वे हे न्यायालयाच्या कक्षेबाहेर आहेत. परंतु गेल्या काही वर्षांपासून न्यायालयाने सुद्धा मार्गदर्शक तत्त्वांना प्राधान्य देणारे निवाडे दिलेले आहेत. अशाप्रकारे शासनाच्या दृष्टीने ही तत्वे नीतिनिर्देशक असतात. मूलभूत अधिकारांना जसा कायद्याचा पाठिंबा आहे तसा तो मार्गदर्शक तत्वांना नाही. परंतु शासकीय कामकाज चालवतांना या मार्गदर्शक तत्त्वांनुसार चालावे अशी अपेक्षा घटनेमध्ये नमूद केली आहे. त्या तत्वांच्या पाठीशी जनमताची शक्ती असल्याने कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर असले तरी त्याला मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणे सहजासहजी शक्य होत नाही.

**९. प्रौढ मताधिकार:**

नागरिकत्व बहाल करताना घटनेने जे उदार धोरण स्वीकारले आहे, तेच प्रौढ मतदान पद्धती बाबतही स्वीकारले आहे. यानुसार अठरा वर्षाच्या वरील सर्व स्त्री-पुरुषांना निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. त्यासाठी धर्म, जात, वंश, भाषा, प्रांत, लिंगभेद आशा कोणत्याही गोष्टीचा अडथळा येऊ शकणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे. या पद्धतीमुळे भारतात लोकशाही खऱ्या अर्थाने निर्माण झाली आहे.

**१०. मूलभूत कर्तव्यांचा समावेश** :

४२व्या घटना दुरुस्तीने घटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला गेला. त्यानुसार नागरिक ज्याप्रमाणे मूलभूत अधिकारांची मागणी करू शकतात त्याचप्रमाणे काही कर्तव्यांचे बंधने त्यांच्यावर टाकण्यात आले आहे. रशियन राज्यघटनेत आणि जर्मन राज्यघटनेत कर्तव्य समाविष्ट करण्यात आली आहेत त्याचा प्रभाव आपल्या राज्यघटनेवर पडलेला आहे. त्यामुळे अधिकारांबरोबर कर्तव्यांचाही समावेश भारतीय राज्यघटनेत केला गेलाआहे. राज्यघटना, राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाचा मान ठेवणे, स्वातंत्र्यलढ्यातील उदात्ततत्वांचे जतन करणे, भारताच्या सार्वभौमत्वाचे व ऐक्याचे रक्षण करणे, देश संरक्षणासाठी वाहून घेणे, भातृभाव वृद्धिंगत करून महिलांची प्रतिष्ठा जतन करणे, विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीचा आदर करणे, नैसर्गिक वातावरणाचे जतन करणे, वन्य प्राण्यांवर दया करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, हिंसेचा त्याग करणे अशी काही प्रमुख मूलभूत कर्तव्य घटनेत सांगितलेली आहे. केवळ अधिकार मागायचे त्या बदल्यात कर्तव्य मात्र काहीच करायचे नाही असे चित्र निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर कर्तव्यांची नोंद महत्त्वाची ठरली आहे. असे असले तरी मूलभूत कर्तव्यांचा समावेश घटनेच्या प्रकरणचारमध्ये करण्यात आल्यामुळे त्यांना न्यायालयाचे पाठबळ मिळत नाही.

munotes.in

**११. एकेरी नागरिकत्वाचा स्वीकार**:

अमेरिकेने दुहेरी नागरिकत्वाची पद्धती स्वीकारलेली आहे. संपूर्ण अमेरिकेचे नागरिकत्व आणि तो नागरिक ज्या राज्याचा रहिवाशी आहे त्या राज्याचे नागरिकत्व अशी दुहेरी व्यवस्था तेथे आहे. भारताने मात्र एकेरी नागरिकत्वाची पद्धती स्वीकारलेली आहे. व्यक्ती कोणत्याही घटक राज्याची रहिवासी असली तरी तो फक्त भारताचा नागरिक असतो. आपण फक्त भारताचे नागरिक आहोत, महाराष्ट्राचे किंवा तामिळनाडूचे नागरिक नाही, यालाच एकेरी नागरिकत्व म्हणतात. त्याचबरोबर नागरिकत्व देतांना जात, धर्म, वंश, लिंग, वर्ग असा कोणताही भेदभाव केला जात नाही. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना नागरिकत्व मिळू शकले. एकेरी नागरिकत्वाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ झाली व फुटीरवादी प्रवृर्तिला आळा बसला. आम्ही सर्व एक आहोत ही एकात्मतेची भावना एकेरी नागरिकत्वाच्या पद्धतीतून व्यक्त होत असते. म्हणून एकेरी नागरिकत्वाचा स्वीकार भारतीय राज्यघटनेने केलेला आहे.

**१२. स्वतंत्र न्यायपालिका:**

राजकीय सत्तेच्या दबाव न्यायदानावर येऊ नये म्हणून विधिमंडळ व कार्यकारीमंडळ यापासून भारतातील न्यायपालिका स्वतंत्र करण्यात आलेली आहे. त्यासाठी न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला असला तरी त्याला बडतर्फ करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला देण्यात आलेला नाही. त्याकरता विशिष्ट पद्धती घालून देण्यात आलेली आहे. न्यायाधीशांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता विवेकाने निर्णय द्यावेत म्हणून न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे. घटनेचा निर्णयाक अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायालयावर टाकल्यामुळे तर हे स्वातंत्र्य आवश्यकच ठरले आहे. भारतीय राज्यघटनेने न्यायालयीन पुनर्लोकनाचा स्वीकार अमेरिकेकडून केला आहे. या तत्त्वानुसार संसदेने पास केलेला कोणताही कायदा जर घटनाबाह्य असेल आणि त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा येत असेल तर असा कायदा रद्द करण्याचा व घटनाविरोधी म्हणून जाहीर करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.संसदेच्या निरंकुश अधिकारावर अशी मर्यादा टाकून घटनाकारांनी सत्ता समतोल राखला आहे. न्यायालयीन पुनर्लोकनाची तरतूद घटनेच्या कलम १३मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. समतोल आणि नियंत्रण या प्रक्रियेत कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यातील प्रत्येक शाखा दुसऱ्या शाखेवर नियंत्रण ठेवते. या सर्वात न्यायालयाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते.

**१३. ताठर आणि लवचिकतेचे मिश्रण:**

भारतीय राज्यघटना अंशतः ताठर आणि अंशतः लवचिक आहे. घटना बदलण्याच्या प्रक्रियेवरून घटनाही लवचिक आहे की ताठर आहे हे ठरवलेजाते. घटना बदल जेव्हा कठीण व गुंतागुंतीचा असतो तेव्हा ती परीदृढ घटना मानली जाते. भारताच्या राज्यघटनेत काही कलमांच्या बाबतीत अशीच पद्धत ठरवण्यात आली आहे.जर समजा राष्ट्रपतीच्या निवडणूक पद्धतीत बदल घडवायचा असेल किंवा संसदेतील घटक राज्यांचे प्रतिनिधित्व बदलायचे असेल तर घटना बदलणे अतिशय अवघड आहे. याबाबतीत बदल करायचा असेल तर संसदेच्या एकूण सभासदांचे बहुमत आणि उपस्थित राहून मतदान करणाऱ्या

सभासदांचे दोन तृतीयांश बहुमत तसेच एकूण घटक राज्यांपैकी अर्ध्या राज्यांनी त्यास मान्यता असावी लागते. म्हणून आपली राज्यघटना काही बाबतीत ताठर आहे असे म्हणता येईल. उलट काही बाबतीत बदल करणे अतिशय सोपे आहे, जर समजा घटक राज्यांच्या नावात किंवा प्रदेशात बदल करायचे असेल किंवा घटक राज्यातील वरिष्ठ सभागृह कायम बरखास्त करायचे असेल किंवा त्याची कायम निर्मिती करायची असेल किंवा घटनेत एखाद्या नव्या भाषेचा समावेश करायचा असेल तर संसदेतील साध्या बहुमताने या संबंधित कलमात बदल करता येतो. घटनेच्या या वैशिष्ट्याबद्दल बोलताना डी.डी. बसू म्हणतात की, “आपली राज्यघटना जेवढ्या प्रमाणात लवचिक आहे तेवढ्या प्रमाणात दृढ मात्र नाही” घटनादुरुस्तीची पद्धत ३६८व्या कलमात स्पष्ट करण्यात आलेली आहे. राज्यघटना बदलणे हे राज्यकर्त्यांच्या लहरींवर अवलंबून असू नये याची काळजी घटनाकारांनी घेतलेली आहे. अशाप्रकारे भारतीय राज्यघटना लवचिक असली तरी त्यात सहजासहजी बदल करता येत नाही.

**१४. प्रगत राज्यघटना:**

जनतेच्या गरजेप्रमाणे वाढत्या इच्छा आकांक्षाप्रमाणे राज्यघटनेत योग्य ते कालमानाप्रमाणे बदल करून तिची वाढ करावी लागते, अशा घटनेला प्रगत राज्यघटना म्हणतात. भारताच्या राज्यघटनेमध्ये काळानुरूप बदल करण्याच्या सोय केलेली आहे. कारण बदलती परिस्थिती व सामाजिक परिवर्तन यानुसार घटनेत आवश्यक ते बदल होणे अगत्याचे असते. त्यानुसार काही नवीन कलमे वाढवावी लागतात तर काही गाळावी लागतात. राज्यघटना ही त्या देशाचा मूलभूत कायदा असते. लिखित तरतुदींप्रमाणे काही रूढीप्रथा परंपरा सारख्या अलिखित भागही महत्त्वाचा असतो. काही रुढींचे कायद्यात रूपांतर करावे लागते. त्यामुळे राज्यघटनेला जिवंतपणा प्राप्त होत असतो. प्रगत राज्यघटनेच्या प्रक्रियेतील पहिले स्थान त्यातील घटना दुरुस्तीला प्राप्त झाले आहे. मागासलेल्या जाती जमातींना संरक्षण देणाऱ्या तरतुदी १९५०मध्ये पहिल्या घटना दुरुस्तीने करण्यात आल्या.तर १९७६च्या ४२व्या घटना दुरुस्तीनुसार प्रस्तावनेत समाजवाद आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द नव्याने घालण्यात आल्यामुळे राज्यव्यवस्थेचा चेहरामोहराच बदलून गेला. ४४व्या घटना दुरुस्तीनुसार मूलभूत अधिकाऱ्यांच्या यादीतून मालमत्तेचा अधिकार रद्द करून त्याचा समावेश ३००व्या कलमात करण्यात आला. असे करीत करीत आतापर्यंत सुमारे ९८घटना दुरुस्त्या झाल्या आहेत. *(डॉ.सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१५: पृ. ३२)*

अशाप्रकारे घटनाकारांनी स्वतंत्र भारताच्या तत्कालीन गरजा व भविष्यकाळाचा आकांक्षा लक्षात घेऊन भारताची राज्यघटना तयार केली. भारतीय राज्यघटनेवर बऱ्याच विद्वानांनी टीकाटिप्पणी केली आहे . आयव्हर जेनिंग्ज यांच्यामते “भारतीय राज्यघटना प्रामुख्याने इंग्लड सारखी आहे. केवळ भारत सरकारच नव्हे तर राज्यसरकारे सुद्धा इंग्लंडच्या पद्धतीप्रमाणे जबाबदार सरकारे आहेत. भारत सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक आहे हे खरे असले तरी, आम्ही त्याला घटनात्मक राजेशाही म्हणू शकतो. कारण राष्ट्रपतीचे कार्य पूर्णपणे तसेच आहे जसे राजाचे आहे. केंद्र आणि राज्य यांच्या परस्पर संबंधावर विशेषतः व्यापार व वाणिज्य बाबत ऑस्ट्रेलियाच्या अनुभवाचा परिणाम जाणवतो. वर्णभेद आणि जाती याविषयीचा अपवाद वगळता अधिकार पत्रातील मूलभूत स्वातंत्र्य इंग्लंडच्या

घटनात्मक इतिहासाच्या अनुभवातून घेतले आहेत. काही बाबतीत अमेरिकेतील विवादांची छाप जाणवते. *"(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेलेकर :५१५)* काही इतिहासकारांनी भारतीय घटनेला 'कैची आणि गोंदचा' खेळ म्हटले आहे. तरी ज्या परिस्थितीमध्ये घटनेची निर्मिती करण्यात आली, त्या परिस्थितीमध्ये यापेक्षा चांगली घटना निर्माण करता आलीनसती. **एम व्हीपायली** म्हणतात की, "भारतीय घटना कार्य करण्यासारखा दस्तावेज आहे, हा दस्तावेज आदर्श आणि वास्तविकता यांचे मिश्रण आहे. ज्याने  भारतातील सर्व लोकांना एकत्र राहण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या निर्मितीचा आधार प्रधान केला आहे

## १.६ सारांश

ब्रिटिशांनी कायद्याचे राज्य भारतामध्ये स्थापन केले. कायद्याच्या आधारे राज्यकारभार करण्यासाठी ब्रिटिशांनी  वेळोवेळी घटनात्मक सुधारणाकरून कायदे केले. यात भारतीय राज्यघटनेची पाळेमुळे आपल्याला दिसून येतात. ब्रिटिशांनी भारताला वेळोवेळी ज्या घटनात्मक सुधारणा दिल्या त्याचाच सर्वोच्च परिणाम म्हणजे भारताचे स्वातंत्र्य आहे. भारताला स्वातंत्र्य द्यायचे होते म्हणून ब्रिटिशांनी भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना स्वातंत्र्योत्तर भारताची राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समितीची निर्मितीकेली. त्यामध्ये राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेल्या अनुभवी लोकांचा समावेश होता. या लोकांनी स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लोक जागृती करतांना उभे केलेले आदर्श आणि मूल्य यांचा घटनेमध्ये समावेश केला आणि भारताची राज्यघटना जगातील आदर्श राज्यघटना म्हणून नावारूपाला आली.२६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी तयार झालेल्या भारताच्या राज्यघटनेमध्ये भारताने  सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाहीचा पुरस्कार करून भारतीय नागरिकांना समान संधी आणि सामाजिक न्याय मिळावा यासाठी मूलभूत अधिकार आणि स्वतंत्र न्यायालय यांची स्थापना केली. संसदीय राज्यपद्धती स्वीकारून कायदे मंडळाला जबाबदार असलेले कार्यकारी मंडळ यांची रचना केली. हे कायदेमंडळ प्रौढ मताधिकाराद्वारे जनतेतून निवडून येणार असल्यामुळे अंतिम सत्ता जनतेचीच राहील याची खबरदारी भारतीय राज्यघटनेत घेतलेली आहे. भारताची एकता आणि अखंडता अबाधित ठेवण्यासाठी भारतीय राज्यघटनेने नागरिकांना एकेरी नागरिकत्व बहाल केले आहे. कालमानाप्रमाणे जनतेच्या  अपेक्षा पूर्ण करण्यासाठी घटनेमध्ये बदल करता यावे म्हणून त्या प्रमाणात तिला लवचिक बनवण्यात आले असून सरकारच्या लहरीपणामुळे तिच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जाऊ नये म्हणून घटना तितकीच ताठर बनवण्यात आलेली आहे. भारतीय राज्यघटनेवर अनेक विद्वानांनी टीका टिप्पणी केली असली तरी तत्कालीन परिस्थितीमध्ये यापेक्षा अधिक चांगली घटना निर्मिती होऊ शकणार नव्हती.या घटना निर्मिती मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष योगदान असून त्यांची विद्वत्ता आणि सामाजिक मूल्य  घटनेमध्ये  पदोपदी दिसून येतात. भारताच्या या आदर्श राज्यघटनेमुळे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये लोकशाहीची यशस्वी वाटचाल झालेली दिसून येते.

munotes.in

## १.७ प्रश्न

**१.** भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

**२.** भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीवर भाष्य करा.

**३.** राज्यघटनेतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

## १.८ संदर्भ


१. **आजादी के बाद का भारत-** बिपिन चंद्र .

२. **आधुनिक भारताचा इतिहास-** शांता कोठेकर.

३. **आधुनिक भारताचा इतिहास-**ग्रोवर आणि बेल्हेकर.

४. **भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास-** साहेबराव गाठाळ

५. **भारत का स्वतंत्रता संघर्ष-** बिपिन चंद्र

६. **भारतीय शासन आणि राजकारण –** डॉ. सुधाकर जोशी


❖❖❖❖

munotes.in

# २

# भारतीय संस्थानांचे विलीणीकरण आणि राज्यांची पुनर्रचना

**घटक रचना :**

२.१ उद्दिष्टे

२.२. प्रस्तावना

२.३ भारतीय संस्थानांचे विलीणीकरण

२.३.१ संस्थानांच्या विलीणीकरणाची पार्श्वभूमी :

२.३.२ जुनागड

२.३.३ हैदराबाद

२.३.४ काश्मीर

२.४ राज्यांची पुनर्रचना

२.४.१ राज्यपुनर्रचनेची पार्श्वभूमी

२.४.२ भाषावार राज्य पुनर्रचना

२.४.3 दार भाषावार समिती १९४८

२.४.४ जे. व्ही. पी. समिती १९४८

२.४.५ आंध्र प्रदेश व तामिळनाडूची निर्मिती १९५३

२.४.६ राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना १९५३

२.४.७ राज्य पुनर्रचना कायदा १९५६

२.४.८ महाराष्ट्र व गुजरातची निर्मिती १९६०

२.४.९ पंजाब व हरियाणाची निर्मिती १९६६

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.७ संदर्भ

munotes.in

## २.१ उद्दिष्टे

१. संस्थानांचे एकीकरण का आवश्यक होते याचा अभ्यास करणे.

२. प्रमुख संस्थानांच्या विलीनीकरणाचा अभ्यास करणे .

३. विलीनीकरणानंतर राज्यांच्या पुनर्रचनेची पार्श्वभूमी समजून घेणे.

४. पुनर्रचनेची आवश्यकता का होती याचा मागोवा घेणे.

५. विविध राज्यांच्या निर्मितीचा आढावा घेणे.

## २.२ प्रस्तावना

१७५७ च्या प्लासीच्या लढाईत विजय मिळवून भारतामध्ये ब्रिटिश सत्तेचा पाया घातला गेला. यावेळी भारतावर कोणत्याही राजकीय सत्तेचा एकछत्री अंमल नव्हता. म्हणून ब्रिटिशांनी जसे जसे प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणले तसे तसे त्यांची प्रशासन व्यवस्था उभी केली. त्यातील काही भागावर ब्रिटिशांची प्रत्यक्ष सत्ता होती तर काही भागांवर त्यांचे मांडलिकत्व पत्करलेल्या भारतीय राजांची सत्ता होती. यालाच संस्थाने म्हंटली जातात. या संस्थानांशी ब्रिटिशांनी करार करून त्यांना अंतर्गत स्वायत्तता दिली होती. मात्र परराष्ट्र व्यवहार आणि संरक्षण व्यवस्था ब्रिटिशांच्या हाती होती. अशा या संस्थांनांची संख्या भारतामध्ये सुमारे ५६२ होती. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर, बेलेकर: ६५२)* ही संस्थाने ब्रिटिशांची एकनिष्ठ होती आणि भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळीस सुरुवात झाल्यानंतर भारतीय जनतेच्या असंतोषाला अटकाव करण्यासाठी त्यांनी आघात प्रतिबंधक म्हणून कार्य केले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीस यश येऊन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला व ब्रिटिश सत्ता भारतातून नष्ट झाली. त्यामुळे आपोआपच या देशी संस्थानावरील ब्रिटिशांची सर्वोच्च सत्ता आपोआपच समाप्त झाली . भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यामध्ये या संस्थांनाना स्वतंत्र राहण्याचा किंवा भारत किंवा पाकिस्तान या मधून कोणत्याही देशात विलीन होण्याचा अधिकार देण्यात आला. भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांचे सचिव मेनन यांच्या साह्याने या ५६२ संस्थानांपैकी जुनागड, हैदराबाद आणि काश्मीर हीसंस्थाने वगळता १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी बाकी संस्थानांना भारतात विलीन करण्यास यश मिळवले आणि स्वातंत्र्यानंतर जुनागड, काश्मीर आणि हैदराबाद यांना लष्करी बळावर भारतात सामील करून घेण्यात आले.

या संस्थानांना विलीन करून घेताना कोणताही स्पष्ट नियम न लावता आजूबाजूच्या इतर राज्यांमध्ये किंवा स्वतंत्रपणे त्यांची रचना करण्यात आले. परंतु स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा समोर आला. त्याचे पहिले यश म्हणजे तेलगू भाषिक आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती होय. यानंतर भाषावार प्रांतरचनेची चळवळ उभी राहून भारत सरकारला भाषावार प्रांतरचनेसाठी आयोग नेमावा लागला. या आयोगाच्या अहवालाच्या आधारे भाषावार प्रांतरचनेला संमती दिली व भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यात येऊ लागली

त्यातूनच महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, हरियाणा अशा राज्यांची निर्मिती झाली आणि आजही या मागणीमध्ये खंड पडलेला दिसून येत नाही.

## २.३ भारतीय संस्थानांचे विलीणीकरण

### २.३.१ संस्थानांच्या विलीणीकरणाची पार्श्वभूमी:

इसवी सन १७५७ मधील प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. त्यावेळी भारतामध्ये कोणतीही एक संघ सत्ता नव्हती लहान मोठ्या राजकीय सत्तांमध्ये भारत देश विभागलेला होता. त्यामुळे ब्रिटिशांनी जसे जसे प्रदेश आपल्या ताब्यात घेतले तस-तशी आपल्या सोयीच्या दृष्टीने प्रशासन व्यवस्था उभी केली. त्याला कोणताही शास्त्रीय आधार नव्हता. त्यांनी काही भागावर आपले प्रत्यक्ष शासन स्थापित केले तर काही भागांवर भारतीय राज्यांची मांडलिक असलेली राज्य होती. त्यांनाच आपण संस्थाने म्हणतो. अशा संस्थानांची संख्या भारतामध्ये सुमारे ५६२ इतकी होती आणि त्यांनी एकूण ७,१२,५०८ चौरस मैल भूभाग व्यापला होता. त्यात काही मोठी राज्य होती तर काही अगदी लहान होती. हैदराबादचे राज्य इटली इतके मोठे होते व त्याची लोकसंख्या १ कोटी ४० लाख होती तर उत्पन्न साडेआठ कोटी रुपये होते. दुसऱ्या बाजूला बिलबारीचे राज्य होते ज्याची लोकसंख्या केवळ सत्तावीस होती व वार्षिक उत्पन्न आठ रुपये होते १९४१ मधील अंदाजाप्रमाणे दहा चौरस मैलांपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेली २०२ राज्य, पाच चौरस मैलां पेक्षा कमी क्षेत्रफळाची १३९ राज्य तर एक चौरस मैलांपेक्षा जास्त क्षेत्रफळ नसलेली ७० राज्य होती. बहुसंख्य राज्य भारताच्या कमी उपजाऊ प्रदेशात व दुर्गम भागात होती. कंपनीने भारतात विजय कार्य करतांना सागरी किनाऱ्यावरील महत्त्वाचे प्रदेश, समुद्रमार्गाने सहज आवागमन करता येतील अशी मोठमोठ्या नद्यांची सुपीक खोरी व श्रीमंत प्रदेश यावर जास्त लक्ष केंद्रित केले होते. (*आधुनिक भारताचा इतिहास: ग्रोवर, बेलेकर ; २९४*)

या राज्यांप्रती ब्रिटिशांची नीती काळानुरूप बदलत गेली. ब्रिटिश कालखंडात दत्तक वारस नामंजूर तसेच कुप्रशासनाच्या नावाखाली सातारा, झांसी, नागपूर, अवध यासारख्या अनेक संस्थानांचे विलीनीकरण करण्यात आले. परंतु १८५७च्या उठावा पासून धडा घेऊन ब्रिटिशांनी या राज्यांच्या बाबतीत मैत्रीपूर्ण धोरण अवलंबले आणि या राज्यांनीही ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहून भारतीयांच्या राजकीय असंतोषा विरुद्ध संरक्षणात्मक भिंतीचे कार्य केले. भारतामध्ये राष्ट्रीय चळवळीचा उदय झाल्यानंतर त्याचा प्रभाव संस्थानातील प्रजेवर पडणे स्वाभाविक होते. त्यातूनच या संस्थानांमध्ये *प्रजा परिषदांची* स्थापना होऊन राजांच्या अन्यायी आणि सरंजामशाही शासनाविरुद्ध आवाज उठवण्यास प्रारंभ झाला व ही चळवळ राष्ट्रीय चळवळीशी जोडली गेली. ३ डिसेंबर १९३८रोजी **महात्मा गांधींनी** घोषणा केली की, "राज्यांमध्ये निर्माण झालेली जागृती म्हणजे काळाची मागणी आहे आणि पूर्णपणे जबाबदार शासनात राज्यांनी स्वतःचे अस्तित्व गमावणे निश्चित ठरले आहे , यात कोणताही अन्य मार्ग असू शकत नाही". (*आधुनिक भारताचा इतिहास: ग्रोवर, बेलेकर ; ३०२*) दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतातील राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला. ब्रिटिशांबरोबर कॉंग्रेसने असहकार्याचे धोरण अवलंबिले. म्हणून भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी ब्रिटिश सरकारने अनेक प्रयत्न केले. क्रिप्स मिशन -१९४२, वेवेल योजना -१९४५, त्रिमंत्री योजना-१९४६ आणि प्रधानमंत्री ॲटली यांची घोषणा २० फेब्रुवारी १९४७ म्हणजे या

प्रयत्नांचा एक भाग होता. वरील सर्वच प्रस्तावामध्ये भारतीय राज्यांबाबत विचार करण्यात आला होता. क्रिप्स मंडळाच्या योजनेत राज्यांची सर्वोच्च सत्ता दुसऱ्या कोणाकडे सोपविण्याचा प्रस्ताव नव्हता. स्वतः राज्यांनीही आपला सार्वभौम सत्ता असलेला वेगळा संघ जो भारतात तिसरी शक्ती म्हणून काम करू शकेल बनवण्यावर विचार केला होता. भोपाळच्या नवाबाने अशी अपेक्षा व्यक्त केली की ,*"भारतीय राज्यांना अनाथ बनवून इंग्रज जाणार नाहीत व हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतील".* परंतु २० फेब्रुवारीच्या ॲटलीची घोषणेत व 3 जूनच्या लॉर्ड माऊंटबॅटनच्या योजनेत स्पष्ट केले की, भारतीय राजांवरील ब्रिटिशांची सर्वोच्च सत्ता समाप्त होईल आणि भारतीय राज्यांना पाकिस्तानात वा भारतात सामील होण्याचे स्वातंत्र्य असेल. माउंटबॅटनने राज्याला किंवा राज्यांच्या संघाला स्वतंत्र प्रदेश म्हणून राहण्यास मान्यता दिली नाही.

हंगामी सरकारमध्ये संस्थानासंबंधीचे खास खाते निर्माण करून त्याची जबाबदारी सरदार वल्लभभाई पटेलांकडे देण्यात आली आणि त्यांच्या मदतीला सचिव म्हणून वी. पी. मेनन यांची नियुक्ती केली. विलीनीकरणासाठी राजांची मान्यता मिळवणे अतिशय बिकट असल्याची पूर्ण जाणीव पटेलांना होती. याबाबतीत राजांवर अवास्तव्य दडपण आणल्यास संस्थानात नव्या जटिल समस्या  असंतुष्ट संस्थानिक उभ्या करतील हे ते जाणून होते. म्हणून त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे दडपण न आणता, संस्थानी प्रजेवरील त्यांचे अधिकार त्यांनी भारत सरकारच्या हाती स्वखुशीने सोपवून देणे त्यांच्या हिताचे ठरेल, असे केल्यास प्रशासकीय जबाबदारीतून ते मुक्त होतील, प्रजेच्या रोषाला त्यांना तोंड द्यावे लागणार नाही आणि त्यांच्या संपत्तीचा शांततेने उपभोग घेण्यास ते मोकळे होतील, हे संस्थानिकांच्या मनावर ठसवण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. अल्पावधीतच सरदार पटेलांच्या मुत्सद्देगिरीला यश आले आणि विलिनीकरणास संस्थानिकांनी मान्यता दिली. परंतु जुनागड, हैदराबाद व काश्मीरच्या संस्थानिकांनी उपस्थित केलेल्या समस्यांचे निराकरण भारत सरकारला करावे लागले. वरील तीन संस्थानांपैकी जुनागड व हैदराबाद येथील गुंता सरदार पटेलांनी बळाचा सोडविला. मात्र काश्मीरचा प्रश्न गुंतागुंतीचा होऊन बसला तो अद्यापही सुटलेला नाही.

### २.३.२ जुनागड:

ज्या दिवशी भारत स्वतंत्र झाला त्याच दिवशी जुनागड संस्थानाच्या **नवाब महाबतखानाने** जुनागड पाकिस्तानात सामील झाल्याची जाहीर घोषणा केली. केवळ भौगोलिक दृष्ट्या नव्हे तर आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या जुनागड हा काठीयावाडचा अविभाज्य घटक होता. या संस्थानातील एकूण प्रजेपैकी २० टक्के मुसलमान तर ८० टक्के हिंदू होते. जुनागडचा नवाब इस्लाम धर्मीय होता आणि अतिशय चैनी विलासी होता. त्याने सुमारे ८०० कुत्री पाळली होती आणि या कुत्र्यांवर तो दरमहा १६ हजार रुपये खर्च करी. या नवाबाचे वर्णन हॉडसन या इतिहासकाराने '*द ग्रेट डिव्हाइड*' या आपल्या ग्रंथात 'पत्यातला जोकर' असे केलेले आहे. *(आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२०००; शांता कोठेकर, २३८)* जुनागडचा नवाब मुसलमान असल्यामुळे त्याला पाकिस्तान मध्ये ओढण्याचा जीनांचा प्रयत्न होता. जीनांनी त्याच्यावरील दडपण वाढवून त्याला मदतीची भरघोस आश्वासने दिली. मे १९४७ मध्ये त्याने शहानवाज भुत्तो या मुस्लीम लीगच्या सदस्याची जुनागडच्या दिवान पदी नियुक्ती केली आणि भुत्तो मार्फत जिना जुनागड मधील सूत्रे हलवू लागले .

भारतामध्ये सामीलीकरणाचे करारपत्र महाबतखानाकडे स्वाक्षरीसाठी धाडण्यात आले असता भुत्तोच्या सल्ल्यानुसार सामीलीकरणाबाबत अजून आपण कोणताही निर्णय घेतलेला नाही असे त्याने १३ ऑगस्ट १९४७ ला सरदार पटेल यांना कळवले आणि त्यानंतर दोनच दिवसांनी भारताच्या स्वातंत्र्यदिनी पाकिस्तानात सामील झाल्याची घोषणा महाबतखानाने करून टाकली. जुनागडच्या विशिष्ट भौगोलिक स्थितीमुळे महाबतखानाचा हा निर्णय काठीयावाडाच्या ऐक्याला धोका निर्माण करणारा होता. त्यामुळे भारत सरकार अस्वस्थ झाले. त्याचबरोबर काठीयावाडातील सर्व नरेषांनी त्याला प्रखरपणे विरोध केला. भारत सरकारने पाकिस्तानशी या बाबत पत्रव्यवहार केला. तेव्हा १३ सप्टेंबर १९४७ला जुनागड पाकिस्तानात सामील करून घेत असल्याचे व पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घेण्याचा नवाबालाला अधिकार असल्याचे पाकिस्तानने ठामपणे भारत सरकारला कळवले. भारत सरकार पाकिस्तानशी याबाबत पत्रव्यवहार करीत असतानाच जुनागडच्या नवाब प्रजेवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार करू लागला. अत्याचार करून संस्थानातील हिंदू प्रजेला आपली घरेदारे सोडून जाण्यास भाग पाडायचे आणि इतर मुसलमानांना जुनागड मध्ये येण्यास प्रोत्साहन द्यायचे असा जुनागडच्या दिवानाचा डाव होता व त्यामागे पाकिस्तान सरकारची चिथावणी होती. संस्थानातील अत्याचारामुळे त्रस्त झालेली हिंदू जनता नजीकच्या संस्थानात आश्रय घेऊ लागली. हिंदू निर्वासितांचा हा लोंढा पाहून नवानगरच्या नरेशने भारत सरकारकडे तातडीचा खलिता पाठवून जुनागड मधील समस्येची अविलंब दखल घ्यावी व तेथील हिंदू प्रजेच्या रक्षणार्थ योग्य ती कार्यवाही तातडीने करावी अशी विनंती केली.

जुनागड नवाबाच्या पाकिस्तानमध्ये सामील झाल्याच्या घोषणेमुळे काठीयावाडातील प्रजामंडळाचे नेते संतप्त झाले. नवाबावर दडपण आणून त्याला त्याचा निर्णय रद्द करण्यास भाग पाडावे या हेतूने गांधीजींचा पुतण्या **समळदास गांधी** यांच्या नेतृत्वाखाली ***काठीयावाड जनता आघाडी*** तयार करण्यात आली. काँग्रेसचा त्याला पाठिंबा होता. जुनागड नरेशच्या अत्याचाराला कंटाळलेल्या हिंदू प्रजेने काठीयावाड जनता आघाडीचे स्वागत केले. *काठीयावाड प्रजा परिषदेचे* नेते बलवंतराय मेहता, रसिक भाई पारेख आणि समळदास यांनी मुंबईला व्ही. पी. मेनन यांची भेट घेतली आणि भारत सरकारने जुनागड विरुद्ध कारवाई न केल्यास काठीयावाडातील लोक कायदा आपल्या हातात घेतील असे त्यांना निक्षून सांगितले. त्याचबरोबर समळदास यांच्या नेतृत्वाखाली जुनागडचे हंगामी सरकार स्थापन झाल्याची घोषणा ही २५ सप्टेंबर १९४७ रोजी करण्यात आली.

अशाप्रकारे काठीयावाडातील परिस्थिती अतिशय स्फोटक बनत असल्याचे पाहून जुनागड बाबत विचार विनिमय करण्यासाठी भारताच्या मंत्रिमंडळाची बैठक १७ सप्टेंबरला झाली. या बैठकीला लॉर्ड माऊंटबॅटन उपस्थित होते. जुनागडमध्ये प्रतिकार करण्यासाठी भारतीय लष्कर पाठवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने एकमुखाने घेतला. माऊंटबॅटन यांना हा निर्णय पसंत नव्हता. परंतु नेहरू व पटेल यांच्या निर्णायक भूमिकेमुळे माऊंटबॅटन यांना गप्प बसावे लागले. लष्करी कारवाईचा निर्णय घेतल्यानंतरही वाटाघाटीचा अखेरचा प्रयत्न भारत सरकारने करून पहिला. त्यासाठी बोलणी करण्यासाठी व्ही पी मेनन यांना रवाना केले गेले. पाकिस्तानला कडक शब्दात खलिता पाठवला गेला. हे दोन्ही मार्ग निष्फळ ठरताच जुनागडच्या सीमेलगत उभे असलेले भारतीय लष्कर जुनागड मध्ये शिरले. भारतीय लष्कर पाहून भुत्तोंनी तातडीने पाकिस्तानकडे लष्करी मदतीची मागणी केली परंतु अपेक्षित मदत

मिळाली नाही. तेव्हा प्रक्षुब्ध जनतेला आणि भारतीय लष्कराला तोंड देणे अशक्य असल्याचे ओळखून भारतीय फौजा जुनागडच्या सिमेत शिरण्यापूर्वीच नवाबाने ऑक्टोबर १९४७ च्या अखेरीस कराचीला पलायन केले. नवाबा विरुद्धच्या उठावात काही मुसलमानही सामील झालेले पाहून जुनागड ताब्यात ठेवणे आपल्याला शक्य नसल्याचे भूतो यांनी जिनांना कळवले आणि जुनागडचा ताबा विभागीय आयुक्तांच्या हाती सोपवून ८ नोव्हेंबर १९४७ ला भुत्तोही कराचीला निघून गेले. जुनागड भागात स्थिरस्थावर होताच जुनागडच्या सामीली करणाबाबत तेथील प्रजेचा कौल घेण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. त्याप्रमाणे फेब्रुवारी १९४८ मध्ये जुनागड मध्ये सार्वमत घेण्यात आले. जुनागड मधील सुमारे दोन लाख मतदारांनी पैकी केवळ ९१ मते पाकिस्तानच्या बाजूने पडली. हा प्रचंड अनुकूल कौल मिळताच जुनागडचे सामीलीकरण भारतात केले गेले. *(आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२००० ; शांता कोठेकर, २४०)*

### २.३.३ हैदराबाद:

**१) हैदराबाद संस्थानाचे स्वरूप :** मोगल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात जन्माला आलेले हैदराबादचे संस्थान भारताच्या मध्यभागी वसलेले होते. भारतातील मोठ्या संस्थानांपैकी हैदराबाद एक होते. हैदराबादच्या प्रजेपैकी सुमारे ८५ टक्के लोक हिंदू व जेमतेम पंधरा टक्के मुसलमान असूनही शासक मुसलमान असल्यामुळे हिंदू प्रजेवर सतत अन्याय करीत असे. नागरिकांना मूलभूत अधिकार तर नव्हतेच पण त्याचबरोबर शासकीय सेवेत अतिशय पक्षपात होता. मुलकी शासनात सुमारे ७५ टक्के तर लष्कर व पोलीस दलात ९० टक्के भरती मुसलमानांची असे. बहुसंख्य प्रजा हिंदू असूनही उर्दू भाषा त्यांच्यावर लादली गेलीहोती. १९११साली ***मीर उस्मान अली खान निजाम*** सत्तेवर आला . तरी हिंदु प्रजे वरील अत्याचारात खंड पडला नाही. हैदराबाद मधील हिंदू प्रजा कानडी, तेलगू व मराठी अशा तीन गटात विभागलेली असल्यामुळे निजामाच्या शोषक व जुलमी शासनाला संघटितरीत्या विरोध करणे त्यांना शक्य होत नव्हते. निजामाचे रोजचे उत्पन्न चार लक्ष रुपये असूनही प्रजा कल्याणासाठी म्हणावा तसा तो उपयोग करत नसे.१९२० नंतर हैदराबाद मधील हिंदू प्रजेच्या प्रबोधनाचे कार्य आर्यसमाजाने हाती घेतले. १९३६मध्ये मराठवाड्यात स्थापन झालेल्या महाराष्ट्र परिषदेने नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची मागणी केली. राजकीय अधिकार मिळवण्यासाठी संघटीत लढा देण्याच्या हेतूने १९३८ साली*हैदराबाद स्टेट काँग्रेस* नावाची संघटना स्थापन झाली. गोविंदराव नानल या संघटनेच्या अध्यक्षपदी होते. स्वामी रामानंद तीर्थ यांचे प्रभावी नेतृत्व या सुमारास पुढे आले. या संघटनेच्या स्थापनेमागे राष्ट्रीय काँग्रेसची प्रेरणा होती. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे नेते राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांशी सतत संपर्क साधून होते. भारतात सत्तेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू होताच हैदराबादनेही भारतात सामील व्हावे ही मागणी हैदराबाद स्टेट काँग्रेस करू लागली. परंतु लोकमताचा हा कौल निजामाला मंजूर नव्हता.

२) **जैसे थे करार** : भारतावरील ब्रिटिश सत्ता संपुष्टात येताच हैदराबादला स्वतंत्र व सार्वभौम राज्याचा दर्जा मिळवून घेण्याचा आणि ब्रिटिश राष्ट्रकुलाचे सदस्यत्व मिळवण्याचा त्याचा मानस होता. म्हणून घटना समितीत सहभागी होण्यास त्याने नकार दिला. तसेच सामीली करण्याच्या करारपत्रावरही स्वाक्षरी करण्याचे त्याने नाकारले. ११ जुलै १९४७ रोजी हंगामी सरकारशी वाटाघाटी करण्यासाठी एक शिष्टमंडळ त्याने दिल्लीला रवाना केले.

हैदराबादला स्वायत्त राज्य म्हणुन मान्यता मिळावी आणि भारतात किंवा पाकिस्तानात सामील न होता भारताशी जैसे थे करार करण्याची परवानगी दिली जावी अशी मागणी त्याने हंगामी सरकारपुढे ठेवली. हंगामी सरकार ही मागणी मंजूर करणे अशक्य होते. १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत सामीलीकरणाबाबत त्याने मौन पाळले आणि सप्टेंबरमध्ये निजामाने एक नवी मागणी भारत सरकार पुढे मांडली. हैदराबादला भारतात सामील करण्याचा आग्रह भारत सरकारने न धरता हैदराबादला सहवर्ती राज्याचा दर्जा द्यावा व परदेशात वकील नेमण्याचा अधिकार मान्य करावा. या बदल्यात निजाम हा भारत सरकारशी जैसे थे करार करून रेल्वे, पोस्ट व दळणवळण या बाबतचे भारत सरकारचे सर्व नियम पाळेल व भारताच्या मदतीसाठी वेळ पडल्यास आपले लष्कर पाठवेल ही नवी योजना निजामाने मांडली. निजामाच्या मागण्या मंजूर करण्याचे सरदार पटेल यांची तयारी नव्हती. तरीही बऱ्याच उहापोहा नंतर निजामाच्या मागण्यांच्या अनुरोधाने कराराचा एक मसुदा तयार करण्यात आला आणि त्या कराराला निजामाची संमती मिळवण्यासाठी शिष्टमंडळ २२ सप्टेंबरला हैदराबादला रवाना झाले. कराराचा मसुदा निजामाला बऱ्याच अंशी अनुकूल असूनही निजामाने त्यावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ केली आणि ज्या दिवशी कराराचा मसुदा घेऊन हैदराबादचे शिष्टमंडळ दिल्लीला परत जाणार होते त्या दिवशी पहाटे तीन वाजता ***इत्तेहाद*** **नावाच्या कट्टर धर्मनिष्ठ मुस्लिम संघटनेचा नेता *कासीम रझवी***व त्याच्या सुमारे ३० हजार अनुयायांनी दिल्लीला जाणाऱ्या शिष्ट मंडळातील प्रत्येक सदस्याच्या घराला वेढा घातला आणि हैदराबाद भारतात सामील करण्यात येऊ नये अशी मागणी केली. निजामने करार अमान्य करू नये असा सल्ला निजामाच्या प्रधानमंत्री यांनी देऊनही निजामाने रजवीच्या दडपणाखाली येऊन करार अमान्य केला. इतकेच नाही तर आपल्या सर्व अटी मान्य न झाल्यास आपण पाकिस्तानात सामील होऊ अशी धमकी दिली. मात्र त्याच वेळी पुन्हा वाटाघाटी करण्यासाठी दुसरे शिष्टमंडळ दिल्लीला पाठवले या शिष्ट मंडळाबरोबर कासिम रजवीला सरदार पटेलांनी भेटीसाठी बोलावले. त्यावेळी त्यांने अत्यंत उद्दाम व आक्रमक पवित्रा घेऊन ; " हैदराबाद हे इस्लामिक राज्य आहे. त्याच्या स्वातंत्र्यावर भारत सरकारने अतिक्रमण केल्यास हैदराबाद मधीलच नाही तर, संपूर्ण भारतातील मुसलमान सशस्त्र उठाव केल्याशिवाय राहणार नाहीत . मुसलमान हा प्रथम एक योद्धा असतो आणि आपला निश्चय पूर्ण झाल्याशिवाय तो आपली तलवार म्यान करत नाही. हैदराबाद वर आक्रमण झाल्यास संस्थानातील एकही हिंदु जिवंत राहणार नाही, अशा धमक्या दिल्या". *(आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२०००; शांता कोठेकर, २४२)* याच सुमारास हैदराबाद संस्थानातील हिंदूंवर रझाकारांनी अत्याचार करण्यास प्रारंभ केला.

अशाप्रकारे हैदराबाद मधील परिस्थिती चिघळत असताना २९ नोव्हेंबर १९४७ रोजी निजामाशी एक वर्ष मुदतीचा *जैसे थे* करार भारत सरकारने केला. या काळात हैदराबाद व भारत सरकार यांचे परस्पर संबंध पूर्वीच्या निजाम-ब्रिटिश संबंधा सारखे राहावेत, दोन्ही पक्षांनी एकमेकांजवळ राजदूत ठेवावेत आणि दोघात असणारे विवाद्य प्रश्न लवादा मार्फत सोडवले जावेत अशा या करारातील तरतुदी होत्या. या करारामुळे स्वायत्त राज्याचा दर्जा बऱ्याच अंशी हैदराबादला मिळणार असल्यामुळे तो करार सरदार पटेल यांना पसंत नव्हता. परंतु लॉर्ड माउंटबॅटन यांनी घोळ घातल्यामुळे त्यांनी तो नाईलाजाने मंजूर केला .

जैसे थे हा करार भारत सरकारला मान्य करण्यास भाग पाडून आपण एक लढाई जिंकली आहे असे निजामाची कल्पना झाली. जैसे थे कराराच्या कालावधीत हर प्रयत्नाने आपले सामर्थ्य वाढवून हा करार आपण धुडकावून लावू आणि हैदराबादवरच नव्हे तर दिल्लीवर आपला ध्वज फडकावून अशा स्वरूपाच्या मुस्लीम मने उद्दीपित करणारा प्रक्षोभक प्रचार यावेळी कासिम रझवी करू लागला. जानेवारी ते ऑगस्ट १९४८ या काळात रजाकारांची संख्या तिपटी पेक्षाही जास्त वाढली. हिंदूवरील रझाकारांच्या पाशवी अत्याचाराला उतआला. लुटालूट जाळपोळ, हिंसक हल्ले यांचे साम्राज्य हैदराबाद संस्थानात पसरले. रझाकारांच्या राक्षशी अत्याचारातून स्त्रिया व मुलेही सुटली नाहीत. हिंदूंची सुरक्षितता धोक्यात आल्यामुळे शेकडो हिंदू कुटुंबे घरादारावर तुळशीपत्र ठेवून संस्थाना बाहेर पडू लागली आणि हैदराबादचे शासन जणू रझाकारांच्या हाती आले.

दरम्यान निजामाने आपले लष्करी सामर्थ्य वाढवण्यावर भर दिला. इराक, इराण व पाकिस्तान कडून शस्त्रास्त्रे मिळवू लागला. वायुदल बलशाली करण्यास त्याने ब्रिटिश अधिकाऱ्यांची मदत घेतली. बॉम्बफेकी विमाने खरेदी करण्यासाठी ब्रिटिश कंपनीशी पत्रव्यवहार केला. कर्नल जॉनकॉब या अमेरिकेतील वायुदल अधिकाऱ्याला हाताशी धरून अमेरिकेकडून अत्याधुनिक शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी त्याची खटपट चालू होती. पाकिस्तानच्या मदतीवर तर त्याची सर्व भिस्त होती. जीना देखील निजामाला पाकिस्तानमध्ये सामील होण्यास उत्तेजन देत होते. एवढेच नाही तर पाकिस्तान व हैद्राबाद यांना जोडणारी एक भूपट्टी आपल्या प्रदेशातून पाकिस्तानला द्यावी अशी मागणी करण्याचे धारिष्ट्य ही ते करीत होते. हैदराबादचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे सोपवावा असाही प्रयत्न निजामाचे अमेरिकेतील हीतसंबंधी करू लागले. संयुक्त राष्ट्र संघातील अमेरिकन प्रतिनिधीने हैदराबादचा प्रश्न तेथे उपस्थित करण्याची तयारीही दर्शवली. असे करून भारताच्या अंतर्गत समस्येला आंतरराष्ट्रीय आयाम देण्याचा व भारतावर बड्या राष्ट्रांचे दडपण आणण्याचा साम्राज्यवादी शक्तींच्या डाव होता.

३) **पोलीस कार्यवाहीचा निर्णय:** हैदराबाद संस्थानातील हिंदु प्रजेवरील अमानुष अत्याचाराच्या आणि निजाम परकीय सत्तांशी संपर्क साधीत असल्याच्या बातम्या हैदराबाद मधील भारताचे राजदूत कन्हैयालाल मुन्शी यांच्याकडून भारत सरकारकडे येत होत्या. हैदराबाद मधील आत्याचाराच्या बातम्याने भारतातील लोकमत प्रक्षुब्ध होत होते. भारत सरकारने हैदराबाद विरुद्ध कार्यवाही करून तेथील बेबंदशाहीला आळा घालावा अशी मागणी अनेक भारतीय नेते करू लागले. अशातच मे १९४८ मध्ये निजामाने दोन आदेश काढून हैदराबाद मधून भारताला होणाऱ्या मौल्यवान धातूंची निर्यात बंद केली आणि भारत सरकारचे चलन हैदराबाद संस्थानात अवैध ठरवले. यामुळे भारत सरकार विलक्षण अस्वस्थ झाले. या सुमारास २१ जून १९४८ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन मायदेशी परतल्यामुळे पटेलांचे हात मोकळे झाले. त्यानंतरच्या दोन महिन्यात रझाकारांचे अत्याचार बेसुमार वाढले. २९ ऑगस्ट १९४८ रोजी माऊंटबॅटन यांना लिहिलेल्या पत्रात नेहरु म्हणतात; " हैदराबाद विरुद्ध कारवाई न करण्याचा मी आजपर्यंत आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यामुळे माझ्या निकटच्या लोकांच्या मनात माझ्याविषयी अविश्वास निर्माण होऊ लागला आहे. हैदराबाद विरुद्ध बळाचा वापर केल्या शिवाय हा प्रश्न निकालात निघणार नाही अशी माझी आता पक्की खात्री झाली आहे आणि लष्करी कारवाई करायची तर त्यात विलंब करण्यात अर्थ नाही असेही माझे स्पष्ट मत बनले आहे." सरदार पटेलांनीही १५ जुलै

रोजी केलेल्या एका जाहीर भाषणात हैदराबाद विरुद्ध सशस्त्र बळाचा वापर करण्याचा मानस बोलून दाखवला. “हैदराबाद मधील परिस्थितीत सुधारणा झाली नाही तर जुनागड सारखीच हैदराबादची स्थिती होईल आणि ज्या परकीय मदतीवर हैदराबाद विसंबून आहे त्या मदतीचा त्यावेळी यित्किंचितही उपयोग होणार नाही”. असा गंभीर इशारा हि त्यांनी निजामाला दिला. निजामाला वठणीवर आणण्याच्या हेतूने भारत सरकारने प्रथम हैदराबादची आर्थिक नाकेबंदी केली परंतु हाही मार्ग अयशस्वी झाल्याचे पाहून मंत्रिमंडळाने अखेर लष्करी कारवाईचा निर्णय ९ सप्टेंबर १९४८ रोजी घेतला.या निर्णयाची माहिती घटना समितीला देताना पटेल म्हणाले, “हैदराबाद आणि भारत यांचा प्रादेशीकदृष्ट्या अतुट संबंध असल्यामुळे हैदराबादचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करणे भारताला शक्य नाही. तसेच तेथील प्रजेवर सतत होत असलेल्या अमानुष अत्याचार निष्क्रियपणे पाहात बसणे भारत सरकारला शक्य नाही. लष्कर पाठविण्यामागे हैदराबादवर सामीलीकरणाबाबत दडपण आणण्याचा भारताचा हेतू नसून केवळ जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात येत आहे हे त्यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणे निजामाला पूर्वसूचनाही देण्यात आली.

४) **ऑपरेशन पोलो:** निजामाकडून झालेला करार भंग, रझाकारांनी सुरू केलेला रक्तपात, त्यांचे लूटमाराचे सत्र, निजामी फौजेचे उपद्व्याप आणि हैदराबाद संस्थानातील उग्र होत जाणाऱ्या स्वातंत्र्यलढ्याचे दडपण यामुळे निजामाविरुद्ध बळाचा वापर करणे अपरिहार्य आहे म्हणून ९ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने सैन्यदलाला हैदराबाद वर चढाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा हैदराबाद संस्थानांमध्ये घुसल्या. हैदराबाद संस्थानावरील लढाईची योजना *‘ऑपरेशन पोलो’* या सांकेतिक नावाने ओळखले जाते. भारतीय सेनेच्या सदर्न कमांडचे प्रमुख जनरल गोडार्ड यांनी ही योजना तयार केली तथापि ते निवृत्त झाल्याने लेफ्टनंट जनरल राजेंद्र सिंग यांची नियुक्ती झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली *मेजर जनरल जयंत चौधरी आणि व्हाईस मार्शल मुखर्जी* यांनी ही योजना राबवली व पूर्णत्वास नेली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद भोवती असलेल्या निजामी फौजांनी माघार घेतली. भारतीय सैन्याने निजामी फौजांचे प्रमुख *जनरल अल इद्रिस* यांना शरणागती पत्करावी असा संदेश पाठवला. त्याप्रमाणे १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी निजामाने आपली शरणागती घोषित केली. दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैन्याने निजामाची राजधानी हैदराबाद शहरात प्रवेश केला. तेथे मेजर जनरल चौधरींनी अधिकृतपणे निजामाचे सेना प्रमुख जनरल इद्रिस यांच्याकडून सत्तेची सूत्रे स्वीकारली आणि भारताविरुद्ध युद्ध करण्याचा बेफाम वल्गना करणाऱ्या कासिम रझवी आणि पंतप्रधान मीर लायक अली यांना अटक करण्यात आली. *(मराठवाड्याचा इतिहास; सोमनाथ रोडे :१९६)* संस्थांनी प्रजेने या कारवाईचे प्रचंड उत्साहाने स्वागत केले. ८ ऑक्टोंबर रोजी सरदार पटेलांनी हैदराबादला भेट दिली. त्यावेळी निजामाने भारताशी एकनिष्ठ राहण्याचे आणि प्रजा कल्याणाचे आश्वासन दिल्यामुळे त्याच्या पदाला व प्रतिष्ठेला धक्का लावला गेला नाही .१९५२ मध्ये हैदराबाद संस्थानात सार्वत्रीक सार्वत्रिक निवडणुका होऊन तेथे काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले.

अशाप्रकारे अत्यंत अल्पावधीत हैदराबाद विरुद्धची पोलीस कारवाई यशस्वीरिता घडवून आणण्याची आणि त्यानंतर निजमांबाबत समोपचाराचे धोरण स्वीकारून त्याला भारताच्या राजकीय प्रवाहात सामावून घेण्याचे श्रेय सरदार पटेल यांच्या पोलादी मुत्सद्देगिरीला आहे.

### २.३.४ काश्मीर:

वरील दोन्ही संस्थानांपेक्षा काश्मीर मधील परिस्थिती वेगळी होती. जम्मू-काश्मीरमध्ये बहुसंख्य प्रजा मुस्लिम होती आणि शासक हरीसिंह हिंदू होता. काश्मीरचे क्षेत्रफळ ८४,४७० चौरस मैलांचे म्हणजे हैदराबाद संस्थांनापेक्षाही मोठे होते. येथे हिंदू व शीख अल्पसंख्य होते . हा प्रदेश अत्यंत निसर्गरम्य तर आहेच पण त्यापेक्षा काश्मीर चे खरे महत्व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने त्याची असलेले मोक्याची भोगोलिक स्थिती होते. काश्मीरची जवळ जवळ तीन चतुर्थांश लोकसंख्या मुसलमान असल्याने व त्याची सीमा एका बाजूने पाकिस्तानशी संलग्न असल्याने काश्मीर पाकिस्तानातच सामील व्हायला पाहिजे असे पाकिस्तानला वाटे . पाकिस्तान या शब्दातील *'के'* हे इंग्रजी अक्षर काश्मीर शब्दावरूनच घेतले गेले होते. परंतु सलग एकसंध मुस्लिम बहुसंख्य प्रदेश पाकिस्तानला जावेत हे फाळणीची मूलभूत सूत्र केवळ ब्रिटिश आंकित भारतीय प्रदेशाला लागू होते . अर्धस्वायत्त भारतीय संस्थानांना नव्हे. १९४७च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याने भारतीय संस्थांनाना त्यांनी भारतात विलीन व्हायचे की पाकिस्तानला जाऊन मिळायचे की स्वतंत्र राहावयाचे हे ठरविण्याचा अधिकार दिला होता.प्रारंभी काश्मीरच्या महाराजांनी पाकिस्तानात जाण्याचा निर्णय घेतला असता तर भारताकडून त्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही झाली नसती. परंतु दोहोंपैकी कोणत्याही राष्ट्रात विलीन न होता स्वतंत्र राहण्याचे महाराज हरिसिंगाच्या मनात होते. म्हणून दोन्ही राष्ट्रांच्या सरकारांशी त्यांनी जैसे थे करार केला आणि १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत सामीलीकरणा संबंधी कोणताही निर्णय घेतला नाही. त्यांच्या संस्थानांच्या सीमा पाकिस्तान व भारत दोघांनाही लागून असल्यामुळे व तेथील बहुसंख्य प्रजा मुसलमान असल्यामुळे सामीलीकरण्याबाबत निर्णय घेणे त्यांना अवघड जात होते. या अडचणीमुळे त्याने भारत किंवा पाकिस्तानामध्ये सामील न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला .१५ ऑगस्ट पूर्वी गांधीजी व लॉर्ड माऊंटबॅटन यांनी काश्मीर नरेश हरीसिंगाशी चर्चा करून स्वतंत्र राहणे त्याच्या हिताचे ठरणार नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड माऊंटबॅटन यांनी तर पाकिस्तानात सामील होण्याचा त्याने निर्णय घेतला तरी भारतीय नेते त्याला हरकत घेणार नाहीत असे ते म्हणाले. परंतु लोकमताचा कौल घेऊनच काय तो निर्णय घ्यावा असा त्याला सल्ला दिला . काश्मीर हे भारताच्या उत्तर सीमेवर संलग्न असल्यामुळे भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काश्मीरचे भारतात सामीलीकरण अगत्याचे आहे अशी भारत सरकारची धारणा होती तर काश्मीरला पाकिस्तान ओढण्याचा जीना आटोकाट प्रयत्न करत होते.

अशा स्थितीत हरीसिंहाने पाकिस्तानशी जैसे थे करार केलेला असतानाही पाकिस्ताने काश्मीरची आर्थिक नाकेबंदी केली. हे दडपण येऊन देखील काश्मीर नरेश आपला स्वातंत्र्याचा हेका सोडत नाही असे दिसताच पाकिस्तानने बळाचा वापर करण्याचे ठरवले आणि२२ ऑक्टोंबर १९४७ रोजी हजारा व पेशावर येथील लढाऊ टोळ्यांना काश्मीरवर हल्ला करण्यास प्रवृत्त केले. काश्मीर वरिल या हल्ल्यात घुसखोरांनी लुटालुट, जाळपोळ, बलात्कार, कत्तली असे अमानुष अत्याचार काश्मिरी जनतेवर केले. अनेक गावे काबीज करून श्रीनगरच्या दिशेने त्यांनी आगेकूच सुरू केली. त्यांना आवर घालने अशक्य झाल्याने शेवटी हरीसिंहाने २४ ऑक्टोबरला भारताकडे मदतीची याचना केली. ती मदत काश्मीरला देण्याचा निर्णय भारत सरकार घेणार असे २५ ऑक्टोंबर १९४७ रोजी संरक्षण समितीत झालेल्या चर्चेवरून लक्षात येताच, भारतात सम्मिलीत न झालेल्या राज्याला लष्करी मदत

munotes.in

देण्याचा भारत सरकारला अधिकार नाही, असा कायद्याचा पेच उपस्थित करून लॉर्ड माऊंटबॅटन यांनी काश्मीरमध्ये लष्कर पाठवण्याबाबत अडथळा आणला. ह्या मुद्द्याचे निराकरण करण्याच्या हेतूने नेहरूंनी मेनन यांना तातडीने श्रीनगरला रवाना केले. त्यावेळी हरिसिंग हे श्रीनगर सोडून जाण्याच्या तयारीत होते. कारण काही तासातच श्रीनगर शत्रूच्या हाती पडणार अशी लक्षणे दिसत होती. त्यामुळे परिस्थितीच्या दडपणाखाली हरीसिंगांनी लागलीच २६ ऑक्टोंबर १९४७ रोजी काश्मीर संस्थान भारतात विलीन करण्यासंबंधीच्या सामीलीकरण करारावर स्वाक्षरी केली. *शेख अब्दुल्ला* या काश्मिरी  जनतेचा पाठिंबा असलेल्या काश्मीरच्या सर्वात बलशाली नेत्यांनेही काश्मीर भारतात विलीन करण्याचा सल्ला त्याला दिला. २७ ऑक्टोंबर १९४७ रोजी भारत सरकारने या करारास मान्यता देऊन लागलीच विमानाने भारतीय सैन्य काश्मीर मध्ये पाठविण्यात आले. त्यामुळे हल्लेखोर मागे रेटले जाऊन श्रीनगरचा बचाव झाला. परंतु तोपर्यंत हल्लेखोरांनी काश्मीरचा कित्येक चौरस मैलांचा प्रदेश व्यापला होता . परिणामी पाकिस्तानने भारताशी युद्ध सुरू केले. त्यावर भारताने सुरक्षा परिषदेत तक्रार केली. पाकिस्ताननेही विरोधात तक्रार केली. राष्ट्रसंघाने मध्यस्थी करून युद्धबंदी रेषा निश्चित करून दिली. मात्र पाकिस्तानने घेतलेला जम्मू-काश्मीरचा प्रदेश *आजादकाश्मीर* या नावाने आजही स्वतंत्र आहे आणि व्यावहारिक दृष्ट्या त्यावर पाकिस्तानचे नियंत्रण आहे.

अशाप्रकारे काश्मीर  राज्य भारतीय संघराज्याचा एक अविभाज्य घटक असून त्याबाबत आता कोणतेही प्रश्नचिन्ह राहिलेले नाही, अशी भारताची धारणा असली तरी तो प्रश्न अजूनही अनिर्णीतच आहे असा पाकिस्तानचा दावा आहे. दोन्ही राष्ट्राच्या संबंधात काश्मीर एक सतत सलणारे शल्य ठरले असून त्यातून निर्माण होणारा परस्पर अविश्वास, तनाव, युद्धे व शस्त्रास्त्र स्पर्धा या बाबी दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टीने घातक ठरल्या आहेत.

## २.४ राज्यांची पुनर्रचना

### २.४.१ राज्यपुनर्रचनेची पार्श्वभूमी :

भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना संस्थांनासंबंधीची नीती निर्धारित करीत असलेल्या सरदार पटेल यांनी दोन उद्दिष्टे निश्चित केली होती. त्यापैकी पहिले उद्दिष्ट संस्थानांचे भारतात सामीलीकरण करून साध्य झाले तर दुसरे उद्दिष्ट संस्थानांच्या प्रदेशाचे भारतीय संघराज्यात पूर्णतः विलीनीकरण करून घेणे आणि संस्थानातील प्रजेला भारतीय नागरिकाप्रमाणे सर्व अधिकार देणे हे होते .१४ डिसेंबर१९४७ रोजी ओरिसातील कटक येथे संस्थानिकांच्या बैठकीत बोलताना  सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले की, “ संस्थाने ही प्रांतांच्या शरीरावरील व्रणासारखी आहेत तेथील प्रजा प्रक्षुब्ध मनस्थितीत असून कोणत्याही क्षणी उठाव करून संस्थानिकांना ती पदच्युत करू शकते. म्हणून संस्थानिकांनी स्वायत्ततेचा दुराग्रह न धरता प्रांतात विलीन होण्याचा निर्णय घ्यावा. संस्थानिकांनी हा सल्ला मानला नाही आणि त्यांच्या प्रजेने बंड  करून त्यांना पदच्युत केले तर भारत सरकार त्यांना कोणत्याही प्रकारचे साहाय्य देऊ शकणार नाही.”  असा गर्भित इशारा त्यांनी संस्थानिकांना दिला. त्याचा योग्य परिणाम होऊन संस्थानिकांनी विलीनीकरणास संमिती दिली. संस्थानांच्या संपूर्ण विलीनीकरणा मागील भारत सरकारचा हेतू देशातील सर्व प्रादेशिक घटक आकाराने मोठे आणि स्वयंपूर्ण बनविण्याचा आणि अशा सर्व घटकांची

munotes.in

एकात्मता साधून एकसंघी व लोकशाहीनिष्ठ भारताची प्रतिष्ठापना करण्याचा असल्याचे नमूद करण्यात आले. या विलीनीकरणाच्या उद्देशासाठी तीन भिन्न मार्गाचा अवलंब करण्यात आला

**१)** लहान-लहान संस्थानांचे त्यालगतच्या मोठ्या संस्थानात किंवा प्रांतात विलीनीकरण करणे हा पहिला मार्ग होता. त्यानुसार ओरिसा व छत्तीसगड भागातील संस्थाने अनुक्रमे ओरिसा व मध्यप्रांतात डिसेंबर १९४७ मध्ये विलीन करण्यात आली. मार्च १९४८ मध्ये दक्षिणेतील सतरा संस्थाने मुंबई प्रांतात विलीन झाली. त्यानंतर १९४९ च्या मध्यापर्यंत काठीयावाड मधील सुमारे २८९ संस्थाने आणि कोल्हापूर व बडोदा ही संस्थाने मुंबई प्रांतात विलीन केली गेली. अशाच प्रकारे पंजाब व बंगालमधील संस्थाने त्यांच्या नजीकच्या प्रांतात विलीन झाली. विलीनीकरणाच्या करारा अन्वये आपल्या संस्थानांचे प्रशासन संस्थानिकांनी भारत सरकारच्या हाती सोपवले. भारतीय संघराज्याचे अविभाज्य घटक बनताच प्रांतिक कायदेमंडळांत संस्थानी प्रजेला प्रतिनिधित्व देण्यात आले. भारतीय संघराज्याच्या घटनेत यांचा समावेश **'अ'** गटात करण्यात आला.

**२)** विलीनीकरणाचा दुसरा मार्ग म्हणजे प्रादेशिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या परस्पर संलग्न असलेल्या अनेक संस्थानांचे एकत्रीकरण करून नवे प्रादेशिक घटक निर्माण करणे. यानुसार काठीयावाडातील सुमारे २२२ लहान लहानसंस्थानांचे एकीकरण करून फेब्रुवारी १९४८ मध्ये सौराष्ट्राची निर्मिती करण्यात आली. माळव्याचाकाही भाग, ग्वाल्हेर आणि इंदौर ही संस्थाने मिळून मध्य भारत अस्तित्वात आला. तर पतियाळा, नाभा, कपूर्थळा इत्यादी पूर्व पंजाब मधील आठ राज्य मिळून पेप्सूची निर्मिती करण्यात आली. जोधपुर, बिकानेर, जयपुर, जैसलमेर इत्यादी संस्थांने मिळून राजस्थानची निर्मिती करण्यात आली. त्रावणकोर व कोचीन चे एकत्रीकरण जुलै १९४९ मध्ये झाले. हैदराबाद, म्हैसूर व जम्मू-काश्मीरचे प्रदेश पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आले. या नवनिर्मित घटकांचा अंतर्भाव संघराज्याच्या घटनेत ***'ब'*** गटात करण्यात आला.

**३)** अत्यंत मागासलेल्या प्रदेशातील लहान संस्थानांचे एकीकरण करून त्या घटकांना केंद्रशासित प्रदेशांचा दर्जा देण्याचा तिसरा मार्ग अवलंबण्यात आला. या प्रदेशांचा विकास जलद गतीने करण्यासाठी तेथे जबाबदार शासन न देता प्रशासनाची सूत्रे केंद्र सरकारच्या हाती ठेवण्यात आली. यानुसार पूर्व पंजाब मधील दहा लक्ष लोकवस्तीच्या दहा हजार सहाशे चौरस मैलाच्या भागाचे रूपांतर एप्रिल १९४८ मध्ये हिमाचल प्रदेशात केले. बुंदेलखंड व त्यालगतच्या प्रदेशातील ३६ लक्ष लोकवस्तीच्या पस्तीस संस्थानांच्या एकत्रीकरणातून विंध्य प्रदेश जन्माला आला. त्रिपुरा , भोपाळ, कच्छ आणि पंजाब मधील बिलासपुर यांचे शासन १९४९ च्या अखेरपर्यंत केंद्र सरकारने हाती घेतले. या सात प्रदेशांचा अंतर्भाव राज्यघटनेतील ***'क'*** गटात करण्यात आला व तेथील प्रशासन चीफ कमिशनर मार्फत केंद्र सरकार चालवू लागले.

अशाप्रकारे १९४९ च्या अखेरपर्यंत विलीनीकरणाचा दुसरा अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या कार्यामध्ये संस्थानांनी अडथळा तर आणला नाहीच, उलट अतिशय समंजसपणाने त्यांनी भारत सरकारला मदत केली व भारतीय संघराज्य खऱ्या अर्थाने एकसंघी व एकात्म बनवण्यास निःशंकपणे आधार लावला. त्याबद्दल सरदार

munotes.in

पटेलांनी संस्थानिकांची प्रशंशा केली व त्यांचे आभार मानले तसेच विलीनीकरणाच्या वेळी त्यांना दिलेली आश्वासने ही पटेल यांनी तंतोतंत पाळली. संस्थानिकांचे तनखे ठरवून दिले आणि त्यांच्या उपाधी, विशेषाधिकार, खाजगी मालमत्ता आणि वारसाहक्काची तरतूद घटनेतील २९१ या कलमात करून देण्यात आली. *(आधुनिक भारताचा इतिहास१९४७-२०००; शांता कोठेकर :२४९)*

### २.४.२ भाषावार राज्य पुनर्रचना :

भारताला स्वातंत्र्य मिळताच भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याचा मुद्दा पुढे आला. ब्रिटिशांनी प्रदेशांच्या सीमा बनवताना भाषा आणि संस्कृतीचा कोणताही विचार केलेला नव्हता. त्यातच जागोजागी असलेल्या संस्थानांमुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनलेला होता. भाषा आणि संस्कृती यांचा खूप जवळचा संबंध असतो आणि भाषेचा रीतीरिवाजावर मोठा प्रभाव पडत असतो. मातृभाषेशिवाय शिक्षणाचा प्रसार चांगला होत नाही. राजकारण आणि प्रशासन लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी भाषा हे खूप महत्त्वाचे माध्यम असते. म्हणून शिक्षण, प्रशासन आणि न्यायालय मातृभाषेतून चालवण्यासाठी राज्यांची रचना ही भाषेच्या आधारावर असणे आवश्यक असते. ह्याच कारणामुळे काँग्रेसने १९२१ मध्ये आपल्या घटनेत बदल करून आपल्या प्रांतीय शाखा भाषेच्या आधारावर गठीत केल्याहोत्या. **महात्मा गांधी** म्हणाले होते की, “प्रादेशिक भाषांना पूर्ण उंचीवर नेऊन ठेवायचे असेल तर, प्रांतांची भाषेच्या आधारावर रचना आवश्यक आहे”. म्हणून स्वतंत्र भारतामध्ये भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न ऐरणीवर आला. परंतु स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय नेतृत्व भाषावार प्रांतरचनेला विरोध करत होते. कारण फाळणीमुळे गंभीर प्रशासनिक, आर्थिक आणि राजनितीक समस्या उत्पन्न झाल्या होत्या. २७ नोव्हेंबर १९४७रोजी पंडित नेहरूंनी स्पष्टपणे सांगितले की, “भारताचा अग्रक्रम हा भारताची सुरक्षा आणि एकता यासाठी राहील व भाषावार प्रांतरचनेचा निर्णय तुर्तास बाजूला ठेवावा लागेल”. *(आजादी के बादका भारत; बिपिन चंद्र :१३४)*

**२.४.३ दार भाषावारसमिती १९४८ :** भाषावार राज्य रचना हा निर्णय काँग्रेसने कित्येक वर्षांपूर्वी घेतला असल्याचा हवाला देऊन काही काँग्रेस सदस्यांनी भाषावार राज्यरचनेचा आग्रह धरला. तेव्हा भाषावार प्रांतरचना योग्य ठरेल की नाही याचा विचार करण्यासाठी जून १९४८ मध्ये घटना समितीने *एस. के. दार* समितीची नियुक्ती केली. या समितीने राष्ट्रीय निष्ठा व प्रादेशिक निष्ठा यांचा समन्वय साधणे प्रत्यक्षात अशक्यप्राय आहे आणि देश आणिबाणीच्या परिस्थितीतून जात असताना, प्रादेशिक पुनर्रचना भाषेच्या आधारे केल्यास, प्रादेशिक निष्ठा बळावतील वत्या प्रमाणात राष्ट्रीय निष्ठा दुबळी होऊ लागेल, हे राष्ट्राच्या दृष्टीने घातक ठरेल अशा आशयाचा अहवाल सादर करून भाषिक तत्त्वावर प्रादेशिक पुनर्रचनेच्या मागणीला विरोध दर्शविला. मात्र प्रशासकीय सोयीसाठी आवश्यक ते प्रादेशिक बदल करण्यास हरकत नसावी असे मत या समितीने प्रतिपादित केले.

**२.४.४ जे. व्ही. पी. समिती १९४८**: दार समितीच्या शिफारशीवरून घटना समितीने भाषावार प्रांतरचनेच्या सिद्धांत घटनेमध्ये सामील न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भाषावार राज्य रचनेला समर्थन असणाऱ्या जनतेमध्ये असंतोष वाढत जाऊन दक्षिण भारतामध्ये भाषावार प्रांतरचनेची मागणी अजूनच जोर धरू लागली. म्हणून भाषावार

समर्थकांना शांत करण्यासाठी काँग्रेसने डिसेंबर १९४८ मध्ये *जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि काँग्रेसचे अध्यक्ष पट्टाभिसीतारामय्या यांची जे व्ही पी समिती* भाषावार राज्यरचनेच्या प्रश्नावर पुनर्विचार करण्यासाठी नियुक्त केली. या समितीने दार समितीच्या अहवालातील शिफारशी पुढे करतअसातर्क दिला की, भाषावार राज्यरचनेपेक्षा सध्या देशाची सुरक्षा, एकता आणि आर्थिक संपन्नता यावर पहिले लक्ष दिले पाहिजे असे सांगितले. परंतु त्याचबरोबर जिथे भाषावार राज्यांची मागणी अधिक आहे आणि तेथील इतर भाषिकांचीही त्याला संमती असेल तर तिथे भाषावार राज्याची निर्मिती केली जाईल असे आपल्या अहवालात नमूद केले.

**२.४.५ आंध्र प्रदेश व तामिळनाडूची निर्मिती १९५३ :** जे व्ही पी समितीच्या अहवालाचा परिणाम म्हणून मद्रास मधून तेलगू भाषिक आंध्र प्रदेशची मागणी नेटाने पुढे आली. मद्रास राज्यात तामिळ भाषिक जनता अधिक होती तर तेलगू भाषिक जनतेचे प्रमाण कमी होते. त्यांचे हे प्रभुत्व नष्ट करण्यासाठी तेलुगु भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यावे अशी मागणी तेलगू भाषिक करू लागले. या ठिकाणी तामिळ भाषिकांचाही भाषावार राज्याला पाठिंबा होता परंतु त्यांच्यात मद्रास शहर कोणाकडे असावे यावरून एकमत होत नव्हते. त्यामुळे तेलुगू भाषिक आंध्रप्रदेशच्या मागणी कडे पंडित नेहरूंनी दुर्लक्षकेले. परिणामी आपली मागणी केंद्र सरकारच्या गळी उतरवण्यासाठी **पोट्टी श्रीरामुलु** यांनी १९ ऑक्टोंबर १९५२ रोजी आमरण उपोषण सुरू केले आणि ५८ दिवसाच्या उपोषणानंतर १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यामुळे तेथील जनतेच्या दृष्टीने ते हुतात्मा ठरले. प्रक्षुब्द तेलुगु जनतेने हिंसाचाराचा मार्ग अवलंबिला. अशाप्रकारे स्फोटक झालेली परिस्थिती बघून तेलगू भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी वांछू समिति स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार ऑक्टोंबर १९५३ मध्ये कायदा पास करून तेलुगू भाषकांच्या आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती करण्यात आली. भारतीय संघराज्यातील हे पहिले एकभाषी राज्य होते . त्याचबरोबर तामिळ भाषी राज्याच्या रूपात तामिळनाडूची निर्मिती झाली. *(आजादी के बादका भारत; बिपिन चंद्र :१३६)*

**२.४.६ राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना १९५३**: तेलुगू भाषिक आंध्रप्रदेश ची मागणी मान्य केल्यामुळे भाषावार राज्य निर्मितीची मागणी इतरत्रही सुरू झाली. राष्ट्रीय ऐक्याचे कारण पुढे करून नेहरूंनी या मागणीला विरोध केला होता. परंतु त्यांच्या भूमिकेवर त्यांच्याच पक्षातील नेत्यांनी टीका करून भाषावार प्रांतरचनेमुळे राज्यात एकता निर्माण होईल व त्यामुळे विकासाच्या विधायक योजना अधिक यशस्वीरित्या राबवता येईल असा युक्तिवाद केला. त्यामुळे नेहरूंचा नाइलाज होऊन डिसेंबर 1953 मध्ये भाषावार प्रांतरचनेचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी एक आयोग नेमला जाईल असे त्यांनी आश्वासन दिले. त्यानुसार ***फाजलअली*** यांच्या अध्यक्षतेखाली **राज्य पुनर्रचना आयोगाची** स्थापना करण्यात आली. **पंडित हृदयनाथ कुंझरू आणि सरदार पणिणकर** हे या आयोगाचे सदस्य होते. या आयोगाने आपल्या कार्यकाळात लोकमताचा अंदाज घेण्यासाठी देशाच्या अनेक भागांचे दौरे करून त्या आधारे आपला अहवाल ३० सप्टेंबर १९५५ रोजी सरकारला सादर केला.

१) भारतीय संघराज्यात विद्यमान असलेल्या सत्तावीस राज्यांच्या व तीन केंद्रशासित प्रदेशांच्या जागी, एकभाषी राज्यांच्या तत्त्वानुसार १६ समान दर्जाची राज्य आणि३

munotes.in

केंद्र केंद्रशासित प्रदेश यांची निर्मिती करण्यात यावी ही मूलभूत शिफारस या आयोगाने केली होती.



२) अ,ब, क अशी वर्गवारी नष्ट करून संघराज्यात *राज्य व केंद्रशासित प्रदेश* असे दोनच घटक असावेत अशी दुसरी शिफारस होती.

३) राजप्रमुखांचे पद रद्द करण्याची सूचना केली.

४) पंजाबचे भाषिक स्वरूप आणि दळणवळणाच्या गरजा लक्षात घेता पंजाबची मागणी या आयोगाला समर्थनीय वाटली नाही.

५) तसेच गुजरातीभाषी व मराठीभाषी प्रदेश मिळून मुंबईचे द्विभाषिक राज्य निर्माण करावे अशी शिफारस केली.

फाजल अली आयोगाच्या आहवाल जनतेपुढे येताच त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया झाल्या. विशेषतः पंजाब व महाराष्ट्रातील जनमत विलक्षण संतप्त झाले . अखेरीस मूळ अहवालात काही बदल करून *ऑगस्ट १९५६* मध्ये राज्य पुनर्रचना कायदा पारित करण्यात आला.

**२.४.७ राज्य पुनर्रचना कायदा १९५६**: या कायद्याने १४ राज्य आणि ५ केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केल्या गेली. आंध्र प्रदेश, आसाम, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, मुंबई, मद्रास, मैसूर, उत्तर प्रदेश, केरळ, पंजाब, राजस्थान व पश्चिम बंगाल ही समान दर्जाची राज्य तर जम्मू काश्मीरला विशेष दर्जादिला. दिल्ली, हिमाचल प्रदेश, मनिपुर, त्रिपुरा, अंदमान निकोबार आणि लखदिव, मिनिकॉय, अमीनदीवी बेटे केंद्रशासित प्रदेश होते. हैदराबादचा तेलुगु भाषिक प्रदेश व 1953 साली निर्माण करण्यात आलेल्या आंध्राचे राज्य मिळून नव्या आंध्रप्रदेशचे राज्य निर्माण झाले. तर अस्तित्वात असलेल्या म्हैसूर राज्यात हैदराबाद मुंबई व मद्रास राज्यातील कन्नड भाषीक प्रदेश व कुर्ग समाविष्ट करण्यात आले. त्रावणकोर वकोचीन मिळून केरळचे राज्य अस्तित्वात आले. मुंबई राज्यात पूर्वीचा मुंबई राज्याचा प्रदेश, हैदराबाद, मध्य प्रदेशातील मराठीभाषी प्रदेश, सौराष्ट्र आणि कच्छ यांचा अंतर्भाव केला. मध्यप्रदेशात अस्तित्वात असलेला मध्य प्रदेशाचा भाग, विंध्यप्रदेश, भोपाळ व राजस्थानमधील हिंदी भाषी भाग समाविष्ट करण्यात आला. अजमेरचा अंतर्भाव राजस्थानात झाला तर पतियाळा व पूर्व पंजाबचा संघ पंजाब राज्यात विलीन करण्यात आला. या प्रादेशिक पुनर्रचनेनुसार घटनेच्या पहिल्या परिशिष्टात परिवर्तन करण्यात आले. राज्य पुनर्रचना कायद्याच्या तिसऱ्या परिशिष्टात सर्व राज्यांच्या लोकसभेतील प्रतिनिधींची व त्यांच्या विधिमंडळातील सदस्यांची संख्या नमूद करण्यात आली. (*आधुनिक भारताचा इतिहास१९४७ ते २000; शांता कोठेकर :२५६)*

**२.४.८ महाराष्ट्र व गुजरातची निर्मिती १९६० :** राज्य पुनर्रचना कायद्याने तयार झालेल्या मुंबई राज्याने मराठी जनतेचे समाधान झाले नाही. म्हणून मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मागणी *संयुक्त महाराष्ट्र समिती*च्या माध्यमातून केली गेली. तसेचकेंद्रीय मंत्रिमंडळातील वित्तमंत्री चिंतामणराव देशमुखांनी स्वतंत्र महाराष्ट्राच्या मागणीसाठी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. याच दरम्यान गुजराती भाषी लोकांनी *महागुजरात जनता परिषद*ेमार्फत स्वतंत्र गुजरात राज्याची मागणी केली. अखेरीस महाराष्ट्रातील व गुजरात मधील वाढता हिंसाचार आणि तणाव याकडे दुर्लक्ष करणे केंद्र सरकारला अशक्य झाले.

परिणामी मुंबई राज्याचे विभाजन करून त्यातून मराठी भाषी महाराष्ट्र व गुजराती भाषी गुजरात राज्याची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र समितीची मुंबई सह महाराष्ट्राची मागणी मान्य झाली पण बेळगाव, निपाणी वकारवार महाराष्ट्रात सामील केले जावे ही मागणी मात्र नामंजूर झाली. ही नवी व्यवस्था करणारा मुंबई पुनर्रचना कायदा २५ एप्रिल १९६० रोजी पारित झाला आणि१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली . त्याचबरोबर गुजराती भाषी गुजरात राज्यसुद्धा उदयास आले.

**२.४.९ पंजाब व हरियाणाची निर्मिती १९६६ :** १९५६ च्या कायद्यानुसार पंजाबमध्ये करण्यात आलेली प्रादेशिक व्यवस्था पंजाबी भाषीक शीखांना मान्य नव्हती. त्यामुळे केंद्र सरकारवर दडपण आणण्यासाठी शीखांनी आंदोलनाचा मार्ग अंगीकारला. अखेरीस या प्रश्नाचा विचार करण्यासाठी *न्यायमूर्ती शहा समिती* स्थापन करण्यात आली. या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे १९६६साली पंजाब पुनर्रचना कायदा पास केला. त्यात पंजाबचे विभाजन करून शिखांची वस्ती असलेल्या प्रदेशांचे पंजाब राज्य व हिंदीभाषी लोकांचे हरीयाना राज्य निर्माण करण्याची, तसेच पंजाबचा काही पर्वतीय भाग हिमाचल प्रदेशला जोडण्याची तरतूद केली गेली.

अशाच प्रकारे यानंतरही महत्त्वाचे प्रादेशिक बदल करण्यात आले. १९७१ साली आसाम राज्यातील मेघालयाला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला गेला. तसेच त्रिपुरा, मणिपुर व हिमाचल प्रदेश यांनाही राज्याचा दर्जा देण्यात आला. आसाम राज्याची प्रादेशिक पुनर्रचना करून मिझोराम व अरुणाचल प्रदेश असे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले.१९७३ साली म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक असे ठेवण्यात आले. तसेच लखदीव, अमीनदीव व मिनीकॉय या बेट समूहाचे लक्षद्विप असे नामांतर केले. १९७५ मध्ये सिक्किमचा घटक राज्य म्हणून भारतीय संघराज्यात अंतर्भाव करण्यात आला.

अशाप्रकारे स्वातंत्र्यानंतर भाषा, भौगोलिक स्थिती इत्यादी कारणाने वेगळ्या राज्यांची मागणी वेळोवेळी होत राहिलेली दिसून येते. त्याचाच परिणाम म्हणून २००० साली उत्तर प्रदेश मधून उत्तराखंड, बिहार मधून झारखंड व मध्यप्रदेश मधून छत्तीसगड या स्वतंत्र राज्याची निर्मिती झाली आणि आता २०१४ मध्ये आंध्र प्रदेश मधुन स्वतंत्र तेलंगणा राज्य अस्तित्वात आले.

## २.५ सारांश

ब्रिटिशांनी भारतामध्ये सत्ता स्थापन करत असताना आपल्या आवश्यकतेनुसार प्रांतरचना केलेली होती. त्यामध्ये ब्रिटिश भारत आणि ब्रिटिशांचे मांडलिक असलेली संस्थाने अशी विभागणी होती. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना ब्रिटिशांनी संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा अधिकार दिला होता. भारत सरकारने संस्थानांसाठी स्वतंत्र खाते निर्माण करून वल्लभ भाई पटेल यांच्याकडे त्याची धुरा सोपवली. त्यांनी ५६२ पैकी हैदराबाद, जुनागड व काश्मीर वगळता भारतामध्ये उर्वरित संस्थानांना आपल्या मुत्सद्देगिरीच्या आधारावर सामील करून घेतले. हैदराबाद, जुनागड व काश्मीर यांचा प्रश्न बळाचा वापर करून सोडवला. अशाप्रकारे एकसंध भारत निर्माण करण्याचे श्रेय सरदार वल्लभभाई पटेल यांना जाते.

ही संस्थाने भारतामध्ये सामील करून घेतल्यानंतर राज्य पुनर्रचनेचा मुद्दा समोर आला. राष्ट्रीय कॉँग्रेसने १९२१ पासून आपल्या प्रांतीय संघटना भाषेच्या आधारावर तयार केल्या होत्या. हाच दुवा हेरून स्वातंत्र्यानंतर भाषावर राज्यरचनेची मागणी समोर आली. राष्ट्रीय ऐक्यासाठी प्रादेशिक निष्ठा घातक ठरतील म्हणून नेहरू आणि पटेल यांनी या मागणीला विरोध केला. परंतु स्वपक्षातून आणि जनतेतून असणाऱ्या भाषावार राज्यरचनेच्या प्रचंड मागणीला राष्ट्रीय नेतृत्व नाकरू शकले नाही. त्यातूनच राज्यपुनर्रचना आयोग व राज्यपुनर्रचना कायदा अस्तित्वात येऊन, भाषिक आधारावर राज्यरचना वेळोवेळी करण्यात आली. परंतु त्यातून संकुचित प्रादेशिक निष्ठा तयार होऊन त्याचे रुपांतर राष्ट्रीय हितापेक्षा प्रादेशिक हिताला अग्रक्रम देणाऱ्या प्रादेशिक राजकीय पक्षात झाले. या शिवाय भाषावार प्रादेशिक पुनर्रचनेचे तत्व एकदा मान्य झाल्यामुळे त्याच्या आधाराने करण्यात येणाऱ्या मागण्यात तेव्हापासून खंड पडलेला नाही.

## २.६ प्रश्न

१. भारतीय संस्थानांच्या विलीनीकरणाची आवश्यकता का होती स्पष्ट करा.

२. भारतीय संस्थानाच्या विलीनीकरणाची प्रक्रिया थोडक्यात सांगा.

३. राज्य पुनर्रचनेची पार्श्वभूमी सांगून आवश्यकता स्पष्ट करा.

४. भाषावर राज्यपुनर्रचना कायद्याविषयी माहिति विशद करा.

५. भाषेच्या आधारावर निर्मिती झालेल्या राज्यांची सविस्तर माहिती द्या.

## २.७ संदर्भ

१. **आधुनिक भारताचा इतिहास१९४७-२०० :** शांता कोठेकर

२. **आजादी केबाद का भारत :** बिपिन चंद्र

३. **मराठवाड्याचा इतिहास :** सोमनाथ रोडे

४. **भारतीय राष्ट्रीय चळवळ :** डॉ.साहेबराव गाठाळ

५. **आधुनिकभारत :** सुमित सरकार

६. **भारत का स्वतंत्रता संघर्ष :** बिपिन चंद्र

७. **आधुनिक भारताचा इतिहास :** ग्रोवर व बेल्हेकर

❖❖❖❖

# ३

# नेहरू युगातील सामाजिक आणि आर्थिक सुधारणा

**घटक रचना :**


३.१ उद्देश

३.२ प्रस्तावना

३.३ सामाजिक सुधारणांची पार्श्वभूमी

३.४ नेहरू युगातील सामाजिक सुधारणा

३.५ आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी

३.६ नेहरू युगातील आर्थिक सुधारणा

३.७ सारांश

३.८ प्रश्न

३.९ संदर्भ


## ३.१ उद्देश

**१** नेहरू युगातील सामाजिक आणि आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी समजून घेणे.

**२** स्वातंत्र्यानंतर नेहरू युगातील सामाजिक सुधारणांचा आढावा घेणे.

**३** नेहरू युगातील आर्थिक सुधारणांचा आढावा घेणे.,

**४** नेहरू युगातील सामाजिक व आर्थिक सुधारणांचे मूल्यांकन करणे.

## ३.२ प्रस्तावना

भारताने आधुनिक कालखंडात प्रवेश केला तेव्हा भारतामध्ये अनेक धार्मिक व सामाजिक अनिष्ट प्रथा परंपराचा बोलबाला होता. स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला मोठा कलंक होता. सतीप्रथा, बालविवाह, विधवांचा प्रश्न, स्त्रियांचे पुरुषांवरील अवलंबित्व, समाजातील दुय्यम स्थान अशा कितीतरी कुप्रथांनी भारतीय स्त्रियांचे जीवन यातनामय बनले होते. भारतामध्ये ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर भारतीयांना आधुनिक सामाजिक मूल्यांची जाणीव झाली. अस्पृश्यतेसारख्या प्रथेने दलितांना माणूसपण नाकारलेला समाज दुभंगलेला होता. या सर्व अनिष्ट प्रथांविरुद्ध पुरोगामी नेतृत्वाने लढा उभारून ब्रिटिशांना त्याबाबतीत कायदे करण्यास भाग पाडले. मात्र ब्रिटिशांनी हातचे राखून केलेल्या या कायद्यांचा विशेष परिणाम झाला नाही. म्हणून भारताला स्वातंत्र्य

मिळाल्यानंतर नेहरूयुगात या दोन्ही समस्यांना विशेष प्राधान्य देऊन त्यांचे निवारण करण्यासाठी कायद्याचे संरक्षण बहाल केल्या गेले.

सामाजिक सुधारणाप्रमाणेच आर्थिक सुधारणांनाही नेहरू युगामध्ये प्राधान्य द्यावे लागले. कारण ब्रिटिश भारतामध्ये आलेच ते संपत्ती मिळवण्यासाठी. त्या दृष्टीने त्यांनी व्यापारावर एकाधिकार मिळवण्यासाठी भारताची राजकीय सत्ता हातात घेतली आणि या सत्तेचा उपयोग आपल्या देशामध्ये संपत्तीचे वहन करण्यासाठी केला. त्यांनी विविध मार्गाने भारतातील संपत्ती इंग्लंडमध्ये नेली. परिणामी स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत हा औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात  प्रचंड प्रमाणात मागासलेला होता. म्हणून स्वातंत्र्य मिळताच नेहरू यूगामध्ये आर्थिक सुधारणांना प्राधान्य देण्यात आले. त्यासाठी आर्थिक नियोजनाचा आधार घेऊन पंचवार्षिक योजना राबवण्यात आल्या.

## ३.३ सामाजिक सुधारणांची पार्श्वभूमी

भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर आधुनिक शिक्षणाची आणि  सामाजिक मूल्यांची माहिती भारतीयांना झाली. त्याचाच परिणाम म्हणून भारतामध्ये धार्मिक आणि सामाजिक चळवळींचा उदय झाला. सुरुवातीच्या राजा राम मोहन राय सारख्या सुधारकांनी सतीबंदी सारखे कायदे ब्रिटिश सरकारला करायला लावून समाज सुधारणांची पायाभरणी केली. त्यानंतर विधवा पुनर्विवाह कायदा, संमती वयाचा कायदा, नरबळी प्रतिबंधक कायदा अशा अनेक प्रकारच्या सामाजिक सुधारणा ब्रिटिशकाळात झाल्या. महात्मा फुलेंसारख्या समाजसुधारकांनी स्त्रियांना सामाजिक दास्यातून बाहेर काढण्यासाठी स्त्रीशिक्षणावर विशेष भर दिला. परंतु या सर्व सामाजिक सुधारणा ब्रिटिश सरकारने हातचे राखून केल्यामुळे त्याचा परिणाम म्हणावा तसा झाला नाही. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर भारतामध्ये संघटित राष्ट्रीय चळवळीला सुरुवात झाली. आधुनिक शिक्षण घेतलेल्या राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनी आपापल्या परीने सामाजिक सुधारणांना हातभार लावला. राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनी सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला परंतु त्यांच्यातही अगोदर राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा यावरून वाद होता. सामाजिक सुधारणांशिवाय राजकीय स्वातंत्र्याला खरा अर्थ प्राप्त होणार नाही याविषयीही कोणालाच शंका नव्हती. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीच्या प्रगती बरोबर सामाजिक सुधारणांचाही विचार होत गेलेला दिसून येतो. परंतु राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीने वेग घेतल्यामुळे सामाजिक सुधारणांकडे दुर्लक्ष झाले. तरी पण १९१७ च्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांनी मांडलेला 'अस्पृश्यता निवारणाचा ठराव' संमत झाला. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भारतीय राजकारणात उदय होऊन त्यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी मोठी चळवळ उभी केली. राष्ट्रीय काँग्रेसनेही १९३१ च्या कराची अधिवेशनामध्ये मूलभूत हक्काचा ठराव मांडून कायद्यासमोर जात, धर्म, लिंग यांच्या आधारावर भेदभाव केल्या जाणार नाही असे ठरवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळाल्याशिवाय त्यांचा सामाजिक स्तर उंचावणार नाही, म्हणून त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली, हे स्वतंत्र मतदार संघ रद्द व्हावे म्हणून महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये १९३२ चा 'पुणे करार'  झाला. यानंतर  महात्मा गांधीजींनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हाती घेतले. त्याचबरोबर स्त्रियांच्या उन्नतीसाठी महात्मा गांधींनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून

घेतले. परंतु याचा प्रभाव विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित होता. यानंतर स्वातंत्र्याची चळवळ अधिक गतिमान झाल्यामुळे सामाजिक सुधारणांकडे दुर्लक्ष झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक सुधारणांनी परत वेग घेतला व आपल्या राज्यघटनेमध्ये त्यासाठी विशेष तरतुदी केल्या गेल्या. महिलांचा व दलित वर्गाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने राज्यघटनेद्वारा व संसदेच्या मार्फत महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणण्याचे धोरण भारत सरकारने अंगीकारले. त्यातूनच नेहरू युगामध्ये महिला आणि दलितांची स्थिती सुधारण्यासाठी सामाजिक सुधारणा करण्यास अग्रक्रम दिला गेला व त्यासाठी सामाजिक जागृती बरोबर विविध कायदेही केल्या गेले.

## ३.४ नेहरू युगातील सामाजिक सुधारणा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय समाजातील सर्वात अनिष्ट रूढी म्हणजे स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता याकडे विशेष लक्ष पुरवल्या गेले. भारतीय संविधानामध्ये यांना कायद्याने विशेष संरक्षण दिले गेले होते, मात्र ते पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील नेहरू युगामध्ये यासाठी विशेष सुधारणा करण्यात आल्या, त्याचा आढावा आपण घेणार आहोत.

### ३.४.१ नेहरू युगातील स्त्रियांविषयक सामाजिक सुधारणा

समाजातील व कुटुंबातील स्त्रियांच्या दर्जाबाबत व अधिकाराबाबत काही प्रश्न स्वातंत्रपूर्व काळात चर्चेला आले होते. वारसा हक्क, दत्तक घेण्याचा हक्क, विवाहाचे वय, घटस्फोट इत्यादी अनेक मुद्द्यांबाबत हिंदू समाजात मतभेद असल्यामुळे आणि ब्रिटिश शासनकाळात झालेल्या कायद्यांच्या तरतुदी काहीशा संदिग्ध व अपुऱ्या असल्यामुळे त्यासंबंधी सुस्पष्ट तरतुदी असलेले कायदे करणे निकडीचे होते. स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी १९४१ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'सर बेनेगलराव समिती'ने महिलांसंबंधी सगळ्या मुद्द्यांचा विचार करून तर्कशुद्ध, न्याय्य व सुसंगत अशी हिंदू कायद्यांची संहिता तयार करून त्यात सर्व मुद्द्यांचा समावेश करावा अशी शिफारस केली होती. हा अहवाल १९४२ नंतरच्या राजकीय धकाधकीच्या काळात दुर्लक्षित राहिला. मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या अहवालाकडे नेहरू सरकारने विशेष लक्ष पुरवले आणि आपल्या मंत्रिमंडळातील विधिमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे हे काम सोपवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक सुधारण्याचे पुरस्कर्ते असल्यामुळे नेहरूंनी त्यांच्याकडे हे काम सोपवणे संयुक्तिकच होते. भारतीय स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने कार्य करून आपली क्षमता व गुणवत्ता सिद्ध केली होती. स्त्रीचा समाजातील व कुटुंबातील दर्जा हा समाजाच्या प्रगतीचा प्रमुख निकष आहे,असे ठाम मत १९२८ मध्ये अलाहाबाद महिला विद्यापीठात बोलताना नेहरूंनी व्यक्त केले होते. अशा परिस्थितीत स्त्रियांचा दर्जा सुधारणास कोणताच अडथळा नव्हता. भारतीय राज्यघटनेच्या चौदाव्या व पंधराव्या कलमानुसार स्त्रियांना समान हक्क व समान संधीची हमी दिलेली होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बेनेगलराव समितीने सुचवलेल्या 'हिंदू विधी संहिते'त थोडेफार बदल करून तो अहवाल विधेयकाच्या रूपात घटना समितीला सादर केला. *(डॉ.शांता कोठेकर; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर,२०१६.पृ.५६३)* यालाच आपण 'हिंदू कोड बिल' देखील म्हणतो.

### ३.४.२ हिंदू कोड बिलास प्रतिगामी शक्तींचा विरोध:

डॉ. आंबेडकरांनी घटना समिती पुढे हिंदू विधी संहितेचा मसुदा मांडताच घटना समितीतील प्रतिगामी नेतृत्वाने या बिलास विरोध केला. राष्ट्रीय चळवळीत महिलांनी कार्य करण्यास ज्यांनी विरोध दर्शवला नव्हता अशा गांधीवादी म्हणवून घेणाऱ्या काही काँग्रेस सदस्यांना देखील महिलांना समान अधिकार देण्याची कल्पना रुचत नव्हती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या मसुद्याला त्यांनी विरोध सुरू केला. समाजातील पुरानमतवाद्यानींही त्याविरुद्ध टीकीचे मोहोळ उठविले. त्यातील तरतुदींमुळे हिंदूंची समाजव्यवस्था धोक्यात येईल, एकत्र कुटुंबपद्धती नष्ट होईल, मुलीला मुलाच्या बरोबरीने अधिकार दिल्यास हिंदू समाजरचना कोलमडून पडेल, शतकानुशतके हिंदू समाजाने जोपासलेली मूल्य लयाला जातील असे अनेक आक्षेप घेतल्या गेले. डॉ. आंबेडकरांवर देखील वैयक्तिकरित्या चिखल फेक करण्यास या प्रतीगाम्यांनी मागेपुढे पाहिले नाही. परंतु या विरोधाला न जुमानता  डॉ. आंबेडकरांनी यासंहितेचा पाठपुरावा चालू ठेवला. पंतप्रधान नेहरूंनी डॉ. आंबेडकरांना पूर्ण समर्थन दिले होते. पट्टाभी सितारामय्या डॉ. केतकर, हंसा मेहता, सुचेता कृपलानी, दुर्गाबाई देशमुख इत्यादींनी या संहितेच्या मसुद्याला हार्दिक पाठिंबा दिला. तरीही राजेंद्र प्रसादांनी हे बिल मागे घेण्याची नेहरूंना गळ घातली. हिंदू समाज या संहितेमुळे नष्ट होईल आणि देशापुढे नानाविध गंभीर समस्या उभ्या असताना समाजातील एका मोठ्या गटाला दुखावणे अनिष्ट ठरेल, असे नेहरूंना पटवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एवढेच नाही तर घटना समितीला मूलभूत बदल करणारा कायदा करण्याचा अधिकार नाही, अशीही तांत्रिक अडचण त्यांनी उपस्थित केली. सरदार पटेलही या विधेयकाला समर्थन देत नव्हते. त्यामुळे १९४८मध्ये बराच ऊहापोह झाल्यानंतर हे विधेयक मागे पडले. काँग्रेस मधील रूढीवादी गटाचे डॉक्टर राजेंद्र प्रसाद व सरदार पटेल हे या बाबतीत अग्रणी होते.

सरदार पटेल यांच्या निधनानंतर कदाचित या विधेयकाला पूर्वी झालेला विरोध दुबळा होईल या अपेक्षेने नेहरूंनी १९५१मध्ये हे विधेयक पुन्हा विचारार्थ पुढे ठेवले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी पुन्हा या विधेयकाला कडाडून विरोध केला.१८ सप्टेंबर १९५१ रोजी नेहरूंना पाठवलेल्या आपल्या लांबलचक पत्रात हे विधेयक पारित करणे कशी घोडचूक ठरेल, त्याचे हिंदू समाजावर दुर्गामी स्वरूपाचे अनिष्ट परिणाम होतील, हिंदू समाजाचा एक मोठा घटक त्याला तीव्र विरोध करेल, हे पटवून देण्याच्या त्यांनी प्रयत्न केला. इतकेच नाहीतर नेहरूंनी आपले वजन खर्च करूनहे विधेयक संसदेकडून पारित करून घेतले तरी त्याला मंजुरी द्यायची की नाही यावर आपल्याला विचार करावा लागेल, असे विधान करून ते विधेयकाला मंजुरी देणार नाहीत असा गर्भित इशाराही त्यांनी दिला. काँग्रेसमधील बरेच सदस्य डॉ. राजेंद्र प्रसादांच्या विरोधात उभे राहण्यास तयार नाहीत हे नेहरूंच्या ध्यानात आल्यामुळे त्यांनी हिंदू कोड बिल विधेयक पारित करून घेण्याचा विचार सोडून दिला. राष्ट्रविकासाच्या  नानाविध योजना कार्यान्वित होत असताना काँग्रेस पक्षात फूट पडू न देणे त्यांना अगत्याचे वाटत होते. त्यांची ही भूमिका डॉ. आंबेडकरांनी लक्षात न घेता ते नेहरूंवर नाराज झाले. त्यांच्या मते नेहरूंना  पक्ष सदस्यांवर दडपण आणून हे विधेयक पारित करून घेणे अशक्य नव्हते. परंतु त्यांनी तसे न करता या विधायकाच्या समर्थनार्थ आपले वजन पणाला न लावता वेळेवर कच खाल्ली व आपल्या नेतृत्वाचे बळ विधायकाच्या मागे उभे न करता आपल्याला तोंडघशी पाडले असा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रह बनला आणि

त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. *( डॉ.शांता कोठेकर ; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर,२०१६.पृ.५६४)*

### ३.४.३ हिंदू विधीसंहिता स्वतंत्र कायद्याद्वारे संमत

१९५४ सालापर्यंत समाज सुधारणेला अनुकूल वातावरण देशात व कॉंग्रेस पक्षात निर्माण झाले. तोपर्यंत कॉंग्रेस मधील रूढीवादी गटाचा पक्षावरील प्रभाव ओसरून नेहरूंच्या पुरोगामी विचारांना पक्षात समर्थन मिळू लागले होते. तेव्हा १९५४मध्ये पुन्हा एकदा हिंदू विधीसंहितेचा प्रश्न संसदेपुढे मांडण्याचा निर्णय घेतला. परंतु मूळ स्वरूपात ते विधेयक न मांडता त्यातील प्रत्येक तरतुदीसाठी स्वतंत्र कायदा करावा असा निर्णय घेतल्या गेला. तोपर्यंत अशी विधेयके पारित होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले होते. मुंबईच्या समाजसुधार परिषदेने संकल्पित सुधारणांवर विचार करून जनमत जागृत करण्यासाठी तीन परिषदा घेतल्या. अनेक महिला संघटनांनी देशाच्या निरनिराळ्या भागात सभा आयोजित करून या समाज सुधारणांची मागणी केली. शिवाय १९५२ सालच्या देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला प्रचंड बहुमत मिळाल्याने नेहरूंचे हात बळकट झाले होते. ह्या लोकनिर्वाचित संसदेत बेनगेल राव समितीच्या शिफारशींवर आधारलेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले विधेयक (*हिंदू कोड बिल*) बाजूला सारून त्यातील महत्त्वाच्या तरतुदीसाठी एक एक स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

#### १. हिंदू विवाह कायदा-१९५५:

या कायद्याने पहिल्या पत्नीच्या अगर पतीच्या हयातीत दुसरा विवाह केल्यास तो बेकायदेशीर ठरवण्यात आला. असा दुसरा विवाह हा गुन्हा असून त्यासाठी संबंधित व्यक्तींना सात वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकेल, त्याचप्रमाणे विवाहाच्या वेळी एका पक्षाने दुसऱ्या पक्षाची फसवणूक केल्याचे सिद्ध झाल्यास असा विवाह एका वर्षाच्या आत रद्द करून घेता येईल. तसेच काही गंभीर कारणांसाठी पती-पत्नीला परस्परांपासून विभक्त होता येईल, म्हणजेच घटस्फोट घेता येईल. इत्यादी तरतुदी हिंदू विवाह कायद्यानुसार करण्यात आल्या.

#### २. हिंदू वारसाहक्क कायदा -१९५६:

हिंदू वारसा हक्काच्या कायद्यान्वये पतीच्या संपत्तीत पत्नीला बरोबरीचा हक्क देण्यात आला. तसेच मुलांबरोबर मुलींनाही संप त्तीत वाटा मिळावा अशी तरतूद करण्यात आली.

#### ३. हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा – १९५६:

या कायद्यानुसार पत्नी विभक्त झाल्यास मुलांचा ताबा कोणाकडे असावा याविषयी तरतूद करण्यात आली. एकत्र कुटुंब मोडल्यावर स्त्री ही कुटुंबाचा भार सांभाळू लागल्याचे ध्यानात घेऊन पित्याच्या मृत्यूनंतर आईला मुलांच्या पालकत्वाचा अधिकार मिळाला. तसेच अज्ञान मुलांच्या भरण पोषणाची जबाबदारी पित्यावर टाकण्यात आली. परंतु मूल पाच वर्षाचे होईपर्यंत त्याचा ताबा सामान्यतः मातेकडे असावा अशी तरतूद या कायद्यान्वये करण्यात आली.

**४. हिंदू दत्तक व पोटगी कायदा– १९५६:**

या कायद्यानुसार विधवा, घटस्फोटीत अगर अविवाहित स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्यास तिला दत्तक घेण्याचा अधिकार देण्यात आला. मुलाप्रमाणे मुलगी दत्तक घेणेही कायदेशीर मानण्यात आले. मात्र कुटुंबात एक मूल असल्यास दुसरे समलिंगी मूल दत्तक घेण्याची परवानगी या कायद्याने दिली नाही. दत्तक घेण्यास पती-पत्नीला परस्परांची संमती आवश्यक ठरवण्यात आली. पोटगी संबंधी या कायद्यान्वये अशी तरतूद करण्यात आली की, पती अथवा पत्नी यापैकी घटस्फोट मागणाऱ्या पक्षाकडे दुसरा पक्ष पोटगी मागू शकेल. पोटगीची रक्कम ठरवितांना दोन्ही पक्षांच्या राहणीमानाचा दर्जा आणि मिळवणाऱ्याची आर्थिक स्थिती या बाबी विचारात घ्याव्या असे कलम या कायद्यात घालण्यात आले. तसेच वृद्ध माता-पिता आणि मुले यांची जबाबदारी मिळवता पुरुष व मिळवती स्त्री या दोघांवरही टाकण्यात आली.

अशाप्रकारे १९४८ साली डॉ. आंबेडकरांनी नेहरूंच्या पाठिंब्याने सुरू केलेल्या प्रक्रियेला सात वर्षानंतर फळ आले. मात्र हे कायदे पास होताना देखील प्रतिक्रियावादी सनातनी मंडळीच्या विरोधामुळे मूळ विधायकात अनेक बदल करणे भाग पडले. महिलांना संपत्तीत वाटा मिळाला परंतु पित्याच्या मालकीच्या घरावर मात्र अधिकार मिळाला नाही. घटस्फोटाच्या संबंधातही अनेक अडचणी उपस्थित करण्यात आल्या. कायद्याने निर्धारित केलेले वयाचे बंधन न पाळणाऱ्यांना किमान शिक्षा व्हावी असा आग्रह धरण्यात आला. पुराणमतवाद्यांच्या दडपणामुळे मूळ विधेयकातील तरतुदींना सौम्य स्वरूप द्यावा लागले. तसेच हे कायदे केवळ हिंदू समाजापुरतेच सीमित राहिले. देशातील सर्व धर्मीयांना अशा प्रकारचे कायदे लागू करणे विरोधामुळे शक्य झाले नाही. स्वातंत्र्यसंग्रमात महिलांनी पुरुषांच्या बरोबर काम केले असताना देखील स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे कायदे करण्यात सनातनी गटाने विरोध करावा आणि त्यामुळे हे कायदे होण्यास सात-आठ वर्षे लागावीत ही बाब निश्चितच खेदजनक होती.

तरीही महिलांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले या कायद्यांनी उचलली गेली असे म्हणावे लागेल. म्हणून १०मे१९५६ रोजी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात "१९५५-५६ साली झालेले महिलांचा दर्जा सुधारणा बाबतचे कायदे क्रांतिकारक स्वरूपाचे असून त्यांनी सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रातील नव्या युगाचा श्रीगणेशा केला आहे", असे मत नेहरूंनी व्यक्त केले.

### ३.४.४ नेहरू युगातील इतर स्त्रीसुधारणा कायदे :

वरील कायद्यान व्यतिरिक्त आणखी काही कायदे नेहरू युगामध्ये स्त्री सुधारणा करण्यासाठी पारित करण्यात आले.

१. **विशेष विवाह कायदा-१९५४**:

१९५४ मध्ये पारित झालेल्या या कायद्यानुसार भिन्न धर्मीय स्त्री-पुरुषांना आपला धर्म न सोडता विवाह करता येईल अशी तरतूद करण्यात आली आणि मुला-मुलींचे विवाहाचे किमान वय अनुक्रमे २१ व १८ असे निर्धारित करण्यात आले. या कायद्यामुळे आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहांना कायदेशीर मान्यता मिळाली.

### २. अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा - १९५६ :

मानवी व्यापाराच्या दुष्ट चक्रातून पीडित स्त्रियांना सोडविण्याकरिता१९५६ मध्ये अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा संमत केला. या कायद्यामध्ये २५ कलमे असून, या कायद्याअंतर्गत असणारे गुन्हे दखलपात्र आहेत. या कायद्याच्या व्याख्येनुसार बालक म्हणजे ज्यांनी वयाची १६ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, अशी व्यक्ती व अज्ञान म्हणजे जिने वयाची १६ वर्षे पूर्ण केलेली आहेत. परंतु वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत व सज्ञान म्हणजे ज्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत अशी व्यक्ती. कुंटणखाना चालविणे, जागेचा वापर कुंटणखान्याप्रमाणे वापरण्यास देणे, वेश्या व्यवसायाच्या कमाईवर उपजीविका करणे, व्यक्तीला वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणे, वेश्या व्यवसायाच्या प्रयोजनार्थ फितवणे किंवा मोह घालणे, सार्वजनिक ठिकाणी व जवळपास वेश्या व्यवसाय करणे, जेथे वेश्या व्यवसाय चालतो त्या जागेत व्यक्तीला अडकून ठेवून जबरदस्ती करणे, वेश्या व्यवसायासाठी अज्ञान व्यक्तीची खरेदी- विक्री करणे, अज्ञान मुलगी अनैतिक कामासाठी आणणे, पीडित व्यक्तीला शारीरिक दुखापत व मानसिक त्रास देणे, धमकी, जबरदस्ती, धाक, आमिष दाखविणे, बलात्कार करणे, अनैसर्गिक लैंगिक शोषण करणे, व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध श्रम करून घेणे ही वरील सर्व कृत्ये या कायद्यानुसार गुन्हे असून, असे करणाऱ्यास शिक्षा व दंड केला जातो, परंतु हा कायदा सामाजिक असल्याने या गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तींना पीडित किंवा बळीत मानले जाऊन त्यांच्या पुनर्वसनाची सोय कायद्यामध्येच केलेली आहे.

### ३. हुंडा प्रतिबंधक कायदा-१९६१:

हुंडा देणे व घेणे ही परंपरेने अस्तित्वात असलेली अनिष्ठ प्रथा आहे. हुंडयापायी छळ होवून अनेक स्त्रियांना वैवाहिक जीवनातून बाहेर पडावे लागते व समाजात अनेक अडचणींना तोंड देत जीवन जगावे लागते. या पध्दतीमुळे कुटूंबाची दुर्दशा होणे, मुले मातेच्या प्रेमापासून पारखी होणे व वैवाहिक जीवनातून बाहेर पडलेल्या स्त्रियांचाही प्रश्न निर्माण होतो. या सर्व समस्यांवर वचक बसावा म्हणून नेहरू युगामध्ये १९६१ मध्ये 'हुंडा बंदी कायदा' करण्यात आला. या अधिनियमातील कलम २ अन्वये हुंडा म्हणजे विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई-वडिलांना अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा तत्पूर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा दयावयाचे कबुल केलेली कोणतीही संपत्ती अथवा मुल्यवान रोख असा आहे. हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल कमीत कमी ५ वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची आणि कमीत कमी रुपये पंधरा हजार अथवा अशा हुंडयाच्या मुल्याइतकी रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल तितक्या रकमेच्या दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

अशा रीतीने एकत्र कुटुंबपद्धती मागे पडू लागल्याने कुटुंबाच्या काही जबाबदाऱ्या स्त्रिया उचलू लागल्या होत्या. त्या पार पाडण्याचे अधिकार कायद्याने त्यांना देणे आवश्यक आहे याची जाणीव स्वातंत्र्यपूर्व काळात समाजधुरीनांना झाली होती. म्हणून स्वतंत्र भारतात नेहरू युगात स्त्रियांना समान नागरिकाचा दर्जा दिला व व्यवहारात समानता आणण्यासाठी कायदे केले. समानतेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणून हे कायदे स्वागताई ठरतात.

### ३.४.५ नेहरू युगातील अस्पृश्यता निवारणविषयक सुधारणा:

हिंदू समाजातील एका मोठ्या घटकाला अस्पृश्य मानून वाळीत टाकल्यामुळे त्या घटकावर शतकानूशतके अपरिमित अन्याय झाला होता. त्याचबरोबर संपूर्ण हिंदू समाज एकसंघ राहिला नव्हता, त्यामुळे एकूण समाजाच्या विकासाची गती अवरुध्द झाली होती. वर्षानुवर्षे दडपल्या गेलेल्या दलित समाजाचे उत्थान करण्याच्या हेतूने स्वातंत्र्यपूर्व काळात जातीप्रथेविरुद्ध विविध व्यक्ती आणि संघटनांनी कार्य केले. या व्यक्तींनी दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार करून त्यांच्यातील न्यूनगंडाची भावना दूर करून त्यांना त्यांच्या न्याय्य अधिकाराची जाणीव करून देण्याचे प्रयत्न केले. दक्षिणेत हे कार्य ब्राह्मणेत्तर चळवळीने केले, तर महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी विठ्ठलराव शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी या कार्याची धुरा वाहिली. दलितांवर लावण्यात आलेले निर्बंध मोडून काढण्यासाठी त्यांचे प्रबोधन व संघटन करून चळवळी आयोजित करण्यात आल्या. या चळवळीच्या आघाडीला दलित नेत्यांप्रमाणे काही पुरोगामी सवर्णही होते. अस्पृश्यता निवरण्याच्या हेतूने स्वातंत्र्यपूर्व काळात कायद्याचीही मदत घेतली गेली. परंतु परकीय शासकांना अस्पृश्यतेचे निर्मूलन करून हिंदू समाज एकसंध करण्यात रस नसल्यामुळे अशा स्वरूपाचे कायदे काही संस्थानातून करण्यात आले. असे अस्पृश्यता निर्मुलनाचे प्रयत्न त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, बडोदा आणि कोल्हापूर संस्थानात झाले. तर १९३८मध्ये मद्रास प्रांतात व १९४६ मध्ये मुंबई प्रांतात अधिकारावर आलेल्या काँग्रेस मंत्रीमंडळांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी काही कायदे केले. अशा प्रकारे स्वातंत्रपूर्व काळात अस्पृश्यता निर्मुलनाची पार्श्वभूमी तयार झाली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नेहरू युगात हिंदू समाजावरील अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्याची संधी घटनाकारांना मिळाली. या समस्येच्या मुळावरच घाव घालण्याच्या हेतूने भारतीय राज्यघटनेत आवश्यक त्या तरतुदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतीत घटना समितीतील मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. घटना समितीतील सर्व पुरोगामी सदस्यांचा त्यांना पाठिंबा होता. त्यानुसार घटनाकारांनी घटनेत अस्पृश्यता निर्मूलनाच्या संबंधित महत्त्वाची कलमे घातली.

१. **कलम–१५:** या कलमान्वये धर्म, वंश व जातीच्या कारणावरून कोणत्याही नागरिकाच्या मूलभूत अधिकारावर बंधने पडणार नाहीत तसेच सार्वजनिक स्थळी वावरण्यास वरील कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिबंध केला जाणार नाही. विहिरी, तळी, घाट, रस्ते, सार्वजनिक जागा या समाजातील सर्व व्यक्तींना खुल्या राहतील. अशा तरतुदी करण्यात आल्या.

२. **कलम–१७:** हे कलम सर्वात महत्त्वाचे असून या कलमानुसार अस्पृश्यतेची प्रथा कोणत्याही स्वरूपात पाळणे बेकायदेशीर ठरवण्यात आले व तो गंभीर शिक्षापात्र गुन्हा ठरवण्यात आला. या प्रमुख तरतुदिंनी हिंदू समाजाच्या एकसंधीकरणाची द्वारे खुली केली.

३. **कलम– १९:** या कलमानुसार प्रत्येक नागरिकाला कोणताही उद्योग, धंदा अगर व्यापार करण्याचा अधिकार राहील अशी तरतूद केली. तर शैक्षणिक संस्थांमधून धर्म, वंश

अगर जातीच्या कारणावरून कोणालाही प्रवेश नाकारता येणार नाही असेही कलम घटनेत अंतर्भूत करण्यात आले.

४. **मार्गदर्शक तत्त्वांमधील तरतुद:** घटक राज्यांनी मागासवर्गाच्या अधिकारांची व हितसंबंधाची जपणूक करावी आणि सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध त्यांना संरक्षण द्यावे अशी तरतूद राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्वात समाविष्ट करण्यात आली.

५. **राखीव जागांची व्यवस्था:** भारतात जातीय मतदारसंघांना मान्यता दिली नाही,परंतु त्यांच्यासाठी सर्व विधीमंडळातून व शासकीय सेवांतून ठराविक प्रमाणात जागा राखून ठेवाव्या अशी तरतूद केली. अखिल भारतीय व राज्यातील स्पर्धापरीक्षांसाठी राखीव जागांची व्यवस्था करण्यात आली आणि त्यांच्यासाठी किमान वयोमर्यादा इतरांपेक्षा उंचावण्यात आली. मागासवर्गीयांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी समाजकल्याण खात्यामार्फत नानाविध उपक्रम राबविण्यात येऊ लागले.

६. **द अनटचेबिलिटी ऑफेन्स ॲक्ट– १९५५:** राज्यघटनेतील सतराव्या कलमान्वये अस्पृश्यता निर्मूलनाची तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात तिची अंमलबजावणी पुरेशी होत नाही, हे ध्यानात आल्यामुळे त्या कलमाच्या पुष्टीकरणाच्या उद्देशाने १९५५ मध्ये' द अनटचेबिलिटी ऑफेन्स ॲक्ट' पारित करण्यात आला. या कायद्यानुसार अनुसूचित जातीवरील सर्व सामाजिक बंधने बेकायदेशीर ठरवण्यात आली. तसेच हिंदूंच्या सर्व सार्वजनिक संस्था व स्थळे त्यांना खुली करण्यात येऊन या अधिकारांपासून त्यांना वंचित करण्याचा केलेला प्रयत्न हा दंडात्मक गुन्हा मानला गेला. मुख्य म्हणजे अस्पृश्यतेची प्रथा पाळणेच नाही, तर त्या प्रथेला प्रत्यक्षात प्रोत्साहन देणे हा सुद्धा गुन्हा ठरविण्यात येऊन त्यासाठी कारावास व दंडाची शिक्षा निर्धारित करण्यात आली. *(डॉ.शांता कोठेकर; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर, २०१६. पृ. ५६८)*

अशा प्रकारे कायद्याच्या आधारे अस्पृश्यतेचा कलंक धुऊन टाकण्याचा व अनुसूचित जातीची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न भारत सरकार करीत होते. परंतु हे प्रयत्न अपुरे आहेत तसेच त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होत नाही, हिंदू समाजातील सनातनी दलित वर्गाच्या उन्नतीचा मार्ग अवरुद्ध करीत आहे, अशी डॉ. आंबेडकरांची धारणा बनली आणि धर्मांतराच्या मार्गाने या वर्गाची उन्नती घडून आणण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यानुसार १९५६ साली लक्षावधी दलित बांधवांसह त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक महत्त्वाच्या धर्मांतरामुळे तो गट अधिक संघटित झाला व त्यांच्यातील न्यूनगंड जाऊन त्यांची अस्मिता प्रभावी बनली.

## ३.५ आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी

ब्रिटिश हे भारतामध्ये व्यापार करण्याच्या दृष्टिकोनातून आलेले होते. व्यापार हे संपत्ती जमवण्याचे एक साधन असते. त्या दृष्टीने त्यांनी व्यापारातून जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी भारतामध्ये राजकीय सत्ता स्थापन करून व्यापारावर एकाधिकार मिळवला आणि त्यातून प्रचंड संपत्ती मिळवून ती आपल्या मायदेशी पाठवली आणि सोन्याचा धूर निघणारा भारत हा दिवसेंदिवस आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनत गेला. परंतु १८५०च्या नंतर

भारतामध्ये आधुनिक शिक्षण घेतलेला वर्ग तयार झाल्यानंतर त्यांनी या लुटीविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली. त्यामध्ये सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी 'संपत्ती नि:सारणाचा सिद्धांत' मांडून ब्रिटिशांनी भारताची कशी लुट चालवली आहे हे जनतेपुढे मांडले. त्यातूनच पुढे आर्थिक राष्ट्रवादाचा जन्म होऊन  हा राष्ट्रीय चळवळीचा प्रमुख मुद्दा बनला.

मार्क्सवादी विचारवंत आर. पी. दत्त यांनी वाणिज्यवाद (१७५७-१८१३), मुक्त व्यापार (१८१३-१८५३) व  आर्थिक भांडवलशाही (१८५३-१९४७) असे संपत्ती नि:सारणाचे तीन कालखंड नमूदकरून आर्थिक लुटीचे शास्त्रीय विश्लेषण केले. यामध्ये सर्वप्रथम व्यापाराच्या माध्यमातून, दुसऱ्या कालखंडात मुक्त व्यापार धोरण अवलंबून व तिसऱ्या कालखंडात भांडवल गुंतवून ब्रिटिशांनी भारतीय संपत्तीचे वहन  आपल्या देशामध्ये केले. याशिवाय ब्रिटिश प्रशासनाचा ब्रिटनमधील गृहखर्च, ईस्ट इंडिया कंपनीच्या भागधारकांचा लाभांश, प्रदेशातून घेतलेले सार्वजनिक कर्ज व त्यावरील व्याज, लष्करी व महसूल प्रशासनावरील खर्च, इंग्लंडमधील साधनसामुग्री खरेदीचा खर्च, परकीय गुंतवणुकीवर दिले जाणारे व्याज, परकीय बँका, इन्शुरन्स व जहाज कंपन्या आदींच्या मार्फत कमवलेला खूप मोठा नफा याद्वारे प्रचंड संपत्ती ब्रिटिशांनी मायदेशात नेली. दादाभाई नौरोजींनी या सर्व अपहरणाला 'वाईटातले वाईट असे म्हटले आणि भारताच्या दारिद्र्याचे ते मुख्य कारण आहे असे प्रतिपादन केले'

इंग्रजांनी औद्योगिक क्रांतीनंतर भारतामध्ये इंग्लंडमधील यंत्रावर तयार झालेला प्रचंड पक्कामाल आणून येथील हस्तोद्योग बंद पाडले आणि भारताला कच्च्या मालाचा पुरवठादार बनवून शेतीचे व्यापारीकरण घडवून आणले. युरोपामध्ये   औद्योगिक क्रांतीनंतर जुने उद्योग बंद पडून यंत्रआधारित नवीन उद्योग सुरू झाले. ब्रिटिश सरकारच्या आर्थिक धोरणामुळे हा नैसर्गिक नियम भारतामध्ये लागू न होता, भारतामध्ये  पारंपारिक उद्योगधंदे बंद पडले मात्र नवीन उद्योगधंदे सुरू झाले नाही. त्यानंतर ब्रिटनमध्ये जास्त नफा मिळत नाही म्हणून ब्रिटिश भांडवलदारांनी भारतामध्ये गुंतवणूक करून प्रचंड संपत्ती आपल्या देशाकडे वळवली. त्यामुळे भारताच्या दारिद्र्यात आणखीनच भर पडत गेली. तरीसुद्धा भारतीय उद्योजकांनी ब्रिटिश सरकारचे प्रतिकूल औद्योगिक धोरण असताना देखील १८५० नंतर कापड उद्योगासारखे उद्योग उभे करून भारतीय उद्योगधंद्यांची पायाभरणी केली. पहिल्या महायुद्धामुळे अनुकूल वातावरण तयार होऊन भारतीय उद्योगधंद्यांची बरीच भरभराट झाली.

अशाप्रकारे दीडशे वर्षाच्या ब्रिटिश राजवटीने भारताला अत्यंत गरिबी आणि शेती व औद्योगिकक्षेत्रात मागासलेपण या  देणग्या दिल्या.१९४७ मध्ये ब्रिटिश भारत सोडून गेले तेव्हा आपल्या मागे अस्ताव्यस्त भूमी व्यवस्था, शेतीच्या पारंपारिक पद्धती, एकरी कमी उत्पादन, जमिनीचे लहान लहान तुकडे, सावकारांची कर्जे, उत्पादनावर नियंत्रण,शेतीत भांडवल गुंतवण्याची उदासीनता यासारखे भयानक प्रश्न ठेवून गेले. आशियाचे अन्नभंडार म्हणावला जाणारा भारत आता कायम दुष्काळाच्या छायेत होता. औद्योगिक क्षेत्राची स्थिती अतिशय वाईट होती. कमी उत्पादनाचे मार्ग, मजुरांची वाईट स्थिती, भांडवलावर इंग्रजी नियंत्रण इत्यादी प्रश्न होते. शहा आणि खंबाटा यांनी १९२४मध्ये प्रकाशित केलेल्या आपल्या संशोधनात म्हटले होते की, "भारताचे सरासरी उत्पन्न इतके आहे की ज्यात तीन पैकी दोन व्यक्ती भोजन करू शकतात किंवा तीन वेळा भोजन घेण्याऐवजी दोन वेळा घेऊ

शकतात, पण अट ही की, त्याने वस्त्रहीन राहावे, संपूर्ण वर्ष निवाऱ्याशिवाय राहावे, कोणत्याही मनोरंजनाचा उपभोग घेऊ नये आणि निकृष्ट प्रतीच्या भोजना व्यतिरिक्त दुसरे काही खाऊ नये".*(बी एल ग्रोवर आणि बेल्हेकर: आधुनिक भारताचा इतिहास; २०१४. पृ. ५३३)* एकूणच इंग्रज भारतातून गेले त्यावेळी आर्थिक स्थिती अशी होती की,देश शतकानुशतके आर्थिक शोषणामुळे व अल्पविकासाने डळमळीत झाला होता, चाचपडत होता. एक असा देश ज्यात अपार नैसर्गिक साधनसामग्री होती पण लोक गरीब होते.

## ३.६ नेहरू युगातील आर्थिक सुधारणा

स्वातंत्र्याच्या सूर्योदयाबरोबर विभाजना पाठोपाठ घडून आलेले दंगे, त्यात झालेला भयावह विनाश व सीमाक्षेत्रात ठप्प झालेला कृषीउद्योग या कारणांनी भारताच्या अन्नधान्य उत्पादनावर अतिशय विपरीत परिणाम झाला. नियंत्रित अन्नधान्य पुरवठा पद्धती कोलमडून पडते की काय असा धोका निर्माण झाला होता. धान्य उत्पादनाची घसरती पातळी, विभाजनाचे परिणाम म्हणून उद्भवलेल्या संकटांना तोंड देताना सरकारवर पडलेला आर्थिक बोजा यामुळे १९४८मध्ये आर्थिक परिस्थिती अत्यंत चिंताजनक होती. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक विकासाकरता नियोजनाचा अवलंब करण्यात यावा ही कल्पना अनेक विचारवंत, अर्थतज्ञ व राजकीय नेत्यांनी मान्य केली होती. 'भारताकरीता नियोजित अर्थव्यवस्था' (Planed Economy for India) हा विश्वेश्वरय्या यांचा ग्रंथ १९३४ मध्येच प्रकाशित झाला होता. आर्थिक नियोजनाची अनिवार्यता त्यांनी त्यात स्पष्टपणे प्रतिपादीत केली होती. काँग्रेसने सुरवातीपासून आर्थिक नियोजनाचा पुरस्कार केला होता. खुद्द पंडित नेहरू सोवियत संघाने नियोजनाद्वारे साध्य केलेल्या प्रगतीने चांगलेच प्रभावित झाले होते.१९३८ मध्ये नेहरूंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसने नियुक्त केलेली 'राष्ट्रीय नियोजन समिती', १९४२ ते १९४७ या काळात उद्योगपतींनी आखलेली पंधरा वर्षे मुदतीची 'मुंबई किंवा टाटा बिर्ला योजना', मानवेंद्र रॉय यांनी तयार केलेली 'जनता योजना', गांधीजींनी विविध आर्थिक प्रश्नावर व्यक्त केलेले विचारांचे संकलन करून भारताच्या विकासाकरिता आचार्य श्रीमन्नारायण अग्रवाल यांनी मांडलेली दशवर्षीय 'गांधीवादी योजना' अशा काही योजना स्वातंत्र्यापूर्वी तयार करण्यात आल्या होत्या. त्या सर्व योजनांची मूलभूत उद्दिष्टे समान होते. ते म्हणजे सुनिश्चित अशा कालावधीत कृषी व औद्योगिक उत्पादनात झपाट्याने वृद्धी घडून आणून जनतेचे जीवनमान उंचावणे. *(बिपिन चंद्र : आजादी के बाद का भारत; २०१५. पृ.४५१)* १९४६ मध्ये हंगामी सरकार स्थापन होताच सल्लागार नियोजन मंडळाची स्थापना त्या सरकारने केली. नियोजनाच्या प्रश्नाचे तपशील आणि अध्ययन करून आर्थिक विकासाकरता उपाययोजना सुचवण्याचे कार्य या मंडळाकडे सोपवण्यात आले. त्याच्या शिफारशीनुसारच १९४८ चे औद्योगिक धोरण ठरवण्यात आले

### ३.६.१ १९४८ चे औद्योगिक धोरण:

सर्व परिस्थितीचा सांगोपांग विचार करून ६ एप्रिल १९४८ रोजी भारतीय संसदेत भारताच्या औद्योगिक धोरणाची रूपरेषा घोषित करण्यात आली. सर्व नागरिकांना न्याय व विकासाची समान संधी मिळेल अशी व्यवस्था करणे, जनतेचे जीवनमान उंचावण्याकरता देशातील सर्व साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन उत्पादनात वेगाने वृद्धी घडवून आणणे ही याची प्रमुख उद्दिष्टे होती .

१. **उद्योगधंद्यांची तीन गटात विभागणी:** या औद्योगिक नितीनुसार उद्योगधंद्यांची तीन गटात विभागणी करण्यात आली. पहिल्या गटात जड उद्योगांचा अंतर्भाव करून या उद्योगांचे संपूर्ण स्वामित्व व नियंत्रण सरकारने स्वतःकडे ठेवले. दुसऱ्या गटात मध्यम स्वरूपाचे उद्योग होते या गटातील स्वामीत्व सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रात राहणार होते आणि तिसऱ्या गटातील उर्वरित उद्योगांचा अंतर्भाव करून हे क्षेत्र खाजगी उद्योजकांकरिता मोकळे ठेवण्यात आले होते.

२. **संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार:** भारताने उद्योगधंद्यांमध्ये सरकारी आणि खाजगी भागीदारीचे तत्व स्वीकारून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. या औद्योगिक धोरणाने भारत सरकारची संमिश्र अर्थव्यवस्थेची भूमिका तयार केली. उद्योगांची सार्वजनिक व खाजगी असे दोन क्षेत्र स्पष्टपणे नमूद करण्यात आले. संमिश्र अर्थव्यवस्थेची ही कल्पना पंचवार्षिक योजनांचे स्वरूप निश्चित करण्याच्या दृष्टीने आधारभूत ठरली.

३. **लघु व कुटीर उद्योगांची दखल:** १९४८च्या औद्योगिक धोरणात लघु व कुटीर उद्योगांची दखल सरकारने घेतली होती. भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कुटीर उद्योगांचे महत्त्व मान्य करून त्यांच्या विकासाकरता आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन सरकारने आपल्या या औद्योगिक धोरणाद्वारे दिले. त्या उद्योगांचा विकास प्रामुख्याने सहकारी तत्त्वावर करण्यावर भर देण्यात आला तसेच त्या उद्योगांची सांगड मोठ्या उद्योगांशी घालण्याचा प्रयत्न केला जाईल असेही स्पष्ट करण्यात आले.

४. **कामगार धोरण**: औद्योगिक शांतता व उत्पादन क्षमता या दृष्टीने कामगार-मालक संबंधात सलोखा असणे आवश्यक असल्याने श्रमिकांना नफ्याचा भाग मिळवून देण्यावर सरकारचा भर राहील, निवारा, शिक्षण, आरोग्य सेवा यासारख्या सोयी कामगारांना उपलब्ध करून देण्यात येतील.त्याचबरोबर गुंतवलेल्या भांडवलावर योग्य तो नफा भांडवलदारांना मिळेल याची काळजी सरकार घेईल असे स्पष्ट करण्यात आले.

५. **परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन:** जलद औद्योगीकरणासाठी पुरेसे भांडवल देशात उपलब्ध नसल्याने परदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. त्या दृष्टीने विदेशी भागीदारी व तांत्रिक मदत याचे स्वागतच होईल असे जाहीर करण्यात आले. या विदेशी भांडवलाचे स्वागत करताना त्या भांडवलाचे भारताच्या अर्थव्यवस्थेवर वर्चस्व प्रस्थापित होणार नाही याचीही काळजी घेतली गेली. त्यासाठी विदेशी भागीदारीत सुरू होणाऱ्या उद्योगांचे नियंत्रण प्रभावीपणे भारतीयांच्याच हाती राहील व तांत्रिकदृष्ट्या उद्योगांचे संचालन भारतीय तज्ञांच्या हाती राहील असे धोरण ठरवण्यात आले..*( डॉ.शांता कोठेकर ; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर, २०१६ पृ .४९३)*

अशाप्रकारे १९४८चे औद्योगिक धोरण हे स्वतंत्र भारताचे पहिले उद्योग विषयक धोरण होते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले. संमिश्र अर्थव्यवस्थेला

मान्यता देण्यात आल्याने औद्योगिक क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी असे दोन वेगळीक्षेत्रे निर्माण झाली आणि नियोजित अर्थव्यवस्थेची पार्श्वभूमी तयार केली.

### ३.६.२ पहिली पंचवार्षिक योजना (१ एप्रिल १९५१ - ३१ मार्च १९५६) :

१९४८ ते १९५० या काळात आवश्यक राजकीय समस्यांचे बहुतांशी निराकरण झाले होते. निर्वासितांच्या पुनर्वसनाचे काम मार्गी लागले होते. संस्थानांचे विलीनीकरण पूर्ण होऊन राष्ट्रीय ऐक्य साध्य झाले होते. काश्मीरच्या कारणाने भडकलेल्या युद्धावर तात्पुरता का होईना पडदा पडला होता. स्वतः भारतीयांनी तयार केलेली राज्यघटनाही मान्य झाली होती. मात्र या काळात आर्थिक परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली होती. महागाईचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच होते. मुद्रा अवमूल्यन न करण्याच्या पाकिस्तानच्या निर्णयामुळे भारत-पाकिस्तान व्यापार ठप्प झाला होता. औद्योगिक उत्पादन१९४९ च्या तुलनेत १९५० मध्ये थोडे घसरले होते. कापूस, ताग यासारख्या कच्च्या मालाच्या उत्पादनात थोडी वृद्धी झाली असली तरी मागणीच्या प्रमाणात ते कमी पडत होते. अन्नधान्याचे उत्पादन घसरल्याने १९५०मध्ये दीड दशलक्ष टन अन्नधान्याची आयात करावी लागेल असा अंदाज होता ती आयात वास्तवात २.१ दशलक्ष टनावर गेली. अशा परिस्थितीत आर्थिक विकासाच्या योजना आखण्यासाठी १९५० मध्ये नियोजन मंडळाची स्थापना सरकारने केली. राज्यघटनेत नमूद करण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे नजरेसमोर ठेवून पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याचे आदेश १९५१ मध्ये सरकारने या मंडळाला दिले व भारतात आर्थिक नियोजनाच्या युगाचा प्रारंभ झाला.

पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड एप्रिल १९५१ ते मार्च १९५६ असा होता. या योजनेची प्रामुख्याने दोन उद्दिष्टे होती.

(१) युद्ध व फाळणी यामुळे अर्थव्यवस्थेत निर्माण झालेला विस्कळीतपणा व असंतुलन नहिसे करणे.

(२) देशाचा जलद व संतुलित असा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे.

देशात नियोजनाची प्रक्रिया सुरू झाली की आर्थिक विषमता कमी होईल व प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढून जनतेचे जीवनमान उंचावेल अशी अपेक्षा होती. त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक व आर्थिक व्यवस्थेच्या चौकटीतच योजना राबवावी एवढेच उद्दिष्ट नव्हते, तर राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांच्या उद्दिष्टांना धरून लोकशाही मार्गाने त्यात क्रमाक्रमाने बदल घडवून आणण्यावर ह्या योजनेने भर दिला होता.

अन्नधान्याची टंचाई व भाववाढ या दोन प्रमुख समस्या योजनाकारांसमोर होत्या. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासावर भर देण्यात आला. त्यामुळे ही योजना 'कृषी योजना' असल्याचे म्हटले जाते. अवजड व मूलभूत उद्योग सार्वजनिक क्षेत्रात तर उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग खाजगी क्षेत्रात सुरू व्हावेत अशी सामान्यतः उद्योगांची विभागणी करण्यात आली होती. उद्योगांच्या विकासाकरता वीज व वाहतुकीच्या सोयी विशेष महत्त्वाच्या असल्याने ती जबाबदारी सरकारने स्वतःकडे घेतली. सार्वजनिक क्षेत्रात विद्युत उत्पादनाचे तसेच रेल्वे व वाहतुकीच्या साधनांच्या विकासाचे अनेक प्रकल्प या

योजना काळात हाती घेण्यात आले. *(बी एल ग्रोवर आणि बेल्हेकर : आधुनिक भारताचा इतिहास ;२०१४. पृ. ५५४)*

ही योजना म्हणजे कृषी उद्योग, कुटीर उद्योग, खाणीकाम, जलसिंचन, विद्युत उत्पादन व ऊर्जा, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य इत्यादी क्षेत्रातील विकास योजनांची यादीच होती. या योजनेचे मूलभूत उद्दिष्ट जनजीवनाची भौतिक व सांस्कृतिक पातळी उंचावणे हे होते. या दृष्टीने विचार केल्यास या योजनेचे लक्ष गाठण्यामध्ये अनेक त्रुटी व उणिवा राहिल्या. योजनेच्या पाच वर्षाच्या काळात राष्ट्रीय उत्पादनात २५ टक्के वृद्धी व्हावी अशी योजनाकारांची अपेक्षा होती ती प्रत्यक्षात १७.५ टक्केच झाली. कार्यक्षमता व संयोजन यातील उणिवांमुळे योजनेच्या यशावर काही प्रमाणात का होईना विपरीत परिणाम झाला. निरनिराळ्या क्षेत्रातील प्रकल्प तयार करण्यात झालेला विलंब, तांत्रिक प्रशिक्षणाच्या सोयींची कमतरता अशा कारणांमुळे कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण झाल्या. केंद्र सरकार व राज्य सरकार यात उद्दिष्टांची आवश्यक तेवढी एकसूत्रता व समन्वय न राहिल्याने शेतीविषयक लोकशाही स्वरूपाच्या सुधारणांनाही मूर्त स्वरूप येऊ शकले नाही. खाजगी क्षेत्रातील उत्पादन तर १९५० च्या तुलनेत काहीसे कमी झाले. खाजगी उद्योजकांना अपेक्षित तेवढा नफा मिळू शकला नाही म्हणून त्यांचे उद्योगजन कल्याणच्या दृष्टेने क्रियाशील होऊ शकत नाही हे स्पष्ट झाले. याउलट औद्योगीकरणावर या योजनेत भर दिलेला नसूनही १९५१ मधील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे ७.५चे योगदान १९५६ मध्ये ९.५ झाले होते. या सर्व योजना काळात अस्वस्थ करणारी एक बाब म्हणजे वाढती बेकारी. योजनेत अपेक्षिल्याप्रमाणे रोजगार निर्मिती होऊ शकली नाही. तसेच व्यापारीवर्गावर परिणामकारी असे सरकारी नियंत्रण राहिले नाही त्यामुळे भाव वाढीलाही आळा बसला नाही. *(डॉ.शांता कोठेकर ; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर,२०१६.पृ.५०२)*

सर्व त्रुटी जमेस धरूनही या योजनेचे यश बराच मोठ्या प्रमाणात राष्ट्राच्या पदरी पडले यात शंका नाही. ही पहिली पंचवार्षिक योजना म्हणजे भारतातील आर्थिक नियोजनाच्या पहिलाच प्रयोग होता. पुढील योजनांकरीता अनुकूल परिस्थिती निर्माण करणारी ही योजना होती. तत्पूर्वीच्या २०० वर्षाच्या काळात तुंबून पडलेल्या व भयावह शोषनाने पिळून निघालेल्या राष्ट्राच्या अर्थकारणाला त्यामुळे गतिशीलता आली. अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने ही योजना म्हणजे पहिले पाऊल होते. १९४७ च्या सुमाराची भारताची डगमगती अर्थव्यवस्था या काळात सावरली गेली. या योजनेचे लक्ष फार उंचीचे नव्हते हे खरे असले तरी बऱ्याच क्षेत्रातील उद्दिष्टे बहुतांश साध्य झाली. कृषी, विद्युत उत्पादन, जलसिंचन या क्षेत्रातील यश विशेष समाधानकारक होते,१९५०-५१ चे८८७० कोटी रुपयांचे राष्ट्रीय उत्पन्न १९५५ मध्ये १०४२० कोटींचे झाले. एकंदरीत १९५१ च्या तुलनेत १९५६ मध्ये भारताच्या अर्थकारणाचे चित्र निश्चितच अधिक आशादायी होते. भारतासारख्या कृषीप्रधान देशातील जनतेच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणायची तर नियोजित आर्थिक विकासाद्वारे शक्य होऊ शकते, हे या योजना काळात स्पष्ट झाले.

### ३.६.३१९५६ चे औद्योगिक धोरण:

१९४८चे औद्योगिक धोरण जाहीर केल्यानंतर भारत सरकारच्या नीतीबाबत एक महत्त्वाची गोष्ट घडून आली होती. ती म्हणजे १९५४ मध्ये भारताने अधिकृतपणे समाजवादी समाजरचनेच्या ध्येयाचा स्वीकार केला. त्या उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल करणे तसेच भारताच्या राज्यघटनेतील मूलभूत अधिकार व नीती निर्देशक तत्वे यांच्या संदर्भात औद्योगिक धोरणाचे स्वरूप निश्चित करणे आवश्यक होते. यामुळे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला प्रारंभ होतो ना होतो तोच भारत सरकारने राष्ट्राच्या नव्या आर्थिक नीतीबाबतची घोषणा ३० एप्रिल १९५६ रोजी केली. या औद्योगिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती

१) जलद औद्योगीकरणावर विशेष करून मूलभूत व अवजड उद्योगांच्या विकासावर भर देणे.

२) सार्वजनिक क्षेत्राच्या विकासाला चालना देणे.

३) संतुलित औद्योगिक विकास घडवून आणणे.

४) खाजगी क्षेत्रातील आर्थिक केंद्रीकरणावर नियंत्रण राखणे.

५) लघु व कुटीर उद्योगांना व सहकारी क्षेत्राला उत्तेजन देणे.

६) संतुलित प्रादेशिक विकास घडवून आणणे.

ही या औद्योगिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे घोषित करण्यात आले. या धोरणानुसार उद्योगांचे वर्गीकरणकरून सरकारने सार्वजनिक, संयुक्त व खाजगी अशी तीन उद्योगक्षेत्रे सुनिश्चित केली. मात्र हे विभाजन लवचिक होते. नियोजनाच्या विकास-उद्दिष्टांच्या यशाकरीता आवश्यकतेनुसार त्यात बदल होऊ शकतील हे १९५६च्या औद्योगिक धोरणात स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे भविष्यात बदलत्या परिस्थितीनुसार विकासाकरता आवश्यक ते निर्णय घेता यावे याकरीता मार्ग मोकळा राहिला. देशाचा दीर्घकालीन विकास, सामाजिक चौकट व तात्विक बैठक या गोष्टी विचारात घेऊन १९५६च्या औद्योगिक धोरणाची आखणी सरकारने केली होती. वेगवान विकास, आर्थिक समानता, रोजगार निर्मिती, प्रादेशिक संतुलन ही सर्व उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून उद्योगांची रूपरेषा या धोरणाने तयार केली. यात सार्वजनिक क्षेत्राच्या विकासाला महत्त्व दिले गेले. ते भारताच्या समाजवादी राज्याच्या  उद्दिष्टांशी सुसंगत होते .१९५६ नंतर औद्योगिक क्षेत्रात देशाच्या झालेल्या प्रगतीचे बहुतांश श्रेय १९५६च्या औद्योगिक धोरणाला द्यावे लागते.

### ३.६.४ दुसरी पंचवार्षिक योजना ( एप्रिल १९५६ ते मार्च १९६१) :

पहिली पंचवार्षिक योजना ३१ मार्च १९५६ रोजी संपली. त्यापूर्वीच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आखणीचे काम सुरू झाले होते. पहिल्या योजनेचा आवाका आणि लक्ष फार मोठी ठरवलेली नव्हती. परंतु ती योजना बहुतांश यशस्वी झाल्याने दुसरी योजना वाढत्या आत्मविश्वासाने आणि कितीतरी अधिक  महत्त्वकांक्षेने  आखली गेली. या योजनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी प्रो. पी. सी. महालानोबिस यांच्याकडे सोपवण्यात आली होती.

त्यांनी १७ मार्च १९५५ रोजी योजनेचे प्रारूप नियोजन मंडळाला सादर केले. त्या आधारे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे औद्योगिकरणावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला. पहिल्या योजनेमुळे अर्थकारणाला थोडेफार स्थैर्य आणि गतिशीलता आली होती. त्यामुळे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची आखणी करताना नियोजन मंडळांने औद्योगीकरणाला प्राधान्य देणे हे स्वाभाविकच होते. झपाट्याने घडून येणारे औद्योगीकरण आर्थिक प्रगतीची गुरुकिल्ली मानले जाते. राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने कृषी उत्पादन वृद्धीबरोबरच मूलभूत अवजड उद्योग व मोठ्या प्रमाणावरील उत्पादन या गोष्टी अनिवार्य होत्या. त्यामुळे एकूण खर्चाच्या सुमारे ८० टक्के रक्कम मूलभूत उद्योग सुरू करण्याकरिता म्हणजे उत्पादनाच्या साधनांचे उत्पादन करणारे उद्योग सुरू करण्याकरता खर्च करण्यात यावी असे ठरवण्यात आले. अशा उद्योगांकरता आवश्यक असलेली फार मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणूक खाजगी उद्योजकांकडून होणे अशक्यच असल्याने हे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरू करण्याचे निश्चित करण्यात आलेजे समाजवादाच्या उद्दिष्टाला धरूनच होते.

**१. योजनेची प्रमुख उद्दिष्टे**:

(१) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे महत्त्व व व्याप्ती वाढवून जलद गतीने राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणणे व त्याद्वारा समाजवादी समाज रचनेच्या दिशेने वाटचाल करणे.

(२) आर्थिक स्वातंत्र्याची दृढतेने पायाभरणी करण्यासाठी उत्पादनांच्या साधनांचे उत्पादन करण्याकरता मूलभूत जड उद्योगांचा विकास करण्यावर भर देणे.

(३) कुटीर व लघु उद्योगांद्वारा उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात जास्तीत जास्त प्रमाणात वृद्धी घडवून आणणे.

(४) उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचे आयोजन त्या वस्तू कुटीर उद्योगांना स्पर्धक किंवा मारक ठरू नयेत या दृष्टीने करणे.

(५) कृषी उत्पादन क्षमता वाढवून शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढवण्याच्या हेतूने भूमीचे न्याय व समतेच्या आधारे वितरण करण्याकरता आवश्यक त्या भूमीसुधारणा घडवून आणणे.

(६) जनतेला विशेष करून गरिबांना निवारा, शिक्षण, आरोग्यसेवा इत्यादी जीवनावश्यक गोष्टी उपलब्ध करून देणे.

(७) शक्य तितक्या लवकर निदान दहा वर्षाच्या आत बेकारीचे निर्मूलन करणे.

(८) योजना काळात राष्ट्रीय उत्पादनात 25 टक्क्यांनी वृद्धी करणे व उत्पादनाचे अधिक समानतेने वितरण करणे. *(डॉ.शांता कोठेकर; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर,२०१६.पृ.५०२)*

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक विकासाची गती मंदच होती, कारण कृषी उत्पादन वृध्दीच्या तुलनेत औद्योगीकरणावर फारसा भर देण्यात आलेला नव्हता. देशाचे पोलाद उत्पादन म्हणजे त्या राष्ट्राच्या विकासाचा मापदंड मानला जातो. परंतु १९५५ च्या सुमारास भारताचे पोलाद उत्पादन अगदीच तोकडे होते. त्यामुळे भांडवली वस्तूंची

निर्मिती करणाऱ्या उद्योगांचा विकास होणे अशक्य होते. जलद गतीने औद्योगीकरण झाल्याशिवाय शतकानुशतके देशाला गांजत असलेले दारिद्र्य, बेकारी, विषमता दूर होणे शक्य नसल्याने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत मूलभूत जड उद्योगांच्या विकासाला विशेष करून लोह व पोलाद उद्योगांची स्थापना व विस्तार यावर भर देण्यात आला. त्यानुसार भिलाई, राउर केला, दुर्गापूर येथे लोहपोलाद उद्योगांचा विकास होण्याला तसेच यंत्रउत्पादन, जड इंजिनिअरिंग, रासायनिक उद्योग, यांत्रिक उपकरणे, कारखान्यांच्या उभारणी करता अत्यावश्यक असलेले सिमेंट, फॉस्फेटिक खते इत्यादींच्या उत्पादनाला अग्रक्रम देण्यात आला.

या योजनाकाळात कृषी उत्पादन सातत्याने वाढणे, देशांतर्गत बचतीत वृद्धी होणे, परकीय मदत मिळून परकीय चलनाची समस्या सुटणे, भाव वाढ फारशी न होणे, शेतमालाच्या उत्पादन वृद्धीच्या व १९५१ पासून निर्माण झालेली संपत्ती व साधनसामग्री योग्य प्रकारे उपयोगात आणली जाणे अशा निरनिराळ्या गोष्टींवर योजनेचे यश अवलंबून राहणार होते. परंतु योजनेच्या सुरुवातीला दुष्काळ, प्रतिकूल हवामान, नफेखोरी व काळाबाजार करणारे यामुळे अन्नधान्य पुरवठ्याबाबत कठीण परिस्थिती निर्माण झाली आणि भाववाढ अपरिहार्य ठरली. या पाठोपाठ साधनसामग्रीचा तीव्र तुटवडा, यंत्रे व भांडवली वस्तू यांची करावी लागलेली आयात, झपाट्याने वाढत असलेल्या वस्तूंच्या किमती, त्याचबरोबर सदोष शासकीय आयोजन अशा निरनिराळ्या कारणांमुळे योजनेच्या पहिल्याच दोन वर्षात गंभीर अडचणी निर्माण झाल्या व काही प्रकल्पांना कात्री लावावी लागली.

**२. योजनेचे मूल्यांकन:** दुसऱ्या योजनेच्या आखणी, अंमलबजावणी व फलनिष्पत्ती बाबतच्या त्रुटी यावर बरीच टीका केली गेली, कारण योजनेत निश्चित केलेले लक्ष अनेक क्षेत्रात पूर्ण अंशाने सफल झाले नाहीत. हे खरे असले तरी ही योजना पूर्णतः अयशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. कारण या योजनाकाळात विशेष प्रगती दिसून आली ती औद्योगिक क्षेत्रात, बहुतेक मूलभूत जड उद्योगांची स्थापना सार्वजनिक क्षेत्रात करण्यात आली त्यामुळे त्या क्षेत्राला बळकटी आली आणि खाजगी क्षेत्रातही उद्योगधंद्यांच्या विकासाला पोषक ठरेल अशी परिस्थिती निर्माण झाली. या योजना काळात एक विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे यंत्र उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची वेगाने वाढ झाली. औद्योगिक बायलर्स, ट्रॅक्टर, मोटार, सायकली, स्कूटर्स यासारखे वस्तूंचे उत्पादन भारतात होऊ लागले, पोलाद उत्पादनात १००%, सिमेंट उत्पादनात ९०%, विद्युत उत्पादनात ९०%, कोळसा उत्पादनात ४०% तर खत उत्पादनात १६६% वृद्धी झाली. औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीत वृद्धी झाल्याने पुढील विकासाचा पाया घातल्या गेला. त्याचबरोबर कापड, साखर इत्यादी उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांचीही बरीच प्रगती झाली.लघु व कुटीर उद्योगांच्या विकासाकरता विविध उपाय योजण्यात आले. त्या उद्योगांद्वारे उत्पन्न होणाऱ्या आधुनिक व परंपरागत वस्तूंच्या उत्पादनात सुमारे २५ ते ३० टक्के वृद्धी झाली.

एकूणच पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांचा आढावा घेतला असता असे म्हणता येते की, सर्व दोष-उणिवा धरूनही नियोजनामुळे राष्ट्राच्या गतीहिन असलेल्या अर्थव्यवस्थेचा अंत होऊन विकसनशील अशा अर्थव्यवस्थेचा शुभारंभ भारतात झाला. अवजड मूलभूत उद्योग सार्वजनिक क्षेत्रात राष्ट्राच्या नियंत्रणाखाली सुरू झाले तर आर्थिक विकासाचा

भक्कम पाया घातल्या जाऊ शकतो, या विश्वासाला या काळात बळकटी आली व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात हा विश्वास स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेला दिसून येतो.

### ३.६.५ तिसरी पंचवार्षिक योजना (एप्रिल १९६१ ते मार्च १९६६) :

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळातच प्रतिकूल हवामानामुळे कृषी उत्पादनावर झालेला विपरीत परिणाम, साधनसामग्रीचा तुटवडा, वाढती महागाई व बेकारी इत्यादी कारणामुळे देशाच्या अर्थकारणात बिकट परिस्थिती निर्माण झालेली होती. या पार्श्वभूमीवर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आखणीला सुरुवात झाली. त्यावेळी दीर्घकालीन आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवण्यावर प्रधानमंत्री नेहरू यांनी भर दिला होत. पंधरा वर्षासाठी एक व्यापक योजना तयार करण्याचा सरकारचा मनोदय त्यांनी लोकसभेत व्यक्त केला होता. त्यानुसार तिसऱ्या योजनेत दीर्घकालीन विकासाच्या प्रारूपाचा समावेश करण्यात आला.

१ ) **तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची प्रमुख उद्दिष्टे:**

(१) राष्ट्रीय उत्पादनात वर्षाला कमीत कमी पाच टक्के वृद्धी करणे आणि भविष्यातील योजनांमध्ये हा दर कायम राहील अशा पद्धतीने गुंतवणूक करणे.

(२) अन्नधान्याबाबत स्वयंपूर्णता गाठून औद्योगिक क्षेत्राची गरज भागवून निर्यात वाढेल या दृष्टीने शेतमालाचे उत्पादन वाढवणे.

(३) पुढील सुमारे दहा वर्षाच्या कालावधीत देशात उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीच्या बळावर पुढील काळात जलद औद्योगीकरण साध्य व्हावे या दृष्टीने पोलाद, ऊर्जा अशा मूलभूत उद्योगांचा विस्तार करणे व यंत्र उत्पादन क्षमता वृद्धिंगत करणे.

(४) देशातील उपलब्ध मनुष्यबळाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे व भरीव प्रमाणात रोजगार निर्मिती होईल अशी व्यवस्था करणे.

(५) उत्पन्न व संपत्ती याबाबतची विषमता दूर करून आर्थिक वितरणात अधिक समानता आणणे..*( डॉ.शांता कोठेकर ; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर,२०१६.पृ.५०७)*

**२) योजनेचे मूल्यांकन:** या योजनेच्या प्रारंभीच्या काळात १९६२ मध्ये चीन विरुद्धच्या युद्धाला तोंड लागले तर योजनेच्या अंतिम टप्प्यात पाकिस्तान विरुद्ध १९६५ मध्ये युद्ध भडकले. भाववाढ, अन्नधान्याची कमतरता, विदेशी विनिमयात तूट, महत्त्वाच्या औद्योगिक कच्च्या मालाचा तीव्र तुटवडा अशा नानाविध प्रतिकूलतेने या योजनेला ग्रासले. विकासाच्या अनेक क्षेत्रात विशेष करून कृषी, जलसिंचन, ऊर्जा, संघटित उद्योग या क्षेत्रात योजनेने ठरवून दिलेली लक्ष्य गाठली गेली नाहीत. तरीपण वाहतूक व दळणवळण क्षेत्रात; रस्ते, जलवाहतूक, महत्त्वाच्या बंदरांची कार्यक्षमता, वायुसेवा, पोस्ट, टेलिग्राफ व टेलिफोन याबाबतची लक्ष या योजना काळात ओलांडल्या गेली. वाहतूकीच्या दृष्टीने तयार केलेले रेल्वेमार्ग व रस्ते याबाबतची लक्ष जवळजवळ साध्य झाली. एकंदरीत वाहतूक

दळणवळणाच्या क्षेत्रात या योजना काळातील यश समाधानकारक होते. तसेच पहिल्या दोन योजना काळात झाली तशी या योजना काळातही शिक्षणाच्या सोयी व आरोग्यसेवा यात बऱ्यापैकी वृद्धी झाली. एकंदरीत तिसऱ्या योजना काळात जलसिंचन, कृषी व ऊर्जा या क्षेत्रात अल्पयश आले, तर उद्योग, वाहतूक, दळणवळण, आरोग्य सेवा, शिक्षण या क्षेत्रातील यश मात्र समाधानकारक होते.

## ३.७ सारांश

भारतात ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर भारतीयांना आधुनिकतेची ओळख झाली. आधुनिक शिक्षण घेतलेल्या भारतीयांना आपल्या समाजातील स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यासारख्या अनिष्ट सामाजिक प्रथांमुळे समाज एकसंध राहिला नाही याची जाणीव होऊन त्या विरोधात वातावरण निर्मिती करण्यास त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरुवात केली. राष्ट्रीय चळवळीतही हा मुद्दा वेळोवेळी येत गेला. इंग्रजांनीही याबाबतीत कायदे करून समाजसुधारणेचे प्रयत्न केले. परंतु त्याचा म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. म्हणून स्वातंत्र्यानंतर नेहरू युगामध्ये राज्यघटनेत स्त्रिया आणि अस्पृश्यांना कायदेशीर हक्क देऊन हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु हे प्रयत्न अपुरे आहे याची जाणीव झाल्याने हिंदू कोड बिलासारखे कायदे करण्याचा प्रयत्न झाला परंतु सनातनी प्रतिगामी शक्तींनी याला विरोध केल्यामुळे हे कायदे कालांतराने तुकड्या तुकड्यांमध्ये पास करण्यात आले. त्याचप्रमाणे अस्पृश्यता निवारण्यासाठीही विशेष कायदे करण्यात आले. त्यामुळे स्त्रीसमानता आणि अस्पृश्यता निवारण याला मोठा हातभार स्वातंत्र्योत्तर कालखंडात लागला.

सामाजिक सुधारणांप्रमाणेच आर्थिक सुधारणांनीही स्वातंत्र्योत्तर कालखंडात वेग घेतला. ब्रिटिशांनी विविध मार्गाने भारतातील संपत्ती आपल्या मायदेशात नेली. त्यामुळे भारत हा दिवसेंदिवस आर्थिक दृष्ट्या दुर्बल बनत गेला. नेहरू युगामध्ये ही आर्थिक दुर्बलता नष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक सुधारणा केल्या गेल्या. त्यासाठी रशियाप्रमाणे आर्थिक नियोजनाचे तत्व स्वीकारून पंचवार्षिक योजनांचा आधार घेतला गेला. त्याप्रमाणे नेहरू काळामध्ये तीन पंचवार्षिक योजना कार्यान्वित झाल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्रावर तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक क्षेत्रावर भर देण्यात आला. या दोन्ही योजनेतील अपूर्ण राहिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत करण्यात आला. या आर्थिक नियोजनांचे तत्कालीन लाभ विशेष नसले तरी नंतर झालेल्या भारतातील आर्थिक विकासाचे श्रेय या आर्थिक नियोजनाला जाते.

## ३.८ प्रश्न

१. स्वातंत्र्योत्तर कालखंडात नेहरू युगामध्ये झालेल्या स्त्रियांविषयक सामाजिक सुधारणांचा आढावा घ्या.

२. नेहरू युगामध्ये झालेल्या स्त्रीसुधारणा विषयक कायद्यांची माहिती द्या.

३. नेहरू युगातील अस्पृश्यता निवारणविषयक प्रयत्नांची चर्चा करा.

४. नेहरू युगातील आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी सांगून आर्थिक धोरणांची चर्चा करा.

५. नेहरू युगातील नियोजित अर्थव्यवस्थेचे तत्व स्पष्ट करून पंचवार्षिक योजनांचे मूल्यमापन करा.

## ३.९ संदर्भ

१) **आधुनिक भारताचा इतिहास :** बी. एल. ग्रोवर आणि एन. के. बेल्हेकर

२) **आधुनिक भारताचा इतिहास :** डॉ. शांता कोठेकर

३) **आजादी के बादका भारत :** बिपिन चंद्र

४) **भारतीय राष्ट्रीय चळवळ :** डॉ. साहेबराव गाठाळ

❖❖❖❖

munotes.in

# ४

## नेहरूंचे परराष्ट्र धोरण

**घटक रचना :**

४.१ उद्देश

४.२ प्रस्तावना

४.३ भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख तत्वे

४.४ अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट

४.५ अलिप्ततावादाची वाटचाल व भारताचे परराष्ट्र धोरण

४.६ भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध

४.७ सारांश

४.८ प्रश्न

४.९ संदर्भ

## ४.१ उद्देश

१ नेहरू काळातील परराष्ट्र धोरणाच्या प्रमुख तत्त्वांचा आढावा घेणे.
२ अलिप्तवादी परराष्ट्र धोरण म्हणजे काय हे समजून घेणे.
३ अलिप्तवादी परराष्ट्र धोरणाच्यावाटचालीचा मागोवा घेणे.
४ भारताचे नेहरू काळातील इतर राष्ट्रांशी असलेले संबंध यावर प्रकाश टाकणे.

## ४.२ प्रस्तावना

दुसरा महायुद्धानंतर जागतिक स्तरावर अमेरिका आणि रशिया या दोन बलाढ्य सत्तागटामध्ये जग विभागले गेले. अमेरिका आणि रशिया या दोन महाशक्तींनी अण्वस्त्रे विकसित करून दुर्बल राष्ट्रांवर आपल्या लष्करी ताकदीचे प्रदर्शन दाखवणे सुरू केले. त्यामुळे शीतयुद्धाची परिस्थिती उद्भवून अविश्वासाचे देशांना वातावरण तयार झाले. या परिस्थितीमुळे आपले परराष्ट्र धोरण कसे असावे याबद्दल बहुतेक देशांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर भारताला स्वातंत्र्य मिळून भारताचे स्वतंत्र असे परराष्ट्र धोरण नेहरू काळामध्ये आकार घेत गेले. सप्टेंबर १९४६ मध्ये बोलताना नेहरूंनी स्पष्ट केले की, “मागील दोन महायूध्दांमध्ये दिसून आलेल्या व पुढे त्याचा विस्तार होण्याची शक्यता असलेल्या परस्परविरोधी गटांच्या सत्ता स्पर्धेपासून दूर राहणे हा आमचा हेतू आहे. आमचा विश्वास आहे की शांतता आणि स्वातंत्र्य अविभाज्य आहेत आणि स्वातंत्र्य कुठेही

नाकारणे म्हणजे संघर्षाला व युद्धाला आमंत्रण आहे. वसाहतींच्या व दुसऱ्यावर अवलंबून असलेल्या राष्ट्रांच्या व लोकांच्या मुक्तीत आम्हाला रुची आहे, तसेच सर्व वंशियांना सिद्धांत व व्यवहार या दृष्टीने समान संधी असावी, त्याचप्रमाणे दुसऱ्यावर नियंत्रण असू नये आणि इतर जनतेवर खास अधिकारांची स्थिती असू नये असे आम्हाला वाटते". ह्या त्यांच्या भाषणामध्येच स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची बीजे सामावलेली दिसून येतात. कोणत्याही राष्ट्राची परराष्ट्रनीती तत्कालीन राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती, विचारधारा, आकांक्षा, राष्ट्राचे हितसंबंध, तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती यातून साकार होते. राष्ट्राचे हित संवर्धन व्हावे या एकाच उद्दिष्टाने परराष्ट्र धोरणाचे निर्धारण केले जाते.१९४७ मध्ये भारताचे परराष्ट्र धोरण निश्चित करताना नेहरूंपुढे हेच उद्दिष्ट होते. तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थितीप्रमाणेच भारताचे परराष्ट्र धोरण स्वातंत्र्य चळवळीतील ध्येय धोरणातून साकार झालेले दिसून येते. भारत हा साम्राज्यवादाच्या ववसाहतवादाच्या अन्यायाखाली पिळून निघाला होता. त्यामुळे साहजिकच भारताचा या तत्त्वांना विरोध होता. भारताचीझालेली आर्थिक पिळवणूक, दोन्ही महायुद्धाचे भारतावर झालेले परिणाम, वंशभेदाचे आलेले अनुभव, तसेच प्राचीन काळापासून भारताची शांततेची  परंपरा या सर्व गोष्टींचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडलेला दिसून येतो. सप्टेंबर १९४६ मध्ये नेहरूंनी हंगामी सरकारच्या पंतप्रधानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर म्हणाले होते की, "एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून आमची नीती स्वतःच निश्चित करून आंतरराष्ट्रीय राजकारणात आम्ही सर्वार्थाने सहभागी होणारआहोत. कोणत्याही राष्ट्राच्या प्रभावाखाली आम्हाला  राहावयाचे नाही. सर्व राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याची व जागतिक शांतता व स्वातंत्र्याकरता सर्व राष्ट्रांशी सहकार्य करण्याची आमची इच्छा आहे. शांतता व स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी अतूट आहेत. कोणत्याही राष्ट्राला स्वातंत्र्य नाकारले गेले तर त्याचा इतरही राष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर विपरीत परिणाम होईल आणि त्याची परिणीती संघर्षात होईल अशी आमची खात्री आहे. वसाहतवादाखाली दडपले गेलेले राष्ट्र व तेथील जनता यांना या जोखडापासून मुक्तता मिळावी व सर्व लोकांकरिता केवळ सैद्धांतिकदृष्ट्या नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारात समानता हे तत्व मान्य केले जावे अशी आमची धारणा आहे. वंशश्रेष्ठत्वाचे नाझी तत्त्वज्ञान कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही स्वरूपात दृष्टिगोचर होत असो त्याचा आम्ही निश्चितपणे धिक्कार करतो". *(शांता कोठेकर ; आधुनिक भारताचा इतिहास ; साईनाथ प्रकाशन ; नागपूर)* नेहरूंच्या या वक्तव्यावरून भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या प्रमुख तत्त्वांवर प्रकाश पडतो.

## ४.३ भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख तत्वे

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नेहरू काळामध्ये निश्चित असे परराष्ट्र धोरण अंगीकारले गेले. त्याची प्रमुख तत्वेपुढीलप्रमाणे सांगता येतील-

१. **जागतिक शांतता**: जागतिक शांतता टिकवून आंतरराष्ट्रीय सहकार्य वृंध्दिंगत करणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख तत्त्व होते. युद्धातील पराजयामुळे राष्ट्राची हानी होते आणि भारताजवळ स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी लष्करी आणि आर्थिक सामर्थ्यही तोकडे होते. त्यामुळे सहाजिकच शांतता टिकवण्याची निकड भारताला अधिक वाटत होती. शिवाय अण्वस्त्रांचा शोध लागल्यामुळे जागतिक युद्ध झाले तर सर्वनाश ठरलेलाच आहे आणि तशा युद्धात तटस्थ राहण्याचा कितीही प्रयत्न केला तरी भारत त्या

विनाशातून सुटू शकणार नाही याची जाणीव नेहरूंना होती. म्हणून जागतिक शांततेला नेहरूंनी आपल्या परराष्ट्र धोरणात प्राधान्य दिले.

२. **निशस्त्रीकरण**: भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जग अमेरिका आणि रशिया या जागतिक सत्तांच्या दोन गटात विभागले जाऊन असुरक्षितेच्या भावनेतून दोन्हीही सत्तांनी शस्त्रास्त्रांचा निर्मितीला प्राधान्य दिले होते. त्यातून जागतिक युद्धाचा तणाव निर्माण झाला. हा तणाव नायसा करायचा असेल तर निशस्त्रीकरण अत्यावश्यक आहे असे पंडित नेहरूंचे मत होते. आर्थिकदृष्ट्या दुबळ्या व मागास अवस्थेत असलेल्या भारताला विकास करायचा असेल तर प्रगत राष्ट्रांकडून भांडवल आणि तंत्रज्ञान इत्यादींची मदत मिळणे अगत्याचे होते आणि हे शांततेच्या काळातच शक्य होणार होते. म्हणून नेहरूंच्या परराष्ट्र धोरणात निशस्त्रीकरण महत्त्वाचे तत्व होते.

३. **साम्राज्यवाद, वसाहतवाद आणि वंशभेदास विरोध:** साम्राज्यवाद, वसाहतवाद ववंशभेद यांच्या चरकात भारतच नव्हे तर अशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रेही चांगलीच पिळून निघाली होती. सहाजिकच त्या राष्ट्रांबद्दल भारताला सहानुभूती होती. त्यामुळे या घातक प्रवृत्तीचे मानवी जीवनातून पूर्णपणे उच्चाटन करण्याकरिता परराष्ट्र धोरण राबवण्याचा भारताचा हेतू स्वाभाविकच होता. वांशिक समतेचे तत्व सैद्यांतिकदृष्ट्या आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झालेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र वर्णभेद व वंशभेद या कारणावरून अनेक राष्ट्रात जुलूम व दडपशाही सुरू होती. वंशभेदामुळे होणारा अन्याय दूर झाला पाहिजे यावर परराष्ट्रनीतीवरील आपल्या भाषणातून नेहरू वेळोवेळी भर देत होते. वांशिक समता हा मानवाचा एक मूलभूत अधिकार आहे असा त्यांचा विश्वास होता. त्याचबरोबर वंशभेदामुळे संघर्षाची आणि युद्धाची संभावना बळावते असे त्यांना वाटे. त्यामुळे वसाहतवाद व वंशभेद यांचे निर्मूलन व्हावे व त्यामुळे होणारा अन्याय दूर व्हावा हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक उद्दिष्ट होते.

४. **आशियाई राष्ट्रांचे ऐक्य:** भारताच्या स्वातंत्र्याबरोबर जगाच्या इतिहासात एका नव्या युगाला प्रारंभ होईल असा विश्वास नेहरूंना वाटत होता. भविष्यातील आशियाच्या पुनरुज्जीवनाच्या प्रक्रियेत भारत-चीन सहकार्याच्या आवश्यकते बाबतची कल्पना नेहरूंच्या मनात मूळ धरू लागली होती. भारत व चीन यांच्या पुढाकाराखाली आशियाई राष्ट्रांचे ऐक्य प्रस्थापित झाले तर जागतिक राजकारणात पाश्चिमात्यांना अनुकूल असलेले शक्तीसंतुलन आशियाच्या बाजूने झुकू शकेल असा विश्वास नेहरूंना होता. त्यामुळे आशियाई राष्ट्रांचे ऐक्य प्रस्थापित करने भारताच्या परराष्ट्र धोरणाचा उद्देश राहिला.

५. **संयुक्त राष्ट्रसंघाप्रती आस्था**: दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक शांतता स्थापन व्हावी म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. पंडित नेहरूंच्या मते, संयुक्त राष्ट्रसंघाचा उपयोग जागतिक शांततेची स्थापना, निशस्त्रीकरणाचा प्रसाराकरता व साम्राज्यवाद, वसाहतवाद आणि वंशवाद यांचा नायनाट करण्याकरता होऊ शकेल. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाप्रती त्यांनी विश्वास व्यक्त केला आणि आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये महत्त्वाचे स्थान दिले.

६. **अलिप्तता:** वरील सर्व तत्त्वानुसार परराष्ट्र धोरण ठरवायचे असेल तर अलिप्तवादी धोरण स्वीकारणे अपरिहार्य ठरते. त्यासाठी अमेरिका किंवा रशिया यांच्या गटात सामील न होता स्वतंत्र राहून आपल्या राष्ट्राला सशक्त बनवण्यासाठी नेहरूंनी अलिप्तवादी धोरण स्वीकारले. १९४७मध्ये अलिप्तवादाचा पुरस्कार करणारा भारत एकमेव देश होता. पाश्चिमात्य भांडवलशाही गटाशी किंवा समाजवादी गटाशी किंवा अन्य कोणत्याही राष्ट्राशी भारताने स्वतःला लष्करी कराराने बांधून न घेणे हे अलिप्तवादी धोरणाचे एक प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. अमेरिका व सोविएत संघ या राष्ट्रांनी आपापल्या गटातील राष्ट्रांशी लष्करी करार केलेले होते. कोणत्याही राष्ट्रावर हल्ला झाला तर तो त्या राष्ट्रगटाच्या सर्वच राष्ट्रांवरील हल्ला आहे असे मानून त्या राष्ट्रांनी आक्रमित राष्ट्राच्या मदतीला जावे अशी तरतूद त्या करारात होती. अशा कारणांमुळे युद्धाच्या धोक्याची व युद्धक्षेत्र विस्तारण्याची संभावना होती. अलिप्तता धोरणामध्ये कोणत्याही राष्ट्राच्या किंवा राष्ट्रगटाच्या मताशी किंवा हितसंबंधाशी स्वतःला बांधून न घेता परराष्ट्र नीतीचे निर्धारण राष्ट्रहिताच्या दृष्टीने आपल्या मतानुसार करण्याचे स्वातंत्र राखणे, कोणत्याही बड्या राष्ट्राच्या हातातील बाहुले बनवून न राहणे, बड्या राष्ट्राच्या हेव्यादाव्यात व शत्रुत्वात अडकून न पडणे, आंधळेपणाने कोणत्याही राष्ट्रगटाच्या पावलावर पाऊल टाकूनन चालणे, उलट कोणत्या प्रसंगी कशी भूमिका घ्यायची याचा निर्णय स्वतंत्रपणे करण्याचा अधिकार अबाधित राखणे हे अलिप्ततावादी धोरणाचे मुख्य मुद्दे होते. शितयुद्धातील कोणत्याही गटाशी कराराने बांधले गेल्यास त्या राष्ट्रगटाच्या धोरणाचे दडपण भारताच्या धोरणावर येणारव भारताचे स्वतःचे हित बाजूला पडून त्या गटाचे सर्वसामान्य हितसंबंध लक्षात घेऊनच भारताला आपले धोरण निश्चित करावे लागणार होते. तसे झाल्यास राष्ट्राच्या राजकीय स्वातंत्र्यावरही विपरीत परिणाम होईल अशी नेहरूंना खात्री होती. तेव्हा तसे बंधन भारतावर येऊ नये या दृष्टीने अलिप्तता धोरण आवश्यक होते.

भारताची अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे यावर नेहरूंनी वेळोवेळी भर दिला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने जवळजवळ सर्व स्वतंत्र राष्ट्रांशी राज नैतिक संबंध प्रस्थापित केले. संयुक्त राष्ट्रसंघ व संबंधित घटक संस्था यांचा भारत एक उत्साही सदस्य राष्ट्र आहे. राष्ट्रकुलाचे सदस्यत्वही भारताने मान्य केलेले आहे. तसेच अफ्रो-आशियाई संघटनात भारत मोलाची कामगिरी बजावत आहे. यावरूनच भारताची तटस्थता म्हणजे अलिप्तता नव्हे हे उघड आहे. म्हणजेच भारताच्या अलिप्तता नीतीचा आधार तटस्थता नव्हे तर सहकार्याचा आहे. आवश्यकतेनुसार इतर राष्ट्रांशी विचार विनिमय व सहकार्य आणि त्याचबरोबर स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा व त्यानुसार नीती निर्धारित करण्याचा अधिकार या सर्व गोष्टी भारताच्या अलिप्तता धोरणात अभिप्रेत आहे. ९ डिसेंबर १९५७ रोजी अलिप्तता धोरणाचे स्वरूप लोकसभेपुढे स्पष्ट करताना नेहरू म्हणाले होते की , “आमची अलिप्तता नीती म्हणजे कोणत्याही लष्करी राष्ट्रगटाशी आम्ही स्वतःला बांधून घेतलेले नाही. मात्र आमची ही नीती नकारात्मक नाहीतर ती एक सुनिश्चित व गतिमान अशी नीती आहे. आजच्या जगातील लष्करी राष्ट्रगट व शीतयुद्ध यात आम्ही स्वतःला गुंतवून घेणार नाही, एवढ्या पुरतेच या नीतीचे स्वरूप मर्यादित नाही तर कोणत्याही प्रश्नाबाबत योग्य तो निर्णय स्वतंत्रपणे घेता यावा व आमचे प्रमुख आदर्श व उद्दिष्ट साध्य करता यावेत याकरिता आम्हीही नीती निर्धारित केली आहे. जागतिक राजकारणात आज दोनच मार्ग आहेत व

प्रत्येक राष्ट्राला त्यापैकी कोणता तरी एक मार्ग चोखाळावाच लागेल असे आग्रही प्रतिपादन अनेकदा केले जाते. परंतु आम्हाला ते मान्य नाही तसे करणे म्हणजे शीतयुद्धात भारताला गुंतवून घेणे होईल, आम्हाला ते नको आहे. एक भारतीय व मुख्य म्हणजे भारताचा परराष्ट्रमंत्री म्हणून कोणत्याही मुद्द्याबाबत आमच्या मतानुसार स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार कोणत्याही राष्ट्राच्या हाती सोपवण्याची आमची तयारी नाही, ह्या आमच्या भूमिकेत आलिप्तता नीतीचे सार साठवलेले आहे". *(डॉ शांता कोठेकर: आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृ. २७१)* या अलिप्ततावादी धोरणाचेप्रत्यंतर तत्कालीन आंतरराष्ट्रीय विविध घटनांच्या संदर्भात आपल्याला दिसून येते.

७. **पंचशील तत्वे**: आंतरराष्ट्रीय सहकार्य वृद्धिंगत होऊन जागतिक शांतता टिकावी या उद्देशाने भारताने पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला. साम्राज्यवादाचा फटका भारत व चीन दोघांनाही बसला होता. भारत १९४७ मध्ये स्वतंत्र झाला तर त्या पाठोपाठ १९४९ मध्ये चीनचे प्रजासत्ताक शासन उदयास आले. नेहरूंना असे वाटत होते की साम्राज्यवादी सत्तांकडून या दोन्ही राष्ट्रांचे शोषण झालेले आहे आणि दोन्ही देशांचे दारिद्र्य व अविकसितपणा हे प्रश्न समान आहेत. त्यामुळे जगात महत्त्वाचे स्थान प्राप्त करण्यासाठी हे दोन्ही देश आलिप्तता व अनाक्रमानाचे धोरण स्वीकारून परस्पर सहकार्य करतील. यासाठी पाच तत्वांचा करार करण्यात आला, त्यालाच पंचशील असे म्हणतात. नेहरूंनी १९५४ मध्ये चीनला भेट दिली होती, तेव्हा पंचशील करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारात पुढील तत्वांचा समावेश होतो-

१. परस्परांच्या प्रादेशिक अखंडतेचा व सार्वभौमत्वाचा आदर ठेवणे.

२. परस्परांवर आक्रमण न करणे.

३. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

४. परस्परांना हितावह होईल असा समानतेचा व्यवहार करणे.

५. शांततापूर्ण सहचार्याला मान्यता देणे.

इंडोनेशियाच्या प्रधान मंत्र्याच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या भोजन समारंभाच्या प्रसंगी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रात भारताने मान्य केलेली मार्गदर्शक तत्वे म्हणून पंचशील तत्त्वांचा उल्लेख नेहरूंनी आपल्या भाषणात जाहीरपणे सप्टेंबर १९५४ मध्ये केला. १७ ऑक्टोंबर१९५४ रोजी व्हिएतनाम लोकशाही सरकारचे अध्यक्ष हो-ची-मिन्ह यांनी तर डिसेंबर १९५५ मध्ये युगोस्लोव्हिया या युरोपीय राष्ट्राने पंचशील तत्त्वांना मान्यता दिली. एप्रिल१९५५ पर्यंत ब्रह्मदेश, चीन, लाओस, नेपाळ, कंबोडिया या राष्ट्रांनीही पंचशीलला आपला पाठिंबा जाहीर केला. एप्रिल १९५५ मध्ये नवी दिल्ली येथे भरलेल्या आशियाई राष्ट्रांच्या परिषदेला सुमारे दोनशे प्रतिनिधी उपस्थित होते. यासर्वांनी पंचशील तत्त्वांना आपला पाठिंबा जाहीर केला. १९५५ मध्ये बांडुंग येथे भरलेल्या आफ्रो-आशियाई परिषदेत दोन्ही खंडातील २९राष्ट्रे सहभागी झाली होती. त्यात मूलभूत मानवी हक्कांचा सन्मान राखला जावा व सर्व आंतरराष्ट्रीय मतभेदांची उकल शांततेच्या मार्गानेच केली जावी. या दोन तत्त्वांची जोड पंचशीलला दिली. १९५५ मध्येच ऑस्ट्रेलिया व पोलंड या देशांनीही पंचशील तत्त्वांना आपली मान्यता दिली.

## ४.४ अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट

भारताने स्वीकार केलेले अलिप्तवादी धोरण १९५० नंतरच्या दशकात जागतिक राजकारणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. प्रारंभी या धोरणाला आशियाई व अरब राष्ट्राकडून पाठिंबा मिळाला. त्यामुळे हे धोरण विशिष्ट भागाशी निगडित असल्याची कल्पना जागतिक स्तरावर होती. मात्र १९४८ मध्ये युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष जोसेफ ब्राझटिटो यांचे सोवियत सरकारशी तीव्र मतभेद झाले. भौगोलिक स्थिती, सैद्धांतिक भूमिका व राष्ट्रीय स्वतंत्र्य टिकवून धरण्याची इच्छा यामुळे पाश्चिमात्य गटातही ते सामील होऊ इच्छित नव्हते. या कारणामुळे हे युरोपीय राष्ट्र अलिप्तवादी धोरणाकडे वळले. डिसेंबर १९५४ मध्ये टीटोंनी भारताला भेट दिली तर जुलै१९५५ मध्ये नेहरू युगोस्लाव्हियाच्या भेटीला गेले. भारत व युगोस्लाव्हिया या राष्ट्रांच्या परराष्ट्रनितीला आधारभूत ठरणाऱ्या कल्पना व तत्वे समान असल्याचे सांगून जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर शांततेने वाटाघाटी होऊन परस्पर संमतीने त्याबाबत निर्णय व्हावे असे आवाहन नेहरू टिटोयांनी केले. याच सुमारास इजिप्तचे शासक गमाल अब्दुल नासेर यांच्याशी नेहरू निकटचा संपर्क प्रस्थापित करत होते. फेब्रुवारी १९५५ मध्ये कैरो येथे झालेल्या त्यांच्या पहिल्या भेटीनंतर लष्करी करारांपासून अलिप्त राहण्यासंबंधी दोन्ही राष्ट्रांची भूमिका समान असल्याचे या उभयनेत्यांनी जाहीर केले. यानंतर जुलै १९५६ मध्ये युगोस्लाव्हियामधील ब्रिओनी बेटावर नेहरू, टिटो व नासेर यांच्यात झालेल्या बैठकीत अलजेरीयाची समस्या, सायप्रस बाबतचे मतभेद अशा आंतरराष्ट्रीय प्रश्नांची शांततेच्या मार्गाने उकल करण्यात यावी याकरता महासत्तांना आव्हान करण्यात आले. ब्रियोनी परिषदेचे खरे महत्त्व म्हणजे आफ्रिका, युरोप व आशिया या तीन निरनिराळ्या खंडातील तीन असंलग्नित राष्ट्र शांततेच्या मार्गाने आंतरराष्ट्रीय समस्यांची उकल करावी, लष्करी करारांना विरोध व जागतिक शांततेची निकड या उद्दिष्टांनी एकत्र आली होती. त्यामुळे अलिप्तवादी धोरणाचे क्षेत्र अधिकाधिक व्यापक होत असल्याचे स्पष्ट झाले.

अणूयुद्धाचा वाढता धोका, सुवेझवरील आक्रमण व क्युबात अमेरिकेचा हस्तक्षेप, बर्लीन आणीबाणी, भारत व युगोस्लोव्हिया या राष्ट्रांप्रती चीनने चालवलेले शत्रुत्व अशा घटनांमुळे अलिप्ततेची उपयुक्तता व बड्या राष्ट्रांच्या आक्रमक नीतीला आवर घालण्याची गरज तीव्रतेने जाणवली. म्हणूनच अलिप्ततावादी नीतीचा अंगीकार करणाऱ्या सर्व राष्ट्रांना एका गटात आणून जागतिक राजकारणात त्या गटाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, या हेतूने डिसेंबर १९६१ मध्ये बेलग्रेड येथे अलिप्ततावादी राष्ट्रांची परिषद आयोजित केली गेली. या परिषदेत अलिप्तवादी राष्ट्रांना सर्वमान्य झालेली अलिप्तवादाची व्याख्या विशद करण्यात आली, त्याचा आधार भारताची अलिप्तवादीनीती होती. वेगवेगळ्या स्वरुपाचे हितसंबंध असलेल्या घाणा, क्युबा, अल्जेरिया, इथिओपिया, अफगाणिस्तान अशा राष्ट्रांना अलिप्तवादी नीती मान्य व्हावी या हेतूने या व्याख्येद्वारे अधिक व्यापक स्वरूप दिले गेले. स्वतंत्रपणे स्वतःच्या मर्जीनुसार नीती निर्धारित करणे, निरनिराळ्या राष्ट्रात चालू असलेल्या स्वातंत्र चळवळींना पाठिंबा देणे, महासत्तांमधील संघर्षाच्या संदर्भात करण्यात येत असलेल्या लष्करी करारात स्वतःला गुंतवून न घेणे, आपल्या राष्ट्राच्या भूमीवर परराष्ट्रांना लष्करी तळ उभारण्यास परवानगी न देणे, ही अलिप्तवादी नीतीची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे बेलग्रेड परिषदेत विशद करण्यात आले. १९६० पर्यंत भारताच्या अलिप्तवादी

munotes.in

धोरणाला सोवियत संघाकडून पाठिंबा मिळाला तर १९६१ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनडी यांनी भारताच्या या धोरणाला मान्यता दिली. त्यामुळे या नीतीला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात निश्चितपणे मान्यता मिळाली. १९६० नंतर अनेक नवस्वतंत्र राष्ट्रांनी स्वतःहून या नीतीचा अंगीकार केला. त्यामुळे अलिप्तवादी धोरणाचे क्षेत्र अधिकच विस्तारले. बेलग्रेड 'अलिप्तवादी' परिषदेला २५ सदस्य राष्ट्र उपस्थित होती तर त्यानंतर १९६४ मध्ये कैरो येथे भरलेल्या परिषदेत ती संख्या ४७ झाली होती. अशा प्रकारे भारतापासून उगम पावलेल्या अलिप्तवादी धोरणाच्या या चळवळीत आज १०० च्या वर राष्ट्रे सहभागी झालेली आहेत. ही अलिप्तवादी राष्ट्रे लष्करीदृष्ट्या सामर्थ्य संपन्न नसली तरी हा एक संघटित गट राहिल्यामुळे जागतिक राजकारणात या गटाची दखल घेणे महासत्तांना आवश्यक व्हावे अशी स्थिती निर्माण झाली. त्यामुळे महासत्तांच्या धोरणावर काही प्रमाणात का होईना दबाव आणण्याचे कार्य या चळवळीने निश्चित केले. अशा ह्या अलिप्तवादी चळवळीचे जनक पंडित नेहरू हे होते.

## ४.५ अलिप्ततावादाची वाटचाल व भारताचे परराष्ट्र धोरण

युद्ध शांतता वसाहतवाद वर्णभेद अशा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर भारताने स्पष्टपणे व ठामपणे आपली मते मांडून अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे तर भारताची निश्चित अशी काही मते आणि भूमिका आहे हे वेळोवेळी घडलेल्या जागतिक स्तरावरील घटनांनी स्पष्ट केले. यातूनच भारताचे विविध देशांशी संबंध व परराष्ट्र धोरण विकसित होत गेले.

१. **कोरियन युद्धः** भारताच्या अलिप्तवादी धोरणाची पहिली परीक्षा कोरीयातील युद्धाने घेतली. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने दक्षिण कोरियाचा तर रशियाने उत्तर कोरियाचा ताबा घेतला होता. ३८ अक्षांश हे उत्तर व दक्षिण कोरियाधील नियंत्रण रेषा मान्य करण्यात आली. परंतु १९५० मध्ये या दोन्ही देशात संघर्ष प्रारंभ झाला. भारताने संयुक्त राष्ट्रसंघात निवेदन दिले की, कोरियाला एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहू द्यावे. परंतु याचा उपयोग झाला नाही. रशिया समर्थित उत्तर कोरियाने अमेरिका समर्थित दक्षिण कोरियावर आक्रमण केले. भारताने उत्तर कोरियाला आक्रमक ठरवून युद्धबंदीचे आवाहन केले. परंतु अमेरिकेच्या दक्षिण कोरियाला सैनिकी मदत पुरवण्यासंबंधी प्रस्तावावर भारताने कोणतीही प्रक्रिया दिली नाही, म्हणून अमेरिकेचा भारतावर रोष ओढवला. अमेरिकन फौजा ३८अक्षांशवर असलेल्या सीमेला पार करून उत्तर कोरिया मध्ये घुसल्या. त्यामुळे चीनने स्वसंरक्षणासाठी सैनिक पाठवून अमेरिकी फौजांना 38 अक्षांश सीमेपर्यंत वापस मागे रेटले. त्यामुळे अमेरिकेने संयुक्त राष्ट्र संघात चीनला आक्रमक ठरवण्यासाठी प्रस्ताव मांडला. परंतु भारताने निपक्षपाती भूमिका घेऊन अमेरिकेला आक्रमक ठरवले. भारताच्या अथक प्रयत्नांमुळे १९५३ मध्ये युद्धबंदी झाली आणि या युद्धामध्ये बंदी बनवलेल्या सैनिकांची अदलाबदली करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने भारताला मध्यस्थी बनवले. १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण करूनही भारताने चीनला सुरक्षा परिषदेमध्ये स्थान द्यावे यासाठी विशेष प्रयत्न केले आणि आपल्या कोरिया संबंधातील नीतीला प्रभावित होऊ दिले नाही. भारतामध्ये दुष्काळ पडल्यानंतर अमेरिकेतून अन्नधान्य मागवण्याची मोठी आवश्यकता होती, तरीही कोरिया संबंधातील आपल्या नीतीला नेहरूंनी प्रभावित होऊ दिले नाही.

munotes.in

भारताच्या या भूमिकेचे रशियाचे प्रधानमंत्री बुल्गारीन यांनी स्वागत केले. अशाप्रकारे भारताच्या अलिप्तवादी परराष्ट्र धोरणाचे महत्त्व अधोरेखित झाले.

२. **सुवेझ कालवा प्रकरण:** भूमध्य समुद्र आणि लाल समुद्रयांना जोडणाऱ्या इजिप्त मधील सुवेझ कालव्याची निर्मिती १८६९ मध्ये झाली. या कालव्यामुळे युरोप आणि आशिया यामधील खूप मोठे अंतर कमी झाले होते. त्यामुळे या अत्यंत महत्त्वाच्या सुवेझ कालव्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी १९५६ मध्ये संघर्ष उद्भवला होता. अमेरिका आणि इंग्लंड यांनी इजिप्तवर अलिप्तवादी धोरणाचा त्याग करण्यासाठी दबाव टाकला. त्याची प्रतिक्रिया म्हणून इजिप्तने सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयकरण केले. त्यामुळे या कालव्याचा उपयोग करणारे देश घाबरून गेले. विशेषतः ब्रिटन आणि फ्रान्सने या कालव्यावर आंतरराष्ट्रीय नियंत्रणाची मागणी केली. १८८८ च्या कराराप्रमाणे सुवेझ कालवा इजिप्तचे अभिन्न अंग होता. भारताने ब्रिटन तथा इजिप्त या दोघांनाही संयमाचे आवाहन केले आणि १९५६ मधील लंडन संमेलनामध्ये इजिप्तच्या कालव्यावरील नियंत्रणाचे समर्थन केले. फ्रान्स, इंग्लड आणि इसराइल यांनी सुवेझ कालव्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी लष्कर पाठवले. नेहरूंनी याला खुले आक्रमण असे संबोधून इजिप्तचे समर्थन केले. अमेरिकेने सुद्धा या कृतीचा निषेध केला. शेवटी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीने या फौजा माघारी घेण्यात आल्या. येथेही भारताने इजिप्तचे समर्थन करून ब्रिटन सोबतचे आपले संबंध बिघडू दिले नाहीत. ब्रिटनलाही कालांतराने भारताची भूमिका बरोबर होती याची जाणीव झाली.

३. **कांगो समस्या :** भारताच्या अलिप्तवादी धोरणाचे महत्व कांगोच्या स्वातंत्र्यामध्ये व एकतेमध्ये दिसून येते.१९६० मध्ये कांगोने बेल्जियमपासून स्वातंत्र्य मिळवले. परंतु तांब्याच्या खाणींनी समृद्ध असलेल्या कांगोमधील कटांगा प्रदेशाने सुद्धा कांगो मधून स्वतंत्र होण्याची घोषणा केली. कटांगाचे नेते शोंबे यांना बेल्जियमने समर्थन दिले. बेल्जियमच्या नागरिकांच्या सुरक्षेचे कारण पुढे करून बेल्जियमने कांगोमध्ये फौजा पाठवल्या. कांगोचे प्रधानमंत्री लुमुंबा यांनी संयुक्त राष्ट्रसंघ, अमेरिका तसेच सोवियत रशिया यांना मदतीसाठी आव्हान केले. संयुक्त राष्ट्र संघाने मदत करण्यासाठी हस्तक्षेप करण्याला संमती दिली. परंतु सत्तालोलपूविदेशी राष्ट्रांनी स्थानिक नेत्यांना समर्थन देऊन एकमेकांच्या विरोधात उभे केले. अमेरिकेने राष्ट्रपती कासावूबु यांचे समर्थन केले तर रशियाने पेट्रीसलुमुंबा आणि बेल्जियमने मोबुटुयाचे समर्थन केले. या संघर्षामध्ये लुमुंबा यांची हत्या झाली. या हत्येने जगामध्ये खळबळ माजली. नेहरूंनी संयुक्त राष्ट्र संघाकडे कारवाई करण्याची जोरदार मागणी करून विदेशी फौज्यांना कांगो मधून बाहेर घालवण्याची मागणी केली तसेच यासाठी भारत सैनिकी सहाय्य करण्यास तयार आहे असे सांगितले. संयुक्त राष्ट्रसंघाने याला सहमती दिली वसुरक्षा परिषदेने २१ फेब्रुवारी १९६१ रोजी याचा प्रस्ताव पास केला. भारतीय फौजांनी काँगोमधील गृहयुद्ध सफलतापूर्वक समाप्त करून संपूर्ण देशामध्ये १९६३ पर्यंत शांतता प्रस्थापित केली. या सर्व घटनेमध्ये भारताच्या अलिप्तवादी नीतीचे महत्व प्रस्थापित झालेले दिसून येते. मोठ्या महासत्ता नवस्वातंत्र्य देशांना त्यांनी स्वातंत्र्य उपभोगण्याआधीच चिरडू पाहत होत्या. त्याच्यावर चांगला उपाय म्हणून अलिप्तवादी धोरणाकडे पाहिले गेले. *(बिपिन चंद्र; आजादी केबाद का भारत)*

munotes.in

४. **भारत अमेरिका परराष्ट्र संबंध:** समाजवादाच्या प्रसाराला आळा घालण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून भांडवलशाही राष्ट्रगटाचे नेतृत्व  करणारा अमेरिका जगातील सर्वात संपन्न राष्ट्र होते. तर अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार करणारा भारत आशियातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र होते. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आंतरराष्ट्रीय राजकारण व परराष्ट्र धोरण या क्षेत्रातील उभय राष्ट्रांच्या भूमिकेचे स्वर फारसे कधी जुळले नाहीत. परराष्ट्रनीतीचे मूलभूत उद्दिष्टे, चीनविषयी नीती, कोरियन युद्ध, पाकिस्तान, गोवा व काश्मीर प्रश्न अशा अनेक मुद्द्यांबाबत दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टिकोनात तफावत असल्याचा वेळोवेळी प्रत्यय आला.

भारत आणि अमेरिका या दोघांचेही परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण परस्परविरोधी होते. अमेरिका भांडवलशाही राष्ट्रांचा एक गट करून साम्यवादी गटाला नेस्तनाबूत करून पाहत होता, तर भारत अलिप्तवादी परराष्ट्र धोरण स्वीकारून स्वतःचा आणि अविकसित राष्ट्रांच्या विकासाचा प्रयत्न करीत होता. १९४९ मध्ये अमेरिका समर्थित चीनमधील चॅग-कै-शेक सरकारचा पराभव होऊन तेथे माओ-त्से-तुंग  यांचे साम्यवादी सरकार सत्तेवर आले. या सरकारला भारताने मान्यता दिली. त्यामुळे भारत अमेरिका संबंध दुरावले गेले.१९४० मध्ये भडकलेल्या कोरियन युद्धबाबतही भारत अमेरिका यांच्या भूमिका पूर्णपणे परस्पर विरोधी होत्या. सोवियत रशिया समर्थित उत्तर कोरियाला भारताने आक्रमक  ठरवल्याचे अमेरिकेने स्वागत केले. परंतु उत्तर कोरियविरुद्ध दक्षिण कोरियाला लष्करी मदत देण्याच्या अमेरिकेच्या ठरावाला भारताने विरोध केला म्हणून म्हणून दोन्ही देशांच्या भूमिका परस्परविरोधी ठरल्या. काश्मीर प्रश्नाबाबत अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घेऊन पाकिस्तानला वेळोवेळी शास्त्रास्त्रे पुरवली त्यामुळे भारताचा अमेरिकेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. गोवा मुक्तीबाबतही अमेरिकेने गोवा ही पोर्तुगालची भूमी असल्याची  जाहीर भूमिका घेतलीव भारताच्या गोवामुक्तीसाठीच्या लष्करी कारवाईला विरोध दर्शविला. असे असले तरी १९६२ च्या भारत-चीन युद्धामध्ये अमेरिकेने भारताची बाजू घेऊन भारताच्या मदतीच्या आव्हानांला लगेच प्रतिसाद दिला आणि पाच दशलक्ष डॉलर्स किमतीची शस्त्रास्त्रे कोणतीही अट न घालता अमेरिकेने ताबडतोब भारताला पुरवली. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात अमेरिकेने दोन्ही देशांना युद्धबंदीचे आव्हान केले. तसेच पाकिस्तानचे लष्कर प्रमुख आयुबखान यांनी अमेरिकेकडे लावलेल्या सुरक्षा परिषदेत मदत करण्याचा तगाद्यालाही अमेरिकेने नकार दर्शवला. त्यामुळे भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांचे संबंध काही प्रमाणात सुधारले.

५. **भारत रशिया संबंध** : वर बघितल्याप्रमाणेच भारताने अलिप्तवादी धोरणाचा  पुरस्कार केला होता, तर रशिया साम्यवादी गटाचे नेतृत्व करून अमेरिका समर्थित भांडवलशाही गटाला शह देत होता. भारत रशियाच्या गटामध्ये सामील होत नव्हता म्हणून रशिया नाराज होता, परंतु भारताने अलिप्तवादी धोरण स्वीकारल्याने तो अमेरिकेच्याही गटात सामील झाला नाही. त्यामुळे सहाजिकच भारताप्रती रशियाला सहानुभूती वाटत होती.

१९४९ मध्ये भारतात अन्नधान्याची भीषण टंचाई निर्माण झाली होती. अन्नधान्याची टंचाई निवारण्यासाठी भारताने अमेरिकेकडे अन्नधान्याची मदत मागितली परंतु अमेरिकेने टाळाटाळ करून अन्नधान्य देण्यासाठी जाचक अटी लादल्या. त्यामुळे भारताला अन्नधान्य पुरवठा करण्याची तयारी रशियाने स्वतःहून दाखवली, त्यामुळे भारत रशिया

मित्रत्वाला सुरुवात झाली. १९५० मधील कोरियन युद्धामध्ये रशिया समर्थित उत्तर कोरियाला भारताने आक्रमक ठरवले असले तरी नंतरच्या अमेरिकेच्या दक्षिण कोरियाला लष्करी मदत करण्याच्या धोरणाला भारताने पाठिंबा दिला नाही म्हणून रशियाला भारताबद्दल सहानुभूती वाटू लागली. १९५२ नंतर अमेरिकेने साम्यवादाला काळा घालण्यासाठी दक्षिण व अग्नेय आशिया या क्षेत्रातील राष्ट्रांशी लष्करी करार करण्याचा सपाटा लावला या करारामुळे रशिया अमेरिकन लष्करी तळांनी वेढला जात होता. अशा परिस्थितीत अमेरिका रशिया विरुद्ध उभारत असलेल्या लष्करी करारात जी आशियाई राष्ट्रे गुंतली नाहीत, त्या राष्ट्रांशी मैत्री संबंध प्रस्थापित करून अमेरिका निर्मित लष्करी करार पद्धतीला खिंडार पाडावे असा प्रयत्न रशियाने चालवला होता. त्यासाठी नव्याने स्वतंत्र झालेल्या अफ्रो-आशियाई राष्ट्रांना अमेरिकन गोटात जाऊ द्यायचे नसेल तर त्यांच्या अलिप्तवादी नितीला मान्यता देऊन, त्यांच्या आर्थिक विकासाला मदत करून, सोवियत संघाशी सलोख्याच्या व हितसंबंधाच्या धाग्याने त्यांना बांधून ठेवावे अशी सोवियत संघाची नीती होती. त्यात प्राधान्याने भारताचा विचार रशिया करू लागला होता. काश्मीर प्रश्न व गोवा मुक्तीबाबत रशियाने संयुक्त राष्ट्रसंघामध्ये नेहमी भारताची बाजू घेऊन वेळोवेळी विटोचा नकाराधिकार वापरला. त्यामुळे सहाजिकच भारत हा रशियाचा समर्थक बनला. १९६२ च्या भारत-चीन युद्धामध्ये रशियाने आपला साम्यवादी मित्र चीनला मदत केली नाही आणि चीनला या युद्धासाठी जबाबदार ठरवले. तसेच भारताला लष्करी दृष्ट्या सुसज्ज करण्यासाठी सर्व प्रकारची सहाय्यता देण्याचे आश्वासन देऊन प्रत्यक्ष मदत केली. त्यामुळे साहजिकच भारत रशिया नेतृत्वाचे संबंध अधिकच दृढ झाले.

भारत रशियातील साम्यवादी क्रांतीपासूनच साम्यवादाकडे आकर्षित झालेला होता. रशियाने आर्थिक नियोजनातून केलेल्या विकासाचा भारताने स्वातंत्र्यानंतर स्वीकार करून पंचवार्षिक योजनांद्वारे भारताचा जलद विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. रशियाने या आर्थिक नियोजनासाठी वेळोवेळी आर्थिक आणि तांत्रिक मदत केली. त्यामुळे भारताला औद्योगिक क्षेत्रामध्ये विकास करता आला. एकूणच भारत रशिया परराष्ट्र संबंध काही अपवाद वगळता नेहमी सलोख्याचे राहिलेले दिसून येतात.

## ४.६ भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध

### ४.६.१ भारत चीन संबंध:

१९४७ मध्ये भारत तर १९४९ मध्ये चीन परकीय सत्तांच्या जोखड्यातून मुक्त झाले. नेहरूंचे मत असे होते की,दोन्ही देशांचे पाश्चिमात्यांनी शोषण केले असल्यामुळे त्यांना जगात महत्त्वाचे स्थान प्राप्त करायचे असेल तर अलिप्तता आणि अनाक्रमाचे धोरण स्वीकारून परस्पर सहकार्याने राहिले पाहिजे. यासाठी दोघांनीही १९५४ मध्ये पंचशील तत्त्वांचा स्वीकार केलेला होता. नेपाळचा अपवाद वगळता भारत व चीन दरम्यान काराकोरम पासून ब्रह्मदेशपर्यंत लांबलचक सीमा आहे. या सीमा सिकीयांग, सिक्कीम व नेफा येथे एकमेकांना स्पर्श करतात. त्या नेहमीच वादग्रस्त ठरलेल्या आहेत.

१. **चीनचा तिबेटवर अधिकार:** १९५० मध्येच चीनने भारताला जोरदार धक्का देऊन जबरदस्तीने तिबेटवर आधिकार प्रस्थापित केला. त्यावर भारताने आपला निषेध

नोंदवला. पण चीनने त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. तरीही १९५४ मध्ये जावातील बांडुंग येथे आफ्रो-आशिया परिषदेत नेहरूंनी चीनच्या चाऊ-एन-लाय समोर मैत्रीचा हात पुढे केला. १९५९ मध्ये चीनच्या गैरव्यवहारामुळे तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांनी तिबेट मधून पलयान केले आणि तिबेटची स्थिती अत्यंत वाईट बनली. आंतरराष्ट्रीय पंचमंडळाने दलाई लामा विरुद्ध कठोर आणि क्रूर व्यवहार केल्याबद्दल चीनवर ठपका ठेवला. भारत सरकारने दलाईलामाला आश्रय दिला. पण 'हद्दपार सरकार' बनवण्यास संमती दिली नाही. दलाईलामाला भारताने दिलेल्या आश्रयाला चीनी अधिकाऱ्यांनी आक्षेप घेऊन लडाखमधील कोंग्का खिंडीजवळ आपल्या फौज आणल्या. त्यावेळी काही भारतीय शिपाई मारले गेले. भारताने चीनला निषेधाचा खलिता पाठवला परंतु चीनने त्यावर समाधानकारक उत्तर दिले नाही. भारतातील बुद्धिवंतांनी त्यावर नेहरूंना ठोस कृती करण्याचा सल्ला दिला. परंतु याही वेळेस नेहरूंना संघर्षाची तीव्रता कमी करून चीनबरोबर पुन्हा मैत्रीसंबंध कायम राखण्याचा मार्ग प्रशस्त वाटला.

२. **भारत चीन युद्ध १९६२:** ऑक्टोंबर १९६२ मध्ये चीनने नेफामधील पूर्वेकडील प्रदेशांवर आक्रमण करून अनेक भारतीय ठाणे जिंकून घेतली. २० सप्टेंबरला चिनी लष्कराने पश्चिमेकडे आघाडी उघडून गलवान खोऱ्यातील १३ भारतीय ठाणी काबीज केली व चुशुल धावपट्टीला धोका निर्माण केला. यामुळे भारतातील सर्वसाधारण जनतेच्या असा समज झाला की, भारतीय लष्कराने माघार घेऊन चीनला आसाम बळकवण्याचा मार्ग मोकळा करून दिला. या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी ९ नोव्हेंबरला नेहरूंनी अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी यांना दोन पत्रे पाठवून भारत-चीन सीमेवरील तणावाची कल्पना दिली आणि लष्करी मदत पाठवण्याची विनंती केली. नेहरूंनी मदतीसाठी इंग्लंडलाही पत्र लिहिले. परीणामी पाश्चिमात्य गटाशी संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी चीनने एकतर्फी युद्धबंदी करून सीमेवरील सैन्य मागे घेण्याची घोषणा केली. *(बी एल ग्रोवर आणि एम के बेल्हकर; आधुनिक भारताचा इतिहास)* त्यानंतर अजूनही चीन व भारताच्या सीमेचे निर्धारण झालेले नाही. वेळोवेळी चीन त्यावरून कुरापती काढत असतो.

### ४.६.२ भारत पाकिस्तान संबंध:

१९४७ मध्ये भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे स्वतंत्र होऊन धर्माच्या आधारावर वेगळी झाली. तेव्हापासूनच भारत आणि पाकिस्तान संबंध अतिशय तणावाचे राहिलेले आहे, काश्मीर प्रश्न हा या तणावाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. पाकिस्तानशी असलेला तणाव कमी करण्याच्या दृष्टीने व परस्पर सामजस्याचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून नेहरूंनी उदार धोरणाचा अवलंब केला. अविभक्त भारताच्या मुलकी आणि लष्करी साधनांची विभागणी करण्याचा प्रश्न परस्पर चर्चेने सोडवण्यात आला. पाकिस्तानमधील पंजाबला कालव्याच्या पाण्याचा अमर्यादित पुरवठा करण्याला भारत सरकारने मान्यता दिली. मात्र दुर्दैवाने पाकिस्तानची प्रतिक्रिया उत्साहवर्धक नव्हती.

१. **पाकिस्तानचे भारतावर आक्रमण :** फाळणी नंतर लगेचच दोन महिन्यांनी २२ ऑक्टोंबर १९४७ रोजी वायव्य सरहद्दीवरील पठाण टोळ्यांनी पाकिस्तानच्या लष्करी

अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली श्रीनगरच्या दिशेने कूच केले. त्यामुळे काश्मीरचे महाराज हरीसिंह यांनी घाबरून २४ ऑक्टोबरला भारताकडे लष्करी मदत मागितली. पण व्हाईसरॉय माउंटबॅटनच्या सल्ल्यावरून नेहरूंनी हरीसिंहला असे कळवले की, आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाले तरच अशा प्रकारची लष्करी मदत देता येऊ शकेल. परिणामी २६ ऑक्टोबरला हरीसिंहने सामिलीकरणावर स्वाक्षरी केली, तसेच नेहरूंच्या सल्ल्यावरून राज्याचे प्रधानमंत्री म्हणून शेख अब्दुल्ला यांची नियुक्ती करण्याचे मान्य केले. भारत सरकारने लगेचच हल्लेखोरांना अडवण्यासाठी लष्कर व शस्त्रास्त्रे १०० भारतीय विमानांनी श्रीनगरच्या दिशेने पाठवले आणि काही दिवसातच पाकिस्तानच्या मदतीने आलेल्या आक्रमकांना काश्मीरखोऱ्यातून पिटाळून लावले. मात्र काश्मीरच्या पश्चिमेकडील प्रदेश अजूनही त्यांच्या नियंत्रणात होता.

२. **काश्मीर प्रश्न सुरक्षा परिषदेत:** भारत व पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरू होण्याच्या भीतीने लॉर्ड  माउंटबॅटन यांनी काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेकडे सोपवण्याचा सल्ला नेहरूंना दिला. त्याप्रमाणे नेहरूंनी ३० डिसेंबर १९४७ रोजी सुरक्षा परिषदेमध्ये हा प्रश्न ठेवला. परंतु सुरक्षा परिषदेत अमेरिका आणि इंग्लंडने पाकिस्तानची बाजू उचलून धरली. कारण रशियाच्या सीमेवर असल्याने पाकिस्तानचे लष्करी व भौगोलिक स्थान या राष्ट्रांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. भारताच्या तक्रारीकडे व काश्मीर प्रश्नातील पाकिस्तानच्या सरळ हस्तक्षेपाकडे दुर्लक्ष करून सुरक्षा परिषदेने अमेरिका व इंग्लंडच्या दबावाखाली या प्रश्नाला 'भारत पाकिस्तान विवाद' असे स्वरूप दिले आणि नियंत्रण रेषेवर जैसे थे स्थिती ठेवून युद्धबंदी करण्याचा ठराव पास केला. त्यानुसार भारत व पाकिस्तान दोघांनीही या सूचनेला  ३१ डिसेंबर १९४८ रोजी मान्यता दिली. युद्धबंदी अमलात आल्याबरोबर नियंत्रण रेषेपलीकडील प्रदेशावर पाकिस्तानने कब्जा केला, त्यात ८४,१६० चौरस किलोमीटर इतका काश्मीरचा उत्तर व पश्चिमेकडील प्रदेश होता.

३. **काश्मीर संबंधी सार्वमतचा निर्णय**: काश्मीरच्या सामालीकरणाच्या निर्णयावर तेथे सार्वमत घेण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघाने ऑगस्ट १९४८ मध्ये संमत केला. त्यामुळे पाकिस्तान सतत सार्वमत घेण्यासाठी आग्रही राहिले, परंतु हा आग्रह धरताना त्यांनी सार्वमतच्या ठरावातील जम्मू व काश्मीर राज्यातून पाकिस्तानने आपल्या फौजा काढून घ्याव्या व संपूर्ण राज्यात श्रीनगर प्रशासनाची सत्ता कायम राखावी, या दोन अटी सोयस्करपणे बाजूला ठेवल्या. या दोन पूर्व अटी पाकिस्तानने कधीच मान्य केल्या नाहीत. त्यामुळे काश्मीरमध्ये सार्वमत घेतले जाऊ शकले नाही. दरम्यानच्या काळात काश्मीरमध्ये घटना समिती निवडण्यात आली. जिने काश्मीरच्या भारतातील सामिलीकरणास पाठिंबा दर्शवला. त्यानंतर काश्मीरने स्वतःची विधानसभा निवडली आणि भारतीय संसदेसाठी होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये भाग घेतला.

४. **नेहरूंची भूमिका:** काश्मीरमध्ये सुव्यवस्था प्रस्थापित झाल्यावर काश्मीरच्या सामिलीकरणाच्या निर्णयावर तिथे सार्वमत घेण्याचे समर्थन नेहरूंनी केले होते. यावर टीकाकारांनी नेहरूंच्या आदर्श उदारतावादावर आणि माउंटबॅटनच्या सल्ल्यानुसार चालण्यावर टीका केली. मात्र सुरक्षा परिषदेवरच्या बड्या सत्तांच्या पक्षपातीपणामुळे

munotes.in

स्वतः नेहरूंचाच भ्रमनिरात झाला. फेब्रुवारी १९४८ मध्ये आपली भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांना नेहरू व्यथित अंतकरणाने लिहितात, "सुरक्षा परिषद इतक्या क्षुद्र आणि पक्षपाती भावनेने काम करीत असेल याची मी कल्पनाही करू शकत नाही. हे लोक संपूर्ण जगाला स्वतःच्या ताब्यात ठेवू इच्छितात. त्यामुळे जगाचे तुकडे झाले तर नवल वाटायला नको. अमेरिका व इंग्लंड घाणेरडे राजकारण खेळले आहेत. या सर्वामागील सूत्रधार इंग्लंड आहे". *(बी एल ग्रोवर आणि एम के बेल्हकर; आधुनिक भारताचा इतिहास)* हे असे असले तरी एक गोष्ट मात्र खरी की, नेहरूंच्या संयुक्त राष्ट्र संघाकडे धाव घेण्यामुळे व काश्मीर संबंधी सार्वमत घेण्याच्या निर्णयामुळे या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय गुंतागुंतीचे स्वरूप आलेले आहे आणि त्याचाच परिणाम म्हणून नेहरूंच्याच काळात १९६५ मध्ये, इंदिरा गांधीच्या काळात १९७१ मध्ये आणि १९९९मध्ये कारगिल संघर्ष झाला. या सर्व संघर्षांचा केंद्रबिंदू काश्मीर राहिलेला आहे. अशाप्रकारे नेहरूंच्या उदार धोरणामुळे भारत पाकिस्तान हा प्रश्न गुंतागुंतीचा आणि न सुटणारा बनून राहिलेला आहे, ज्याचे परिणाम आजही भारत भोगत आहे.

## ४.७ सारांश

ब्रिटिशांच्या दीडशे वर्षाच्या शोषणातून भारत स्वतंत्र झाला तेव्हा ढासळलेली अर्थव्यवस्था, अन्नधान्याचा प्रश्न, औद्योगिकरणात मागसलेपण, कमजोर लष्करी व्यवस्था, फाळणीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि स्वातंत्र्य चळवळीतून उभे केलेले मूल्य यांच्यातून स्वातंत्र्योत्तर भारताचे परराष्ट्र धोरण आकाराला येत गेले. हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी भारताने अलिप्तवादी परराष्ट्र धोरणाचा स्वीकार करून जागतिक शांतता, निशस्त्रीकरण, साम्राज्यवाद व वंशभेद यांना विरोध, आफ्रिका व आशिया खंडातील नव स्वतंत्र राष्ट्रांचे ऐक्य तसेच संयुक्त राष्ट्रसंघाविषयी आदर या तत्त्वांचा परराष्ट्र धोरणात भारताने अंतर्भाव केला. त्याचप्रमाणे पंचशील तत्त्वांचा स्वीकार करून शांततापूर्ण सहचार्यासाठी अनाक्रमण, प्रत्येक राष्ट्राच्या प्रादेशिक अखंडत्व व सार्वभौमत्वाचा आदर, दुसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबतीत हस्तक्षेप न करणे व सर्वांना समानतेने वागवणे इत्यादी तत्त्वांचा स्वीकार करून सन्मान केला. या अलिप्तवादी धोरणाचा प्रथम स्वीकार करणारे भारत सुरुवातीला एकमेव राष्ट्र होते. परंतु या धोरणाचे महत्त्व पटल्यामुळे त्यात कालांतराने अनेक देश सामील झाले. सुरुवातीला २५ असलेली ही संख्या आज घडीला १०० च्या वर गेलेली आहे. भारताच्या या अलिप्तवादी धोरणामुळे अमेरिका-रशिया या दोन गटांशिवाय तिसरा पर्याय जगाला खुला झाला आणि जागतिक सत्ता संतुलनात या गटाने महत्त्वाची भूमिका निभवली. या सर्व उद्दिष्टामधूनच भारताचे शेजारील व अन्य राष्ट्रांशी संबंध दृढ होत गेले.

## ४.८ प्रश्न

१. भारताच्या नेहरू काळातील परराष्ट्र धोरणातील प्रमुख तत्वांची चर्चा करा.

२. अलिप्तवादी धोरण म्हणजे काय हे सांगून अलिप्तवादी राष्ट्रगटाचे महत्त्व विशद करा.

३. भारताच्या नेहरू काळातील जागतिक घटनांच्या संबंधात अलिप्तवादी धोरणाची वाटचाल स्पष्ट करा.

४. भारताचे अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांशी असलेले संबंध स्पष्ट करा.

५. भारताचे शेजारील राष्ट्र चीन आणि पाकिस्तानशी नेहरू काळात असलेले संबंध यावर चर्चा करा.

## ४.९ संदर्भ


१) **आधुनिक भारताचा इतिहास :** बी. एल. ग्रोवर आणि एन. के. बेल्हेकर

२) **आधुनिक भारताचा इतिहास (१९४७-२०००) :** डॉ. शांता कोठेकर

३) **आजादी के बाद भारत :** बिपिन चंद्र

४) **भारतीय राष्ट्रीय चळवळ :** डॉ. साहेबराव गाठाळ


❖❖❖❖

munotes.in

# ५

# नेहरू युगानंतरच्या राजकीय घडामोडी: हरित क्रांती (इ.स १९६४ ते इ.स १९८४)

**घटक रचना :**

५.१ नेहरू युगानंतरच्या राजकीय घडामोडी

५.१.० उद्दिष्टे

५.१.१ प्रस्तावना

५.१.२ नेहरू नंतर भारतातील राजकीय विकास

५.१.३ भारतातील राजकीय विकासाचे टप्पे

५.२ हरित क्रांती

५.२.१ प्रस्तावना

५.२.२ हरित क्रांतीची गरज

५.२.३ हरित क्रांती म्हणजे काय?

५.२.४ हरित क्रांतीची कारणे

५.२.४.१ कृषी विषयक संशोधन

५.२.४.२ खतांचा अधिक वापर

५.२.४.३ नवीन बियाणांचा वापर

५.२.४.४ अंतर पिक पद्धती

५.२.४.५ आधुनिक अवजारांची उपलब्धता

५.२.४.६ जलसिंचन

५.२.४.७ कर्जाच्या सोयी

५.२.४.८ पिक संरक्षण

५.२.४.९ साठवणूक आणि प्रक्रिया

munotes.in

५.२.५ हरित क्रांतीचे परिणाम

५.२.५.१ देश स्वयंपूर्ण बनला

५.२.५.२ ग्रामीण भागातील मनुष्यबळाला न्याय

५.२.५.३ शेती व्यवसायभिमुख बनली

५.२.५.४ आर्थिक विकास

५.२.५.५ भारताचा आत्मविश्वास वाढला

५.२.५.६ ग्रामीण भागातील शिक्षण प्रसार

५.२.६ हरित क्रांतीचे दुष्परिणाम

५.२.६.१ मोठे शेतकरी आणि हरित क्रांती

५.२.६.२ भांडवलशाही क्रांतीचा उदय

५.२.६.३ जैवविविधतेचे प्रमाण घटले

५.२.६.४ जनुकीय विविधतेची हानी

५.२.६.५ संकरीत पिकांची एक पिक पद्धत धोकादायक

५.२.६.६ रासायनिक खतांचा वापर धोकादायक

५.२.६.७ सत्वहीन अन्नाची निर्मिती

५.३ सारांश

५.४ प्रश्न

५.५ संदर्भ

munotes.in

## ५.१ नेहरू युगानंतरच्या राजकीय घडामोडी

### ५.१.० उद्दिष्टे :-

या प्रकरणात आपणास लक्षात येईल की :-

**१**. काँग्रेस पक्षाची कार्यपद्धती, त्याचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य व महत्त्व लक्षात येईल.

**२**. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात काँग्रेस पक्षात झालेले बदल व नेहरूंचे देश उभारणीमधील योगदानाची माहिती समजेल.

**३**. नेहरूंनंतर भारताने उचललेली प्रगतीची पावले.

४. इंदिरा गांधी यांच्या काळातील काँग्रेसमधील संघर्ष व त्यांचे देश उभारणीमधील योगदानाची माहिती समजेल.

५. अर्थव्यवस्थेत भारतासमोरील आव्हाने आणि हरित क्रांतीचे महत्त्व.

६. राजकीय पक्षांचा उदय आणि त्यांच्या अस्तित्वाची कारणे.

## ५.१.१ प्रस्तावना :-

स्वातंत्र्यानंतर भारताने सर्वप्रथम राष्ट्राच्या पुनर्रचनेवर लक्ष केंद्रित केले. भारतीय समाजातील निवडक वर्गांना शासनाच्या व्यवसायात खेचण्यासाठी ब्रिटिश सरकारने मर्यादित लोकशाही अधिकारांसह घटनात्मक सुधारणांची मालिका सुरू केली होती. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात, समाजाच्या सर्व स्तरांनी देशव्यापी आंदोलनांमध्ये आणि स्वातंत्र्योत्तर काळात भाग घेतला, त्या सर्वांनी समाजात एक नवीन सांस्कृतिक, बौद्धिक आणि सौंदर्यात्मक चळवळ विकसित करण्याची आकांक्षा बाळगली. भारताला लोकशाही राष्ट्र असण्याची आणि सुशासनासाठी उदारमतवादी करण्याची इच्छा होती. भारताचे संविधान हे भारतीयांसाठी केवळ लिखित दस्तऐवज नव्हते तर ते न्याय्य आणि समान समाजाचे ते स्वप्न होते. भारताला आपल्या फाळणीची पार्श्वभूमी माहिती होती. 1950 मध्ये स्वीकारण्यात आलेली राज्यघटना विविधतेच्या बहुलतेचे प्रतिनिधित्व करते. एकता, धर्मनिरपेक्षता आणि प्रशासकीय कार्यक्षमतेचे संरक्षण करते. त्यामुळे धर्मनिरपेक्षता आणि संघराज्य या संकल्पना भारतीय राज्यघटनेत अगदी सुरुवातीच्या काळातच स्वीकारल्या गेल्या. भारताच्या राजकीय विकासाचे मूळ नेहमीच तिच्या भूतकाळात होते. त्यामुळे भारताची वसाहतोत्तर राजकीय अर्थव्यवस्था भांडवलशाही नव्हती, सरंजामशाही नव्हती तर त्या दोघांचे मिश्रण होते.

भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेमध्ये समाज आणि राज्याच्या समाजवादी पॅटर्नचा पाया स्थापित केला. समानता, न्याय, व्यक्तीचा सन्मान आणि राष्ट्राची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी कल्याणकारी राज्य बनणे हे भारतीय राजकारणाचे उद्दिष्ट राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनी प्रोत्साहित केले आहे. भारतीय राज्यघटनेत नमूद केलेले नागरिकांचे मूलभूत अधिकार हे वैयक्तिक हक्क आणि न्यायाचे सार आहे. हे सुनिश्चित करण्यासाठी, राष्ट्राची अर्थव्यवस्था देखील प्रगतीपथावर आहे. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार, बाजारावरील नियंत्रण, खाजगी आर्थिक क्रियाकलाप, परकीय चलन आणि आयात नियंत्रण यांचा समावेश असलेली नियामक व्यवस्था आवश्यक होती. राष्ट्राच्या राजकीय अर्थव्यवस्थेचे मूळ समाजवाद आणि राष्ट्रवादाच्या विचारसरणीत होते. जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण आणि नियोजनाच्या कल्पनेचे समर्थन केले. नवीन सरकारला भारतीय नागरी सेवा (ICS) चे महत्त्व चांगलेच ठाऊक होते. भारतीय प्रशासन नियम आणि नियमांनुसार चालवण्याच्या त्यांच्या कार्यक्षम भूमिकेमुळे IAS (भारतीय प्रशासकीय सेवा) द्वारे ICS नंतर यशस्वी झाले. नेहरूंनी भारताच्या सुरक्षिततेसाठी आणि स्थिरतेसाठी त्याचे महत्त्व मानले. पटेल यांनी देखील त्यांच्या अस्तित्वाचे जोरदार समर्थन केले आणि त्यांचे विचार भारतीय राज्यघटनेतील कलम 311 मधील कलम तयार करताना प्रतिबिंबित झाले. ज्यामध्ये नागरी सेवकाचे पद काढून टाकणे, बडतर्फ करणे किंवा कमी करणे संरक्षित आहे. संसदीय शासन प्रणाली

munotes.in

आणि भारतातील नागरिकांद्वारे कार्यकारिणीची निवडणूक त्यांना त्यांच्यासाठी जबाबदार बनवते. अशा प्रकारे. नेहरूंच्या काळात भारताचा राजकीय विकास स्थिर, प्रगतीशील आणि एकपक्षीय वर्चस्वाचा होता. तथापि, नेहरूंनंतर, व्यवस्था मोडकळीस येऊ लागली आणि १९६९ मध्ये श्रीमती इंदिरा गांधींना विरोधी शक्तीचा सामना करावा लागला. त्यांनी पक्षाकडे दुर्लक्ष केले. सत्ता आणि अधिकाराचे केंद्रीकरण केले. भारताला लोकशाहीच्या सर्वात काळ्या टप्प्याचा सामना करावा लागला. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेले सर्व अधिकार निलंबित केले.



## ५.१.२ नेहरू नंतर भारतातील राजकीय विकास :-

स्वातंत्र्यानंतरचा भारत लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीकोनातून प्रगल्भ होता. नेहरूंच्या दुःखद निधनानंतर स्थिर आणि मजबूत उत्तराधिकारी मिळण्याची गरज होती. १९६३ मध्ये सिंडिकेट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजकीय नेत्यांचा एक गट होता. ज्यामध्ये के. कामराज, काँग्रेस अध्यक्ष, बंगालचे अतुल्य घोष यांचा समावेश होता. एस.के. पाटील, बॉम्बेचे एन. संजीव रेड्डी, आंध्र प्रदेशचे आणि म्हैसूरचे एस. निजलिंगप्पा. श्री लाल बहादूर शास्त्री यांना त्यांच्या नम्र आणि सभ्य स्वभावामुळे त्यांनी निवडले होते. पक्षातही ते खूप लोकप्रिय होते. श्री. शास्त्री हे तत्त्वनिष्ठ होते आणि 'सदा जीवन, चांगला विचार' या तत्त्वज्ञानावर त्यांचा विश्वास होता. २ जून १९६४ रोजी त्यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यांचा कार्यकाळ अल्पकालीन होता. पक्षात सामील झाल्यापासून त्यांनी देशाची कृषी आणि अर्थव्यवस्था स्थिर करण्यासाठी विविध पैलूंवर लक्ष केंद्रित केले. परदेशात व्यवहार करतानाही त्यांनी अलिप्ततेचे धोरण पाळले. १९६५ मध्ये झालेले भारत-पाक युद्ध ही एक वेदनादायक घटना होती. श्री. शास्त्री याला सामोरे जाण्यासाठी अत्यंत सक्रिय होते. त्यांनी 'घुसखोरीच्या आक्रमणाचा' यशस्वीपणे सामना केला. युद्ध आणि मुत्सद्देगिरीच्या वेळी त्यांची भूमिका त्यांना राष्ट्रीय नायक आणि प्रबळ राजकीय व्यक्ती बनवते. युद्ध अनिर्णित होते. ४ जानेवारी १९६६ रोजी सोव्हिएत युनियनमध्ये ताश्कंद करार म्हणून एक करार झाला. श्री शास्त्री यांचे १९ जानेवारी १९६६ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी १९ महिने पंतप्रधान म्हणून काम केले.

श्री. शास्त्री यांच्या निधनानंतर, काँग्रेस नेत्यांचा पाठिंबा मिळाल्यानंतर श्रीमती इंदिरा गांधी पुढील पंतप्रधान बनल्या. श्रीमती गांधी आणि श्री. मोरारजी देसाई यांच्यात पंतप्रधान निवडण्यासाठी १९ जानेवारी १९६६ रोजी काँग्रेस संसदीय पक्षात गुप्त मतदान घेण्यात आले. तिने त्यांचा पराभव केला आणि १६९ च्या तुलनेत ३५५ मते मिळविली. श्रीमती गांधी सत्तेवर आल्या. राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक आव्हाने आणि विरोधकांना सामोरे गेले. राज्यांच्या भाषिक निर्मितीने आणि प्रादेशिक राजकारणाने शांततापूर्ण राज्य म्हणून राष्ट्राची प्रतिमा तपासली. दुष्काळ आणि मसुदा परिस्थितीने आर्थिक राज्य म्हणून राष्ट्राच्या वाढीस अडथळा आणला. भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्यातील युद्धाने देशाच्या लष्करी सामर्थ्याला आव्हान दिले. वाढती महागाई, प्रशासकीय खर्च आणि अंतर्गत व बाह्य आव्हाने वाढत होती. भारताने मुत्सद्देगिरीने प्रश्न हाताळला आणि शांतपणे देशाच्या विकासाचा प्रगतीचा मार्ग कोरला. राजकारणाने आपल्या दृष्टिकोनाच्या आणि पक्षांची व्याख्या करण्याच्या बाबतीतही प्रतिमान बदललेले पाहिले. अनेक राजकीय पक्ष उदयास आले. त्यांनी देशाच्या व्यापक असंतोषाचा आणि आंदोलनांचा

फायदा घेण्यासाठी लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली. सीपीएम, समाजवादी, जनसंघ हे विरोधी राजकीय पक्ष काँग्रेसचे प्रबळ प्रतिस्पर्धी म्हणून उदयास आले. १९६६ हे वर्ष गटबाजी आणि पक्षीय राजकारणाचे साक्षीदार होते. संसद हे गोंधळाचे, अनुशासनाचे आणि गोंधळाचे ठिकाण बनले. श्रीमती गांधींना श्री. राममनोहर लोहिया यांनी 'गुंगीगुडिया' असेही संबोधले, जे पंतप्रधानांसाठी आक्षेपार्ह टिप्पणी होती. राजकीय स्तरावर परिस्थिती गंभीर आणि अनादराची असली तरी, भारतातील नागरिक मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जागृत झाले. फेब्रुवारी १९६७ मध्ये झालेल्या लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी जास्त होती. ती सुमारे ६१.१ टक्के होती. पक्षीय राजकारण, गटबाजी आणि गटबाजी ही नवीन गतिमानता बनली. एक छत्री पक्ष म्हणून काँग्रेसने इतरांवरील नियंत्रण गमावण्यास सुरुवात केली. इतर पक्ष किंवा आघाडीचे पक्षही एकमेकांशी एकनिष्ठ नव्हते. १९६७ ते १९७० च्या दरम्यान, सुमारे ८०० विधानसभा सदस्यांनी मजला ओलांडला आणि त्यापैकी जवळपास १५५ जणांना मंत्रीपदे दिली गेली. काँग्रेस १९६९ मध्ये फुटली आणि काँग्रेस (आर-रिक्विजिशन्स) आणि काँग्रेस (ओ) असे दोन गट बनले. श्रीमती गांधी हळूहळू शक्तिशाली बनू लागल्या आणि जनतेचा विश्वास संपादन करू लागल्या. कोणत्याही राजकीय पक्षांनी विद्यमान समस्या आणि परिस्थिती व्यापक स्तरावर पाहिल्या नाहीत. तर ते यशस्वी होऊ शकत नाहीत. हे देखील या काळात साक्षीदार आहे. श्रीमती गांधींनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्तरावर उचललेली विविध पावले जसे की भारतीय बँकांचे राष्ट्रीयीकरण, खाजगी पर्स रद्द करणे, मक्तेदारी आणि प्रतिबंधात्मक व्यापार पद्धती (MRTP) आयोगाची नियुक्ती काही लोकांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण तपासण्यासाठी अग्रगण्य व्यावसायिक कुटुंबे, पंचवार्षिक आर्थिक योजना सुरू करणे आणि इतर अनेक गोष्टींनी भारतातील परिस्थिती स्थिर केली. विरोधी पक्षांनी वैयक्तिक पातळीवर तिच्यावर हल्ला करण्यावर लक्ष केंद्रित केले आणि राष्ट्रीय मुद्द्यांवर  सामाजिक बदल, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद यावर भर देणारी तिची मोहीम, विचारधारा यावर लक्ष केंद्रित करताना तिने पलटवार केला. तिने सार्वजनिक क्षेत्रातील वाढ, ग्रामीण जमीन धारणेवर कमाल मर्यादा लादणे, शहरी मालमत्ता आणि रियासतचे विशेषाधिकार रद्द करणे, यावरही लक्ष केंद्रित केले. श्रीमती गांधी यांनी बहुमताने निवडणूक जिंकली. पूर्व पाकिस्तान (बांगलादेश) मध्ये निर्माण झालेल्या आणखी एका मोठ्या राजकीय संकटाचा सामना भारताला झाला. भारताने आपल्या शौर्याने, दृढनिश्चयाने, धैर्याने आणि धाडसी लष्करी कारवाईने हे प्रकरण सोडवले. भारताने 20 वर्षांच्या शांतता, मैत्री आणि सहकार्याच्या भारत-सोव्हिएत करारावरही स्वाक्षरी केली. श्रीमती गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुन्हा एक व्यक्ती सत्तेत आली आणि त्यांनी मिश्र अर्थव्यवस्था, बँकांचे राष्ट्रीयीकरण, नियोजन आयोग आणि नियोजन यंत्रणा मजबूत करण्याशी संबंधित अनेक घडामोडी सुरू केल्या. २४व्या आणि २५व्या घटनादुरुस्तीद्वारे रियासतदारांचे खाजगी पर्स आणि पदव्या रद्द करण्याचा अधिकारही संसदेला मिळाला. सरकारने भारतीय अर्थव्यवस्था आणि भारतीय राजकारण हातात हात घालून चालावे यासाठी सर्व प्रभावी उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक आणि आर्थिक स्तरावरील सतत आव्हाने आणि बदलांचा भारतातील राजकीय विकासावर परिणाम झाला.

munotes.in

**तुमची प्रगती तपासा**

प्र.१. स्वातंत्र्यानंतरच्या राजकारणातील बदल थोडक्यात सांगा?

प्र.२. युती सरकार काय आहे आणि ते का स्थापन झाले? थोडक्यात स्पष्ट करा.

## ५.१.३ भारतातील राजकीय विकासाचे टप्पे :-

पार्थ चॅटर्जी यांच्या मते, भारतातील संपूर्ण राजकीय विकास १९४७ ते १९६०, १९६७ ते १९७७, १९७७-१९८४ आणि १९८४ मधील निवडणुकीनंतरच्या वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात चार विभागांमध्ये विभागलेला आहे.

### १९४७-१९६७ पासून :-

भारतीय राजकारणाची पहिली २० वर्षे कॉंग्रेस वर्चस्व असलेला पक्ष होता. हे सर्वत्र दिसून आले आहे आणि मान्य केले आहे. मॉरिस-जोन्स यांनी नमूद केले आहे की, कॉंग्रेसचे वर्चस्व स्पर्धेसह अस्तित्वात होते, परंतु बदलाचा मागमूसही नव्हता. पक्षात उपलब्ध एकमत असल्याने कॉंग्रेसची सत्ता होती. विरोधी पक्ष हे केवळ दबावाचे पक्ष होते. सर्व प्रमुख राजकीय नेते कुशल, दूरदृष्टी असलेले आणि देशाच्या विकासासाठी कटिबद्ध होते. ज्या अनुभवी नेत्यांनी स्वातंत्र्यापूर्वी देश पाहिला होता, त्यांना उपलब्ध आव्हाने आणि समस्यांची जाणीव होती. त्यांना जनसामान्यांचा पाठिंबा मिळत होता आणि ते कल्पना अंमलात आणण्याची आकांक्षा बाळगत होते. एकमेकांशी जवळीक जोडण्याच्या फॅब्रिकने राज्य आणि समाज यांना जोडले. भारताला एकात्मिक संस्था म्हणून विकसित केले. आपल्या वैविध्यपूर्ण स्वभावामुळे आणि पक्षाबाहेरील गटांना सामावून घेण्याची लवचिकता यामुळे कॉंग्रेस बहुसंख्य राखू शकली. त्यांना इतर पक्षांनाही रोखण्यात यश आले. इतर अनेक राजकीय पक्षांचा जन्म झाला असला तरी, नेहरूंच्या पंतप्रधानपदापर्यंत कॉंग्रेस नेहमीच आघाडीवर राहण्यास सक्षम होती.

### १९६७ ते १९७७ पर्यंत :-

१९६७-१९७७ या कालखंडात भारतात आणि तेथील राजकीय घडामोडींमध्ये अनेक उलथापालथ घडल्या. राजकारणाच्या सामाजिक-आर्थिक आणि लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे राजकीय प्रक्रियेत नवीन गटांची भरतीमुळे नवीन अधिक भिन्न ओळख राजकीय विघटनाच्या नमुन्यांचा विकास झाला आहे. यात सरकारच्या कामगिरीवर लक्ष १९६७ च्या निवडणुकीत कॉंग्रेसने सहा राज्यांतील सत्ता गमावली आणि विरोधी पक्षांचा बाजारात उदय झाला. १९६९ मध्ये कॉंग्रेसचे नाट्यमय विभाजनही झाले आणि श्रीमती गांधी यांच्या नेतृत्वाखाली १९७१ ची निवडणूक जिंकली.

### 1977 ते 1984 पर्यंत :-

तिसरा टप्पा हा भारताच्या राजकारणातील सर्वात कठीण आणि आव्हानात्मक काळ होता. श्रीमती गांधींचा पराभव आणि जनतेच्या पाठिंब्याने राजकारणात पुन्हा प्रवेश करणे आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय अंतर भरून काढण्याची गरज यामुळे राष्ट्राच्या राजकीय विकासात गतिमान बदल दिसून आले. १९७७ ते १९८४ हा काळ प्रबोधन आणि क्षयकाळ

म्हणून ओळखला जातो. राजकीय पक्षांमध्ये एक घणाघाती संघर्ष होता. नागरिकांनी मतदार म्हणून आपल्या हक्कांबद्दल जागरूक झाल्यामुळे निवडणुकीच्या राजकारणाचे तर्क समजून घेतल्याने हा काळ प्रबोधन कालावधी म्हणून नोंदविला गेला. मतदार अधिक ठाम आणि स्पर्धात्मक झाले. लोकशाहीने उत्पादनांनुसार पाच बदल घडले जे खालीलप्रमाणे आहेत: -

1. निवडणूक निकाल - आणीबाणीनंतर, नागरिकांनी लोकशाहीची ताकद दाखवली. श्रीमती गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची सत्ता गेली आणि आघाडी सरकार सत्तेवर आले. तथापि, जेव्हा असे दिसून आले की ते देखील कार्य करू शकत नाहीत, तेव्हा नागरिकांनी सामाजिक अपेक्षा आणि गरजांनुसार सामाजिक बदल आणि सुधारणांच्या कल्पनांवर काँग्रेसला पुन्हा मतदान केले. त्यामुळे नागरिकांनी एका व्यक्तीला महत्त्वाकांक्षी न ठेवता प्रगती आणि विकासाला मतदान केल्याचे स्पष्ट झाले. जनतेच्या ठामपणा आणि अपेक्षांना वाढत्या प्रतिसादाची मागणी होत आहे.

2. सरकार आणि राजकीय अजेंड्यात लोकशाही आणि लोकांच्या हक्कांसाठी झालेला बदल दिसत होता. जनसामान्यांचे उत्थान आणि सामाजिक कृती महत्त्वपूर्ण आहेत आणि सुव्यवस्था राखण्यासाठी इतर सर्व जबरदस्ती शक्तींना वेगळे ठेवण्यास सांगितले गेले.

3. जेव्हा जेव्हा, राजकीय पक्ष सर्वोच्च शक्ती म्हणून उदयास आला किंवा दर्शविला गेला, तेव्हा तो प्रतिसाद कडू आणि कठोर होता. समाज आणि राजकारण वेगळे करता येत नाही.

4. असे सांगूनही, राष्ट्रीय स्तरावर आणि अनेक भारतीय राज्यांमधील राजकीय पक्ष आणि त्यांचे तळ यांच्या सीमा पुसून टाकण्याची गरज आहे.

5. सरतेशेवटी, १९८० च्या दशकात अनेक राज्यांमध्ये विविध प्रादेशिक पक्षांचा उदय आणि केंद्र आणि राज्यांमध्ये एकसमान समन्वय नसल्यामुळे राजकीय पातळीवर इतर विविध समस्या आणि संघर्ष निर्माण झाले.

**तुमची प्रगती तपासा**

प्र.१. भारतातील राजकीय विकासाच्या विविध टप्प्यांचे थोडक्यात विश्लेषण करा.

## ५.२ हरित क्रांती

### ५.२.१ प्रस्तावना :-

हरित क्रांती ही भारतीय शेती व्यवस्थेतील एक महत्वाचा टप्पा आहे. क्रांती म्हणजे अमुलाग्र बदल होय. भारतीय शेती पद्धती आणि उत्पादन यामध्ये काही महत्वाचे बदल होऊन शेती उत्पन्न वाढले याला हरित क्रांती असे म्हंटले जाते. वास्तविक पाहता ब्रिटीश काळापासून शेती व्यवसायात काही प्रमाणात बदल घडत असले तरी ते काही सकारात्मक स्वरूपाचे नव्हते. भारतीय अर्थव्यवस्था ही सुरळीत करण्यासाठी मध्ये नियोजन मंडळाची स्थापना

झाली आणि त्या मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून पंतप्रधान असावेत असे ठरले त्याप्रमाणे या नियोजन मंडळाच्या मार्गदर्शनाने पंचवार्षिक योजनेचा आराखडा मांडला गेला. त्यामुळे शेती घटकात काही बदल घडले. भारतात भारतात च्या दशकाच्या मध्यावधीनंतर हरित क्रांतीची सुरुवात झाली. या टप्प्याला तांत्रिक सुधारणांचा टप्पा असे म्हटले जाते. नेहरूंपासून ते मृत्यूपर्यंत भारताने संस्थात्मक सुधारणांवर लक्ष केंद्रित केले होते, शेतीच्या तांत्रिक आधारावर नाही. अर्थव्यवस्थेच्या पहिल्या योजनेत एकूण ३१ टक्के कृषी आणि सिंचनाला महत्त्व देण्यात आले. भारताने भाक्रा-नांगल सारखे मोठे सिंचन ,ऊर्जा प्रकल्प आणि असंख्य कृषी विद्यापीठे आणि संशोधन प्रयोगशाळा खत संयंत्रे इ. आणली. हरित क्रांतीच्या प्रमुख अभ्यासकांपैकी एक जी.एस. भल्ला यांनी नमूद केले की, भारतातील गुणात्मक तांत्रिक परिवर्तनाला हरित क्रांती असे नाव देण्यात आले. तथापि, नेहरूंच्या काळात तांत्रिक विकासाचा पाया पडला. हरित क्रांती हा नवीन कृषी धोरणाचा काळ मानला गेला. भारताच्या लोकसंख्येच्या प्रचंड वाढीमुळे, ५० आणि ६० च्या दशकाच्या मध्यात अन्नाची कमतरता होती. भारत खाद्यपदार्थांची आयात करत होता आणि अमेरिकेशी झालेल्या करारानुसार, १९५६ मध्ये भारत PL-४८० योजने अंतर्गत अमेरिकेतून अन्न आयात करत होता. ते सुमारे तीन दशलक्ष टन होते आणि ते वर्षानुवर्षे वाढत होते. १९६५-६६ मधील सलग दोन मसुद्यांसह चिनी आक्रमण आणि पाकिस्तान युद्धामुळे कृषी उत्पादनात १७ टक्के आणि अन्न उत्पादनात २० टक्के घट झाली. भारत परदेशी खाद्यपदार्थांवर अवलंबून होता आणि त्यानंतरच्या वर्षी टन आयातीची संख्या वाढत होती. अशा प्रकारे, ६० च्या दशकाच्या मध्यातील वर्तमान परिस्थिती लक्षात घेता, भारताचे लक्ष अन्न स्वावलंबी होण्यावर होते.



## ५.२.२ हरित क्रांतीची गरज :-

नवीन कृषी धोरणाची अंमलबजावणी तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री, अन्नमंत्री सी. सुब्रमण्यम आणि इंदिरा गांधी यांनी सुरू केली होती. जागतिक बँकेने नियुक्त केलेल्या बेल मिशनने संक्रमणाची शिफारस केली आणि अमेरिकेने त्यास अनुकूलता दर्शविली. उच्च-उत्पादक जातीचे बियाणे (HYV) मेक्सिकन बौना गहू वैज्ञानिक असल्याचे सिद्ध झाले, रासायनिक खते, कीटकनाशके, ट्रॅक्टर, पंप संच इत्यादींसह कृषी यंत्रे, माती परीक्षण सुविधा, कृषी शिक्षण कार्यक्रम आणि संस्थात्मक कर्ज ओळखले गेले. अशा प्रकारे सुमारे ३२ दशलक्ष एकर जमीन सर्वोच्च प्राधान्याने लागवडीसाठी निवडण्यात आली.

## ५.२.३ हरित क्रांती म्हणजे काय ?

हरित क्रांती म्हणजे १९४० ते १९६० या काळातील शेतीमध्ये संशोधन आणि साधनसामुग्री यामध्ये जी प्रगती घडली त्याचा अंतर्भाव होतो. यामध्ये विशेष म्हणजे १९२० ते १९३० या काळात कृषी जैवतंत्रज्ञान शास्त्रज्ञ नाझारीनो स्ट्रापिली यांच्या कामचाही अंतर्भाव होतो. हरित क्रांती हि संज्ञा प्रथम युनायटेड स्टेटस एजन्सीज फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (USAID) यांनी प्रथम मांडली. हरित क्रांती या कामात महत्वाची भूमिका अमेरिकन शास्त्रज्ञ नॉर्मन बोर्लोग यांनी बजावली होती. त्यांना फादर ऑफ ग्रीन रिव्होल्युशन असे म्हंटले जाते. त्यांच्या महत्वाच्या संशोधनामुळे लाखो लोक उपासमारीतून वाचले.या कामासाठी त्यांना १९७० मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले होते. १९६१ मध्ये



munotes.in

भारतात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी भारतीय शेती तज्ञ डॉ. सी. सुब्रह्मण्यम यांनी नॉर्मन बोर्लोग यांना भारतात आमंत्रित केले होते. कोणत्याही विरोधाला न जुमानता भारत सरकारने गव्हाचे बीज आयात केले. आणि शेतीच्या प्रयोगासाठी पंजाब हा जलसिंचन सोयीनी युक्त असलेला प्रदेश निवडला. त्यातून भारताने स्वतःची हरित क्रांती निर्माण केली. थोड्याच अवधीत आय आर ८ हि भाताचे एक नवीन वाण शोधून काढले. १९६८ मध्ये भारतीय शास्त्रज्ञ एस. के. डी. दत्ता यांचे संशोधन प्रकाशित झाली आणि सुधारित आय आर ८ हे भाताचे वाण यापासून अधिक उत्पादन होऊ लागले. त्यामुळे हा प्रयोग सर्व आशिया खंडात लोकप्रिय झाला.

हरित क्रांतीची संकल्पना अमेरिका या राष्ट्रातून आली असली तर भारतात मात्र ती व्यापक करण्याचे काम डॉ. एन.एस स्वामीनाथन यांनी केले. नॉर्मन बोर्लोग यांनी मेक्सिको मध्ये जी सुधारित गव्हाची जात शोधली होती ते बियाणे भारतात आणले. भारतीय हवामान आणि जमीन याचे संशोधन करून आपल्या देशासाठी नवीन वाण तयार केला. भारतीय त्यामुळे त्यांना भारतीय हरित क्रांतीचे जनक असे म्हणतात. १९६७-६८ च्या काळात शेती क्षेत्रात काही अमुलाग्र बदल घडले. त्यामुळे भारतात हरित क्रांती आली किंवा सुरुवात झाली असे मानले जाते. हे शेतीमधील बदल अचानक घडले नाहीत तर त्याला अनेक गोष्टी सहाय्यक ठरल्या त्या सहाय्यक ठरलेल्या काही कारणांचा आपण आढावा घेवू.

## ५.२.४ हरित क्रांतीची कारणे :-

### ५.२.४.१ कृषी विषयक संशोधन :-

शेतीविषयक संशोधन हे एक महत्वाचे कारण हरित क्रांती घडण्यास कारणीभूत ठरेल आहे. भारतीय शेती संशोधन मंडळ व भारतातील विविध कृषी विद्यापीठातून झालेले संशोधन महत्वाचे ठरेल. पिकांचे प्रकार महत्वाची खते व शेती करण्याच्या विविध पद्धती या संदर्भात अचूक मार्गदर्शन शेतकऱ्यांना झाले.

### ५.२.४.२ खतांचा अधिक वापर :-

शेतीचे उत्पादन अधिक निघावे या उद्देशाने खतांचा वापर अधिक होऊ लागला. हा वापर १९६० सालापासून कसा वाढला याचे विवरण पाहणे आवश्यक आहे. १९६०-१९६१ ते १९५४-६६ या काळात दरवर्षी ९० हजार टन वापर केला गेला. हेच प्रमाण पुढे वाढत गेल्याचे दिसते. १९७७-७८ या वर्षात ४.२९ दशलक्ष टनावर पोहोचला. सन २००३-२००४ या वर्षात १ कोटी टनावर वापर झाल्याचे दिसून येते. अर्थात याचे दुष्परिणामही नंतरच्या काळात दिसून आले.

### ५.२.४.३ नवीन बियाणांचा वापर :-

कृषी क्षेत्रात नवीन बियाणे उपलब्ध झाल्याने अधिक उत्पादन होऊ लागले. तायचुंग, तैना, सोना, सोनालिका, साबरमती, जमुना, बाला, रत्ना, कृष्ण, विजया, कावेरी या सारखे बियाणे दर एकरी अधिक उत्पादन देणारे होते. त्याचा वापर मोठं प्रमाणत शेतकऱ्यांनी केल्याने उत्पादनात वाढ झाली.

### ५.२.४.४ अंतर पिक पद्धती :-

अधिक उत्पन्न देणारी नवीन बीजे उपलब्ध झाल्याने अंतर पिकाची पद्धत सुरु झाली. जमिनीच्या एकाच तुकड्यातून वर्षातून ३ ते ४ पिके निघू लागली. या नवीन बियाणांचे वैशिष्ट्य म्हणजे हे पिक ६० ते ७० दिवसातच निघत होते. त्यामुळे उत्पन्न वाढले

### ५.२.४.५ आधुनिक अवजारांची उपलब्धता :-

कृषी संशोधन केंद्रातून केवळ नवीन बियाणे यावर संशोधन केले जात नव्हते. तर शेतीला पूरक असे नवीन अवजारे यावरही संशोधन केले जात होते. त्यामध्ये मळणी यंत्र, कापणी यंत्र, भरणी यंत्र, टॅक्टर, पाणी पुरवठा यासाठी लागणारी यंत्र निर्माण केली गेली त्यामुळे वाहतूक सुलभ झाली वेळ आणि श्रम याची बचत होऊन मानवी जीवन सुलभ झाले. याचा परिणाम सकारात्मक उत्पादन क्षमतेवर झाला.

### ५.२.४.६ जलसिंचन :-

पारंपारिक शेती ही पावसावर अवलंबून असल्याने शेती होतीही मागास स्वरूपात होती. सरकारने मध्यम व लहान पाणी पुरवठा सोई निर्माण केल्या. १९६६ मध्ये भारतात ८०००० ट्युबवेल्स उपलब्ध होत्या. त्याची संख्या वाढली आणि १९७७-१०७८ या काळात दीड लाख ट्युबवेल्स काढल्या गेल्या. १९९८-९९ या काळात विहिरी व ट्युबवेल्स मार्फत मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा झाल्याने ३ कोटी ३१ लक्ष जमिनीला पाणी मिळाले. तसेच पाणीपुरवठा करण्यासाठी १९८४-८५ पर्यंत ३५ लाख ५३ हजार पंप बसविण्यात आले. य विविध योजनामुळे आज ८ कोटी हेक्टर जमीन बारमाही ओलिताखाली आली आहे.

### ५.२.४.७ कर्जाच्या सोयी :-

अधिक उत्पादन निर्माण करण्यासाठी शेतकऱ्याला आधुनिक बीजे आणि साहित्य याच्या वापर करावा लागतो. यासाठी लागणारा पैसा सहजपणे उपलब्ध झाला. १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयकरण झाल्याने शेतीला मोठ्या प्रमाणावर पैसा उपलब्ध झाला. व्यापारी बँका, सहकारी बँका तसेच ग्रामीण बँका यांचे योगदान मोठे आहे. यांनी १९९४-९५ या काळात २१,११३ कोटी रुपयांचा कर्जपुरवठा केला आहे. १९९७-९८ या काळात ८० हजार कोटीचा कर्जपुरवठा केल्याचे अंदाजित आहे.

### ५.२.४.८ पिक संरक्षण :-

भारतात पिकांच्या संरक्षणाची हमी हेण्यासाठी काही योजना निर्माण करण्यात आल्या. शेतातील उभ्या पिकावर रोग पडणे किंवा कीड लागणे यावर अनेक प्रतिकारक औषधे निर्माण झाली. त्यामुळे पिकाची नासाडी थाबली आणि उत्पादन वाढले.

### ५.२.४.९ साठवणूक आणि प्रक्रिया :-

शेतीमालाच्या उत्पादनाचा प्रश्न जरी सुटला तरी ते योग्य रीतीने साठवणे ही एक मोठी जबाबदार होती. यासाठी सहकारी संस्थाच्या मार्फत काही गोदामे बांधली गेली. त्याज

munotes.in

प्रमाणे नाशवंत मालाच्या साठवणुकीसाठी शीतगृहे सुद्धा बांधली गेली. शेती मालावर प्रक्रिया करणारी व्यवस्था निर्माण करण्यात आली. या सर्वांमुळे शेतीमालाचे नुकसान टाळले.

## ५.२.५ हरित क्रांतीचे परिणाम :-

### ५.२.५.१ देश स्वयंपूर्ण बनला :-

हरित क्रांतीचा एक महत्वाचा परिणाम म्हणजे अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण बनला. भारत देशाची वाढती लोकसंख्या लक्ष्यात घेता बाह्य जगावर भारताला अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे त्यांच्या जाचक अटी स्वीकाराव्या लागत असत. तसेच आपले परकीय चलन मोठं प्रमाणावर खर्च करावे लागत होते. याचा परिणाम भारताच्या विकास कार्यक्रमावर होत असल्याचे दिसते. आजमितीला भारत देश जगातील २० ते २५ देशांना अन्नधान्याचा पुरवठा करत असल्याचे दिसते. हा हरित क्रांतीचा परिणाम म्हणावे लागेल.

### ५.२.५.२ ग्रामीण भागातील मनुष्यबळाला न्याय :-

पारंपारिक शेतीमध्ये काही उणीव असल्याने ग्रामीण भागातील मनुष्यबळ याला रोजगाराची संधी प्राप्त होत नव्हती. हरित क्रांतीने वर्षातून ३ ते ४ पिके घेण्याच्या पद्धतीत अधिक मनुष्यबळाची आवश्यकत निर्माण झाली. त्यामुळे रोजगार वाढला. अल्पभूधारक शेतकरी किंवा भूमिहीन लोक यामध्ये समविष्ट झाली. त्यामुळे जे मनुष्यबळ आपल्याकडे उपलब्ध होते त्याला एकप्रकारे न्याय मिळून ग्रामीण भागातील गरिबी काही प्रमाणात हटविण्यास ही क्रांती कारणीभूत ठरली.

### ५.२.५.३ शेती व्यवसायभिमुख बनली :-

भारतीय शेतकऱ्यांचा दृष्टीकोन या क्रांतीने बदलला. शेती ही वर्षभर कुटुंबाला लागणारे अन्नधान्य मिळवून देणारे केवळ एक साधन आहे. अशी जी परंपरावादी दृष्टी होती त्यामध्ये बदल घडला. शेती हा एक व्यवसाय असून तो किफायतशीर आहे त्यातून कुटुंबाच्या गरजा पूर्ण होऊन पैसा मिळू शकतो ही दृष्टी निर्माण झाली. त्यामुळे भारतीय शेतकरी याबाबत सतर्क झाल्याचे दिसून येते.

### ५.२.५.४ आर्थिक विकास :-

देशाची प्रगती केवळ एकच मार्गाने होत नाही तर कृषी आणि औद्योगिक ह्या दोन्ही क्षेत्राने होणार आहे हे सत्य असले तरी औद्योगिक क्षेत्र हे हरित क्रांतीने पुढे आल्याचे दिसते. विविध कारखान्यांना लागणारा कच्चा माल हा शेतीमधून पुरवला जातो. त्यामुळे उद्योग वाढीस शेतीचे योगदान मोठे आहे परिणामी देशाचा आर्थिक मोठ्या प्रमाणावर झाला.

### ५.२.५.५ भारताचा आत्मविश्वास वाढला :-

हरित क्रांतीने जे अमुलाग्र बदल घडले त्याचा परिणाम आत्मविश्वास वाढण्यात झाला. १९७१ सालचे पाकिस्तान बरोबरीचे युद्धप्रसंगी आपल्याला अमेरिका या देशावर अन्नधान्यासाठी अवलंबून राहावे लागत होते. यावेळी हा पुरवठा बंद करण्याची भाषा अमेरिका करत होती. पण याचवेळी भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याने

भारताने त्या धमकीची दाखल घेतली नाही. उलट एक कोटी बांगलादेशी निवसितांच्या अन्नाच्या गरजा भारताने पूर्ण केल्या. हा परिणाम हरित क्रांतीचा होता.

### ५.२.५.६ ग्रामीण भागातील शिक्षण प्रसार :-

ग्रामीण भागात फक्त शेती व्यवसाय असल्याने शिक्षणासाठी शहरी भागावर अवलंबून राहावे लागत होते. शेतीच्या प्रगतीने ग्रामीण भागात व विविध व्यवसाय सुरु झाले, कारखाने निघाले आणि त्यामार्फत शाळा आणि महाविद्यालये निघाली. त्यामध्ये इतर शिक्षणाबरोबर व्यवसायिक शिक्षण, शेती शाळा निघाल्या. त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील जीवनमान व राहणीमान उंचावले.

## ५.२.६ हरित क्रांतीचे दुष्परिणाम :-

हरित क्रांतीने जरी मानवी जीवनात बरेच सकारात्मक परिणाम घडविले असले तरी काही बाबी मात्र नकारात्मक घडल्या ही वस्तुस्थिती आहे.

### ५.२.६.१ मोठे शेतकरी आणि हरित क्रांती :-

कोणत्याही क्रांतीच्या विकासाची पहिली फळे ही समाजातील उच्च वर्गाला मिळतात. हा विकास घडला खरा पण ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिक होत्या त्यांना याचा फायदा अधिक झाला. आधुनिक बियाणे, आधुनिक अवजारे खरेदी करण्याची कुवत ही बड्या जमीनदारांची होती. शिवाय त्याचे जमीन क्षेत्र हे अधिक असल्याने त्याची पतपुरवठा करणाऱ्या संस्थाकडे मोठी पत होती. याचा परिणाम म्हणून त्यांना मोठा प्रमाणावर कर्ज पुरवठा झाला. त्यातून या बड्या शेतकऱ्यांचे अधिक उत्पन्न निघाले. शेतकरी अल्पभूधारक होते ते मात्र गतिहीन बनले.

### ५.२.६.२ भांडवलशाही क्रांतीचा उदय :-

त्याउलट जे वर चर्चा केल्याप्रमाणे जे बड़े शेतकरी होते ते ग्रामीण भागातील शेती व्यवसायातील भांडवलदार बनले. या क्रांतीचा फायदा अधिक प्रमाणत मोठ्या शेतकऱ्यांना मिळाला. आणि इतर मात्र गरीब राहिले याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील आर्थिक विषमता वाढीस लागली आणि समाजवादी भारतातील भांडवलशाहीचा उदय झाला.

### ५.२.६.३ जैवविविधतेचे प्रमाण घटले :-

पिके आणि प्राणी याबाबत हे प्रकर्षाने जाणवत आहे. उच्च दर्जाची पिकांच्या पैदासाची संख्या अत्यंत कमी आहे. परंतु याच्या वापराने स्थानिक जातीवर प्रभुत्व गाजविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे जैवविविधतेचे प्रमाण घटत चालले आहे.

### ५.२.६.४ जनुकीय विविधतेची हानी :-

पिकांच्या सुधारित जातीसाठी विविधतेचा स्त्रोत आवश्यक असतो. शेतकरी पिकांची विविधत सोडून देतो आणि स्थानिक प्रदेशातील समायोजित पिकाची निवड करतो. म्हणजे जनुकीय विविधत कमी होते. पिकांच्या निर्मितीमध्ये मुल जातींची संख्या कमी होते. हे हरित क्रांतीने केलेले आक्रमण होय.

### ५.२.६.५ संकरीत पिकांची एक पिक पद्धत धोकादायक :-

उच्च संकरीत बियाणे एक पिक पद्धतीला शेत्करीत प्रोसाहित होतो. जनुकीय साधर्म्य असलेल्या पिकावर रोगराई आली तर संपूर्ण पिक नष्ट होण्याची भीती मोठ्या प्रमाणावर असते.

### ५.२.६.६ रासायनिक खतांचा वापर धोकादायक :-

शेतकरी रासायनिक कटाचा वापर मोठ्या प्रमाणात करू लागल्याने जमिनीचा कस कमी होऊ लागला आणि त्याचा परिणाम पिक उत्पादनावर होऊ लागला आहे.

### ५.२.६.७ सत्वहीन अन्नाची निर्मिती :-

संकरीत बियाणे हे उत्पादनाच्या दृष्टीने महत्वाचे अथवा अधिक येणारे असले तरी त्याची गुणवत्ता व सत्व हे कमी असल्याचे मानले जाते. त्याचा परिणाम मानवी जीवनावर झालेला दिसून येतो. एकूणच सत्वहीन धान्याच्या उत्पादनाने रोगाचे प्रमाण वाढल्याचे दिसते.

## ५.३ सारांश

नेहरुंनी स्वतंत्र भारतात लोकशाही व संसदीय प्रशासन यांची काळजीपूर्वक जोपासना केल व त्यांची भक्कम पायाभरणी केली. स्वातंत्र्यानंतर देशात जातीयता, प्रादेशिक भिन्नता, जमातवाद आणि संकुचित भाषावाद यांनी डोके वर काढले होते. संस्थानिकांचा प्रश्न होताच या सर्व प्रश्नांशी त्यांनी यशस्वीरित्या तोंड दिले. त्यांनी भारताची राष्ट्र म्हणून जडणघडण करताना समाजवादी समाजरचना कायम करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी नियोजनबद्ध विकास करण्यावर भर देऊन संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. परराष्ट्र धोरणाबाबत अलिप्ततावादाचा स्वीकार करनू देशाच्या विकासावर लक्ष केंदित केले. विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञानांवर भर दिला. चीनशी झालेल्या युद्धाबाबत त्यांच्यावर टिका केली जाते. भारताने संसदीय लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला आहे. या शासन व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे राजकीय पक्ष राष्ट्रापुढील अंतर्गत व बाह्यप्रश्नांचे निराकरण करण्याचे विविध पर्याय सुचवित असतात. तसेच ते राष्ट्रीय व परराष्ट्रविषयक ध्येय धोरणे ठरविण्यासंबंधी देखील मोलाची कामगिरी बजावू शकतात.

डिसेंबर १९८५ मध्ये ७२ राजकीय कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. काँग्रेसच्या स्थापनेच्या कामी सर ए. ओ. ह्युम यांनी महत्त्वाची भुमिका बजावली. या राष्ट्रीय कांग्रेसने एक राष्ट्रीय संघटना या नात्याने भारत स्वतंत्र होईपर्यंत राष्ट्रीय चळवळींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. या पक्षाने जनमत जागृत करून स्वातंत्र्याचा लढा दिला. सन १८८५ ते १९४७ हा काँग्रेस पक्षाच्या स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय प्रजासत्ताक अस्तित्वात आले. त्यानंतर स्वतंत्र भारतात काँग्रेस पक्ष हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पु आला. या पक्षातील नेत्यांनी राष्ट्र उभारणीत महत्त्वाचे कार्य केले. देशाच्या स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या ४० वर्षांच्या काळात बहुपक्षीय पद्धती असली तरी काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व होते. आजही हा पक्ष एकमेव प्रभावी पक्ष म्हणून कार्यरत आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे कामकाज लोकशाही मार्गाने म्हणजेच

वादविवाद, चर्चा, प्रसंगी मतदान अशा पद्धतीने चालत असे. एका अर्थाने राष्ट्रीय काँग्रेसने भारतीय लोकशाहीला संसदीय लोकशाहीचे रूप दिले. अशा तऱ्हेने देशात सांसदीय लोकशाहीची बिजे घट्ट रुजवली व ती लोकप्रिय केली.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश साम्राज्यसवेला विरोध करण्याच्या समान भुमिकेमुळे भिन्न वैचारिक दृष्टीकोन असणारे कार्यकर्त्यांचे गट काँग्रेसच्या नावाखाली काम करत होते. काँग्रेस अंतर्गत साम्यवादी पक्ष, समाजवादी पक्ष, शेतकरी संघटना कार्यरत होती. मात्र स्वातंत्र्यानंतर ही परिस्थिती बदलली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकाराने सन १९४८ साली काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनामध्ये काँग्रेसची नवीन घटना मंजूर करण्यात आली. अशा रितीने कॉंग्रेस या राष्ट्रीय संघटनेचे काँग्रेस पक्षामध्ये रुपांतर झाले. काँग्रेसने नेहरूंच्या कालखंडात लोकशाही समाजवादाचे धोरण स्वीकारले होते. हेच धोरण इंदिरा गांधीने पुढे नेले. राजीव गांधीच्या काळात संगणीकरणावर भर देण्यात आला. तर नरसिंह राव यांच्या कालखंडात नदवीन आर्थिक धोरणांचा स्वीकार करण्यात आला. परराष्ट्रीय धोरणामध्ये मात्र काँग्रेसच्या सर्व प्रधानमंत्र्यांनी नेहरूंच्या अलिप्ततावादाचा पुरस्कार केला असला तरी देशाची संरक्षण व्यवस्था सुसज्ज ठेवण्याचा प्रयत्न मात्र राजीव गांधीच्या काळात केला गेला. त्यांच्या काळात संरक्षणावरचा खर्च दुप्पट झाला होता. अणुऊर्जेच्या संबंधात सर्व कॉंग्रेस प्रधानमंत्र्यांनी देश अणुउर्जा संपन्न बनवण्याकडे लक्ष दिले. अणुउर्जेचा उपयोग शांततेसाठी करण्यावर भारताने भर दिला. त्यांनी अलिप्ततावादाचा पुरस्कार करून सत्तासंतुलन राखण्याच्या प्रयत्नाबरोबरच देशाचा विकासही साधला. भारताने आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये आपला शांततेचा दूत म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

काँग्रेसच्या सर्व प्रधानमंत्र्यांच्या काळात त्यांना मुलतत्त्ववादाच्या समस्येशी झगडावे लागले.. फुटीरवादी वृत्तीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. असे असले तरी प्रादेशिक स्तरावर व राष्ट्रीय स्तरावर मुलतत्ववादी पक्षांचा उदय व विकास झाला. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काँग्रेसच्या सर्व प्रधानमंत्र्यांनी प्रयत्न केले. त्यासां नेहरूंनी मिश्र अर्थव्यवस्तेचा पुरस्कार केला. इंदिरा गांधी यांनी गरीबी हटावचा नारा दिला. राजीव गांधी यांनी देशाच्या विकासासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली. तर नरसिंह राव यांनी नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला. अशा तऱ्हेने काँग्रेसच्या काखंडात देशाचा विकास घडून आला.

## ५.४ प्रश्न

१. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घ्या.

२. इंदिरा गांधी यांचे परराष्ट्र धोरण स्पष्ट करा.

३. इंदिरा गांधी यांच्या कार्यकर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घ्या

४. पी. व्ही. नरसिंह राव यांचे नवीन आर्थिक धोरण.

५. हरित क्रांतीबद्दल सविस्तर माहीती लिहा.

## ५.५ संदर्भ


१. इंडिया सिन्स इंडिपेंडन्स - बिपीन चंद्र

२. भारत के प्रधानमंत्री - भगवतीशरण मिश्रा.

३. स्वातंत्र्योत्तर भारत - प्रचार्य य. ना. कदम, प्रा. डॉ. रुण भोसले

४. भारतीय शासन आणि राजकारण बी. बी. पाटील.

5. Partha Chatterjee (ed.), State and Politics in India - Parties and the Party System. Delhi; New York : Oxford University Press, 1997 x, 576

6. Chandra Bipanel al. (2002). India after Independence (1947-2002)

7. Hiranmay Karlekar Module 1 Polity (p.g 3 to 55)

8. The Green Revolution in India retrieved on 30.12.2022 https://www.afsahighschool.com/cms/lib/MN50000145/Centricity/Domain/1165/The%20Green%20Revolution%20in%20India.pdf

9. AntonyUsha el.al. The impact of the Green Revolution on indigenous crops of India. Journal of Ethnic Foods(2019).

10. Karlekar Hiranmay (ed), Independent India: The First Fifty Years. Indian Council of Cultural Relations (1998).


❖❖❖❖

munotes.in

# ६

# बँकांचे राष्ट्रीयीकरण : आणीबाणी

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

६.३ राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता

६.४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे

६.४.१ आर्थिक विकास घडवून आणणे

६.४.२ बँकेतून श्रीमंत लोकांचा प्रभाव नष्ट करणे

६.४.३ शेती, लघु - मध्यम उद्योग व व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्यता

६.४.४ बँकिंग व्यवस्थेमध्ये प्रोफेशनलिझम आणणे

६.४.५ ग्रामीण भारतात बँकेचा विस्तार घडवून आणणे

६.४.६ सरकारी धोरणांचे पालन

६.५ इंदिरा गांधींची भूमिका

६.६ चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण (पहिला टप्पा)

६.७ बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा (दुसरा टप्पा)

६.८ बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम

६.९ सारांश

६.१० सरावासाठी प्रश्न

६.११ संदर्भ

## ६.० उद्दिष्ट्ये

१) भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा अभ्यास करणे.

२) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता अभ्यासणे.

munotes.in

३) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे तपासणे.

४) बँकाच्या राष्ट्रीयीकरणात इंदिरा गांधी यांची भूमिका अभ्यासणे.

५) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना

जनता, व्यापारी, शेतकरी, व्यावसायिक, उद्योजक, सरकार, शेअर मार्केट आणि देशी-परदेशी संस्था यांच्याशी आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थेस बँक म्हणतात. खाजगी मालकीचा कोणताही अर्थोद्योग सार्वजनिक मालकीचा म्हणजे पर्यायाने राज्यसंस्थेच्या मालकीचा केला जातो, तेव्हा त्याचे राष्ट्रीयीकरण झाले असे म्हणण्यात येते. खाजगी क्षेत्रातून एखादा अर्थोद्योग सार्वजनिक क्षेत्रात अथवा सरकारी क्षेत्रात घेणे, म्हणजे राष्ट्रीयीकरण असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. खाजगी मालकीच्या अर्थोद्योगातून होणारा नफा खाजगी व्यक्तीला मिळतो किंवा खाजगी मालकीचा अर्थोद्योग अशा प्रकारे चालविला जातो की, त्यामुळे या ना त्या प्रकारे समाजाचे अहित होते असे वाटल्यास नफा सर्वच्या सर्व समाजाला उपलब्ध व्हावा म्हणून अथवा समाजाचे अहित थांबवावे म्हणून राष्ट्रीयीकरणाच्या मार्गाचा अवलंब केला जातो. थोडक्यात, एखादा अर्थोद्योग खाजगी मालकीचा असण्यापेक्षा सार्वजनिक मालकीचा असणे एकंदर समाजाच्या दृष्टीने अधिक हितकर आहे असे वाटल्यास त्याचे राष्ट्रीयीकरण करावे, हे त्यामागील मुख्य तात्त्विक सूत्र आहे. अर्थात नेहमी या सूत्राला धरूनच राष्ट्रीयीकरण केले जाते असे मात्र नाही. कित्येकदा एखाद्या अर्थोद्योगाच्या बाबतीत तात्पुरती काही अडचण उद्‌भवलेली आहे म्हणून अथवा देशाच्या एकंदर आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रीयीकरण अनिवार्य अथवा सोयीचे झाले असते म्हणूनही राष्ट्रीयीकरण केले जाते. राष्ट्रीयीकरण करण्यामध्ये नेहमी समाजहिताची दृष्टी प्रभावी ठरते, असे मानणेही चुकीचे होईल. विशिष्ट अर्थोद्योगाचे राष्ट्रीयीकरण त्या अर्थोद्योगांच्या खाजगी मालकांना तोट्याच्या अथवा अडचणीच्या परिस्थितीतून सोडविण्यासाठी केले जाते असा ज्याप्रमाणे अनुभव आहे त्याचप्रमाणे एकंदर राष्ट्रीयीकरण अशा प्रकारे केले जाते की, राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेबाहेरील खाजगी हितसंबंधांचाच फायदा त्यामुळे होऊ शकतो. राष्ट्रीयीकरण हे नेहमीच समाजवादाच्या दिशेने टाकलेले पाऊल असते, हा समज बरोबर नाही. म्हणूनच समाजवादी नसलेल्या किंबहुना समाजवादविरोधी राज्यकर्ते असलेल्या देशांतही सरकारी क्षेत्राचा व्याप वाढत असल्याचे दृश्य अलीकडे दिसून येते.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाची आर्थिक परिस्थिती गंभीर होती. ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषणाचे विपरित परिणाम स्पष्ट दिसत होते. देशातील मूठभर लोकांजवळ अमाप संपत्ती होती. उरलेला ९०% समाज गरीबीचे जीवन जगत होता. ताष्कंद करारानंतर लाल बहाद्दुर शास्त्री यांचा मृत्यू झाला. १९६७ साली इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या. भारतात राष्ट्रीयीकरणाच्या प्रश्नाला स्वातंत्र्योत्तर काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले. स्वातंत्र्यापूर्वी रेल्वे, पोस्ट, तारखाते, बंदरे आदी ब्रिटिश सरकारच्या मालकीची होती परंतु ब्रिटिश व्यापाऱ्यांना तयार माल भारतात विकणे आणि भारताकडून कच्चा माल, अन्नधान्य खरेदी करणे सोपे ठरावे म्हणून प्रशासनाच्या सोयीसाठी ही व्यवस्था होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक नियोजनाच्या मार्गाने आर्थिक विकास साधण्याचा मार्ग भारताने स्वीकारला. समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट आणि मिश्र अर्थव्यवस्था भारताच्या आर्थिक नियोजनाचे तात्त्विक अधिष्ठान बनले. साहजिकच भारतीय नियोजनाचे एक महत्त्वाचे सूत्र म्हणून सरकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवून त्या क्षेत्राचा क्रमशः विस्तार करण्याचे धोरण भारताने स्वीकारले. या धोरणाचा भाग म्हणून राष्ट्रीयीकरणाचा कार्यक्रम ओघानेच येतो.

सरकारी क्षेत्राचा व्याप हळूहळू वाढत गेल्याचे दिसते. सिमेंट, कागद, औषधे, कापड यांसारख्या उपभोग्य वस्तूंची टंचाई भरून काढण्यासाठी त्या क्षेत्रातही सार्वजनिक उद्योग सुरू करण्यात आले. मजूर बेकार होऊ नयेत म्हणून आजारी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. भांडवली व उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करण्याव्यतिरिक्त सरकारी क्षेत्राने सेवाक्षेत्रातही शिरकाव करून घेतल्याचे दिसते. वित्तीय आणि व्यापार क्षेत्रांत सरकारी क्षेत्राचा प्रभाव अधिक आहे. सरकारने १९६९ मध्ये १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले आणि १९८० मध्ये आणखी ६ बँका ताब्यात घेतल्या. जीवनविमा, सर्वसाधारण विमा, विमान वाहतून, हिंदुस्थान झिंक्स आदी उद्योगांचे सरकारने राष्ट्रीयीकरण केले.

स्वतःच्या क्षमतेची ओळख पटविण्यासाठी इंदिराजींना कठोर निर्णय घ्यावे लागणार होते. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काळात देशातील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या यशस्वी संचलनासाठी व देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी बँका ह्या महत्वाच्या भूमिका बजावत असतात. इंदिरा गांधींनी १४ बँकांचे केलेले राष्ट्रीयीकरण हा एक धाडसी व अर्थव्यवस्थेला कलाटणी देणार निर्णय ठरला. इंदिरा गांधीनी १४ बँकांचे केलेलं राष्ट्रीयीकरण हा त्यांच्या राजकीय कूटनीतीचा भाग होता कि त्यांना गरिबांचे कल्याण करायचे होता हा एक विवादास्पद प्रश्न आहे. तरी त्यांच्या या निर्णयाने देशातील आर्थिक क्षेत्रात एकच खळबळ निर्माण केली.

## ६.२ भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

लोकांना पैसे जमा करण्यासाठी आणि लोकांना कर्ज वाटण्यासाठी जी वित्त संस्था कार्य करते तिला बँक असे म्हणतात. सर्व प्रकारच्या आर्थिक सेवा या मुख्यतः बँकेच्या माध्यमातून चालतात. भारतातील नव्हे तर संपूर्ण जगभरातील बँका या वित्तीय सेवा देत असतात. आधुनिक जगात बँक हा शब्द किंव्हा हि व्यवस्था सर्वसामान्य लोंकाना परिचित आहे. परंतु बँक हा शब्द कधी प्रचलित आला याबद्दल विद्वानांमध्ये एकमत आढळून येत नाही. काहींच्या मते, बँक हा शब्द जर्मन शब्द (BANCK) या शब्दापासून बनला असावा, तर काहींच्या मते हा शब्द इटालियन भाषेतील (BANCO) या शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ "Common Fund" असा होतो. जगातील बँकांचा इतिहास हा ई. स. पूर्व २००० वर्षांपूर्वी बेबोलीयन किंव्हा ग्रीक मध्ये आढळतो. इ. स. पूर्व २००० मध्ये असिरियन आणि बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये आपल्याला कर्जे दिल्याची काही उदाहरणे बघायला मिळतात. या मंदिरातील साधक म्हणजेच पुजाऱ्यानी काही व्यापाऱ्यांना कर्ज दिले होते असे उल्लेख आढळतात. भारतात वैदिक काळापासूनच बँकिंग व्यवस्था असल्याची

माहिती आढळते. भारतात प्राचीन काळामध्ये अनेक व्यापारी संस्था ह्या बँक व्यवस्थेचे कार्य कारात असल्याचे पुरावे आढळतात.

अलेक्झांडर हॅमिल्टन यांना “आधुनिक बँकिंगचे जनक" म्हणून ओळखले जाते. भारतातील आधुनिक बँकिंग व्यवस्था हि ब्रिटिश कालखंडापासुनन सुरु झाल्याचे दिसून येते. १७७० मध्ये भारतात 'बँक ऑफ हिंदुस्तान ही पहिली बँक स्थापन झाली. ही बँक अलेक्झांडर अँड कंपनीने कलकत्त्याला स्थापन केलेली होती. मात्र ही बँक १८३२ मध्ये बंद पडली. १८०६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने 'बँक ऑफ कलकत्ता' ही पहिली प्रेसिडेन्सी बँक स्थापन केली. १८४० मध्ये दुसरी प्रेसिडेन्सी 'बँक ऑफ बॉम्बे' या नावाने स्थापन करण्यात आली आणि १८४३ मध्ये 'बँक ऑफ मद्रास' ही तिसरी प्रेसिडेन्सी बँक स्थापन करण्यात आली. १८६५ मध्ये अलाहाबाद बँक, अलायन्स बँक ऑफ सिमला या बँकांची स्थापना करण्यात आली. १८८१ मध्ये मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर अवध कमर्शियल बँक या बँकेची स्थापना करण्यात आली. मर्यादित जबाबदारीच्या तत्वानुसार बँकेमध्ये गुंतवणूकदार असतात. यांची जबाबदारी कमी असते. त्यामुळे भांडवलदार अशा प्रकारच्या बँका स्थाप करण्याला प्राधान्य देतात. १८९४ मध्ये पंजाब नॅशनल बँकेची स्थापना झाली आणि संपूर्ण भारतीयांच्या मालकीची ही पहिलीच बँक होती. २०व्या शतकाच्या सुरवातीस भारतीय बँकामध्ये अनेक दोष दिसू लागल्याने त्या बँका बुडू लागल्या. हे टाळण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२० मध्ये इंपिरियल बँकेची निर्मिती केली. १९३५ मध्ये भारताची मध्यवर्ती बँक म्हणून 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. १९४९ मध्ये रिझर्व्ह बॅकचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. १९५५ मध्ये 'इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून तिचे नामकरण 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे केले.

## ६.३ राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता

१४ बँकांचे राष्ट्रीयीकरण होईपर्यंत बँक व्यवसाय मुख्यत: नागरी भागात केंद्रित होता. कर्ज पुरवठा उद्योग आणि व्यापार क्षेत्राला(च) होत होता. शिवाय बँकांची मालकी टाटा, बिर्ला अशा उद्योगसमूहांकडे असल्याने बरीच कर्जे ‘नात्यातील’ आस्थापनांनाच दिली जात. परिणामत: व्यापक आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देण्यास बँका अक्षम ठरत. जर बँकांचा ग्रामीण भागात शाखा विस्तार झाला; शेती, लघु उद्योग, छोटे व्यापारी या क्षेत्रांना योग्य प्रमाणात बँक कर्जे उपलब्ध झाली, कर्जपुरवठा फक्त ‘सोयरिकीच्या’ आस्थापनांपुरता मर्यादित न राहता किफायतशीर प्रकल्प/ कंपन्यांना व्यावसायिक निकषावर कर्जे दिली गेली, तर आर्थिक विकासाला चालना मिळेल. आजच्या भाषेत समावेशी विकासाला पोषक वातावरण निर्माण होईल. याबद्दल राजकारणी, अर्थतज्ज्ञ, सरकारी अधिकारी यात व्यापक सहमती होती.

प्रश्न इतकाच होता की, हे सर्व साध्य करण्यासाठी बँकांची खाजगी मालकी संपुष्टात आणणे आवश्यक आहे की, खाजगी मालकीला धक्का न लावता काही (सामाजिक) नियम, नियंत्रणे याद्वारेही हे साध्य करता येईल. मार्च १९६९ मध्येच बँकांवर सामाजिक नियंत्रण आणण्याचा कायदा मंजूर झाला होता. बँक संचालक मंडळावर प्रवर्तकांव्यतिरिक्त व्यावसायिकांची बहुसंख्या असावी, बँक संचालकांशी संबधित आस्थापनांना कर्जे दिली जाऊ नयेत, अशा काही बाबी या कायद्यात समाविष्ट होत्या. सामाजिक नियंत्रणाच्या या

पर्यायाची यशस्विता पडताळून पाहण्यास काही काळ द्यावा लागेल, हाच राष्ट्रीयीकरणाला विरोध करणाऱ्यांचा मुख्य मुद्दा होता.

पण राजकीय डावपेचातील एक खेळी म्हणून राष्ट्रीयीकरण झाले आणि पुढील काळात अपेक्षित सुपरिणाम दिसून आलेही. बँकांचा शाखा विस्तार झाला, त्या नफ्यात येण्यास बराच काळ लागत असला तरी ग्रामीण भागात शाखा विस्तार होऊ लागला. एकूण बँक कर्जातील लघु उद्योग आणि शेती क्षेत्राचा वाटा वाढला. वैयक्तिक पातळीवर विचार केला तर पुरेशा भांडवलाअभावी व्यवसाय सुरू करता येत नाही; तो यशस्वी होत नाही हे खरेच आहे. पण सामाजिक पातळीवर विचार करता सर्व व्यावसायिकांना पुरेसा कर्जपुरवठा झाला तर हे सर्व व्यवसाय यशस्वी होतील का असा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न १९६९ साली उपस्थित करण्याची गरज वाटली नसावी. पण आजही तो विचारात येतोच असे नाही.खाजगी बँका फक्त त्यांच्या नफ्याचा विचार करत असल्याने त्या ग्रामीण भागात शाखा उघडत नाहीत, शेतीकर्जे देण्यातील जोखीम स्वीकारण्यास त्यांची तयारी नसते. बँका सरकारच्या मालकीच्या बनल्या की, या सर्व गोष्टी सरकार करू शकेल, असा साधा विचार यामागे होता. सरकारी बँकांचा उद्देश फक्त नफा मिळवणे असा नसला तरी ज्या प्रकल्पाला कर्ज द्यायचे तो - लगेच नाही तरी काही काळाने - नफा मिळवून कर्जफेड करू शकला तरच बँका आपला व्यवसाय चालू ठेवू शकतात. बँक किती प्रमाणात जोखीम घेऊ शकतील याचाही विचार झाला नाही. पण नियोजित व्यवस्थेत किती गुंतवणूक करायची; कोणत्या उत्पादन तंत्राचा वापर करायचा याचे नियोजन होत असल्याने व्यवसाय यशस्वी होण्यासाठी ज्या आदानांची गरज भासते, त्याच्या पुरावठ्याबरोबरच वित्त पुरवठाही झाला तर व्यवसाय यशस्वी ठरतात. मग बँक कर्जे फेडली जातील आणि यशस्वी उद्योजक नवीन कर्जे घेऊन व्यवसायवृद्धी करू शकतात असा विचार असावा.

बँक राष्ट्रीयीकरण झाले त्याच वेळी नवीन शेती तंत्र प्रचलित होण्यास सुरुवात झाली. सुधारित बियाणे, रासायनिक खते, जलसिंचनाची वाढती सोय आणि हमी किमतीस शेतमालाची सरकारमार्फत खरेदी यातून शेती उत्पादन आणि उत्पादकता वाढवून अन्नधान्याचे उत्पादन वाढवण्याचा कार्यक्रम सरकार राबवत होते. या सर्व आदानांच्या बरोबरच बँक कर्जे देण्याची योजना यशस्वी ठरली. हरित क्रांतीने अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली; देश स्वयंपूर्ण झाला. शाखा विस्ताराच्या कार्यक्रमाने सुशिक्षितांना सरकारी नोकरी मिळण्याची नवीन संधी निर्माण झाली. बँक कर्जपुरवठा सरकारच्या अखत्यारीत असल्याने या कर्जाच्या आधारे ग्रामीण भागात विकासाच्या योजना आखल्या जाऊ लागल्या. हे सर्व फायदे अधिक स्वरूपात मिळण्यासाठी १९८० मध्ये आणखी ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले.

दुसऱ्या बँक राष्ट्रीयीकरणानंतर सरकारी मालकीच्या २८ बँका झाल्या होत्या. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व व्यावसायिक निकषावर आवश्यक आहे का यांचा विचार झाला नाही. सरकारी मालकीच्या बँकांचा बाजारहिस्सा ९० टक्क्यांच्या आसपास राहिल्याने ही जवळ जवळ मक्तेदारीच होती. भारतीय औद्योगिक क्षेत्रही संरक्षित वातावरणात वाढत होते. त्यामुळे औद्योगिक कर्जे फार जोखमीची नव्हती. अशा वातावरणात ठेवी संकलन आणि कर्ज पुरवठा 'संरक्षित' वातावरणात होत असल्याने सरकारी बँकव्यवसाय वाढला, बहरला यात काहीच नवल नाही. सरकारी बँकांवर नजर ठेवणारा अर्थ मंत्रालयातील बँकिंग प्रभाग प्रभावशाली

बनला आणि संप करून अर्थव्यवहार रोखण्याची ताकद असलेल्या बँक कर्मचारी संघटनांची ताकदही वाढली.

## ६.४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे

एखाद्या बँकेची अथवा काही बँकांची मालकी जेव्हा सरकार स्वतःकडे घेते व त्या बँकेचे किंवा बँकांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सरकारकडे येते, त्यास ' राष्ट्रीयीकरण' असे म्हणतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण १ जानेवारी १९४९ रोजी करण्यात आले. १ जुलै १९५५ रोजी इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँक ऑफ इंडिया ची (SBI) ची निर्मिती करण्यात आली. इंदिरा गांधींनी १९ जुलै १९६९ रोजी राष्ट्रपतींच्या वटहुकूमाद्वारे ५० कोटी रु. पेक्षा अधिक ठेवी असणा-या १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची अनेक कारणे होती ती पुढीलप्रमाणे-

### ६.४.१ आर्थिक विकास घडवून आणणे :-

पंचवार्षिक योजनांच्या यशस्वी संचलनासाठी मोठ्या प्रमाणावर वित्तीय साधनांची आवश्यक्यता होती. वित्तीय समस्यांमुळे शेती, छोटे व मोठे उद्योगधंदे यांच्या विकासाची गती मंदावली होती. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास जलद गतीने घडवून आणण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण आवश्यक्य होते.

### ६.४.२ बँकेतून श्रीमंत लोकांचा प्रभाव नष्ट करणे :-

स्वातंत्र्यानंतर बँकिंग व्यवस्थेवर श्रीमंत वर्गांचा प्रभाव होता. व देशातील ८०% संपत्ती या मूठभर श्रीमंत लोकांच्या हाती एकवटल्याने सामान्य व्यक्तींना बँकेकडून कुठल्याही प्रकारची मदत मिळत नव्हती. राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी व्यावसायिक बँक 'क्लास बँकिंग' नीतीचा वापर करायचे. याअंतर्गत केवळ श्रीमंतांनाच बँकेद्वारे कर्ज आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जायच्या. या काळात बँका ह्या आपल्या मित्रांना किंव्हा मोठ्या उद्योगपतींना आपल्या फायद्यासाठी बँकेतील पैसा व्याजाने देत. व राष्ट्रीय हिताच्या कार्यासाठी आर्थिक मदत करण्यास नकार देत. राष्ट्रीयीकरण करून उद्योगपतींचा हा प्रभाव नष्ट करणे हे मुख्य उद्देश होता.

### ६.४.३ शेती, लघु - मध्यम उद्योग व व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्यता :-

या बँकांवर मोठ्या व्यापाऱ्यांचे नियंत्रण असल्याने सर्वसामान्य व्यापाऱ्यांना कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नसे. लघु उद्योग व व्यापाऱ्यातील विकासामध्ये कर्ज उपलध करून देणे हे फार आवश्यक्य असते परंतु हे कर्ज फक्त श्रीमंत व्यापाऱ्यांना किंव्हा जवळच्या व्यक्तींना दिले जात असल्याने छोटे उदयोगधंदे, शेती यांचा हवा तसा विकास होत नव्हता.

कृषी, लघु आणि मध्यम उद्योगांसोबत छोटे व्यापाऱ्यांना सरळ अटींवर आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण कारणे आवश्यक्य होते...

### ६.४.४ बँकिंग व्यवस्थेमध्ये व्यावसायिकता आणणे :-

बँका जेव्हा खाजगी क्षेत्रात होत्या, तेव्हा त्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची कुठलीही व्यवस्था नव्हती. तसेच त्या कर्मचाऱ्यांची नोकरी हि बँकाच्या मालकावर निर्भर होती. त्यामुळे आपली नोकरी टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टचाराला वाव होता. राष्ट्रीयीकरणामुळे या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन कार्यक्षमता व कुशलता वाढवणे हे मुख्य उद्दिष्टे होते.

### ६.४.५ ग्रामीण भारतात बँकेचा विस्तार घडवून आणणे :-

राष्ट्रीयीकरणाचा मुख्य उद्देश भारतातील ग्रामीण भागात बँकिंग क्षेत्राचा विकास घडवून आणणे हा होता. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून पैशांची गुंतवणूक होईल तर दुसरीकडे बँका ह्या शेतकऱ्यांना व्याजाने पैसे देऊन त्याद्वारे अर्थव्यवस्थेचा विकास घडवू आणेल.

### ६.४.६ सरकारी धोरणांचे पालन :-

१९४८ च्या भारतातील आर्थिक व औदयोगिक धोरणांद्वारे हे स्पष्ट केले होते कि, राष्ट्रीय व सामाजिक महत्वाच्या कोणत्याही उपक्रमाद्वारे राष्ट्रीयीकरण केले जाईल. समाजवाद व गरिबी हटाव सारखे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकांची भूमिका हि महत्वाची होती. त्यामुळे त्याचे राष्ट्रीयीकरण करणे आवश्यक आहे अशी भूमिका तत्कालीन सरकारने घेतली.

## ६.५ इंदिरा गांधींची भूमिका

भारतात १९६० पासूनच ८ क्षेत्रीय बँकांचे प्रायोगिक तत्वावर राष्ट्रीयीकरण करावे हा विचार रुजू लागला होता. १९६६ मध्ये इंदिरा गांधी ह्या पंतप्रधान झाल्या. तत्कालीन आर्थिक व्यवस्थेमध्ये मोठे बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी पाऊले उचलायला सुरवात केली. सामान्य माणसाला कर्जपुरवठा करता यावा, व्यापाराप्रमाणेच शेतीसाठी व इतर ग्रामीण उद्योगांनाही पतपुरवठा करावा. यासाठी देशातील प्रमुख बँकांवर सरकारचे नियंत्रण असणे आवश्यक्य आहे, असे इंदिरा गांधीना वाटत होते. या बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यास पतपुरवठ्याविषयी काही मार्गदर्शक नियम कसे तयार करता येईल व श्रीमंतांसाठीच असलेले हे क्षेत्र सामान्यांसाठी कसे उपलध होईल यादृष्टीने इंदिरा गांधी प्रयन्त करत होते. १९६६ मध्ये आकशवाणीवर दिलेल्या भाषणात बँकेच्या राष्ट्रीयीकरणाच्या संदर्भात आपले उद्देश मांडले होते. त्यांच्या मते,

१) सामान्य गरजू माणसाला पतपुरवठा व्हावा.

२) बँकेवरील आणि अर्थपुरवठयावरील मूठभर लोकांची मक्तेदारी संपावी.

३) शेती, ग्रामीण, उद्योग व छोटे - मोठे उद्योगधंदे यांनाही बँकेने मुक्तहस्ते कर्ज द्यावे. ४) बँकेतील नोकरांना संरक्षण देऊन त्यांच्या सेवाशर्तीतीत सुसूत्रता आणणे.

**आपली प्रगती तपासा.**

१) १४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणात इंदिरा गांधी यांच्या भूमिकेचा आढाव घ्या.

## ६.६ चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण (पहिला टप्पा)

२५ ऑक्टोम्बर १९६७च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार, राष्ट्रीय पतपुरवठा समितीचे गठन आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदयांना आर्थिक मदत याविषयी सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव मांडण्यात आला. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या विरुद्ध मोरारजी देसाई, सत्यनारायण सिन्हा व चेन्ना रेडी हे या ठरावाच्या विरुद्ध बोलले. तर जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण व स्वर्णसिंग यांनी आपला होकार इंदिरा गांधींच्या बाजूने दिला. मोरारजी देसाई हे कॉंग्रेसचे जेष्ठ नेते असल्याने व इंदिरा गांधी या उमेदवारी घोषित केली. तर अपक्ष उमेदवार व्ही. व्ही. गिरींना इंदिराजींचा पाठिंबा होता. यामुळे सिंडिकेट - इंदिरा संबंध ताणले गेले. मोरारजी देसाई यावेळेस अर्थमंत्री होते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणातील प्रमुख अडथळा दूर करण्यासाठी सर्वप्रथम इंदिराजींनी मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते काढून घेतेले. व ते खाते स्वतःकडे ठेवले.

१९६९ मध्ये बंगलोर येथे कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर १९ जुलै १९६९ मध्ये इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण घडवून आणले. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने काढलेल्या वटहुकूमानें १४ प्रमुख मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या वटहुकूमाचे नाव "उपक्रमांचे संपादन आणि हस्तांतरण वटहुकूम १९६९" असे होते. यामध्ये ज्या बँकाच्या ठेवी ५० कोटी रुपये किंव्हा त्यापेक्षा जास्त होत्या अशा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. अशा प्रकारे वटहुकूमाद्वारे १४ बँकांचे स्वामित्व व नियंत्रण हे सरकारच्या ताब्यात आले. १० फेब्रुवारी १९७० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने १४ बँकांचे राष्ट्रीयकरण घटनाबाह्य घोषित केले. परंतु लोकांच्या दबावामुळे व समाजवादी विचारधारेच्या प्रेरणेने तसेच सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करून सरकारने १४ फेब्रुवारी १९७० ला राष्ट्रपतींच्या नवीन अध्यादेशाद्वारे बँकांचे पुन्हा राष्ट्रीयीकरण केले. ह्या बँका पुढीलप्रमाणे होत्या :

१) सेंट्रल बँक ऑफ इंडिया

२) बँक ऑफ इंडिया

३) पंजाब नॅशनल बँक

४) बँक ऑफ बडोदा

५) युनाइटेड कमर्शियल बँक

६) कॅनरा बँक

७) युनाइटेड बँक ऑफ इंडिया

८) देना बँक

९) सिंडिकेट बँक

munotes.in

१०) युनियन बँक ऑफ इंडिया

११) इलाहाबाद बँक

१२) इंडियन बँक

१३) बँक ऑफ महाराष्ट्र

१४) इंडियन ओव्हरसीज बँक

## ६.७ बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा (दुसरा टप्पा)

१५ एप्रिल १९८० मध्ये इंदिरा गांधी यांनी आणखी सहा मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करणारा कायदा पास केला. या सहा बँका पुढीलप्रमाणे होत्या

१) आंध्र बँक

२) पंजाब अँड सिंध बँक

३) विजया बँक

४) कॉर्पोरेशन बँक

५) न्यू बँक ऑफ इंडिया

६) ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स

या सर्व बँकांकडे ठेवी २०० कोटी रु. पेक्ष्या अधिक होत्या. राष्ट्रीयीकरणाच्या दुसऱ्या टप्प्या बरोबर देशातील ९३% बँक व्यवसाय सार्वजनिक क्षेत्रात आले.

## ६.८ बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम

१) बँकेकडे पडून असलेला अनावश्यक पैसा आवश्यक क्षेत्रामध्ये गुंतविण्यात आला. यामध्ये प्राथमिक सेक्टर, छोटे उद्योग, कृषी आणि छोटे ट्रान्सपोर्ट यांचा समावेश होता.

२) शासनाने राष्ट्रीय बँकांना दिशानिर्देश देत लोन पोर्टफोलियोमध्ये ४०% कृषी कर्ज देणे अनिवार्य केले. सोबतच प्राथमिकता प्राप्त इतर क्षेत्रातही कर्ज देण्यात आले. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला.

३) राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या शाखांचा वेगाने विस्तार झाला. बँकांनी त्यांचा व्यवसाय गाव, शहरा-शहरांपर्यंत पोहोचविला. आकडेवारीनुसार जुलै, १९६९ मध्ये देशात बँकां केवळ ८३२२ शाखा होत्या. १९९४ पर्यंत या शाखा ६० हजारांच्या पलीकडे पोहोचल्या.

४) बँका ह्या सरकारच्या नियंत्रणात आल्यामुळे लोकांचा बँकेवरील विश्वास वाढला, त्यामुळे बँकेतील गुंतवणूक वाढत गेली. १९६९ मध्ये ४६४५ करोड रुपये बँकेची गुंतवणूक होती तीच गुंतवणूक १९८६ मध्ये ९८००० करोड रुपया पर्यंत पोहचली.

५) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा सकारात्मक प्रभाव हा इतर क्षेत्रावर देखील पडला. १९९२ मध्ये विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. व पुढे १९७३ मध्ये कोळसा कंपनीचे देखील राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

**आपली प्रगती तपासा.**

१) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम सांगा?

## ६.९ सारांश

खाजगी क्षेत्रातील बँका जास्त कार्यक्षम असून, जास्त नफा कमवितात, तसेच त्यांच्याकडे कमी दराने व्याज द्यावे लागणाऱ्या ठेवी फार मोठ्या प्रमाणावर आहेत, तर सार्वजनिक उद्योगातील बँका प्राधान्याने द्यावयाच्या कर्ज वाटपात आघाडीवर असून, कर्मचाऱ्यांच्या पगारावर फार मोठ्या प्रमाणावर खर्च करतात, असे बँकिंग उद्योगातील अभ्यासकांचे मत आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण हा १९६९ साली घेतलेला योग्य निर्णय होता.पण, सध्याच्या आर्थिक परिस्थितीत याबाबत पुनर्विचार होऊ शकतो. १९६७ साली इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या. स्वतःच्या क्षमतेची ओळख पटविण्यासाठी इंदिराजींना काही कठोर निर्णय घ्यावे लागले. १९६७ मध्ये इंदिरा गांधी यांनी काँग्रेस पार्टीमध्ये १० सूत्री कार्यक्रम सादर केले. बँकेवर शासनाने नियंत्रण असावे हा यामागील मुख्य हेतू होता. राजा-महाराजांना मिळणारा आर्थिक लाभ बंद करणे, किमान मजुरीचे धोरण ठरविणे, पायाभूत संरचणेचा विकास, कृषी, लघु उद्योग आणि निर्यातीत गुंतवणूक वाढविणे हा यामागील मुख्य हेतू होता. इंदिरा गांधींनी १९ जुलै, १९६९ रोजी एक सूचना काढून देशातील १४ मोठ्या खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. या सूचनेला 'बँकिंग कंपनीज ऑर्डिनन्स' म्हटल्या जाते. पुढे याच नावाने विधेयक पारित करण्यात आले. यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले. राष्ट्रीयीकरण होण्याच्या आधी देशामध्ये केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया ही एकमात्र शासकीय बँक होती. बँकांच्या राष्ट्रीयीकरणांमुळे या बँकांचे पतपुरवठा धोरण बदलले. ज्यामुळे सामान्य माणसाला हि आता कर्ज मिळू लागले. सामान्य व्यक्ती, व्यापारी व नवीन तरुण उद्योजकही आपल्या उद्योग उभारणीसाठी आत्मविश्वासाने बँकेकडे जाऊ लागला. बँकेतील पैसे हा सर्वसामान्य माणसा पर्यंत झिरपू लागला.

भारतात सार्वजनिक उद्योगातील बँका, सहकारी बँका, परदेशी बँका, 'ओल्ड व न्यू जनरेशन' खाजगी बँका विशिष्ट हेतूने कार्यरत असलेल्या बँका, लघु वित्त बँका, पेमेंट बँका अशा बऱ्याच प्रकारच्या बँका कार्यरत आहेत. भारतातील लोकसंख्येचा विचार करता विविध बँकांची गरज आहे, पण त्यांना सरकारने शिस्त लावणेही गरजेचे आहे. बँका या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तो कणा ताठ ठेवणे, हे सरकारचे प्रमुख आर्थिक धोरण असावयास हवे. दरम्यान आर्थिक वर्ष २०१९ अखेरीस सार्वजनिक उद्योगातील बँकांचे बुडित कर्जांचे प्रमाण एकूण कर्जाच्या १३ टक्के होते, तर खाजगी बँकांचे फक्त ४.२ टक्के होते. आर्थिक वर्ष २०१८ अखेरीस खाजगी बँकांनी ४० हजार कोटी रुपयांचा नफा कमवला, तर सार्वजनिक उद्योगातील बँकांनी ८५ हजार, ४०० कोटी रुपयांचा तोटा सोसला.

## ६.१० प्रश्न

१) भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२) इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण का केले त्याची करणे सांगा.

३) इंदिरा गांधी यांनी कोणत्या १४ बँकांचे राष्ट्रीकरण केले ?

४) बँकांच्या राष्ट्रीयीकरणातील इंदिरा गांधी यांची भूमिका सांगून बँकांचे राष्ट्रीयीकरण स्पष्ट करा.

५) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम सांगा.

## ६.११ संदर्भ ग्रंथ

१) शर्मा वृज / शर्मा शैलबाला, समसामायिक भारत ( १९४७-२०००), पंचशील प्रकाशन, जयपूर, २००७.

२) बिपीनचंद्र,मृदुला मुखर्जी, आदित्य मुखर्जी, आझादी के बाद का भारत (१९४७ - २००७), हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ली विश्वविद्यालय, २०१५.

३) कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७-२०००), साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१३.

४) कोलारकर श. गो. स्वतंत्र हिंदुस्थानचा इतिहास (१९४७-१९८०), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

५) पिंपलपल्ले आर./ मुटकुळे रामभाऊ, स्वतंत्रत्तोर भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

६) समकालीन भारत (१९४७-२०००), (Study Material) वर्धमान महावीर खुला विश्व विद्यालय, कोटा.

७) https://www.mahamtb.com/Encyc/2019/7/25/Article-on-50-years-of-Nationalization-of-Banks.html

❖❖❖❖

munotes.in

# ७

# जनता सरकार; काँग्रेसचे सत्तेत पुनरागमन; परराष्ट्र धोरण

**घटक रचना :**


७.१ जनता सरकार

७.१.१ प्रस्तावना

७.१.२ आणीबाणीनंतरचे राजकारण

७.१.३ जनता सरकार आणि शाह आयोगाची नियुक्ती

७.१.४ संकटात जनता पक्ष आणि काँग्रेसचे पुनरुज्जीवन

७.२ काँग्रेसचे सत्तेत पुनरागमन आणि श्रीमती इंदिरा गांधींची भूमिका

७.३ इ.स.१९६४ - इ.स.१९८४ या कालावधीतील भारताचे परराष्ट्र धोरण

७.३.१ प्रस्तावना

७.३.२ नेहरूनंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण

७.३.३ श्रीमती इंदिरा गांधी कार्यकाळ

७.४ सारांश

७.५ निष्कर्ष

७.६ प्रश्न

७.७ संदर्भ


## ७.० उद्दिष्टे

हा अध्याय वाचकांना पुढील बाबी समजण्यास मदत करेल

१. आणीबाणीनंतरचे भारतीय राजकारण समजून घेणे

२. भारतीय राजकारणातील गतिशीलता शोधण्यासाठी श्रीमती गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षात झालेले बदल

३. भारत सरकारने भारताची लोकशाही बळकट करण्यासाठी हाती घेतलेले प्रयत्न.

४. परराष्ट्र धोरणाद्वारे भारताचा विकसनशील देश म्हणून उदय.

munotes.in

## ७.१ जनता सरकार

### ७.१.१ प्रस्तावना :-

भारताने सांसदीय लोकशाही प्रणालीचा स्विकार केला आहे. या शासन व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे राजकीय पक्ष राष्ट्रापुढील अंतर्गत व बाह्यप्रश्नांचे निराकरण करण्याचे विविध पर्याय सुचवत असतात. तसेच ते राष्ट्रीय व परराष्ट्रीय ध्येय धोरणे ठरविण्यासंबंधी देखील मोलाची कामगिरी बजावू शकतात. भारतीय प्रमुख राजकीय पक्षांमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महत्त्वाचे स्थान आहे. हा पक्ष सुरूवातीपासूनच एक पक्ष म्हणून नव्हे तर एक संघटना म्हणून सर्वप्रथम अस्तित्वात आला. राष्ट्रीय काँग्रेस प्रथमपासून एखाद्या संसद किंवा प्रातिनिधीक कायदेमंडळाप्रमाणे संघटित करण्यात आली. राष्ट्रीय काँग्रेसचे नांव म्हणून वापरण्यात आलेला 'काँग्रेस' हा शब्द उत्तर अमेरिकेच्या इतिहासातून उचलण्यात आलेला आहे. लोकांचे मंडळ असा त्याचा अर्थ आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे कामकाज लोकशाही मार्गाने म्हणजेच, वादविवाद, चर्चा, प्रसंग, मतदान अशा पद्धतीने चालत असे. राष्ट्रीय काँग्रेसने भारतीय लोकशाहीला सांसदीय लोकशाहीचे रूप दिले होते. अशा तऱ्हेने देशात सांसदीय लोकशाहीची बीजे घट्ट रुजवण्यात व ती लोकप्रिय करण्यात मदत केली.

### ७.१.२ आणीबाणीनंतरचे राजकारण :-

आणीबाणीच्या काळात भारताच्या लोकशाहीचे सामर्थ्य आणि कमकुवतपणा दोन्ही उघड झाले. यातून अनेक धडे मिळाले आहेत आणि लोकशाही हक्कांवरील विश्वास दृढ झाला आहे. श्रीमती गांधींनी 'अंतर्गत गोंधळ आणि अराजकता आणि सुव्यवस्थेचा धोका' या कारणास्तव आणीबाणी लादली परंतु आणीबाणीच्या तरतुदीने त्यांच्या व्याख्यांना विरोध केला आणि असे म्हटले आहे की ती केवळ 'सशस्त्र बंडखोरी' च्या आधारावर आणि त्यांच्या सल्ल्यानुसार घोषित केली जाऊ शकते. अध्यक्ष जे मंत्रिपरिषदेने लिखित स्वरूपात दिले पाहिजेत. नागरी स्वातंत्र्याचे अधिकार लोकांना समजले आणि न्यायव्यवस्था देखील व्यक्तीच्या नागरी स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी सक्रिय झाली. आणीबाणीच्या काळातील सर्वात महत्त्वाचा धडा काँग्रेस सरकारने लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर आणि काँग्रेसच्या पराभवाने शिकला. काँग्रेस (ओ), जनसंघ, भारतीय लोक दल आणि सोशालिस्ट पार्टी या विरोधी पक्षांच्या विलीनीकरणाने जनता पक्षाची स्थापना केली. काँग्रेसचे इतर राजकीय नेते जगजीवन राम, एचएन बहुगुणा आणि नंदिनी सत्पथी यांनी एकत्र येऊन काँग्रेस फॉर डेमोक्रसी (CFD) पक्षाची स्थापना केली, नंतर जनता पक्षात विलीन झाले. मार्च महिन्यात लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसशी लढण्यासाठी हे सर्वजण एकत्र आले होते. जयप्रकाश नारायण हे लोकशाहीच्या पुनर्स्थापनेचे प्रतीक बनले. परिणामी जनता पक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षांनी निवडणुका जिंकल्या आणि ५४२ जागांपैकी ३३० जागा जिंकल्या. प्रत्येक राज्यानुसार मतदारांचा प्रतिसाद वेगवेगळा होता. जनता सरकार सत्तेवर आले. श्रीमती इंदिरा गांधी आणि संजय गांधी यांनीही रायबरेली आणि अमेठीतून आपल्या जागा गमावल्या.

**७.१.३ जनता सरकार आणि शाह आयोगाची नियुक्ती :-**

पंतप्रधानपदाच्या मुद्द्यावरून पक्षाच्या नेत्यांमध्ये जोरदार स्पर्धा होती. पंतप्रधानपदासाठी तीन इच्छुक होते - मोरारजी देसाई जे १९६६-67 पासून श्रीमती इंदिरा गांधींचे प्रतिस्पर्धी होते, चौधरी चरणसिंग, यूपी आणि भारतीय लोक दलाचे समाजवादी नेते आणि काँग्रेस सरकारमधील जगजीवन राम हे ज्येष्ठ मंत्री होते. हे प्रकरण जयप्रकाश नारायण आणि जे.बी. कृपलानी यांच्याकडे होते ज्यांनी मोरारजी देसाईंना भारताचे पंतप्रधान बनवण्याची बाजू घेतली आणि त्यांनी २३ व्या सामन्यात वयाच्या ८१ व्या वर्षी शपथ घेतली. एन. संजीव रेड्डी जुलै १९७७ मध्ये राष्ट्रपती झाले.

आणीबाणीची सर्व अधिकृत वैशिष्ट्ये मोडून काढण्यासाठी आणि उदारमतवादी लोकशाही पुनर्स्थापित करण्यासाठी जनता सरकारने तातडीने योग्य पावले उचलण्यास सुरुवात केली. सर्व निलंबित अधिकार आणि नागरिकांना बहाल करण्यात आले. ४२ व्या घटनादुरुस्ती अंतर्गत भारतीय राज्यघटनेद्वारे नागरिकांच्या उदारमतवादी अधिकारांना बाधा आणणाऱ्या सर्व तरतुदी रद्द करण्यासाठी ४४ वी घटनादुरुस्ती लागू करण्यात आली. न्यायपालिकेनेही तिची संरचना परत मिळवली आणि राज्याच्या कार्यकारी अधिकारांवर तिचे वर्चस्व उपभोगले.

मे १९७७ मध्ये जनता पक्षाच्या सरकारने भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती जे.सी. शाह यांच्या अध्यक्षतेखाली शाह आयोग नेमला. जून १९७५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या आणीबाणीच्या काळात सरकारवर झालेल्या विविध आरोपांची चौकशी करण्यासाठी हा अहवाल तयार करण्यात आला होता. अटक, सेन्सॉरशिप, शहरी मंजुरी, नसबंदी कार्यक्रम आणि अधिकाराचा गैरवापर यासह हे आरोप आणि तक्रारी. आयोगाने कठोरपणे चौकशी केली आणि साक्षीदारांचे दाखले दस्तऐवजीकरण केले. आयोगाने श्रीमती इंदिरा गांधी यांनाही पाचारण केले जे चौकशीसमोर हजर झाले परंतु त्यांनी कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला. शाह कमिशनचे दोन अंतरिम अहवाल आणि १९७८ मध्ये एक अंतिम प्रकाशित अहवाल होता. शहा आयोगाच्या अहवालाने आणीबाणीच्या काळात लोकांना सामोरे जावे लागलेल्या वास्तविक परिस्थितीची पडताळणी केली होती जी वेदनादायक होती आणि लोकांच्या लोकशाही अधिकारांच्या बाहेर होती.

**७.१.४ संकटात जनता पक्ष आणि काँग्रेसचे पुनरुज्जीवन :-**

जनता पक्षाने पर्याय म्हणून सत्तेवर येऊन लोकशाही पुनर्संचयित करण्यासाठी महत्त्वपूर्ण बदल केले असले तरी, प्रशासनातील त्यांची कामगिरी, विकासाची धोरणे राबविणे, सामाजिक न्याय प्रदान करणे या कारणांमुळे पक्ष लवकरच क्षीण होऊ लागला. ते जुलै १९७९ पर्यंत अल्प कालावधीसाठी सत्तेवर होते. जनता पक्षाचा अधःपतन खालील प्रमाणे अनेक कारणांमुळे झाला:-

• ते ग्रामीण भागातील सामाजिक तणाव हाताळण्यास असमर्थ होते;

• उत्तर भारतातील इतर जातींवर जातीय तणाव आणि हिंसक हल्ले यांचा व्यापक प्रसार;

• सांप्रदायिक हिंसाचार, वाढती आंदोलने, अराजकता आणि हिंसा, ज्याचा समाजाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत होता;

• आर्थिक अविकसितांना सामोरे जाण्यास अक्षम;

• सरकारने गावातील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी काही सकारात्मक कार्यक्रम तसेच 'कामासाठी अन्न' कार्यक्रम सुरू केला असला, तरी त्यांनी जमीन सुधारणा आणि शेतमजुरांना जास्त वेतन देण्याच्या इतर मागण्या पूर्ण करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत;

• कमी दरामुळे अर्थव्यवस्थेवर महागाईचा प्रभाव वाढत होता;

• जनता सरकारने भारताच्या असंलग्न धोरणाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला आणि अमेरिका आणि ब्रिटनशी संबंध मजबूत करण्यासाठी आणि सोव्हिएत युनियनशी जवळचे संबंध सुधारण्यासाठी काम केले परंतु जनता सरकारचा कार्यकाळ खूपच कमी होता;

• जनता सरकार आपल्या नेत्यांना एकत्र ठेवू शकले नाही. केंद्र आणि राज्य या दोन्ही ठिकाणी दिशा, एकता नव्हती. जनता सरकार हे इतर अनेक राजकीय पक्षांचे मिश्रण असल्याने सर्वांनी आपापली उद्दिष्टे आणि अजेंडा पूर्ण करण्यासाठी एकमेकांना पाठिंबा दिला. पक्षाने आपले अस्तित्वच गमावले आणि तो गटबाजी, हेराफेरी आणि नेत्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा बळी ठरला. परिणामी पक्षाचे विभाजन झाले आणि मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली १८ महिन्यांपेक्षा कमी कालावधीत बहुमत गमावले. काँग्रेस सरकारचा पाठिंबा काढून घेतल्याने चार महिन्यांत काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने चरणसिंग यांच्या नेतृत्वाखालील आणखी एका सरकारची सत्ता गेली.

**तुमची प्रगती तपासा**

१. निवडणुका जिंकूनही जनता पक्ष सत्तेत का राहू शकला नाही?

## ७.२ काँग्रेसचे सत्तेत पुनरागमन आणि श्रीमती इंदिरा गांधींची भूमिका

तब्बल चौतीस महिन्यांनी १९८० च्या निवडणुका जिंकून काँग्रेस पुन्हा सत्तेत आली. श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा एकदा पंतप्रधान झाल्या. जवळपास सर्वच राज्यांमध्ये काँग्रेसचे बहुमत सिद्ध झाले आणि बावीस राज्यांपैकी पंधरा राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता प्रामुख्याने आली. काँग्रेस श्रीमती गांधींच्या पूर्ण नियंत्रणाखाली होती आणि लोक पुन्हा त्यांच्याकडून भारतातील सर्व समस्यांचे निराकरण करण्याची अपेक्षा करू लागले. इंदिरा गांधींनी सत्तेशिवाय या सर्व वर्षांत अनेक अंतर्गत आणि बाह्य प्रतिकूल परिस्थितींचा सामना केला. यावेळी तिच्याकडे संकोच आणि जाणीवेचा दृष्टिकोन होता. २३ जून १९८० रोजी त्यांचा मुलगा संजय गांधी यांचे विमान उड्डाण करताना निधन झाल्यानंतर, त्यांनी त्यांचा मोठा मुलगा राजीव गांधी यांच्यासोबत त्यांची जागा भरण्याचा प्रयत्न केला, जे खासदार म्हणून निवडून आले आणि १९८३ मध्ये पक्षाचे सरचिटणीस झाले.

काँग्रेसची दुसरा डावही गोंधळ आणि अनिर्णयतेने भरलेली होती. काँग्रेस हळूहळू कमकुवत संघटनात्मक संरचना म्हणून प्रक्षेपित करू लागली. पक्षाच्या राज्य घटकांमध्ये आणि राज्य

सरकारांमध्ये सतत गृहयुद्ध सुरू होते. 1983 मध्ये आंध्र आणि कर्नाटकच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला गंभीर पराभवाला सामोरे जावे लागले. आंध्रमध्ये तेलुगू देशम पक्षाने फिल्म स्टार्ट अंतर्गत विजय मिळवून राजकारणी एन.टी. रामाराव आणि कर्नाटकमध्ये २२४ विधानसभा जागांपैकी काँग्रेसच्या 81 जागांवर जनता आघाडीने ९५ जागा जिंकल्या.

काँग्रेसलाही जातीय, आणि भाषिक संघर्षांचा सामना करावा लागला. काश्मीर, आसाम आणि पंजाबमधील जातीय तणावाचा भारताला अधिक फटका बसला आणि सरकारच्या दिरंगाईमुळे आणि या राज्यांकडे कमी लक्ष दिल्याने जातीय तणावामुळे जातीय दंगली वाढल्या, आणि एकमेकांविरुद्ध शत्रुत्व वाढले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या अत्याचाराच्या घटनाही घडल्या. भारताने सार्वजनिक क्षेत्र आणि आर्थिक उदारीकरणाच्या माध्यमातून नियोजन आणि आर्थिक विकासाच्या कार्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. सरकारने आपल्या प्रयत्नांद्वारे महागाई नियंत्रित केली आणि कृषी आणि पेट्रोलियम उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ करून आर्थिक विकास दर प्रतिवर्ष ४ टक्क्यांहून अधिक वाढवला. श्रीमती गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने परकीय संबंध मजबूत करण्यावरही लक्ष केंद्रित केले ज्याची आपण युनिटच्या पुढील भागात तपशीलवार चर्चा करू. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी, भारतातील अतिरेकी आणि दहशतवादी परिस्थितीला आळा घालण्यासाठी सुवर्णमंदिरात सैन्य पाठवण्याच्या मुद्द्यावरून त्यांच्या अंगरक्षकांनी त्यांची हत्या केल्यावर श्रीमती गांधींचा भारताच्या पंतप्रधान म्हणून दीर्घकाळाचा कार्यकाळ संपुष्टात आला. तिचा मुलगा राजीव गांधी यांनी तिच्या मृत्यूनंतर लगेचच काँग्रेसच्या संसदीय मंडळाने पुढच्या पंतप्रधानाची नियुक्ती केली आणि ते भारताचे पुढचे पंतप्रधान झाले.

**तुमची प्रगती तपासा**

१. काँग्रेस आपली सत्ता का टिकवू शकली नाही ?

२. श्रीमती गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात त्यांचा दृष्टिकोन काय होता? योग्य उदाहरणांसह स्पष्ट करा.

## ७.३ इ.स.१९६४ - इ.स.१९८४ या कालावधीतील भारताचे परराष्ट्र धोरण

### ७.३.१ प्रस्तावना :-

स्वातंत्र्योत्तर भारत एक मजबूत आणि तटस्थ परराष्ट्र धोरण राखण्यासाठी अतिशय स्पष्ट आणि ठाम होता. जे.**एन. दीक्षित** यांच्या मते, आंतरराष्ट्रीय संदर्भ आणि राष्ट्रीय घटनांमधील बदलांमुळे भारताचे परराष्ट्र धोरण चार वेगवेगळ्या कालक्रमानुसार अभ्यासले जाऊ शकते. हे चार टप्पे पुढीलप्रमाणे आहेत:-

1. १९४७-१९६४ चा पहिला टप्पा

2. १९६४-६२ पासून दुसरा टप्पा

3. तिसरा टप्पा १९६२ ते ८० च्या दशकाच्या मध्यापर्यंत

जनता सरकार; काँग्रेस**चे** सत्तेत पुनरागमन; परराष्ट्र धोरण

4. १९८० च्या मध्यापासून आजपर्यंतचा चौथा टप्पा.

पहिला टप्पा त्याच्या प्रादेशिक एकत्रीकरणाचा होता. भारताने आपल्या संस्थानांच्या एकत्रीकरणावर लक्ष केंद्रित केले, फाळणीचा आघात आणि दुसरा देश म्हणजे पाकिस्तानची निर्मिती. हैदराबाद आणि काश्मीरशी व्यवहार करणे, पंचशील आणि अलिप्त परराष्ट्र धोरण राखणे ही भारतासाठी मोठी चिंता होती. काश्मीरसाठी भारत-पाकिस्तानच्या परिस्थितीजन्य युद्धामुळे संपूर्ण टप्प्यात आणि नंतरही भारताचा दबाव वाढला.

दुस-या टप्प्यात भारताच्या राजकीय आणि धोरणात्मक जागतिक दृष्टिकोनाची व्याख्या करणे आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि युनियन ऑफ सोव्हिएत सोशलिस्ट रिपब्लिक (यूएसएसआर) च्या नेतृत्वाखालील राष्ट्रांच्या समाजवादी आणि कम्युनिस्ट गटांबद्दलची भूमिका स्पष्ट करणे हे होते.

तिसरा टप्पा हा युद्धाचा काळ होता. भारताने चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशच्या आक्रमणाचा सामना केला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धाने राष्ट्रीय राजकारण आणि समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विविध प्रादेशिक पक्षांच्या हस्तक्षेपाची व्याख्या केली. भारताने आपले परराष्ट्र धोरण टिकवून ठेवण्याचा आणि बळकट करण्याचा सतत प्रयत्न केला परंतु देशाच्या अंतर्गत अशांतता परिस्थितीला त्रास देत राहिली.

चौथ्या टप्प्यात भारताची प्रतिमा एक मजबूत राष्ट्र आणि लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचे समर्थक होते. आशिया आणि आफ्रिकेत अनेक मोठ्या संख्येने राज्ये होती. भारताने स्वतःच्या सामरिक आणि आर्थिक हितासाठी या देशांमध्ये आपला राजकीय प्रभाव कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.

**रौच कार्स्टन (2008) यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे आकृतीबंध सादर केले: -**

श्रीमती गांधी या बाह्य दहशतवादाचा निषेध करणाऱ्या पहिल्या पंतप्रधान होत्या. त्या मोठ्या संदर्भात दक्षिण आशियाच्या नेत्या मानल्या जात होत्या. त्यांनी केवळ राष्ट्रीय सीमेवरच भारताला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला नाही तर बाह्य धोके आणि अशांतता यांच्या विरोधातही प्रयत्न केले. शांतताप्रिय पंतप्रधान म्हणून, परराष्ट्र धोरणाचा शांततापूर्ण वापर राखण्यासाठी त्या अतिशय व्यावहारिक होत्या. परंतु आपण श्रीमती गांधींचा कार्यकाळ आणि भारताचे परराष्ट्र धोरण टिकवून ठेवण्याच्या त्यांच्या भूमिकेची चर्चा करण्यापूर्वी, भारताच्या दरम्यान इतर राजकीय नेत्यांनीही पाहिले ज्यांनी परकीय संदर्भात भारताच्या संबंधांना आकार देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या भूमिकांचाही थोडक्यात अभ्यास करू.

## तुमची प्रगती तपासा

१. भारताच्या परराष्ट्र धोरणातील विविध टप्पे कोणते आहेत. थोडक्यात स्पष्ट करा.

munotes.in

### ७.३.२ नेहरूंनंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण :-

इ.स.१९६४ मध्ये नेहरूंच्या आकस्मिक निधनानंतर लाल बहादूर शास्त्री त्यांचे उत्तराधिकारी झाले. त्यांचा छोटा कार्यकाळ भारताच्या शेजारी देशांशी व्यवहार करण्यावर अधिक केंद्रित होता. इ.स.१९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तानच्या इतिहासातील सर्वात मोठ्या युद्धाचा सामना केला. त्यांच्या कार्यकाळात, भारताने प्रथम उत्तर व्हिएतनामवर अमेरिकेच्या बॉम्बहल्लावर टीका केली. काश्मीरचा प्रश्न येत राहिला. पाकिस्तानने भारताच्या प्रतिक्रियेची चाचणी घेतली आणि एप्रिल १९६५ मध्ये कच्छच्या दलदलीच्या रणावर कब्जा केला. कच्छच्या रणची सीमा अरबी समुद्र आणि गुजरातला लागून आहे. भूप्रदेशाच्या स्वरूपामुळे भारत प्रत्युत्तर देण्यास कचरत होता. ब्रिटनच्या हस्तक्षेपावर परस्पर संमतीने हा वाद आंतरराष्ट्रीय लवादाकडे पाठवण्यात आला. पाकिस्तानने काश्मीर खोऱ्यात प्रशिक्षित घुसखोरांना पाठवून शांतता बिघडवण्याचा प्रयत्न केला. शास्त्री पाकिस्तानच्या वागण्याबाबत सावध होते. त्यांनी लष्कराला युद्धविराम ओलांडून घुसखोर भारतात प्रवेश करत असलेल्या पासेस सील करण्याचे आदेश दिले. पाकिस्तानने १ सप्टेंबर रोजी जम्मू आणि काश्मीरच्या नैऋत्येला असलेल्या छेंब सेक्टरमध्ये भारतावर हल्ला करण्यास सुरुवात केली, जो भारताचा काश्मीरशी एकमेव रस्ता आहे आणि लाहोर आणि सियालकोटच्या सीमा सामायिक केला आहे. यूएसए आणि ब्रिटनने हस्तक्षेप न करण्याचा निर्णय घेतला आणि नियतीला सामोरे जाण्यासाठी त्यांना स्वतःहून सोडले. चीनने भारताला आक्रमक मानले. सोव्हिएत युनियन हा फक्त भारताविषयी सहानुभूती असलेला देश होता. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दोन्ही देशांना युद्धविराम कायम ठेवण्यास सांगितले. २३ सप्टेंबर रोजी ते अंमलात आले आणि युद्ध अनिर्णित होते. पाकिस्तानशी लढा ही भारताच्या लोकशाहीची परीक्षा होती. शास्त्री राष्ट्रीय नायक आणि प्रबळ राजकीय व्यक्तिमत्त्व बनले.

४ जानेवारी १९६६ रोजी शास्त्री आणि पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल अयुब खान यांनी ताश्कंद घोषणेवर स्वाक्षरी करण्यासाठी सोव्हिएत युनियनमधील ताश्कंद येथे भेट घेतली. या घोषणेने दोन्ही पक्षांना सर्व व्यापलेल्या भागातून माघार घेण्यास आणि युद्धपूर्व स्थितीत परत येण्यास सहमती दर्शविली. भारताला ही स्थिती अत्यंत प्रतिकूल वाटली कारण काश्मीरमधील मोक्याच्या मार्गांवरून माघार घेणे ज्याद्वारे पाकिस्तानी घुसखोर काश्मीरमध्ये प्रवेश करू शकतात. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील काश्मीर प्रश्नावर आणि संरक्षण उपकरणांच्या पुरवठ्यावर भारत सोव्हिएत संघाचा पाठिंबा गमावण्याच्या स्थितीत नव्हता. शास्त्री यांनी जड अंतःकरणाने करार स्वीकारला आणि एकोणीस महिन्यांच्या कार्यकाळासाठी भारताचे पंतप्रधान म्हणून १० जानेवारी रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

### तुमची प्रगती तपासा

१. नेहरूंनंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण आणि १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात लाल बहादूर शास्त्री यांची पंतप्रधान म्हणून भूमिका याविषयी चर्चा करा.

### ७.३.३ श्रीमती इंदिरा गांधी कार्यकाळ :-

जनता सरकार; काँग्रेस**चे** सत्तेत पुनरागमन; परराष्ट्र धोरण

श्रीमती गांधी लाल बहादूर शास्त्री यांच्यानंतर पंतप्रधान झाल्या. ती भारतीय राजकारणात दीर्घ काळ टिकून राहिली आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संदर्भात तितकेच सामर्थ्यवान असलेले नेहरूंनंतरचे भारताचे पंतप्रधान मानले. देशाच्या राजकारणाला सामोरे जात असताना, बांगलादेश युद्धावरील तिच्या भूमिकेने तिला 'दुर्गा'चा अवतार दिला. बांगलादेशचा प्रश्न हाताळणे हे भारतासाठी रोलरकोस्टर राईडपेक्षा कमी नव्हते. १९७० मध्ये, डिसेंबरच्या लोकशाही निवडणुकीनंतर, झुल्फिकार अली भुट्टो यांच्या पाकिस्तान पीपल्स पार्टीने (पीपीपी) पश्चिम पाकिस्तानमध्ये विजय मिळवला आणि अवामी लीगने पूर्व पाकिस्तानमध्ये पूर्ण बहुमताने विजय मिळवला. अवामी लीगचे नेते शेख मुजीबुर रहमान होते आणि पाकिस्तानातील लष्करी हुकूमशहा याह्या खान यांनी त्यांना पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून आमंत्रित केले नव्हते. दुसरीकडे त्यांनी लष्करी कायदा लागू केला. शेख रहमानला अटक करून पश्चिम पाकिस्तानात तुरुंगात टाकण्यात आले. पूर्व पाकिस्तानच्या लोकसंख्येने परिस्थितीचा प्रतिकार केला आणि लष्करी हुकूमशाहीच्या विरोधात संप, बंद, दंगलीचे प्रदर्शन केले. जगाच्या इतिहासात सैन्याने जनसामान्यांवर क्रूरपणा केला आणि मानवी हक्कांचे उल्लंघन केले. सामूहिक नरसंहार करण्यात आला. पूर्व पाकिस्तानमध्ये क्रूर अत्याचार आणि वेदनादायक हिंसाचार आणि हिंदूंचा पद्धतशीर नरसंहार नोंदवला गेला. परिणामी १२ दशलक्ष बांगलादेशी, मुस्लिम आणि हिंदू पश्चिम बंगालमध्ये विशेषतः कलकत्ता येथे निर्वासित म्हणून आले. पश्चिम बंगालमध्ये अर्थव्यवस्था आणि शांतता राखण्यासाठी भारताला समस्यांचा सामना करावा लागला. इंदिरा गांधी पूर्व पाकिस्तानच्या शोकांतिका जगाला कळवण्यासाठी पाश्चात्य देशांच्या दौऱ्यावर गेल्या आणि लष्करी हस्तक्षेपासाठी लष्कराला तयार केले. नैसर्गिक परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी लष्कराला हिवाळ्यात हा हस्तक्षेप हवा होता. ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानने हल्ला केला. भारताने आपल्या प्रगल्भ शक्तीने आणि तयारीसह जोरदार हस्तक्षेप केला. त्यामुळे पूर्व पाकिस्तान स्वतंत्र झाला आणि बांगलादेशचा जन्म झाला. ९०००० पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली आणि भारताने युद्ध जिंकले. भारताने पाकिस्तानसोबत शिमला करार केला. या कराराने दोन्ही देशांनी आपले मतभेद शांततापूर्ण मार्गाने सोडवण्याचा प्रस्ताव दिला होता; एकमेकांच्या राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करा. तसेच राष्ट्राची शांतता नि:शस्त्र करणाऱ्या कोणत्याही कृत्यास मदत न करण्याचे प्रोत्साहन दिले. या करारामुळे पाकिस्तानने युद्धात गमावलेला भूभाग परत मिळवला. भारताने युद्धकैद्यांची सुटका केली आणि त्या बदल्यात चांगल्या वागणुकीचे आश्वासन मिळवले. विरोधी पक्ष विशेषतः भारतीय जनता पक्षाने भारताच्या या निर्णयावर टीका केली.

### तुमची प्रगती तपासा

१. १९७१ च्या बांगलादेश युद्धाचे विश्लेषण करा**.**

२. १९७२ च्या शिमला कराराचे प्रमुख मुद्दे कोणते होते ?

या काळात कायम ठेवलेला आणखी एक परकीय संबंध म्हणजे भारत आणि सोव्हिएत-संघ यांच्यात १९७१ मधील शांतता आणि मैत्रीचा भारत-सोव्हिएत करार आणि हा करार लष्करी धोक्याच्या वेळी दोन्ही पक्षांच्या 'तत्काळ परस्पर सल्लामसलत'वर सहमत होता.

भारताने सुरू केलेल्या 'नॉन-अलाइनमेंट' धोरणाचा प्रभावी उपाय आणि स्वीकार करण्याचाही या करारात प्रस्ताव होता. हा करार जागतिक स्तरावर आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी आणि आपल्या शेजारी आक्रमणामुळे भारताला वेळोवेळी सामोरे जाणाऱ्या धोक्याच्या परिस्थितीत सहयोगी शोधण्यासाठी एक मजबूत पाऊल होते.

देशाला एका मोठ्या सत्तेपर्यंत घेऊन जाण्याच्या दृढ निश्चयामुळे श्रीमती गांधींनी भारताच्या इतिहासात आपले शौर्य पुन्हा सिद्ध केले. १९७४ मध्ये पोखरणमध्ये अणुचाचणीचे आयोजन हे एक मोठे यश होते. चीनने ऑक्टोबर १९६४ मध्ये चाचणी घेतल्यावर भारतावर अणुचाचण्या घेण्याचा सतत दबाव होता. षष्ठी अनिर्णित होती परंतु त्यांचे परराष्ट्र मंत्री स्वरण सिंग यांनी अणुचाचणी घेण्याच्या कल्पनेला अनुकूलता दर्शवली. भारताने १९६४ मध्ये अणुऊर्जा आयोगाला बॉम्ब डिझाइनवर काम करण्यासाठी अधिकृत केले. भारताने आपली आण्विक क्षमता सिद्ध करण्यासाठी ही चाचणी घेतली आणि तो शांततापूर्ण अणुस्फोट असल्याचा दावा केला. अणुचाचणी घेण्याचे पाऊल मुळात भारताला तिच्या सुरक्षिततेसाठी आणि जागतिक देशांच्या नेत्यांच्या दबावाला प्रतिसाद देण्यासाठी एक स्वावलंबी राष्ट्र म्हणून प्रक्षेपित करण्यासाठी होते.

भारतातील आणीबाणीनंतरच्या निवडणुकीदरम्यान, श्रीमती गांधी सत्तेबाहेर होत्या आणि भारताचे पंतप्रधान म्हणून मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता सरकार भारताचे नेते बनले. १९७९ मध्ये श्री चरण सिंग सहा महिन्यांच्या कार्यकाळासाठी त्यांच्यानंतर आले. जानेवारी १९७९ मध्ये श्रीमती गांधी पुन्हा सत्तेवर आल्या. गैर-काँग्रेस पक्षाच्या अल्प कार्यकाळात, भारताच्या परराष्ट्र धोरणात लक्षणीय विकास झाला नाही. डिसेंबर १९७९ मध्ये राष्ट्र निवडणूक प्रक्रियेला सामोरे जात असताना १९७९ मध्ये घडलेली एक मोठी परराष्ट्र धोरणाची घटना. अफगाणिस्तानमध्ये सोव्हिएत युनियनचा लष्करी हस्तक्षेप, आणि भारताने आपले सैन्य निरपेक्ष देशाकडे माघारी घेण्याचा सल्ला नाकारणे हे सोव्हिएत युनियनचे चित्रण आहे. भारताला धोका' अफगाणिस्तानमध्ये सोव्हिएत युनियनच्या लष्करी हस्तक्षेपाला उत्तर म्हणून व्हिएतनाममध्ये बॉम्बफेक करण्यासाठी रशियनांना अफगाणिस्तानातून बाहेर काढण्यासाठी अमेरिकेने भारताला पाठिंबा देण्यास सांगितले. सोव्हिएत विरुद्ध अमेरिकेला सहकार्य करण्याचे भारताला मान्य झाले नाही. भारताला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन समर्थनासाठी पाकिस्तानकडे गेले. पाकिस्तानने अमेरिकेला पाठिंबा दिला आणि अफगाण गनिमांना (मुजाहिदीन) शस्त्रे पाठवली. पाकिस्तानला ७.४ अब्ज डॉलरचे लष्करी आणि आर्थिक मदत पॅकेज मिळाले. यामुळे देशात आणि धर्माच्या नावाखाली आणखी अराजकता निर्माण झाली होती.

**तुमची प्रगती तपासा**

१. १९६४-१९८४ या कालावधीत परराष्ट्र धोरणात भारताची प्रमुख कामगिरी काय होती ?

## ७.४ सारांश

भारताने राजकारण आणि परराष्ट्र धोरणात नाट्यमय बदल पाहिले. 1964-1984 हा काळ मुख्यत्वे राजकारण आणि राष्ट्रातील एका व्यक्तीच्या शासनावर आधारित होता आणि त्या

श्रीमती इंदिरा गांधी होत्या. बिपीन चंद्र यांनी त्यांच्या पुस्तकात मूल्यमापन करताना ती एक गुंतागुंतीची व्यक्ती असल्याचे मान्य केले आहे. एकीकडे ती भोळी, साधी आणि सरळ होती, दुसरीकडे ती अप्रत्याशित आणि गुंतागुंतीची होती. तिच्या जवळपास 16 वर्षांच्या सत्तेत तिने उल्लेखनीय योगदान दिले आहे, तिच्या राजकीय आणि व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टिकोनातील विरोधाभास आहेत. भारताच्या राजकारणातील आव्हानांनी जगाला हादरवून सोडले. अनेक आव्हाने भारताने खंबीरपणे आणि ठामपणे हाताळली. भारतीय राजकारणात जनता सरकारचा प्रवेश हा काही अचानक किंवा तात्पुरता टप्पा नव्हता. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आणि भारतीय राज्यघटनेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी हा भारतातील नागरिकांचा प्रतिसाद होता. आणीबाणीची घोषणा आणि भारतीय अधिकार जप्त करणे याला जनसामान्य कार्यक्रमाने दाद दिली नाही, जरी श्रीमती गांधींचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व अतिशय आकर्षक आणि कौतुकास्पद होते. काँग्रेसने पुनरुज्जीवन केले आणि आपली चूक काही प्रमाणात सुधारली. जनता सरकारच्या ढासळत्या स्थितीने त्यांना पुन्हा सत्तेपासून दूर केले आणि श्रीमती गांधींना पुन्हा सत्तेवर बसवले. तथापि, श्रीमती गांधींचा दुसरा टप्पा अल्पायुषी ठरला आणि धर्माच्या नावाखाली प्रादेशिक राजकारण आणि कट्टरता यांना तोंड देण्यासाठी त्यांना देशात कठोर निर्णय घेण्यास भाग पाडले.

जनता सरकार; काँग्रेस**चे** सत्तेत पुनरागमन; परराष्ट्र धोरण

भारताने आपली लोकशाही तत्त्वे आणि जागतिक स्तरावरील शाश्वत स्थान जतन करण्याचाही आपल्या अलाइनमेंट धोरणाद्वारे प्रयत्न केला. जगामध्ये शांतता प्रस्थापित करणे आणि स्वतःच्या अस्थिर परिस्थितीमुळे इतर कोणत्याही राष्ट्राच्या आकांक्षांमध्ये सहभागी न होणे हे भारताचे अलाइनमेंट धोरण होते. प्रचंड विविधता आणि शक्ती असूनही, भारत एकसंध देश राहिला आणि त्याने सर्व प्रतिकूल परिस्थितींना धैर्याने आणि धैर्याने सामोरे गेले. भारताने केवळ आपल्या परदेशी मित्र राष्ट्रांसोबत चांगले किंवा तटस्थ संबंध राखले नाहीत तर बाह्य धोके आणि लष्करी धमक्या, आक्रमणे आणि अंतर्गत राजकीय आव्हाने यांच्यावर दबाव असतानाही आपल्या प्रादेशिक अखंडतेचे रक्षण केले.

## ७.५ निष्कर्ष

परराष्ट्र धोरणात प्रतिनिधित्व करणारे भारताचे राजकारण आणि जगाचे राजकारण आव्हानांनी भरलेले आणि गुंतागुंतीचे होते. काँग्रेस सत्तेचा पराभव, जनता सरकारचा प्रवेश, काँग्रेस सरकार पुन्हा सत्तेवर येणे आणि भक्कम आणि तटस्थ परराष्ट्र धोरण राखणे हे सोपे काम नव्हते. १९६४-१९८४ CE च्या टप्प्यात अनेक राजकीय नेत्यांचे मोठे परिवर्तन देखील दिसून आले ज्यांनी या कार्यकाळात आश्वासक शासन बजावले परंतु नंतर ते राजकीय नेते बनले. इंदिरा १.० आणि इंदिरा २.० या दोन भिन्न व्यक्तिमत्त्वे होत्या. श्रीमती गांधी १९६६-१९७७ CE च्या त्यांच्या नेतृत्वाच्या पहिल्या टप्प्यात अधीन, सावध, शांत आणि संयमशील होत्या परंतु १९८०-१९८४ CE पासून त्यांच्या दुसऱ्या टप्प्यात त्या अधिक धैर्यवान, धाडसी आणि चतुर राजकारणी होत्या. पण दोन्ही टप्प्यात तिने प्रशासनाला तत्परतेने सामोरे गेले.

भारताच्या परराष्ट्र धोरणात अनेक घटकांमुळे अनेक बदल झाले. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय वातावरण, अमेरिका आणि यूएसएसआर बरोबरचे संबंध, पाकिस्तानचे सतत आक्रमण, भारत-चीन युद्ध इत्यादींमुळे हे बदल घडले. देशांतर्गत बदल आणि युती

सरकारच्या प्रवेशाने देखील स्वतःचे दृष्टीकोन तयार केले. असे म्हटल्यावर भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्त्वे शुद्ध, व्यावहारिक आणि समर्पक होती हे कोणीही नाकारणार नाही. भारताने कोणत्याही परकीय देशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्यासाठी कधीही नाही म्हटले नाही, तथापि, हे अगदी स्पष्ट होते की भारत कोणत्याही देशाचा योग्य विचार आणि स्वतःचा प्रतिसाद न घेता प्रार्थना आणि समर्थन करणार नाही.

## ७.६ प्रश्न

१. आणीबाणीनंतरचे राजकारण स्पष्ट करा.

२. जनता सरकार आणि शाह आयोगाची नियुक्ती संदर्भात सविस्तर माहीती लिहा.

३. काँग्रेसचे सत्तेत पुनरागमन आणि श्रीमती इंदिरा गांधींची भूमिका स्पष्ट करा.

४. इ.स.१९६४ ते इ.स.१९८४ या कालावधीतील भारताचे परराष्ट्र धोरण स्पष्ट करा.

५. नेहरु नंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण स्पष्ट करा.

## ७.७ संदर्भ

१) इंडिया सिन्स इंडिपेंडन्स-बिपीन चंद्र

२) भारत के प्रधानमंत्री -भगवतीशरण मिश्रा.

३) स्वातंत्र्योत्तर भारत-प्रचार्य य. ना. कदम, प्रा. डॉ. रुण भोसले

४) भारतीय शासन आणि राजकारण-बी. बी. पाटील.

५) 5. Minoo Masani, Is J.P. The Answer, Delhi, 1975.

६) 6. C.P. Bhambari, the Janata Party: A Profile, New Delhi, 1980.

७) 7. Inder Malhotra, Indira Gandhi: A Personal and Political Biography, London 1989.

८) 8. Popular Jaykar, Indira Gandhi -A Biography, London 1975.

९) 9. Mondel Saptarshi. Rethinking Indira Gandhi's Foreign Policy: Peace and Pragmatism. International Journal of Research on Social and Natural Sciences Vol. VI Issue 2 Dec 2021 ISSN (Online) 2455-5916.

१०) 10. Rauch Carsten. Phases of Indian foreign policy since independence. Peace Research Frankfurt Jstor (2008).

११) 11. Karlekar Hiranmay (ed), Independent India: The First Fifty Years. Indian Council of Cultural Relations (1998).

❖❖❖❖

munotes.in

# ८

# राजकीय विकास

**घटक रचना :**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ भारतात लोकशाहीची वाटचाल

८.३ प्रादेशिक राजकारण

८.३.१ प्रादेशिकता म्हणजे काय

८.३.२ प्रादेशिक राजकारणाचे परिणाम

८.४ फुटीरतावादी चळवळ

८.४.१ तेलंगणा विरुद्ध आंध्र प्रदेश

८.४.२ आसाम

८.४.३ पंजाब

८.४.४ जम्मू आणि काश्मिर

८.५ जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता

८.६ सारांश

८.७ प्रश्न

८.८ संदर्भ


## ८.० उद्दिष्टे

या घटकांमध्ये आपण :

१. भारतातील लोकशाहीची वाटचाल समजून घेता येईल.

२. प्रादेशिक राजकारण समजून घेता येईल.

३. फुटीरतावादी चळवळ समजून घेता येईल.

## ८.१ प्रस्तावना

२६ जानेवारी १९५० पासून भारत प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र म्हणून उदयास आले. त्या अगोदर भारतावर ब्रिटिशांची सत्ता होती. ब्रिटिशांनी प्रशासन राबवत असताना कायद्याचा आधार घेतलेला होता. सुरुवातीला गव्हर्नर जनरलच्या मदतीसाठी काही व्यक्तींची नियुक्ती केली जात असे. या व्यक्तींच्या मदतीने गव्हर्नर प्रशासनाच्या संदर्भात निर्णय घेत असे. परंतु एखाद्या निर्णयासंदर्भात वाद निर्माण झाल्यास बहुमताच्या आधारे निर्णय घेतल्या जात असे. यामध्ये आपल्याला भारतीय लोकशाहीची बीजे दिसून येतात. भारतीयांमध्ये आधुनिक शिक्षणामुळे जनजागृती झाल्यानंतर लोकशाही सारख्या आधुनिक संस्था आणि कायद्याचे राज्य यांची ओळख भारतीयांना झाली. भारतीय नेत्यांनी प्रशासनामध्ये आपला भारतीयांचा सहभाग असावा म्हणून ब्रिटिश सरकारकडे वेळोवेळी त्यासंबंधी मागण्या केल्या. त्याचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी भारतीयांना टप्प्याटप्प्याने प्रशासनामध्ये सहभागी करून घेण्यासाठी वेळोवेळी घटनात्मक सुधारणांचा हप्ता दिला. त्यातूनच ब्रिटिश काळात अनेक कायदे निर्माण झाले. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना स्वतंत्र भारताचे संविधान स्वतः भारतीयांनी तयार करावे म्हणून ब्रिटिश सरकारने घटना समितीच्या निवडणुका घेतल्या. या घटना समितीने स्वतंत्र भारतासाठी प्रदीर्घ आणि लिखित संविधान तयार केले. जगामध्ये जिथे जिथे जे काही चांगले असेल त्याचा अंतर्भाव आपल्या या घटनेमध्ये करण्यात आला आणि २६ जानेवारी १९५० पासून ही राज्यघटना लागू करण्यात आली. या राज्यघटनेच्या आधारे भारतामध्ये लोकशाहीची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. असे असले तरी ब्रिटिशांच्या वसाहतवादाने निर्माण केलेली आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असमतोल यामुळे प्रादेशिक राजकारणाला स्वातंत्र्यानंतर गती मिळाली. त्यातूनच प्रादेशिक निष्ठा वाढीस लागून राज्याराज्यांमध्ये संघर्ष उभे राहिले. त्यावर बऱ्याच अंशी मात करून देखील कालांतराने फुटीरतावादी चळवळी उभ्या राहिल्या. या जातीयवादी चळवळींमुळे भारताच्या एकतेला व अखंडतेला धोका निर्माण झाला होता. परंतु तत्कालीन नेतृत्वाने कधी चर्चेच्या माध्यमातून तर कधी बळाचा वापर करून भारताला या धोक्यापासून वाचवले. आजही बऱ्याच ठिकाणी हे जातीय आणि आर्थिक संघर्ष अधून मधून डोके वर काढत असतात.

## ८.२ भारतात लोकशाहीची वाटचाल

लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालवलेले सरकार आहे. लोकशाहीत दोन प्रकार आहेत प्रत्यक्ष लोकशाही आणि प्रातिनिधिक लोकशाही. प्रत्यक्ष लोकशाहीत सार्वजनिक निर्णय घेण्यासाठी नागरिक थेट जबाबदार असतात. अशी लोकशाही लोकांच्या छोट्या गटासाठी शक्य आह. पण जेव्हा भारतासारखी लोकसंख्या मोठी असते तेव्हा प्रातिनिधिक लोकशाही हाच योग्य उपाय आहे. नागरिक त्यांच्या मतदानाच्या अधिकाराद्वारे, त्यांच्या मतदारसंघात किंवा परिसरात त्यांचे प्रतिनिधी निवडतात. भारतात प्रातिनिधिक लोकशाही सर्व स्तरांवर लागू केली जाते. ज्यामध्ये लोक पंचायत, नगरपालिका मंडळे, राज्य विधानसभा आणि संसदेत त्यांचे प्रतिनिधी

निवडतात. परंतु लोकशाही अधिकारांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आणि देशाच्या विकासासाठी, लोकांनी अधिक नियमितपणे निर्णय घेण्यामध्ये सहभाग घेतला पाहिजे. सहभागी लोकशाहीमध्ये समूह किंवा समुदायाचे प्रमुख निर्णय घेण्यासाठी एकत्रितपणे सहभागी होतात. भारतीय राज्यघटना सामाजिक न्याय मिळण्याच्या उद्देशाने जी हमी देते त्यातून देशाची जटिलता आणि बहुलता प्रतिबिंबित होते. भारताचा मूलभूत आदर्श त्याच्या संविधानातून येतो. संविधानात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार कायदे केले जातात. हे कायदे राज्यघटनेने निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांद्वारे लागू केले जातात. सर्वोच्च न्यायालय हे राज्यघटनेचे सर्वोच्च व्याख्याते आहे. जर आपण राज्यघटना, त्यातील कृती आणि वेळोवेळी केलेल्या सुधारणांचे बारकाईने निरीक्षण केले, तर भारतीय नागरिकांचे लोकशाही हक्क चांगल्या प्रकारे जपले जातात आणि संविधानाची रचना करताना राष्ट्राची जटिलता आणि बहुलता यांचाही विचार केला जातो. तथापि, विशेषत: जात, समुदाय आणि लिंगावर आधारित असमानतेचा दीर्घ इतिहास असलेल्या भारतासारख्या जटिल समाजात लोकशाहीची प्रक्रिया राबविने सोपी गोष्ट नाही. स्वातंत्र्यानंतर लगेचच लोकशाही कार्यान्वित करण्यासाठी भारत सरकारने जे प्रयत्न केले ते विलक्षण आहेत हे सत्य नाकारता येत नाही. पंचायती राज, महिला आरक्षण, आदिवासी हक्क, अनुसूचित जाती-जमाती कायदा, पाणी, शिक्षण आणि इतर अनेक क्षेत्रांतील वाद हाताळणे आणि मूलभूत कर्तव्यांच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी कायद्याची निर्मिती करणे यातून सरकारची काम करण्याची जिद्द दिसून आली.

वर नमूद केल्याप्रमाणे भारतात प्रातिनिधिक लोकशाही आहे आणि जनतेचा आवाज राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या निवडून आलेल्या लोकांद्वारे ऐकला जातो. राजकीय पक्षाचे उद्दिष्ट सरकारी शक्ती प्राप्त करणे आणि विशिष्ट कार्यक्रमाचा पाठपुरावा करण्यासाठी त्या शक्तीचा वापर करणे आहे. राजकीय पक्ष हे सामाजिक आकलन आणि ते कसे असावे यावर आधारित असतात. जे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधित्वानुसार वेगवेगळ्या गटांच्या हिताचे प्रतिनिधित्व करतात. राजकीय पक्षांना प्रभावित करण्यासाठी वेगवेगळे हितसंबंध काम करतात. जर त्यांचे हितसंबंध पूर्ण झाले नाही, तर ते राजकारणात विशिष्ट संबंध जोपासण्यासाठी दुसरा राजकीय पक्ष किंवा दबाव गट तयार करतात. प्रत्येक प्रदेशाच्या स्वतःच्या गरजा आणि आकांक्षा असतात. प्रादेशिक राजकीय पक्ष आपापल्या प्रदेशाचा आवाज उठवतात. तथापि, प्रादेशिक राजकारण कधीकधी गुंतागुंतीची परिस्थिती आणते. त्यातूनच प्रादेशिक राजकारण आणि भारतातील फुटीरतावादी चळवळींच्या उदय झालेला दिसून येतो.

## ८.३ प्रादेशिक राजकारण

### ८.३.१ प्रादेशिकता म्हणजे काय :

प्रसिद्ध इतिहासकार बिपीनचंद्र यांनी प्रादेशिकते संबंधी स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यांच्यामते, "भारतीय संघराज्याच्या अंतर्गत व्यवहारीक कारणांच्या आधारे एखाद्या राज्याची मागणी करने किंवा अस्तित्वात असलेल्या राज्याच्या अंतर्गत स्वायत्त प्रदेशाची मागणी करणे याला आपण तोपर्यंत प्रादेशिकता म्हणू शकत नाही जोपर्यंत याला एखाद्या

राज्याच्या उर्वरित जनते विरुद्ध शत्रुतापूर्ण भावनेने समोर आणले जात नाही. जेव्हा एखादे राज्य किंवा प्रदेश आपल्या हितसंबंधांसाठी पूर्ण देश किंवा एखाद्या राज्याविरुद्ध संघर्षाला प्रोत्साहित करतो तेव्हा त्याला प्रादेशिकतावाद म्हटले जाते." (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र :१६६)

भारतातील प्रादेशिकता ओळखण्यासाठी रशीद उद्दी खान यांनी खालील प्रमाणे कसोट्या सांगितल्या आहे. जास्तीत जास्त एकजिनसीपणा आणि जास्तीत जास्त वेगळेपण हा त्याचा आधार आहे. यात बोलीभाषा, सामाजिक रचना, वांशिक गट, लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये, भौगोलिक संलग्नता, सांस्कृतिक नमुना, अर्थव्यवस्था आणि आर्थिक जीवन, ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय पार्श्वभूमी, आणि मानसशास्त्रीय जाणीव यांचा समावेश होतो. प्रादेशिकता ही विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील लोकांची ओळख आणि उद्देशाची सामान्य भावना म्हणून व्यक्त केली जाते. ही लोकांना एकत्र आणून त्यांच्यात बंधुत्व आणि निष्ठेची भावना निर्माण करते. तथापि राष्ट्राच्या उद्दिष्टांविरुद्ध एखाद्या प्रदेशाच्या अत्यधिक आसक्तीमुळे देशाचे अस्तित्व, एकता आणि अखंडतेला मोठा धोका निर्माण होतो. प्रादेशिकतेचे राजकारण भारतात नवीन नाही. त्याची मुळे वसाहतवादी धोरणांच्या काळात खोलवर रुजलेली आहे. ब्रिटिश सरकारने विविध राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिलेली भिन्न मानसिकता, दृष्टिकोण आणि अनुकूलता यातून स्वतंत्र अस्मितेची बीजे रोवल्या गेली. जातीच्या आधारावर अनेक राजकीय पक्षांचा उदय हे त्याचे द्योतक होते. ब्रिटिशांच्या वसाहतवादी आर्थिक धोरणामुळे काही प्रदेशांकडे दुर्लक्ष झाले. ज्यामुळे आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असमतोल यांना चालना मिळाली. १९४० च्या दशकात डीएमके यांनी उभारलेली ब्राह्मणेतर द्रविड चळवळ पुढे स्वतंत्र तमिळ राज्याच्या मागणी मध्ये परावर्तित झाली. परिणामी आंध्र प्रदेशामध्ये तेलगू देशम पक्षाने वेगळ्या राज्याची मागणी केली. १९५० आणि १९६० च्या दशकामध्ये वेगळ्या राज्यांच्या मागणीसाठी मोठ्या प्रम हिंसक स्वरूपाचे आंदोलने झाली. राज्य पुनर्रचनेच्या अभ्यासादरम्यान भाषिक आयोगाने भाषेच्या आधारे वेगळ्या राज्यांच्या लोकांच्या मागण्या कशा पूर्ण केल्या हे आपण पाहिले आहे. अशाप्रकारे अनेक राज्यांच्या निर्मितीने भारतात राजकीय प्रादेशिकवादाचा उद्रेक झाला. १९७० आणि १९८०च्या दशकात प्रादेशिकतेच्या आधारे अनेक राज्य निर्मितीचे कायदे केले गेले.२००० च्या दशकामध्ये प्रादेशिक वंचिततेच्या भावनेमुळे मध्य प्रदेशातून छत्तीसगड, बिहार मधून झारखंड आणि उत्तर प्रदेशातून उत्तराखंड या तीन नवीन राज्यांची निर्मिती करण्यात आली. अशाच प्रकारे २०१४ मध्ये आंध्र प्रदेशातून तेलंगणा वेगळे करण्यात आले.

### ८.३.२ प्रादेशिक राजकारणाचे परिणाम :

प्रादेशिक राजकारणाचे पुढील प्रमाणे परिणाम झाले .

१. अनेक प्रादेशिक पक्षांचा उदय झाला.

२. प्रादेशिक समस्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची जनतेला सवय झाली.

३. प्रादेशिकतेच्या अत्याधिक स्वरूपामुळे फुटीरतावादी चळवळी वाढल्या ज्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण झाला. त्याचेच द्योतक म्हणजे काश्मिरी दहशतवादी, तेलंगणा चळवळ व पंजाब मधील फुटीरतावादी चळवळ होय.

## ८.४ फुटीरतावादी चळवळ

आपण या अगोदर बघितल्या प्रमाणे भारतामध्ये कशाप्रकारे नवीन भाषावार राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यातून प्रादेशिकवादाला नवे धुमारे फुटत गेले. त्याचे रूपांतर पुढे चालून आक्रमक आणि हिंसक फुटीरतावादी चळवळी मध्ये कसे झाले यासंबंधी उदाहरणा दाखल काही राज्यांतील परिस्थितीचा आपण आता आढावा घेणार आहोत.

### ८.४.१ तेलंगणा विरुद्ध आंध्र प्रदेश :

आंध्र प्रदेशामध्ये एकच भाषा आणि संस्कृती असून देखील विकासातील असमानता आणि आर्थिक संधी मधील विषमता यावर आधारित उपप्रादेशिक आणि राजनितिक संघर्ष उदयाला आला होता. १९५३ मध्ये आंध्र प्रदेश राज्याची स्थापना करण्यात आली आणि १९५६मध्ये हैदराबाद मधील तेलगु भाषिक प्रदेश आंध्र प्रदेशमध्ये सामील करण्यात आला. भाषावार राज्यनिर्मितीमुळे तेलगु लोकांचा सांस्कृतिक, राजनीतिक आणि आर्थिक विक होईल ही त्यामागची धारणा होती. परंतु तेलंगणा हा निजामाच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे अत्याधिक अविकसित होता. आंध्र क्षेत्रातील लोकांचे राजकारण आणि प्रशासन यामध्ये वर्चस्व असल्याने आंध्र सरकार तेलंगणाच्या विकासाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करते. त्यामुळे तेलंगणाचा आर्थिक विकास खुंटला आहे अशी भावना तेलंगणातील जनतेची होती. तेलंगणाचा जलदगतीने विकास व्हावा म्हणून १९६९मध्ये वेगळ्या तेलंगणा राज्यासाठी आंदोलन उभे राहिले. सरकारी नोकऱ्यांमधील पक्षपात आणि तेलंगणा मधील वाढती बेरोजगारी हा या आंदोलनाचा मुख्य आधार होता. १९१८ मध्ये हैदराबादच्या सरकारने असा नियम केला होता की, सर्व प्रशासनिक नोकऱ्यांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य दिले जाईल.१९५६ मध्ये तेलंगणाचे आंध्रामध्ये विलीनीकरण केले तेव्हा तेथील नेत्यांमध्ये असा करार झाला होता की हा नियम पुढेही चालू राहील आणि हैदराबादमधील उस्मानिया विद्यापीठासमवेत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये तेलंगणामधील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल. परंतु तेलंगणा मधील लोकांचे असे म्हणणे होते की आंध्र सरकार जाणून बुजून या नियमाकडे दुर्लक्ष करत आहे. १९६८ च्या शेवटी उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थी नोकऱ्यांमधील भेदभावाच्या प्रश्नावर संपावर गेले. लवकरच हे आंदोलन तेलंगणाच्या इतर भागात पसरले. त्यामध्ये १९६९ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने तेल ओतण्याचे काम केले. कारण न्यायालयाने १९५६ मधील कराराला घटनाबाह्य म्हणून घोषित केले. या आंदोलनाला सरकारी कर्मचारी, शिक्षक, वकील, व्यापारी आणि इतर मध्यमवर्गाने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. (आजादी के बाद का भारत ; बिपिन चंद्र : ४०३)

वेगळ्या तेलंगणा राज्याच्या मागणीसाठी संघटितपणे आंदोलन चालवण्यासाठी तेलंगणा प्रजा समितीची (टी पी एस ) स्थापना करण्यात आली. यामध्ये काँग्रेसमधील असंतुष्ट नेतेही सामील झाले. प्रमुख राष्ट्रीय पक्षांनी आणि साम्यवादी पक्षांनी या मागणीचा विरोध

केला. तर स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशालिस्ट पार्टी आणि जनसंघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी या मागणीला समर्थन दिले. परंतु इंदिरा गांधी आणि काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने या मागणीला सक्त विरोध करून आंध्र सरकारला तेलंगणाच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची सूचना केली. त्यामुळे १९६९ च्या अखेरीस या संघर्षाचा शेवट झाला. तरीही १९७१च्या निवडणुकांमध्ये टीपीएस ने तेलंगणातील १४ पैकी १० जागांवर विजय मिळवला. निवडणुकांनंतर केंद्र सरकारने एक करार करून १९५६ चा करार तसाच पुढे चालू ठेवण्यासंदर्भात निर्णय घेतला आणि तेलंगणाच्या विकासासाठी तेलंगणा क्षेत्रिय समितीच्या स्थापनेची घोषणा केली. त्यामुळे नाराज असलेल्या मध्यमवर्गीयांचे बऱ्याच प्रमाणात समाधान झाले. मुख्यमंत्री ब्रह्मानंद रेड्डी यांच्या जागी तेलंगणातील पी व्ही नरसिंहराव यांची नियुक्ती केली आणि सप्टेंबर १९७१ मध्ये टीपीएस कॉंग्रेसमध्ये विलीन झाली.

वरील व्यवस्थेमुळे तेलंगणातील जनतेचे समाधान तर झाले परंतु आंध्र क्षेत्रातील जनतेमध्ये यामुळे असंतोष निर्माण झाला. त्यांच्या मते १९५६ चा मुलकी प्राधान्याचा नियम क संशोधित केला तरी सरकारी नोकऱ्यांमध्ये आंध्र क्षेत्रातील जनतेला मोठ्या प्रमाणात प्रभावित करेल. अशातच १९७२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्राधान्यक्रम नियमाला चालू ठेवण्यास मान्यता दिल्यामुळे हा असंतोष संघर्षाच्या रूपात पुढे आला. तेलंगणा प्रमाणेच आंध्रमधील विद्यार्थ्यांनी आणि अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी संप आणि प्रदर्शन करण्यास सुरुवात केली. त्यांचे म्हणणे होते की, आंध्र प्रदेशचे सरकार नोकऱ्यांमध्ये पक्षपात क आहेत, कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध भेदभाव करत आहे, डॉक्टरांचे असे म्हणणे होते की आरोग्याचा निधी हैदराबाद शहराकडे वळवल्या जात आहे, वकिलांना आंध्र क्षेत्रामध्ये वेगळे उच्च न्यायालय पाहिजे होते, व्यापारी लोक प्रस्तावित शहरी संपत्ती हदबंदी विधेयकाचा विरोध करत होते, त्याचे मोठे जमीनदार आणि श्रीमंत शेतकरी समर्थन करीत होते.

पंतप्रधानांनी परत एकदा २७ नोव्हेंबर १९७२ रोजी करार करून १९५६ च्या मुलकी सेवा नियमांमध्ये संशोधन करून हा नियम हैदराबाद शहरा करीता १९७७ पर्यंत आणि उर्वरित तेलंगाना क्षेत्रा साठी १९८० पर्यंत लागू राहील असे घोषित केले. या कराराला आंध्र क्षेत्रातील जनतेने तेलंगणाच्या पक्षातील मानून आंदोलन अधिक तीव्र केले. अराजपत्रीत कर्मचारी अनिश्चित काळासाठी संपावर गेले. त्यांनी स्वतंत्र पार्टी, जनसंघ आणि काही अपक्ष नेत्यांद्वारे प्रोत्साहित होऊन वेगळ्या राज्याची मागणी पुढे केली. त्यांचे हे आंदोलन आता तेलंगणाच्या बरोबरच केंद्र सरकारच्या देखील विरोधात होते. काँग्रेसमधील काही नेत्यांचे याला समर्थन होते. परंतु साम्यवादी पक्ष आणि किसान सभा यांनी या मागणीला जोरदार विरोध केला. इंदिरा गांधींनी आंध्र जनतेच्या वेगळ्या राज्याच्या मागणीला कडाडून विरोध करत संयुक्त आंध्रप्रदेशचे समर्थन केले. २१ डिसेंबर १९७२ मध्ये मुलकी नियम विधे लोकसभेमध्ये पारित करून १७ जानेवारी १९७३ला नरसिंहराव सरकार बरखास्त केले व आंध्रप्रदेश मध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली. त्यामुळे हळूहळू या संघर्षावर नियंत्रण मिळवून सप्टेंबर मध्ये केंद्र सरकारने सहासुत्री कार्यक्रम तयार केला. ज्यानुसार १९५६ चा मुल्की नियम समाप्त करून

राज्याच्या सर्व प्रादेशिक विभागांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याचे प्रावधान केले गेले. घटनेमध्ये ३२ वी दुरुस्ती करून हा कार्यक्रम लागू केला. ज्यामुळे अधिकांश काँग्रेस नेते संतुष्ट झाले. डिसेंबर १९७३ मध्ये राष्ट्रपती राजवट हटवण्यात आली आणि सर्वसंमतीने मुख्यमंत्री बनलेले वेंगल राव यांना हा फार्मूला लागू करण्यास सांगण्यात आले. परिणामी आंध्रप्रदेशच्या दोन्ही प्रादेशिक विभागातील वेगळ्या राज्याची मागणी समाप्त झाली तथापि नंतर बीजेपी ने याला आपला कार्यक्रम बनवले. (आजादी के बाद का भारत ; बिपिन चंद्र : ४०६ )

तेलंगणा आणि आंध्र क्षेत्रातील जनतेच्या वेगळ्या राज्याची मागणी केंद्र सरकारने फेटाळून लावली कारण इतर ठिकाणीही अशीच मागणी होण्याची शक्यता होती. परंतु या दोन्ही क्षेत्रातील मागण्या मान्य करण्यास वाव होता कारण यांच्या मागण्या जातीयवादी आणि सांस्कृतिक नसून आर्थिक स्वरूपाच्या होत्या. या संघर्षामधून एक गोष्ट शिकायला मिळाली ती म्हणजे दोन वेगळ्या राज्यातील नव्हे तर एकाच राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील आर्थिक विषमता दूर करून संपूर्ण राज्याचा एकत्रित विकास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर हे ही माहीत झाले की केवळ भाषेच्या आणि सांस्कृतिकतेच्या आधारावर जनतेमध्ये ऐक्य भावना निर्माण होऊ शकत नाही.

**८.४.२ आसाम :**

आसामी लोकसंख्येच्या दृष्टीने एक छोटेसे राज्य आहे. येथील जनतेला आपल्या आसाम ओळख कमी होण्याच्या किंवा पुसून जाण्याच्या भीतीने बऱ्याच वर्षापासून घेरले आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहे:

१. आसामी लोकांचे म्हणणे आहे की, केंद्र सरकारने आसाम वर नेहमीच भेदभावपूर्ण नीतीचा अवलंब केला आहे. केंद्रीय निधी वाटपात आणि औद्योगिक व आर्थिक विभाग यांचे स्थान निर्धारित करताना हा भेदभाव प्रकर्षाने दिसून येतो. आसाम मधील कच्चे तेल, चहा आणि प्लायवुड उद्योगांमधून प्राप्त होणारे कराच्या स्वरूपातील उत्पन्नापासून आसामला वंचित केले आहे. त्यांचे म्हणणे होते की, आसाम मधील उत्पादनातून देशातील इतर भागाचा विकास केला जातो. त्याचप्रमाणे आसाममधील चहा, प्लायवुड आणि इतर वस्तूंचे उत्पादन आणि विक्री व्यवहारावर बाहेरून आलेल्या लोकांचा विशेषतः मारवाडी आणि बंगाली लोकांचा कब्जा आहे आणि या उद्योगातील मजूरही अधिकांश गैरअसामी आहे. त्यामुळे त्यांनी अशा मागण्या केले की चहा आणि प्लायवूड उद्योगातून निर्माण होणारे कर स्वरूपातील उत्पन्नामध्ये असामला अधिक हिस्सा देण्यात यावा, तेलातील रॉयल्टी वाढवण्यात यावी, केंद्राची आर्थिक सहायता आणि योजना वाढविण्यात याव्या, आसाम मध्ये तेलाचे कारखाने उभारण्यात यावे, आसामला इतर भारताबरोबर रेल्वेद्वारे चांगल्या प्रकारे जोडण्यात यावे आणि राज्य व केंद्र सरकार मधील शासकीय सेवांमध्ये आसामी लोकांना जास्तीच्या संधी दिल्या जाव्यात."

२. वसाहतिक कालखंडामध्येच नाही तर स्वातंत्र्यानंतरही आसाममध्ये गेलेल्या बंगाली लोकांनी शासकीय नोकऱ्या, शैक्षणिक संस्था आणि आधुनिक व्यवसाय यामध्ये वर्चस्व निर्माण केलेले आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्यामुळे आसामी युवक बंगाली युवकांशी

स्पर्धा करू शकत नव्हते. त्यामुळे आसामी भाषी लोकांमध्ये अशी भावना निर्माण झाली की, शिक्षण आणि मध्यमवर्गीय नोकऱ्यांमध्ये बंगाली लोकांच्या वर्चस्वामुळे आसामी भाषा आणि संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे. परिणामी १९५० च्या दशकांमध्ये आसामी भाषी लोकांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यासाठी आणि आसामी भाषेला राज्याची एक मात्र भाषा बनविण्यासाठी तसेच आसामी भाषेला शैक्षणिक माध्यम बनवण्यासाठी आंदोलन उभे केले. सरकारी भाषेच्या परिवर्तनासाठी चाललेल्या या आंदोलनामुळे बंगाली आणि असामी भाषी लोकांमध्ये शत्रुत्व निर्माण होऊन १९६०च्या सुमारास भाषाई दंग्यांना सुरुवात झाली. लवकरच १९६० मध्येच बांगला भाषी आणि काही जनजातीय समुदायाच्या इच्छे विरुद्ध आसामच्या विधानसभेत एक कायदा करून आसामीला एक मात्र सरकारी कामकाजाची भाषा घोषित करण्यात आले. तसेच १९७२ मध्ये गुवाहाटी विद्यापीठाशी संबंधित सर्व महाविद्यालयांमध्ये असामी भाषेला शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता दिली. याचा परिणाम म्हणून जनजातीय समुदायांनी आसाम मधून वेगळे होण्याची मागणी केली.

३. आसाम मधील अशांततेला तिसरे कारण म्हणजे बंगाल, बांगलादेश आणि नेपाळ मधून येणाऱ्या बेकायदेशीर विदेशी स्थलांतरितांचा प्रश्न होय. मोठ्या प्रमाणातील गैरअसामी लोकसंख्येमुळे आसामच्या जनतेमध्ये अशी भीती निर्माण झाले की आपल्याच प्रदेशांमध्ये आपण अल्पसंख्यांक होऊन जाऊ. परिणामी आपली भाषा आणि संस्कृती दुसऱ्यांच्या आधीन होऊन जाईल, अर्थव्यवस्था आणि राजकारणातील आपले वर्चस्व समाप्त होईल व शेवटी आसामी समुदाय म्हणून असलेली आपली ओळख आणि विशिष्टता नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. राजकीय मुद्दा म्हणून बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न १९५० पासूनच पुढे येत होता. परंतु याचा विस्पोट १९७९ मध्ये झाला. कारण बेकायदेशीर आलेले हे स्थलांतरित राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात मतदार बनले होते. १९७९ मध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांचा वरचष्मा राहील या भीतीने ऑल आसाम स्टूडेंट युनियन आणि आसाम गण संग्राम परिषद यांनी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधात चळवळ सर्व सुरू केली. आंदोलनकर्त्यांचा दावा होता की, या विदेशी लोकांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ३१ ते ३४ टक्यांपर्यंत मोठी आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडे त्यांनी अशी मागणी केली की, आसामच्या सीमा बंद करून बेकायदेशीर स्थलांतरितांवर बंदी आणावी आणि या स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांची नावे मतदार यादी मधुन कमी करावी व तोपर्यंत निवडणूका घेण्यात येऊ नये. या आंदोलनाला इतके समर्थन मिळाले की १६ पैकी १४ मतदार संघामध्ये निवडणुका होऊ शकल्या नाही.

१९७९ ते १९८५ दरम्यान आसाम मध्ये राजनीतिक अस्थिरता, राज्य सरकारची अस्तव्यस्तता आणि राष्ट्रपती राजवट लागू होणे अशा घटना घडल्या. याच दरम्यान सतत हिंसक चळवळी, संप, कायदेभंग इत्यादी गोष्टींमुळे जनजीवन ठप्प झाले होते. बरीच वर्ष केंद्र आणि राज्यातील नेत्यांमध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या परंतु त्यातून कोणतेही समाधान निघू शकले नाही. अशातच केंद्रसरकारने १९८३ मध्ये घेतलेल्या निवडणुकांवर जवळजवळ पूर्ण बहिष्कार टाकला गेला. आसामी भाषी

munotes.in

बहुसंख्यांक असलेल्या प्रदेशांमध्ये दोन टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झाले. काँग्रेसने सरकार बनवले परंतु त्याला वैधता नव्हती. याच वेळी राज्यव्यापी हिंसेमध्ये जवळ जवळ तीन हजार लोक मारले गेले. १९८३ नंतर परत चर्चा होऊन शेवटी राजीव गांधी सरकार आंदोलकांसोबत १५ ऑगस्ट १९८५ मध्ये एका करारावर स्वाक्षरी करण्यास यशस्वी झाले. या करारानुसार १९५१ ते १९६१ च्या दरम्यान आसाम मध्ये आलेल्या विदेशी नागरिकांना मतदानाचा अधिकार आणि नागरीकता दिली जाईल असे ठरले. १९६१ ते १९७१ दरम्यान आलेल्या नागरिकांना दहा वर्ष मतदानाचा अधिकार दिला जाणार नाही परंतु नागरिकत्वाचे इतर अधिकार दिले जातील. १९७१ नंतर आलेल्या लोकांना वापस पाठवले जाईल. आसामच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र पॅकेज दिल्या जाईल. औद्योगिक विकासासाठी दुसरा एक तेल शुद्धीकरण कारखाना, एक कागदाचा कारखाना आणि एक तांत्रिक शिक्षण संस्था स्थापन केल्या जाईल अशा तरतुदी होत्या. त्याचबरोबर आसामी लोकांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि भाषाई अस्मितेला सुरक्षा प्रदान करण्याकरता प्रशासनिक रक्षा कवच देण्याचे मान्य केले.

वरील कराराच्या आधारावर मतदार यादी तयार करण्यासाठी गांभीर्याने काम सुरु केले गेले. तत्कालीन विधानसभा भंग करून डिसेंबर १९८५ मध्ये पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या. आसाम गण परिषदेला विधानसभेमध्ये १२६ पैकी ६४ जागांवर विजय मिळाला. ऑल आसाम स्टुडंट युनियनचा नेता प्रफुल्ल महंतो ३२व्या वर्षी स्वतंत्र भारतातील सर्वात तरुण मुख्यमंत्री बनला आणि या बरोबरच आसाम मधील दीर्घकालीन जहालवादी राजकारणाचा शेवट झाला. परंतु त्याच बरोबर वेगळ्या राज्यांसाठी बोडो जमात आणि फुटीरतावादी युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) यांचा उदय झाला.

अशाप्रकारे आसाम मधील बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधातील हे आंदोलन जातीयवादी आणि फुटीरतावादी नसून आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी होते असे दिसून येते. यामुळे भारताच्या एक्यामध्ये आणि अखंडते मध्ये कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.

### ८.४.३ पंजाब :

१९८०च्या दशकामध्ये पंजाब फुटीरतावादी चळवळीचा बळी ठरला. १९४७च्या पूर्वी पंजाब मध्ये जातियवाद हिंदू, मुस्लिम आणि शिख या तीन जमातींमध्ये त्रिशंकू पद्धतीने अस्तित्वात होता. ज्यामध्ये एकाच्या विरुद्ध दोघे असे आलटून पालटून चालत असे. परंतु १९४७ च्या नंतर पंजाब मधून मुस्लिम जतियवाद नष्ट होऊन हिंदू आणि शीख एकमेकांविरोधात उभे ठाकले. प्रारंभापासूनच अकाली नेतृत्वाने जतियवादाचा अंगीक केला होता. धर्मनिरपेक्ष व्यवस्थेचा विरोध करून अकाली दलाने धर्म आणि राजकारण आम्ही वेगळं करू शकत नाही असे सांगितले. तसेच अकाली दल शिखांची एक मात्र प्रतिनिधी आहे असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी हिंदू वर असा आरोप लावला की त्यांच्यावर ब्राह्मणवादी हुकूमशाही लादली जात आहे. त्यामुळे शिखांची ओळख नष्ट होत असून धर्म खतरे मे असा नारा दिला. तसेच काँग्रेसला हिंदुत्ववादी संघटना संबोधून

समुदायांमध्ये कॉंग्रेस विरोधी वातावरण निर्माण केले. १९५३ मध्ये मास्टर तारासिंह म्हणतात की, "इंग्रज चालले गेले परंतु आम्हाला स्वातंत्र्य मिळाले नाही, आमच्यासाठी स्वातंत्र्य म्हणजे फक्त मालकांमधील बदल आहे. गोरे जाऊन काळे आले. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या आडून आमच्या धर्माला व जातीला डावलण्यात येत आहे."

अकाली दलाने गुरुव्दारांचा विशेषतः सुवर्ण मंदिराचा आपल्या राजकारणासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यास सुरुवात केली होती. १९६६ पर्यंत पंजाब मध्ये मुख्यता दोन मुद्दे प्रमुख होते पहिला राज्याच्या भाषे संबंधित होता. हिंदू जनता हिंदी भाषेसाठी आग्रही होती. तर शिखांचे म्हणणे होते की गुरुमुखी लिपीतील पंजाबी ही राज्याची भाषा असावी. दुसरा मुद्दा पंजाबी सूभ्याबद्दल होता, जो अधिक भावनात्मक आणि फुटीरतावादी म्हणून पुढे आला. १९५५ मधील राज्यपुनर्रचना आयोगाच्या स्थापनेनंतर अकाली दल, सी पी आय, काही कॉंग्रेस नेते आणि पंजाबी विद्वानांनी भाषेच्या आधारावर पंजाबची पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी केली. ज्यानुसार पंजाबी भाषीक पंजाब आणि हिंदी भाषीक हरियाणा यांची निर्मिती केली जावी. परंतु या मागणीला पंजाब मध्ये म्हणावी तशी सहमती नसल्यामुळे त्यांची हि मागणी फेटाळल्या गेली. १९५६ साली पेप्सू पंजाबमध्ये सामील केले गेले. परंतु लवकरच मास्टर तारासिंग यांच्या नेतृत्वाखाली अकाली दलाने पंजाबच्या मागणीसाठी संघर्ष उभा केला. त्यांचे म्हणणे असे होते की, "शिखांना आपल्या स्वतंत्र प्रदेशाची आवश्यकता असून त्यांचा धर्म आणि राजकारण यांचे वर्चस्व राहण्यासाठी ते आवश्यक आहे." जातियवादी आधारावर पंजाबच्या मागणीला नेहरूंचा विरोध होता कारण त्यांचे म्हणणे होते की, यामुळे राजसत्ता आणि समाज यांच्या धर्मनिरपेक्ष चरित्राला धक्का पोहोचेल. परंतु संत फतेह सिंह यांनी मास्टर तारा सिंह यांना अकाली दलातून बाहेर केल्यानंतर पंजाबची मागणी फक्त भाषेच्या आधारावर केल्यामुळे आणि हरियाणामधील जनतेने हिंदी भाषी हरियाणाची आणि कांगडा जिल्ह्याने हिमाचल प्रदेश मध्ये जाण्याची मागणी केल्यामुळे १९६६ मध्ये पंजाब आणि हरियाणा या दोन स्वतंत्र राज्यांची निर्मिती करण्यात आली व कांगडा जिल्हा हिमाचल प्रदेश मध्ये विलीन करण्यात आला. परंतु चंदीगड कोणाला मिळाले पाहिजे यावरून वाद झाल्याने चंदीगडला केंद्रशासित प्रदेश म्हणून मान्यता दिली गेली.

भाषावार पंजाबी राज्याची मागणी पूर्ण करूनही पंजाब मधील समस्येचे समाधान झाले नाही कारण ही समस्या राजकीय नसून जातीयवादी होती. त्यामुळे पंजाब मधील समस्या नव्या रुपात पुढे आली. पंजाबच्या निर्मितीनंतर अकाली दलाकडे कोणताही राजकीय कार्यक्रम राहिला नसल्याने, जनसमर्थन मिळवण्यासाठी जातियवादी तत्वाचा आधार घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. संत लोंगोवाल यांच्या नेतृत्वामध्ये अकाली दलाने पंतप्रधानांना धार्मिक, राजनीतिक, आर्थिक आणि सामाजिक अशा ४५ मागण्यांचे मागणी पत्र सोपवून त्यासाठी चळवळ सुरू केली. यांची एक मागणी पूर्ण केले की दुसरी मागणी उभे राहत असे. त्यांचा मुख्य दृष्टिकोन हा होता की पंजाब एक शिख धर्मीय राज्य आहे आणि अकाली दल शिख धर्मीय पार्टी असल्यामुळे भारतीय संघराज्याच्या रचनेपेक्षा श्रेष्ठ आहे.

munotes.in

१९७० च्या दशकामध्ये जातीयवादी तत्त्वांना खूष करण्याच्या नीतीमुळे पंजाब मध्ये १९७९च्या दरम्यान जहाल जातीयवादी आतंकवादाची सुरुवात संत भिंद्रांवाले यांच्या नेतृत्वात झाली. याला ग्यानी झेलसिंग यांच्या नेतृत्वाखालील पंजाब कॉंग्रेसचा मुक पाठिं होता. भिंद्रांवाले आणि अमरीक सिंह यांच्या नेतृत्वाखाली ऑल इंडिया शिख स्टूडेंट फेडरेशनने आपल्या आतंकवादाची सुरुवात २४ एप्रिल १९८० रोजी निरंकारी संप्रदायाचे प्रमुख यांची हत्या करून केली. यानंतर अनेक निरंकारी, अधिकारी आणि कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या. सप्टेंबर १९८१ मध्ये एक वृत्तपत्र संपादक जगत नारायणची हत्या झाली. ते भिंद्रांवालेचे प्रमुख टीकाकार होते. ग्यानी झैल सिंह यांनी भिंद्रांवाले यांना सरकारी कारवाई पासून वाचवले. १९८२ मध्ये भिंद्रांवाले यांनी आपल्याला सुरक्षित करण्याकरता सुवर्ण मंदिराच्या गुरुनानक भवन मध्ये आसरा घेतला आणि तेथून ते आपल्या आतंकवादी कार्यवाह्यांचे नेतृत्व करू लागले. भिंद्रांवाले आता पंजाबच्या राजकारणातील प्रमुख नेतृत्व म्हणून पुढे आले. १९८३ नंतर त्यांनी मोठ्या प्रमाणात हिंदूंना आपला निशाणा बनवायला सुरुवात केली. असे असले तरी पंजाब प्रशासन आणि भारत सरकार या आतंकवाद्यांविरुद्ध कारवाई करण्यास कच खात होते. भिंद्रांवाले यांनी बँका, दुकाने आणि शस्त्रागार लुटून आपल्याला आर्थिक आणि शस्त्राअस्त्रांच्या दृष्टी मजबूत बनवले.

एप्रिल १९८३ मध्ये पोलीस महानिदेशक आटवाल यांची स्वर्ण मंदिरातून प्रार्थना आटोपून बाहेर येताना हत्या करण्यात आली. याबरोबरच आतंकवादी कारवाया वाढत जाऊन शिख आणि हिंदूंच्या मध्ये जातीयवादी भावना वाढायला लागली. भिंद्रांवाले आता भारतीय राजसत्तेच्या विरुद्ध सशस्त्र संघर्षाच्या नारा देऊ लागले.

१९८४ मध्ये पंजाबची स्थिती मोठ्या प्रमाणात बिघडायला लागली. अकाली नेतृत्वाने ३ जून १९८४ पासून आतंकवादाचा नवा अध्याय सुरू करण्याचे आव्हान करून त्यासाठी जन समर्थन मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. या स्थितीमध्ये सर्वात धोकादायक प्रकार म्हणजे पंजाब मध्ये पाकिस्तानचा वाढता हस्तक्षेप होता. पाकिस्तानने भारताचा विरुद्ध आतंकवादी संघटनांना प्रशिक्षण देणे व शस्त्रास्त्रे पुरविणे असे कार्य सुरू केले. विदेशातील काही जातियवादी शीख समुदायाने सुद्धा आर्थिक आणि शस्त्रास्त्रांच्या रूपात मदत घेऊन प्रोत्साहन दिले. यामुळे पंजाब आणि पूर्ण देशाच्या ऐकतेला व शांततेला धोका निर्माण झाल्याची भावना निर्माण झाली. हिंदूनी पंजाब सोडून जाण्यास सुरुवात केली. जास्तीत जास्त गुरुद्वारांची तटबंदी करून त्यांना शस्त्रागाऱ्यांमध्ये रूपांतरित केले जात होते. एकूण काय तर पंजाबमध्ये उठावाची जोरदार तयारी सुरू होती आणि जनतेचा सरकारवरील विश्वास झपाट्याने कमी होत चालला होता.

मे १९८४ च्या शेवटी हे स्पष्ट झाले की पंजाबी आतंकवादाच्या विरुद्ध बलप्रयोग करण्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा ऑपरेशन ब्लू स्टार ची योजना बनवण्यात आली. त्यानुसार ३ जून १९८४ रोजी भारतीय सेनेने सुवर्णमंदिराला वेढा घातला आणि ५ जून रोजी मंदिरात प्रवेश केला. परंतु सेनेच्या अनुमानापेक्षा आतंकवाद्यांची संख्या आणि शस्त्रास्त्रे कीतीतरी अधिक प्रमाणात होती. त्यामुळे ही छोटी कार्यवाही न राहता तिला

युद्धाचे स्वरूप आले. सर्वात धोकादायक गोष्ट म्हणजे मंदिरामध्ये जवळपास एक हजार भाविक अडकले होते. त्यामधील बरेचसे दोन्ही बाजूकडील गोळीबारामध्ये मारले गेले. अकाल तख्त पूर्णतः नष्ट झाले. हरमंदिर साहिब जे शीखांचे सर्वात पवित्र स्थळ होते त्याच्यावर गोळीबाराच्या खुणा दिसत होत्या. तरीपण सैनिकांनी आपल्याकडून अनेकांचे बलिदान देऊन काळजी घेतली होती. या कारवाईमध्ये भिंद्रांवाले आणि त्यांचे अनेक अनुयायी मारले गेले.

अधिकतर लोकांनी याला आतंकवादविरोधी कारवाई न मानता धर्म विरोधी आणि शिख समुदायाच्या अपमान म्हणून बघितले. परंतु त्यासोबतच ऑपरेशन ब्लू स्टार ने हे दाखवून दिले की भारत सरकार कोणत्याही आतंकवादाला संपवण्यासाठी खंबीर आहे. ऑपरेशन ब्लू स्टारच्या नंतर शिख आतंकवाद्यांनी इंदीरा गांधी यांनी सुवर्णमंदिराला अपव केल्याबद्दल बदला घेण्याची शपथ घेतली आणि त्याचाच परिणाम म्हणून ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी इंदिरा गांधींच्या सुरक्षा पथकातील दोन शिख रक्षकांनी त्यांची हत्या केली.

विशेष म्हणजे त्यांच्या या सुरक्षारक्षकांना हटवण्याचा सल्ला दिला गेला होता. पण त्यांनी धर्मनिरपेक्ष भारतामध्ये असे आपण करू शकत नसल्याचे सांगितले होते. इंदिरा गांधींच्या हत्तेने उत्तर भारतामध्ये शिखविरोधी भावना निर्माण होऊन जातीय दंगली उसळल्या. दिल्लीमधील हिंसक कारवाईमध्ये अडीच हजार लोक मारले गेले. इंदिरा गांधींच्या जागी पंतप्रधान म्हणून नोव्हेंबर १९८४ मध्ये राजीव गांधी यांनी शपथ घेतली. त्यांनी डिसेंबर १९८४ च्या निवडणुकांनंतर पंजाब मधील समस्या सोडवण्यासाठी कंबर कसली. त्यासाठी जानेवारी १९८५मध्ये अटक केलेल्या सर्व अकाली दलाच्या नेत्यांना सोडून देण्यात आले आणि त्यांच्यासोबत चर्चा सुरू केली. ह्या गोष्टी मुळे पंजाबच्या समस्या सुटण्यापेक्षा ऑपरेशन ब्लू स्टार मुळे मिळालेला फायदाही नष्ट झाला आणि आतंकवादास नवसंजीवनी मिळाली. तरीपण ऑगस्ट १९८५ मध्ये राजीव गांधी आणि लोंगोवाल यांनी पंजाब करारावर स्वाक्षरी केली. केंद्र सरकारने अकालींच्या प्रमुख मागण्या मान्य केल्या तर इतर मागण्यांवर पुनर्विचार करण्याचे आश्वासन दिले. सप्टेंबर १९८५ मध्ये राज्य विधानसभा आणि संसदेच्या निवडणुका होणार होत्या त्या निवडणुकांमध्ये भाग घेण्याची घोषणा २० ऑगस्ट १९४५ रोजी लोंगोवाल यांनी केली. त्याच दिवशी आतंकवाद्यांनी लोंगोवाल यांची हत्या केली. पहिल्यांदा अकालींना राज्य विधानसभेमध्ये पूर्ण बहुमत प्राप्त झाले आणि सूरजित सिंह बरनाला यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन करण्यात आले. बरनाळा सरकाच्या अकार्यक्षमतेमुळे आतंकवादी समुदाय पुन्हा संघटित होऊ लागले. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे सरकारला शक्य झाले नाही म्हणून १९८७ मध्ये राष्ट्रपती शासन लागू केले गेले. राष्ट्रपती शासन लागू करूनही पंजाब मधील आतंकवाद वाढतच गेला. शेवटी १९८८ मध्ये केंद्र सरकारने ऑपरेशन ब्लॅक थंडर राबवून स्वर्ण मंदिरातून आतंकवाद्यांना बाहेर काढण्यात यश मिळवले. १९९१ मध्ये नरसिंहराव सरकारने आतंकवाद्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई केली. त्याबरोबरच फेब्रुवारी १९९२च्या निवडणुकांमध्ये यश मिळवलेल्या पंजाबच्या बेअंत सिंह यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने आतंकवाद्यांच्या विरुद्ध कडक पावले

munotes.in

उचलली. या व्यतिरिक्त सी पी आय आणि सीपीएम या दोन साम्यवादी पक्षांनी मोठ्या प्रमाणात आतंकवादाच्या विरुद्ध भूमिका घेतल्यामुळे १९९३ पर्यंत पंजाब मधून आतंकवादाचा सफाया झाला. अशाप्रकारे पंजाब मधील फुटीरतावादी चळवळ ही जातीयवादी भूमिका घेऊन उदयास आली होती. ज्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला व अखंडतेला धोका निर्माण झाला होता. तथापि या आतंकवादा विरुद्ध सरकारने कडक पावले उचलल्यामुळे यावर नियंत्रण मिळवले गेले. पण त्यासाठी इंदीरा गांधी सारख्या नेत्यांना आपला जीव गमवावा लागला.

### ८.४.४ जम्मू आणि काश्मिर :

ऑक्टोंबर १९४७ मध्ये विलीनीकरणाच्या पत्रावर स्वाक्षरी झाल्यापासून जम्मू आणि काश्मीरला भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० नुसार विशेष राज्याचा दर्जा देण्यात आलेला होता. काश्मीर संस्थानाने भारतात विलीन होताना फक्त विदेशनीति, दळणवळण आणि संरक्षण याचेच हस्तांतरण केंद्र सरकारला केले होते बाकी बाबतीमध्ये जम्मू आणि काश्मिर स्वायत्त होते. या राज्याला आपले वेगळे संविधान बनवण्याची, वेगळा राज्यप्रमुख (सद्र ए रियासत) निवडण्याची आणि आपला वेगळा ध्वज बनवण्याची परवानगी होती. त्याचा अर्थ असा होतो की भारतीय घटनेतील मूलभूत अधिकार येथील जनतेवर लागू होत नव्हते. त्याचप्रमाणे भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग आणि महालेखाकार अशा संस्थांच्या जम्मू-काश्मीरवर कोणताही अधिकार नव्हता. कलम ३७० काश्मीरच्या विलिनीकरणाच्या संबंधित नसून केंद्र आणि राज्यातील देवाण-घेवाण या संबंधित होते. १९५६ साली विधानसभेने भारतामध्ये काश्मीरच्या विलीनीकरणाला मान्यता दिली. त्यामुळे काश्मिरचा विशेष दर्जा जवळपास समाप्त झाल्यासारखाच होता. याबरोबरच भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, संविधानातील मूलभूत अधिकार काश्मीरला लागू झाले. भारतीय संसदेला काश्मीर संबंधात कायदे बनवण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याचबरोबर काश्मीरमधील प्रशासनिक सेवा अखिल भारतीय सेवांशी जोडल्या गेल्या. तसेच सद्र ए रियासत नाव बदलून राज्यपाल तर प्रधानमंत्र्याला मुख्यमंत्री संबोधले जाऊ लागले. काश्मीरची स्वायत्तता कमी केल्यामुळे काश्मीर जनतेचा एक मोठा हिस्सा नाराज झाला. दुसरीकडे कलम ३७० नुसार काश्मीरचे संपूर्ण विलीनीकरण, प्रशासनिक सेवांमध्ये जास्तीचा वाटा आणि जम्मूला काश्मीरपासून वेगळे करण्यासाठी एक शक्तिशाली आंदोलन उभे राहिले. लवकरच या आंदोलनाला जातीयवादी रंग आल्याने जम्मू आणि काश्म धार्मिक आधारावर विभक्त होण्याचा धोका निर्माण झाला. कारण काश्मीर एक मुस्लिम बहुसंख्यांक भाग होता तर जम्मूमध्ये हिंदूंची संख्या अधिक होती. जम्मूमधील आंदोलनाचे नेतृत्व जम्मू प्रजा परिषद करत होती, जीचे नंतर जनसंघांमध्ये विलीनीकरण झाले. या प्रजा परिषदेने जम्मू काश्मीरचा प्रश्न अखिल भारतीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान ३० जून १९५३ रोजी जनसंघाचे अध्यक्ष श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा हृदय विकाराच्या झटक्याने श्रीनगर तुरुंगात मृत्यू झाला. जम्मू-काश्मीरमध्ये बंदी असतानाही त्यांनी सरकारी आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. यांच्या मृत्यूमुळे जम्मू प्रजा परिषदेचे नेतृत्व काश्मीरच्या पाकिस्तान समर्थक

जातीयवाद्यांच्या हाती गेले. त्यांनी भारताचे धर्मनिरपेक्ष चरित्र बदनाम करण्याचा प्रयत्न करून काश्मीर वरील भारताचे नियंत्रण हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:४२४)

**शेख अब्दुल्लांची भूमिका :**

काश्मीरचे जातीयवादी तत्व जे पाकिस्तान मध्ये विलीन होण्याची मागणी करत होते आणि जम्मूमधील जातीयवादी तत्व जे भारतात संपूर्ण विलिनीकरणाची मागणी करत होते, या दोन्हींच्या दबावात येऊन शेख अब्दुल्ला हे फुटीरवादाकडे झुकायला लागले. ते जातीयवादाची शक्ती आणि धर्मनिरपेक्षतेची कमजोरी यावर अवास्तव भर द्यायला लागले. त्याचबरोबर काश्मीरचे भारतातील विलिनीकरण मर्यादित स्वरूपाचे असावे आणि जास्तीत जास्त स्वायत्तता असावी यावर ते जोर देऊ लागले. त्याच्याही पुढे जाऊन १९५३ मध्ये ते अमेरिका आणि इतर विदेशी देशांच्या मदतीने काश्मीरला स्वतंत्र करण्याची भाषा बोलू लागले आणि काश्मिरी मुसलमानांच्या जातीयवादी भावना भडकावू लागले. पंडित नेहरूंनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा शेख अब्दुल्लांवर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी त्यांच्या पक्षातील नेत्यांनी त्यांच्या या वागण्याचा विरोध करून त्यांना हटवण्याची मागणी केली. परिणामी शेख अब्दुल्ला यांना हटवून त्यांच्या जागी प्रधानमंत्री म्हणून बक्षी गुलाम मोहम्मद यांची नियुक्ती केली. या नव्या सरकारने त्यांना लगेच अटक करून तुरुंगात डांबले. पंडित नेहरू या घटनेने नाराज झाले, परंतु ते राज्य सरकार मध्ये हस्तक्षेप करू इच्छित नव्हते. १९५८ मध्ये पंडित नेहरूंच्या म्हणण्यानुसार शेख अब्दुल्ला यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले. परंतु त्यांनी जातीयवादी आणि फुटीरतावादी प्रचार सुरू ठेवल्याने त्यांना परत तीन महिन्यांनी अटक करण्यात आली. एप्रिल १९६४ मध्ये नेहरूंनी अब्दुल्लांना परत तुरुंगातून मुक्त केले. आता अब्दुल्लांनी असे बोलायला सुरुवात केली की, काश्मीरचे विलिनीकरण निर्णायक नसून राज्याचा स्वनिर्णयाचा अधिकार मिळवण्यासाठी ते संघर्ष करत राहतील. त्यांना आता पाकिस्तान समर्थक राजकीय समुदाय ज्याचे नेतृत्व मौलवी फारूक आणि आवामी एक्शन कमिटी करत होते यांच्याही विरोधाला सामोरे जावे लागत होते. त्यांना परत १९६५ ते १९६८ दरम्यान घरातच नजरकैदेत ठेवण्यात आले. दरम्यान बक्षी गुलाम मोहम्मद यांनी जम्मू-काश्मीरवर कठोर निर्णयाद्वारे आणि सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग करत शासन केले. त्यांच्यानंतर जी एम सादिक आणि मीर कासिम यांनी शासनाची धुरा सांभाळली. परंतु हे दोघेही प्रभावशाली प्रशासक आणि राजनीतिक मुत्सद्दी नव्हते. यांच्या काळात राज्य सरकार लोकप्रियता मिळू शकले नाही तरीही पाकिस्तान समर्थक शक्ती या काळात कमजोर राहिल्या. १९७१चे युद्ध आणि पाकिस्तानचे विभाजन होऊन बांगलादेशची झालेली निर्मिती याचा काश्मीरवर मोठा परिणाम झाला. पाकिस्तान समर्थक आवामी एक्शन कमिटी आणि फुटीरतावादी प्लेबीसाईट फ्रंटला यामुळे मोठा राजकीय झटका बसला. शेख अब्दुल्ला यांच्या मध्ये मोठी सुधारणा झाली होती. ते केंद्रसरकार बरोबर अधिक जबाबदारीने वागू लागले. त्यामुळे इंदिरा गांधींनीही त्यांच्यापुढे मित्रत्वाचा हात केला. त्यांच्यावरील सर्व निर्बंध उठवून त्यांच्या सोबत चर्चा सुरू केली. शेख अब्दुल्ला यांनीही स्वनिर्णय आणि जनमत

संग्रह हे मुद्दे सोडून देण्याचे मान्य करून आपली मागणी भारतीय संघराज्याच्या अंतर्गत स्वायत्तता यापुरतीच मर्यादित ठेवतील हे मान्य केले. १९७५ मध्ये ते परत एकदा नॅशनल कॉन्फरन्सचे नेता आणि जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री बनले. १९७७च्या मध्यवती निवडणुकांमध्ये ते विजयी झाले. १९८२ मध्ये त्यांचा मृत्यू होऊन त्यांचा जागी त्यांचा मुलगा मुलगा फारुख अब्दुल्ला मुख्यमंत्री बनला.

**फारुख अब्दुल्ला, बंडखोरी आणि अतिरेकी :**

१९८२ नंतर जम्मू-काश्मीरमध्ये एक तर फारूक अब्दुल्ला यांचे शासन असते किंवा राष्ट्रपतीला राजवट लागू असते. १९८३ च्या निवडणुकांमध्ये फारूक अब्दुल्ला यांना स्पष्ट बहुमत मिळाले. परंतु लवकरच केंद्र सरकार बरोबर त्यांचा बेबनाव झाला. जुलै १९८४ मध्ये जी एम शहा यांनी नॅशनल कॉन्फरन्स फूट पाडली आणि केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार राज्यपाल जगमोहन यांनी फारुख अब्दुल्ला यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवू त्यांच्या जागी जी एम शहा यांना खुर्चीवर बसवले. परंतु जीएम शहा भ्रष्टाचारी आणि शासन करण्यास लायक नसल्याने ते काश्मिरी पंडितांवर होणाऱ्या हल्ल्यांना थोपवू शकले नाही. त्यामुळे १९८६ मध्ये त्यांचे सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली. १९८७ मध्ये राजीव गांधी यांनी फारूक अब्दुल्ला यांच्याबरोबर निवडणुकांसाठी आघाडी केली. परंतु निवडणुका जिंकल्या नंतर फारूक अब्दुल्ला राजकीय आणि प्रशासनिक दृष्ट्या राज्यावर नियंत्रण ठेवू शकले नाही. यानंतर काश्मीर मध्ये फुटीरतावादी आंदोलन जोर पकडू लागले. हिजबुल मुजाहिद्दीन तसेच अन्य कट्टरपंथी पाकिस्तानी समर्थक समुदाय जम्मु अँड काश्मीर लिब्रेशन फ्रंट यांच्या नेतृत्वाने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठी हिंसक चळवळी आणि सशस्त्र उठाव सुरू केला. या सर्व समुदायांना पाकिस्तानकडून आर्थिक मदत, शस्त्रसाठा आणि प्रशिक्षण दिल्या जाऊ लागले. यांनी पोलिस स्टेशन, सरकारी कार्यालये आणि इतर सरकारी इमारतींवर हल्ले करण्यास सुरुवात केली. सर्वात महत्वाचे म्हणजे काश्मिरी पंडितांवर हल्ले करून त्यांना आपली जमीन जायदाद सोडून जम्मू आणि दिल्ली येथील शरणार्थी शिबिरांमध्ये जाण्यास बाध्य केले. परिणामी बंडखोरी आणि अतिरेकी कारवाया नियंत्रित करण्यासाठी केंद्रातील व्ही पी सिंग सरकारने फारूक अब्दुल्ला यांचे सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली. तरीही मोठ्या कालखंडानंतर १९९६ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये फारूक अब्दुल्ला परत निवडून आले. कालांतराने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्याचे समर्थक ऑल पार्टी हुरियत कॉन्फरन्स, जम्मू अँड काश्मीर लिब्रेशन फ्रंट तसेच पाकिस्तान समर्थक मुजाहिद्दीन हे आपली शक्ती गमावून बसले आहेत कारण यांनी स्थानिक लोकांची मोठ्या प्रमाणात लुटमार केली होती. परंतु अजूनही पाकिस्तान समर्थित आणि संघटित आतंकवाद जम्मू व काश्मीर मधील राजकारणाला प्रभावित करणारा एक घटक म्हणून आजही कार्यरत आहे.

## ८.५ जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता

भारत हा विविधतेने नटलेला देश असल्यामुळे आणि भारतामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहात असल्याने सर्वांना सामावून घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्ष

लोकशाहीचा अंगीकार केला आहे. यासाठी भारतीय राज्यघटनेने कोणत्याही एका धर्माचे समर्थन केलेले नसून प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार वागण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु लोकशाहीमध्ये 'एक व्यक्ती एक मत' हे तत्व महत्त्वाचे असल्यामुळे ज्याच्या पाठीमागे अधिक लोक त्याचे राज्य हे सूत्र काम करत असते. त्यामुळे जमातवादी राजकीय पक्ष नेतृत्व आपल्या जनाधार वाढविण्यासाठी धर्माचा उपयोग करतात. यातूनच भारतामध्ये जमातवादाचा प्रचार झपाट्याने झालेला दिसून येतो. ऐतिहासिक काळापासून भारतामध्ये वेळोवेळी विदेशी लोकांचे आगमन होत राहिले व भारतालाच आपली कर्मभूमी मानून येथील संस्कृतीत ते मिसळून गेले. त्याबरोबरच भारतीय भूमीमध्येही अनेक धर्म आणि पंथ यांचा वेळोवेळी उदय झाला. त्यांनी आपला धर्म तत्वांच्या आधारे आपापल्या धर्माचा प्रचार प्रसार केला. भारतामध्ये इस्लाम धर्मीय राज्यकर्त्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी सत्ता मिळवण्यासाठी आपल्या सैनिकांना धर्माच्या आधारावर स्फूर्ती देण्याचा प्रयत्न अनेक वेळा केला. त्यांचा सत्तास्थापने मागील हेतू राजकारणाबरोबरच इस्लाम धर्माचा प्रचार प्रसार करणे हा असला तरी इतर प्रदेशांप्रमाणे ते भारताचे इस्लामीकरण करू शकले नाही. त्यांनी सत्तेसाठी धर्माचा वेळोवेळी वापर केला परंतु धर्माच्या आधारावर हिंसक जातीय दंगली झाल्याचे प्रणाम मात्र उपलब्ध नाही. भारतामध्ये ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर आपल्या सत्तेचा विस्तारासाठी व दृढीकरणासाठी त्यांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला. अठराशे सत्तावनचा उठावामध्ये हिंदू-मुस्लीम हे खांद्याला खांदा लावून लढल्यामुळे हिंदू-मुस्लिमांची एकता आपल्या साम्राज्यासाठी घातक आहे; हे ओळखून ब्रिटिशांनी या दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले.

अठराशे सत्तावनचा उठावानंतर भारतातील पारंपारिक सरंजामशाही नेतृत्व मागे पडून आधुनिक शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांच्या हाती भारतीय राजकारणाचे नेतृत्व आले. आपल्याला प्रशासनामध्ये सहभाग आणि राजकीय हक्क मिळावे म्हणून या वर्गाने एकत्र येत १८८५ मध्ये धर्मनिरपेक्ष आशा राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. याच दरम्यान ब्रिटिशांनी भारतीयांना स्थानिक प्रशासनामध्ये सामावून घेण्यासाठी काही घटनात्मक तरतुदी केल्या व त्यासाठी लोकशाही मार्गाने निवडणुकांच्या माध्यमातून प्रतिनिधित्व देण्याचे मान्य केले. यातूनच जनाधार मिळवण्यासाठी भारतीय राजकारणामध्ये जमातवादाचा उदय झालेला दिसून येतो. पुढे चालून मुस्लिम, शिख व दलितांना स्वतंत्र मतदार संघ देण्याची घोषणा करण्यात आली. याचा फायदा उचलत जमातवादी तत्त्वांनी एकत्र येत मुस्लिम लीग आणि अकाली दल यासारख्या संस्थांची स्थापना केली. याला विरोध म्हणून हिंदू महासभे सारख्या हिंदुत्ववादी संघटनेची स्थापना करण्यात आली. या जमातवादी वृक्षाचे सर्वात विषारी फळ म्हणजे धर्माच्या आधारावर झालेली पाकिस्तानची निर्मिती होय. पंडित नेहरू म्हणतात की, "One Communalism dose not end the other each feeds on the other and both fatten". (आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर बेल्हेकर: ४९५ ) म्हणजे एक जमातवाद दुसऱ्या जमातवादाला संपवू शकत नाही तर तो दुसऱ्या जातीवादाला जन्म देत असतो आणि नंतर दोघांमध्ये संघर्ष उभा राहतो. या वक्तव्या प्रमाणे ब्रिटिशांनी भारत सोडल्यानंतरही जमातवाद कमी न होता तो नव्या रुपात समोर आलेला आहे. याला जातीयवाद्यांचा आक्रमक प्रचार प्रसारा

बरोबरच धर्मनिरपेक्ष शक्तींना जातिवादास थोपवण्यात आलेले अपयश देखील कारणीभूत आहे.

## ८. ६ सारांश

ब्रिटिशांनी कायद्याचे राज्य भारतामध्ये स्थापन केले. कायद्याच्या आधारे ते राज्यकारभार करत असे. यातच भारतीय राज्यघटनेची पाळेमुळे आपल्याला दिसून येतात. ब्रिटिशांनी भारताला वेळोवेळी ज्या घटनात्मक सुधारणा दिल्या त्याचाच सर्वोच्च परिणाम म्हणजे भारताचे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्यानंतर घटना समितीची निर्मिती झाली. त्यामध्ये राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेल्या अनुभवी लोकांचा समावेश होता. या लोकांनी स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लोक जागृती करतांना उभे केलेले आदर्श आणि मूल्य यांचा घटनेमध्ये समावेश केला आणि भारताची राज्यघटना जगातील आदर्श राज्यघटना म्हणून नावारूपाला आली. या घटना निर्मिती मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष योगदान असून त्यांची विद्वत्ता आणि सामाजिक मूल्य घटनेमध्ये पदोपदी दिसून येतात. भारताच्या या आदर्श राज्यघटनेमुळे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये लोकशाहीची यशस्वी वाटचाल झालेली दिसून येते. तरीही वसाहतवादाच्या शोषणात्मक व्यवस्थेमुळे निर्माण झालेली प्रादेशिक विषमता आणि असमतोल यामुळे प्रादेशिक राजकारणाला चालना मिळाली. त्यातूनच प्रादेशिक निष्ठा व त्याची जोपासना करणारे प्रादेशिक नेतृत्व यांचा उदय झाला. परंतु कणखर राष्ट्रीय नेतृत्वाने यावर विजय मिळवून या समस्येचे वेळोवेळी निराकरण केले. असे असले तरी भारतामधील पंजाब, काश्मीर, आंध्र प्रदेश आणि आसाम अशा प्रदेशांमध्ये फुटीरतावादी चळवळी उभ्या राहिल्या. यांनी जातीयवादी हिंसक संघर्ष उभे करून आतंकवादाला प्रोत्साहन दिले. बऱ्याच वेळेस यांना विदेशी शक्तींचे प्रोत्साहनही मिळाले. तरीही राष्ट्रीय नेतृत्वाने वेळोवेळी चर्चा करून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला . तर काही प्रसंगी कडक पावले उचलत बळाचा वापर करून या फुटीरवादी शक्तींवर विजय मिळून भारताच्या एकतेला व अखंडतेला असलेला धोका दूर केलेला दिसून येतो.

## ८.७ प्रश्न

१. भारतातील लोकशाहीची वाटचाल स्पष्ट करा.

२. प्रादेशिक राजकारणाचा उदय आणि विकास यांचा आढावा घ्या.

३. भारतामधील फुटीरतावादी चळवळीचा उदय आणि विकास विविध राज्यांच्या संदर्भासह स्पष्ट करा.

## ८.८ संदर्भ


१. आजादी के बाद का भारत - बिपिन चंद्र .

२. आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२००० : शांता कोठेकर

३. आधुनिक भारताचा इतिहास- ग्रोवर आणि बेल्हेकर.

४. भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास - साहेबराव गाठाळ

५. भारत का स्वतंत्रता संघर्ष - बिपिन चंद्र

६. आधुनिक भारत : सुमित सरकार

७. आधुनिक भारताचा इतिहास : ग्रोवर व बेलेकर


❖❖❖❖

munotes.in

# ९

# भारताचे शेजारील राष्ट्राशी सबंध

**घटक रचना :**

९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे

९.२.१ अलिप्ततावाद

९.२.२ वसाहतवाद व सम्राज्यवादला विरोध

९.२.३ वर्णभेदभावला विरोध

९.२.४ शांततेला प्रोत्साहन

९.२.५ चांगले शेजारी व प्रादेशिक सहकार्य

९.२.६ निःशस्त्रिकारणाला पाठिंबा

९.२.७ संयुक्त राष्ट्रसंघावर विश्वास

९.२.८ राष्ट्रकुलाशी सहकार्य

९.३ भारत पाकिस्तान सबंध

९.३.१ फाळणीतून निर्माण झालेले प्रश्न

९.३.२ काश्मीरवर आक्रमण व विलीनीकरण

९.३.३ १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध

९.३.४ १९९९ चे कारगील युद्ध

९.४ भारत-चीन संबंधाची माहिती

९.४.१ कोरिया प्रश्न

९.४.२ तिबेट प्रश्न

९.४.३ भारताचा चीन बाबत सावध पवित्रा

९.४.४ भारत-चीन संबंधात दुरावा

munotes.in

९.४.५ चीनच्या धोरणात बदल

९.४.६ चीनचे आक्रमण

९.५ भारत श्रीलंका संबंध

९.६ भारत-नेपाळ सबंध

९.७ भारत अफगाणिस्तान संबंध

९.८ भारत भूतान सबंध

९.९ भारत बांगलादेश संबंध

९.१० भारत ब्रह्मदेश संबंध

९.११ सारांश

९.१२ प्रश्न

९.१३ संदर्भ

## ९.० उद्दिष्ट्ये

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे समजून घेणे.
२. भारत-पाकिस्तान सबंधाची माहिती जाणून घेणे.
३. भारत-चीन संबंधाची माहिती जाणून घेणे.
४. भारत-श्रीलंका सबंधाची माहिती अभ्यासाने.
५. भारत-नेपाळ संबंधाची माहिती जाणून घेणे.
६. भारत-अफगाणिस्तान सबंधाची माहिती अभ्यासाने.
७. भारत-भूतान सबंधाची माहिती जाणून घेणे.
८. भारत बांगलादेश सबंधाची माहिती जाणून घेणे.
९. भारत-ब्रम्हदेश सबंधाची माहिती अभ्यासाने.

## ९.१ प्रस्तावना

भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या परराष्ट्र धोरणाच्या राष्ट्रीय सार्वभौमत्व, परदेशिक अखंडत्व, स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा अवलंब, आंतरराष्ट्रीय शांततेस उत्तेजन, भारतीय वंशाच्या नागरिकांच्या हितसंबंधानचे संरक्षण, तिसऱ्या जगातील देशांच्या हितसंबंधांचे संरक्षण, अवलंबित लोकांचे स्वातंत्र्य आणि वंशाच्या आधारावरील भेदभावाचे उच्चाटन या उद्दिष्टांना अनुसरून तसेच भारताच्या अलिप्ततावाद, वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक पातळीवर शांततेसाठी उत्तेजन, चांगले शेजारी व

प्रादेशिक सहकार्य, नि:शस्त्रिकरणाला पाठिंबा, संयुक्त राष्ट्रावर विश्वास, राष्ट्रकुलाशी सौहार्य या भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या तत्वांना अनुसरूनच भारताने आपल्या शेजारी राष्ट्रांना बरोबर तसेच जगातील इतर राष्ट्रांन बरोबर आपले परराष्ट्र धोरण राबविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. या प्रकरणात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक भाग म्हणून भारताच्या परराष्ट्र धोरणाची भारताचे शेजारी राष्ट्र म्हणून पाकिस्तान, चीन, श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश व ब्रह्मदेश बरोबरचे संबंध आदी घटकांची माहिती पाहणार आहोत.

## ९.२ भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे

पंडित जवाहरलाल नेहरूंना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार मानले जाते. पंडित जवाहरलाल नेहरुननंतर थोड्याफार अंशी जरी परराष्ट्र धोरणाचे स्वरूप बदलले असले तरी आजही बऱ्याच प्रमाणात भारताचे परराष्ट्र धोरण आरंभीच्या धोरणासारखे प्रचलीत आहे असे दिसते. खालील माहितीच्या आधारे भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे स्पष्ट करण्यात आली आहेत.

### ९.२.१ अलिप्ततावाद :

अलिप्ततावाद हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र होते. या धोरणाला अनुसरूनच तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरनी जागतिक राजकारणात हे धोरण अवलंबिण्याचा निर्णय घेतला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात दोन गट निर्माण झाले होते. अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांच्या प्रभावक्षेत्राखाली बरीच राष्ट्र गेली होती. मात्र भारताने या दोन्ही गटांपैकी कोणत्याही गटात न जाता अलिप्तता धोरणाचा अंगीकार करत अलिप्ततावादी राष्ट्रांच्या स्वतंत्र गटनिर्मितिचे आशिया आफ्रिका खंडातील राष्ट्राना आवाहन केले व पुढे अलिप्ततावादी राष्ट्रांची स्वतंत्र चळवळ उभी राहिली. परिणामी अलिप्ततावाद हे भारताच्या धोरणाचे मुख्य सूत्र ठरेल.

### ९.२.२ वसाहतवाद व सम्राज्यवादला विरोध :

स्वातंत्र्यापूर्वी भारत ब्रिटिशांची वसाहत होती. भारत ब्रिटिशांची वसाहत असतांना ब्रिटिशांच्या जे भारताचे शोषण केले होते त्याचा अनुभव भरतानी घेतला होता. त्याच बरोबर आशिया, आफ्रिका खंडातील बरीच राष्ट्र युरोपीय राष्ट्रांच्या वसाहती म्हणुन युरोपीय राष्ट्रांच्या नियंत्रणात होत्या. म्हणजेच वसाहतवाद व साम्राज्यवाद हा दोन्ही गोष्टी ह्या कोणत्याही राष्ट्रांच्या दृष्टीने घातक आहेत. या गोष्टीचा कोणत्याही राष्ट्रांवर मोठ्या प्रमाणात राजकीय, आर्थिक व प्रशासकीय परिणाम होतो. म्हणुनच या वाईट गोष्टींना विरोध करण्याचा उद्देशाने भारताने आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये विरोध दर्शविला.

munotes.in

**९.२.३ वर्णभेदभावला विरोध** :

भारत जेंव्हा ब्रिटिशांच्या नियंत्रणात होता तेंव्हा ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणात वांशिक भेदभाव केला होता त्याच बरोबर जागतिक स्तरावर अमेरिका व आफ्रिकेमध्ये मोठ्या प्रमाणात वांशिक भेदभावाचे वातावरण निर्माण झाले होते. व हा वर्णद्वेष मिटविण्यासाठी मोठे लढे उभारावे लागेल होते.मोठी जीवित व वित्तहानी झाली होती. म्हणूनच भरतानी आपल्या परराष्ट्र धोरणात वर्णद्वेषाला विरोध करण्याचा निर्णय घेतला.

**९.२.४ शांततेला प्रोत्साहन**:

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात शांततेला महत्व दिले होते. मानवी जातींच्या कल्याणासाठी शांतता आवश्यक आहे असे भारताला वाटत होते. अविकसित व विकसनशील राष्ट्रांच्या अस्तित्वासाठी व विकासासाठी शांतता ही महत्त्वाची आहे म्हणूनच भारताने या आपल्या परराष्ट्र धोरणात शांततेचा अंगीकार केला होता. परराष्ट्र धोरणाच्या या तत्वाला अनुसरून भारतानी संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता व विकासाच्या तत्वावर विश्वास दाखवला होता. संयुक्त राष्ट्राचा सभासद म्हणुन प्रसंगी जागतिक तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या तत्वाला अनुसरून कोरियन युद्ध, भारत-चीन पेचप्रसंग, सुएझ पेचप्रसंग, कांगोची समस्या आदी प्रसंग शांततेच्या तत्वाला अनुसरून सोडविण्यासाठी प्रयत्न केले होते.

**९.२.५ चांगले शेजारी व प्रादेशिक सहकार्य :**

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर चांगले सहकार्य टिकविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येते. दक्षिण आशियात प्रादेशिक सहकार्य निर्माण करण्याचा उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या सार्कच्या स्थापनेत भारताची भूमिका महत्त्वाची मानली जाते. तसेच "गुजराल" धोरणाला अनुसरून शेजारील राष्ट्रांना केलेल्या मदतीही महत्वाच्या मानल्या जातात.

**९.२.६ निःशस्त्रिकारणाला पाठिंबा :**

पहिली व दुसऱ्या जागतिक महायुद्ध जगाची मोठ्या प्रमाणात हानी झाली होती. या युद्धकाळात व युधोत्तर काळात जागतिक शांतता भंग पावली होती अशा कठीण परिस्थितीत जग पुनः एकदा अमेरिका व रशिया सारख्या बलाढ्य शक्तींच्या दोन गटात विभागले होते. जगात शितयुद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. अशा कठीण परिस्थिती भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात नि:शस्त्रिकारणाला पाठिंबा दर्शविला व त्याचा नेटाने पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला.

**९.२.७ संयुक्त राष्ट्रसंघावर विश्वास :**

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपले परराष्ट्र धोरण राबवत असतांना जागतिक पातळीवर आपल्या एक वेगळ्या स्वरूपाच्या स्वतंत्र अस्तित्वाची संपूर्ण जगाला जाणीव करून दिली होती. ही कामगिरी करत असतांना भारताने जागतिक शांततेसाठी निर्माण

करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्रसंघावरही आपला पुर्ण विश्वास दाखवला होता. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या अनेक शांतता मोहिमेत ही आपला सहभाग नोंदविला होता.तसेच भारत संयुक्त राष्ट्रसंघाच्या विधायक मोहिमांमध्येही सहभागी झाला.

### ९.२.८ राष्ट्रकुलाशी सहकार्य :

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात शांतता व सहकार्याला प्राधान्य दिल्याने संयुक्त राष्ट्रसंघ, अलिप्तता चळवळ, या ठिकाणी महत्वपूर्ण कामगिरी केली होती त्याचबरोबर राष्ट्रकुल संघटनेचे सुद्धा सदस्यत्व मिळविले होते. भारताचे या ठिकाणीही परराष्ट्र धोरण महत्वाचे ठरले.

## ९.३ भारत पाकिस्तान सबंध

हिंदुस्थानाची फाळणी होवून भारत-पाकिस्तान या दोन राष्ट्रांची निर्मिती झाल्यापासून या दोन्ही राष्ट्रांचे सबंध तसे पाहिले तर सलोख्याचे नव्हते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण हिंदुस्थानच्या फळणीपासून आजतागायत या दोन्ही राष्ट्रांचे सबंध संघर्षाचेच आहेत हे आजही दिसून येते. अशा या भारत-पाकिस्तान सबंधाची माहिती खालील माहितीच्या आधारे स्पष्ट करण्यात आली आहे.

### ९.३.१ फाळणीतून निर्माण झालेले प्रश्न :

हिंदुस्थानची फाळणी होवून भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्र निर्माण झाली होती. मात्र या दोन राष्ट्रांच्या विभाजनामुळे अनेक समस्या निर्माण होवून उभय राष्ट्रांमध्ये संघर्षमय वातावरण निर्माण झाले होते.

**अ) निर्वासितांचे प्रश्न :**

हिंदुस्थानची भारत-पाकिस्तान अशी फाळणी झाल्यानंतर भारतातील मुसलमानांचे भारतातून पाकिस्तानमध्ये स्थलांतर तर पाकिस्तानातील शिख व हिंदूंचे भारतात स्थलांतर सुरू झाले होते. या स्थलांतराची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर स्थलांतरित लोकांच्या शेतजमिनी, इमाताती, बँकेतील ठेवी, अलंकार इतर मालमत्ता याबाबत तपासणी, खरेखोटपणा याची पडताळणी करणे अत्यंत कठीण काम होते. अशातच भारत सरकारने स्थलांतरित लोकांच्या नुकसानभरपाई साठी कायदा करून तसेच नुकसान भरपाई मंजूर करून हा प्रश्न निकाली लावला पुढे पाकिस्तानेही असाच निर्णय घेवून हा प्रश्न निकाली लावला.

**ब) नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न :**

भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये सिंधू व तिच्या उपनद्यांच्या पाणी वाटपावरून प्रश्न निर्माण झाला होता. रावी, बियास व सतलज या पूर्वेकडील नद्यांच्या पाण्याचा उपयोग भारताने करावा व पश्चिमेकडील सिंधू, झेलम व चिनाब नद्यांचे पाणी पाकिस्तानने वापरावे.

munotes.in

या पाणी प्रश्नावर निर्णय घेण्याकरीत पंडित जवाहरलाल नेहरू व अयुबखान तसेच बँक अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यात चर्चा व्होवून १९ सप्टेंबर १९६० रोजी 'इंडस वॉटर' करार झाला या करारानुसार पश्चिमेकडील झेलम, चिनाब व सिंधू नद्यांचे पाणी पाकिस्तानला तर रावी, बियास व सतलज नद्यांचे पाणी भारताला अशी विभागणी होणार होती. या साठी पाकिस्तानातील कालवे निर्मितीसाठी स्वतंत्र सिंधू विकास खोरे निधीची स्थापना करण्यात आली. जागतिक बँक, अमेरिका, ऑस्ट्रीया, कॅनडा, जर्मन, न्यूझीलंड व ब्रिटन आदीकडून वीतभर उपलब्ध होणार होता तसेच भारताकडून ८३.३ कोटी उपलब्ध व्हावा अशी मागणी होती. या धोरणामुळे रावी, सतलज व बियास नद्यांचे पाणी उपलब्ध होणार असल्या भारताने राजकीय चातुर्याच्या दृष्टिकोनातून होकार दिला व उभय देशांमध्ये तडजोड होवून हा प्रश्न त्या परिस्थितीला अनुसरून सुटला.

**क) सीमा प्रश्न :**

काश्मीरची सिमा वगळता पश्चिमेकडील भारत-पाकिस्तान सीमा १५०३ मैलाची तर पूर्वेकडील सीमा २०८० मैलाची होती. त्यामुळेच सुमारे १२३ लहान-लहान भारतीय प्रदेश पाकिस्तानने व तर सुमारे ७४ छोटे पाकिस्तानी प्रदेश भारतीय प्रदेशाने वेढले होते. १९५८ व १९६९ मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू व पाकिस्तानी नेते यांच्यात वाटाघाटी होवून भारत व पाकिस्तान यांच्यात समप्रमाणात विभाजन व्हावे या विभाजनाचा अनुसरून पाकिस्तानी प्रदेशाने वेढलेले कूच, बिहारचे प्रदेश भारताने पाकिस्तानला द्यावे व तसेच भारतीय प्रदेशनी वेढलेले पाकिस्तानी प्रदेश पाकिस्तानने भारताला द्यावेत याला दोन्ही राष्ट्रांनी मान्यता दिली. मात्र काश्मीर प्रश जटिल होता तो सोडविण्यासाठी पाकिस्तानने सर्व शक्तनिशी बळप्रयोगाचा अवलंब केलाव यातूनच संघर्षमय परिस्थिती उद्भवली.

**९.३.२ काश्मीरवर आक्रमण व विलीनीकरण :**

पाकिस्तानच्या परिपूर्ण निर्मितीसाठी काश्मीर आवश्यक आहे असे सुरवातीपासून पाकिस्तानला वाटत होते. तर काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे असे भारताला वाटत होते. अशा अवस्थेतच काश्मीरच्या महाराजाचे नाक दाबण्याचा काश्मीरच्या व्यापारावर बंदी घातली व याही पुढे जावून ऑक्टोबर १९४७ मध्ये उत्तरेकडील हजार व पेशावर येथील टोळ्यांना काश्मीरवर हल्ला करण्यास प्रवृत्त केले. या हल्ल्यात हल्लेखोरांनी लुटालुट, जाळपोळ, बलात्कार, कत्तली असे भयानक अत्याचार काश्मीर जनतेवर केले. हा हल्ला परतवून लावण्यासाठी महाराजा हरिसिंग यांनी भारताची मदत मागितली. तेंव्हा लॉर्ड माऊंट बॅटन यांनी आक्षेप घेवून काश्मीर भारतात विलीन झाला नसल्यामुळे भारत या संस्थानास मदत करू शकत नाही असे स्पष्ट सांगितले . हा तांत्रिक मुद्दा मिटविण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरूनी मेनन यांना तातडीने काश्मीरला पाठविले त्यामुळेच २६ ऑक्टोबर १९४७ रोजी महाराजा हरिसिंग यांनी काश्मीर भारतात विलीन झाल्याचे जाहीर केले. काश्मीरचे विलीनीकरण पुर्ण कायदेशीर असल्याने जनमताचा पाठिंबा घेण्याची गरज नाही असे पंडित जवाहरलाल नेहरुनी जाहीर केले. भारतीय सैन्य काश्मीरच्या मदतीला धावून आले. पुढे भारतीय

सैन्यानी पराक्रमाची शर्थ करत काश्मीरमधील घुसखोरांना मागे रेटत नेले त्यामुळे भारताला श्रीनगर वाचवता आले मात्र काश्मीरच्या कित्येक चौरस मैल भागात हे घुसखोर तसेस राहिले त्यामुळे हा प्रश्न पुढे भिजत राहिला.

## ९.३.३ १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध :

१४ ऑगस्ट १९४७ ला हिंदुस्थानाची फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानची निर्मिती झाली होती.तेव्हां पाकिस्तानची विभागणी भौगोलिक दृष्ट्या पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान अशा दोन गटात झाली होती. धर्माच्या आधारावर जरी पाकिस्तानची निर्मिती झाली असली तरी पाकिस्तानच्या या दोन भागात अनेक बाबतीत मतभिन्नता होती. पाकिस्तानच्या राजकारणात पश्चिम पाकिस्तानचा पगडा जास्त होता त्यामुळेच पश्चिम पाकिस्ता सातत्याने पूर्व पाकिस्तानवर अन्याय करत होता. पूर्व पाकिस्तानची संस्कृती, भाषा व आर्थिक विकास याकडे दुर्लक्ष करत होता. परिणामी पूर्व पाकिस्तानच्या लोकांच्या मनात टप्याटप्याने असंतोष निर्माण होवू लागला होता. या असंतोषाचा उद्रेक होण्यास सुरुवात झाली होती. 'अवामी लीग' या राजकीय पक्षाचे प्रमुख शेख मुजीबुर रहमान यांनी पूर्व पाकिस्तानच्या स्वायततेची मागणी केली. त्यांच्या या मागणीला पर्व पाकिस्तानमधून प्रचंड पाठिंबा मिळू लागला. १९७० च्या पाकिस्तानच्या नॅशनल असेंम्बलिमध्ये 'अवामी लीग' या पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या. या घटनेला अनुसरून अवामी लीग' या राजकीय पक्षाचे प्रमुख शेख मुजीबुर रहमान यांची पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती होणे कायद्याच्या दृष्टीने योग्य होते मात्र पाकिस्तानचे प्रचलीत अध्यक्ष जनरल याह्याखान यांनी शेख मुजीबुर रहमान यांना संधीच दिली नाही. याह्या खानच्या या निर्णयामुळे पूर्व पाकिस्तानात प्रचंड असंतोष निर्माण झाला. पश्चिम पाकिस्तानातील लोक आपणांस घटनात्मक अधिकार देण्यास तयार नाहीत असे वाटू लागले व याचाच परिणाम होवून पूर्व पाकिस्तानने स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा निर्णय घेतला व २५ मार्च १९७१ रोजी शेख मुजीबुर रहमान यांनी बांगलादेश स्वतंत्र राज्य असल्याची घोषणा केली. शेख मुजीबुर रहमान यांच्या घोषणेमुळे पूर्व व पश्चिम पाकिस्तान मध्ये यादवीला सुरवात झाली. पश्चिम पाकिस्तानमधील राज्यकर्त्यांनी पूर्व पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केले व पूर्व पाकिस्तानमधील जनतेची मुस्कटदाबी सुरू केली. अवामी लीगच्या प्रमुख नेत्यांना व कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबले व पूर्व पाकिस्तानमधील जनतेवर मोठ्याप्रमाणात अन्याय केला. पूर्व पाकिस्तानची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. पश्चिम पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचारमुळे पूर्व पाकिस्तानातील लोक जीव वाचविण्यासाठी भारतीय प्रदेशाकडे मोठया प्रमाणात धावू लागले.

१९७१ च्या शेवटापर्यंत १० लाख निर्वासित पूर्व पाकिस्तानची सीमा ओलांडून भारतात आले.निर्वासितांना नागरी सुविधा देतांना भारातपुढे प्रश्न निर्माण झाला. तेंव्हा जागतिक सत्तानी ह्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे अशी मागणी जागतिक सत्तांकडे केली. तसेच मानव्य दृष्टीने निर्वासितांना मदत केल्याचे जाहीर केले. अशातच पूर्व पाकिस्तानमधील जनतेने मुक्तवाहिनीच्या माध्यमातून संघर्ष सुरू केला. मुक्तवाहिनीच्या कडव्या प्रतिकारामुळे राज्यकर्त्यांना पूर्व पाकिस्तानचा कारभार चालविणे अशक्य होवून बसले. मात्र

निर्वासितांना भारताने आश्रय दिल्याने पाकिस्तानच्या मनात राग होताच पण भारत मुक्ती सेनेला मदत करतो असा संशय ही होता. दरम्यानच्या कालखंडात पाकिस्तानचे अमेरिकेबरोबर मित्रत्वाचे सबंध वाढले होते. परिणामी पाकिस्तानने अशा परिस्थिती भारतावर आक्रमण

केले तर पाकिस्तानला अमेरिकेची मदत होईल हे निश्चित झाले होते. म्हणूनच या परिस्थितीला शह देण्यासाठी भारताने राशियाबरोबर आपले मित्रत्वाचे सबंध प्रस्थापित केले. भारताच्या या धोरणामुळे पाकिस्तानला अमेरिका मदत करणार नाही हे निश्चित झाले होते. भारत मुक्तीवाहिनीला सर्व प्रकारची मदत करतो असा आरोप ठेवून शेवटी ३ डिसेंबर १९७१ मध्ये पाकिस्तानने अचानक भारताच्या हवाई तळावर हल्ला चढवला. भारताने चोख प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारताने ४ डिसेंबर १९७१ मध्ये घेतला. भारतीय सेना मुक्तीवाहिनीच्या मदतीने बांगलादेशात घुसली व पाकिस्तानी सैन्यावर आक्रमण केले.भारतीय सैन्यापुढे पाकिस्तानी सैन्य निष्प्रभ झाले. व पाकिस्तानी व १६ डिसेंबर १९७१ रोजी शरणागती पत्करली. अशा पद्धतीने बांगलादेश पाकिस्तानच्या नियंत्रणातून मुक्त झाला. या युद्ध विजयात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, लष्करप्रमुख जनरल माणेकशा व भारतीय सैन्यांचे योगदान महत्वाचे ठरले.

### ९.३.४ १९९९ चे कारगील युद्ध :

१९९९ चे कारगील युद्ध भारत व पाकिस्तान या दोन देशामध्ये झाले होते. या युद्धाची व्याप्ती कारगील व आजूबाजूच्या परिसरापुरती मर्यादीत होती. १९९९ मध्ये पाकिस्तानी घुसखोरांना भारतीय सीमा ओलांडून भारतीय हद्दीतील अनेक ठिकाणे काबीज केली होती. भारताने अत्यंत संयमाने हे युद्ध कारगीलपुरतेच मर्यादीत ठेवून 'ऑपरेशन विजय' या नावाने युद्धाला सुरवात करून कार्यवाही सुरू केली. भारताने २००००० सैन्य तैनात केले होते मात्र भारताने एकुण ३००००० सैन्य या युद्धासाठी वापरले. या युद्धप्रसंगी पाकिस्तानी घुसखोरांची संख्या ५००० होती. यात पाकव्याप्त सैनिकांचा ही समावेश होता. भारतीय वायुसेनेनेही 'ऑपरेशन सफेदसागर सुरू करून पाकिस्तानी घुसखोरांना धडा शिकवला. भारताच्या कारगील विजयाने पाकिस्तानवर पुनः एकदा नामुष्कीची वेळ आली.

एकंदरीत वरील सर्व माहितीच्या आधारे असे दिसून येते की हिंदुस्थानच्या फळणीपासून भारत-पाकिस्तान या उभय राष्ट्रनमध्ये सलोख्याचे वतातवरण नाही. निर्वासितांचा प्रश्न, पाणीवाटपाचा प्रश्न, १९६५ चे भारत-पाकिस्तान युध्द, १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध, कारगील युद्ध तदनंतर घडून आलेला सर्जिकल स्ट्राईक हे हा दोन राष्ट्रांचे संघर्षमय परिस्थितीचे दाखले आहे.

## ९.४ भारत-चीन संबंधाची माहिती

आशिया खंडातील दोन मोठे शेजारी राष्ट्र म्हणुन चीन व भारताकडे पाहिले जाते. जेंव्हा भारत ब्रिटिशांच्या बंधनातून मुक्त झाला, स्वतंत्र झाला तेव्हां भारताने चीनच्या राष्ट्रवादी सरकारशी राजनैतिक संबंध प्रस्तापित केले. तसेच चीनमधील राष्ट्रवादी सरकार

उलथून १९४९ मध्ये साम्यवादी विचारसरणीचे सरकार प्रस्तापित झाले तेंव्हा भारताने चीनच्या या नव्या सरकारला राजनैतिक मान्यता दिली. पंडित भारत जवाहरलाल नेहरुच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत चीन-भारत संबंधात आपणांस मोठ्याप्रमाणात चढउतार पहावयास मिळतात. 'हिंदी-चिनी- भाई-भाई' या मित्रत्वाच्या नात्यापासून ते पुढे परस्पर कट्टर द्वेषभावापर्यंतचची चढउताराची परिस्थिती आपणांस या दोन राष्ट्रांच्या संबंधांमध्ये पहावयास मिळते. खालील माहितीच्या आधारे आपण ही परिस्थिती जाणून घेणार आहोत.

### ९.४.१ कोरिया प्रश्न:

भारत व चीन ही दोन्हीं राष्ट्रे सुरवातीला राजनैतिक दृष्ट्या एकत्र आली होती पण कोरियन प्रश्नावरून ह्या दोन राष्ट्रांचे सबंध ताणले गेले होते. जेंव्हा उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर हल्ला केला तेव्हां भारताने या घटनेचा निषेध केला तसेच संयुक्त राष्ट्रांच्या कोरिया बाबतच्या भूमिकेला पाठिंबा दिला.भारताच्या या भूमिकेमुळे चीन संतप्त झाला. मात्र चीनच्या युध्द प्रवेशाचे कारण सकारात्मक असल्याचे भरतानी स्पष्ट केले. तसेच १९५२ मध्ये कोरियन युद्धातील भारताची मध्यस्थी मान्य केली. भारताने सुचविलेल्या अटींवर युद्धबंदी करण्याची तयारी दर्शविली.

### ९.४.२ तिबेट प्रश्न :

तिबेट प्रश्न भारत व चीन या दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा होता. जेंव्हा चीनमध्ये साम्यवादी सरकार स्थापन झाले तेंव्हा या सरकारला असे वाटत होते की तिबेट आपल्या ताब्यात यावा. या साठी प्रचलीत सरकारने निर्धार करून तिबेट मुक्तीसाठी आपले सैन्य तिबेटमध्ये पाठविले. भारताच्या सीमेजवळ असणाऱ्या लष्करी कारवाईमुळे भारत मात्र अस्वस्थ झाला. मात्र भारताने सावध पवित्रा घेत भारताचे तिबेटमधील अधिकार कायम ठेवण्यासाठी एक खलिता पाठविला. या खलित्यात असे नमुद करण्यात आले होते की, "भारतात तिबेटमध्ये कोणताही राजकिय, प्रादेशिक अथवा प्रशासकीय अधिकार नको फक्त भारताचा तिबेटमध्ये सुरू असणारा व्यापार कायम सुरू राहावा." २३ मे १९५१ मध्ये चीन-तिबेट करार झाला व या कराराला अनुसरून तिबेटने चीनचे वर्चस्व मान्य केले. भारतालाही शेवटी तिबेटशी चाललेला व्यापार मागे घ्यावा लागला. तेंव्हा भारताची लष्करी व आर्थिक परिस्थिती कमजोर असल्यासने भारताला चीनवर कारवाई करणे शक्य नव्हते तसेच हिमालय सीमा रक्षणासाठी चीन बरोबर शांतता व सहजीवन तत्व सुरू ठेवणे आवश्यक होते. असे जरी असले तरी तिबेट प्रश्नाने भारताला चीनने जी वागणूक दिली हो ती भारताच्या कायमस्वरूपी लक्षात राहिली.

### ९.४.३ भारताचा चीन बाबत सावध पवित्रा :

भारताने सुरवातीपासून चीन बरोबर मित्रत्वाचे धोरण प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे १५९५० ते १९५८ या कालखंडात भारताची चीन बरोबर मैत्री असावी यासाठी प्रयत्न केले. कोरियन युद्धात चीन उतरल्यानंतर पाश्चिमात्य राष्ट्रांनी १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मांडला तेंव्हा भारताने चीनला

मदत करण्यासाठी भारताने चीनची बाजू घेण्यासाठी ठरावाच्या विरोधात मतदान केले. याच कालखंडात चीनचे चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय चार वेळा भारतात आले तेव्हां त्यांच्या प्रत्येक भेटीत भारताने त्यांचे हार्दिक स्वागत केले. गोवा मुक्तीच्या वेळी चीनने भारताला उघड उघड पाठिंबा दिला. याहीपुढे जावून जानेवारी १९५७ मध्ये काश्मीर विषयी अमेरिकेने संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीत मांडलेली भारत विरोधी ठरावाला चीनने कडाडून विरोध केला एकंदरीत या सर्व घटनांचा विचार केला तर या दोन्ही राष्ट्रांच्या दृढता निर्माण होईल अशी अशी परिस्थिती होती. पुढे चीनने आपली भूमिका बदलल्यामुळे पुढे या मैत्रित तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

### ९.४.४ भारत-चीन संबंधात दुरावा :

चीनमध्ये साम्यवादी सरकार आल्या नंतर चीनने ताबडतोब कठोर निर्णय घेण्यास सुरुवात केली. सिकीयांग मधील 'काशगर' येथील कौन्सुल जनरलला भारताने परत आपल्या देशात बोलवावे असे चीनने भारत सरकारला कळविले. भारताच्या ल्हासा येथील पोलिटिकल एजंटलाही तेथे राहण्याची परवानगी नाकारण्यात अली. चीनने काही नकाशे प्रकाशित केले होते त्या नकाशात भारत-चीन सीमेनुसार ५०,००० चौरस मैलाचा भारतीय प्रदेश चीनचा असल्याचे दर्शविण्यात आले होते. या व्यतिरिक्त चीनने चायना पिक्टोरियलच्या ग्रंथात पुनः एकदा विवादात्मक नकाशे प्रकाशित केले मात्र या चीनच्या कृतीचा भारताने निषेध केला. तिबेट प्रश्न, तिबेट मध्ये व्यापार करण्यास बंदी, तिबेटमधील लोकांवर अन्याय, तिबेटमधील ३०००० लोक भारताच्या आश्रयाला येणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत चीन दडपशाहीच्या निषेधाचा ठराव पास होवूनही चीनने त्याची दखल न घेणे, दलाई लामाचे भारतात आश्रयाला येणे अशा संवेदनशिल घटना घडत असताना त्याचा चीनवर कोणताही परिणाम होत नव्हता. चीनच्या या अन्यायकारक धोरणामुळेच भारत-चीन संबंधात दुरावा निर्माण झाला होता.

### ९.४.५ चीनच्या धोरणात बदल :

भारताने चीनबरोबर आपले मित्रत्वाचे सबंध टाकावेत म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न केले होते मात्र चीन आपली अडमुठेपणाची भूमिका सोडायला तयार नव्हता. उलट चीन दिवसेंदिवस भारताच्या विरोधात आपली आक्रमक भूमिका घेवू लागला होता. चीनचे पंतप्रधान चाऊ- एन-लाय १९६० मध्ये दिल्लीला आले. तेव्हां त्यांनी अकसाई चीनवरील आपला हक्क कधीही सोडणार नाही हे स्पष्ट केले. म्हणजे भारताने लडाख जवळील अकसाईवर पाणी सोडणे त्या मोबदल्यात चीनने भारताला नेफाचा प्रदेश भारताला द्यावा. पंडित जवाहरलाल नेहरुनी हा निर्णय घेतला असता तर कदाचीत भारतीय जनतेला हे पटले नसते. चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय व भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या चर्चेतून एक गोष्ट निष्पन्न झाली की सदर प्रकरणाबाबत दोन्ही राष्ट्रांनी पुरावे पडताळून पाहावे व नंतर या प्रकरणाबाबत निर्णय घ्यावा. भारताने सहा महिने पुरावे जमा केले मात्र चीनने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. उलट हे दोन्ही प्रदेश ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला.

munotes.in

### ९.४.६ चीनचे आक्रमण :

चीन व भारत यांच्या चर्चेत विसंवाद निर्माण झाल्यानंतर संघर्षमय परिस्थिती निर्माण झाली होती. चीनने भारताच्या विरोधात हल्ला करण्याची योजना अगोदरपासून केली होती. भारताला कोणतीही संधी न देता ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. चीनने या आक्रमणात सुरवातीला खिंझेमाने व ढोला ही ठिकाणे जिंकली. भारताने चिनी सैन्याना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण या प्रतिकारात भारतीय सैन्याची दाणादाण उडाली. या प्रतिकारात भारतीय सैनिकांच्या फळ्या कोलमडून पडल्या. एका महिन्यातच चीनी सैन्य प्रचंड प्रदेश काबीज करत मॅकमोहन रेषेपर्यंत येवून पोहचले. नेफाचा मोठा प्रदेश जिंकून चिनने लडाखच्या प्रदेश काबीज केला व २० नोव्हेंबर २९६२ रोजी चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली.चीनने एकतर्फी युद्ध बंद करण्याची दोन करणे होती पाहिले कारण म्हणजे आफ्रो-आशियायी राष्ट्रांकडून चीनला पाठींबा मिळविणे व सोव्हिएत संघाने चीनवर युद्धबंदीचे दडपण आणू नये.

अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्र मंत्री असताना चीन दौरा केल्यानंतर उभय राष्ट्रानमध्ये उच्यस्तरावर भेटी सुरू झाल्या. भारतात सत्तान्तर होवून काँग्रेस सत्तेवर आले. पंतप्रधान इंदिरा गांधींनी चिन बरोबर नव्याने संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू केले. याच कालखंडात चीनचे उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री भारत दौऱ्यावर आले व चीन-भारत वाद समोपचाराने मिटविण्याची तयारी दर्शविली. दरम्यानच्या कालखंडात मात्र इंदिरा गांधींनचा मृत्यू झाल्याने या चर्चेत खंड पडला. पुढे भारताच्या पंतप्रधानपदी राजीव गांधींची नियुक्ती झाली. या कालखंडात पुनः चीनी परराष्ट्र मंत्र्यांच्या भेटी वाढल्या व उभय देशांमध्ये व्यापारी सबंध वाढीस लागले. १९८६ मध्ये इंडियन चेंबर्स ऑफ कोमर्सच्या प्रतिनिधी मंडळाने चीनला भेट दिली तसेच पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीनला भेट दिली. परिणाम उभय देशांमध्ये व्यापारी व आर्थिक सबंध वृद्धिंगत झाले.

## ९.५ भारत श्रीलंका संबंध

भारत-श्रीलंका संबंधाचा विचार करता सुरुवातीला हे सबंध अत्यंत क्लिष्ठ होते. एकमेकांच एकमेकांवर विश्वास नव्हता. अशातच श्रीलंका व ब्रिटिशांचे मित्रत्वाचे सबंध होते त्यामुळे भारत सुरवातीपासूनच श्रीलंके बाबत सावध होता. १९५५ मध्ये बांडुंग परिषदेत श्रीलंकेचे पंतप्रधान कोटेलवाला यांनी असे स्पष्ट केले की, 'पाश्चिमात्य साम्राज्यवाद' व 'सोव्हिएततांचा वसाहतवाद' यात आम्हाला काहीही फरक पडत नाही. त्यामुळे पंचशिलातील सर्व तत्व आमच्या दृष्टीने अव्यवहार्य आहेत. याही पुढे जावून श्रीलंकेमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांवर श्रीलंका मोठ्याप्रमाणात सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्वरूपाचे अन्याय करत होती परिणामी या पार्श्वभूमीमुळे उभय राष्ट्रांच्या सबंधामध्ये दरी निर्माण झाली होती. या कालखंडात सिंहली तामिळ लोक यांच्यातील संघर्ष पराकोटीला पोहचला होता. सिंहली म्हणजे श्रीलंकेती मुळ लोक व तामिळ म्हणजे भारतातून श्रीलंकेत स्थायिक झालेले लोक. या दोन गटात वांशिक संघर्ष निर्माण झाला होता. या वादातून शेकडो तामिळाची हत्या झाली होती. यातूनच तामिळ फुटीरवादाचा जन्म झाला. व या फुटीरवादातून श्रीलंकेच्या उत्तरेकडे असणाऱ्या

बहुसंख्य तामिळ प्रदेशाला स्वायत्तता मिळावी अशी मागणी वाढू लागली. तामिळ बंडखोरांचा बंदोबस्त करणे श्रीलंकेला अवघड होते म्हणूनच चीन, इंग्लंड, इस्त्रायल व अमेरिकेची श्रीलंका मदत घेत आहे अशा वाईट बातम्या भारताला ऐकू येवू लागल्या. तसेच परकीय सत्तानी जर नाविक दल उभारले तर ती भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे याची जाणीव भारताला झाली. म्हणूनच भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८५ मध्ये प्रयत्न केले. व भुतांची राजधानी थिम्पू येथे श्रीलंका सरकार व बंडखोर यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. या वाटाघाटी सुरू असतांनाच १९८५ मध्ये श्रीलंका अध्यक्षाची हत्या झाली. व वाटाघाटी फिस्कटल्या. त्यामुळे आजही हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.

## ९.६ भारत-नेपाळ सबंध

भारताच्या उत्तर सीमेवरील एक छोटेसे राष्ट्र म्हणजे नेपाळ. नेपाळला विशिष्ट भौगोलिक परिस्थिती लाभल्याने भारताला आपले परराष्ट्र धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी भारताला नेपाळची मदत आवश्यक होती. या दोन राष्ट्रातील सबंध खालील माहितीच्या आधारे स्पष्ट करण्यात आले आहेत. सुरवातीला भारतासमोर आर्थिक समस्या गंभीर असतांना नेपाळला भारताने दीडशे कोटींची मदत केली होती. असे असूनही भारतामध्ये सिक्कीम विलीन केल्यानंतर नेपाळने भारतावर प्रखर टीका केली. मात्र १९७१ मध्ये भारत - मैत्री करार झाल्यानंतर नेपाळ शुद्धीवर आला व लगेचच नेपाळने भारताबरोबर मैत्रीचे नूतनीकरण केले. व या नुतनीकरणाला अनुसरून भारताने नेपाळाला व्यापार, आरोग्य, शिक्षण, कृषी व वणारक्षण या गोष्टींन साठी मदत देण्याचा निर्णय घेतला. नेपाळचे राजे महेंद्रच्या मृत्यू नंतर राजे वीरेंद्र हे राजे झाले. तेंव्हा नेपाळ-भारत संबंध पुनः एकदा दृढ झाले. अशातच भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई नेपाळ दौऱ्यावर गेले व उभय राष्ट्रात नव्याने व्यापारी करार झाले.

चीन व पाकिस्तानने नेपाळच्या सुरक्षिततेची संयुक्त तयारी दर्शविली तशीच तयारी भारताने दर्शवावी अशी मागणी नेपाळने भारताकडे केली. भारत व नेपाळ यांच्यामध्ये द्विपक्षीय करार असल्याने अशा कराराची गरज नाही असे भारताने नेपाळला स्पष्ट सांगितले. अशातच १९८५ मध्ये काठमांडू येथे भयानक बॉंबस्फोट झाला या बॉम्बस्फोट मध्ये भारताचा हात असावा असा अपप्रचार काही विरोधी शक्तीने केला मात्र नंतर भारताने हे आरोप चुकीचे आहेत हे पुराव्यानिशी स्पष्ट केले.

## ९.७ भारत अफगाणिस्तान संबंध

हिंदुस्थानची फाळणी झाल्यानंतर भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्र निर्माण झाली त्यामुळे अफगाणिस्तान च्या सीमा भारताला संलग्न जरी राहिल्या नसल्या तरी या दोन्ही राष्ट्रांचे सबंध मित्रत्वाचे होते.दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्ती नंतर जग जेंव्हा दोन गटात विभागले गेले होते तेंव्हा अफगाणिस्तानने कोणत्याही गटात सामील न होता अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानचे हे धोरण भारताच्या अलिप्तता धोरणाशी जुळणारे होते.

अफगाणिस्तानमध्ये वाढलेल्या आंतरराष्ट्रीय संबंधामुळे भारताने अत्यंत कार्यक्षमतेने अफगाणिस्तान बरोबरचे संबंध टिकविण्यात यश संपादन केले होते. सुरवातीला अफगाणिस्तानात दाऊदची सत्ता जाऊन तराकीची सत्ता आली होती. त्यामुळे बगतातने अफगाणिस्तान बाबत अलिप्तता बाळगली होती. मात्र भारतात सत्तान्तर होवून जेंव्हा जनता पक्षाचे सरकार आले तेव्हां परराष्ट्र मंत्री अटलबिहारी वाजपेयी अफगाणिस्तान भेटीला गेले व त्यांनी अफगाणिस्तान बरोबर मित्रत्वाचे सबंध कायम राहतील हे स्पष्ट केले. पण अलपवधीतच अफगाणिस्तान परिस्थिती बदलली. १९८९ मध्ये अफगाणिस्तानमध्ये भेटीला गेले व त्यांनी अफगाणिस्तान बरोबर मित्रत्वाचे सबंध कायम राहतील हे स्पष्ट केले. पण अलपवधीतच अफगाणिस्तान परिस्थिती बदलली. १९८९ मध्ये अफगाणिस्तानमध्ये राजकीय क्रांती घडून आली. व अफगाणिस्तान मध्ये अमीनची सत्ता उलथून थे बब्राककर्मालची सत्ता आली. तेंव्हा त्यांनी आपल्या मदतीसाठी रशियन लष्कराला पाचारण केले. या गोष्टीला अमेरिका, चीन व पाकिस्तानने विरोध केला. याही पुढे जावून अमेरिका व चीनने रशियाशी लढण्यासाठी अफगाणिस्तानला शस्त्रास्त पुरविण्याची मदत सुरू केली. पाकिस्तानी हद्दीत लष्करी छावण्या सुरू झाल्या. अशा कठीण परिस्थिती भारतात सत्तान्तर झाले होते. काँग्रेस सत्तेवर आला होता. पंतप्रधान इंदिरा गांधींनी सत्तेची सूत्रे घेतल्यानंतर सर्वप्रथम रशियाला अफगाणिस्तानातून सैन्य माघारी घेण्याची वारंवार विनंती केली. तसेच अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्राने अफगाण बंडखोरांना शस्त्रे पुरवूनयेत असे स्पष्ट सांगितले. अफगाणिस्तान प्रश्न तेथील दोन गटाने परस्पर सामोपचाराने हाताळावा अशी विनंती अफगाणिस्तानमधील लोकांना केली. अलिप्ततावादी राष्ट्रांच्या गटाला अनुसरून अफगाणिस्तान प्रश्न हाताळण्यात यावा अशी भूमिका भारताने संयुक्त राष्ट्रसंघात मांडली. त्याला इंग्लंड व फ्रान्सने पाठिंबा दिला. या कठीण प्रसंगात भारताचे अफगाणिस्तानला सहकार्य मोलाचे ठरले. त्यामुळेच उभय राष्ट्रात मैत्रीचे संबंध टिकण्यास मदत झाली.

## ९.८ भारत भूतान सबंध

भारताने भूतान बरोबर आपले सबंध प्रस्तापित करण्यासाठी सर्वप्रथम ८ ऑगस्ट १९४९ रोजी कायम शांतता व मैत्री या घटकांवर आधारीत करार केला. व येथूनच उभय राष्ट्रांच्या सहसंबंधाला सुरवात झाली होती. चीनकडून आपणांस सर्वाधिक धोका आहे याची जाणीव भूतानला होती. अशातच १९६४ मध्ये भूतानचे प्रधानमंत्री दोर्जी यांची हत्या झाली. या हत्येनंतर दुसऱ्याच वर्षी भूताच्या नरेशवर हल्ला झाला. याच पार्श्वभूमीवर भूतान नरेश वांगचूक भारत भेटीला आले. तेंव्हा भारताने त्यांना भूतानच्या सुरक्षिततेे बाबत सर्वतोपरी जबाबदारीचे आश्वासन दिले. याच कालखंडात चीनी सैन्याने भूतानच्या डोकलांच्या गवताळ भागालोकांना त्रास देण्यास सुरुवात केली. याची तक्रार भारताने संयुक्त राष्ट्रसंघाकडे केली. त्या तक्रारीस भूतानने ही दुजोरा दिला. याही पुढे जावून भूतानाला संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासदत्व मिळावे यासाठी भारताने प्रयत्न केले. १९७२ मध्ये भारताने भूतानला रस्ते, कालवे, दळणवळण, आरोग्य, शिक्षण, लघुउद्योग यासाठी मदत करण्याचे मान्य केले. १९८३ मध्ये उभय राष्ट्रात मोठा व्यापारी करार

munotes.in

घडून आला. १९८५ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी भूताना भेट देवून भारत भूतान सबंध अधिक दृढ केले.

## ९.९ भारत बांगलादेश संबंध

पाकिस्तानच्या विभाजनातून बांगला देशाचा १९७१ मध्ये जन्म झाला. म्हणजेच पूर्व पाकिस्तान विभाजित होवून बांगला देशाची निर्मिती झाली. पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचाराविरोधात भारताने पूर्व पाकिस्तान मधील जनतेला मदत केल्यामुळे बांगला देशाला सुरावतीला भारताबद्दल कृतज्ञता होती. जो पर्यंत शेख मुजीब हे बांगलादेशाचे अध्यक्ष होते तो पर्यंत या दोन्ही राष्ट्रात अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. परंतु १९७५ मध्ये शेख मुजीब व त्यांच्या कुटुंबीयांची असंतुष्ट लष्करानी निर्घृण हत्या करण्यात आली व सत्ता ताब्यात घेण्यात आली. लष्कराच्या या धोरणामुळे बांगलादेशात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. अमेरिका, पाकिस्तान व चीन या तीन राष्ट्रांनी बंगाल देशातील अस्थिरतेचा फायदा घेत बांगला देशात भारत विरोधी वातावरण निर्माण केले व भारत विरोधी वातावरण निर्माण झाल्या नंतर त्यांनी बांगलादेशात आपले अस्तित्व निर्माण करण्यास सुरवात केली. याचाच विपरीत परिणाम होवून भारत-बांगलादेश सीमेजवळ संघर्षमय वातावरण निर्माण झाले. पराक्का जवळ गंगा नदीच्या पाण्याच्या वाटपाचा प्रश्न, सीमा निर्धारण प्रश्न, भारत येणाऱ्या निर्वासितांचा प्रश्न, नागा व मिझो येथील बंडखोरांना होणारी मदत असे अनेक प्रश्न निर्माण झाले व हे प्रश्न अनुत्तरित राहिले. मात्र असे असतानाही भारताने बांगलादेशा बरोबर आपले चांगले संबंध सातत्याने प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. वरील प्रलंबित प्रश्न निकाली लावण्यासाठी भारताचे सातत्याने प्रयत्न सुरू होते. गंगा पाणी वाटप वाद निकाली लावण्यासाठी उभय देशांमध्ये संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. तसेच नागा व मिझो बंडखोरांचा प्रतिबंध करण्याचे बांगला देशांनी मान्य केले. भारत-बांगला देश मैत्री दृढ व्हावी म्हणून भारताचे तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी १९७८ मध्ये बंगाला देशाला भेट दिली. पुढे कॉंग्रेसचे सरकार सत्तेवर आल्यानंतर १९८० मध्ये भारत व बांगला देशामध्ये करार होवून सीमा निर्धारण, रेल्वे, दळणवळण सोई व संस्कृतिक सहकार्य या घटकांना अनुसरून सतत तीन वर्षे उच्चस्तरीय बैठका घेण्यात याव्यात असे ठरविण्यात आले. १९८२ मध्ये बांगला देशाचे नेतृत्व जनरल इर्शाद यांच्या हाती आले. त्यांनी लष्करी कायदा करून सुधारणांकडे लक्ष देण्याची निर्णय घेतला. बांगलादेशाच्या बदलत्या परिस्थितीला अनुसरून पुनः एकदा बांगलादेशाला मदत करण्याचा निर्णय भारताने घेतला. १९८५ मध्ये जेंव्हा बांगलादेशा मध्ये पूर येवून बांगला देशाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते तेंव्हा भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी स्वतः बांगलादेशच्या दौऱ्यावर गेले होते. व त्यांनी या कठीण प्रसंगी बांगला देशाला मोठ्या प्रमाणात मदत करण्याचे जाहीर केले होते. या मदतीमुळे भारत-बांगला देश मित्रत्वाचे सबंध सुधारण्यास मदत झाली. या कालखंडात बांगला देशाने भारत पुरस्कृत सार्क परिषदेचे सदस्यत्व स्वीकारले. या नंतर अजून एक महत्त्वाची घटना घडली ती म्हणजे सार्क परिषदेची बैठक बांगला देशाची राजधानी ढाका येथे आयोजित करण्यात आली व या परिषदेचे अध्यक्षपद इर्शाद यांना

देण्यात आले. या सर्वच घडामोडींमुळे भारत- बांगलादेश संबंध पुनः एकदा दृढ होण्यास मदत झाली.

## ९.१० भारत ब्रह्मदेश संबंध

ब्राम्हदेश भारताचे शेजारी राष्ट्र असून ब्रह्मदेशाचा सुमारे ९०० मैलाचा सीमा संलग्न भाग भारताला जोडला आहे. ब्रह्मदेशाला ब्रिटिशांच्या बंधनातून मुक्त होण्याची प्रेरणा भारताकडून मिळाली. ४ जानेवारी १९४८ मध्ये ब्राम्हदेश स्वतंत्र झाला. भारत-ब्रह्मदेशन व्यापाराच्या निमित्ताने ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या नागरिकांचा प्रश्न उभय राष्ट्रांनी विचार विनिमय करून सोडविला. जेंव्हा भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी ब्रह्मदेशाच्या दौऱ्यावर गेल्या होत्या तेव्हां ब्रम्हदेश सरकार बरोबर वाटाघाटी करून सुमारे आठ हजार परदेशी नागरिकांना ब्रम्हदेशाचे नागरिकत्व मिळवून देण्यात त्यांना यश आले होते. या साठ हजार नागरिकांन पैकी बहुतेक नागरिक हे भारतीय होते. ब्रम्हदेश-भारत यांच्यामध्ये एक वादाचा मुद्दा म्हणजे सीमा निर्धारित करण्याचा. म्हणजेच नागा व मिझो बंडखोरांनी भारतात निर्माण केलेल्या असंतोषाचा. या प्रश्नावर दोन्ही राष्ट्रांनी सीमा करार करून एक समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतला व हा प्रश्न मिटविण्यासाठी प्रयत्न केले. तसेच १९८९० मध्ये ब्रह्मदेशाच्या नव्या २१ प्रकल्पांना भारताने मदत करण्याचे आश्वासन दिले. परिणामी या दोन राष्ट्रांचे सबंध दृढ होण्यास मदत झाली.

## ९.११ सारांश

भारत आणि भारताच्या शेजारील राष्ट्रांचा विचार करत असतांना आपण भारता शेजारील राष्ट्रे म्हणून पाकिस्तान, चीन, श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश व ब्रह्मदेश या राष्ट्रांचा विचार केला. या सर्वच राष्ट्रांबरोबर आपल्या पंचशील तत्वाला अनुसरून आपले परराष्ट्र धोरण राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. या सहसंबंधाचा विचार करत असतांना चीन व पाकिस्तानचे कटू अनुभव वगळता इतर शेजारी राष्ट्रांबरोबरचे भारताचे सबंध हे शांततेचे व सहकार्याचे होते. अनेक राष्ट्रांबाबरोबरचे वादग्रस्त प्रश्न भारताने वाटाघाटीने सोडविले. श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश व ब्रम्हदेश या राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. या देशातील निर्वासितांना मदत केली. सार्क परिषद व संयुक्तराष्ट्रसंघ या ठिकाणी या राष्ट्रांचे प्रश्न मांडण्यासाठी मदत केली. विशेष म्हणजे कोणत्याही राष्ट्रावर स्वतः कुरघोडी न करता जर दुसऱ्या राष्ट्राने कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तर त्या गोष्टीला प्रतिकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न केला. परिणामतः चीन व पाकिस्तान वगळता भारताचे शेजारील राष्ट्रांबरोबरचे सबंध अत्यंत सलोख्याचे होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## ९.१२ प्रश्न

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे स्पष्ट करा.

२. भारत-पाकिस्तान सबंधावर एक दृष्टिक्षेप टाका.

३. भारत-चीन संबंधाचा आढावा घ्या.

४. भारत-श्रीलंका सबंधाची माहिती स्पष्ट करा.

५. भारत- अफगाणिस्तान संबंधावर चर्चा करा.

६. भारत-भूतान संबंधाचे सविस्तर विवेचन करा.

७. भारत-बांगलादेश संबंधावर भाष्य करा.

८. भारत-ब्रह्मदेश संबंधाची चर्चा करा.

## ९.१३ संदर्भ

१. डॉ. एन. एस. तांबोळी, व्ही. पी. पवार - आधुनिक भारत.

२. कठारे अनिल - आधुनिक भारताचा इतिहास.

३. डॉ मधुकर पाटील, डॉ. सुनील अमृतकर - समकालीन भारत.

४. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक भारत.

५. डॉ. एन. एस. तांबोळी - आधुनिक जग

६. के. सागर - आधुनिक भारताचा इतिहास.

❖❖❖❖

munotes.in

# १०

## उदारीकरण

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ उदारीकरण म्हणजे काय?

१०.३ भारतातील उदारीकरण

१०.४ भारताने उदारीकरण स्वीकारण्याची कारणे

१०.५ उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे

१०.५.१ 1991 नंतर झालेले बदल

१०.५.२ उद्योग क्षेत्रात झालेले बदल

१०.५.३ करविषयक सुधारणा

१०.५.४ बँकिंग क्षेत्रातील सुधारणा

१०.५.५ विमा क्षेत्रातील सुधारणा

१०.५.६ अप्रत्यक्ष करातील सुधारणा

१०.५.७ विदेशी विनिमयातील सुधारणा

१०.५.८ कृषी क्षेत्रातील सुधारणा

१०.६ उदारीकरणातून अपेक्षाभंग

१०.७ उदारीकरण होऊनही भारत मागे का ?

१०.८ उदारीकरणाने विषमता वाढली?

१०.९ सारांश

१०.१० प्रश्न

१०.११ संदर्भ

munotes.in

## १०.० उद्दिष्टे

१. भारतातील उदारीकरण धोरणाचा मागोवा घेण.

२. उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे स्पष्ट करणे.

३. उद्योग क्षेत्रात झालेल्या सुधारणाचा आढावा घेणे.

४. उदारीकरणांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

५. उदारीकरण होऊनही भारत मागे का ? याचा उलगडा करणे.

## १०.१ प्रस्तावना

१९८० नंतर जगातील अनेक राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत शिथिलीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांचा स्वीकार केला. उदारीकरण म्हणजे आपल्या देशाचा जगातील इतर राष्ट्रांशी खुला व्यापार असणे आणि देशांतर्गत खाजगी क्षेत्रावर कोणतेही बंधन नसणे होय. सीमाशुल्क आणि वाटप पद्धती नष्ट करणे हा शिथिलीकरणा मागचा हेतू आहे. उदारीकरणाची संकल्पना ही बाजार यंत्रणा आणि खुला (मुक्त) बाजार आणि मुक्त स्पर्धा यांवर आधारित आहे. म्हणून उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला जातो. थोडक्यात सरकारने मुख्यतः आयात निर्यात, उत्पादन यांवर कोणत्याही प्रकारचा निर्बंध लादू नयेत. अनावश्यक नियंत्रणे दूर करावीत बाजारपेठेत किंमत यंत्रणेच्या माध्यमाने जसे व्यवहार होतील त्यावर निर्बंध आणू नयेत. अर्थव्यवस्थेत अधिक स्पर्धा आणि कार्यक्षमता असावी, विदेशी विनिमय बाजार, वित्तीय बाजार, शेतमालाचा बाजार इत्यादी बाबतचे अडथळे दूर करणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. आर्थिक उदारीकरण स्वीकारल्यास किंवा बाजाराधिष्ठित किंमत यंत्रणेतील अडथळे दूर केल्यास अर्थव्यवस्थेची स्पर्धा शक्ती, कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते. परिणामी राष्ट्रीय उत्पादन जलद गतीने वाढते. थोडक्यात आर्थिक उदारीकरणाद्वारे अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा केली जाते. आर्थिक उदारीकरण म्हणजे सरकारी नियंत्रण आणि हस्तक्षेप कमीत-कमी असा अर्थ आहे. 24 जुलै 1991 रोजी मा. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी परमिटराज- समाप्तीची घोषणा केली आणि भारतात उदारीकरणाला सुरुवात झाली. उदारीकरणाला सुरुवात होऊन आता तीन दशकांचा काळ लोटतो आहे. या तीन दशकात आपण काय कमावलं आणि काय गमावलं याचा लेखाजोखा मांडला तर आपले चुकले कुठे आणि अजून काय केलं तर पुढील दशकात भारत एक सशक्त महासत्ता होऊ शकेल याचा उहापोह करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

## १०.२ उदारीकरण म्हणजे काय ?

उदारीकरण ही संकल्पना व्यापक असल्याने त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. ही संकल्पना अर्थव्यवस्थेतील व्यापक स्वरुपाच्या आर्थिक सुधारणांची प्रक्रिया आहे.

१) डॉ. व्ही. एम्. अत्री - आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे निर्यातीस आणि आयातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्ठीत किंमतयंत्रणेचा स्वीकार केला जातो.

२) डॉ. एस रामनजनेयुल आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात, निर्यात आणि उत्पादक गुंतवणुकीवरील अनिष्ट निबंध, नियंत्रणे, परवाने शिथिल करणे होय. अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा वाढीला लावण्यासाठी, बाजाराधिष्ठीत किंमत यंत्रणेचा स्वीकार, ही यंत्रणा म्हणजे मागणीपुरवठा यांच्या आधारे उत्पादन व उपयोग याबाबतचे निर्णय घेणारी यंत्रणा होय. ती अधिक सुलभ झाली तर अर्थव्यवस्थेची गती वाढते. त्यासाठी सरकारने बाजारव्यवस्थेतील आपला हस्तक्षेप क्रमाक्रमाने कमी करणे आणि खुल्या स्पर्धेला वाव देणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.

उदारीकरण हा शब्द अर्थ व्यवस्थेच्या संदर्भात आपण वापरणार आहोत. अर्थव्यवस्थेच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारणे म्हणजे उदारीकरण. उदार धोरण म्हणजे मुक्त अर्थ व्यवस्थेचे धोरण, खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण - थोडक्यात उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था खुली करणे. किंमतींवरचे सरकारी नियत्रण काढून टाकणे, परवाने आणि लायसन्स ची पद्धत रद्द करणे, परकीय भांडवलाचे स्वागत करणे. उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था देशी आणि विदेशी खाजगी संस्थांसाठी खुली करणे.

उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील शासकीय हस्तक्षेप व नियंत्रण कमी करण्याकडे कल असणाऱ्या धोरणांचा अवलंब करणारी प्रक्रिया होय. या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेमध्ये खासगी क्षेत्राला अधिक सहभागी करून घेण्यात येते. सामान्यपणे, या धोरणांमध्ये उद्योगधंद्यांच्या खासगीकरणावर भर देण्यात येतो.

देशात स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी व्यवसायाला प्रोत्साहन देणे हा उदारीकरणाचा अर्थ आहे. यासाठी उद्योगांवरील काही कठोर निर्बंध त्यांच्या अधिकारक्षेत्रातून काढून टाकणे. खाजगी आणि परदेशी गुंतवणुकीचा विस्तार करण्यासाठी नियम शिथिल करणे म्हणजे उदारीकरण होय.

## १०.३ भारतातील उदारीकरण

भारतासारख्या देशांनी साम्यवादी व्यवस्था स्वीकारली नसली तरी १९५० च्या दरम्यान नियोजनाचे तत्त्व स्वीकारले होते. नियोजित अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेमुळेच शासनाचे अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण वाढत गेले. बाजार मागणी आणि पुरवठ्यानुसार चालतो. त्यामुळे बाजारामध्ये अनिश्चितता असते. कोणाचा फायदा होईल आणि कोणाचा तोटा होईल ते खात्रीने सांगता येत नाही. प्रचंड स्पर्धा असते. या स्पर्धेमध्ये बलवान स्पर्धक विजयी ठरतात, दुर्बलांचा कोणीही वाली नसतो. खाजगी उद्योजक कामगारांच्या हीताचा विचार करीत नाहीत. त्यांना सामाजिक जबाबदारीचे भान नसते. त्यांच्यामधील स्पर्धेमुळे अमूल्य संसाधनांचा विनाश होतो. ग्राहकांना योग्य भावात वस्तु आणि सेवा मिळत नाहीत. किंमतीमध्ये भरमसाठ वाढ होते. तसेच शेती मालाला चांगला भाव मिळत नाही. या सर्व कारणांसाठी विविध देशांच्या सरकारांनी अर्थव्यवस्था मुक्त ठेवण्याऐवजी,

म्हणजेच बाजाराच्या हाती सोपविण्याऐवजी अर्थव्यवस्थेवर बंधने घालणे पसंत केले. परंतु काही काळानंतर जगातील सर्वच बंदीस्त किंवा शासननियंत्रित अर्थव्यवस्थांना काही समस्यांना तोंड द्यावे लागले. किंमतींचे नियंत्रण सरकारांनी आपल्या हाती ठेवले होते. महाग दराने एखादी वस्तु आयात करावी लागली तरी ग्राहकांना ती स्वस्त् दरात उपलब्ध करुन देण्याच्या अट्टाहासामुळे या शासन व्यवस्थांना आर्थिक तोटा सहन करावा लागला.

चीनने वेळीच (१९७९ च्या दरम्यान) आपली अर्थव्यवस्था खुली करण्यास सुरवात केली. परकीय भांडवलाचे स्वागत केले. त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था टिकून आहे, वाढते आहे.

१९८० च्या दशकात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरवात झाली. आज भारतात पेट्रोलियम, दूरचित्रवाणी, रेडीओ, दूरसंचार, वीजनिर्मिती, विमा इत्यादी क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर लगोलग भांडवलाची कमतरता आणि पायाभूत सुविधांचाही अभाव असल्याने तत्कालीन बडे उदयोगपती टाटा, बिर्ला, बांगर यांनी BOMBAY PLAN द्वारे नेहरू सरकारला खाजगी क्षेत्राच्या विकासाकरिता सरकारने सरकारी क्षेत्राचा नियोजनपूर्वक विकास करून हस्तक्षेप करण्याचा आग्रह केला होता. भारतीय अर्थव्यवस्थेचं उदारीकरण नरसिंहराव सरकारने केलं आणि नियतीशी नेहरू सरकारने केलेल्या कराराला आमुलाग्र वेगळं वळण दिलं. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वीकारलेल्या औद्योगिक धोरणामुळे सरकारी नियंत्रण आणि सरकारी उद्योगांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले होते. परंतु त्यामुळे अर्थव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले परिणामी १९८० च्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाला मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार मोठ्या उद्योगांच्या परवाना धोरणाबाबत शिथिलता आणि भारत सरकारने १९८६ मध्ये २३ उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण, विदेशी विनिमय नियंत्रण कायद्यातून परवाना मुक्त केले. औद्योगिक परवान्याचे शिथिलीकरण करण्यात आले. जुलै १९९१ मध्ये नव्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले.

उदारीकरण प्रक्रियेत अर्थव्यवस्था मुक्त करता करता, आता मोकाट अर्थव्यवस्था होऊन देशाची परिस्थिती अधिक संकटग्रस्त झाली आहे काय ? हा संदर्भ तपासावा लागेल.

## १०.४ भारताने उदारीकरण स्वीकारण्याची कारणे

१) १९८८ ते ९१ या काळात सरकारला आयात-निर्याती मी करण्यात अपयश आले. त्यामुळे महसूलातील तूट तीव्रतेने वाढ लागली लागताच सरकारला सर्व बाजूंनी कर्ज घ्यावे लागले. कर्ज वाढल्याने देशा संकट आले. या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारला उदारीकरण मार्ग अवलंबावा लागला.

२) आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात प्रगती होणे आवश्यक होते. भारतातील उद्योगधंद्यांवर सरकारी नियंत्रणे बरीच होती: ती शिशित करून परवानामुक्त धोरण अवलंबिणे सरकारला अत्यावश्यक होते.

३) कृषी क्षेत्रातही बदल करणे आवश्यक होते. कारण देशातील कषिमालाची निर्यात नगण्य होती. कृषी क्षेत्राला फारसे महत्त्वही दिले गेले नव्हते. त्यामुळे कृषी उत्पन्नावरील नियंत्रणेही दर करणे निकडीचे होते.

४) भांडवल बाजारातही कमालीचे औदासिन्य होते. सर्वसामान्य माणस शेअर बाजारापासून तसेच भांडवल बाजारापासून चार हात लांबच होता. त्यामळे उद्योगधंद्यातील गंतवणूकही अत्यल्प अशीच होती. भारत सरकारने परकीय भांडवलाच्या आयातीवर निर्बंध घातल्याने भारतीय उद्योगाच्या क्षेत्रात परकीय भांडवल विशेष गुंतलेले नव्हते. सरकारने उदारीकरणाचे धोरण अवलंबिले असते तरच गंतवणुकीतील निर्बंध शिथील झाले असते. जागतिक व्यापारवती करण्यावर भर देणेही आवश्यक होते. कारण १९९१ पूर्वी भारताचा जागतिक व्यापार अत्यल्प होता, निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण अधिक होते. निर्यातीत वाढ करावयाची असल्यास भारताला उदारीकरणाचे धोरण पत्करणे आवश्यक होते.

५) याशिवाय मंदगतीने असणारी भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतिमान करणेही तितकेच निकडीचे होते. त्यासाठी काही ठोस पावले उचलणे आवश्यक होते. भारताची फारशी निर्यात होत नसल्याने त्याला व्यापारात सतत तूट सहन करावी लागत होती. तुटीमुळे परकीय चलन विशेष उपलब्ध होत नव्हते. परकीय चलन उपलब्ध नसल्यामुळे नवीन तंत्रज्ञान आयात करण्यासाठी भारताला अनेक अडचणीना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे लवकरात लवकर उदारीकरणाची प्रक्रीया सुरू करण भारताला आवश्यक होऊन बसले.

६) बहुराष्ट्रीय कंपन्या आपली आगेकूच अधिक गतीने करीत होत्या. त्याच्यासमोर भारतीय कंपन्या टिकणे अशक्य झाले होते. ही स्पर्धा देशांतर्गत नसून आंतर्राष्ट्रीय स्वरूपाची बनल्याने उदारीकरण आवश्यक झाले होते. १९९१ पतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी उदारीकरणाचे धार राबविण्यास मंजुरी दिली. १९९१ मध्ये (New Economic Policy) - धोरण सरकारने घोषित केले. त्यानुसार-

१) नवे औद्योगिक धोरण

२) नवीन शा व्यापार धोरण

३) विनिमय दर धोरण या गोष्टींवर आधारित १९९१-९२ चे केंद्रीय अंदाजपत्रक घोषित करण्यात आले व भारतात उदारीकरणाला प्रारंभ झाला.

munotes.in

## १०.५ उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे

भारताचा परकीय चलनाचा साठा इतका कमी झाला होता की पंधरवड्यानंतर लागणारे परकीय चलन सुद्धा रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक नव्हते. आपल्याकडील 47 टन सोन्याचा साठा जागतिक बँकेकडे तारण ठेवावा लागण्याची नामुष्की भारतापुढे ओढवली होती. अशा अगतिकतेच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेणे भाग होते. त्यावेळी कर्ज देतांना आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष (IMF) आणि जागतिक बँकेने घातलेल्या अटी मान्य करण्यावाचून भारताला गत्यंतर नव्हते.

### १०.५.१ १९९१ नंतर झालेले बदल :

समाजवादाच्या रुळावरून जाणारी गाडी रूळ बदलून दिशा बदलून जायला लागली. गाडी रूळ बदलते तेव्हा खडखडाट हा होतोच. पण तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी सरकार अल्पमतात असूनदेखील अत्यंत कुशलतेने ही परिस्थिती सांभाळली.

पुढील पाच वर्षे कॉंग्रेस पक्षातील आणि मित्र पक्षातील समाजवादी विचारसरणी असलेल्या पुढाऱ्यांना बाजूला सारून किंवा त्यांची समजूत काढून त्यांनी उदारीकरणाची प्रक्रिया चालू ठेवली आणि उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या रुळावरून भारताची घोडदौड सुरू झाली.

जीडीपी वाढीचा दर २-३ टक्क्यांवरून वाढून ६-७ टक्क्यांवर आला. पाच वर्षांनंतर आलेल्या वाजपेयी सरकारनेही त्याच मार्गावरून वाटचाल केली किंबहुना त्यांच्या काळात या धोरणांना बळ प्राप्त झाले कारण त्यांचा पक्षच मुळी "उजव्या" विचारधारेचा असल्याने नरसिंहराव यांना जसा पक्षांतर्गत विरोधाचा सामना करावा लागला तसा वाजपेयींना करावा लागला नाही. पुढील दहा वर्षं युपीए सरकारने तोच मार्ग अवलंबला आणि सकल उत्पन्न वाढीचा दर २०१० साली चक्क ८.५% झाला. २०१४ साली भाजपचे सरकार आल्यावर तर मा. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर जाहीरच केलं की सरकाराचे काम व्यापार / उद्योग करणे हे नसून त्यांना प्रोत्साहन देणे हे आहे -" Government has no business to do business." उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण मागील 7 वर्षांत जेवढे झाले तेवढे आधीच्या २३ वर्षांत झाले नाही असे दिसून येते. कोणत्या क्षेत्रात काय काय बदल झाले हे बघायचे झाले तर प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रातील बदल, आर्थिक क्षेत्रातील बदल, कर-प्रणालीतले बदल, परकीय चलन बाजारातील बदल, कृषी क्षेत्रातील बदल आणि विदेशी गुंतवणुकीस चालना देणारे बदल आणि त्यांचे परिणाम या विषयी जाणून घ्यावे लागेल.

### १०.५.२ उद्योग क्षेत्रात झालेले बदल :-

1991 पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी लायसन्स किंवा परवान्याची गरज असे. तो मिळवण्यासाठी तुम्ही कोणते उत्पादन घेणार, किती घेणार, कामगार किती ठेवणार, वगैरे तपशील दिल्यावर उद्योग निरीक्षक दहा खेटे घालायला लावणार, वीस आक्षेप घेणार

आणि नशीब चांगले असले आणि निरीक्षकाला "खुश" करू शकलात तरच उद्योगास परवाना मिळत असे. परवाना कधी मिळेल, याची कोणीही खात्री देऊ शकत नसे. Ease of doing business याची परिभाषा निरीक्षकास माहीत नव्हती. उद्योग हे केवळ सरकारी संस्थांनीच करायचे, खाजगी गुंतवणूकदारांना, उद्योजकांना अनेक उद्योग निषिद्ध होते. काही उत्पादने ही केवळ लघु उद्योगांसाठी राखीव होती. उत्पादनांची किंमत ठरवायची मुभा देखील अनेकदा उद्योजकांना नसे. १९९१ मध्ये मनमोहन सिंग हे केंद्रीय अर्थमंत्री होते. १९९१ मध्ये नवे औद्योगिक धोरण जाहीर झाले आणि यामध्ये अमुलाग्र बदल झाला. अनेक निर्बंध हटविले गेले, "इन्स्पेक्टर राज" मधून मालकांची सुटका झाली, उद्योग परवाना न घेताही अनेक उद्योग सुरू करण्याची मुभा मिळाली.

### १०.५.३ करविषयक सुधारणा :

आयकराचे दर कमी करण्यात आले. कॉर्पोरेट टॅक्स केवळ कमीच करण्यात आला असे नाही तर ३० टक्क्यांहून अधिक असलेला कर-दर टप्याटप्याने कमी होईल आणि तो २५% होईल अशी घोषणा अर्थमंत्रानी संसदेत केली आणि त्याबरहुकूम कॉर्पोरेट टॅक्स चे दर कमी केले देखील. वैयक्तिक आयकराचे दर पण कमी झाले, कर आकारणी सुलभ झाली. आपण आयकर भरतो याचा अभिमान वाटायला हवा अशी वागणूक त्यांना आयकर अधिकाऱ्यांकडून मिळायला हवी अशा स्पष्ट सूचना पंतप्रधानांनी दिल्या. या सर्वांचा परिणाम आयकर विवरण भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय अशी वाढ दिसून आली आणि कर संकलन देखील बरेच वाढले. असे जरी असले तरी याच काळात पूर्वलक्षी कर आकारणीच्या व्होडाफोन सारख्या केसेसने भारताची बदनामी झाली.

### १०.५.४ बँकिंग क्षेत्रातील सुधारणा :

स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये इतर स्टेट बँकांचे विलीनीकरण करण्यात आले तसेच राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या कमी करण्यात आली. बँकांचे विलीनीकरण झाल्याने अनुत्पादित खर्चात आणि अनुत्पादित कर्जात कमी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे बॅकांमधील कम्युनिस्ट प्रणित कामगार संघटनांच्या विरोधाला न जुमानता सरकारने बँकांचे विलीनीकरण केले. दोन सरकारी बँकांची विक्री करण्याची घोषणा करण्यात आली आहे. आयडीबीआय बँकेतील हिस्सेदारी आधी कमी करून आता ती बँक पूर्णपणे खाजगी करण्याच्या हालचाली सुरू आहेत. महाराष्ट्र बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँक या बँकांचे यथावकाश खाजगीकरण करून सरकार या बँकांमधील आपली हिस्सेदारी पूर्णपणे काढून टाकणार आहे. भारतीय बॅकांमधील विदेशी गुंतवणुकीची मर्यादा ७४% पर्यंत वाढवण्यात आली तसेच नवीन शाखा विस्तारासाठी आता रिझर्व्ह बँकेची परवानगी लागत नाही.

### १०.५.५ विमा क्षेत्रातील सुधारणा :

विमा कंपन्यांमधील विदेशी गुंतवणूकीची मर्यादा वाढवून ७४% करण्यात आली. सरकारी स्वामित्वाच्या साधारण विमा कॉर्पोरेशन (GIC ) आणि न्यू इंडिया अशुरन्स कंपनी यांची शेअर बाजारात नोंदणी करण्यात आली. या वर्षीच्या शेवटच्या तिमाहीत

एलआयसीचा आयपीओ (IPO) येऊ घातला आहे. त्या निर्गुंतवणुकीद्वारे सरकार रु. 80,000 ते 1,00,000 कोटी उभे करेल असे दिसते. ही आतापर्यंतची सर्वाधिक रकमेची प्रारंभिक विक्री होण्याची शक्यता आहे. एलआयसीची नोंदणी भांडवली शेअर बाजारात झाल्यावर नोंदणी झालेल्या कंपन्यांमध्ये एलआयसीचे भांडवली बाजारमूल्य सर्वाधिक असण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच वर्षांत सरकार एलआयसीतील आपली हिस्सेदारी 25 टक्क्यांनी कमी करणार आहे.

### १०.५.६ अप्रत्यक्ष करातील सुधारणा :

"एक देश : एक कर" या तत्त्वानुसार जुलै २०१७ पासून जीएसटीची अंमलबजावणी करण्यात आली. पेट्रोलियम उत्पादने, दारू असे काही अपवाद वगळता सर्व वस्तू आणि सेवा चार दरात विभागण्यात आल्या असून त्यात सुसूत्रता आणण्यात आली आहे. त्यामुळे कर संकलनात भरीव वाढ होऊन आता दर महिन्याला १ लाख कोटीहून अधिक कर संकलन होत आहे. सध्या होत असलेल्या चार दरांऐवजी दोनच दराने आकारणी करणे गरजेचे आहे तसेच केंद्राने राज्यांचा वाटा वेळच्या वेळी राज्यांना देणे आवश्यक आहे. नजीकच्या काळात कुठल्याही अपवादाशिवाय सर्व सेवा आणि वस्तू जीएसटीच्या अंतर्गत आणणे गरजेचे आहे.

### १०.५.७ विदेशी विनिमयातील सुधारणा :

1991 मध्ये रुपयाचे अवमूल्यन केल्याने विदेशी विनिमयातील तूट कमी झाली. रुपया - डॉलर चा विनिमय दर (Exchange Rate) पूर्वी नियंत्रित असे, तो बाजारमूल्याशी निगडित झाला. रिझर्व्ह बँकेचा विनिमयदरातील हस्तक्षेप कमी झाल्याने मोठ्या प्रमाणात शेअर बाजारात, म्युच्युअल फंडात, बँकात, विमा कंपन्यात, उद्योगात विदेशी गुंतवणूक होऊ लागल्याने १९९१ साली केवळ १५ दिवस पुरेल इतका परकीय चलनाचा साठा होता तो वाढून १८ महिने पुरेल इतका म्हणजे म्हणजे ६ बिलियन डॉलर वरून वाढून ६०० बिलियन डॉलर इतका झाला. निर्यातीवरील कर पूर्णतः काढून टाकल्याने १९९१ मध्ये असलेले ४ बिलियन डॉलर चे उत्पन्न वाढून १६५ बिलियन डॉलर इतके झाले. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राने तर दरवर्षी २१% चक्रवाढ दराने १५० बिलियन डॉलर इतके प्रचंड विदेशी विनिमय भारतात आणले.

### १०.५.८ कृषी क्षेत्रातील सुधारणा :

राजकीय इच्छा शक्तीच्या अभावामुळे कृषी क्षेत्रातील बदल आणि कृषी कायद्यातील बदल लांबणीवर पडले. अनेक पुढाऱ्यांचे हितसंबंध गुंतले असल्याने कृषी कायद्यांतील सुधारणा करणे दुरापास्त झाले होते. पण विद्यमान सरकारने अत्यंत कुशलतेने या कायद्यांना होणार विरोध मोडून काढला आणि आता पंजाब आणि हरियाणा या केवळ दोनच राज्यांमधील शेतकरी आंदोलन करताना दिसताहेत.

## १०.६ उदारीकरणातून अपेक्षा भंग

उदारीकरणाचा अभ्यास तौलनिकही करावा लागेल. आपण हे धोरण अवलंबलं तेव्हाच इतर देशही किंबहुना आपल्या आधी इतर देश या वाटेवरून गेले होते. चीनने उदारीकरणाच्या तीस वर्षांत जेवढी प्रगती केली त्याच्या निम्मीपण आपण करू शकलो नाही. रोजगार निर्मिती ज्या प्रमाणात व्हायला हवी होती, त्याहून खूपच कमी प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. मोठे उद्योगधंदे सुरू झाले नाहीत. Ease of doing business या क्षेत्रात लक्षणीय अशा सुधारणा झाल्या नाहीत. दरडोई उत्पन्न वाढलं असलं तरी ते अजून किमान दुप्पट वाढायला हवं होतं. या वर्षीच्या शेवटच्या तिमाहीत एलआयसीचा आयपीओ येऊ घातला आहे. कर प्रणालीत सुसूत्रता आणणे गरजेचे आहे. लोकांच्या मानसिकतेत बदल घडवणे जरुरी आहे त्यासाठी मोठ्या प्रमाणावर संवाद साधायला हवा. "सरकारने बँका विकायला काढल्या आहेत," ही मानसिकता बदलून अशा सुधारणांची आवश्यकता आम जनतेला पटवून देणे गरजेचे आहे.

हळुहळू या मानसिकतेत बदल झालेला दिसून येतोय. एके काळी सिंगूर मधून टाटांना पळवून लावणाऱ्या बंगालच्या मुख्यमंत्री मा. ममतादीदींनी नुकतेच टाटांना बंगालमध्ये प्रकल्प सुरु करण्याचे आवाहन केले आहे. चीनने आपल्या आधी केवळ १२ वर्षं म्हणजे १९७८ पासून उदारीकणाला सुरुवात केली तेव्हा भारताचे आणि चीनचे दरडोई उत्पन्न जवळपास सारखे होते. आज  चीनचे दरडोई उत्पन्न भारतातून ५ पटीहून अधिक आहे याचे कारण म्हणजे तिथे आर्थिक सुधारणा मनापासून करण्यात आल्या. कम्युनिस्ट शासन असल्याने विरोधाला वाव नव्हता. भारतात मात्र लोकशाही असल्याने व समाजवाद खोलवर रुजला असल्याने नव-विचाराला होणार विरोध मोडून काढणं कठीण जातं. शिवाय महत्त्वाचे म्हणजे आपण उदारीकरणाचे धोरण केवळ इष्टापत्ती होती म्हणून मान्य केलं, मनापासून नव्हे. एवढे असले तरी भारताचे सकल उत्पन्न जे स्वातंत्र्य मिळाले तेव्हा १० बिलियन डॉलर होते ते १००० बिलियन डॉलर व्हायला ६० वर्षं लागली मात्र उदारीकरणानंतर पुढचा हजाराचा टप्पा आपण केवळ ७ वर्षांत गाठला आणि करोनाने अर्थव्यवस्था मोडकळीस आली असतांना देखील पुढचा हजाराचा टप्पा २०२२-२३ मध्ये आपण गाठू आणि त्या पुढील हजाराच्या टप्प्यातील कालावधी झपाट्याने कमी होईल असे दिसते.

## १०.७ उदारीकरण होऊनही भारत मागे का ?

मानवी विकासाच्या निर्देशांकात चीन पुढे आहे. भारतात उदारीकरण राबविण्यात भारतीय लोकशाहीने अर्थव्यवस्थेत मूठभरांची संपत्ती वाढविण्याचं काम केलं आणि बेसुमार विषमता निर्माण करणारी मोकाट अर्थव्यवस्था जन्माला घातली.

## १०.८ उदारीकरणाने विषमता वाढली ?

उदारीकरण करताना निर्माण झालेली विषमता कमी करणे, लहान उद्योग मोठया उद्योगाने गिळंकृत करणे या प्रक्रियेत स्पर्धेतून मक्तेदारी निर्माण होणे किती धोक्याचे आहे

याकडे सरकारचं दुर्लक्ष झालं. नवीन निर्माण झालेले रोजगार याची भलामण करताना किती बंद कंपन्यांमधील रोजगार विनाश झाला याची खबर ही न घेणे, उदारीकरणाचे समाजावरील दुषपरिणाम अधोरेखित करणारे होते. मानवी विकासाकरिता रोजगार, अन्न सुरक्षा, शिक्षण आणि आरोग्य यावर सरकारने किती कमी खर्च करावा आणि ही क्षेत्रं खाजगी भांडवल आधारिताच मोकळी ठेवणं यांत तीन दशकांच्या उदारीकरणांत मानव विकासांचे, सामाजिक न्यायव्यवस्थेचे प्रश्न पायदळी तुडविणे सुरू राहिले आहे. उदारीकरणाच्या प्रक्रियेत देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर सरकारने विदेशी भांडवलाला प्रवेश देणे हे देशाच्या सुरक्षेला नख लावणारे होत आहे. खनिजे, कोळसा, तेल, वायु, पाणी व संरक्षण कारखान्याचे महत्त्व बॅंका आणि विमा व्यवसाय सारखेच राष्ट्रीय महत्त्वाचे आहे.

उदारीकरण खासगीकरणाचा हा मार्ग देशाची सार्वभौम लोकशाही व्यवस्था कायम ठेवण्यात संविधानाने बजावलेली भूमिका कमकुवत करतो. या संदर्भात खासगीकरण हा 'नीजिकरण एक धोका है,' हे सिध्द होतं.

चीनने एक पक्षीय साम्यवादी राजवटीत उदारीकरण राबविलं, विदेशी भांडवलाशी चक्क पार्टनशिप केली. भांडवलशाही विकासाची फळे साम्यवादी राजवटीत आपल्या जनतेला चाखायला दिली. तरी शोषण व्यवस्था त्याच्या २१ Trillion डॉलर अर्थव्यवस्थेत संपली असं म्हणतां येत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत तर सध्या २.५० Trillion अर्थव्यवस्थेत भांडवलशाही शोषण व्यवस्था अधिक मजबूत झाली आहे. काम करण्यास पात्र असणाऱ्या ९७ टक्के भारतीयांना उदारीकरण प्रक्रियेत असंघटीत आणि असुरक्षित जगणे देऊ केले आहे.

अशा उदारीकरणात भारतात यापुढे तंत्रज्ञानाच्या विकासाच्या टप्प्यात बॅंका आणि विमा, बंदरे आणि रेल्वे, तेल आणि वायु तसंच नैसर्गिक संपती मूठभरांच्या ताब्यात जाणे यांत लोकशाही व्यवस्थेलाच धोका आहे. उदारीकरण करणाऱ्या शक्ती कोण? आणि उदारीकरणाचे उद्दिष्ट स्पष्ट असणे आवश्यक आहे.

## १०.९ सारांश

आर्थिक सुधारणांच्या दिशेने उदारीकरण हे एक मोठे पाऊल आहे. मुळात याचा अर्थ अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप कमी करून बाजार व्यवस्थेवरील अवलंबित्व वाढवणे. कृषी, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रांवर उदारीकरणाचा चांगला परिणाम झाला आहे. कृषी क्षेत्रातील उदारीकरणामुळे बाजारपेठेचा विस्तार झाला आहे, ज्यामुळे उत्पादकांना कृषी माल आकर्षक किमतीत आणि ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत मिळणे सोपे झाले आहे. कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाची पातळी वाढल्याने उत्पादकताही वाढली आहे. याशिवाय या क्षेत्रातील संशोधन आणि विकासावर भर देण्यात आला आहे. उदारीकरणानंतर उद्योगांची स्थितीही सुधारली आहे. औद्योगिक उत्पादनात वैविध्य आले आहे, परदेशातून उच्च तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा वाढली आहे. उदारीकरणाचा सर्वाधिक सकारात्मक

परिणाम सेवा क्षेत्रावर दिसून येत आहे. सध्या या क्षेत्रातून सर्वाधिक जीडीपी येतो. सॉफ्टवेअर सेवा, पर्यटन सेवा, वैद्यकीय सेवा इत्यादींसाठी भारत हे एक आदर्श ठिकाण बनले आहे. बीपीओ या क्षेत्रातही भारत अग्रेसर आहे. परंतु या सकारात्मक परिणामांसोबतच उदारीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर काही आव्हानेही उभी केली आहेत. उदारीकरणाची प्रक्रिया स्वीकारल्यानंतर आपल्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचा वाटा सातत्याने कमी होत आहे. भारतातील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक असल्याने देशभरातील प्रत्येक शेतकऱ्याकडे उदारीकरणाचा लाभ घेण्याची क्षमता नाही. आपले उद्योग बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाहीत आणि देशी उद्योग उद्ध्वस्त होत आहेत. विकसित देशांच्या तुलनेत कमी सोयी असलेल्या सेवा क्षेत्रातही पर्यटन क्षेत्रासमोर अनेक समस्या आहेत. ऐतिहासिक सांस्कृतिक क्षेत्रातील महत्त्वाच्या स्थळांमध्ये प्रचंड क्षमता असूनही त्यांचा विकास होत नाही. त्याच वेळी, आपल्या अर्थव्यवस्थेवर बाह्य घटकांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे भारताला अद्याप उदारीकरणाचा योग्य फायदा घेता आलेला नाही.

नवीन आर्थिक सुधारणांचे मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे सुधारणांमुळे कोणत्याही उद्योग/ व्यापार/ व्यवसाय संस्थेला किंवा नवप्रवर्तकाला कोणताही उद्योग/ व्यापार/ व्यवसाय सुरू करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. याचा अर्थ असा होतो की, उत्पादनाच्या विविध घटकांना म्हणजेच उत्पादक, मालक आणि ग्राहक यांना त्याचे हित जोपासण्यासाठी मुक्तपणे निर्णय घेऊ शकतात. औद्योगिक क्षेत्र, परकीय क्षेत्र (परकीय व्यापार, विनिमय दर) बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र, राजकोषीय क्षेत्र या सर्व क्षेत्रांमध्ये सरकारने उदारिकरणाचे धोरण स्वीकारली खाजगी उद्योगसंस्थाना भांडवली बाजारही खुला आणि मुक्त केला. १९९१ पासून परकीय भागभांडवलातील सहभाग ५१% किंवा त्यापेक्षा जास्त वाढविण्याला परवानगी दिली गेली. औद्योगिक क्षेत्र परवानमुक्त केले गेले. मक्तेदारी आणि व्यापार प्रतिबंध कायदा काढना टाकण्यात आला. त्याऐवजी भारतीय स्पर्धा आयोगाची स्थापना केली गेली. परकीय गुंतवणूकदारांना पायाभूत क्षेत्र खुले केले गेले. परकीय चलन विनिमय कायदा (FERA) सुधारून परकीय चलन व्यवस्थापन कायदा (FEMA) अस्तित्वात आला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणामुळे असमानतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि १९९१ मधील शीर्ष १०% लोकसंख्येच्या उत्पन्नाचा वाटा ३५% वरून २०१४ मध्ये ५७.१% इतका वाढला. त्याचप्रमाणे, तळाच्या 50% लोकांच्या उत्पन्नाचा वाटा १९९१ मध्ये २०.१% वरून कमी झाला. २०१४ मध्ये १३.१%. ग्रामीण जीवनमान, ग्रामीण रोजगार आणि शेतकरी आत्महत्येत वाढ झाल्यामुळेही टीका केली गेली आहे.

## १०.१० प्रश्न

१. उदारीकरण म्हणजे काय ते सांगून भारतातील उदारीकरण स्पष्ट करा.

२. उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे लिहा.

३. उदारीकरणामुळे १९९१ नंतर झालेले बदल लिहा.

४. उदारीकरण होऊनही भारत मागे का ? सविस्तर माहिती लिहा.

५. उदारीकरण म्हणजे खासगीकरण नव्हे स्पष्ट करा.

## १०.११ संदर्भ


1. Social and Economic Problems in India, Naseem Azad, R Gupta Pub (2011)
2. Indian Society and Culture, Vinita Padey, Rawat Pub (2016)
3. Social Problems in India, Ram Ahuja, Rawat Pub (2014)
4. Faces of Feminine in Ancient, medivial and Modern India, Mandakranta Bose Oxford University Press
5. National Humana rights commission-disability Manual
6. Rural, Urban Migration : Trends, challenges & Strategies, S Rajagopalan, ICFAI- 2012
7. Regional Inequilities in India Bhat L SSSRD- New Delhi.
8. Urbanisation in India: Challenges, Opportunities & the way forward, I J Ahluwalia, Ravi Kanbur, P K Mohanty, SAGE Pub 2014)
9. The Constitution of India, P M Bakshi 2011
10. The Problems of Linguistic States in India, Krishna Kodesia Sterling Pub.


❖❖❖❖

munotes.in

# ११

## खाजगीकरण

**घटक रचना :**

११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ खाजगीकरण म्हणजे काय

११.३ खाजगीकरणांची आवश्यकता

११.४ रोजगारासांठी एल्गार आणि खाजगीकरण

११.५ बँकांचे खाजगीकरण देशहिताचे नाही !

११.६ खाजगीकरणाला होतोय विरोध ?

११.७ खाजगीकरण वारे

११.८ खासगीकरणाचे दुष्परिणाम

११.९ देशातील नोकरीचं खाजगीकरण: एक गंभीर बाब !

११.१० खाजगीकरणांचे वास्तव

११.११ सारांश

११.१२ प्रश्न

११.१३ संदर्भ

## ११.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास :

१. खाजगीकरणांची संकल्पणा स्पष्ट करणे,

२. खाजगीकरणांची आवश्यकता समजून घेणे,

३. खाजगीकरणांचे परिणाम अधोरेखित करणे,

४. खाजगीकरणांचे वास्तव समजून घेणे.

## ११.१ प्रस्तावना

१९९१ च्या नंतर आपल्या देशात सत्तेवर आलेल्या विविध सरकारांनी जागतिकीकरणाचे धोरण अवलंबले आहे. या जागतिकीकरणाचा अविभाज्य भाग म्हणजे सरकारी वा सार्वजनिक क्षेत्रांत असलेले उद्योग मोडून काढून त्याचे खाजगीकरण करणे होय. त्यात सरकारची जबाबदारी असलेल्या जनतेच्या आरोग्याचे खाजगीकरण करणे हेही क्षेत्र त्याला अपवाद राहिले नाही. खरे म्हणजे भारतीय राज्यघटनेने जनतेच्या शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबींची जबाबदारी शासनावर टाकलेली आहे. पण राज्यघटनेतील या तरतुदीचीही फिकीर कोणत्याच सरकारांनी केली नाही. मोठ्या धुमधडाक्यात सर्वच क्षेत्रांचे खाजगीकरण करण्याचा सपाटाच त्यांनी लावला. मुळात सार्वजनीक उद्योग हे नफा कमावण्या च्या उदेशाने उभारले च नसतात. त्यामागे राष्ट्रीय हिताचे उद्देश असतात. नुसता नफा कमवणे म्हणजे राष्ट्रीय हित नव्हे. सदर उदयोग तोट्यात चालत असतील तर त्या साठी सरकारने लक्ष घातले पाहिजे. त्याची कारणे शोधून त्या वर उपाय केले पाहिजेत. सार्वजनीक उद्योग तोट्यात आहेत म्हणून ते आपली आर्थिक अडचण भागवण्यासाठी विकणे आणि खाजगीकरणला प्रोत्साहन देणे हा निर्णय विचार पूर्वक वाटत नाही.

खाजगीकरणतून भांडवलदार वर्गाची ताकद वाढू शकते. देशाच्या व जनतेच्या हिताचे महत्वाचे प्रश्न सोडवायला सरकारला मर्यादा येवू शकतात. देशाच्या अविकसित भागातील बेरोजगारी वाढू शकते कारण खाजगी उद्योगपती आपले उद्योग विकसीत शहरांच्या आजूबाजूला च उभारणार कारण उद्योगांशी निगडित सोयी सुविधा ह्या विकसीत शहरांलगतच असतात व सहज उपलब्ध होतात. हळू हळू देशाची अर्थव्यवस्थेची धुरा भांडवल दार वर्गाच्या हातात जाईल. ज्यामुळे गरीब व श्रीमंत अशी आर्थिक विषमता निर्माण होऊ शकते. खाजगीकरणा च्या विषया बाबतीत देशातील सामाजिक हित तज्ञ व अर्थ तज्ञांची मत मतांतरे असल्यामूळे सार्वजनीक उद्योग खाजगीकरणाला सतत विरोध होतो . जे जे उद्योग देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने व समाज हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत असे उदयोग ज्यात संरक्षणासाठी लागणारी साहीत्य सामुग्री उत्पादन करणारे उद्योग अर्थात रणगाडे, लढावू विमाने, लढावू जहाजे, अत्याधुनिक बंदुका, दारूगोळा इ.तसेच आरोग्याशी निगडीत अत्यावश्यक औषधे निर्मीती करणारे उद्योग, जीवन विमा व सरकारी दवाखाने तसेच शिक्षण क्षेत्रातील सर्व संस्था तसेच आर्थिक दृष्टीने बँकांच्या सहीत सर्व प्रकारच्या वित्तीय संस्था व इंधन पेट्रोल, डिझेल व गॅस इत्यादी उद्योग १००% सरकारच्या अखत्यारीत असावीत. इतर मूलभूत उद्योग म्हणजे रस्ते, विज, पाणी, दळण वळण म्हणजे प्रवासी व मालवाहू वाहणे, विमाने, रेल्वे, जहाजे , विज निर्मीती उद्योग, धरणे व पाणी शुद्धीकरण तसेच दूरसंचार इ. शी निगडीत उद्योग निमसरकारी असावीत म्हणजे ५१% हिस्सा सरकारचा असावा व उर्वरीत हिस्सा खाजगीकरणात असावा, व इतर जी उदयोग आहेत ज्यामधी अत्यावश्यक औषधी सोडून इतर औषधी निर्मीती, इतर वाहण निर्मीती, कापड उद्योग, रसायने इत्यादी तसेच शेती क्षेत्रातील सर्व उद्योग खाजगीकरण करणे योग्य राहील.

## ११.२ खाजगीकरण म्हणजे काय

एखादी इंडस्ट्री किंवा संस्था पब्लिक सेक्टर मधून प्रायव्हेट सेक्टर मध्ये ट्रान्स्फर करण्याच्या प्रक्रियेला खासगीकरण म्हणतात. पब्लिक सेक्टर मधील कंपन्या सरकार मार्फत चालवल्या जातात. खाजगीकरणामध्ये सरकार प्रायव्हेट कंपन्या आणि संस्थांवरील बंधने शिथिल करते. यामुळे सरकारी कंपन्या/ संस्था ई.ना एक पर्याय उभा राहतो. तसेच सरकारदेखील काही जबाबदाऱ्यांमधून मुक्त होते. जसे कि ऑइल इंडस्ट्री मधील खाजगीकरणाने अंबानी सारखा बिझनेसमॅन स्वतःचे पेट्रोल पंप टाकू शकतो. जेव्हा खाजगीकरण नव्हते (सुमारे १९९० च्या आधी) त्यावेळेस सर्व पेट्रोल पंप सरकारी कंपन्यांचे होते. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील खाजगीकरणामुळे बऱ्याच खाजगी शाळा आणि खाजगी शैक्षणिक संस्थाना परवानगी मिळाली. यातून कॉम्पिटिशन होऊन काही प्रमाणात शिक्षणाची क्वालिटी सुधारली तसेच सरकारची जबाबदारी देखील थोड्या प्रमाणात कमी झाली.

## ११.३ खाजगीकरणांची आवश्यकता

भारताच्या विकासात खाजगीकरणाचा मोठा वाटा असेल असे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी म्हटले होते पण त्यांना त्याचा वेग वाढवता आला नाही. कारण आपल्या देशातले लोक अजूनही साऱ्या भांडवलदारांना चोर समजतात. ती समाजवादी चालीची सवय अजून गेलेली नाही. म्हणूनच आपण फार खाजगीकरण करायला लागलो तर जनता आपल्यावर नाराज होईल आणि आपल्या मागे उभी राहणार नाही अशी भीती नेत्यांना वाटते. यामुळे ते खाजगीकरण देशाच्या फायद्याचे असूनही ते टाळतात. परिणामी देशाच्या विकासाचे खोबरे होते. ही गोष्ट आपल्याला दोनदा दिसून आली आहे. वाजपेयी सरकारने खाजगीकरण करण्याचा प्रयत्न करताच त्यांचा पराभव झाला. पण त्यांच्या काळात विकासाला चांगली गती मिळाली होती.

१९९१ साली भारतात समाजवादाचा अंत झाला आणि हळू हळू एक एक सेवा खाजगी व्हायला लागली. पूर्वी जसा समाजवादाने सगळे प्रश्न सुटतील असा भ्रम निर्माण करण्यात आला होता, तसा आता खाजगीकरणाने सगळे प्रश्न सुटतील असा नवा भ्रम जोपासला गेला. म्हणजे पद्धत कोणतीही असो, विकासाची एक गुरुकिल्ली असते असा लोकांचा भ्रम आहे. प्रत्यक्षात तसे नाही. विचारसरणी किंवा अर्थव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो ती अर्थव्यवस्था जादूची कांडी फिरवून बदल घडावा तसा बदल घडवू शकत नसते. पण लोक तशी अपेक्षा करतात.

## ११.४ रोजगारासांठी एल्गार आणि खाजगीकरण

बँका ब्रिटीश काळापासून खाजगी होत्या. कर्ज फक्त श्रीमंतांना मिळत होते. भांडवलशाहीचे तत्त्व असे कि बँकामध्ये पैसा जमा होतो तो श्रीमंत भांडवलदारांना द्यायचा म्हणजे ते उद्योग काढतील. त्यातून रोजगार निर्माण होईल व जनतेला चांगले जीवन मिळेल. हे सिद्धांत पूर्णपणे फसवे निघाले. तेव्हा गरीब बँकेकडे फक्त दुरून बघत

होता. त्यांना स्वत: रोजगार निर्मिती करण्याची संधी नव्हती; तसेच, शेतकऱ्याला कर्ज मिळवून शेतीतून चांगले उत्पन्न काढण्याची संधी नव्हती. इंदिरा गांधीनी बँकांचे राष्ट्रीयकरण केले आणि गरिबांना बँका खुल्या झाल्या. शेतकऱ्यांना कर्ज मिळायला लागले. त्यामुळे हरित क्रांती देशात आली. शेतकऱ्याला चांगले दिवस आले. आमच्या मुलांना रिक्षासाठी कर्ज मिळाले. छोटी दुकाने घातली. मध्यम आणि छोटे उद्योग सुरु झाले. छोटे उद्योग सर्वात जास्त रोजगार निर्माण करतात. तर मोठे उद्योग नोकऱ्या कमी करतात. आधुनिक तंत्रज्ञान मोठ्या उद्योगात, माणसाचे महत्व कमी करते. म्हणूनच मोठ्या उद्योगांचा समाजाला उपयोग होत नाही. कारण ते नोकऱ्या कमी करतात. पैसे जास्त कमावतात.

ह्या जगात महाकाय MONSENTO सारखी कंपनी पूर्ण जगात बियाणे नष्ट करत आहेत आणि त्यांची बियाणे जगात शेतीवर प्रभुत्व निर्माण करत आहेत. ग्रामीण बियाणे व्यवस्था संपली. पुन्हा पुन्हा त्याच कंपनीकडे बियाणे घेण्यासाठी जावे लागते. जसे BT COTTON हे GMO बियाणे. म्हणजेच जीनमध्ये बदल करून नवीन बियाणे निर्माण होते. युरोपमध्ये ह्याला बंदी आहे. पण आमच्या महान नेत्यांनी ते भारतात आणले. बँकेच्या राष्ट्रीयकरणामुळे हरित क्रांती आली आणि बऱ्याच प्रमाणात गरिबी कमी झाली. त्याच काँग्रेस पक्षाच्या मनमोहन सिंघाने १९९१ साली बँकांच्या खाजगीकरणाचे धोरण आणले. गरीब कर्ज परतफेड करत नाहीत म्हणून गरिबांना कर्ज देता नये हे कारण पुढे ढकलण्यात आले. सर्वात भयानक सरकारचे षड्यंत्र म्हणजे बँकांना विकून टाकण्याचे आहे. कर्ज बुडव्या श्रीमंतांचा नोकर असल्यासारखे सरकार त्यांचे ऐकत आहे. तसे बघितले तर बँकांचे कर्ज द्यायचे नियम फार कडक आहेत. १५०% हमी असल्याशिवाय कर्ज द्यायचे नाही हा नियम आहे. म्हणजे जर रु.१०० कर्ज द्यायचे असेल तर रु. १५० ची मालमता जामीन ठेवली पाहिजे. कर्ज बुडवले कि जमीन मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार बँकांना असतात. तरी देखील रु.८ लाख कोटी एवढे कर्ज मोठे भांडवलदार कसे बुडवू शकले ? त्याचे एकमेव कारण म्हणजे भ्रष्टाचार. बँकांना कोणीतरी हे करायला लावले. बँकांच्या प्रमुखांना सरकार नेमते. म्हणून सरकारचा वरदहस्त असल्याशिवाय; जामीन न घेता कर्ज बँका देऊच शकत नाही. म्हणून मुख्य माणसाचे नाव निरव मोदीसारख्या चोरांच्या भानगडीत येत नाही. सही करणारे अधिकारी सापडतात. एकंदरीत बँकांना बुडवण्याचा धंदा सरकार करत आहे. ज्या उद्योगपतींनी बँका लुटल्या त्या बँकांना खाजगीकरण करा म्हणून आक्रोश करत आहेत. सरकारचे धोरण आहे कि बँका बुडाल्या म्हणून बँकांनी पैसे उभे करावेत. कसे? तर खाजगी क्षेत्राकडून. म्हणजेच बँकांचे भाग भांडवल खाजगी कंपन्यांना विकून टाकणे. भाग भांडवल खाजगी मालकाचे झाले कि बँक त्यांच्या मालकीची होणार. ह्या पद्धतीने बँका विकून टाकणे. रु.८ लाख कोटीचे बुडीत कर्ज झाले. जप्ती केली तर उद्योग बंद पडणार. मग उद्योग बंद पडू नये म्हणून सरकारने बँकांना आदेश दिले कि उद्योगांना कर्जमाफी करा. शेतकऱ्यांना रु.३४००० कोटी कर्ज माफ करताना रडणाऱ्या सरकारने लाखो कोटी रुपये कर्जमाफी उद्योगांना केली. त्यामुळे बँका बुडाल्या. त्यांना सावरण्यासाठीच्या रु २.१५ कोटी अनुदान देण्याची घोषणा केली. हे पैसे गरिबांना देण्याच्या ऐवजी श्रीमंतांची कर्जमाफी करण्यासाठी मोठ्या श्रीमंतांना दिले. त्यामुळे सरकारकडे गरिबांना देण्यासाठी पैसा कमी

पडला. बँक खाजगी झाल्या कि लाखो नोकऱ्या नष्ट होतील. तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या बंद व्हायला लागल्या. जसे ATM झाल्यामुळे बँकेतील लाखो लोक बेकार झाले. त्यात बँका खाजगी झाल्या तर शेतकरी कामगार, छोटे उद्योजक, व्यापारी उद्धवस्त होतील.

ह्या सर्व अपयशापासून लोकांचे लक्ष दूर नेण्यासाठी पुतळे पाडण्याचा धंदा सुरु झाला. त्यात लेनिन आणि पेरीयारचे पुतळे म्हणजे शोषणाविरुध्द लढणाऱ्याचे पुतळे पाडण्यात येत आहेत. हिंदुत्वाच्या नावावर दंगे पेटवण्यात येत आहेत. बॉम्बब्लास्ट, दहशतवादी हल्ले वाढत आहेत. बेकारीच्या बडग्यापासून लोकांचे लक्ष दूर खेचण्यासाठी पाकिस्तानचे भूत पुन्हा उभे करण्यात येत आहेत. देशावर एक जबरदस्त संकट येत आहे, बेकारीचे. युवक रस्त्यावर येत आहेत. MPSC विरुद्ध मोर्चे निघाले. रेल्वे नोकऱ्यासाठी रेल रोको झाले. ही तर सुरुवात आहे. ज्यांना रोजगार नाही ते हत्यारे घेतात. आज एक ठिणगी पडली तर आग लागेल अशी परिस्थिती आहे.

## ११.५ बँकांचे खाजगीकरण देशहिताचे नाही !

निकृष्ट कर्जांमुळे बँकांचे नुकसान होत असते. या विषयाचा सर्वांगीण विचार करताना, ७० च्या दशकात इंदिरा गांधी यांनी खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करतानाचा त्यांचा राजकीय हेतू बाजूला ठेवूनच मूल्यमापन केले पाहिजे. राष्ट्रीयीकरणापूर्वी प्रामुख्याने शहरातच शाखा असलेल्या बँकांना नंतर खेडोपाडी- संपूर्ण भारतभर शाखा उघडणे भाग पडले. पण, त्यामुळे सर्वच बँकांचा शाखाविस्तार आणि व्यवसाय कैकपटींनी वाढून बँका सर्व जनतेपर्यंत पोहोचल्या. आम जनतेला बँकिंग सेवा प्रथमच उपलब्ध झाल्या, ज्याची खरी गरज होती. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व आर्थिक सुधारणा आणि योजना केवळ बँकांमार्फतच राबविल्या जातात. कारण, बँकांची विश्वासार्हता व कार्यक्षमता सरकारी कार्यालयांपेक्षा नेहमीच गतिशील, तत्पर व पारदर्शी असते. सरकारी बँकांतील कारकुनाच्या जागाही उच्च अर्हताप्राप्त आणि स्पर्धात्मक परीक्षेद्वारा भरल्या जात असल्याने, त्यांची क्षमता जास्त असते आणि अधिकारीवर्ग तर आयएएस व आयपीएसच्या बौद्धिक दर्जाचे असतात. त्यामुळे अशा तज्ज्ञ कर्मचाऱ्यांच्या भरवशावरच आज बँकांचे स्पृहणीय कार्य सुरू आहे, हे मानलेच पाहिजे. मात्र, या यंत्रणेतही अनेक दोष आहेत.

## ११.६ खाजगीकरणाला होतोय विरोध ?

महाराष्ट्रातील विजवितरण कंपन्यातील कर्मचा-यांनी या खाजगी करणाला तीव्र विरोध दर्शवला आहे. काही मोजक्या उद्योपतिंना फायदा देण्यासाठी खाजगीकरणाचा घाट असल्याचा त्यांचा आरोप आहे. चंडीगड या केंद्रशासित प्रदेशात खासगीकरणाची प्रक्रिया सुरू केली पण तेथील वीज कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी त्याविरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली.खरं तर येथे वीजकंपनी फायद्यात आहे. सरकारी वीजवितरण कंपनी तीन वर्षांपासून नफ्यात असताना आणि वीजगळतीचे प्रमाण १५ टक्के या आदर्श मर्यादेत असताना खासगीकरण कशासाठी, असा सवाल वीज कर्मचारी संघटनेने केलाय. त्याची

दखल उच्च न्यायालयाने घेतली असून सुनावणीचे आदेश दिले आहेत केंद्र सरकारला हा एक झटका मानला जातो.

औष्णिक वीज विद्युत विज आणि सोलर सूत्रातून सरकार २० तयार करतात पण सरकारने सोलर वीज निर्माण करण्यासाठी जे कायदे केले आहेत. ते चांगल्यासाठी आहेत की वाईट याच्या साठी हेच स्पष्ट होत नाही कारण एखाद्या ग्राहकाने दहा किलोवॅट पेक्षा जास्त वीज जर निर्माण केली तर ती तीन रुपये दराने घेतली जाते. पण दहा किलो पेक्षा कमी असेल तर ती सात रुपये युनिट ने घेतली जाते. म्हणजे जास्त उत्पादन करतील त्यांना मोठा तोटा सहन करावा लागतो. या नियमामुळे सरकार सोलर एनर्जीला येत आहे मागे खेचत आहे असा प्रश्न चिन्ह निर्माण झाल्याचं वगैरे सांगतात.

## ११.७ खाजगीकरण वारे

१९९१ मध्ये जेव्हा भारत आर्थिक संकटात सापडला होता तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी परकीय गंगाजळी भारतात मोठ्या प्रमाणावर आणण्यासाठी वेगवेगळ्या आर्थिक उपाययोजना केल्या. त्यामध्ये विविध सरकारी प्रकल्पांचे खाजगीकरण हीदेखील एक महत्त्वपूर्ण उपाययोजना होती. त्यानंतर १९९७ ते २००२ अशी पाच वर्षे देशात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी प्रणित भाजप आघाडीचे सरकार केंद्रात सत्तेवर होते. मात्र काँग्रेस सरकारच्या काळात सुरू झालेला खाजगीकरणाचा रेटा हा एवढा प्रचंड होता की भाजपप्रणीत एनडीए सरकारलादेखील खाजगीकरणाचे प्रयोग देशभरात राबवण्याखेरीज पर्याय राहिला नाही. २००४ मध्ये पुन्हा काँग्रेसप्रणीत यूपीए सरकार केंद्रात सत्तेवर आले आणि २०१४ पर्यंत म्हणजेच दहा वर्ष हे सरकार देशावर राज्य करत होते. देशाच्या आर्थिक चक्राला गती द्यायची तर खाजगीकरण याशिवाय पर्याय नाही याची जाणीव काँग्रेस सरकारला सातत्याने होती त्यामुळेच जेव्हा जेव्हा केंद्रात काँग्रेस प्रणित सरकार सत्तेवर होते तेव्हा तेव्हा तत्कालीन केंद्र सरकारने खासगीकरणाचा पुरस्कार करणारेच निर्णय प्रमुख्याने घेतले आहेत. मात्र २०१४ साली देशात राजकीय क्रांती झाली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार बहुमताने केंद्रात सत्तेवर आले. गुजरातचे तब्बल तीन टर्म मुख्यमंत्रीपद भूषवलेले नरेंद्र मोदी हे काँग्रेसी विचारसरणीच्या पूर्णपणे विरोधात असलेले प्रधानमंत्री आहेत. स्वातंत्र्यानंतर देशात खऱ्या अर्थाने स्वराज्याचे सुराज्य आणण्यासाठी सत्तेवर असलेल्या काँग्रेस सरकारने आणि त्यातही विशेषत: सत्तेचा रिमोट हाती असलेल्या नेहरू आणि गांधी परिवाराने गेल्या साठ वर्षांच्या काळात देशाला अधिकाधिक खड्ड्यात घालण्याचेच काम केल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने करत असतात. मोदी यांच्या या आरोपांमध्ये तथ्य किती हा भाग वेगळा आहे. मात्र गेल्याच आठवड्यात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशातील सार्वजनिक उपक्रमांबाबत खाजगीकरणाची जी घोषणा केली आहे ती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आजवरच्या तत्वांशी पूर्णपणे विसंगत आहे असेच म्हणावे लागेल.

गेली दीड-पावणेदोन वर्ष देश कोरोनासारख्या जीवघेण्या विषाणूशी लढत आहे. टाळेबंदीमुळे देशभरातील उद्योग कारखाने अक्षरश: दिवाळखोरीत निघत आहेत. विविध

करांच्या रूपाने सरकारी तिजोरीत जमा होणारी गंगाजळी देखील या काळात मोठ्या प्रमाणावर आटली आहे. असे असताना विकास कामे विविध प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे हे सत्य नाकारण्यात अर्थ नाही. कोणत्याही विचारसरणीचे सरकार आले तरी जर राज्याचा, देशाचा विकास करायचा असेल तर जनताभिमुख विकास योजना राबवायच्या तर त्यासाठी निधीची तरतूद असणे आवश्यक आहे. मात्र देशातील आर्थिक परिस्थिती चिंताजनक असताना अशा विकास प्रकल्पांकरिता निधी उभा राहणार कुठून असा यक्षप्रश्न केवळ केंद्र सरकारच नव्हे तर देशातील सर्वच राज्य सरकारांना पुढे आणि स्थानिक पातळीवर विचार करायचा झाल्यास अगदी महापालिका नगरपालिका यांच्या समोरही आ वासून उभा ठाकला आहे. त्यामुळेच जरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्वतःची विचारसरणी ही काँग्रेसची विचारसरणीपेक्षा भिन्न असली तरीदेखील देशाचा गाडा चालवण्यासाठी आज मोदींनाही खासगीकरणाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यासाठीच आता सरकारी मालमत्तांच्या विक्रीतून केंद्र सरकार येत्या काही काळात सहा लाख कोटींचा निधी उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतीच दिल्लीत केली.यामध्ये वाराणसी, बडोदा, भोपाळ, चेन्नई यासह देशातील २५ विमानतळ, देशभरातील तब्बल ४०० हून अधिक रेल्वे स्थानके, ९० प्रवासी रेल्वे, ७४१ किलोमीटरपर्यंत धावणारी कोकण रेल्वे त्यावरील १५ रेल्वे स्टेशन, चौदाशे किलोमीटर लांबीचा रेल्वे ट्रॅक, पंधरा रेल्वे स्टेडियम, १६५ रेल्वेचे गुड्स शेड, चार पर्यटनस्थळांवरील रेल्वे आणि काही ठिकाणी तर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा अर्थात रेल्वे कॉलनींचाही या विक्रीमध्ये समावेश करण्यात आला आहे. भारतीय रेल्वे ही सध्या केंद्र सरकारकडे असणारी सर्वात मोठी पायाभूत दळणवळण व्यवस्था असलेली वाहतूक यंत्रणा आहे. केंद्रातील भाजप सरकारने तब्बल १.५२ लाख कोटीचा निधी या रेल्वेच्या मालमत्ता विक्रीतून उभारण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये कोकण रेल्वेची मालमत्ता विकून केंद्र सरकारला तब्बल सात हजार २८१ कोटी इतकी रक्कम मिळणार आहे. तर केंद्र सरकार येत्या काही काळात ज्या सहा लाख कोटींच्या मालमत्ता विकणार आहे. त्यामध्ये एकट्या रेल्वेच्या मालमत्ता विकून केंद्र सरकारला या सहा लाख कोटींपैकी सर्वाधिक २६ टक्के निधी यामधून प्राप्त होणार आहे. या बरोबरच देशातील महामार्गांची मालमत्ता विकून दीड लाख कोटी ऊर्जा क्षेत्रातून एक लाख कोटी गॅस पाईपलाईन मधून ५९ हजार कोटी तर टेलिकम्युनिकेशनमधून ४० हजार कोटी असा हा सहा लाख कोटींचा निधी केंद्र सरकार उभा करणार आहे. याबाबत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्टीकरण दिले आहे ते फारसे समाधानकारक नाही याचं कारण म्हणजे केंद्रीय अर्थमंत्री म्हणतात की, सरकारी मालकीच्या प्रकल्पांची विक्री होईल. मात्र केंद्र सरकारच्या मोनेटायझेशन धोरणानुसार जरी प्रकल्पांची विक्री झाली तरी जमीन मात्र खाजगी कंपन्यांना विकली जाणार नाही. जमिनीची मालकी केंद्र सरकारकडे राहील, असे अर्थमंत्री सांगत आहेत. हे कोणत्याही सुशिक्षित व अर्थसाक्षर व्यक्तीला फारसे पटण्यासारखे नाही. कारण घर विकायचे मात्र घराची जमीन विकायची नाही असेच केंद्र सरकारचे मोनेटायझेशनचे धोरण आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये. कोरोनामुळे देशासह जगभरात आलेली आर्थिक मंदी यामुळे त्याचा सगळ्याच

पातळ्यांवर परिणाम झालेला आहे. भारताचीही त्यातून सुटका झालेली नाही. त्यामुळे विकास कामांसाठी आर्थिक निधी उभारण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे आहे.

एवढी मोठी सार्वजनिक मालमत्ता विक्रीला काढण्याचे जे प्रमुख कारण सांगितले जात आहे ते म्हणजे सार्वजनिक आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून केंद्र सरकारला पायाभूत सुविधांचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईप लाईनकरिता आगामी काळात तब्बल ४३ लाख कोटी रकमेची गरज आहे आणि विशेष म्हणजे पुढील तीन वर्षात म्हणजेच २०-२२ ते २०-२५ या चार वर्षांच्या काळात मोनेटायझेशन हे धोरण राबवून केंद्र सरकार या ४३ लाख कोटी रुपयांपैकी केवळ सहा लाख कोटी उभे करू शकणार आहे. त्यामुळे उर्वरित ३७ लाख कोटींचा निधी केंद्र सरकार कशाच्या माध्यमातून उभे करणार हा आजच्या घडीला प्रश्न आहे. जी अवस्था केंद्र सरकारची आहे तीच किंबहुना त्याहून अधिक दारुण अवस्था आर्थिक स्थिती देशातील विविध राज्य सरकारांची आहे. नवीन विकास कामे सुरू करायची तर त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक निधीची गरज आहे. कोणत्याही पक्षाचे केंद्रातील तसेच राज्यातील सरकार हे पूर्णपणे सरकारी निधीमधून विकास प्रकल्प राबवू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे, मात्र असे असताना खाजगीकरणाचे तसेच सरकारी मालमत्ता देशातील मूठभर उद्योगपतींच्या घशात घालण्याचे हे जे काही प्रयोग सर्वच पक्षातील सरकारांकडून सुरू आहेत हे देशाकरता आणि विशेषतः देशातील समाजवादी कामगार चळवळ आणि मध्यमवर्गीयांसाठी अत्यंत धोकादायक आहेत, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

## ११.८ खासगीकरणाचे दुष्परिणाम

भारतात जी विषमता आणि जातीवाद यामुळे द्वेषाची व विषमतेची व्यवस्था निर्माण करून कोणत्याही परिस्थितीत एक वर्ग सत्तेत वा मोठ्या पदावर राहील यासाठी पूर्वीपासून नियोजन केलेले आहे मग परिस्थिती आणि सत्ता कोणाचीही असो. परकीय लोकांच्या गुलामगिरी लाचारीचे जिवन जगणे भारतीय लोकांना पसंत आहे. म्हणून पारतंत्र्यातही लोक आनंदी राहतात. काही काही लोकांना तर आपण आजही पारतंत्र्यात आहोत याचीच जाणीव नाही. स्वतः चा मेंदू न वापरता दुसऱ्याने सांगितलेल्या अफवेवर सर्वात जास्त विश्वास ठेवणारा व्यक्ती म्हणजे भारतीय माणूस होय. आजही ९५ टक्के लोक फक्त अफवेला सत्य समजून जगत आहे. जो अफवा अथवा काल्पनिक बाबीं विषय खर बोलतो त्याला मुर्खात काढतात किंवा विद्रोही बनवतात.

खाजगीकरणामुळे देश गुलामीत कसा जातो याचे उदाहरण म्हणजे इस्ट कंपनी व्यापाराच्या उद्देशाने भारतात आली आणि बघता बघता भारताला गुलाम बनवून कसे टाकले हेच कळाले नाही. बघता बघता संपूर्ण भारतावर इस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापित झाली. सांगायचे तात्पर्य गुलामीकडे जाण्याचा पहिले लक्षण म्हणजे खाजगीकरण होय. खाजगीकरणामध्ये मुलभूत हक्क व आधिकारांचे हनन होऊन, नागरिकांना फक्त गुलाम म्हणून बघितले जाते आणि तशी त्याला वागणूक दिली जाते. ज्यांच्याकडे दूरदृष्टी नाही वा ज्यांना राष्ट्राबद्दल आपुलकी नाही असेच लोक खाजगीकरणाचे जल्लोष करून आनंदाने स्विकार करतात. खाजगीकरण आणि

सार्वजनिक अर्थात सरकारी यामध्ये काय फरक आहे ? हे सुशिक्षित लोकांना याची जाणीव नाही. म्हणून लोक खाजगीकरणाचा हसत हसत स्विकार करून सार्वजनिक मालमत्तेची हानी आणि देशाचे नुकसान करतात. आज सर्वच सार्वजनिक क्षेत्र खाजगीकरणामध्ये गेले आहे. बोटावर मोजण्या इतक्या लोकांना खाजगीकरण व त्याचे दुष्परिणाम माहिती आहेत बाकीच्या लोकांचे काय? खाजगीकरणाची झळ सोसत असताना सुद्धां खाजगीकरण फायद्याचे आहे की तोट्याचे आहे हे कळत नसेल तर याला काय म्हणावे? टेलिकॉम क्षेत्रात पाय ठेवताना जिओने एक वर्षे नेट फ्री देऊन ग्राहकांना आकर्षित केले. अनेक ग्राहक जिओशी जुळल्या गेले, लोकांना सवय झाली आणि आज जिओ सर्वात महाग आहे. भारतीय लोक कोणताच विचार करत नाहीत, काही दिवस वापरून सिम कार्ड फेकून देऊ इथपर्यंत विचारसरणी असलेल्या लोकांमुळे आज जिओ नंबर एक वर आहे. उद्योजक कोणतीही वस्तू वा सेवा कधीच मोफत देत उलट दिलेल्या च्या बदल्यात जास्त वसूल कसे करायचे याचे नियोजन अगोदरच असते. सुरवातीला हवे हवेसे वाटणारे आज खिशाला परवडणारे नाही. याचे कारण समोरचा विचार करण्याची मानसिक कुवत नाही. हीच परिस्थिती शिक्षण, नोकरी, वाहतूक, याविषयी झाली आहे. खाजगीकरण ही संकल्पना आली आणि देश अधोगतीकडे जायला सुरवात झाली. शिक्षणामध्ये खाजगीकरण आले. मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे. असा कायदा असताना सुद्धां मुलांना केजी, ज्युनिअर केजी सिनिअर केजी यामध्ये हजारो रुपये देऊन प्रवेश घेतला जातो.

माझं मुल कॉनव्हेटमध्ये शिकायला जाते याच खूप गर्व पालकांना असते पण त्याच्या फायदे तोट्यांचा कुठेच विचार नसतो. सरकारच्या बालवाड्या असायच्या मोफत प्रवेश, रोज रोज गाणे गाऊन व कथा सांगून मुलांना शिक्षणामध्ये आवड निर्माण केली जायची. ती गोष्ट केजी मध्ये मिळत नाही. पहिल्या वर्गापासून इंग्रजी माध्यम घेऊन मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो, घरी कोणाला एबीसीडी माहिती नाही तरी मुलगा इंग्रजी शाळेत. पाचव्या सहाव्या वर्गात मुलगा गेला की जवळचा पैसा संपून जातो. दहावी बारावी नंतर खाजगी मध्ये शिकवताना पालकाच्या नाकी नऊ येतात. ज्यांच्याकडे स्थावर मालमत्ता आहे असे लोक जमीन विकून मुलांना शिकवतात. लाखो रुपये खर्च करून जेव्हा शिक्षण पूर्ण होते तेव्हा आपण तर शिकलो पण नोकरीच काय. कारण नोकरी सुध्दा खाजगीकरणात कमी पगाराची असते.

कमी पगारावर जास्त वेळ काम करावे लागते. शिक्षणाला लागलेला पैसा सुद्धा आपण कमवू शकत नाही. आपण कॉनव्हेंट आले कोणताही विचार न करता दुसऱ्याने केले म्हणून आपण सरकारी शाळेतील मुल खाजगी शाळेत टाकून स्वतः चे, मुलाचे आणि अर्थाचे नुकसान करून टाकतात. शासकीय बसने प्रवास करणे कंटाळवाणे वाटतं पण खाजगी बसने प्रवास करताना खुप आनंद होतो. खाजगीकरणाचा स्विकार आपण हसत खेळत करून अनेक समस्या निर्माण करून ठेवतो. वाहतूक रस्त्याची सुद्धा तिच परिस्थिती आहे. सरकार कडे रस्ते बांधायला पैसे नसतात. मग सरकार खाजगी कंपनीला काम देऊन रस्ते बांधून घेतात. मोठ मोठे टोल नाके उभे करतात. रस्ते खराब होतात, टोलची मुदत संपून जाते तरी नागरिकांची लुट थांबता थांबत नाही. जे काम

कंपनी करू शकते ते काम सरकार का करत नाही? सुरवातीला शासकीय चॅनल दूरदर्शन म्हणून होते. परंतु जसजसे खाजगी कंपन्या आल्या आणि दूरदर्शन नामशेष झाले. दूरदर्शन मोफत बघायला मिळायचे परंतु आता दरमहा विशिष्ट शुल्क आकारूनच आपल्या घरातील टिव्ही आपण बघू शकतो. आज शेतजमीन जर खाजगीकरणाद्वारे कंपनीकडे गेली तर उपासमार आणि महागाईमध्ये होरपळून मरणाऱ्यांची संख्या करोडोच्या घरात राहील. खाजगीकरणाचा काही लोकांना सुरवातीला चांगले वाटते. परंतु दुष्परिणाम दिसून येत नाही. खाजगीकरणा शिवाय विषमतावादी व्यवस्था सुद्धा कायम राहू शकत नाही. म्हणून विषमतावाद पसरवून उद्योगपतींच्या हाती सत्ता देऊन पुन्हा पारतंत्र्यात जाण्याची पूर्ण तयारी झालेली आहे. अशा प्रकारे खाजगीकरणाचा आपण हसत स्विकार केला तरी त्याचे दुष्परिणाम खूप भयावह आहेत. शाळेच्या फी वाढण्याचे, सरकारी नोकरी कमी होण्याचे, कमी पगारावर जास्त काम करण्याचे, दिवसातून फेरी परत टोलनाका अशा अनेक प्रकारे आपल्याकडून खाजगी सेवेच्या नावाखाली नागरिकांचे खिसे रिकामी करून खाजगीकरणाने देशाला आर्थिक मागास केले आहे. सरकारी तिजोरीत जाणारा पूर्ण पैसा खाजगी लोकांकडे गेला आणि भारत देशाची तिजोरी रिकामी करून देशाला कंगाल केले. राष्ट्रीय संपती कंपनीच्या हाती गेली. त्यामुळे देशातील जनता भिकेला लागली. हे सर्व घडले कारण स्वतःला सुशिक्षित समजणारा वर्ग आपल्या मेंदूने विचार न करता दुसऱ्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे, दुरदृष्टीचा अभाव असून तर्क करण्याची क्षमता नाही. म्हणून खाजगीकरण वाढून दुष्परिणाम दिसून येतो. आता तर ही खाजगीकरणाला सुरवात झाली आहे. येणाऱ्या काळामध्ये शिक्षण, राशन, आरोग्य, नोकरी, सर्व काही खाजगीच असेल आणि ते कोणत्याही सर्व सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारे नसेल म्हणजे खाजगीकरणामुळे आपण भिकेला लागणार हे नाकारून चालणार नाही. म्हणून आज खाजगीकरणाचा आनंदाने स्विकार केल्यापेक्षा स्वाभिमानाने विरोध जर झाला तर राष्ट्रीय संपती राष्ट्राच्या मालकीची राहील आणि जास्त दुष्परिणाम बघायला मिळणार नाहीत.

## ११.९ देशातील नोकरीचं खाजगीकरण: एक गंभीर बाब !

देशात खाजीकरणाचं वादळ सुरु झालं आहे. वीज, रेल्वे आणि तत्सम क्षेत्राचं आता खाजगीकरण झालं आणि आता शिक्षणक्षेत्रही खाजगी होवू पाहात आहे. ती अगदी जमेची बाजू आहे. कारण यातून त्या त्या क्षेत्राचा विकास होवू शकतो आणि देशाचाही. देशाला कराच्या स्वरुपात फायदा होचो. परंतू यामधून एक सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे गरीबांची मुलं उच्च शिक्षण घेवू शकणार नाहीत. तसेच खाजगी नोक-याही गरीबांच्या वाट्याला येणार नाही. जरी त्यांच्यात कौशल्य असले तरीही बेरोजगारी वाढली आहे. देश चरणसीमेला पोहोचलेला आहे. लोकांना शिकावंसं वाटत आहे. लोकं शिकतात आहे. उच्च शिक्षण घेतात आहे. परंतू हे शिक्षण घेतात नोकरीच्या अपेक्षेनं. कोणीही साधा धंदा लावायचा विचार करीत नाहीत. त्यांना असं वाटतं की नोकरी करणे हे उच्च शिक्षण घेणा-यांचे काम आणि धंदा करणे हे निरक्षरांचे काम. मग मी जर निरक्षर नाही तर मी धंदा कशाला करु? शेवटी याच प्रश्नांच्या चक्रव्युहात फसून लोकं उच्च शिक्षण तर

घेतात. परंतू नोकरी व्यतिरिक्त इतर कामे करायला धजत नाहीत. मग बेरोजगारी वाढणार नाही तर काय ? अलीकडे नोकरीमध्येही स्पर्धा आहेत. नोकरी नोकरी करता करता वय निघून जातं. परंतू नोकरी मिळत नाही. तसेच नोकरी मिळवीत असतांना लाखो रुपये डोनेशन म्हणून द्यावं लागतं. शिवाय शिफारशीही भरपूर लागतात. शेवटी या कितीही शिफारशी असल्या तरी भागत नाही. जवळचा नातेवाईक व जवळची ओळखही असते नोकरी मिळवायला. ती नसल्यानेही नोकरी लागत नाही. आजच्या परिस्थितीत असा विचार केला तर नोक-याच अलिकडे संपलेल्या आहेत. लोकं उच्च शिक्षण घेत आहेत. परंतू नोकरी न मिळाल्यानं ते आत्महत्याही करीत आहेत. कारण शिक्षण घेत असतांना घरी आलेली डबघाईची परिस्थिती, अलिकडचं शिक्षण एवढं महाग झालं आहे की त्याचा विचारच आपण करु शकत नाही. कोणताही मुलगा सहजपणे दहावी बारावीपर्यंत शिकू शकतो. कारण तेवढं शिकायला तेवढा पैसा लागत नाही. परंतू पुढे मात्र भरपूर पैसा लागतो. कारण सर्व शैक्षणीक संस्था ह्या खाजगी आहेत. याचाच अर्थ असा की मालीक मौजाच्या आहेत. त्या संस्थेचे मालक विद्यार्थ्यांकडून अतोनात शुल्क गोळा करतात नव्हे तर शिक्षण देण्यासाठी व्यापार करतात. मग एवढा पैसा गरीबांजवळ कुठून? तरीही त्यांची मुलं उच्च शिक्षण शिकता यावं म्हणून शिकतात. त्यामुळं आलेली डबघाईची परिस्थिती. त्यातच मुलं शिकली की त्यांना वाटणारी लाज. उच्च शिक्षीत मुलांना कोणतेही काम करायला शरमच वाटते.

## ११.१० खाजगीकरणांचे वास्तव

भारतीय समाजाला गुलामगिरीच्या चक्रव्युहात ढकलणारी व्यवस्था म्हणजे खाजगीकरण होय. भारत देश जेव्हा पासून प्रजासत्ताक झाला तेव्हा पासून अलोकशाही वृत्तीवादी भारताला स्वतःच्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण भारतीय संविधानातील बळकटीमुळे राजकर्त्यांना तसे करता आले नाही.सन १९८५ पासून भारतीय राजनीती नव्या मोडवर आली आहे. बदलत्या युगाचे नवे स्थितंतरे आपल्या पाहायला मिळत आहेत. देशहीतपेक्षा स्वःहीत व पक्षहीत यामध्ये राजकारणी मशगुल असल्याने गरीब हा गरीब तर श्रीमंत हा श्रीमंत होत आहे. भ्रष्टाचारांचे नवे कुरण म्हणजे आजचे राजकिय क्षेत्र पाहायला मिळत आहे. सरकारी सेवावर कुटाराघात करून खाजगी मालकांचे नवे अर्थसम्राट निर्माण झाले आहेत. शिक्षणक्षेत्र, दुरसंचार क्षेत्र, बँक क्षेत्र, कमजोर झाले असून खाजगीकरणाचा उदो उदो सारीकडे वाढला आहे. आजचे वर्तमान केंद्र सरकार भांडवलधार्जिने असल्याने देशातील सर्व सरकारी क्षेत्र विकण्याचा सपाटा सरकारने लावला आहे. भारतीय दुरसंचार व्यवस्थेला मोळकळीस आणून विदेशी कंपण्यांनी भरघोस फायदा केला आहे. कोरोना महामारीने मोबाईल कंपण्यांची चांदी झाली आहे. ऑनलाईन शिक्षणाने व वर्क टू होम प्रक्रियेने सर्व कंपन्यांनी अतोनात पैसा कमविला आहे. भारतीय उच्चतम श्रीमंताच्या फायद्यासाठी सामान्य जनतेला वेठीस धरले जात आहे. ऑनलाईन परिक्षेसाठी दहावी व बारावी मधील श्रीमंत विद्यार्थांनी आंदोलन चालवले आहे. खेड्यातील लाखो विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून कोसो दूर असतांना श्रीमंत विद्यार्थी स्वतःचा विचार करत आहे हे नक्कीच वेदनादायक आहे. यासाठी शासनाने योग्य पावले उचलने गरजेचे आहे. विद्यार्थांत गरीब व श्रीमंत असा भेद निर्माण

munotes.in

होऊ देऊ नये. नाहीतर यांचे गंभीर परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील. आज फुकटच्या डाटाने तरूण पिढी वाईट मार्गाने जात आहे. तरी सरकार यावर नियंत्रण ठेवू शकत नाही. कारण हाच तरूण राजकारणी लोकांचा खरा राजवाहक आहे. इ.स. १९९१ पासून भारतात खाजगीकरणाचे वारे जोरात वाहू लागले. कृषी, शिक्षण,कामगार व असंघटित क्षेत्राला या नीतीने जबरदस्त हादरे दिले. पैसाच्या झगमगाटात सरकारी कंपण्या कवडीभावाने विकल्या गेल्या. आर्थिक विकासाचे मॉडेल श्रीमंतासाठी लाभदायक ठरले पण गरीब व बेरोजगारासाठी धोकादायक ठरले. या खाजगीकरणाने आदिवासी,शेतकरी,कामगार, कर्मचारी यांचे शोषण केले. राजकारण्यांनी खाजगीकरण म्हणजे भारताचे नंदनवन करणारा महामार्ग असा भ्रम निर्माण करून खाजगीकरण म्हणजे भारताला गुलाम करण्याच्या षडयंत्राचे वास्तव लपवून ठेवले. सन १९९१ ते सन २०२१ या कालखंडात देशातील व विदेशी कंपण्यांनी अब्जो रूपयांचे द्रव्यनिःसारण केले आहे. करोडो कामगाराचे शोषण करून गडगंज संपत्ती कमावली आहे. या कमाईवर सरकारला टेकू देऊन देश गुलाम केला आहे. आज लोकशाहीचे लक्तरे वेशीवर टांगवले जात आहे. नव्या कायद्याने भारतीय कामगार व शेतकरी वर्गाला दास्य व गरीबीच्या अंधकारमय आभासी जगात लोटले आहे. नवा भ्रम मेंदूत तयार करून खरे वास्तव लपवून ठेवले आहे. सरकार शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्यासाठी नवी रणनीती आखत आहे. तरी शेतकरी स्वतःची जमीन व देश वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावत आहेत. न्यायालयातील न्यायधिशांनी आरक्षण समाप्त करण्याविषयी सुतोवातन केले आहे. कायद्यानी सत्यता सांगणाऱ्या न्यायधिशांनी असे वक्तव्य करून स्वतःचे पूर्वग्रह दूषितपणाची भावना जाहीर केली आहे. त्याच्या बोलण्यांनी आरक्षणाविषयी भ्रम निर्माण झाला आहे .तर आरक्षणाचे खरे वास्तव जनतेपासून डोळेझाक होत आहे. आरक्षण समाप्त करता येत नसल्याने सर्व सरकारी विभागाचे खाजगीकरण करून व प्रतिआंदोलन करून आरक्षण कमकूवत करणे हे त्यांचे वास्तव आपण समजून घेतले पाहिजे. आज कोविड-१९ च्या महामारीने सारे क्षेत्र प्रभावित झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्था ऋण अवस्थेत पोहचली आहे. अनेकांची आयुष्य उध्दवस्त झाली आहेत. अशा कठीण काळात केंद्र सरकारने सरकारी सेवा क्षेत्राचे खाजगीकरण करण्याचा कपटी डाव आखला आहे. खाजगीकरणातून देशहीत असल्याचा भास निर्माण करून स्वतःच्या मित्रांचा फायदा करण्याचा हा डाव दिसून येत आहे. वित्तमंत्री यांनी अर्थसंकल्पात खाजगीकरणाचा आगाज केला आहे. बँक व विमा क्षेत्र, अनेक सरकारी क्षेत्रात खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

बँक कर्मचारी स्वतःला सरकारचे तारणहार समजत होते. त्याच कर्मचाऱ्यांचे जीवन उध्दवस्त होत आहे. ग्रामीण जनतेचे जीवन श्रीमंताच्या हवाली करून देशाला विकण्याचा हा डाव फारच धोकादायक ठरू शकतो. भारतीय सर्व नागरिकांनी खाजगीकरणातील भ्रम व वास्तव यांचा योग्य अर्थ समजून स्वतःची वाटचाल करावी. येणाऱ्या पुढील निवडणूकित यांचे गंभीर परिणाम पाहायला मिळतील. देशातील तरुणांनी व सर्व लोकांनी सरकारचे धोरण समजून घ्यावे. देशाला विकणाऱ्या कावेबाजापासून देशाचे रक्षण करावे. सारे भेदभाव सोडून आपण एक होऊ या. देशाला आम्ही विकणार नाही असा भ्रम निर्माण करणाऱ्या सत्तेपासून सावध राहावे. खाजगीकरणातील वास्तव

ओळखून नवा क्रांतीपथ निर्माण करून देशाला व संविधानाला वाचवावे हाच खरा मार्ग आहे. दुसरा कोणताच मार्ग चांगला नाही.

## ११.११ सारांश

फायद्यात चालणा-या सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करावे अशी मागणी विविध उद्योगपतींकडून सतत होत असते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणूनच खाजगीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळते. १९९१ साली नरसिंहराव सरकारने खाजगीकरणाच्या धोरणाची सुरवात केली. त्यानंतर १९९८ ते २००४ या काळात सत्तेवर असलेल्या भाजपप्रणित आघाडीच्या सरकारने वेगाने हे धोरण पुढे नेले. त्यानंतर सत्तेमध्ये आलेल्या काँग्रेस आघाडीने हे धोरण तसेच चालू ठेवले आहे. फक्त त्याचा वेग काही प्रमाणात कमी केला आहे. मोठ्या उद्योगांना खाजगीकरणामुळे फायदा झाला आहे. फायद्यात चालणा-या मोठ्या सरकारी कंपन्या त्यांच्या ताब्यात येत असल्यामुळे त्यांची ताकद वाढते आहे. मूलभूत साधने त्यांच्या हाती येत आहेत. सरकारची जबाबदारी कमी होते आणि गुंतवणुक कमी होते. सरकारकडे निधी उपलब्ध होतो. त्यामुळे या प्रक्रियेत सरकारचाही फायदा आहे. इतर महत्त्वाच्या विकास कामांसाठी सरकारच्या हाती पैसा येतो असा सरकारचा दावा असतो. खाजगीकरणामुळे शासनाची मक्तेदारी संपून स्पर्धा वाढते त्यामुळे उत्पादनाचा दर्जा वाढतो किंमतींवरही नियंत्रण येते, ग्राहकांना विविध सेवा आणि वस्तूंची निवड करण्याची संधी मिळते आणि त्यामुळे अंतिमतः ग्राहकांचा फायदा होतो असा खाजगी उद्योजकांचा दावा आहे. कामगारांचे हाल मात्र या व्यवस्थेमुळे वाढलेले आहेत. त्यांच्या नोकरीची शास्वती राहीलेली नाही. कायमस्वरुपी कामगार ठेवण्याऐवजी कंत्राटी पद्धतीने काम करून घेण्याकडे खाजगी उद्योगांचा कल दिसतो आहे. सरकारी व्यवस्थे मध्ये कामगार संघटनांना मानाचे स्थान होते. खाजगी उद्योजक मात्र संघटना उभीच राहणार नाही या दृष्टीने आपली धोरणे आखतात. निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि स्वस्त दरात कर्ज, घरासाठी कर्ज, मुलांच्या शिक्षणाची सोय, पाळणा घरांची सोय अशाप्रकारच्या सोयी सवलती देण्यासही खाजगी उद्योजक फारसे उत्सूक नसतात. खाजगी उद्योजक माणसांपेक्षा यंत्रसामुग्री आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणुक करण्याला प्राधान्य देतात. (Capital intensive technique instead of labour intensive technique) अधिकात अधिक यांत्रिकीकरणकरून कामगार कमी करण्यावर त्यांचा भर असतो. त्यासाठी कधी स्वेच्छा निवृत्ती योजना मांडल्या जातात. शिक्षण, आरोग्य, पाण्याचे व्यवस्थापन यासारख्या मूलभूत व्यवस्थांमध्ये खाजगीकरण होत असल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना या सेवांसाठी खुल्या बाजारातील भाव परवडत नाहीत. त्यांना या सेवांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे विषमता वाढू लागली आहे. समाजातील दुर्बल घटकांवर अन्याय होतो.

खाजगीकरणाचा अतिरेक घातक ठरतो. याचा चांगलाच अनुभव अमेरिकेने घेतला आहे. त्यांनी त्यांच्या विमानतळांवरील सुरक्षाव्यवस्था खाजगी संस्थांकडे दिली. या संस्थांनी ती फारशा गांभिर्याने घेतली नाही. ९ /११ च्या अनुभवानंतर मात्र ती यंत्रणा हा सरकारी सुरक्षा संस्थांकडे द्यावी लागली. तसेच लुइझियाना राज्यातही चक्रीवादळानंतर

स्थानिकांच्या पुनर्वसनाचे काम खाजगी संस्थांकडे दिल्यामुळे काही प्रश्न निर्माण झाल्याची चर्चा होती.

## ११.१२ प्रश्न

१. खाजगीकरण म्हणजे काय ?

२. बँकाच्या खाजगीकरणांचे दुष्परिणाम स्पष्ठ करा.

३. शिक्षणाच्या खाजगीकरणांचे परिणाम स्पष्ट करा.

४. देशातील नोकरींचे खाजगीकरण एक गंभीर बाब आहे सविस्तर चर्चा करा.

## ११.१३ संदर्भ


१. कराडे जगन :-'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने' डॉयमण्ड पब्लिकेशनसदाशिव पेठ, पुणे-३०.

२. गायकवाड मुकुंद :-'जागतिकीकरण शाप नव्हे वरदान' कॉन्टीनेटल प्रकाशन,विजय नगर, पुणे-३०.

३. जाधव अपेक्षा :-'भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन, निराली प्रकाशन, शिवाजी नगर, पुणे.

४. दत्त गौरव, महाजन अश्विनी :- 'भारतीय अर्थव्यवस्था' एस चन्द ॲण्ड कंम्पनी प्रा. लि. रामनगर, नई दिल्ली-११००५५

५. भागवत ॲण्ड ॲडमिरल :- 'जागतिकीकरण नविन गुलामगिरी' समता प्रकाशन, समता सैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाण पूल-लष्करी बाग, नागपूर-१६

६. जिभकाटे, शास्त्री :- स्थूल अर्थशास्त्राचे सिध्दान्त-१ विश्व पब्किास ॲण्ड डिस्टीब्यूटर्ट्स नागपूर-४४००३२

७. म्हारेके राहूलः-अर्थसंवाद त्रैमासिक, मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड ४४ अंक १ भारतीय, मृद्रणालय, शाहपुरी, कोल्हापूर-४३१२०४

८. साठे मधुसूदनः-'जागतिक अर्थकारण, नव्या जगाचे अर्थकारण' डायमण्ड पब्लिकेशन्स पुणे-३०

९. साठे मधुसूदनृ :-'भारताच्या आर्थिक समस्या भाग-५, आर्थिक सुधारणा आणि वाढ' डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे-३०

१०. साठे मधुसूदन :-'जागतिक अर्थकारण : आशियातील अर्थव्यवस्था' डायमण्ड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे-३०

११. वावरे अनिलकुमार, :-'आंतरराष्ट्रिय अर्थशास्त्र' एज्युकेशनल पब्लिशर्स घाटगे लालासाहेब ॲण्ड डिस्टिब्यूटर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

१२. लोकमत ई - पेपर मुंबई १२/०६/२०२०

१३. www.bbc.com.in> 10 mar 2020

१४. www.bbc.com.in> india.5189827915mar 2020,

१५. M. dailyhunt.in> india> marathi> b.... १८ Dec २०१६ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

१६. www.bbc.com.India. 53975746

१७. Musselburgh co-op in crisis as privatisation bid fails

१८. The Pursuit of Reason: The Economist 1843–1993. Harvard Business School Press. p. 946. ISBN 0-87584-608-4.

❖❖❖❖

munotes.in

# १२

## जागतिकीकरण

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ पार्श्वभूमी

१२.३ जागतिकीकरणाचा अर्थ

१२.४ जागतिकीकरण आणि जागतिक भांडवलशाही

१२.५ जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे

१२.५.१ जागतिकीकरणाचे फायदे

१२.५.१.१ औद्योगिकीकरणास चालना

१२.५.१.२ बाजारपेठांचा विस्तार

१२.५.१.३ परकीय व्यापारात वृद्धी

१२.५.१. ४ उपभोक्त्यांचा फायदा

१२.५.१.५ रोजगार वृद्धी

१२.५.१.६ सेवाक्षेत्राचा विस्तार

१२.५.१.७ साजाजिक-सांस्कृतिक संबंधात वाढ

१२.५.२ जागतिकीकरणाचे तोटे

१२.५.२.१ स्थानिक उद्योगास मारक

१२.५.२.२ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी

१२.५.२.३ बेरोजगारीत वाढ

१२.५.२.४ विषमतेत वाढ

१२.५.२.५ विकसनशील राष्ट्रांची लूट

१२.५.२.६ कर्जबाजारीपणात वाढ

munotes.in

१२.५.२.७ पर्यावरणाची समस्या

१२.५.२.८ समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी

१२.५.२.९ सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव

१२.५.२.१० पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष

१२.६ जागतिकीकरणांचे भारतीय क्षेत्रावर पडलेले परिणाम

१२.६.१ जागतिकरणांचे शिक्षण क्षेत्रावरील परिणाम

१२.७. जागतिकीकरणांचे कृषी विभागांवर पडलेले परिणाम

१२.८ सारांश

१२.९ प्रश्न

१२.१० संदर्भ

## १२.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास :

१. जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करता येईल.

२. जागतिकीकरणाची प्रभेदक वैशिष्ट्ये सांगता येतील.

३. जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांच्यातील संबंधाचे आकलन होईल.

४. जागतिकीकरणाचे फायदे व तोटे यांचे आकलन होईल.

## १२.१ प्रस्तावना

औद्योगिकीकरण, पाश्चिमात्त्यकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियांचा विस्तारीत असा पुढचा टप्पा म्हणजे जागतिकीकरण होय. १९८० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात आर्थिक सुधारणेचे वा पुनर्रचनेचे जे कार्यक्रम सुरू झाले, त्यातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. जागतिकीकरण ही संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणारी प्रक्रिया आहे. किंवा जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. १९९० मध्ये सोव्हिएट युनियनचा पाडाव झाल्या नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. १९८० नंतर जगभर काही राष्ट्रांकडून अर्थव्यवस्था खुली करण्याच्या आग्रहाला सुरवात झाली. यामध्ये अर्थातच अमेरिका, यु. के. (इंग्लंड) या राष्ट्रांचा पुढाकार होता. १९८९ मध्ये बर्लिनची भिंत आणि त्यापाठोपाठ पूर्व युरोपातील साम्यवादी व्यवस्था कोसळल्यानंतर या प्रक्रियेला वेग आला. १९९१ मध्ये सोव्हिएट रशिया (USSR) नष्ट झाल्यानंतर जागतिकीकरणाची प्रक्रिया परत उलट

दिशेने जावू शकेल ही काही भांडवलवादी राष्ट्रांच्या मनातील भीती नाहीशी झाली. जागतिकीकरणामुळे प्रगत देशांना नवीन बाजारपेठा उपलब्ध होतात. त्यांच्याकडील प्रगत तंत्रज्ञानामुळे तसेच कायदा, अर्थव्यवहार, माहिती तंत्रज्ञान या बाबतीतील अफाट कौशल्यामुळे ते या नवीन बाजारपेठांमधील स्पर्धांमध्ये इतर स्थानिक स्पर्धकांना सहज मागे टाकतात आणि सहजपणे बाजारपेठ काबीज करतात. त्यांना स्पर्धकच उरत नाही. त्यामुळे त्यांना जागतिकीकरण वेगाने व्हावे असे वाटते.

अमेरिका आणि पश्चिम युरोपातील प्रगत देशांनी जागतिकीकरणाचा आग्रह धरला. साम्यवादी चीनने १९७९ पासून राजकीय व्यवस्था बंदीस्त ठेऊन आर्थिक बदल करण्यास सुरवात केली. त्यांनी त्यांच्या अटींवर पश्चिमेकडील आर्थिक महासत्तांना चीनमध्ये प्रवेश दिला. मेक्सिको, इंडोनेशिया, मलेशिया या काही देशांनी पश्चिमेकडील देशांच्या सूचनांप्रमाणे आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांच्या म्हणण्याप्रमाणे आर्थिक बदल स्वीकारले. परंतु त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. रशियाने पुतीन यांच्या नेतृत्वाखाली वेगळ्या मार्गाने जागतिकीकरण स्वीकारले. त्यांचाही गेल्या दशकात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास झालेला दिसतो. भारताने सावध पाऊले उचलत आर्थिक सुधारणांचा मार्ग स्वीकारला. भारत सरकारला प्रचंड अंतर्गत विरोधाला तोंड द्यावे लागले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्वत्र काही समान अनुभव आले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीत वाढ झाली आहे. परंतु उत्पन्नाचे समान वितरण झालेले नाही. समाजातील असमानता वाढीस लागली आहे. श्रीमंत वर्गाला फायदा झाला आहे. गरीब अधिक अडचणीत आले आहेत. श्रीमंत आणि गरीबांमधील दरी वाढली आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. जगातील सर्व देश आर्थिक विकासाच्या समान पातळीवर नाहीत. जगाच्या सर्व भागांचा विकास समप्रमाणात झालेला नाही.

जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेताना आपणाला असे म्हणता येईल की, व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळ ण , विदेशी स्थलांतर, पर्यावरण राहणीमान, शासन समाजव्यवस्था आणि संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रूपांतर होय. जागतिकीकरणामध्ये प्रामुख्याने वित्त व भांडवल यांची मालकी, बाजार व स्पर्धा, ज्ञान व संशोधन, आणि यांना संलग्नीत असणारे तंत्रज्ञान तसेच नवनवीन वस्तुद्वारे उपभोगाचे सारखेपण व राहणीमानाचे आधुनिकीकरण यांचा समावेश होतो.

## १२.२ पार्श्वभूमी

जागतिकीकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता आपणास असे दिसते की, १९७० च्या दशकापासून जागतिककीरणाला सुरूवात झाली. आंतरराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्यामार्फत राष्ट्रांना कर्ज पुरवठा करते वेळी घातलेल्या विविध नियम व अटीतून जागतिकीकरणाची सुरूवात झाल्याचे दिसते. त्याचे कारण असे की, विकसीत देशांची उत्पादक यंत्रणा सज्ज असताना प्रभावी मागणी तोकडी पडते म्हणून भविष्यात येणाऱ्या आर्थिक मंदीवर, पूर्ण रोजगारासाठी सक्रिय हस्तक्षेप व प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याचे धोरण १९५० च्या दशकात अवलंबिले, पण त्यामुळे नोकरशाहीची पकड वाढत गेली, कामगार संघटना व इतर हितसंबंधी गट आपल्या स्वार्थासाठी

शासनव्यवस्थेला व जनतेला धारेवर धरू लागल्या याऊलट दुसरीकडे शासकीय उद्योगाच्या वित्तिय गरजा भागविण्यासाठी कर्जे उभारली गेली. यांचा परिणाम म्हणजे खाजगी उपक्रमशीलतेची गळचेपी होऊ लागली. या परिस्थितीमुळे शासकीय पातळीवरून म्हणजे सरकारने उत्पादन क्षेत्रातून अंग काढून घ्यावे असा विचार पुढे आला या विचाराला अनुसरून खुलेपणा स्वीकारणारी अनेक धोरणे अवलंबली गेली. १९७० च्या दशकात सार्वत्रिक दुष्काळाने संपूर्ण जनतेला ग्रासले होते. त्यातुन बेकारी, दारिद्र्य, उपासमार व महागाई यासारख्या विविध गोष्टींना तोंड द्यावे लागले. यांचा फायदा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी घेतला आणि त्यांचा विस्तार वाढला खऱ्या अर्थाने येथुनच जागतिकीकरणाचा उदय झाला असे आपणास म्हणता येईल.

## १२.३ जागतिकीकरणाचा अर्थ

जागतिकीकरण चा शाब्दिक अर्थ म्हणजे स्थानिक किंवा प्रादेशिक वस्तू किंवा घटनांचे जागतिक स्तरावर रूपांतरण करण्याची प्रक्रिया. याचा उपयोग एका प्रक्रियेचे वर्णन करण्यासाठी देखील केला जाऊ शकतो ज्याद्वारे जगभरातील लोक एकत्र येऊन एक समाज तयार करतात आणि एकत्र काम करतात. ही प्रक्रिया आर्थिक, तांत्रिक, सामाजिक आणि राजकीय शक्तींचे संयोजन आहे. जागतिकीकरणाचा वापर बऱ्याचदा आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो, म्हणजेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थांमध्ये व्यापार, परदेशी थेट गुंतवणूक, भांडवली प्रवाह, स्थलांतर आणि तंत्रज्ञानाचा प्रसार याद्वारे एकत्रीकरण. जागतिकीकरण ही अत्यंत संकीर्ण व मानवी जीवनाच्या विविध पैलूशी संबंधित असणारी अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे सोपे नाही. वेगवेगळ्या अभ्यासकांनी जागतिकीकरणाच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. त्यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. **दिपक नय्यर**: एखाद्या राष्ट्राचे आर्थिक व्यवहार त्याच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारीत करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

२. **श्रवणकुमार सिंग**: आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करून तेथे जगातील साधनसामग्रीचे व भांडवलाचे सुलभ अभिसरण निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

३. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पश्चिम आशियासाठी असलेल्या आर्थिक व सामाजिक आयोगाच्या मते - वस्तू, भांडवल, सेवा, आणि श्रम यांचा प्रवाह सुलभ करण्यासाठी राष्ट्रांच्या सीमांमधील अडथळे काढून टाकणे वा कमी करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

४. **जागतिक बँक**: जागतिकीकरण म्हणजे - अ) उपभोग्य वस्तूंच्या सर्व वस्तूंच्या आयातीवरील नियंत्रण समाप्त करणे. ब) आयात शुल्काचे दर कमी करणे. क) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे होय.

वरील चारही व्याख्या या आर्थिक दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. काही विद्वानांनी जागतिकीकरणाची व्याख्या वेगळ्या दृष्टिकोनातून केलेली आहे.

**५) ॲन्थनी गिडेन्स:** जगातील विविध लोकांमध्ये व क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारस्पारिकता व परस्परनिर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय. ही पारस्पारिकता आर्थिक व सामाजिक संबंधातील तसेच स्थळकाळातील अंतर मिटवून टाकते.

**६. एम. अल्ब्रो आणि ई किंग**: ज्या प्रक्रियेद्वारे जगातील लोक एकाच समाजात एकत्रित होतात, त्या प्रक्रियेस जागतिकीकरण असे म्हणतात.

**७. बायलिस आणि स्मिथ:** जगातील वेगवेगळया प्रदेशातील लोकांमध्ये वाढत जाणारे आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**८. गीलपीन**: प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था व संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय.

**९. चंद्रकांत खंडागळे** : जगातील विविध लोक, राष्ट्रे वा समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करुन त्यांना जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार मुक्तपणे करण्यास वाव देऊन एकच जागतिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

वरील विविध व्याख्यांच्या आधारे जागतिकीकरणाचा अर्थ आपणास तीन दृष्टिकोनातून सांगता येईल.

**अ)** आर्थिक दृष्टिकोनातून जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करून तिच्याशी सर्व राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था जोडणे किंवा एकात्म करणे होय.

**ब)** सामाजिक दृष्टिकोनातून जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध लोक, राष्ट्र वा समाज यांच्यात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करून त्यांना एकाच जागतिक व्यवस्थेत सामील करणे होय.

**क)** राजकीय दृष्टिकोनातून जागतिकीकरण म्हणजे विकसित अशा प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी आपली आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक ध्येयधोरणे इतर राष्ट्रांना स्वीकारावयास लावणे होय. थोडक्यात जागतिकीकरण ही जगातील विविध लोक, राष्ट्र व समाज यांच्यातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संबंधाची जागतिक व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे.

## १२.४ जागतिकीकरण आणि जागतिक भांडवलशाही

आर्थिकदृष्ट्या जागतिकीकरण ही प्रक्रिया देशाची अर्थव्यवस्था ही जगाच्या अर्थव्यवस्थेशी एकात्म करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था

निर्माण करणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ही जी जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करावयाची आहे ती भांडवलशाही या प्रकारची अर्थव्यवस्था आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की जागतिकीकरण ही संपूर्ण जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था पसरविण्याची प्रक्रिया आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जगभर प्रसार व प्रचार किंवा वाढ व विस्तार करणे हे जागतिकीकरणामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जागतिकीकरण व भांडवलशाही यांच्यातील संबंध समजावून घेणे या ठिकाणी आवश्यक ठरते.

अमेरिका, जर्मनी, जपान, फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादीत भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रात मोठमोठे उद्योग उभारले. आर्थिक व्यवहारावर सरकारचे नियंत्रण ठेवले, नियोजनबद्ध विकासाचे धोरण पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राबविले. पण १९५० ते १९९० या ४० वर्षाच्या काळात सरकारी नियंत्रणे व आर्थिक नियोजन यांचा फायदा होण्यापेक्षा तोटाच अधिक झाला. सार्वजनिक उद्योग तोट्यात गेले. परकीय चलनसाठा घटला. दारिद्र्य, बेकारी महागाई वाढत गेली. १९९१ मध्ये आर्थिक संकट उद्भवले. त्यातून बाहेर पडण्यासाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्ज मागितले आणि ते देताना या संस्थांनी घातलेल्या अटींनुसार भारताने उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचा स्वीकार केला. अशाप्रकारे भारतानेही भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अनेक तत्त्वे व धोरणे या प्रक्रियांच्या माध्यमातून स्वीकारली. आज केवळ ६ उद्योगधंदे सरकारी क्षेत्रासाठी राखीव ठेऊन बाकीचे सर्व उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले केले आहेत. परकीय गुंतवणुकीस परवानगी दिली आहे. निर्यातीवरील निर्बंध उठवून आयात मुक्त केली आहे. एकंदरीत मिश्र अर्थव्यवस्थेचे अस्तित्व नाममात्र राहिले असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढला आहे.अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जगभर प्रसार केला जात असून पूर्वी काही राष्ट्रांपुरती मर्यादित असलेली भांडवलशाही अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्था बनविण्याचे प्रयत्न होत आहेत.

## १२.५ जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे

ॲडम स्मिथ या इंग्रज अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक विकासास चालना देण्यासाठी उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा पुरस्कार केला. स्मिथच्या शिफारसीची अंमलबजावणी करून इंग्लंडने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात केली होती. तथापि, १९८० नंतर जगात जागतिकीकरणाचे वारे जोरदारपणे वाहू लागले. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन आज सुमारे ३५ वर्षे उलटली आहेत. या ३५ वर्षाच्या अनुभवाच्या आधारे आपणास जागतिकीकरणाचे फायदे व तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १२.५.१ जागतिकीकरणाचे फायदे :

### १२.५.१.१ औद्योगिकीकरणास चालना :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगाची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी अनेक इष्ट निर्णय घेण्यात आले आहेत. उदा. परवाना पध्दतीचे निर्मूलन करणे, सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करणे, परकीय गुंतवणूकीस वाव देणे, मक्तेदारी कायद्यात सुधारणा करणे, कर व्यवस्था सुधारणे इत्यादी. या सर्व उदार निर्णयांमुळे नवीन उद्योग उभारणे, जुन्या उद्योगांचे विस्तारीकरण करणे, उद्योगाचे वैविध्यकरण करणे, परकीय कंपन्यासह संयुक्त उद्योग उभारणे, उद्योगांचे विलीनीकरण करणे, त्यांचे हस्तांतरण करणे इत्यादीबाबतचे स्वातंत्र्य उद्योगपतींना मिळाले. त्यामुळे औद्योगिकीकरणाची गती वाढून औद्योगिक विकासास व रोजगारवृद्धी होण्यास मदत झाली आहे.

भारताचा विचार करता जागतिकीकरणामुळे भारतात अनेक परकीय तसेच स्थानिक कंपन्यांनी नवे उद्योगधंदे सुरू केले आहेत. तसेच सद्याच्या उद्योगांचा विस्तार केला आहे. उदा. फोर्ड व हंडाई या कंपन्यांनी मोटार कारखाने उभारले तर आयटीसी, हिंदुस्थान लिव्हर, पेप्सी, कोका-कोला, पिझ्झा-हट या कंपन्यांनी खाद्यपदार्थ व शीतपेयाचे कारखाने काढले. खाजगीकरणाच्या प्रक्रियेद्वारे आजारी सरकारी उद्योग खाजगी उद्योजकांना चालविण्यास दिले व त्यामुळे या आजारी उद्योगांची उत्पादकता, कार्यक्षमता व गुणवत्ता सुधारली. अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीवरील अनावश्यक निर्बंध व खर्च कमी केल्याने पर्यटन व हॉटेलिंग उद्योगांचा विकास घडून येत आहे. परकीय कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी स्थानिक उद्योगांना आपली उत्पादनक्षमता कार्यक्षमता मालाचा दर्जा इ. सुधारणे भाग पडत आहे. त्यामुळे देशी उद्योगांमध्येही सुधारणा होण्यास चालना मिळाली आहे.

### १२.५.१.२ बाजारपेठांचा विस्तार :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापन इत्यादींना एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात सहज प्रवेश मिळू लागला आहे. तसेच प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांना परकीय बाजारात भांडवल उभारण्यास व त्यांची उत्पादने परकीय बाजारपेठेत निर्यात करण्यास परवानगी दिल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा निर्माण होण्यास चालना मिळाली आहे.

### १२.५.१.३ परकीय व्यापारात वृद्धी :

जागतिकीकरणामुळे राष्ट्रांना आपला परकीय व्यापार मुक्त करावा लागत आहे. त्यामुळे आयात-निर्यातीवरील निर्बंध दूर झाले आहेत. तसेच आयात करात कपात करावी लागली आहे. तसेच आपले चलन  परिवर्तनीय करावे लागले आहे. या उपायांमुळे राष्ट्रांचा परकीय व्यापार वेगाने वाढला आहे. परकीय व्यापार वाढल्याने या राष्ट्रांचा परकीय चलनसाठी (गंगाजळी) वाढला आहे.

munotes.in

जागतिकीकरणामुळे विविध राष्ट्रांचा केवळ परकीय व्यापारच वाढला नाही तर त्या व्यापाराचे भौगोलिकदृष्ट्या वैविध्यकरण झाले आहे. म्हणजे पूर्वी काही राष्ट्र थोड्याच परकीय राष्ट्रांशी व्यापार करीत होती. आज ती जगातील विविध देशांशी व्यापार करू लागली आहेत. उदा. भारत पूर्वी केवळ इंग्लंड, जर्मनी, जपान, कॅनडा, अमेरिका, रशिया इत्यादी मोजक्याच राष्ट्रांशी व्यापार करीत असे. जागतिकीकरणामुळे आज भारत वरील राष्ट्रांबरोबरच मध्यपूर्व राष्ट्रांशी (इराक, सौदे अरेबिया, कुवेत, दुबई इ.) व आफ्रिकन राष्ट्रांशी (द. आफ्रिका, केनिया, घाना, टांझानिया, इथोपिया इ.) व्यापार करू लागला आहे. लॅटीन अमेरिकन राष्ट्रांशीही व्यापार वाढविण्याची संधी भारतास आहे. परकीय व्यापाराचे भौगोलिक क्षेत्र विस्तारल्यानेही परकीय गंगाजळी वाढत आहे.

### **१२.५.१.४ उपभोक्त्यांचा फायदा** :

जागतिकीकरणामुळे उपभोक्त्यांचा (ग्राहकांचा) फायदा होत आहे. जागतिकीकरणामुळे आयात दर कमी झाल्याने एखाद्या राष्ट्रात म्हणजेच स्थानिक बाजारपेठेत परदेशातील विविध दर्जेदार वस्तू (उदा. वस्त्रे, खेळणी, बॅग्ज, पादत्राणे, दुचाकी-चारचाकी वाहने, टी.व्ही सेट, वॉशिंग मशिन, फ्रिज, मोबाईल हँडसेट, संगणक, लॅपटॉप इ.) विपूल प्रमाणात योग्य किंमतीत उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे लोकांना आपल्या आवडीच्या वस्तू खरेदी करता येऊ लागल्या आहेत त्यामुळे ग्राहक हा बाजाराचा राजा बनला आहे.

### **१२.५.१.५ रोजगार वृद्धी :**

जागतिकीकरणामुळे लोकांना विशेषतः उच्चशिक्षीतांना व कुशल व्यक्तींना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध झालेल्या आहेत. उद्योग, व्यापार, व्यवस्थापन, वाहतूक, संप्रेषण, माहिती-तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात असंख्य नोकऱ्या उपलब्ध झालेल्या आहेत. अशा रोजगार वा नोकऱ्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण देणाऱ्या विविध शिक्षणसंस्थाही सुरू झाल्या आहेत. विकसनशिल राष्ट्रातील उच्चशिक्षीत तरूणांना देशोविदेशात आकर्षक वेतन देणारे रोजगार मिळू लागले आहेत.

### **१२.५.१.६ सेवाक्षेत्राचा विस्तार :**

जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्राचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. वाहतुकीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक सुरू झाल्यान रस्ते व महामार्ग यांची स्थिती सुधारली आहे. हवाई वाहतुकीतही खाजगी व परकीय कंपन्यांनी गुंतवणूक केल्याने हवाई वाहतुकीची सुविधाही सुधारली आहे. लोहमार्ग व जलमार्ग सुविधांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे. बँका व वित्तसंस्थांना स्वायत्तता मिळाल्याने इंटरनेट बँकिंग, एटीएम सुविधा, कोठेही गेले तरी बँकिंग सुविधा (any where banking facility) इत्यादी सुविधा लोकांना मिळू लागल्या आहेत. जागतिकीकरणामुळे संप्रेषण (Communication) क्षेत्रातही क्रांती घडून आली आहे. दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट इत्यादीचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही व्यक्तीशी त्वरीत संपर्क साधणे शक्य झाले आहे. स्पर्धेमुळे मोबाईल सेवा स्वस्त होऊन सामान्यातील सामान्य माणूसही मोबाईल वापरू

munotes.in

लागला आहे. टपालसेवेच खाजगीकरण होऊन कुरिअर कंपन्याद्वारे त्वरीत टपाल पोहचविता येत आहे. जागतिकीकरणात जगातील नामांकित शिक्षणसंस्थांना इतर राष्ट्रात आपल्या शाखा उघडण्यास परवानगी मिळाल्याने तेथील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिवाय या परकीय शिक्षणसंस्थाशी होणाऱ्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्थानिक शिक्षणसंस्थांना आपला शैक्षणिक दर्जा सुधारणे भाग पडत आहे. यातून शिक्षणक्षेत्रातील सुधारणांना गती मिळत आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्र विस्तारले आहे व त्यामुळेही रोजगार वृद्धी झाली आहे.

### **१२.५.१.७ साजाजिक-सांस्कृतिक संबंधात वाढ** :

जागतिकीकरणामुळे विभिन्न राष्ट्रातील लोक परस्परांच्या राष्ट्रांना भेटी देऊ लागल्या आहेत. शिक्षण, रोजगार, पर्यटन, इत्यादीच्या निमित्ताने जगात कोठेही स्थलांतरीत होऊ लागले आहेत. परिणामी जगातील विविध लोक व राष्ट्रे यांच्यात केवळ आर्थिक सहकार्याचेच नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक सहकार्याचेही संबंध वाढत चालले आहेत. या संबंधावरील राजकीय व भौगोलिक सीमा दूर झाल्या आहेत. त्यामुळे जग खूप जवळ आले आहे. राष्ट्राराष्ट्रातील या सहकार्यामुळे संपूर्ण जग हे जणू एक खेडे बनले आहे. जागतिकीकरणामुळे जागतिक खेड्याचे (Global village) स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास चालना मिळाली आहे.

### **१२.५.२ जागतिकीकरणाचे तोटे :**

जागतिकीकरणाचे तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### **१२.५.२.१ स्थानिक उद्योगास मारक :**

जागतिकीकरण हे स्थानिक उद्योगास मारक ठरत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्तम गुणतत्तेच्या परकीय वस्तू मुबलक प्रमाणात व वाजवी दरात स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध होत आहेत. स्थानिक वस्तूंला या परकीय वस्तूंशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. त्यामुळे स्थानिक उद्योगात मंदी येऊन ते आजारी पडत आहेत. काही स्थानिक उद्योजकांनी तर आपले उद्योग परकीय कंपन्यांना विकून टाकले आहेत. परकीय कंपन्यांनी जाहिरातीच्या जोरावर स्थानिक बाजारपेठा काबीज केल्याने स्थानिक उद्योगधंद्यांची विशेषतः लघुउद्योगांची स्थानिक बाजारपेठेत पिछेहाट झाली आहे.

### **१२.५.२.२ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी :**

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची अनेक क्षेत्रात __ मक्तेदारी निर्माण होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिका, पश्चिम युरोपियन राष्ट्र, जपान इत्यादीमधील अनेक कंपन्यांनी विकसनशील राष्ट्रातील महत्त्वाचे उद्योग आपल्या ताब्यात घेऊन स्थानिक उद्योजकांना बाजारपेठेतून हुसकावून लावले आहे. प्रचंड भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्तम व्यवस्थापकीय कौशल्य, आकर्षक जाहिरातबाजी इत्यादीच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक बाजारातील मोठा हिस्सा काबीज केला आहे.

### १२.५.२.३ बेरोजगारीत वाढ :

अनेक विकसनशिल राष्ट्रांत मुळातच रोजगाराच्या संधी कमी आहेत. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाणे बरेच आहे. जागतिकीकरणामुळे बेरोजगारीचे हे प्रमाण वाढण्यास हातभार लागला आहे. परकीय वस्तूंशी स्पर्धा करू शकत नसल्याने अनेक स्थानिक उद्योग आजारी किंवा बंद पडून त्यातील कामगार बेरोजगारी (बेकार) बनले आहेत. खाजगीकरणाच्या धोरणामुळेही कामगार कपात होऊन अनेक कामगार बेकार झाले आहेत. लघुउद्योगांची पिछेहाट झाल्यानेही बेकारीत वाढ झाली आहे.

### १२.५.२.४ विषमतेत वाढ :

जागतिकीकरणामुळे आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढली आहे. जागतिकीकरणामुळे ज्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत त्यांचा फायदा केवळ उच्च शैक्षणिक पात्रताधारक व्यक्तींना होत आहे. बडे शेतकरी, उद्योजक व व्यापारी या प्रक्रियेत मालामाल होत आहेत. त्यांच्या तुलनेत लहान शेतकरी, शेतमजूर, अकुशल कामगार, दलित, आदिवासी इत्यादी दुर्बल घटक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत तर गरीब वर्ग अधिक गरीब होत आहे. श्रीमंत वर्ग चैन करू लागला आहे तर गरीब वर्गास मूलभूत गरजा भागविणेही अवघड झाले आहे. परिणामी, आर्थिक व सामाजिक विषमता वाढत आहे.

### १२.५.२.५ विकसनशील राष्ट्रांची लूट :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित देश उदा. अमेरिका व युरोपियन राष्ट्रे ही विकसनशील राष्ट्रांची लूट करीत आहेत. रॉयलटी, नफा, कर्जावरील व्याज इत्यादी रूपाने विकसनशील देशात मिळविलेले उत्पन्न आपल्या देशात पाठवून विकसित राष्ट्रे ही लूट करीत आहेत.

### १२.५.२.६ कर्जबाजारीपणात वाढ :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली आहे. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून कर्ज घेताना विकसनशील राष्ट्रांना उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडते हे धोरण राबविताना परकीय भांडवल, तंत्रज्ञान, वस्तू व सेवा यांची आयात करावी लागते. आयात वाढल्याने कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. परिणामी, ही राष्ट्र कर्जाच्या विळख्यात अडकली आहेत. उदा. मेक्सिको, ब्राझील, चिली, अर्जेंटिना यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे.

### १२.५.२.७ पर्यावरणाची समस्या :

जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगपती हे जास्तीत जास्त फायदा वा नफा मिळविण्याच्या हेतुने नैसर्गिक साधनसामग्रीचा स्वैरपणे वापर करीत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन

munotes.in

करण्याऐवजी हवा, पाणी, भूमी, ध्वनी यांचे प्रदूषण वाढवित आहेत, जंगलतोड करीत आहेत. त्यामुळे तापमान वृद्धीची समस्या उग्र बनली आहे.

### १२.५.२.८ समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी :

जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्र समाजवादी व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी देऊ लागली आहेत. जागतिकीकरणात आर्थिक सुधारणांचे कार्यक्रम राबविण्यासाठी विकसनशील राष्ट्रांना जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व अमेरिकेसारखी बडी राष्ट्रे यांच्याकडून कर्ज व इतर मदत घ्यावी लागते. ही मदत देताना या संस्था व बडी राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांवर अनुदानात आणि कल्याणकारी योजनांत कपात करावी, समाजवादी उपक्रम बंद करावेत यासारख्या अटी लादत आहेत. विकसनशील राष्ट्रांना या अटींचे पालन करणे भाग पडत आहे. त्यातूनच कामगार कपात करणे, कंत्राटी पध्दतीने कामगार भरती करणे, पेन्शन व विमा सुविधा बंद करणे, अन्नधान्य, गॅस, खनीज तेल इत्यादीवरील अनुदान बंद करणे इत्यादी उपाय योजना केल्या जात आहेत. त्यामुळे या राष्ट्रांतील गरीबांना आता कोणीच वाली राहिलेला नाही. महत्त्वाची म्हणजे इतरांना अर्थव्यवस्था मुक्त करण्यास व अनुदाने बंद करण्यास सांगणारी अमेरिका स्वतःमात्र आपल्या उद्योगांना संरक्षण व शेतकऱ्यांना अनुदाने देत आहे. ही दुटप्पी नीती अन्यायकारक आहे.

### १२.५.२.९ सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव :

जागतिकीकरणाचा विकसनशील राष्ट्रांच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव पडत आहे. या राष्ट्रांतील लोकांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, सवयी, अभिवृत्ती, जीवनपध्दती इत्यादीत अनिष्ट परिवर्तन होत आहे. व्यक्तीवाद, उपभोक्तावाद, उपयुक्ततावाद या मूल्यांचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे समष्टीवाद सामाजिक बांधिलकी, राष्ट्राचे हित, स्वसंस्कृती अभिमान, इत्यादींचा प्रभाव घटत आहे. या राष्ट्रातील नवीन पिढी ही तेथील हवामानास प्रतिकूल ठरेल अशा खाण्यापिण्याच्या व पोषाखाच्या आहारी जात आहे. विकसित राष्ट्रातील वस्तूंचे व चालिरीतीचे अंधानुकरण होऊ लागले आहे. इंग्रजी भाषाचे प्रभुत्त्व वाढून देशी भाषांचे महत्त्व तरुण पिढीस वाटेनासे झाले आहे.

### १२.५.२.१० पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पायाभूत सेवांमध्ये (वीज, पाणीपुरवठा, रस्ते वाहतूक, संप्रेषण इत्यादी) गुंतवणूक करण्यास परवानगी दिली आहे. तथापि, या कंपन्या पायाभूत सेवासुविधांमध्ये गुंतवणूक करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्याऐवजी चैनीच्या वस्तूंचे (उदा. वॉशिंग मशिन, टी.व्ही सेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोटार सायकली, मोटार इत्यादी) उत्पादन करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे गरिबांचा फायदा होण्याऐवजी श्रीमंतांचे चैनीचे चोचले पुरविले जात आहेत.

## १२.६ जागतिकीकरणांचे भारतीय क्षेत्रावर पडलेले परिणाम

### १२.६.१ जागतिकरणांचे शिक्षण क्षेत्रावरील परिणाम :

जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी भारतात शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन उदात्त होता. तळागाळातील समाजाचा विकास व्हावा ही शिक्षणाची भूमिका होती. शिक्षणविषयक आयोगाचे धोरणही असेच होते. नंतरच्या काळात कल्याणकारी भूमिकेला अपयश  आले. दिवसेंदिवस ढासळत चाललेल्या भारतीय अर्थव्यवस्थेनेच विकसित देशांना व जागतिक बँकेसारख्या अर्थव्यवस्थांना आपली पाळमुळं भारतात पसरवायला मुभा दिली. यातुन शिक्षण क्षेत्रही सुटले नाही. याचे गंभीर परिणाम आज शिक्षणक्षेत्रावर झालेले दिसून येत आहेत. जागतिकीकरणाच्या आणि व्यापारीकरणाच्या युगांत शिक्षण ही एक विकावू वस्तू अगर सेवा बनली आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या देशात २००२ मध्ये अंबानी - बिर्ला या कार्पोरेट मंडळींनी एका अहवालाव्दारे शिक्षणव्यवस्थेच्या खाजगीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा केला आहे. या मंडळींनी गुणवत्ता हाच निकष ठरवून शिक्षण धोरणांत आमूलाग्र बदल सुचविले आहेत. मोफत व सक्तीचे शिक्षण २००४ च्या मसुद्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात पुढील त्रुटी आढळतात.

i. भारतीय घटनेने मांडलेल्या समानता आणि समाजातील सर्व घटकांना विकासासाठी देऊ केलेली संधी या मसुद्यात नाकारली आहे.

ii. १९८६ च्या घटनादुरुस्ती कायदयाने शासन प्राथमिक शिक्षणासाठी लागणा-या आर्थिक जबाबदारीतून मुक्त होणार आहे.

iii. गुणवत्ता हाच निकष ठरवितांना सामाजिक न्याय आणि समान शिक्षण पध्दती या समाजातील सर्व घटकांसाठीच्या शिक्षणपध्दतीपासून शासन अलिप्त होत आहे.

iv. ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे शिक्षण करतांना ४ ते ६ या शिशुगटातील बालकांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे.

v. सक्तीच्या शिक्षणातील सरकारने आपली वैधानिक व आर्थिक मुक्तता करुन घेतली आहे. ग्रामीण ठ दुर्बल घटकांतील मुलांच्या शिक्षणातील जबाबदारी सरकारने नाकारली आहे व एक शिक्षकी शाळा सुचविल्या आहेत.

vi. अपंग व मतिमंद मुलांकडे दुर्लक्ष केले आहे.

vii. बालकामगारांसाठी वेगळी शिक्षणपध्दत सुचवितांना समान शिक्षणपध्दतीकडे दुर्लक्ष केले आहे.

viii. शिक्षण ही विकावू वस्तू अगर सेवा या विचाराला कायदेशीर मान्यता देतांना या संदर्भात निर्माण होणा-या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक बाबींचा विचार केलेला नाही.

munotes.in

## १२.७ जागतिकीकरणांचे कृषी विभागांवर पडलेले परिणाम

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय उत्पादनामध्ये व निर्यातीमध्ये शेती क्षेत्राचा वाटा आज घसरत जाऊन (२०१११२) १७.२% आला आहे. परंतु ६४% लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्येचा भार इतर क्षेत्राऐवजी शेती क्षेत्रावर अधिक पडत आहे. त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न तसेच पावसाची अनियमितता, अनियमित विजपुरवठा, खताच्या व किटकनाशकांच्या वाढत्या किंमती मशागतीसाठी येणारा खर्च अशा अस्मानी व सुलतानी संकटामुळे भारतीय शेती नेहमीच परिघस्थानी किंवा अडचणीत राहीली आहे असे दिसते.

## १२.८ सारांश

जुलै १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणांचा स्वीकार केला. उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण - हे या धोरणाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. उदारीकरणाच्या प्रक्रियेदवारे, अर्थव्यवस्थेला सरकारी बंधनातून मुक्त केले जाते. खाजगीकरणादवारे सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षम उदयोगाचे भाग खाजगी व्यक्ती व संस्थांना विकून त्यांना व्यवस्थापनात सहभागी करुन घेतले जाते. जागतिकीकरणादवारे देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न केली जाते. या आर्थिक बदलांमुळे बाजारपेठेतील स्पर्धेत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. सहकारी संस्थांना खाजगी बडया कंपन्या व बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. नवीन आर्थिक धोरणातून उदयास आलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेचा सहकारी चळवळीवर परिणाम होणे अपरिहार्य आहे. सहकारी संस्थांनी आपल्या कार्यप्रणालीत बदल करुन आधुनिक व्यवस्थापन व विक्री तंत्र आत्मसात करुन, अधिक भांडवल उभारुन, आत्मनिर्भर बनून अकार्यक्षमता झटकून आपली स्पर्धात्मकता सिदध केली पाहिजे. आणि बदललेल्या आर्थिक परिस्थितीत सहकार चळवळ सक्षमपणे उभी राहिली पाहिजे. असेच सर्व समाजातील सर्व घटकांना वाटते. आजही सभासद, ग्राहक, शासन, समाज, कर्मचारी यांच्या सहकार चळवळीकडून मोठया अपेक्षा आहेत. या अपेक्षांची पूर्तता सहकारी चळवळीला पूर्ण करता यावी म्हणून बदललेल्या व्यवस्थेशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य सहकारी चळवळीने प्राप्त केले पाहिजे.

या घटकात आपण जागतिकीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये, जागतिकीकरण व भांडवलशाही यांच्यातील संबंध आणि जागतिकीकरणाचे फायदे-तोटे इत्यादींची चर्चा केली आहे. जागतिकीकरण ही आर्थिकदृष्ट्या सर्व जगाची एकच अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. सामाजिकदृष्ट्या जागतिकीकरण ही जगातील सर्व लोक व समाज यांना एका जागतिक व्यवस्थेत सामील करण्याची प्रक्रिया आहे. तर राजकीयदृष्ट्या जागतिकीकरण ही प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी त्यांची ध्येयधोरणे इतर राष्ट्रांना स्वीकारावयास भाग पाडणारी प्रक्रिया आहे.

## १२.९ प्रश्न

१. जागतिकीकरण म्हणजे काय सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. जागतिकीकरणांचे फायदे आणि तोटे स्पष्ट करा.

३. जागतिकीकरणांचे शिक्षण क्षेत्रावरील पडलेले परिणाम स्पष्ट करा.

४. जागतिकीकरणांचे शेती क्षेत्रावर पडलेले परिणाम थोडक्यात लिहा.

५. जागतिकीकरणांचे अर्थव्यवस्थेच्या सहकारी चळवळीवरील परिणाम सविस्तर लिहा.

## १२.१० संदर्भ


१. बेडकीहाळ किशोर, प्रा. एन. डी. पाटील : व्यक्तित्व आणि कर्तृत्व, सातारा, २००५.

२. सावंत दत्तात्रय, दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन, एम. फिल. अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९.

३. प्रा. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, २००९

४. नीरज जैन - जागतिकीकरण की नवी गुलामगिरी लोकायत प्रकाशन

५. कॉ. गोविंद पानसरे - व्दिवर्ण शिक्षणव्यवस्था भारतीय कम्युनिष्ट पक्ष _

६. आंदोलन शाश्वत विकासासाठी - अंक जाने. फेब्रु. २०१२

७. भाई वैद्य - संपूर्ण शिक्षण, समाजवादी अद्यापक सभा

८. प्रबोधन प्रकाशन ज्योती - दीपावली विशेषांक - ऑक्टो. २००७

९. Vasant Desai-Rural Devlopement In India-Past, present and future, ___Himalaya publication, New Delhi,

१०. Prakash B.A.- The Indian economy since 1991, Peason publication, Delhi.

११. The Indian Economic Survey 2015-16.

१२. डॉ. जयप्रकाश मिश्र कृषी अर्थव्यवस्था,साहित्यभवन पब्लिकेशन. आया,

१३. ए. बी. सवदी - कृषी भूगोल. निराली प्रकाशन, पुणे.

१४. रुद्र, दत्त सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था', नई दिल्ली.


munotes.in

१५. योजना मासिक, 'जागतिकीकरण आणि भारतीय शेतीपुढील आव्हाने',जानेवारी-२०१०.

१६. संपा. राराविकर, 'यशवंत गोडबोले वि.ज.बर्जेस, जॉन्सन, 'डायमंड अर्थशास्त्र कोश', डायमंड पब्लिकेशन, पुणे-२००८.

१७. पंडित, नलिनी., 'जागतिकीकरण आणि भारत', लोकवाङमय गृह, मुंबई-२००३

१८. शिंदे, एन., 'अर्थसंवाद', खंड-२७, अंक-२, जुलै-सप्टेबर-२००३

१९. टकले, एस.आर., कृषी अर्थशास्त्र'.

२०. खांदेवाले, श्रीनिवास, महाराष्ट्रातील शेती-एक दुर्लक्षित प्रश्न', किसान सभा,२०१०.

२१. 'समाजप्रबोधन पत्रिका', २००३.

२२. जरांडे जगन, 'जागतिकीकरण व भारतासमोरील आव्हाने'

❖❖❖❖

munotes.in

# १३

## स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवाद

**घटक रचना**


१३.१ उद्दिष्टे

१३.२ प्रस्तावना

१३.३ जमातवाद: व्याख्या आणि अर्थ

१३.४ भारतातील जमातवादाची कारणे

१३.५ भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण

१३.६ जमातवाद आणि भारतीय धर्मनिरपेक्षते समोरील आव्हाने

१३.७ सारांश

१३.८ प्रश्न

१३.९ संदर्भ


## १३.१ उद्दिष्टे

१. जमातवादाची व्याख्या व अर्थ समजावून घेणे.

२. जमातवादी लक्षणांचा आढावा घेणे.

३. भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण कसे झाले याची चर्चा करणे.

१३. जमातवादामुळे धर्मनिरपेक्षते समोर निर्माण झालेल्या आव्हानांवर चर्चा करणे.

## १३.२ प्रस्तावना

भारत हा विविधतेने नटलेला देश असल्यामुळे आणि भारतामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहात असल्याने सर्वांना सामावून घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेने *धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा* अंगीकार केला आहे. यासाठी भारतीय राज्यघटनेने कोणत्याही एका धर्माचे समर्थन केलेले नसून प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार वागण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु लोकशाहीमध्ये *'एक व्यक्ती एक मत'* हे तत्व महत्त्वाचे असल्यामुळे ज्याच्या पाठीमागे अधिक लोक त्याचे राज्य हे सूत्र काम करत असते . त्यामुळे जमातवादी राजकीय पक्ष नेतृत्व आपला जनाधार वाढविण्यासाठी धर्माचा उपयोग करतात. यातूनच भारतामध्ये जमातवादाचा प्रचार झपाट्याने झालेला दिसून येतो.

ऐतिहासिक काळापासून भारतामध्ये वेळोवेळी विदेशी लोकांचे आगमन होत राहिले व भारतालाच आपली कर्मभूमी मानून येथील संस्कृतीत ते मिसळून गेले. त्याबरोबरच भारतीय भूमीमध्येही अनेक धर्म आणि पंथ यांचा वेळोवेळी उदय झाला. त्यांनी आपल्या धर्म तत्वांच्या आधारे आपापल्या धर्माचा प्रचार प्रसार केला. भारतामध्ये इस्लाम धर्मीय राज्यकर्त्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी सत्ता मिळवण्यासाठी आपल्या सैनिकांना धर्माच्या आधारावर स्फूर्ती देण्याचा प्रयत्न अनेक वेळा केला.त्यांचा सत्तास्थापनेमागील हेतू राजकारणाबरोबरच इस्लाम धर्माचा प्रचार प्रसार करणे हा असला तरी इतर प्रदेशांप्रमाणेते भारताचे इस्लामीकरण करू शकले नाही. त्यांनी सत्तेसाठी धर्माचा वेळोवेळी वापर केला परंतु धर्माच्या आधारावर हिंसक जातीय दंगली झाल्याचे प्रणाम मात्र उपलब्ध नाही. भारतामध्ये ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर आपल्या सत्तेचा विस्तारासाठी व दृढीकरणासाठी त्यांनी*'फोडा आणि राज्य करा'* या नीतीचा अवलंब केला.१८५७च्या उठावामध्ये हिंदू-मुस्लीम हे खांद्याला खांदा लावून लढल्यामुळे हिंदू-मुस्लिमांची एकता आपल्या साम्राज्यासाठी घातक आहे हे ओळखून ब्रिटिशांनी या दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले.

१८५७च्या उठावानंतर भारतातील पारंपारिक सरंजामशाही नेतृत्व मागे पडून आधुनिक शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांच्या हाती भारतीय राजकारणाचे नेतृत्व आले. आपल्याला प्रशासनामध्ये सहभाग आणि राजकीय हक्क मिळावे म्हणून या वर्गाने एकत्र येत १८८५ मध्ये धर्मनिरपेक्ष आशा राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. याच दरम्यान ब्रिटिशांनी भारतीयांना स्थानिक प्रशासनामध्ये सामावून घेण्यासाठी काही घटनात्मक तरतुदी केल्या व त्यासाठी लोकशाही मार्गाने निवडणुकांच्या माध्यमातून प्रतिनिधित्व देण्याचे मान्य केले. यातूनच जनाधार मिळवण्यासाठी भारतीय राजकारणामध्ये जमातवादाचा उदय झालेला दिसून येतो. पुढे चालून मुस्लिम, शिख व दलितांना स्वतंत्र मतदार संघ देण्याची घोषणा करण्यात आली. याचा फायदा उचलत जमातवादी तत्त्वांनी एकत्र येत मुस्लिम लीग आणि अकाली दल यासारख्या संस्थांची स्थापना केली. याला विरोध म्हणून हिंदू महासभेसारख्या हिंदुत्ववादी संघटनेची स्थापना करण्यात आली. या जमातवादी वृक्षाचे सर्वात विषारी फळ म्हणजे धर्माच्या आधारावर झालेली पाकिस्तानची निर्मिती होय. **पंडित नेहरू म्हणतात** की, “One Communalism dosenot end the other ; each feeds on the other and both fatten”. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर बेल्हेकर :४९५)*म्हणजे एक जमातवाद दुसऱ्या जमातवादाला संपवू शकत नाही तर तो दुसऱ्या जमातवादाला जन्म देत असतो आणि नंतर दोघांमध्ये संघर्ष उभा राहतो. या वक्तव्या प्रमाणे ब्रिटिशांनी भारत सोडल्यानंतरही जमातवाद कमी न होता तो नव्या रुपात समोर आलेला आहे.याला जमातवाद्यांच्या आक्रमक प्रचारप्रसारा बरोबरच धर्मनिरपेक्ष शक्तींना जमातवादास थोपवण्यात आलेले अपयश देखील कारणीभूत आहे. याचाच उहापोह आपण या प्रकरणात करणार आहोत.

## १३.३ जमातवाद : व्याख्या आणि अर्थ

भारतीय समाजाचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या जमातवादीकरण कशाप्रकारे झाले आहे आणि त्याने धर्मनिरपेक्षते समोर कोणती आव्हाने उभी केली याचा अभ्यास करण्यापूर्वी आपल्याला जमातवादाचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे .

### **१३.३.१ जमातवाद / संप्रदायवाद**:

जमातवाद या शब्दाची व्याख्या करताना **ए आर देसाई** म्हणतात, “धर्म व संस्कृतीला श्रेष्ठ मानून राजकीय हेतू साध्य करणाऱ्या विचारास जमातवाद असे म्हणतात”. **आरसी मजुमदार** यांच्या मते “सांप्रदायिकता म्हणजे धर्म व राजकारणाचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करणे होय”. **बिपीन चंद्र** यांच्या मते, “जमातवादी विचारधारा असे मानते की, भारतीय समाज अशा वेगवेगळ्या गटांमध्ये विभाजित झालेला आहे ज्याचे आर्थिक, राजनीतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हितसंबंध एकमेकांपेक्षा वेगळे आहे आणि या धार्मिक अंतरामुळे ते एकमेकांचे शत्रू आहे”. ते पुढे म्हणतात की “जमातवाद ही एक अशी विश्वास प्रणाली आहे की या माध्यमातून समाज, अर्थव्यवस्था व राजकारण यांचे अवलोकन आणि विश्लेषण केले जाते आणि त्याच्या अवती भोवती राजकारण संघटित केले जाते.*(आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:६१०)*जमातवादाचा मूळ उद्देशजमातवादी हिंसा घडवून आणणे हा नसून जमातवादाचा प्रचार आणि प्रसार करणे हाआहे.या जमातवादी विचारधारेचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे जमातवादी हिंसक संघर्ष होय. जमातवादी विचारधारा एका विशिष्ट उंची वर पोहोचल्यानंतर जमातवादाची भीती आणि द्वेष निर्माण झाल्याने जमातवादी हिंसा घडून येते. अशाप्रकारे जमातवादी विचारधाराहिंसेविना जिवंत राहू शकते परंतु जमातवादी विचारधारेच्या पार्श्वभूमी शिवाय जमातवादीहिंसाचारघडू शकत नाही. एकूणच काय तर जमातवादी विचारधारा हा एक राजकीय रोग असूनजमातवादी दंगे हे त्याचे बाह्यलक्षण आहे. म्हणजेच सांप्रदायिक विचारधारेकडे दुर्लक्ष केल्यामुळे जमातवादी हिंसा होताना दिसते. म्हणून जमातवादाचा अंगीकार करणारे जमातवादी हिंसा फैलवत नाही, तर जमातवादी विचारधारा फैलवण्यात धन्यता मानतात.त्यांचा प्रमुख उद्देश मोठ्या प्रमाणात नरसंहार करणे हा नसून जास्तीत जास्त जनतेचे जमातवादीकरण करणे हा असतो. *(आधुनिक भारताचा इतिहास;शांता कोठेकर:२११)*

## १३.४ भारतातील जमातवादाची कारणे

भारतामध्ये जमातवादाच्या वाढीमध्ये खालील घटकांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे.

१. **आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण**: स्वातंत्र्यानंतर भारताने धर्मनिरपेक्षतेचा अंगीकार केला असला तरी वसाहातीक शासनाच्या दुष्परिणामामुळे निर्माण झालेली आर्थिक विषमता आणि सामाजिक समस्यांमुळे बहुतांश भारतीय जनमानसात असंतोष होता. स्वातंत्र्यानंतर यावर बऱ्याच अंशी नियंत्रण मिळवले गेलेअसले तरी स्वतंत्र भारतामध्ये लोकांच्या महत्वकांक्षा अधिक वाढल्या होत्या. या महत्त्वाकांक्षांना खतपाणी घालण्याचे काम जमातवादी नेतृत्वाने केले. इतर धर्मियांनी आर्थिक संसाधनांवर केलेल्या कब्जामुळेया समस्या निर्माण झाल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. या अशा प्रकारच्या विचारांना मध्यमवर्ग आणि छोटे भांडवलदार यांनी अधिक प्रतिसाद दिला. ते आपल्या समस्यांमागील कारणे समजण्यात कमी पडल्याचे दिसून येते.

२. **सामाजिक संक्रमण:** भारतीय समाज पूर्वीपासून एका विशिष्ट बंदिस्त समाज व्यवस्थेमध्ये गुरफटलेला होता. स्वातंत्र्यानंतर संयुक्त कुटुंब पद्धती, बलुतेदारी,

जातीव्यवस्था इत्यादी पारंपारिक संस्था झपाट्याने मोडकळीस येत होत्या आणि कामगार संघटना, किसान सभा, राजकीय पक्ष इत्यादी आधुनिक संघटनां बंधुत्वाचे एक वेगळे नाते तयार करत होत्या. या विविध संस्थांमधून नेमकी कशाची निवड करावी या द्विधा मनस्थितीतून काही लोक जमातवादी संघटनांकडे ओढले गेले.

३. **राजकीय आदर्शवादांचा ऱ्हास :** राष्ट्रीय चळवळी दरम्यान काँग्रेस नेत्यांनी जे राजकीय आदर्श निर्माण केले होते, स्वातंत्र्यानंतर हळूहळू त्यांचाऱ्हास होत गेला. राष्ट्रीय एकता आणि सामाजिक धर्मनिरपेक्षता मजबूत करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर विशेष प्रयत्न केले गेले नाही. त्यामुळे मूलभूत सामाजिक परिवर्तनास आवश्यक असणारे प्रेरणादायी समतावादी विचार यांची निर्मिती होऊ शकली नाही. परिणामी जमातवादी तत्वांनी उचल खाल्ली.

४. **प्रशासनाची कचखाऊ भूमिका:** मागील काही वर्षांपासून भारतीय राजकीय व्यवस्था आणि प्रशासनाने विशेष करून पोलिस खात्याने जमातवादी हिंसा रोखतांना कच खाल्लेली दिसून येते. जमातवादी विचारधारा आणि हिंसा रोखण्याचे सर्वात प्रभावी माध्यम हे सरकार असते. परंतु प्रशासनाने कधीही पूर्ण ताकतीने आपल्या शक्तीचा उपयोग जमातवादी विचारधारा आणि हिंसा रोखण्यासाठी केलेला नाही. बराच वेळा प्रशासनामध्ये सुद्धा जमातवादी तत्त्व कामकरत असल्याने जमातवाद रोखतांना भेदभाव होताना दिसतो.

५. **धर्मनिरपेक्ष पक्षांची जमातवादी पक्षांसोबत आघाडी :** १९६० नंतर धर्मनिरपेक्ष पक्षांनी आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी जमातवादी पक्षांसोबत आघाडी करण्यास मागेपुढे बघितले नाही.त्यामुळे जमातवादाला हातभार लागण्यास मदतच झाली. १९६० मध्ये धर्मनिरपेक्ष काँग्रेसने केरळ मध्ये मुस्लिम लीग सोबत राजकीय आघाडी केली होती. १९६७ मध्ये समाजवादी पक्षाने जनसंघासोबत जाण्यास मागेपुढे बघितले नाही. १९७५ मध्ये जयप्रकाश नारायण यांनी आरएसएस, जनसंघ आणि जमात ए इस्लामी यांना एकत्र करून काँग्रेस विरोधात **संपूर्ण क्रांतीचा** नारा दिला आणि १९७७ मध्ये जनसंघामध्ये सामील झाले.१९८९च्या निवडणुकांमध्ये व्ही पी सिंह यांच्या नेतृत्वात जनता दलाने भाजपासोबत अप्रत्यक्षपणे निवडणुक आघाडी केली होती आणि साम्यवादी पक्षाने अप्रत्यक्षपणे त्यांना पाठिंबा दिला होता. परिणामी जमातवादी विचारधारेची झपाट्याने वाढ झाली. *(आजादी के बाद का भारत; बिपिनचंद्र:६१७)*

## १३.५ भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण

१९६०च्या दशकाच्या आरंभी भारतामध्ये धार्मिक मुद्द्यांचा वापर राजकारणासाठी करण्यास सुरुवात झाली. मुस्लिम लीगच्या स्वातंत्र्यापूर्वीच्या जमातवादी राजकारणापासून प्रेरणा घेऊन जमातवादी शक्ती आकाराला येत होत्या.ज्याप्रमाणे मुस्लिम लीगने '**इस्लाम खतरे में है'** चा नारा देताच मुसलमान लोक संघटित होऊन मुस्लिम लीगच्या पाठीमागे उभे राहिले त्याप्रमाणे हिंदू जमातवादाच्या मागे लोक उभे राहिले नाही. कारण मुसलमान भारतामध्ये अल्पसंख्यांक असल्याने त्यांना बहुसंख्यांक हिंदूंची भीती दाखवण्यात आली

होती . परंतु भारतामध्ये हिंदू बहुसंख्यांक असल्यामुळे अशा प्रकारची भीती दाखवून हिंदू जमातवाद संघटित करता आला नाही. म्हणून १९७०च्यादशकात हिंदू जमातवादी आशा मुद्द्याच्या शोधात होते की, ज्यामुळे हिंदू धर्माला जमातवादाच्या आधारे संघटित करून त्याचा राजकारणासाठी उपयोग करता येईल.लवकरच त्यांना '**बाबरी मशिद आणि राम जन्मभूमी विवादाच्या**' रूपाने१९८०च्या दशकाच्या आरंभी अशा मुद्द्याच्या शोध लागला . या मुद्द्याच्या आधारे हिंदू जमातवादाला संघटित केल्या जाऊ शकत होते कारण भगवान राम हे हिंदूंचे दैनंदिन जीवनमूल्य आणि भावनिक आस्था यांचे प्रतीक होते. त्यांचे नाव करोडो हिंदूंच्या मनामध्ये प्राचीन काळापासून घर करून होते. बऱ्याच काळापासून भाजप आणि त्याच्या सहयोगी संघटना विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल ज्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने व्यवस्थित पालन-पोषण केले होते. त्यांच्या सहकार्याने बाबरी मशीद-राम जन्मभूमी या मुद्द्याच्या आधारे हिंदू जमातवादाला संघटित करून त्याचा राजकारणासाठी उपयोग करण्यात जमातवादी यशस्वी झाले. म्हणून बाबरी मशिद-राम जन्मभूमी विवाद नेमका काय आहे हे  आपण थोडक्यात समजून घेऊ.

### १३.५.१ बाबरी मशिद-राम जन्मभूमी विवाद:

सोळाव्या शतकाच्या आरंभी मोगल शासक बाबर याच्या सरदाराने उत्तर प्रदेश मधील आयोध्या येथे बाबरी  मशिदीची निर्मिती केली होती . १९व्या शतकाच्या आरंभी काही हिंदूंनी असा दावा केला की आयोध्येमधील बाबरी मशिदीच्या जागी राम जन्मभूमी असून तेथे मशिद बांधण्याच्या अगोदर रामाचे मंदिर होते. १९४९ पर्यंत या मुद्द्याला कोणीही गांभीर्याने घेतले नाही. परंतु १९४९ मध्ये एका जमातवादी जिल्हा न्यायाधीशाने काही हिंदू पुजाऱ्यांना मशिदीमध्ये राम सीतेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना  करून पूजा करण्यास परवानगी दिली . या कृतीचा पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी विरोध केल्याने उत्तर प्रदेश सरकारने या मशिदीला कुलूप ठोकून हिंदू आणि  मुसलमान दोघांनाही या ठिकाणी जाण्यास बंदी घातली. त्यानंतर हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्याने दोन्हीही समाजाचे तात्पुरते समाधान होऊन १९८३ पर्यंत येथे शांतता कायम होती . परंतु यानंतर विश्व हिंदू परिषदेने राम जन्मभूमी मुक्तीसाठी मोठ्या प्रमाणात प्रचार करून बाबरी मशीद जमीनदोस्तकरावी व त्या जागी राम मंदिर उभे करावे असे आवाहन केले. १९८६ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यावरून जिल्हा न्यायाधीशाने बाबरी मशिदीचे दरवाजे उघडून त्या ठिकाणी पुजाऱ्यांना पूजा करण्याची परवानगी दिली . परिणामी जमातवादी भावना भडकून देशामध्ये दंगली सुरूझाल्या. विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वाखाली हिंदू तर बाबरी मशीद ॲक्शन कमिटीच्या नेतृत्वाखाली मुसलमान जमातवादी लोक एकत्र येऊन एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले. हिंदू जमातवादी मशिद पाडून त्या ठिकाणी राम मंदिर निर्माण करण्याची मागणी करत होते तर मुस्लिम जमातवादी मशिदीवर हक्क मागत होते.

### १३.५.२ राजकारणासाठी उपयोग :

१९८९मधील निवडणूका समोर ठेवून विश्व हिंदू परिषदेने बाबरी मशिदीच्या जागेवर राम मंदिर निर्माण करण्यासाठी खूप मोठे आंदोलन उभे केले आणि मंदिराच्या उभारण्यासाठी गंगाजलाने पवित्र केलेल्या विटा संपूर्ण भारतातून घेऊन येण्याचेआवाहन हिंदू जनतेला केले. १९८९ मधील निवडणुका प्रचंड जातीयतावादी तणावात पार पडल्या आणि



munotes.in

भाजपने१९८४ मधील २ जागांवरून ८६जागांपर्यंत मजल मारली. केंद्रामध्ये व्हीपी सिंह सरकार भाजपने बाहेरून दिलेल्या पाठिंब्याच्या आधारे सत्तेत आले . आपल्या वाढलेल्या जनाधाराला अधिक मजबूत बनवण्यासाठी मशिदीच्या जागी अधिकृतपणे मंदिर बनवण्यासाठी १९९० मध्ये लाल कृष्ण आडवाणी यांनी अखिल भारतीय **रथयात्रेचे** आयोजन केले . या रथयात्रेमुळे प्रचंड जमातवादी तणाव वाढीस लागून अनेक ठिकाणी जमातवादी हिंसा झाल्या. ऑक्टोबर १९९० च्या शेवटी मुलायमसिंह सरकारने मशिदीच्या आवारात जाण्यावर बंदी घातलेली असतांना देखील भाजप आणि विश्व हिंदू परिषद यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात बाबरी मशीदीजवळ लोक एकत्र आले. जमावाला पांगवण्यासाठी आणि मशीदीची सुरक्षा व्हावी म्हणून पोलिसांनी गोळीबार केला त्यात शंभराहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर भाजपने व्ही पी सिंह सरकारला दिलेले समर्थन वापस काढून घेतले . परिणामी १९९१ च्या निवडणुकांमध्ये११९ जागा जिंकत भाजप सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून पुढे आला. त्याचप्रमाणे भाजप उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश मध्ये देखील सत्ता मिळवण्यात यशस्वी झाले. मिळालेल्या या राजकीय लाभाला अधिक मजबूत बनवण्यासाठी भाजप आणि विश्व हिंदू परिषदेने६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशिदीच्या आवारात जवळजवळ दोन लाख लोकांना एकत्र जमवले. या जमावाने मशिदीवर चढून मशिद जमीनदोस्त केली. भाजपचा कल्याणसिंह सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये मशिदीच्या संरक्षणाच्या हमी दिलेली असतानाही बघ्याची भूमिका घेतली. केंद्र सरकारनेही कचखाऊ भूमिका घेतल्याने प्रचंड प्रमाणात जमातवादी तणाव वाढून देशाच्या संपूर्ण भागामध्ये जातीय दंगलींचे पीक उभे राहिले. मुंबई, कलकत्ता आणि भोपाळ सर्वाधिक प्रभावित झाले. मुंबईमध्ये तर जवळ-जवळ एक महिनाभर नरसंहार चालू होता. त्यामध्ये तीन हजाराहून अधिक लोकांचा बळी गेला. यावर कालांतराने नियंत्रण मिळवले गेले असले तरी बाबरी मज्जिद-राम जन्मभूमी हा विवाद शरीरावरील जखमे प्रमाणे वेळोवेळी चिघळत असतो. ह्याच मुद्याच्या आधारावर भाजपने १९९६ च्या निवडणुकीमध्ये १६१ जागा मिळवल्या व अल्पकाळासाठी मित्रपक्षांच्या सहकार्याने सत्ता स्थापन केली .१९९८ च्या निवडणुकांमध्ये १८२ जागा मिळवून सत्ता स्थापन केली परंतु ह्याही वेळेस भाजपचे सरकार अल्पजीवी ठरले. मात्र १९९९च्या निवडणुकांमध्ये भाजपने १८२ जागांवर विजय मिळवत मित्र पक्षांच्या सहकार्याने मजबूत आघाडी सरकार स्थापन केले आणि या सरकारने आपला कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला.

अशाप्रकारे बाबरी मशीद राम जन्मभूमी विवांद आपल्याला धार्मिक मुद्दा वाटत असला तरी वास्तविक तसे नाही आहे. वास्तविकता ही आहे की जमातवाद्यांना धर्मामध्ये कोणताही रस नसतो ते फक्त धार्मिक मुद्यांचा उपयोग आपले राजकीय हेतू पूर्ण करण्यासाठी करत असतात. विविध धर्मातील धार्मिक मतभेद हे जमातवादाचे मूळ कारण नाही. तसेच आपापल्या धर्मानुसार आचरण करणे सुद्धा जमातवाद नाही. उलटपक्षी कोणताही धर्माचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान एकमेकांचा द्वेष करण्याचे सांगत नाही. *( आजादी की बाद का भारत; बिपिन चंद्र:६२१)*

## १३.६ जमातवाद आणि भारतीय धर्मनिरपेक्षते समोरील आव्हाने

भारताची धार्मिक आधारावर फाळणी झाल्यामुळे उसळलेल्या जातीय दंग्यांच्या पार्श्वभूमीवरही भारतीय जनतेने धर्मनिरपेक्षतेचा आपल्या जीवनमूल्याच्या स्वरूपात स्वीकार केला आणि धर्मनिरपेक्षतेला भारतीय राज्यघटनेमध्ये स्थान देऊन धर्मनिरपेक्ष राजसत्ता आणि समाजाची निर्मिती केली. स्वातंत्र्य चळवळीचा वारसा, महात्मा गांधींचे बलिदान, पंडित नेहरूंची धर्मनिरपेक्षतेमध्ये असलेली आस्था याबरोबर सरदार पटेल, मौलाना आजाद इत्यादी नेत्यांचा संप्रदायीकतेला असलेल्या विरोधामुळे १९५० च्या दशकामध्ये धर्मनिरपेक्षता सर्वोच्च शिखरावर होती. नैतिक मानवी मूल्य जमातवादाला प्रोत्साहन देत नाहीत. म्हणूनच महात्मा गांधी यांनी १९४२ मध्ये म्हटले होते की,"धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब असून, राजकारणामध्ये धर्माला कोणतेही स्थान नसले पाहिजे." परीणामी १९५२, १९५७ आणि १९६७ च्या निवडणुकांमध्ये जमातवादी पक्षांची कामगिरी निराशाजनक होती. त्यामुळे आरएसएस, जनसंघ, जमात-ए-इस्लामी, मुस्लिम लीग आणि अकाली दलासारख्या जमातवादीराजकीय पक्षांनी जनाधार मिळवण्यासाठी धार्मिक मुद्द्यांचा आधार घ्यायला सुरुवात केली. १९६०च्या दशकामध्ये जमातवादी शक्ती वाढत जाऊन भारतीय समाजाचेमोठ्या प्रमाणात सांप्रदायिकरण होत गेले.१९५८ मध्ये जमातवादी हिंसेमध्ये बळी जाणाऱ्यांची संख्या ७ होती.त्यात१९५९ मध्ये वाढ होऊन ४९ झाली तर १९६१ मध्ये १०८ बळी गेले . विशेषतः १९६१ मध्ये जबलपूरमध्ये झालेल्या जमातवादी दंगलींनी संपूर्ण देशाला हादरवून सोडले. जमातवादाला आळा घालण्यासाठी पंडित नेहरूंनी तात्काळ एका राष्ट्रीय एकता परिषदेची स्थापना केली.१९६२ मधील चिनी आक्रमणाने भारतीय जनतेच्या प्रत्येक स्तरांमध्ये राष्ट्रीय एकतेची भावना जागृत केली, त्यामुळे जमातवादी विचारधारा मागे पडली. परंतु ही स्थिती अल्पकाळ टिकली.

१९६० च्या दशकाच्या मध्यंतरी जमातवादी शक्तींनी पुन्हा उचल खाल्ली आणि भारतीय जनतेचा मोठा भाग जमातवादी शक्तींच्या प्रभावाखाली आला. जनसंघाने संसदेमध्ये १९६२ च्या १४ जागांच्या तुलनेत १९६७ मध्ये ३५ जागांवर झेप घेतली. त्याचबरोबर उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये आघाडी सरकारमध्ये सहभाग नोंदवला. याच दरम्यान जमातवादी हिंसेच्या घटना वाढत गेलेल्या दिसून येतात.१९६४ मध्ये १०७०हिंसक घटनां घडून त्यामध्ये १९१९ लोकांचा बळी गेला तर १९६९ मध्ये ५२० दंगली होऊन त्यामध्ये ६७३ लोकांचा बळी गेला. १९७१ ते १९७७ च्या दरम्यान जमातवादी हिंसेमधून काही प्रमाणात उसंत मिळाली आणि या दरम्यान प्रत्येक वर्षी ५२० दंगली व एक हजारापेक्षा कमी माणसे दंगलीत मृत्युमुखी पडली. १९७१च्या निवडणुकांमध्ये इंदीरा गांधी यांनी आपली स्थिती मजबूत केल्यामुळे १९६७ च्या निवडणुकीमध्ये ३५ जागा असलेल्या जनसंघाची ताकत २२ पर्यंत खाली आली.१९७१ मध्ये झालेले भारत-पाक युद्ध आणि बांगलादेशची निर्मिती यामुळे हिंदू आणि मुस्लिम दोन्हीही जातीयवाद्यांना मोठा धक्का बसला. परंतु १९७८ नंतर जमातवाद आणि जमातवादी हिंसा पुन्हा एकदा वाढत जाऊन ती अनियंत्रित स्तरापर्यंत जाऊन पोहोचली.

१९८०च्या दशकामध्ये देशातील महत्त्वांच्या शहरांबरोबरच ग्रामीण भागालाही जमातवादी विचारधारेने आपला विळखा घातला. जातीवादाच्या दृष्टीने सुरक्षित मानल्या जाणाऱ्या केरळ, तामिळनाडू, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेश या राज्यांनाही जमातवादाने

आपल्या कवेत घेतले. त्याचप्रमाणे आता जमातवादी दंगली पूर्वनियोजित, अधिक संघटित आणि अधिक वेळेपर्यंत चालायला लागल्या. दंगलखोरांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत आणि शस्त्रास्त्रे यांचा पुरवठा केला जाऊ लागला. ध्यानात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे १९७५ ते ७७ दरम्यान ज्यावेळेस जनसंघ आणि जमात-ए-इस्लामी या जमातवादी संघटनांचे प्रमुख नेते तुरुंगात होते, त्यावेळी जमातवादी हिंसा व जमातवादी विचारधारेच्या प्रचारामध्ये फार मोठी घसरण झालेली दिसून येते. कारण दंगली संघटित करणारे आणि जमातवादी द्वेष पसरवणारे खूप कमी लोक तुरुंगाच्या बाहेर होते. दुसरीकडे जनता सरकारच्या काळामध्ये सांप्रदायिकता आणि दंगली ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, कारण जनता सरकारवर आरएसएस आणि जनसंघाचा मोठा प्रभाव होता. या काळातील सांप्रदायिकतेचा वेग एवढा प्रचंड होता की,१९८० मध्ये इंदीरा गांधी पुन्हा सत्तेवर येऊनही त्या सांप्रदायिकतेला रोखू शकल्या नाही. *(आजादी केबाद का भारत ; बिपीन चंद्र :६१२)* त्यातीलच एका शिख सांप्रदायिकतेने त्यांचा बळी घेतला. यानंतर सांप्रदायिकता वाढतच जाऊन बाबरी मशीद-राम जन्मभूमी विवादाच्या रूपात सांप्रदायिकतेचा स्फोट झाला . त्यामुळे भारतीय धर्मनिरपेक्षतेला मोठा धक्का बसलेला दिसून येतो.

## १३.७ सारांश

भारताने स्वातंत्र्यानंतर धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक लोकशाहीचा अंगीकार केलेला आहे . भारतीय स्वातंत्र्य चळवळीतूनमिळालेले आदर्श आणि भारतामधील विविध जाती-धर्मांच्या अस्तित्वामुळे भारत धर्मनिरपेक्ष असणे आवश्यक आहे . परंतु भारताने लोकशाहीचा अवलंब केल्यामुळे जनाधार मिळवण्यासाठी राजकीय पक्षांनी वेळोवेळी विविध मुद्द्यांचा आधार घेतलेला दिसून. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वातंत्र्यानंतर राजकारणामध्ये दबदबा असलेला एकमेव राष्ट्रीय पक्ष होता . या पक्षाने स्वातंत्र्यानंतर भारताला आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या सशक्त बनवण्यासाठी मिश्रित अर्थव्यवस्थेचा आधार घेऊन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध विकासाची कास धरली होती. परंतु जनसंघ,अकाली दल, जमात-ए-इस्लामी आणि मुस्लीम लीग या सारख्या जमातवादी पक्षांनी आपल्याला आर्थिक विकासाच्या आधारावर जनाधार मिळत नाही म्हणून धार्मिक मुद्द्यांचा आधारे राजकारण करण्यास सुरुवात केली. त्यांनी जनतेच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांना जमातवादी रंग देऊन ह्या समस्यांचे मूळ धार्मिक हितसंबंधांमध्ये आहे असा भासवण्याचा प्रयत्न केला. या जमातवादी पक्षांना धर्मनिरपेक्ष पक्षांनी साथ दिल्यामुळे आणि त्यांच्या जमातवादी विचारधारेला वेळेवर प्रत्युत्तर न दिल्यामुळे भारतामध्ये जमातवाद अनियंत्रित स्थितीमध्ये पोहचून त्याने राजकारणावर आपली पकड घट्ट केली. परिणामी भारतामध्ये वेळोवेळी जातीय हिंसा होऊन त्यामध्ये अनेक निरपराध जनतेचा बळी गेला. त्याबरोबरच जमातवादाने भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये अडथळा निर्माण केल्याची दिसून येते.

अशाप्रकारे भारत मूलतःएक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. जमातवादाने धर्मनिरपेक्षते पुढे मोठे आव्हान उभे केले असले तरी भारतीय जनमानस याला सहजासहजी स्वीकारणार नाही . कारण भारतातील जनतेने जमातवादी पक्षांना मतदान धार्मिक आधारावर न करता त्यांच्या आर्थिक समस्या हे पक्ष प्रस्थापित पक्षांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे सोडू शकतील ही

त्यामागची अपेक्षा आहे. त्यांच्या समस्या जमातवादी पक्षांनी योग्य प्रकारे सोडवल्या नाहीतर या पक्ष्यांचीही पीछेहाट होण्यास उशीर लागणार नाही.



## १३.८ प्रश्न

**१.** जमातवाद यांची व्याख्या सांगून अर्थ स्पष्ट करा.

**२.** भारतातील जमातवादाच्या वाढीस कारणीभूत असलेल्या प्रमुख घटकांची चर्चा करा.

**३.** भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण कसेझाले याचा आढावा घ्या.

**४ .** भारताच्या धर्मनिरपेक्षतेसमोर जमातवादाने उभ्या केलेल्या आव्हानांचा मागोवा घ्या.

## १३ .९ संदर्भ

१. **आजादी के बाद का भारत-** बिपिन चंद्र.

२. **भारत का स्वतंत्रता संघर्ष-** बिपिन चंद्र .

३. **भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास –** डॉ. साहेबराव गाठाळ.

४. **आधुनिक भारताचा इतिहास** (१९४७ते२०००) **-** शांता कोठेकर.

❖❖❖❖

munotes.in

# १४

# फुटीरतावादी चळवळ

**घटक रचना :**

१४.१ उद्दिष्टे

१४.२ प्रस्तावना

१४.३ प्रादेशिक राजकारण व फुटीरतावाद

१४.४ फुटीरतावादी चळवळ

१४.४.१ तेलंगणा आणि आंध्र प्रदेश

१४.४.२ आसाम

१४.४.३ पंजाब

१४.४.४ जम्मू आणि काश्मिर

१४.५ सारांश

१४.६ प्रश्न

१४.७ संदर्भ

## १४.१ उद्दिष्टे

१) भारतातील प्रादेशिक राजकारण समजून घेणे.

२) भारतातील फुटीरतावादी चळवळीचा उदय आणि विकास यांचा आढावा विविध राज्याच्या संदर्भात घेणे.

३) आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील फुटीरतावादी चळवळीचा आढावा घेणे.

४) आसाममधील सांस्कृतिक आणि आर्थिक फुटीरतावादाचा आढावा घेणे.

५) पंजाब मधील जमातवादी फुटीरतावादी चळवळीचा आढावा घेणे.

६) काश्मीर प्रश्न आणि फुटीरतावादी चळवळ यांचा सहसंबंध अभ्यासणे.

## १४.२ प्रस्तावना

२६ जानेवारी १९५० पासून भारत प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र म्हणून उदयास आले. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना स्वतंत्र भारताचे संविधान स्वतः भारतीयांनी

munotes.in

तयार करावे म्हणून ब्रिटिश सरकारने घटना समितीच्या निवडणुका घेतल्या. या घटना समितीने स्वतंत्र भारतासाठी प्रदीर्घ आणि लिखित संविधान तयार केले. जगामध्ये जिथे जिथे जे काही चांगले असेल त्याचा अंतर्भाव आपल्या या घटनेमध्ये करण्यात आला आणि २६ जानेवारी १९५० पासून ही राज्यघटना लागू करण्यात आली.या राज्यघटनेच्या आधारेभारतामध्ये लोकशाहीची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. असे असले तरीब्रिटिशांच्या वसाहतवादाने निर्माण केलेली आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असमतोल यामुळे प्रादेशिक राजकारणाला स्वातंत्र्यानंतर गती मिळाली. त्यातूनच प्रादेशिक निष्ठा वाढीस लागून राज्याराज्यांमध्ये संघर्ष उभे राहिले. त्यावर बऱ्याच अंशी मात करून देखील कालांतराने फुटीरतावादी चळवळी उभ्या राहिल्या. या जमातवादी चळवळींमुळे भारताच्या एकतेला व अखंडतेला धोका निर्माण झाला होता. परंतु तत्कालीन नेतृत्वाने कधी चर्चेच्या माध्यमातून तर कधी बळाचा वापर करून भारताला या धोक्यापासून वाचवले. आजही बऱ्याच ठिकाणी हे जातीय आणि आर्थिक संघर्ष अधून मधून डोके वर काढत असतात.

## १४.३ प्रादेशिक राजकारण आणि फुटीरतावाद

**प्रादेशिकता म्हणजे काय:**

प्रसिद्ध इतिहासकार बिपीनचंद्र यांनी प्रादेशिकतेसंबंधी स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यांच्यामते, “भारतीय संघराज्याच्या अंतर्गत व्यवहारीक कारणांच्या आधारे एखाद्या राज्याची मागणी करने किंवा अस्तित्वात असलेल्या राज्याच्या अंतर्गत स्वायत्त प्रदेशाची मागणी करणे याला आपण प्रादेशिकता म्हणू शकत नाही. तर जेव्हा एखादे राज्य किंवा प्रदेश आपल्या हितसंबंधांसाठी पूर्ण देश किंवा एखाद्या राज्याविरुद्ध संघर्षाला प्रोत्साहित करतो तेव्हा त्याला प्रादेशिकतावाद म्हटले जाते.” (आजादी केबाद का भारत ; बिपिन चंद्र :१६६)

भारतातील प्रादेशिकता ओळखण्यासाठी रशीद उद्दी खान यांनी खालील प्रमाणे कसोट्या सांगितल्या आहे. जास्तीत जास्त एकजिनसीपणा आणि जास्तीत जास्त वेगळेपण हा त्याचा आधार आहे. यात बोलीभाषा, सामाजिक रचना, वांशिक गट, लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये, भौगोलिक संलग्नता, सांस्कृतिक नमुना, अर्थव्यवस्था आणि आर्थिक जीवन, ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय पार्श्वभूमी आणि मानसशास्त्रीय जाणीव यांचा समावेश होतो.

प्रादेशिकता ही विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील लोकांची ओळख आणि उद्देशाची सामान्य भावना म्हणून व्यक्त केली जाते. ही लोकांना एकत्र आणून त्यांच्यात बंधुत्व आणि निष्ठेची भावना निर्माण करते. तथापि राष्ट्राच्या उद्दिष्टांविरुद्ध एखाद्या प्रदेशाच्या अत्याधिक आसक्तीमुळे देशाचे अस्तित्व, एकता आणि अखंडतेला मोठा धोका निर्माण होतो. प्रादेशिकतेचे राजकारण भारतात नवीन नाही. त्याची मुळे वसाहतवादी धोरणांच्या काळात खोलवर रुजलेली आहे. ब्रिटिश सरकारने विविध राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिलेली भिन्न मानसिकता, दृष्टिकोण आणि अनुकूलता यातून स्वतंत्र अस्मितेची बीजे रोवल्या गेली. जातीच्या आधारावर अनेक राजकीय पक्षांचा उदय हे त्याचे धोतक होते. ब्रिटिशांच्या वसाहतवादी आर्थिक धोरणामुळे काही प्रदेशांकडे दुर्लक्ष झाले. ज्यामुळे आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असमतोल यांना चालना मिळाली. १९४० च्या दशकात डीएमके यांनी उभारलेली ब्राह्मणेतर द्रविड चळवळ पुढे स्वतंत्र तमिळ राज्याच्या मागणी मध्ये परावर्तित

झाली. परिणामी आंध्र प्रदेशामध्ये तेलगू देशम पक्षाने वेगळ्या राज्याची मागणीकेली. १९५०आणि१९६० च्या दशकामध्ये वेगळ्या राज्यांच्या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात हिंसक स्वरूपाचे आंदोलने झाली. राज्य पुनर्रचनेच्या अभ्यासा दरम्यान भाषिक आयोगाने भाषेच्या आधारे वेगळ्या राज्यांच्या लोकांच्या मागण्या पूर्ण केल्या. अशाप्रकारे अनेक राज्यांच्या निर्मितीने भारतात राजकीय प्रादेशिकवादाचा उद्रेक झाला. १९७० आणि १९८०च्या दशकात प्रादेशिकतेच्या आधारे अनेक राज्य निर्मितीचे कायदे केले गेले. २०००च्या दशकामध्ये प्रादेशिक वंचिततेच्या भावनेमुळे मध्यप्रदेशातून छत्तीसगड, बिहार मधून झारखंड आणि उत्तरप्रदेशातून उत्तराखंड या तीन नवीन राज्यांची निर्मिती करण्यात आली. अशाच प्रकारे २०१४ मध्ये आंध्र प्रदेशातून तेलंगणा वेगळे करण्यात आले.

प्रादेशिक राजकारणाचे परिणाम: प्रादेशिक राजकारणाचे पुढील प्रमाणे परिणाम झाले.

१) अनेक प्रादेशिक पक्षांचा उदय झाला.

२) प्रादेशिक समस्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची जनतेला सवय झाली.

३) प्रादेशिकतेच्या अत्याधिक स्वरूपामुळे फुटीरतावादी चळवळी वाढल्या ज्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण झाला. त्याचेच द्योतक म्हणजे काश्मिरी दहशतवादी, तेलंगणा चळवळ व पंजाब संकट होय.

## १४.४ फुटीरतावादी चळवळ

आपण या अगोदर बघितल्या प्रमाणे भारतामध्ये कशाप्रकारे नवीन भाषावार राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यातून प्रादेशिकवादाला नवे धुमारे फुटत गेले. त्याचे रूपांतर पुढे चालून आक्रमक आणि हिंसक फुटीरतावादी चळवळी मध्ये कसे झाले यासंबंधी उदाहरणादाखल काही राज्यांतील परिस्थितीचा आपण आता आढावा घेणार आहोत.

### १४.४.१ आंध्र प्रदेश-तेलंगणा :

आंध्र प्रदेशामध्ये एकच भाषा आणि संस्कृती असून देखील विकासातील असमानता आणि आर्थिक संधी मधील विषमता यावर आधारित उपप्रादेशिक आणि राजनितिक संघर्ष उदयाला आला होता. १९५३ मध्ये आंध्रप्रदेश राज्याची स्थापना करण्यात आली आणि १९५६मध्ये हैदराबाद मधील तेलगु भाषिक प्रदेश आंध्रप्रदेशमध्ये सामील करण्यात आला. भाषावार राज्यनिर्मितीमुळे तेलगु लोकांचा सांस्कृतिक, राजनीतिक आणि आर्थिक विकास होईल ही त्यामागची धारणा होती. परंतु तेलंगणा हा निजामाच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे अत्याधिक अविकसित होता. आंध्रक्षेत्रातील लोकांचे राजकारण आणि प्रशासन यामध्ये वर्चस्व असल्याने आंध्र सरकार तेलंगणाच्या विकासाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करते, त्यामुळे तेलंगणाचा आर्थिक विकास खुंटला आहे अशी भावना तेलंगणातील जनतेची होती. तेलंगणाचा जलदगतीने विकास व्हावा म्हणून १९६९मध्ये वेगळ्या तेलंगणा राज्यासाठी आंदोलन उभे राहिले. सरकारी नोकऱ्यांमधील पक्षपात आणि तेलंगणामधील वाढती बेरोजगारी हा या आंदोलनाचा मुख्य आधार होता. १९१८ मध्ये हैदराबादच्या निजाम सरकारने असा नियम केला होता की, सर्व प्रशासनिक नोकऱ्यांमध्ये स्थानिक लोकांना

munotes.in

प्राधान्य दिले जाईल. १९५६ मध्ये तेलंगणाचे आंध्रामध्ये विलीनीकरण केले तेव्हा तेथील नेत्यांमध्ये असा करार झाला होता की, हा नियम पुढेही चालू राहील आणि हैदराबाद मधील उस्मानिया विद्यापीठासमवेत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये तेलंगणामधील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल. परंतु तेलंगणा मधील असंतुष्ट लोकांचे असे म्हणणे होते की आंध्र सरकार जाणूनबुजून या नियमाकडे दुर्लक्ष करत आहे.

१९६८ च्या शेवटी उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थी नोकऱ्यांमधील भेदभावाच्या प्रश्नावर संपावर गेले. लवकरच हे आंदोलन तेलंगणाच्या इतर भागात पसरले. त्यामध्ये १९६९च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने तेल ओतण्याचे काम केले. कारण न्यायालयाने १९५६मधील कराराला घटनाबाह्य म्हणून घोषित केले. या आंदोलनाला सरकारी कर्मचारी, शिक्षक, वकील, व्यापारी आणि इतर मध्यमवर्गाने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. ( आजादी के बाद का भारत ;बिपिन चंद्र :४०३)

वेगळ्या तेलंगणा राज्याच्या मागणीसाठी संघटितपणे आंदोलन चालवण्यासाठी तेलंगणा प्रजा समितीची (टी पी एस ) स्थापना करण्यात आली. यामध्ये काँग्रेसमधील असंतुष्ट नेतेही सामील झाले. प्रमुख राष्ट्रीय पक्षांनी आणि साम्यवादी पक्षांनी या मागणीचा विरोध केला तर स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशालिस्ट पार्टी आणि जनसंघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी या मागणीला समर्थन दिले. परंतु इंदिरा गांधी आणि काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने या मागणीला सक्त विरोध करून आंध्र सरकारला तेलंगणाच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची सूचना केली. त्यामुळे १९६९ च्या अखेरीस या संघर्षाचा शेवट झाला. तरीही १९७१च्या निवडणुकांमध्ये टीपीएस नेतेलंगणातील १४ पैकी १० जागांवर विजय मिळवला. निवडणुकांनंतर केंद्र सरकारने एक करार करून १९५६चा करार तसाच पुढे चालू ठेवण्यासंदर्भात निर्णय घेतला आणि तेलंगणाच्या विकासासाठी तेलंगणा क्षेत्रिय समितीच्या स्थापनेची घोषणा केली. त्यामुळे असंतुष्ट मध्यमवर्गीयांचे बऱ्याच प्रमाणात समाधान झाले. मुख्यमंत्री ब्रह्मानंद रेड्डी यांच्या जागी तेलंगणातील पी व्ही नरसिंहराव यांची नियुक्ती केली आणि सप्टेंबर १९७१ मध्ये टीपीएस काँग्रेसमध्ये विलीन झाली.

वरील व्यवस्थेमुळे तेलंगणातील जनतेचे समाधान तर झाले परंतु आंध्र क्षेत्रातील जनतेमध्ये यामुळे असंतोष निर्माण झाला. त्यांच्या मते १९५६चा मुलकी प्राधान्याचा नियम कितीही संशोधित केला तरी सरकारी नोकऱ्यांमध्ये आंध्र क्षेत्रातील जनतेला मोठ्या प्रमाणात प्रभावित करेल. अशातच १९७२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्राधान्यक्रम नियमाला चालू ठेवण्यास मान्यता दिल्यामुळे हा असंतोष संघर्षाच्या रूपात पुढे आला. तेलंगणा प्रमाणेच आंध्रमधील विद्यार्थ्यांनी आणि अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी संप आणि प्रदर्शन करण्यास सुरुवात केली. त्यांचे म्हणणे होते की, आंध्र प्रदेशचे सरकार नोकऱ्यांमध्ये पक्षपात करीत आहेत, कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध भेदभाव करत आहे, डॉक्टरांचे असे म्हणणे होते की आरोग्याचा निधी हैदराबाद शहराकडे वळवल्या जात आहे, वकिलांना आंध्र क्षेत्रामध्ये वेगळे उच्च न्यायालय पाहिजे होते, व्यापारी लोक प्रस्तावित शहरी संपत्ती हदबंदी विधेयकाचा विरोध करत होते, त्याचे मोठे जमीनदार आणि श्रीमंत शेतकरी समर्थन करीत होते.

पंतप्रधानांनी परत एकदा २७ नोव्हेंबर १९७२ रोजी करार करून १९५६ च्या मुलकी सेवा नियमांमध्ये संशोधन करून हा नियम हैदराबाद शहराकरीता१९७७ पर्यंत आणि उर्वरित

तेलंगाना क्षेत्रासाठी १९८० पर्यंत लागू राहील असे घोषित केले. या कराराला आंध्र क्षेत्रातील जनतेने तेलंगणाच्या पक्षातील मानून आंदोलन अधिक तीव्र केले. अराजपत्रीत कर्मचारी अनिश्चित काळासाठी संपावर गेले. त्यांनी स्वतंत्र पार्टी, जनसंघ आणि काही अपक्ष नेत्यांद्वारे प्रोत्साहित होऊन वेगळ्या राज्याची मागणी पुढे केली. त्यांचे हे आंदोलन आता तेलंगणाच्या बरोबरच केंद्र सरकारच्या देखील विरोधात होते. काँग्रेसमधील काही नेत्यांचे याला समर्थन होते. परंतु साम्यवादी पक्ष आणि किसान सभा यांनी या मागणीला जोरदार विरोध केला. इंदिरा गांधींनी आंध्र जनतेच्या वेगळ्या राज्याच्या मागणीला कडाडून विरोध करत संयुक्त आंध्रप्रदेशचे समर्थन केले.२१ डिसेंबर १९७२ मध्ये मुलकी नियम विधेयक लोकसभेमध्ये पारित करून १७ जानेवारी १९७३ला नरसिंहराव सरकार बरखास्त केलेव आंध्रप्रदेश मध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली. त्यामुळे हळूहळू या संघर्षावर नियंत्रण मिळवून सप्टेंबर मध्ये केंद्र सरकारने सहासुत्री कार्यक्रम तयार केला. ज्यानुसार १९५६ चा मुल्की नियम समाप्त करून राज्याच्या सर्व प्रादेशिक विभागांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याचे प्रावधान केले गेले. घटनेमध्ये 32 वी दुरुस्ती करून हा कार्यक्रम लागू केला. ज्यामुळे अधिकांश काँग्रेस नेते संतुष्ट झाले. डिसेंबर १९७३ मध्ये राष्ट्रपती राजवट हटवण्यात आली आणि सर्वसंमतीने मुख्यमंत्री बनलेले वेंगल राव यांना हा फार्मूला लागू करण्यास सांगण्यात आले. परिणामी आंध्रप्रदेशच्या दोन्ही प्रादेशिक विभागातील वेगळ्या राज्याची मागणी समाप्त झाली तथापि नंतर भाजपाने याला आपला कार्यक्रम बनवले. (आजादी के बाद का भारत ; बिपिन चंद्र : ४०६)

तेलंगणा आणि आंध्र क्षेत्रातील जनतेच्या वेगळ्या राज्याची मागणी केंद्र सरकारने फेटाळून लावली कारण इतर ठिकाणीही अशीच मागणी होण्याची शक्यता होती. परंतु या दोन्ही क्षेत्रातील मागण्या मान्य करण्यास वाव होता कारण यांच्या मागण्या जमातवादी आणि सांस्कृतिक नसून आर्थिक स्वरूपाच्या होत्या.या संघर्षामधून एक गोष्ट शिकायला मिळाली ती म्हणजे दोन वेगळ्या राज्यातील नव्हेतर एकाच राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील आर्थिक विषमता दूर करून संपूर्ण राज्याचा एकत्रित विकास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर हे ही माहीत  झाले की, केवळ भाषेच्या आणि सांस्कृतिकतेच्या आधारावर जनतेमध्ये ऐक्य भावना निर्माण होऊ शकत नाही.

### १४.४.२ आसाम :

आसाम लोकसंख्येच्या दृष्टीने एक छोटेसे राज्य आहे. येथील जनतेला आपली आसामी ओळख कमी होण्याच्या किंवा पुसून जाण्याच्या भीतीने बऱ्याच वर्षापासून घेरले आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहे,

(१) आसामी लोकांचे म्हणणे आहे की, केंद्र सरकारने आसाम वर नेहमीच भेदभावपूर्ण नीतीचा अवलंब केला आहे. केंद्रीय निधी वाटप आणि औद्योगिक व आर्थिक विभाग यांचेस्थान निर्धारित करताना हा भेदभाव प्रकर्षाने दिसून येतो. आसाम मधील कच्चे तेल, चहा आणि प्लायवुड उद्योगांमधून प्राप्त होणारे कराच्या स्वरूपातील उत्पन्नापासून आसामला वंचित केले आहे. त्यांचे म्हणणे होते की, आसाम मधील उत्पादनातून देशातील इतर भागाचा विकास केला जातो. त्याचप्रमाणे आसाम मधील चहा, प्लायवुड आणि इतर वस्तूंचे उत्पादन आणि विक्री व्यवहारावर बाहेरून

आलेल्या लोकांचा विशेषतः मारवाडी आणि बंगाली लोकांचा कब्जा आहे आणि या उद्योगातील मजूरही अधिकांश गैरअसामी आहे. त्यामुळे त्यांनी अशा मागण्या केले की, चहा आणि प्लायवूड उद्योगातून निर्माण होणारे कर स्वरूपातील उत्पन्नामध्ये आसामला अधिक हिस्सा देण्यात यावा, तेलातील रॉयल्टी वाढवण्यात यावी, केंद्राची आर्थिक सहायता आणि योजना वाढविण्यात याव्या, आसाम मध्ये तेलाचे कारखाने उभरण्यात यावे, आसामला इतर भारताबरोबर रेल्वेद्वारे चांगल्या प्रकारे जोडण्यात यावे आणि  राज्य व केंद्र सरकार मधील शासकीय सेवांमध्ये आसामी लोकांना जास्तीच्या संधी दिल्या जाव्यात.

(२) वसाहतिक कालखंडामध्येच नाही तर स्वातंत्र्यानंतरही आसाममध्ये गेलेल्या बंगाली लोकांनी शासकीय नोकऱ्या, शैक्षणिक संस्था आणि आधुनिक व्यवसाय यामध्ये वर्चस्व निर्माण केलेले आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्यामुळे आसामी युवक बंगाली युवकांशी स्पर्धा करू शकत नव्हते. त्यामुळे आसामी भाषी लोकांमध्ये अशी भावना निर्माण झाली की, शिक्षण आणि मध्यमवर्गीय नोकऱ्यांमध्ये बंगाली लोकांच्या वर्चस्वामुळे आसामी भाषा आणि संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे. परिणामी १९५०च्या दशकांमध्ये आसामी भाषी लोकांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यासाठी आणि आसामी भाषेला राज्याची एक मात्र भाषा बनविण्यासाठी तसेच आसामी भाषेला शैक्षणिक माध्यम बनवण्यासाठी आंदोलन उभे केले. सरकारी भाषेच्या परिवर्तनासाठी चाललेल्या या आंदोलनामुळे बंगाली  आणि असामी भाषी लोकांमध्ये शत्रुत्व निर्माण होऊन१९६०च्या सुमारास भाषाईदंग्यांना सुरुवात झाली. लवकरच १९६० मध्येच बांगला भाषी आणि काही जनजातीय समुदायाच्या इच्छे विरुद्ध आसामच्या विधानसभेत एक कायदा करून आसामीला एक मात्र सरकारी कामकाजाची भाषा घोषित करण्यात आले. तसेच१९७२ मध्ये गुवाहाटी विद्यापीठाशी संबंधित सर्व महाविद्यालयांमध्ये असामी भाषेला शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता दिली. याचा परिणाम म्हणून जनजातीय समुदायांनी आसाममधून वेगळे होण्याची मागणी केली.

(३) आसाम मधील अशांततेला तिसरे कारण म्हणजे बंगाल, बांगलादेश आणि नेपाळ मधून येणाऱ्या  बेकायदेशीर विदेशी स्थलांतरितांचा प्रश्न होय. मोठ्या प्रमाणातील गैरअसामी लोकसंख्येमुळे आसामच्या जनतेमध्ये अशी भीती निर्माण झाले की, आपल्याच प्रदेशांमध्ये आपण अल्पसंख्यांक होऊन जाऊ. परिणामी आपली भाषा आणि संस्कृती दुसऱ्यांच्या आधीन होऊन जाईल, अर्थव्यवस्था आणि राजकारणातील आपले वर्चस्व समाप्त होईल व शेवटी आसामी समुदाय म्हणून असलेली आपली ओळख आणि विशिष्टता नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही.

राजकीय मुद्दा म्हणून बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न १९५० पासूनच पुढे येत होता. परंतु याचा विस्फोट१९७९ मध्ये झाला. कारण बेकायदेशीर आलेले हे स्थलांतरित राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात मतदार बनले होते . १९७९ मध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांचा वरचष्मा राहील या भीतीने ऑल आसाम स्टूडेंट युनियन आणि आसाम गण संग्राम परिषद यांनी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधात चळवळ सर्व सुरू केली. आंदोलनकर्त्यांचा दावा होता की, या विदेशी लोकांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या

३१ ते ३४ टक्यांपर्यंत मोठी आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडे त्यांनी अशी मागणी केली की, आसामच्या सीमा बंद करून बेकायदेशीर स्थलांतरितांवर बंदी आणावी आणि या स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांची नावे मतदार यादी मधुन कमी करावी व तोपर्यंत निवडणूका घेण्यात येऊ नये. या आंदोलनाला इतके समर्थन मिळाले की १६ पैकी १४ मतदार संघामध्ये निवडणुका होऊ शकल्या नाही.

१९७९ ते १९८५ दरम्यान आसाम मध्ये राजनीतिक अस्थिरता, राज्य सरकारची अस्तव्यस्तता आणि राष्ट्रपती राजवट लागू होणे अशा घटना घडल्या. याच दरम्यान सतत हिंसक चळवळी, संप, कायदेभंग इत्यादी गोष्टींमुळे जनजीवन ठप्प झाले होते . बरीच वर्ष केंद्र आणि राज्यातील नेत्यांमध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या परंतु त्यातून कोणतेही समाधान निघू शकले नाही. अशातच केंद्रसरकारने १९८३ मध्ये घेतलेल्या निवडणुकांवर जवळजवळ पूर्ण बहिष्कार टाकला गेला. आसामी भाषी बहुसंख्यांक असलेल्या प्रदेशांमध्ये दोन टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झाले. काँग्रेसने सरकार बनवले परंतु त्याला वैधता नव्हती. याच वेळी राज्यव्यापी हिंसेमध्ये जवळ जवळ तीन हजार लोक मारले गेले. १९८३ नंतर परत चर्चा होऊन शेवटी राजीव गांधी सरकार आंदोलकांसोबत १५ ऑगस्ट १९८५ मध्ये एका करारावर स्वाक्षरी करण्यास यशस्वी झाले.या करारानुसार १९५१ ते १९६१ च्या दरम्यान आसाममध्ये आलेल्या विदेशी नागरिकांना मतदानाचा अधिकार आणि नागरीकता दिली जाईल असे ठरले. १९६१ते १९७१ दरम्यान आलेल्या नागरिकांना दहा वर्ष मतदानाचा अधिकार दिला जाणार नाही परंतु नागरिकत्वाचे इतर अधिकार दिले जातील. १९७१ नंतर आलेल्या लोकांना वापस पाठवले जाईल. आसामच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र पॅकेज दिल्या जाईल. औद्योगिक विकासासाठी दुसरा एक तेल शुद्धीकरण कारखाना,एक कागदाचा कारखाना आणि एक तांत्रिक शिक्षण संस्था स्थापन केल्या जाईल अशा तरतुदी होत्या. त्याचबरोबर आसामी लोकांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि भाषाई अस्मितेला सुरक्षा प्रदान करण्याकरता प्रशासनिक रक्षाकवच देण्याचे मान्य केले. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र : ४११)

वरील कराराच्या आधारावर मतदार यादी तयार करण्यासाठी गांभीर्याने काम सुरु केले गेले. तत्कालीन विधानसभा भंग करून डिसेंबर १९८५ मध्ये पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या. आसाम गण परिषदेला विधानसभेमध्ये १२६ पैकी ६४ जागांवर विजय मिळाला. ऑल आसाम स्टुडंट युनियनचा नेता प्रफुल्ल महंतो ३२व्या वर्षी स्वतंत्र भारतातील सर्वात तरुण मुख्यमंत्री बनला आणि या बरोबरच आसाम मधील दीर्घकालीन जहालवादी राजकारणाचा शेवट झाला.परंतु त्याच बरोबर वेगळ्या राज्यांसाठी बोडो जमात आणि फुटीरतावादी युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) यांचा उदय झाला.

अशाप्रकारे आसाम मधील बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधातील हे आंदोलन जमातवादी आणि फुटीरतावादी नसून आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी होते असे दिसून येते. यामुळे भारताच्या ऐक्यामध्ये आणि अखंडतेमध्ये कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.

## १४.४.३ पंजाब :



१९८०च्या दशकामध्ये पंजाब फुटीरतावादी चळवळीचा बळी ठरला .१९४७च्या पूर्वी पंजाबमध्ये जातियवाद हिंदू, मुस्लिम आणि शिख या तीन जमातींमध्ये त्रिशंकू पद्धतीने अस्तित्वात होता. ज्यामध्ये एकाच्या विरुद्ध दोघे असे आलटून पालटून चालत असे. परंतु १९४७ च्या नंतर पंजाब मधून मुस्लिम जतियवाद नष्ट होऊन हिंदू आणि शीख एकमेकांविरोधात उभे ठाकले. प्रारंभापासूनच अकाली नेतृत्वाने जमातवादाचा अंगीकार केला होता. धर्मनिरपेक्ष व्यवस्थेचा विरोध करून अकाली दलाने धर्म आणि राजकारण आम्ही वेगळं करू शकत नाही असे सांगितले. तसेच अकाली दल शिखांची एक मात्र प्रतिनिधी आहे असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी हिंदू वर असा आरोप लावला की त्यांच्यावर ब्राह्मणवादी हुकूमशाही लादली जात आहे. त्यामुळे शिखांची ओळख नष्ट होत असून 'शिखधर्म खतरे मे' असा नारा दिला. तसेच काँग्रेसला हिंदुत्ववादी संघटना संबोधून शिख समुदायांमध्ये काँग्रेस विरोधी वातावरण निर्माण केले.१९५३ मध्ये मास्टर तारासिंह म्हणतात की, “इंग्रज चालले गेले परंतु आम्हाला स्वातंत्र्य मिळाले नाही, आमच्यासाठी स्वातंत्र्य म्हणजे फक्त मालकांमधील बदल आहे.गोरे जाऊन काळे आले. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या आडून आमच्या धर्माला व जातीला डावलण्यात येत आहे.”

अकाली दलाने गुरुव्दारांचा विशेषतः सुवर्ण मंदिराचा आपल्या राजकारणासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यास सुरुवात केली होती.१९६६ पर्यंत पंजाबमध्ये मुख्यता दोन मुद्दे प्रमुख होते पहिला राज्याच्या भाषे संबंधित होता. हिंदू जनता हिंदी भाषेसाठी आग्रही होती तर शिखांचे म्हणणे होते की गुरुमुखी लिपीतील पंजाबी ही राज्याची भाषा असावी. दुसरा मुद्दा पंजाबी सूभ्याबद्दल होता, जो अधिक भावनात्मक आणि फुटीरतावादी म्हणून पुढे आला. १९५५ मधील राज्यपुनर्रचना आयोगाच्या स्थापनेनंतर अकाली दल, सी पी आय, काही कॉंग्रेस नेते आणि पंजाबी विद्वानांनी भाषेच्या आधारावर पंजाबची पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी केली. ज्यानुसार पंजाबीभाषीक पंजाब आणि हिंदी भाषीक हरियाणा यांची निर्मिती केली जावी. परंतु या मागणीला पंजाब मध्ये म्हणावी तशी सहमती नसल्यामुळे त्यांची हि मागणी फेटाळल्या गेली.१९५६साली पेप्सू पंजाबमध्ये सामील केले गेले. परंतु लवकरच मास्टर तारासिंग यांच्या नेतृत्वाखाली अकाली दलाने पंजाबच्या मागणीसाठी संघर्ष उभा केला. त्यांचे म्हणणे असे होते की, “शिखांना आपल्या स्वतंत्र प्रदेशाची आवश्यकता असून त्यांचा धर्म आणि राजकारण यांचे वर्चस्व राहण्यासाठी तेआवश्यक आहे.”जातियवादी आधारावर पंजाबच्या मागणीला नेहरूंचा विरोध होता कारण त्यांचे म्हणणे होते की, यामुळे राजसत्ता आणि समाज यांच्या धर्मनिरपेक्ष चरित्राला धक्का पोहोचेल. परंतु संत फतेहसिंह यांनी मास्टर तारासिंह यांना अकाली दलातून बाहेर केल्यानंतर पंजाबची मागणी फक्त भाषेच्या आधारावर केल्यामुळे आणि हरियाणामधील जनतेने हिंदी भाषी हरियाणाची आणि कांगडा जिल्ह्याने हिमाचल प्रदेशमध्ये जाण्याची मागणी केल्यामुळे १९६६ मध्ये पंजाब आणि हरियाणा या दोनस्वतंत्र राज्यांची निर्मिती करण्यात आली व कांगडा जिल्हा हिमाचल प्रदेश मध्ये विलीन करण्यात आला. परंतु चंदीगड कोणाला मिळाले पाहिजे यावरून वाद झाल्याने चंदीगडला केंद्रशासित प्रदेश म्हणून मान्यता दिली गेली.

भाषावार पंजाब राज्याची मागणी पूर्ण करूनही पंजाबमधील समस्येचे समाधान झाले नाही कारण ही समस्या राजकीय नसून जमातवादी होती.त्यामुळे पंजाब मधील समस्या नव्या रुपात पुढे आली. पंजाबच्या निर्मितीनंतर अकाली दलाकडे कोणताही राजकीय कार्यक्रम राहिला नसल्याने, जनसमर्थन मिळवण्यासाठी जातियवादी तत्वाचा आधार घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. संत लोंगोवाल यांच्या नेतृत्वामध्ये अकाली दलाने पंतप्रधानांना धार्मिक, राजनीतिक, आर्थिक आणि सामाजिक अशा ४५ मागण्यांचे मागणी पत्र सोपवून त्यासाठी चळवळ सुरू केली. यांची एक मागणी पूर्ण केले की दुसरी मागणी उभे राहत असे. त्यांचा मुख्य दृष्टिकोन हा होता की पंजाब एकशिख धर्मीय राज्य आहे आणि अकाली दल शिख धर्मीय पार्टी असल्यामुळे भारतीय संघराज्याच्या रचनेपेक्षा श्रेष्ठ आहे.

१९७० च्या दशकामध्ये जमातवादी तत्त्वांना खूष करण्याच्या नीतीमुळे पंजाब मध्ये १९७९च्या दरम्यान जहाल जमातवादी आतंकवादाची सुरुवात संत भिंद्रांवाले यांच्या नेतृत्वात झाली. याला ग्यानी झेलसिंग यांच्या नेतृत्वाखालील पंजाब काँग्रेसचा मुक पाठिंबा होता. भिंद्रांवाले आणि अमरीक सिंह यांच्या नेतृत्वाखाली'ऑल इंडिया शिख स्टूडेंट फेडरेशनने' आपल्या आतंकवादाची सुरुवात २४ एप्रिल १९८० रोजी निरंकारी संप्रदायाचे प्रमुख यांची हत्या करून केली. यानंतर अनेक निरंकारी, अधिकारी आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या. सप्टेंबर १९८१ मध्ये एक वृत्तपत्र संपादक जगत नारायणची हत्या झाली. ते भिंद्रांवालेचे प्रमुख टीकाकार होते . ग्यानी झैल सिंह यांनी भिंद्रांवाले यांना सरकारी कारवाई पासून वाचवले. १९८२ मध्ये भिंद्रांवालेयांनी आपल्याला सुरक्षित करण्याकरता सुवर्ण मंदिराच्या गुरुनानक भवनमध्ये आसरा घेतला आणि तेथून ते आपल्या आतंकवादी कारवायांचे नेतृत्व करू लागले. भिंद्रांवाले आता पंजाबच्या राजकारणातील प्रमुख नेतृत्व म्हणून पुढे आले.१९८३ नंतर त्यांनी मोठ्या प्रमाणात हिंदूंना आपला निशाणा बनवायला सुरुवात केली. असे असले तरी पंजाब प्रशासन आणि भारत सरकार या आतंकवाद्यांविरुद्ध कारवाई करण्यास कच खात होते. भिंद्रांवाले यांनी बँका, दुकाने आणि शस्त्रागार लुटून आपल्याला आर्थिक आणि शस्त्राअस्त्रांच्या दृष्टीने मजबूत बनवले.

एप्रिल १९८३ मध्ये पोलीस महानिदेशक आटवाल यांची स्वर्ण मंदिरातून प्रार्थना आटोपून बाहेर येतांना हत्या करण्यात आली. याबरोबरच आतंकवादी कारवाया वाढत जाऊन शिख आणि हिंदूंच्यामध्ये जमातवादी भावना वाढायला लागली. भिंद्रांवाले आता भारतीय राजसत्तेच्या विरुद्ध सशस्त्र संघर्षाच्या नारा देऊ लागले.१९८४ मध्ये पंजाबची स्थिती मोठ्या प्रमाणात बिघडायला लागली. अकाली नेतृत्वाने ३ जून १९८४ पासून आतंकवादाचा नवा अध्याय सुरू करण्याचे आव्हान करून त्यासाठी जन समर्थन मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. या स्थितीमध्ये सर्वात धोकादायक प्रकार म्हणजे पंजाबमध्ये पाकिस्तानचा वाढता हस्तक्षेप होता. पाकिस्तानने भारताचा विरुद्ध आतंकवादी संघटनांना प्रशिक्षण देणे व शस्त्रास्त्रे पुरविणेअसे कार्य सुरू केले. विदेशातील काही जातियवादी शीख समुदायाने सुद्धा आर्थिक आणि शस्त्रास्त्रांच्या रूपात मदत घेऊन प्रोत्साहन दिले. यामुळे पंजाब आणि पूर्ण देशाच्या ऐकतेला व शांततेला धोका निर्माण झाल्याची भावना निर्माण झाली. हिंदूनी पंजाब सोडून जाण्यास सुरुवात केली. जास्तीत जास्त गुरुद्वारांची तटबंदी करून त्यांना शस्त्रागाऱ्यांमध्ये रूपांतरित केले जात होते. एकूण

काय तर पंजाबमध्ये उठावाची जोरदार तयारी सुरू होती आणि जनतेचा सरकारवरील विश्वास झपाट्याने कमी होत चालला होता.

मे १९८४ च्या शेवटी हे स्पष्ट झाले की पंजाबी आतंकवादाच्या विरुद्ध बलप्रयोग करण्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा ऑपरेशन ब्लू स्टार ची योजना बनवण्यात आली. त्यानुसार ३ जून १९८४ रोजी भारतीय सेनेने सुवर्णमंदिराला वेढा घातला आणि ५ जून रोजी मंदिरात प्रवेश केला. परंतु सेनेच्या अनुमानापेक्षा आतंकवाद्यांची संख्या आणि शस्त्रास्त्रे कीतीतरी अधिक प्रमाणात होती. त्यामुळे ही छोटी कार्यवाही न राहता तिला युद्धाचे स्वरूप आले. सर्वात धोकादायक गोष्ट म्हणजे मंदिरामध्ये जवळपास एक हजार भाविक अडकले होते. त्यामधील बरेचसे दोन्ही बाजूकडील गोळीबारामध्ये मारले गेले. अकाल तख्त पूर्णतः नष्ट झाले. हरमंदिर सहिब जे शीखांचे सर्वात पवित्र स्थळ होते त्याच्यावर गोळीबाराच्या खुणा दिसत होत्या. तरीपण सैनिकांनी आपल्याकडून अनेकांचे बलिदान देऊन काळजी घेतली होती. या कारवाईमध्ये भिंद्रांवाले आणि त्यांचे अनेक अनुयायी मारले गेले.

अधिकतर लोकांनी याला आतंकवाद विरोधी कारवाई न मानता धर्म विरोधी आणि शिख समुदायाच्या अपमान म्हणून बघितले. परंतु त्यासोबतच ऑपरेशन ब्लू स्टार ने हे दाखवून दिले की भारत सरकार कोणत्याही आतंकवादाला संपवण्यासाठी खंबीर आहे. ऑपरेशन ब्लू स्टारच्या नंतरशिख आतंकवाद्यांनी इंदीरा गांधी यांनी सुवर्णमंदिराला अपवित्र केल्याबद्दल बदला घेण्याची शपथ घेतली आणि त्याचाच परिणाम म्हणून ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी इंदिरा गांधींच्या सुरक्षा पथकातील दोन शिख रक्षकांनी त्यांची हत्या केली. विशेष म्हणजे त्यांच्या या सुरक्षारक्षकांना हटवण्याचा सल्ला दिला गेला होता. पण त्यांनी धर्मनिरपेक्ष भारतामध्ये असे आपण करू शकत नसल्याचे सांगितले होते. इंदिरा गांधींच्या हत्तेने उत्तर भारतामध्ये शिखविरोधी भावना निर्माण होऊन जातीय दंगली उसळल्या. दिल्लीमधील हिंसक कारवाईमध्ये अडीच हजार लोक मारले गेले. इंदिरा गांधींच्या जागी पंतप्रधान म्हणून नोव्हेंबर १९८४ मध्ये राजीव गांधी यांनी शपथ घेतली. त्यांनी डिसेंबर १९८४ च्या निवडणुकांनंतर पंजाब मधील समस्या सोडवण्यासाठी कंबर कसली. त्यासाठी जानेवारी १९८५मध्ये अटक केलेल्या सर्व अकाली दलाच्या नेत्यांना सोडून देण्यात आले आणि त्यांच्यासोबत चर्चा सुरू केली. ह्या गोष्टीमुळे पंजाबच्या समस्या सुटण्यापेक्षा ऑपरेशन ब्लू स्टार मुळे मिळालेला फायदाही नष्ट झाला आणि आतंकवादास नवसंजीवनी मिळाली. तरीपण ऑगस्ट १९८५ मध्ये राजीव गांधी आणि लोंगोवाल यांनी पंजाब करारावर स्वाक्षरी केली. केंद्र सरकारने अकालींच्या प्रमुख मागण्या मान्य केल्या तर इतर मागण्यांवर पुनर्विचार करण्याचे आश्वासनदिले. सप्टेंबर १९८५ मध्ये राज्य विधानसभा आणि संसदेच्या निवडणुका होणार होत्या. त्या निवडणुकांमध्ये भाग घेण्याची घोषणा २० ऑगस्ट १९४५ रोजी लोंगोवाल यांनी केली. त्याच दिवशी आतंकवाद्यांनी लोंगोवालयांची हत्या केली. पहिल्यांदा अकालींना राज्य विधानसभेमध्ये पूर्ण बहुमत प्राप्त झाले आणि सूरजितसिंह बरनाला यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन करण्यात आले. बरनाला सरकाच्या अकार्यक्षमतेमुळे आतंकवादी समुदाय पुन्हा संघटित होऊ लागले. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे सरकारला शक्य झाले नाही म्हणून १९८७ मध्ये राष्ट्रपती शासन लागू केले गेले. राष्ट्रपती शासन लागू करूनही पंजाब मधील आतंकवाद वाढतच गेला. शेवटी१९८८ मध्ये केंद्र सरकारने ऑपरेशन ब्लॅक थंडर राबवून स्वर्ण मंदिरातून आतंकवाद्यांना बाहेर काढण्यात

यश मिळवले.१९९१ मध्ये नरसिंहराव सरकारने आतंकवाद्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई केली. त्याबरोबरच फेब्रुवारी १९९२च्या निवडणुकांमध्ये यश मिळवलेल्या पंजाबच्या बे अंत सिंह यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने आतंकवाद्यांच्या विरुद्ध कडक पावले उचलली . या व्यतिरिक्त सी पी आय आणि सीपीएम या दोन साम्यवादी पक्षांनी मोठ्या प्रमाणात आतंकवादाच्या विरुद्ध भूमिका घेतल्यामुळे १९९३ पर्यंत पंजाब मधून आतंकवादाचा सफाया झाला. अशाप्रकारे पंजाब मधील फुटीरतावादी चळवळ ही जमातवादी भूमिका घेऊन उदयास आली होती. ज्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला व अखंडतेला धोका निर्माण झाला होता. तथापि या आतंकवादाविरुद्ध सरकारने कडक पावले उचलल्यामुळे यावर नियंत्रण मिळवले गेले. पण त्यासाठी इंदीरा गांधी सारख्या नेत्यांना आपला जीव गमवावा लागला.

### १४.४.४ जम्मू आणि काश्मिर :

ऑक्टोंबर १९४७ मध्येविलीनी करणाच्या पत्रावर स्वाक्षरी झाल्यापासून जम्मू आणि काश्मीरला भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० नुसार विशेष राज्याचा दर्जा देण्यात आलेला होता. काश्मीर संस्थानाने भारतात विलीन होताना फक्त विदेशनीति, दळणवळण आणि संरक्षण याचेच हस्तांतरण केंद्र सरकारला केले होते बाकी बाबतीमध्ये जम्मू आणि काश्मिर स्वायत्त होते. या राज्याला आपले वेगळे संविधान बनवण्याची, वेगळा राज्यप्रमुख (सद्रए रियासत) निवडण्याची आणि आपला वेगळा ध्वज बनवण्याची परवानगी होती. त्याचा अर्थ असा होतो की भारतीय घटनेतील मूलभूत अधिकार येथील जनतेवर लागू होत नव्हते. त्याचप्रमाणे भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग आणि महालेखाकार अशा संस्थांच्या जम्मू-काश्मीरवर कोणताही अधिकार नव्हता. कलम ३७० काश्मीरच्या विलिनीकरणाच्या संबंधित नसून केंद्र आणि राज्यातील देवाण-घेवाण या संबंधित होते. १९५६ साली विधानसभेने भारतामध्ये काश्मीरच्या विलीनीकरणाला मान्यता दिली. त्यामुळे काश्मिरचा विशेष दर्जा जवळपास समाप्त झाल्यासारखाच होता. याबरोबरच भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, संविधानातील मूलभूत अधिकार काश्मीरला लागू झाले. भारतीय संसदेला काश्मीर संबंधात कायदे बनवण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याचबरोबर काश्मीरमधील प्रशासनिक सेवा अखिल भारतीय सेवांशी जोडल्या गेल्या. तसेचसद्र एरियासत नाव बदलून राज्यपाल तर प्रधानमंत्र्याला मुख्यमंत्री संबोधले जाऊ लागले.

काश्मीरची स्वायत्तता कमी केल्यामुळे काश्मीर जनतेचा एक मोठा हिस्सा नाराज झाला. दुसरीकडे कलम ३७० नुसार काश्मीरचे संपूर्ण विलीनीकरण, प्रशासनिक सेवांमध्ये जास्तीचा वाटा आणि जम्मूला काश्मीरपासून वेगळे करण्यासाठी एक शक्तिशाली आंदोलन उभे राहिले. लवकरच या आंदोलनाला जमातवादी रंग आल्याने जम्मू आणि काश्मीर धार्मिक आधारावर विभक्त होण्याचा धोका निर्माण झाला. कारण काश्मीर एक मुस्लिम बहुसंख्यांक भाग होता तर जम्मूमध्ये हिंदूंची संख्या अधिक होती. जम्मूमधील आंदोलनाचे नेतृत्व जम्मू प्रजा परिषद करत होती, जीचे नंतर जनसंघांमध्ये विलीनीकरण झाले. या प्रजा परिषदेने जम्मू काश्मीरचा प्रश्न अखिल भारतीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान ३० जून १९५३ रोजी जनसंघाचे अध्यक्ष श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा हृदय विकाराच्या झटक्याने श्रीनगर तुरुंगात मृत्यू झाला. जम्मू-काश्मीरमध्ये बंदी असतानाही त्यांनी सरकारी

आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. यांच्या मृत्यूमुळे जम्मू प्रजा परिषदेचे नेतृत्व काश्मीरच्या पाकिस्तान समर्थक जमातवाद्यांच्या हाती गेले. त्यांनी भारताचे धर्मनिरपेक्ष चरित्र बदनाम करण्याचा प्रयत्न करून काश्मीर वरील भारताचे नियंत्रण हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:४२४)

### १) शेख अब्दुल्लांची भूमिका :

काश्मीरचे जमातवादी तत्व जे पाकिस्तान मध्ये विलीन होण्याची मागणी करत होते आणि जम्मूमधील जमातवादी तत्व जे भारतात संपूर्ण विलिनीकरणाची मागणी करत होते, या दोन्हींच्या दबावात येऊन शेख अब्दुल्ला हे फुटीरवादाकडे झुकायला लागले. ते जमातवादाची शक्ती आणि धर्मनिरपेक्षतेची कमजोरी यावर अवास्तव भर द्यायला लागले. त्याचबरोबर काश्मीरचे भारतातील विलिनीकरण मर्यादित स्वरूपाचे असावे आणि जास्तीत जास्त स्वायत्तता असावी यावरते जोर देऊ लागले. त्याच्याही पुढे जाऊन १९५३ मध्ये ते अमेरिका आणि इतर विदेशी देशांच्या मदतीने काश्मीरला स्वतंत्र करण्याची भाषा बोलू लागले आणि काश्मिरी मुसलमानांच्या जमातवादी भावनाभडकावू लागले. पंडित नेहरूंनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा शेख अब्दुल्लांवर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी त्यांच्या पक्षातील नेत्यांनी त्यांच्या या वागण्याचा विरोध करून त्यांना हटवण्याची मागणी केली. परिणामी शेख अब्दुल्ला यांना हटवून त्यांच्या जागी प्रधानमंत्री म्हणून बक्षी गुलाम मोहम्मद यांची नियुक्ती केली . या नव्या सरकारने त्यांना लगेच अटक करून तुरुंगात डांबले. पंडित नेहरू या घटनेने नाराज झाले, परंतु ते राज्य सरकार मध्ये हस्तक्षेप करू इच्छित नव्हते. १९५८ मध्ये पंडित नेहरूंच्या म्हणण्यानुसार शेख अब्दुल्ला यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले. परंतु त्यांनी जमातवादी आणि फुटीरतावादी प्रचार सुरू ठेवल्याने त्यांना परत तीन महिन्यांनी अटक करण्यात आली. एप्रिल १९६४ मध्ये नेहरूंनी अब्दुल्लांना परत तुरुंगातून मुक्त केले.आता अब्दुल्लांनी असे बोलायला सुरुवात केली की, काश्मीरचे विलिनीकरण निर्णायक नसून राज्याचा स्वनिर्णयाचा अधिकार मिळवण्यासाठी ते संघर्ष करत राहतील. त्यांना आता पाकिस्तान समर्थक राजकीय समुदाय ज्याचे नेतृत्व मौलवी फारूक आणि आवामी एक्शन कमिटी करत होते यांच्याही विरोधाला सामोरे जावे लागत होते. त्यांना परत १९६५ ते १९६८ दरम्यान घरातच नजरकैदेत ठेवण्यात आले. दरम्यान बक्षी गुलाम मोहम्मद यांनी जम्मूनिर्णयाद्वारे काश्मीरवर कठोर- आणि सरकारीयंत्रणेचा दुरुपयोग करत शासन केले. त्यांच्यानंतर जी एम सादिक आणि मीर कासिम यांनी शासनाची धुरा सांभाळली. परंतु हे दोघेही प्रभावशाली प्रशासक आणि राजनीतिक मुत्सद्दी नव्हते. यांच्या काळात राज्य सरकार लोकप्रियता मिळू शकले नाही तरीही पाकिस्तान समर्थक शक्ती या काळात कमजोर राहिल्या. १९७१चे युद्धआणि पाकिस्तानचे विभाजन होऊन बांगलादेशची झालेली निर्मिती याचा काश्मीरवर मोठा परिणाम झाला. पाकिस्तान समर्थक आवामी एक्शन कमिटी आणि फुटीरतावादी प्लेबीसाईट फ्रंटला यामुळे मोठा राजकीय झटका बसला. शेख अब्दुल्ला यांच्या मध्ये आता मोठी सुधारणा झाली होती. ते केंद्र सरकार बरोबर अधिक जबाबदारीने वागू लागले. त्यामुळे इंदिरा गांधींनीही त्यांच्यापुढे मित्रत्वाचा हात केला. त्यांच्यावरील सर्व निर्बंध उठवून त्यांच्या सोबत चर्चा सुरू केली. शेख अब्दुल्ला यांनी ही स्वनिर्णय आणि जनमत संग्रह हे मुद्दे सोडून देण्याचे मान्य करून आपली मागणी भारतीय संघराज्याच्या अंतर्गत स्वायत्तता यापुरतीच मर्यादित ठेवतील हे मान्य केले. १९७५ मध्ये ते परत एकदा नॅशनल कॉन्फरन्सचे नेता

आणि जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री बनले-.१९७७च्या मध्यवती निवडणुकांमध्ये ते विजयी झाले. १९८२ मध्ये त्यांचा मृत्यू होऊन त्यांचा जागी त्यांचा मुलगा मुलगा फारुख अब्दुल्ला मुख्यमंत्री बनला.

**२) फारुख अब्दुल्ला :**

१९८२ नंतर जम्मू-काश्मीरमध्ये एक तर फारूक अब्दुल्ला यांचे शासन असते किंवा राष्ट्रपतीला राजवट लागू असते. १९८३ च्या निवडणुकांमध्ये फारूक अब्दुल्ला यांना स्पष्ट बहुमत मिळाले. परंतु लवकरच केंद्र सरकार बरोबर त्यांचा बेबनाव झाला. जुलै १९८४ मध्ये जी एम शहा यांनी नॅशनल कॉन्फरन्स फूट पाडली आणि केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार राज्यपाल जगमोहन यांनी फारुख अब्दुल्ला यांना मुख्यमंत्री पदावरून हटवून त्यांच्या जागी जी एम शहा यांना खुर्चीवर बसवले. परंतु जीएम शहा भ्रष्टाचारी आणि शासन करण्यास लायक नसल्याने ते काश्मिरी पंडितांवर होणाऱ्या हल्ल्यांना थोपवू शकले नाही. त्यामुळे १९८६ मध्ये त्यांचे सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली.१९८७ मध्ये राजीव गांधी यांनी फारूक अब्दुल्ला यांच्याबरोबर निवडणुकांसाठी आघाडी केली. परंतु निवडणुका जिंकल्या नंतर फारूक अब्दुल्ला राजकीय आणि प्रशासनिक दृष्ट्या राज्यावर नियंत्रण ठेवू शकले नाही. यानंतर काश्मीर मध्ये फुटीरतावादी आंदोलन जोर पकडू लागले. हिजबुल मुजाहिद्दीन तसेच अन्य कट्टरपंथी पाकिस्तानी समर्थक समुदाय व जम्मु अँड काश्मीर लिब्रेशन फ्रंट यांच्या नेतृत्वाने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठी हिंसक चळवळी आणि सशस्त्र उठाव सुरू केला.या सर्व समुदायांना पाकिस्तानकडून आर्थिक मदत, शस्त्रसाठा आणि प्रशिक्षण दिल्या जाऊ लागले. त्यांनी पोलिस स्टेशन, सरकारी कार्यालये आणि इतर सरकारी इमारतींवर हल्ले करण्यास सुरुवात केली. सर्वात महत्वाचे म्हणजे काश्मिरी पंडितांवर हल्ले करून त्यांना आपली जमीन-जायदाद सोडून जम्मू आणि दिल्ली येथील शरणार्थी शिबिरांमध्ये जाण्यास बाध्य केले. परिणामी बंडखोरी आणि अतिरेकी कारवाया नियंत्रित करण्यासाठी केंद्रातील व्ही पी सिंग सरकारने फारूक अब्दुल्ला यांचे सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली. तरीही मोठ्या कालखंडानंतर १९९६ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये फारूक अब्दुल्ला परत निवडून आले. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र;४२७)

कालांतराने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्याचे समर्थक ऑल पार्टी हुरियत कॉन्फरन्स, जम्मू अँड काश्मीर लिब्रेशन फ्रंट तसेच पाकिस्तान समर्थक मुजाहिद्दीन हे आपली शक्ती गमावून बसले आहेत कारण यांनी स्थानिक लोकांची मोठ्या प्रमाणात लुटमार केली होती. परंतु अजूनही पाकिस्तान समर्थित आणि संघटित आतंकवाद जम्मू व काश्मीर मधील राजकारणाला प्रभावित करणारा एक घटक म्हणून आजही कार्यरत आहे.

## १४.५ सारांश

भारताच्या आदर्श राज्यघटनेमुळे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये लोकशाहीची यशस्वी वाटचाल झालेली दिसून येते. तरीही वसाहतवादाच्या शोषणात्मक व्यवस्थेमुळे निर्माण झालेली प्रादेशिक विषमता आणि असमतोल यामुळे प्रादेशिक राजकारणाला चालना मिळाली. त्यातूनच प्रादेशिक निष्ठा व त्याची जोपासना करणारे प्रादेशिक नेतृत्व यांचा उदय

झाला. परंतु कणखर राष्ट्रीय नेतृत्वाने यावर विजय मिळवून या समस्येचे वेळोवेळी निराकरण केले. असे असले तरी भारतामधील पंजाब, काश्मीर, आंध्र प्रदेश आणि आसाम अशा प्रदेशांमध्ये फुटीरतावादी चळवळी उभ्या राहिल्या. यांनी जमातवादी हिंसक संघर्ष उभे करून आतंकवादाला प्रोत्साहन दिले. बऱ्याच वेळेस यांना विदेशी शक्तींचे प्रोत्साहनही मिळाले. तरीही राष्ट्रीय नेतृत्वाने वेळोवेळी चर्चा करूनत्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. तर काही प्रसंगी कडक पावले उचलत बळाचा वापर करून या फुटीरवादी शक्तींवर विजय मिळून भारताच्या एकतेला व अखंडतेला असलेला धोका दूर केलेला दिसून येतो.

## १४.६ प्रश्न

१) प्रादेशिक राजकारणाचा उगम आणि विकास यांचा आढावा घ्या.

२) भारतामधील फुटीरतावादी चळवळीचा उदय आणि विकास आंध्र-तेलंगणाच्या संदर्भात स्पष्ट करा.

३) आसाममधील फुटेरवादीचळवळीचा मागोवा घ्या.

४) पंजाबमधील आतंकवादाची फुटीरवादी चळवळीच्या संदर्भाने चर्चा करा.

५) काश्मीर प्रश्न आणि फुटीरवादी चळवळ यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

## १४.७ संदर्भ


१) आजादी के बाद का भारत- बिपिन चंद्र .

२) आधुनिक भारताचा इतिहास- शांता कोठेकर.

३) आधुनिक भारताचा इतिहास-ग्रोवर आणि बेल्हेकर.

४) भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास- साहेबराव गाठाळ

५) भारत का स्वतंत्रता संघर्ष- बिपिन चंद्र


❖❖❖❖

# १५

# महिला सक्षमीकरण आणि आरक्षणाचे धोरण

**घटक रचना**

१५.१ उद्दिष्टे

१५.२ प्रस्तावना

१५.३ महिला सक्षमीकरण म्हणजे काय?

१५.४ महिला सक्षमीकरणासाठी भारतीय संविधानातील तरतुदी

१५.५ महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हिंदू कोड बिल

१५.६ महिला सक्षमीकरणासाठी स्वातंत्र्योत्तर भारतातील कायदे

१५.७ महिला सक्षमीकरणासाठी आरक्षणाचे धोरण

१५.८ महिलांचा राजकारणातील सहभाग

१५.९ महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग सहभाग

१५.१० स्वातंत्र्योत्तर भारतातील महिला संघटन व चळवळी

१५.११ सारांश

१५.१२ प्रश्न

१५.१३ संदर्भ

munotes.in

## १५.१ उद्दिष्टे

१) महिला सक्षमीकरणाचा अर्थ समजून घणे.

२) महिला सक्षमीकरणासंदर्भातील संविधानातील तरतुदींचा आढावा घेणे.

३) महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हिंदू कोड बिलाचे महत्व विशद करणे.

४) स्वातंत्र्योत्तर भारतात महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कायद्यांचा मागोवा घेणे.

५) महिला सक्षमीकरणासाठी आरक्षण धोरणाचा आढावा घेणे.

६) महिलांचा राजकीय व आर्थिक सहभाग स्पष्ट करणे.

७) स्वातंत्र्योत्तर काळातील महिला संघटन व चळवळी यांचा आढावा घेणे.

## १५.२ प्रस्तावना

मानवी समूहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्री हीच मानवाच्या उत्पत्तीची जननी आहे. स्त्री आणि पुरुष जन्मतः दोघेही नैसर्गिक दृष्ट्या समान आहेत. परंतु मानवनिर्मित समाजव्यवस्थेने समाजाचे लिंगभेदाच्या आधारावर स्त्री-पुरुषांमध्ये समाजाचे श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे दोन भागात विभाजन केले. भारतामध्ये स्त्रियांची आदिशक्ती, दुर्गा म्हणून पूजा केली जाते. परंतु समाजामध्ये विशेषतः कुटुंबामध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना गौण स्थान देण्यात आले आहे. तिला तिच्या अनेक प्रकारच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. हे आपल्याला वैदिक काळ, मध्ययुगीन काळ, स्वातंत्र्यापूर्वीचा काळ आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळ अशा प्रत्येक काळात दिसून येते. स्त्रियांचे क्षेत्र फक्त 'चुल आणि मुल' इतकेच मर्यादित करण्यात आले आहे. याचा परिणाम असा झाला की स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक विकास होऊ शकला नाही. ही परिस्थिती केवळ भारताचीच नाही तर संपूर्ण जगामध्ये अशा प्रकारचे चित्र दिसून येते. म्हणूनच स्त्री ही पुरुषांप्रमाणे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम व्हावी म्हणून सर्वप्रथम १९८५ मध्ये नैरोबी येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला संमेलनामध्ये महिला सक्षमीकरणाचे बिजारोपण करण्यात आले. त्यानंतर भारताने सुद्धा २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून जाहीर केले.

## १५.३ महिला सक्षमीकरण म्हणजे काय :

जीवशास्त्रीय दृष्ट्या स्त्री-पुरुषांमध्ये काही नैसर्गिक भेद आहेत. परंतु लिंग (Gender) या संज्ञेशी अनेक सांस्कृतिक पैलू व अर्थ जोडले गेले आहेत. मुलत: नैसर्गिक भेदामुळे समाजात स्त्रीच्या दुय्यम दर्जाचे समर्थन केले जाते. जीवशास्त्रीय कारणांचा आधार घेऊन शोषणाच्या अनेक प्रकारांना तत्त्वज्ञानाचा मुलामा चढवला जातो. नैसर्गिक आणि अपरीवर्तनीय घटनांमुळे शोषण अटळ आहे असे सांगितले जाते. जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था ही शोषणाचे उदाहरणे म्हणून सांगता येतील. अशाच प्रकारे जीवशास्त्रीय आधारावर शतकानुशतके स्त्री वर्गाचं होत असलेल्या शोषणाचे समर्थन केले जात आहे. त्यामुळे अशा जीवशास्त्रीय समर्थनाला आव्हान देणे गरजेचे आहे. स्त्रिया हजारो वर्षापासून उपेक्षित व पराधीन जीवन जगत आहे. प्राचीन काळापासून पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने स्त्रियांना केवळ बंधनात ठेवले. एकंदरीत हजारो वर्षापासून स्त्रियांच्या वाट्याला दयनीय जीवन आलेले आहे. स्त्रियांची या दास्यातून मुक्तता करण्यासाठी १९ व्या व २०व्या शतकात जे प्रयत्न होऊ लागले त्यामागे अनेक चळवळी, सामाजिक संस्था, समाजसुधारक व स्त्रीमुक्तीविषयी कणव असणाऱ्या सर्वांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभलेले आहे. त्यांच्यामुळे सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, महिला संघटना यासंबंधी कायदे संमत होत गेले आणि स्त्रीमुक्ती व महिला सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

**व्याख्या :** योजना, कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि कौटुंबिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये निर्णयक्षम बनविणे, स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे, स्त्रियांना पुरुषांसारखी विकासाची संधी उपलब्ध करून देणे, या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

वरील व्याख्येवरून असे लक्षात येते की, महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना स्वतःच्या अधिकाराप्रती जागृत करणे होय. ज्याप्रमाणे पुरुष हा मानव प्राणी आहे, त्याचप्रमाणे महिला देखील एक मानव प्राणी आहे. ती पुरूषापेक्षा वेगळी नाही. ती सुद्धा पुरुषांप्रमाणे निर्णय घेण्यास सक्षम आहे ही भावना स्त्रियांमध्ये रुजवणे होय. महिला सक्षमीकरण ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करून देणारी प्रक्रिया आहे. लिंगभेदावर आधारित विषमतापूर्ण समाजव्यवस्था नष्ट करून स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे व स्त्रियांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व व प्रतिष्ठा मिळवून देणे हे या प्रक्रियेचे स्वरूप आहे. महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनवण्यासाठी पोषक अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने संथपणे का होईना पण निश्चितपणे वाटचाल करीत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पूर्वीपासून स्त्रियांची उपेक्षा झालेली आहे. त्यामुळे स्त्रियांचा विकास झालेला नाही. लिंगभेद आणि शोषणावर आधारित सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था बदलून स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण करणे महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेशी संबंधित आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर महिला सक्षमीकरण ही स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य, राजकीय व आर्थिक धोरण निश्चितीमध्ये भागीदारी तसेच समान कामासाठी समान वेतन आणि कायद्याचे संरक्षण , अधिकारांची प्राप्ती यांच्याशी संबंधित आहे. अर्थात महिला सक्षमीकरणाच्या राष्ट्रीय धोरणाचा उद्देश स्त्री-पुरुष विषमता नष्ट करणे, त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण करणे आणि देशाच्या नितीनिर्धारण व विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवणे हा आहे. *(शर्मा विशाला व विनोद बैरागी – संपादक, महिला सक्षमीकरण- समस्या आणि आव्हाने, अजंठा प्रकाशन, औरंगाबाद, 2015)*

2001 हे वर्ष भारताने महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. या वर्षात महिलांना सक्षम बनवण्यासाठी खालील बाबींवर भर देण्यात आला आहे.

१. महिलांच्या विकासासाठी कार्यक्रम योजना तयार करणे, तसेच या कार्यक्रमावरील योजनांना गतिमान करणे.

२. महिलांप्रती होणारे दुर्व्यवहार व हिंसाचार अत्याचार कमी करण्यावर भर देणे.

३. महिलांना कौटुंबिक, आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनवणे.

४. देशातील महिलांसाठी असे चित्र निर्माण करायचे की, त्यामुळे त्यांना सामाजिक आणि आर्थिक धोरण निर्मितीत सहभागी करून घेण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

५. महिलांचा शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा यातील सहभाग निश्चित करणे.

६. पुरुषांप्रमाणे महिलांना सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्ट्या समान अधिकार देणे.

महिलांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव दूर करण्यासंबंधी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १९८९ मध्ये ठराव संमत केला होता. महिलांबाबत भेदभाव दूर करणे आणि आपल्या न्याय व्यवस्थेत समानतेचे तत्व समाविष्ट करणे हे या ठरावावर सही केलेल्या सर्व देशांना बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने सन १९९४

मध्ये महिला धोरण जाहीर केले. बदलांशी सुसंगत राहण्याच्या दृष्टीने वेळोवेळी या धोरणाअंतर्गत घेतलेल्या निर्णयाची फेर तपासणी करून त्यात आवश्यकतेनुसार बदल घडून आणण्याची तरतूद १९९४ च्या धोरणात करण्यात आली आहे. ही बाब विचारात घेऊन तसेच कालानुरूप झालेला बदलाचा विचार करून शासनाने सन २००१ मध्ये दुसरे महिला धोरण जाहीर केले. या दोन्हीही धोरणांमध्ये प्रामुख्याने महिलांवरील अत्याचार, हिंसा, महिला विषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसार माध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, महिलांना केंद्रस्थानी मानून नियोजन, स्वयंसहायता बचत गटांचा विकास, महिलांविषयीचे हक्क व कायदे याबाबत जनजागृती यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. या दोन्ही धोरणांच्या अनुषंगाने महिलांच्या विकासाच्या विविध बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले. त्याचेच फलित म्हणजेच महिलांची, शिक्षणातील प्रगती, त्यांच्या आरोग्यात सुधारणा, महिलांचा मालमत्तेतील हक्क, महिला विषयक कायद्याबाबत जनजागृती याबरोबरच शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये नौकरीची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीतून आलेले नोकरी व उच्च शिक्षण यात ३० टक्के महिला आरक्षण, तसेच राजकीय क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के महिला आरक्षण करण्यात आले. पुढे राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण करण्यात आले. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून बचत गटांच्या चळवळीद्वारे महिलांना आर्थिक पाठबळ मिळाले व त्यांचा आत्मविश्वास वाढला. यासारख्या ठळक बाबी प्रामुख्याने महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरत आहे.

## १५.४ महिला सक्षमीकरणासाठी भारतीय संविधानातील तरतुदी :

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय राज्यघटना अस्तित्वात येईपर्यंत स्त्री-पुरुष समतेला कायद्याचे स्थान प्राप्त झाले नव्हते. ते स्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून स्त्रियांना प्राप्त करून दिले. त्यामुळे शेकडो वर्षाच्या कालखंडानंतर भारतीय स्त्रियांना राज्यघटनेत कायदेशीररीत्या पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार व स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. भारतीय राज्य घटनेच्या चौदाव्या व पंधराव्या कलमानुसार महिलांना समान हक्क व समान संधीची हमी दिलेली आहे. लिंग आधारित भेदभाव निर्मूलन करणे ही भारतीय घटनात्मक तरतुदी मधील मूलभूत तत्वे आहेत.

घटनेच्या उद्देश पत्रिकेत समतेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु १४व्या कलमात हक्कांच्या दृष्टीने आवश्यक असा समतेचा अर्थ सांगण्यात आला. त्या अन्वये समता म्हणजे कायद्यापुढील समता आणि कायद्याने संरक्षणाची समान संधी होय. लोकशाही राष्ट्रात असा समन्वय आवश्यक असतो. राज्यांनी केलेले कायदे सर्वांना समानपणे लागू राहतील. तसेच धर्म, वंश, जात, लिंग अथवा वर्गाच्या आधारित कोणताही भेदभाव केला जाणार नाही असे या कलमात स्पष्ट केलेले आहे. घटनेच्या १५व्या कलमात असे नमूद केले आहे की जाती, वंश, लिंग, धर्म, वर्ग, जन्मस्थान या कोणत्याही आधारावर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी शाळा, मंदिरे, सिनेमागृहे आदी ठिकाणी नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. तसेच दुकान, उपहारगृहे, करमणूकगृहे, विहिरी, तळी, घाट या ठिकाणी प्रवेश नाकारला जाणार नाही. घटनेच्या १६व्या कलमात सार्वजनिक नोकऱ्यात सर्वांना समान संधी दिली जाईल असे म्हटले आहे. जाती, धर्म, वंश, जन्मस्थान, लिंग यावरून नोकरी

देताना भेदभाव केल्या जाणार नाही किंवा या कारणास्तव कोणालाही अपात्र ठरवले जाणार नाही. घटनेच्या कलम १९ नुसार प्रत्येक व्यक्तीला आपल्या पात्रतेप्रमाणे आणि इच्छेनुसार धंदा, उद्योग, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे, परंपरेनुसार आपापला व्यवसाय करण्याचे पूर्वी बंधन होते, व्यवसायानुसार जाती व्यवस्था अस्तित्वात आली. रूढी-परंपरेनुसार स्त्री आणि पुरुषांमध्ये श्रमविभागणी ही करण्यात आली होती. ती या कायद्याने नष्ट करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर रूढी प्रथा, जातीच्या व्यवसायाचा अभिमान कमी होऊ लागला. ठरवून दिलेल्या व्यवसायापेक्षा आपल्या इच्छेनुसार व्यवसाय करण्याची प्रेरणा ब्रिटिश राजवटीत इंग्रजी शिक्षणामुळे मिळाली. स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करताना या व्यवसाय स्वातंत्र्याचा उल्लेख करण्यात आला आणि समाज परिवर्तनाला व जातीवर आधारित व्यवसायाला कलाटणी मिळाली. कलम १४, १५, १९ आणि २१ या सर्व कलमांचा एकत्रित विचार सर्वोच्च न्यायालयाने एका निकाल पत्रात केला आहे. एखाद्या स्त्री कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ होत असेल तर व्यवसाय स्वातंत्र्य या मूलभूत अधिकाराचा भंग होतो असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच जीवन जगणे या मूलभूत अधिकाराचा भंग होतो असे न्यायालयाने म्हटलेले आहे.

घटनेच्या २३व्या कलमात शोषणाविरुद्धचा अधिकार स्पष्ट केला आहे. त्यानुसार वेठबिगार, सक्तीने कामे करून घेणे किंवा सक्तीची मजुरी कायद्याने बंद करण्यात आली आहे. कोणत्याही जाती, धर्म, वंश अथवा वर्णाच्या माणसाच्या खरेदी विक्रीला अवैध ठरवण्यात आले आहे. यात स्त्रीदासत्व आणि सक्तीने चालवलेला वेश्याव्यवसायाचाही अंतर्भाव होऊ शकतो. घटनेतील २९व्या कलमानुसार शिक्षणाचा अधिकार स्पष्ट केलेला आहे. राज्याने अनुदान दिलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धर्म, वंश, जात किंवा लिंग याआधारे कोणत्याही व्यक्तीला प्रवेश नाकरता येणार नाही. व्यक्ती विकासासाठी म्हणून आपल्या इच्छेप्रमाणे शिक्षण घेण्याचा हक्क प्रत्येक नागरिकाला असेल. नागरिकत्व बहाल करताना घटनेने जे उदार धोरण स्वीकारले आहे, तेच प्रौढ मतदान पद्धती बाबतही स्वीकारले आहे. यानुसार अठरा वर्षाच्यावरील सर्व स्त्री-पुरुषांना निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. त्यासाठी धर्म, जात, वंश, भाषा, प्रांत, लिंगभेद आशा कोणत्याही गोष्टीचा अडथळा येऊ शकणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे. या पद्धतीमुळे भारतात लोकशाही खऱ्या अर्थाने निर्माण झाली आहे .*(जोशी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2015)*

अशाप्रकारे महिला सक्षमीकरणासंदर्भात भारताच्या प्रयत्नांचा राजकीय आलेख मांडताना असे म्हणता येईल की, भारतीय संविधानाने सुरुवातीपासूनच याबाबतीत पुढाकार घेतल्याचे दिसते स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानात अनेक मार्गदर्शक बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत. संविधानाच्या चौथ्या भागात राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वांच्या अंतर्गत कलम ३९-घ मध्ये संविधानाने राज्याला असा निर्देश दिला आहे की, पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे. भारताचे संविधान निर्माण करत असताना घटनाकारांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार प्रदान केले होते. असे असले तरी महिला सबलीकरणासाठी शासनाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार कायदे केले. १९७६ मध्ये भारत सरकारने समान वेतन कायदा करून स्त्री आणि पुरुष कामगारांना समान वेतन देण्याचे ठरवण्यात आले. तसेच मजूर मंत्रालयांतर्गत स्वतंत्र महिला

विभागाची निर्मिती केली. चौथ्या पंचवार्षिक योजनेनंतर महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत उल्लेखनीय परिवर्तन झाले. महिला विकासाच्या मुद्याची जागा महिला सक्षमीकरणाने घेतली. ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायतराज संस्था तसेच नागरी स्थानिक संस्था यांच्यामध्ये महिलांसाठी एक तृतीयांश आरक्षणाची व्यवस्था हे या दिशेने सर्वाधिक क्रांतिकारी पाऊल ठरले. भारतात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची नोंद घेऊन त्यासंबंधीचा अहवाल शासनाला सादर करून महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी भारत सरकारने ३१ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. यामुळे वर्षानुवर्षी शोषित वंचित उपेक्षित स्त्रियांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यामुळे राज्य व राष्ट्रीय स्तरावर महिला सक्षमीकरणाच्या दिशेने गतिमान वाटचाल सुरू असल्याचे आपणास दिसते.

## १५.५ महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हिंदू कोड बिल

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय समाजातील सर्वात अनिष्ट रूढी म्हणजे स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता याकडे विशेष लक्ष पुरवल्या गेले. भारतीय संविधानामध्ये यांना कायद्याने विशेष संरक्षण दिले गेले होते, मात्र ते पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये यासाठी विशेष सुधारणा करण्यात आल्या.

### १५.५.१ हिंदू कोड बिलाची पार्श्वभूमी :

समाजातील व कुटुंबातील स्त्रियांच्या दर्जाबाबत व अधिकाराबाबत काही प्रश्न स्वातंत्रपूर्व काळात चर्चेला आले होते. वारसा हक्क, दत्तक घेण्याचा हक्क, विवाहाचे वय, घटस्फोट इत्यादी अनेक मुद्द्यांबाबत हिंदू समाजात मतभेद असल्यामुळे आणि ब्रिटिश शासनकाळात झालेल्या कायद्यांच्या तरतुदी काहीशा संदिग्ध व अपुऱ्या असल्यामुळे त्यासंबंधी सुस्पष्ट तरतुदी असलेले कायदे करणे निकडीचे होते. स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी १९४१मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'सर बेनेगल राव समिती'ने महिलांसंबंधी सर्व मुद्द्यांचा विचार करून तर्कशुद्ध, न्याय्य व सुसंगत अशी हिंदू कायद्यांची संहिता तयार करून त्यात सर्व मुद्द्यांचा समावेश करावा अशी शिफारस केली होती. हा अहवाल १९४२ नंतरच्या राजकीय धकाधकीच्या काळात दुर्लक्षित राहिला. मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या अहवालाकडे नेहरू सरकारने विशेष लक्ष पुरवले आणि आपल्या मंत्रिमंडळातील विधिमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे हे काम सोपवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक सुधारण्याचे पुरस्कर्ते असल्यामुळे नेहरूंनी त्यांच्याकडे हे काम सोपवणे संयुक्तिकच होते. भारतीय स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने कार्य करून आपली क्षमता व गुणवत्ता सिद्ध केली होती. स्त्रीचा समाजातील व कुटुंबातील दर्जा हा समाजाच्या प्रगतीचा प्रमुख निकष आहे, असे ठाम मत १९२८मध्ये अलाहाबाद महिला विद्यापीठात बोलताना नेहरूंनी व्यक्त केले होते. अशा परिस्थितीत स्त्रियांचा दर्जा सुधारणास कोणताच अडथळा नव्हता. भारतीय राज्यघटनेच्या चौदाव्या व पंधराव्या कलमानुसार स्त्रियांना समान हक्क व समान संधीची हमी दिलेली होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बेनेगल राव समितीने सुचवलेल्या 'हिंदू विधी संहिते'त थोडेफार बदल करून तो अहवाल विधेयकाच्या रूपात घटना समितीला सादर केला. *( डॉ. शांता कोठेकर ;*

*आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर, २०१६.पृ.५६३)* यालाच आपण 'हिंदू कोड बिल' देखील म्हणतो.

## १५.५.२ हिंदू कोड बिलास प्रतिगामी शक्तींचा विरोध :

डॉ. आंबेडकरांनी घटना समिती पुढे हिंदू विधी संहितेचा मसुदा मांडताच घटना समितीतील प्रतिगामी नेतृत्वाने या बिलास विरोध केला. राष्ट्रीय चळवळीत महिलांनी कार्य करण्यास ज्यांनी विरोध दर्शवला नव्हता अशा गांधीवादी म्हणवून घेणाऱ्या काही काँग्रेस सदस्यांना देखील महिलांना समान अधिकार देण्याची कल्पना रुचत नव्हती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या मसुद्याला त्यांनी विरोध सुरू केला. समाजातील पुराणमतवाद्यानींही त्याविरुद्ध टीकीचे मोहोळ उठविले. त्यातील तरतुदींमुळे हिंदूंची समाजव्यवस्था धोक्यात येईल, एकत्र कुटुंबपद्धती नष्ट होईल, मुलीला मुलाच्या बरोबरीने अधिकार दिल्यास हिंदू समाजरचना कोलमडून पडेल, शतकानुशतके हिंदू समाजाने जोपासलेली मूल्य लयाला जातील असे अनेक आक्षेप घेतल्या गेले. डॉ. आंबेडकरांवर देखील वैयक्तिकरित्या चिखल फेक करण्यास या प्रतीगाम्यांनी मागेपुढे पाहिले नाही. परंतु या विरोधाला नजुमानता डॉ. आंबेडकरांनी या संहितेचा पाठपुरावा चालू ठेवला. पंतप्रधान नेहरूंनी डॉ. आंबेडकरांना पूर्ण समर्थन दिले होते. पट्टाभी सितारामय्या डॉ. केतकर, हंसा मेहता, सुचेता कृपलानी, दुर्गाबाई देशमुख इत्यादींनी या संहितेच्या मसुद्याला हार्दिक पाठिंबा दिला. तरीही राजेंद्र प्रसादांनी हे बिल मागे घेण्याची नेहरूंना गळ घातली. हिंदू समाज या संहितेमुळे नष्ट होईल आणि देशापुढे नानाविध गंभीर समस्या उभ्या असताना समाजातील एका मोठ्या गटाला दुखावणे अनिष्ट ठरेल, असे नेहरूंना पटवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एवढेच नाही तर घटना समितीला मूलभूत बदल करणारा कायदा करण्याचा अधिकार नाही, अशीही तांत्रिक अडचण त्यांनी उपस्थित केली. सरदार पटेलही या विधेयकाला समर्थन देत नव्हते. त्यामुळे १९४८मध्ये बराच ऊहापोह झाल्यानंतर हे विधेयक मागे पडले. काँग्रेस मधील रूढीवादी गटाचे डॉ. राजेंद्र प्रसाद व सरदार पटेल हे याबाबतीत अग्रणी होते.

सरदार पटेल यांच्या निधनानंतर कदाचित या विधेयकाला पूर्वी झालेला विरोध दुबळा होईल या अपेक्षेने नेहरूंनी १९५१मध्ये हे विधेयक पुन्हा विचारार्थ पुढे ठेवले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी पुन्हा या विधेयकाला कडाडून विरोध केला. १८ सप्टेंबर १९५१ रोजी नेहरूंना पाठवलेल्या आपल्या लांबलचक पत्रात हे विधेयक पारित करणे कशी घोडचूक ठरेल, त्याचे हिंदू समाजावर दुरगमी स्वरूपाचे अनिष्ट परिणाम होतील, हिंदू समाजाचा एक मोठा घटक त्याला तीव्र विरोध करेल, हे पटवून देण्याच्या त्यांनी प्रयत्न केला. इतकेच नाहीतर नेहरूंनी आपले वजन खर्च करून हे विधेयक संसदेकडून पारित करून घेतले तरी त्याला मंजुरी द्यायची की नाही यावर आपल्याला विचार करावा लागेल, असे विधान करून ते विधेयकाला मंजुरी देणार नाहीत असा गर्भित इशाराही त्यांनी दिला. काँग्रेसमधील बरेच सदस्य डॉ. राजेंद्र प्रसादांच्या विरोधात उभे राहण्यास तयार नाहीत हे नेहरूंच्या ध्यानात आल्यामुळे त्यांनी हिंदू कोड बिल विधेयक पारित करून घेण्याचा विचार सोडून दिला. राष्ट्रविकासाच्या नानाविध योजना कार्यान्वित होत असताना काँग्रेस पक्षात फूट पडू न देणे त्यांना अगत्याचे वाटत होते. त्यांची ही भूमिका डॉ. आंबेडकरांनी लक्षात न घेता ते नेहरूंवर नाराज झाले. त्यांच्या मते नेहरूंना पक्ष सदस्यांवर दडपण आणून हे विधेयक पारित करून घेणे अशक्य नव्हते. परंतु त्यांनी तसे न करता या विधायकाच्या समर्थनार्थ आपले वजन

पणाला न लावता वेळेवर कच खाल्ली व आपल्या नेतृत्वाचे बळ विधायकाच्या मागे उभे न करता आपल्याला तोंडघशी पाडले असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रह बनला आणि त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. *( डॉ. शांता कोठेकर ; आधुनिक भारताचा इतिहास; साईनाथ प्रकाशन; नागपूर, २०१६.पृ.५६४)*

### १५.४.३ हिंदू विधीसंहिता स्वतंत्र कायद्याद्वारे संमत

१९५४ सालापर्यंत समाज सुधारणेला अनुकूल वातावरण देशात व कॉंग्रेस पक्षात निर्माण झाले. तोपर्यंत कॉंग्रेस मधील रूढीवादी गटाचा पक्षावरील प्रभाव ओसरून नेहरूंच्या पुरोगामी विचारांना पक्षात समर्थन मिळू लागले होते. तेव्हा १९५४मध्ये पुन्हा एकदा हिंदू विधीसंहितेचा प्रश्न संसदेपुढे मांडण्याचा निर्णय घेतला. परंतु मूळ स्वरूपात ते विधेयक न मांडता त्यातील प्रत्येक तरतुदीसाठी स्वतंत्र कायदा करावा असा निर्णय घेतल्या गेला. तोपर्यंत अशी विधेयके पारित होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले होते. मुंबईच्या समाजसुधार परिषदेने संकल्पित सुधारणांवर विचार करून जनमत जागृत करण्यासाठी तीन परिषदा घेतल्या. अनेक महिला संघटनांनी देशाच्या निरनिराळ्या भागात सभा आयोजित करून या समाजसुधारणांची मागणी केली. शिवाय १९५२ सालच्या देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला प्रचंड बहुमत मिळाल्याने नेहरूंचे हात बळकट झाले होते. ह्या लोकनिर्वाचित संसदेत बेनगेल राव समितीच्या शिफारशींवर आधारलेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले विधेयक (*हिंदू कोड बिल*) बाजूला सारून त्यातील महत्त्वाच्या तरतुदीसाठी एक एक स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

#### १. हिंदू विवाह कायदा -१९५५ :

या कायद्याने पहिल्या पत्नीच्या अगर पतीच्या हयातीत दुसरा विवाह केल्यास तो बेकायदेशीर ठरवण्यात आला. असा दुसरा विवाह हा गुन्हा असून त्यासाठी संबंधित व्यक्तींना सात वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकेल, त्याचप्रमाणे विवाहाच्या वेळी एका पक्षाने दुसऱ्या पक्षाची फसवणूक केल्याचे सिद्ध झाल्यास असा विवाह एका वर्षाच्या आत रद्द करून घेता येईल. तसेच काही गंभीर कारणांसाठी पती-पत्नीला परस्परांपासून विभक्त होता येईल, म्हणजेच घटस्फोट घेता येईल. इत्यादी तरतुदी हिंदू विवाह कायद्यानुसार करण्यात आल्या.

#### २. हिंदू वारसाहक्क कायदा -१९५६ :

हिंदू वारसा हक्काच्या कायद्यान्वये पतीच्या संपत्तीत पत्नीला बरोबरीचा हक्क देण्यात आला. तसेच मुलांबरोबर मुलींनाही संपत्तीत वाटा मिळावा अशी तरतूद करण्यात आली.

#### ३. हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा – १९५६ :

या कायद्यानुसार पत्नी विभक्त झाल्यास मुलांचा ताबा कोणाकडे असावा याविषयी तरतूद करण्यात आली. एकत्र कुटुंब मोडल्यावर स्त्री ही कुटुंबाचा भार सांभाळू लागल्याचे ध्यानात घेऊन पित्याच्या मृत्यूनंतर आईला मुलांच्या पालकत्वाचा अधिकार मिळाला. तसेच अज्ञान मुलांच्या भरण पोषणाची जबाबदारी पित्यावर टाकण्यात आली. परंतु मूल पाच वर्षाचे

होईपर्यंत त्याचा ताबा सामान्यतः मातेकडे असावा अशी तरतूद या कायद्यान्वये करण्यात आली.

### ४ हिंदू दत्तक व पोटगी कायदा – १९५६ :

या कायद्यानुसार विधवा, घटस्फोटीत अगर अविवाहित स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्यास तिला दत्तक घेण्याचा अधिकार देण्यात आला. मुलाप्रमाणे मुलगी दत्तक घेणेही कायदेशीर मानण्यात आले. मात्र कुटुंबात एक मूल असल्यास दुसरे समलिंगी मूल दत्तक घेण्याची परवानगी या कायद्याने दिली नाही. दत्तक घेण्यास पती-पत्नीला परस्परांची संमती आवश्यक ठरवण्यात आली. पोटगी संबंधी या कायद्यान्वये अशी तरतूद करण्यात आली की, पती अथवा पत्नी यापैकी घटस्फोट मागणाऱ्या पक्षाकडे दुसरा पक्ष पोटगी मागू शकेल. पोटगीची रक्कम ठरविताना दोन्ही पक्षांच्या राहणीमानाचा दर्जा आणि मिळवणाऱ्याची आर्थिक स्थिती या बाबी विचारात घ्याव्या असे कलम या कायद्यात घालण्यात आले. तसेच वृद्ध माता-पिता आणि मुले यांची जबाबदारी मिळवता पुरुष व मिळवती स्त्री या दोघांवरही टाकण्यात आली.

अशाप्रकारे १९४८साली डॉक्टर आंबेडकरांनी नेहरूंच्या पाठिंब्याने सुरू केलेल्या प्रक्रियेला सात वर्षानंतर फळ आले. मात्र हे कायदे पास होताना देखील प्रतिक्रियावादी सनातनी मंडळीच्या विरोधामुळे मूळ विधायकात अनेक बदल करणे भाग पडले. महिलांना संपत्तीत वाटा मिळाला परंतु पित्याच्या मालकीच्या घरावर मात्र अधिकार मिळाला नाही. घटस्फोटाच्या संबंधातही अनेक अडचणी उपस्थित करण्यात आल्या. कायद्याने निर्धारित केलेले वयाचे बंधन न पाळणाऱ्यांना किमान शिक्षा व्हावी असा आग्रह धरण्यात आला. पुराणमतवाद्यांच्या दडपणामुळे मूळ विधेयकातील तरतुदींना सौम्य स्वरूप द्यावा लागले. तसेच हे कायदे केवळ हिंदू समाजापुरतेच सीमित राहिले. देशातील सर्व धर्मीयांना अशा प्रकारचे कायदे लागू करणे विरोधामुळे शक्य झाले नाही. स्वातंत्र्यसंग्रमात महिलांनी पुरुषांच्या बरोबर काम केले असताना देखील स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे कायदे करण्यात सनातनी गटाने विरोध करावा आणि त्यामुळे हे कायदे होण्यास सात-आठ वर्षे लागावीत ही बाब निश्चितच खेदजनक होती.

तरीही महिलां सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची पावले या कायद्यांनी उचलली गेली असे म्हणावे लागेल. म्हणून १० मे १९५६ रोजी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात “१९५५-५६ साली झालेले महिलांचा दर्जा सुधारणा बाबतचे कायदे क्रांतिकारक स्वरूपाचे असून त्यांनी सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रातील नव्या युगाचा श्रीगणेशा केला आहे”, असे मत नेहरूंनी व्यक्त केले.

## १५.६ महिला सक्षमीकरणासाठी स्वातंत्र्योत्तर भारतातील कायदे :

### १. विशेष विवाह कायदा -१९५४ :

१९५४मध्ये पारित झालेल्या या कायद्यानुसार भिन्न धर्मीय स्त्री-पुरुषांना आपला धर्म न सोडता विवाह करता येईल अशी तरतूद करण्यात आली आणि मुला-मुलींचे विवाहाचे

किमान वय अनुक्रमे २१ व १८ असे निर्धारित करण्यात आले. या कायद्यामुळे आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहांना कायदेशीर मान्यता मिळाली.

## २. अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा - १९५६ :

मानवी व्यापाराच्या दुष्ट चक्रातून पीडित स्त्रियांना सोडविण्याकरिता १९५६मध्ये अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा संमत केला. या कायद्यामध्ये २५ कलमे असून, या कायद्याअंतर्गत असणारे गुन्हे दखलपात्र आहेत. या कायद्याच्या व्याख्येनुसार बालक म्हणजे ज्यांनी वयाची १६ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, अशी व्यक्ती व अज्ञान म्हणजे जिने वयाची १६ वर्षे पूर्ण केलेली आहेत. परंतु वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत व सज्ञान म्हणजे ज्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत अशी व्यक्ती. कुंटणखाना चालविणे, जागेचा वापर कुंटणखान्यास वापरण्यास देणे, वेश्या व्यवसायाच्या कमाईवर उपजीविका करणे, व्यक्तीला वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणे, वेश्या व्यवसायाच्या प्रयोजनार्थ फितवणे किंवा मोह घालणे, सार्वजनिक ठिकाणी व जवळपास वेश्या व्यवसाय करणे, जेथे वेश्या व्यवसाय चालतो त्या जागेत व्यक्तीला अडकून ठेवून जबरदस्ती करणे, वेश्या व्यवसायासाठी अज्ञानी व्यक्तीची खरेदी- विक्री करणे, अज्ञानी मुलगी अनैतिक कामासाठी आणणे, पीडित व्यक्तीला शारीरिक दुखापत व मानसिक त्रास देणे, धमकी, जबरदस्ती, धाक, आमिष दाखविणे, बलात्कार करणे, अनैसर्गिक लैंगिक शोषण करणे, व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध श्रम करून घेणे ही वरील सर्व कृत्ये या कायद्यानुसार गुन्हे असून, असे करणाऱ्यास शिक्षा व दंड केला जातो, परंतु हा कायदा सामाजिक असल्याने या गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तींना पीडित किंवा बळीत मानले जाऊन त्यांच्या पुनर्वसनाची सोय कायद्यामध्येच केलेली आहे.

## ३. हुंडा प्रतिबंधक कायदा -१९६१ :

हुंडा देणे व घेणे ही परंपरेने अस्तित्वात असलेली अनिष्ठ प्रथा आहे. हुंडयापायी छळ होवून अनेक स्त्रियांना वैवाहिक जीवनातून बाहेर पडावे लागते व समाजात अनेक अडचणींना तोंड देत जीवन जगावे लागते. या पध्दतीमुळे कुटूंबाची दुर्दशा होणे, मुले मातेच्या प्रेमापासून पारखी होणे व वैवाहिक जीवनातून बाहेर पडलेल्या स्त्रियांचाही प्रश्न निर्माण होतो. या सर्व समस्यांवर वचक बसावा म्हणून नेहरू युगामध्ये १९६१मध्ये 'हुंडा बंदी कायदा' करण्यात आला. या अधिनियमातील कलम २ अन्वये हुंडा म्हणजे विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई-वडिलांना अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा तत्पूर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा दयावयाचे कबुल केलेली कोणतीही संपत्ती अथवा मुल्यवान रोख असा आहे. हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल कमीत कमी ५ वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची आणि कमीत कमी रुपये पंधरा हजार अथवा अशा हुंडयाच्या मुल्याइतकी रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल तितक्या रकमेच्या दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

## ४. मातृत्व हितरक्षण कायदा १९६१ :

या कायद्यान्वये स्त्रियांना प्रसूती काळामध्ये हक्काची रजा मिळण्याची तरतूद केलेली आहे. या कायद्यामुळे स्त्रियांना आर्थिक स्वयंपूर्णतेबरोबरच मातृत्व सुखाचे क्षणही शांतपणे घालवता येऊ लागले आहेत.

### ५. समान वेतन कायदा १९७६ :

सन १९७६ मध्ये भारत सरकारने समान वेतन कायदा मंजूर करून स्त्री आणि पुरुष कामगारांना समान वेतन देण्याचे ठरविण्यात आले. तसेच नोकरीमध्ये स्त्री-पुरुष भेदाला बंदी घालण्यात आली आहे. यामुळे हा कायदा पुरुषांच्या बरोबरीने महिलांना सर्वच क्षेत्रांमध्ये समान अधिकार मिळण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे पाऊल आहे.

### ६. ठेकेदार मजूर कायदा १९७८ :

बांधकाम व गृहनिर्माण क्षेत्रात ठेकेदारीवर काम करणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या कामाचा व श्रमाचा मोबदला, सुरक्षा, पाळणाघर इत्यादी व्यवस्था पुरवण्याची तरतूद करणारा हा कायदा आहे.

### ७ सतीबंदी कायदा १९८७ :

१६ डिसेंबर १९८७ रोजी सतीप्रथा निवारण कायदा सरकारने संमत केला. त्यानुसार सती जाणे, सती जाण्यास भाग पाडणे, सती जाण्यास प्रोत्साहन देणे, जबरदस्ती करणे, सतीचे स्मारक तयार करणे, अशी कृती गुन्हा मानून त्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

### ८. गर्भ निदान प्रतिबंधक कायदा १९९४ व २००३ :

समाजामध्ये असलेल्या पुरुषांच्या श्रेष्ठत्वामुळे आधुनिक काळात गर्भनिदान चाचणी करून गर्भ जर मुलीचा असेल तर त्याला जन्माअगोदरच नष्ट करण्याची परंपरा रूढ झालेली आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष प्रमाणावर विपरीत परिणाम होत होता, म्हणून हा कायदा करण्यात आला.

### ९. कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५ :

या कायद्याने नात्यातील कोणत्याही व्यक्तीकडून जर शारीरिक मानसिक किंवा लैंगिक छळ होत असेल तर या विरुद्ध न्यायालयात अपील करण्याचा अधिकार स्त्रियांना देण्यात आला. पत्नी, माता, बहीण, मुलगी, भावजय, मेहुणी, मैत्रीण सरकारी महिला कर्मचारी अशा सर्वच स्त्रियांना या कायद्याने संरक्षण प्रदान केलेले आहेत. महिलांवरील शारीरिक अत्याचार, लैंगिक अत्याचार, भावनात्मक अत्याचार, आर्थिक अत्याचार या सर्वांपासून त्यांना कायद्याने संरक्षण दिल्यामुळे प्रथमच स्त्रिया कुटुंबामध्ये सुरक्षित होऊ शकतात याची जाणीव झालेली आहे.

### १०. हिंदू वारसा दुरुस्ती कायदा -२००५:

या कायद्यानुसार स्त्रीला वडिलांच्या संपत्ती मध्ये मुलांप्रमाणे समान अधिकार देण्यात आला आहे.

### ११. बलात्कार विरोधी कायदा -२०१३ :

भारतात बलात्कार ही गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. 'निर्भया बलात्कार प्रकरणानंतर' या गुन्ह्यांचा गांभीर्याने विचार करून २०१३ मध्ये 'बलात्कार विरोधी कायदा' संमत करण्यात आला. या कायद्यानुसार शारीरिक इजाच नाही तर लैंगिक शेरेबाजी,

munotes.in

पाठलाग, शरीरस्पर्श, लैंगिक सुखाची मागणी, अश्लील हावभाव इत्यादींनाही या कायद्याच्या कक्षेत आणले गेले. त्याचबरोबर गुन्हा दाखल करताना पोलीस किंवा वैद्यकीय तपासणी करताना डॉक्टरांनी हलगर्जीपणा केला तर त्यांनाही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सर्वात महत्त्वाचे ह्या केसेस फास्टट्रॅक कोर्टात चालवून त्याचा निकाल दोन महिन्याच्या आत देणे बंधनकारक करण्यात आले आहेत.*(गाठाळ एस एस, भारतीय इतिहासातील स्त्रिया, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.)*

अशाप्रकारे स्वातंत्र्यानंतर महिला सक्षमीकरणासाठी वरील कायदे करण्यात आले आहे. त्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्याचे चांगले परिणाम दिसत नाही. तरीही वरील कायद्यामुळे लोकांच्या मनात धाक निर्माण झाला आहे. महिला सक्षमीकरणासाठी कायद्याच्या प्रामाणिक अंमलबजावणी बरोबरच सामाजिक जनजागृती होणे आवश्यक आहे. तरच महिलांना समाजात समानतेची वागणूक मिळून महिला सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा होईल.

## १५.७ महिला सक्षमीकरणासाठी आरक्षणाचे धोरण :

पंचायतराज व्यवस्था लोकशाही विकेंद्रीकरणाचा एक भाग असून लोकशाही व्यवस्था तळागाळापर्यंत रुजवण्यासाठी पंचायतराज व्यवस्था प्रस्थापित होणे आणि अधिक दृढमूल होणे आवश्यक असते. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक घटकांचा सहभाग अपेक्षित असतो, म्हणून महिलांचा सहभाग देखील महत्त्वाचा ठरतो. भारतात लोकशाहीची स्थापना झाली व तिचे विकेंद्रीकरण होऊन पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. या व्यवस्थेला कित्येक वर्षे होऊन देखील प्रत्यक्षात सहभागी लोकशाही स्थापित होऊ शकली नाही. म्हणून ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती करून महिलांसाठी पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक तृतीयांश जागा आरक्षित करण्यात आल्या.

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीचा विचार करून महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था अमलात आणण्यासाठी तत्कालीन महसूल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेसाठी खाली लोकशाही विकेंद्रीकरण समिती जून १९६० ला स्थापित करण्यात आली. या समितीच्या अहवालाच्या आधारे 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९५९' करण्यात आला. १९६१ पासून या लोकप्रतिनिधी संस्थांमार्फत कारभार सुरू झाला. त्यावेळी पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना कोणत्याही प्रकारचा वाव देण्यात आला नव्हता. महिलांचे कार्यक्षेत्र राजकारण नसून केवळ चूल आणि मूल एवढ्या पुरतेच मर्यादित आहे असा समज होता. त्यात महिलांनी आपली कर्तव्य क्षमता सिद्ध करून दाखवली तरी सुद्धा स्थानिक राजकारणात महिलांची दखल घेण्यात आली नव्हती. बलवंतराय मेहता समितीने मात्र महिलांचा सहभाग देखील आवश्यक आहे हे ओळखून पंचायत राज संस्थांमध्ये दोन महिला सदस्य नियुक्त करण्याची शिफारस केली. त्यानुसार दोन महिलांची नियुक्ती केली जाऊ लागली. पण प्रस्थापित पुरुष वर्ग आपल्या नातेसंबंधातील महिलांची नियुक्ती करू लागले. नियुक्ती झालेल्या महिला बैठकीला उपस्थित न राहतात त्यांच्या घरीच रजिस्टर पाठवून त्यांची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जात होता. त्यामुळे पंचायत संस्थामधील नेमणुकेद्वारे महिलांचा जो सहभाग होता तो नाममात्र व परिणाम शून्य राहिला. सर्वसामान्य अनुसूचित जाती व जमातीतील महिलांना तर पंचायतराज संस्थांच्या

कार्यालयाकडे फिरकण्याचे स्वातंत्र्य देखील नव्हते, प्रत्यक्षात राजकीय सहभाग तर फारच दूरची गोष्ट होती. स्थानिक राजकीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा त्यांचा विकास व्हावा आणि रराजकी, सामाजिक, आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाव्यात या उद्देशाने पंचायत राज संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद १९९३ मध्ये ७३व्या घटनादुरुस्तीने करण्यात आली. या महिला आरक्षणामुळे हजारो वर्षाचा दुय्यम पातळीवरच्या जीवनानंतर पुरुषांच्या मानलेल्या राजकीय क्षेत्रात खऱ्या अर्थाने महिला पाऊल टाकायला लागल्या. त्यामुळे राजकीय क्षेत्रात वर्षानुवर्ष राजकारण करणाऱ्या पुरुषांबरोबर त्यांची तुलना करणे योग्य होणार नाही. एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून राजकारण करावे लागणार आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की ३३% महिला आरक्षणामुळे महिलांचा राजकीय सहभागच्या कधीही न थांबणाऱ्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

१९८५ मध्ये राजीव गांधी शासनाने महिलांच्या विषयाला प्राधान्य दिले. ज्याचा भाग म्हणून समाजकल्याण विभागाअंतर्गत महिला विभागाची स्थापना करण्यात आली. तसेच या महिला विभागास लवकरच महिला आणि बालकल्याण विभागात रूपांतरित केले. त्यासोबतच भारत शासनामार्फत महिलांसाठी एक 'राष्ट्रीय परिप्रेक्ष योजना' बनवण्याची घोषणा करण्यात आली. 'राष्ट्रीय परिप्रेक्ष योजने'नुसार एक समिती बनवण्यात आली. त्याने भारतात पुन्हा महिला आरक्षणावर चर्चेचे नवे युग प्रारंभ झाले. या समितीने महिलांचे राजकीय क्षेत्रातील सहभागीत्व कमी होण्याची कारणे सांगितली व महिलांच्या सहभागीत्वास वाढवण्यासाठी विशेष तरतुदींची आवश्यकता स्पष्ट केली. 'राष्ट्रीय परिप्रेक्ष योजने' ने आपल्या शिफारशीत पंचायती पासून संसदेपर्यंत, शासकीय समित्या आणि आयोगासोबतच राजकीय पक्षातही ३३ टक्के जागा महिलांसाठी आरक्षित असाव्यात अशी शिफारस केली. राष्ट्रीय परिप्रेक्ष योजनेच्या अंतिम अहवालात ६४वी आणि ६५वी घटनादुरुस्ती मांडली. परंतु त्यावेळेस त्याचे कायद्यात रूपांतर होऊ शकले नाहीत. १९९३ मध्ये नरसिंहराव सरकारने पुन्हा ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी १/३जागा आरक्षित करण्यासाठी ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती विधेयक मांडले. ज्यास बहुमताने स्वीकारण्यात आले. अशा प्रकारे देशाची अर्धी लोकसंख्या असलेल्या महिलांना स्थानिक संस्थांमध्ये ३३ टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या. १९९४ आणि १९९६ दरम्यान संसदेत व राज्य विधानसभेत महिलांना जागा आरक्षित करण्याची मागणी तीव्रतेने करण्यात आली. या दबावामुळे संयुक्त मोर्चा आघाडी शासनाने महिलांसाठी संसदेत व राज्य विधानसभेत ३३% जागा आरक्षित करण्याची घोषणा केली. त्याच्या अंमलबजावणीसाठी १२ सप्टेंबर १९९६ला भारतीय संसदेत महिला आरक्षण विधेयक मांडले. परंतु तेव्हापासून ते आतापर्यंत भारतीय संसदेत हे विधेयक अनेक वेळा ठेवण्यात आले, तरी त्यास आजपर्यंत कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले नाही.

२१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात त्रिस्तरीय पंचायत संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित करून बिहार सरकारने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने क्रांतिकारक सुरुवात केली. २००६ मध्ये यासंबंधीचा अध्यादेश काढण्यात आला होता की, १४ एप्रिल २०२१ रोजी महाराष्ट्र शासनाने पंचायतराज संस्थांमध्ये महिलांसाठी बिहार प्रमाणेच ५० टक्के आरक्षण जाहीर करून महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतलेला आहे.

## १५.८ महिलांचा राजकारणातील सहभाग

संवैधानिक तरतुदीमुळे व महिलांच्या आरक्षण धोरणामुळे महिलांच्या राजकीय सहभागात वृद्धी होण्यास मदत झाली. यासोबत विकास प्रक्रिया व शिक्षणातील वृद्धी यामुळे त्यांची विचार प्रवृत्ती विस्तारली. त्यांनी बाह्य जग समजण्यास सुरुवात केली. याचाच परिणाम म्हणून त्यांचा राजकीय सहभाग वाढू लागला. स्वतंत्र भारतात महिला प्रधानमंत्री , महिला राजदूत, महिला आंतरराष्ट्रीय मंडळात पण प्रतिनिधी, महिला राज्यपाल, महिला मुख्यमंत्री, महिला मंत्री, विधिमंडळ व संसद सदस्य झालेल्या दिसून येतात. भारतीय राजकारणात महिलांनी मोलाची भर घातली आहे. विजयालक्ष्मी पंडित यांनी मंत्री म्हणून तसेच पहिल्या महिला राजदूत म्हणून जगात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. नगरपालिका सदस्य, मंत्री, राजदूत, राज्यपाल आशी वेगवेगळी पदे भूषवली. प्रत्येक जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. सरोजनीदेवी नायडू या बुद्धिमान राजकारणी होत्या. राजकारणाबरोबरच त्यांनी साहित्यातून आपली छाप पाडली आहे. त्या काळात विदेशातून त्यांनी शिक्षण घेऊन स्वातंत्र चवळील भाग घेतला एवढेच नव्हे तर कानपूर काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पदही भूषवले. भारत स्वतंत्र झाल्यावर सर्वात मोठ्या उत्तर प्रदेश राज्याच्या त्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. राज्यपाल म्हणून त्यांनी आपल्या कार्याची चूणूक दाखवली. इंदिरा गांधींना पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा बहुमान मिळाला. देशाच्या महिला पंतप्रधान म्हणून त्यांची जगभर खाती होती. त्यांच्या काळात झालेल्या १९७१ च्या भारत पाकिस्तान यूध्दात भारताचा विजय झाला म्हणून इंदिरा गांधी यांना 'आयर्न लेडी ऑफ इंडिया' म्हणून ओळख मिळाली. त्यांच्याच काळात गरीबी हटावचा नारा देऊन गरीबीविषयी आपल्याला वाटत असेलेली सहानुभूती दाखवून दिली. प्रतिभाताईंनी आमदार म्हणून आपल्या कार्याची सुरुवात करून भारताच्या सर्वोच्च पदापर्यंत त्या पोहोचल्या. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. महिला सबलीकरण्यासाठी त्यांनी फार मोठे कार्य केले. मायावती  या दलित समाजातून राजकारणात येऊन उत्तर प्रदेश सारख्या मोठ्या राज्याच्या पहिल्या दलित महिला मुख्यमंत्री होण्याचा बहुमान त्यांनी मिळवला. त्या तीन वेळा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री झाल्या. यासोबतच सुचेता कृपलानी , नंदिनी सत्पती व शशिकला काकोडकर या उत्तर प्रदेशच्या, गोवा व ओरिसाच्या मुख्यमंत्री राहिल्या. श्रीमती शीला दीक्षित, श्रीमती जय ललिता या दिल्ली व तामिळनाडूच्या मुख्यमंत्री राहिल्या. नजमा हेपतुल्ला या राज्यसभेच्या उपाध्यक्ष राहिल्या.  सुमित्रा महाजन ह्या लोकसभेच्या अध्यक्ष होत्या. राजकुमारी अमृता कौर या केंद्रीय मंत्रिमंडळातील प्रथम महिला सदस्य होत्या. शानोदेवी ह्या राज्य विधिमंडळातील प्रथम महिला स्पीकर होत्या. वसुंधरा राजे – राजस्थान, आनंदी बेन पटेल – गुजरात,  ममता बॅनर्जी-पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री राहिल्या आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळात देखील सुषमा स्वराज, उमा भारती, स्मृती इराणी, नजमा हेपतुल्ला, मनेका गांधी, हरसिमतकर बादल, निर्मला सीतारामन, साध्वी निरंजन ज्योती या केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्रीपदी होत्या.

अशा प्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय स्त्री राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणात विविध पदावर सक्रियरित्या कार्यरत व सहभागी राहिली असे असून देखील सार्वत्रिकदृष्ट्या पाहिल्यास महिलांचे स्थान व दर्जा समाधानकारक नाहीत. संवैधानिक अधिकार व सत्यस्थिती यात मोठी फारकत दिसते व महिला खऱ्या अर्थाने अधिकारांचा वापर थोड्याच

प्रमाणात करतात. काही अपवाद वगळल्यास इतर महिलावर्ग हा सत्ता व राजकीय अधिकारापासून दूरच आहे. असे असले तरीही भारतीय राजकारणात आज आपल्याला पुरुषांच्या तुलनेत महिलांची संख्या कमी दिसते. महिलांना संसदेत राखीव जागा मिळाल्या तर निश्चित राजकारणात महिलांची संख्या वाढेल व खऱ्या अर्थाने महिलांना न्याय मिळेल.

## १५.९ महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग सहभाग

अर्थकारण म्हटलं की या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी असते. परंतु स्त्रियांचा अप्रत्यक्षपणे का होईना अर्थकारणाशी जवळून संबंध येतो. प्राचीन काळात मानव जेव्हा शेती करायला लागला त्या शेतीचा शोध ही स्त्रियांची कल्पना होती. स्त्रीचा शेतीतील सहभाग हाच तिच्या भावी अर्थकारणातील सहभागाची पूर्वकल्पना देतो. स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग ही प्रत्येक राष्ट्राची गरज आहे. भारतासारख्या विकसनशील देशात गतिशील अर्थव्यवस्थेसाठी स्त्रियांच्या अर्थकारणातील सहभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम ते जागतिक दर्जाच्या उद्योगधंद्यात भारतीय स्त्रियांचा सहभाग हळूहळू वाढत आहे. जागतिक अर्थशास्त्राचा विचार केला तर इतर राष्ट्रांच्या तुलनेत भारतीय स्त्रियांच्या अर्थकारणात सहभाग त्यामानाने खूप कमी आहे. भारतीय स्त्रियांचा अर्थकारणात टक्का वाढवण्यासाठी भारत सरकार बऱ्याच योजना राबवत असते. स्त्रियांचा उद्योग, व्यवसाय, नोकरी यात सहभाग वाढवून भारतीय आर्थिक व्यवस्थेला बळकटी आणणे काळाची गरज आहे. जगातील उदयनमुख अर्थव्यवस्था असलेल्या आपल्या भारतात स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग वाढवणे ही सरकार तसेच समाजाची जिम्मेदारी आहे. समाजातील रूढी, परंपरा यांना छेद देऊन स्त्रियांचा अर्थकारणातील सहभाग वाढवला तर देशाची अर्थव्यवस्था भरभराटीला येऊन भारत नक्कीच जागतिक महासत्ता होईल.

महिला व बालकल्याण कार्यासाठी १९५३ साली स्थापित करण्यात आलेल्या केंद्रीय समाज कल्याण मंडळांनी आणि त्याच्या राज्यस्तरीय शाखांनी महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शिबिरे चालविणे, गरजू महिलांसाठी पुनर्वसन केंद्रे स्थापित करणे, कायद्याने महिलांना देण्यात आलेल्या अधिकारांची त्यांना माहिती करून देणे, खाजगी महिला कल्याण संस्थांना अनुदान देणे, इत्यादी कामे हाती घेतली. ग्रामीण भागातील निरक्षर महिलांना साक्षर करण्याचा १९५८ साली सुरू झालेला उपक्रम १९७५ नंतर अधिक व्यापक केला गेला. १८ ते ५० वयोगटातील महिलांसाठी व्यवसायिक प्रशिक्षणाचे प्रकल्प सुरू केले गेले, तसेच त्यांच्यासाठी वस्तीगृह चालवण्यासाठी खाजगी संस्थांना मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जाऊ लागले. १९७६ साली महिला कल्याण व विकासाच्या नव्या योजना आखण्यासाठी 'नॅशनल प्लॅन ऑफ ॲक्शन फॉर वीमेन' तयार केला गेला. 'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल वेल्फेअर' या मंडळाकडे शासकीय व खाजगी कल्याणकारी योजनांचा समन्वय साधने, महिलांच्या समस्यावर राष्ट्रीय चर्चासत्रे आयोजित करणे, महिलांच्या समस्यांसंबंधी माहिती शासनाला पुरवून त्यावर उपाययोजना सुचवणे, इत्यादी कामे सोपविली गेली. महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनता यावे म्हणून लघुउद्योग व हस्तव्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची व्यवस्था 1982 साली करण्यात आली 1986 साली 'विमेन्स डेव्हलपमेंट कार्पोरेशन' स्थापन करण्यात येऊन नोकऱ्यांची दारे महिलांसाठी मोठ्या प्रमाणात खुली केली गेली. *(कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2016)*

भारतात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शहरी व ग्रामीण दोन्ही भागातील स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील महिला प्रामुख्याने शेती व त्यावर आधारित उद्योगधंदे करून भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लावतात. प्राचीन काळापासून शेती हे स्त्रियांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागाचे माध्यम आहे. सुरुवातीला वस्तूंची देवाण-घेवाण करणारी स्त्रीने राष्ट्राच्या उन्नतीसाठी केलेल्या व्यवहार म्हणजे अर्थकारण इथपर्यंत आली आणि तिचा प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेची संबंध आला. आज ग्रामीण भागातून फळे भाज्या पॅकिंग करून मॉलमध्ये पाठवणे असो की इडली डोसाचे पीठ बाजारात विकायला पाठवणे असो यातून स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग दिसून येतो. भारत सरकारने बचतगट ही संकल्पना निर्माण केली आणि यातून स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग अजूनच वाढला. आज भारतात अनेक नोंदणीकृत बचत गट असून याद्वारे शिवणकाम, पापड बनवणे, लोणचे बनवणे, आटा तयार करणे, भोजनालय चालवणे, असे विविध उद्योगधंदे राबवले जातात. सरकार ही अशा उद्योगांना प्रोत्साहन देते. भारतात विविध प्रकारे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग भरभराटीला आले आहे. अशा उद्योगांमध्ये स्त्रियांच्या सहभागासाठी प्रोत्साहन दिले. प्रामुख्याने सूक्ष्म उद्योगात महिलांचा मोठा प्रमाणावर सहभाग आहे. एकूण महिलांच्या उद्योगधंद्यातील सहभागा पैकी९७.६२% महिला या सूक्ष्म उद्योग करतात. परंतु मध्यम व लघु तसेच जागतिक उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे.

सध्याच्या 'ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्स'नुसार बघितलं तर महिलांचा भारतीय अर्थकारणातील सहभाग खूपच कमी आहे. १३४ देशांमध्ये भारताचा क्रमांक ११२वा लागतो. ही आकडेवारी सुधारण्यासाठी मुळातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांना सकारात्मक अर्थकारणाची दिशा दाखवून त्यांना अर्थव्यवस्थेमध्ये सामावून घेणे आवश्यक आहे. तसेच अर्थव्यवस्थेत स्त्रियांना पुरुषा एवढेच मानाचे स्थान देणे आवश्यक आहे. विविध बँकांना महिलांना उद्योगासाठी भांडवल पुरवण्यासाठी प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे, तंत्रज्ञानासाठी वोकेशनल ट्रेनिंग देणे व उद्योगधंद्यांसाठी साधनसामुग्री पुरवणे हे देखील महत्त्वाचे कार्य आहे, सहकारी तत्त्वावर उद्योग स्थापण्यासाठी उत्तेजन देणे यासारख्या कामावर सरकार भर देत आहे. याचाच परिपाक म्हणून बँका महिलांच्या अर्थकारणातील सहभागासाठी कमी व्याजदराने भांडवल पुरवतात. आर्थिक मदतीमुळे महिलांचा अर्थकारणात सहभाग वाढला आहे. भारतात सर्वाधिक महिलांचा अर्थकारणात सहभाग हा सेवा क्षेत्राच्या माध्यमातून आहे, हा सहभाग इतर क्षेत्रातही वाढायला हवा.*(शर्मा विशाला आणि विनोद बैरागी, महिला सक्षमीकरण -समस्या आणि आव्हाने, अजंता प्रकाशन, औरंगाबाद, २०१५)*

किरण मुजुमदार - बीकॉन लिमिटेड, जिया मोदी - ए टू झेड अँड पार्टनर्स, नैनालाल किडवाणी - एच एस बी सी इंडिया, रेणू सूद करनाड - एचडीएफसी बँक, मल्लिका श्रीनिवासन - टाफे लिमिटेड, चंदा कोचर - आयसीआयसीआय बँक, स्वाती पिरमल - पिरमल इंटरप्राईजेस, प्रिया रेड्डी - अपोलो हॉस्पिटल, बीनिता वाली - ब्रिटानिया इंडस्ट्रीज, शिखा शर्मा - अक्सिस बँक, या स्त्रियांनी भारतातील मोठमोठ्या उद्योगधंद्यांचे राहते यशस्वीरित्या संचालन केलेले आहे . म्हणजे स्त्रियांना जर संधी दिली तर त्या नक्कीच अर्थव्यवस्थेमध्ये मोलाची भर टाकतात. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या दक्षिणात्य राज्यांमध्ये महिलांचा उद्योग धंद्यामध्ये सहभाग जास्त आहे, तर दिल्ली, बिहार, हरियाणा व गुजरातमध्ये स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग कमी दिसून येतो. म्हणून भारतीय

महिलांचा अर्थकारणात सहभाग वाढवणे गरजेचे आहे. त्यासाठी स्त्रियांना सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक बंधनापासून मुक्तता देऊन स्त्रियांचा अर्थकारणात सहभाग वाढवणे आवश्यक आहे व आर्थिक सहकार्यांबरोबरच सामाजिक स्वातंत्र्य देणे गरजेचे आहे.

## १५.१० स्वातंत्र्योत्तर भारतातील महिला संघटन व चळवळी

गरीब महिलांना रोजगार मिळून देण्यासाठी १९७२ मध्ये महिला स्वयंरोजगार संस्था अहमदाबाद येथे स्थापन होऊन गुजरात मध्य प्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, दिल्ली, केरळ येथील दोन लाखापेक्षा अधिक महिला तिच्या सदस्य बनल्या. या संघटनेने अकुशल, अर्धकुशल, अज्ञानी, गरीब हस्तव्यवसाय करणाऱ्या महिलांना योग्य रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. या संघटनेने स्वतःचे काही उद्योग व बँका तयार करून गरीब महिलांना त्यात सामावून घेतले. महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील आदिवासी महिलांसाठी कार्य करणारी श्रमिक संघटना १९७० च्या दरम्यान निर्माण झाली. या संघटनेने आदिवासीच्या जमिनी वाचवण्यासाठी व त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी चळवळ उभारली. आदिवासी स्त्रियांना संघटित करून त्यांचे प्रशिक्षण शिबिर १९७३ मध्ये भरवले. ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी रात्र शाळा सुरू केल्या. पुरुषांचे दारूचे व्यसन, जुगार, पत्नीला मारहाण या गोष्टी थांबवण्याचे प्रयत्न या संघटनेने केले. प्रमिला दंडवते यांची 'महिला दक्षता समिती', दिल्ली मधील 'सहेली' या महिला संघटनांच्या चळवळीमुळे १९६१चा हुंडा प्रतिबंधक कायदा सरकारने पास केला. १९८४ मध्ये पुन्हा या कायद्याची व्याप्ती वाढविण्यात आली. महिलांनी अनेक सामाजिक चळवळीत भाग घेतला. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीने प्रभावित होऊन साम्यवादी महिलांनी १९७३ ते १९७५ या काळात महाराष्ट्र व गुजरातमध्ये नवनिर्माण चळवळ उभारली. उत्तराखंडात सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पर्यावरण संरक्षण चळवळीत म्हणजे 'चिपको आंदोलनात' महिलांनी मोठ्या प्रमाणात मोठ्या सहभाग घेतला. 1975 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे करण्यास सुरुवात केली. त्यामुळे महिलांचा हक्क व अधिकाराकडे लक्ष वेधले गेले व त्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात येऊ लागले.

अशा प्रकारे स्वातंत्र्यापूर्वी समाजसुधारकांनी सुरू केलेल्या स्त्रीसुधारणा चळवळीमुळे महिलांमध्ये जागृती येऊन महिलांनी आपल्या अधिकारासाठी व हक्कासाठी स्वतः संघटना बांधण्यास सुरुवात केली होती. स्वातंत्र्यानंतरही ह्या महिला चळवळी पुढे आणखी जोमाने काम करू लागल्या व आपल्या स्वतःच्या हक्कासाठी व अधिकारासाठी स्वतः संघर्ष करत आहे.

## १५.११ सारांश

भारतीय महिलांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास केला तर हे स्पष्ट होते की, भारतात महिलांचा जो विकास झाला आहे तो विषमतेवर आधारित आहे. एकीकडे बोटावर मोजता येईल इतक्याच महिलांचा विकास झाला तर दुसरीकडे बहुतांश महिला सक्षमीकरणापासून कोसो दूर आहेत. भारतातील शिक्षण व प्रशासनात काही महिला आघाडीवर आहेत तर दुसऱ्या बाजूला बलात्कार, लैंगिक आघात, आरोग्याला सामान्य महिला बळी पडत आहे.

स्त्रियांच्या विकासासाठी अनेकांनी प्रयत्न केले, परंतु सद्यस्थितीत स्त्रीभ्रूणहत्या, महिलांवर बलात्कार, छेडछाड, शिक्षणात, राजकारणात व प्रशासनात अल्प सहभाग यावरून असे सिद्ध होते की महिला आजही पूर्णपणे सक्षम झालेल्या नाहीत. म्हणून महिला सक्षमीकरणावर करण्याचा विचार होणे आवश्यक आहे. त्याकरता सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात स्त्रियांच्या प्रमाणाला निकष मानून स्त्रीचा विकास एक मानव म्हणून होणे आवश्यक आहे. थोडक्यात महिला सक्षमीकरणाच्या वाटेवर विविध समस्या असल्याचे दिसते. त्यावर शासनाचे प्रामाणिक प्रयत्न व व्यापक सामाजिक जागृती झाल्यास महिला विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतील.

## १५.१२ प्रश्न

१ महिला सक्षमीकरणाची व्याख्या सांगून त्याचा अर्थ स्पष्ट करा.
२ महिला सक्षमीकरणासाठी संविधानातील तरतुदींचा आढावा घ्या.
३ महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हिंदू कोड बिलाचे महत्त्व विशद करा.
४ स्वातंत्र्यानंतर महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कायद्यांचा आढावा घ्या.
५ महिला सक्षमीकरणासाठी आरक्षण धोरणाचे महत्व विशद करा.
६ महिलांचा राजकारणातील सहभाग स्पष्ट करा.
७ महिलांचा अर्थकारणातील सहभाग स्पष्ट करा.
८ स्वातंत्र्योत्तर भारतातील महिला संघटन व चळवळी यावर भाष्य करा.

## १५.१३ संदर्भ

१. **आधुनिक भारताचा इतिहास -१९४७ ते २००० -** शांता कोठेकर
२. **महिला सक्षमीकरण : समस्या व आव्हाने -** विषाला शर्मा व विनोद बैरागी
३. **भारतीय शासन व राजकारण –** डॉ . सुधाकर जोशी
४. **भारतीय स्त्री व हिंदू कोड बिल –** डॉ. अनिल सुर्या
५. **भारतीय इतिहासातील स्त्रिया –** डॉ. साहेबराव गाठाळ
६. **हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर
७. **आजादी के बाद का भारत -** बिपिन चंद्र

❖❖❖❖

munotes.in

# १६

# शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान

**घटक रचना**

१६.१ उद्दिष्टे

१६.२ प्रस्तावना

१६.३ शिक्षण

१६.४ विज्ञान व तंत्रज्ञान

१६.५ सारांश

१६.६ प्रश्न

१६.७ संदर्भ

## १६.१ उद्दिष्टे

१. स्वतंत्रोत्तर काळातील शिक्षणाची स्थिती जाणून घेणे.
२. स्वतंत्रोत्तर काळातील शिक्षणामध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे.
३. स्वातंत्र्याच्या वेळेची विज्ञान व तंत्रज्ञानाची स्थिती जाणून घेणे
४. स्वातंत्र्योत्तर काळातील विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे.
५. शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीची चिकित्सक चर्चा करणे.

## १६.२ प्रस्तावना

स्वातंत्र्यानंतर भारताने अंगीकृत केलेल्या लोकशाही शासन व्यवस्थेचा मार्ग लाभदायक ठरण्यासाठी देशाच्या तळागाळात पोचणारी साक्षरतेची व्यापक मोहीम हाती घेणे, सर्व तरुण पिढीच्या शिक्षणाची व्यवस्था करणे, उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणे, विज्ञान व तंत्रज्ञानाचे अद्यावत शिक्षण भारतीयांना उपलब्ध करून देणे, मूलभूत संशोधनाची संधी सर्जनशील प्रतिभावांत तरुणांना उपलब्ध करून देणे, शिक्षणाची प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनाशी सांगड घालणे इत्यादी मूलभूत उद्दिष्टे भारत सरकारने निर्धारित केली व ती द्रुतगतीने साकार करता यावीत या दृष्टीने शिक्षण विषयक धोरणे आखली. देशाच्या निरनिराळ्या भागातील परिस्थिती व गरजा ध्यानात घेऊन शिक्षण विषयक योजना आखणे व उपक्रम हाती घेणे, राज्य सरकारांना अधिक सुकर होईल या दृष्टीने शिक्षण हा विषय राज्य सरकारांच्या हाती सोपवण्यात आला, तर राष्ट्रीय प्रतिष्ठेची विद्या केंद्र मानल्या गेलेल्या काही उच्च शिक्षण संस्था तसेच बनारस हिंदू विद्यापीठ, अलीगड मुस्लिम विद्यापीठ, यासारखी महत्त्वाची विद्यापीठे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असावीत असे ठरविण्यात आले. व्यावसायिक

शिक्षण व कामगारांचे तांत्रिक प्रशिक्षण असे काही विषय समवर्ती सूचीमध्ये अंतर्भूत केले गेले. तसेच भविष्यात पूर्णतः केंद्र सरकारच्या खर्चाने स्थापन होणाऱ्या विज्ञान, व्यावसायिक, तांत्रिक शिक्षण संस्था व संशोधन संस्था केंद्र शासनाच्या अधिकाराखाली असाव्यात अशी तरतूद करण्यात आली.

शिक्षण हा विषय राज्यांच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यात आल्याने त्याचे संमिश्र परिणाम झाले. या तरतुदीमुळे स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेऊन शिक्षणाचा प्रसार व विकास घडवून आणणे शक्य झाले. परंतु यामुळे प्रत्येक राज्याने आपले शैक्षणिक धोरण स्वतंत्रपणे निर्धारित केले. परिणामतः राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक बाबींचा समन्वय साधने तसेच सर्व राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व दर्जात सुसंगती राखणे कठीण झाले. ही अडचण दूर करण्याच्या हेतूने राष्ट्रीय शैक्षणिक समित्या व आयोग अधून मधून स्थापन करण्यात आले. परंतु त्यांच्या अहवालातील तरतुदी शिफारसीच्या स्वरूपात असल्यामुळे त्या राज्यांना बंधनकारक नव्हत्या. त्यामुळे राज्यांच्या शैक्षणिक धोरणात एकवाक्यता राहणे दुरापास्त झाले. राष्ट्रीय स्तरावर प्रचलित असलेल्या शिक्षण पद्धतीचा व प्रसाराचा आढावा घेऊन शिक्षण प्रसाराची व्याप्ती वाढवण्याच्या, दर्जा उंचावण्याच्या व देशाच्या गरजा लक्षात घेऊन शैक्षणिक बाबतीत बदल सुचवण्याच्या हेतूने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक राष्ट्रीय समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी १९४८ सालची विद्यापीठ शिक्षण समिती, १९५०-५२ची प्राथमिक शिक्षणासंबंधी समिती, १९५६-५८ सालची महाविद्यालय शिक्षणाबाबतची समिती, १९५८-६० सालची स्त्री शिक्षणासंबंधी समिती, १९६४ सालचा भारतीय शिक्षण आयोग या समित्या विशेष उल्लेखनीय आहेत.

## १६.३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण

### १६.३.१. राधाकृष्णन् आयोग १९४८ :

देशातील उच्च शिक्षण उच्च दर्जाचे असावे या दृष्टीने प्रचलित शिक्षण पद्धतीत बदल सुचवण्यासाठी १९४८ साली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने भारतीय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन उच्च शिक्षणाच्या विकासाच्या हेतूने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या. शालेय शिक्षणाचा घसरलेल्या दर्जाचा प्रतिकूल परिणाम महाविद्यालयीन शिक्षणावर होत असल्याचे नमूद करून शालेय शिक्षणक्रमाचा काळ बारा वर्षाचा व महाविद्यालयीन शिक्षणाचा तीन वर्षे असावा असे या समितीने सुचवले. तसेच विद्यापीठात प्रवेश देण्याबाबत निश्चित नियम केले जावेत. देशाच्या गरजा लक्षात घेऊन उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्या जावा. विद्यापीठे स्वायत्य असावीत, उच्च शिक्षणावरील खर्चात वृद्धी केल्या जावी, संशोधकांना देण्यात येणाऱ्या अर्थसाहयात वाढ केली जावी, श्रेष्ठ गुणवत्तेचे प्राध्यापक विद्यापीठात नियुक्त केले जावेत, विद्यापीठांना वेळोवेळी आवश्यक ते मार्गदर्शन करून विद्यापीठीय शिक्षणात सुसंगती आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली जावी, हा खर्च केंद्र सरकारने उचलावा. देशाच्या विकासाच्या गरजा लक्षात घेऊन नव्या विज्ञान शाखा, तंत्रज्ञान शाखा व व्यावसायिक शिक्षण शाखा स्थापन करण्यात याव्या, अशा सूचना राधाकृष्ण समितीने केल्या. तसेच या समितीने उच्च शिक्षण व संशोधनाची मूलभूत तत्वे निर्धारित करून दिली.

राधाकृष्णन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे त्याच्या अंमलबजावणीसाठी 1953 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन करण्यात आला. संसदेतील एका अधिनियमानुसार आयोगाला स्वायत्त दर्जा देण्यात आला. भिन्नस्तर ठरवणे व त्यांच्यात समन्वय ठेवणे ही जबाबदारी आयोगाची होती. त्यासाठी सरकारने पुरेसे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले. विद्यापीठांना द्यावयाच्या अनुदानासाठी मोठ्या रकमा विद्यापीठ अनुदान मंडळाच्या हाती सोपवण्यात आल्या. तसेच प्रत्येक नव्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षणाच्या प्रचारासाठी वाढत्या प्रमाणात रकमेची तरतूद करण्यात आली. या खर्चाचा काही वाटा राज्य सरकारांना उचलावा लागणार होता.

### १६.३.२. कोठारी शिक्षण आयोग १९६४ ते ६६ :

पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात भारतातील शैक्षणिक क्षेत्रात बरीच प्रगती झाली असली तरी राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाच्या सर्व अंगांचा व पैलूंचा एकत्रित विचार करणारी सुसंगत अशी सर्वांगीण राष्ट्रीय शिक्षण योजना तयार केली गेली नव्हती. ही उणीव भरून काढण्यासाठी १९६४ साली डी एस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एका शिक्षण आयोगाची नियुक्ती करण्यात आली. शिक्षणाची राष्ट्रीय रूपरेषा, त्याचे सर्व सामान्य सिद्धांत व धोरण या सर्व अंगांचा विचार करून शिक्षण सुधारणा बाबतीत आयोगाने सरकारला सल्ला द्यावयाचा होता. इंग्लंड, अमेरिका, रशिया इत्यादी ठिकाणाहून प्रमुख शिक्षण शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक यांना आमंत्रित करण्यात आले. आयोगाने हे मान्य केले की, शिक्षण व संशोधन देशाच्या आर्थिक सांस्कृतिक व आत्मिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आहेत. वर्तमान शिक्षण प्रणालीतील कठोरतेवर टीका करून आयोगाने बदलत्या परिस्थितीनुसार अनुकूल असणारी लवचिक शिक्षण पद्धती असण्यावर भर दिला. या आयोगाने पुढील शिफारशी केल्या.

१. सर्वसामान्य शिक्षणाचे अविभाज्य अंग म्हणून शिक्षणाच्या सर्वच स्तरावर समाजसेवा आणि कार्यानुभव इत्यादीचा समावेश करण्यात यावा

२. नैतिक शिक्षणावर तसेच सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणाऱ्या शिक्षणावर भर दिला जावा. शाळांना या जबाबदारीची जाणीव असावी की, त्यांना विद्यार्थ्यांना शैक्षणिक विश्वातून प्रत्यक्ष कार्याच्या आणि जीवनाच्या विश्वात घेऊन जाण्यासाठी मदत करावयाची आहे.

३. माध्यमिक शिक्षण व्यावसायिक स्वरूपाचे केले जावे.

४. प्रगत अभ्यासक्रमाची केंद्रे अधिक मजबूत केली जावीत. मोठ्या विद्यापीठांमध्ये एक छोटी संस्था याकरता असावी जी आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहील.

५. शाळांमधील शिक्षकांची गुणवत्ता व प्रशिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले जावे.

६. शिक्षण पुनर्निर्मानाच्या कार्यात कृषी विषयक संशोधन आणि त्या संबंधातील शास्त्रज्ञांना प्राथमिकता दिली जावी.

७. संपूर्ण देशात शालेय स्तरापर्यंत समान अभ्यासक्रम असावा व त्यावर समान क्रमिक पुस्तके तयार केली जावी.

८ प्रादेशिक भाषा शिक्षणाचे माध्यम असावे आणि हिंदी व इंग्रजी यांचा संपर्क भाषा म्हणून उपयोग व्हावा.

९. बुद्धिमान तरुणांना ज्ञान आर्जनाच्या आवश्यक त्या सवलती उपलब्ध करून दिल्या जाव्यात. त्याचप्रमाणे शेती उद्योग व विज्ञान विषयक संशोधनाला प्रस्तावित प्रोत्साहन दिले जावे.

१०. शिक्षण घेणाऱ्या तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी समाज कल्याण व राष्ट्रीय पुनर्रचना कार्यक्रमात त्यांना सहभागी करून घ्यावे आणि असे उपक्रम त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचे अविभाज्य अंग बनवण्यात यावे.

११. उच्चशास्त्रीय तांत्रिक व कृषी शिक्षणाचा व संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी मोजक्या पण सर्वसोयी असलेल्या शिक्षण संस्था असाव्यात.

१२. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाचा आकृतीबंध १०:२:३ असा असावा. *(ग्रोवर आणि बेलेकर-आधुनिक भारताचा इतिहास)*

अशा अनेक मौलिक शिफारशी या आयोगाने केल्या. तसेच या सर्व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शासनाने राष्ट्रीय उत्पन्नाचा सहा टक्के भाग शिक्षणासाठी उपलब्ध करून द्यावा असेही या आयोगाने सुचवले.

या आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाने पारित केलेल्या प्रस्तावावर भारत सरकारने शिक्षण प्रसार, शिक्षण सुधार व शैक्षणिक पुनर्रचनेच्या कार्याला विशेष गती दिली. या क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाने यांच्या धोरणात सुसंवाद व सुसंगती आणता यावी म्हणून १९७६ साली घटनेत दुरुस्ती करून शिक्षण हा राज्य शासनाच्या अधिकारात असलेला विषय संयुक्त यादीत अंतर्भूत करण्यात आला. यामुळे शैक्षणिक बाबतीत अधिक सक्रिय भूमिका घेणे केंद्र सरकारला शक्य झाले. शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवण्यासाठी १९८४ साली शिक्षणाचे स्वतंत्र खाते एका केंद्रीय मंत्र्याच्या हाती सोपविण्यात आले. व्यावसायिक शिक्षण, तांत्रिक शिक्षण व महिला शिक्षण प्रसार तसेच बुद्धिमान शाळकरी मुलांच्या सर्वांगीण विकासाची हेतूने शिक्षण पद्धतीत बदल करण्याबाबत केंद्र शासनाने नवे धोरण आखले. त्यातूनच नवोदय विद्यालयांचा उपक्रम जन्माला आला.

### १६.३.३. नवे शैक्षणिक धोरण १९८६ :

नव्या शैक्षणिक धोरणाचा उद्देश गतिहीन समाजाला विकास व परिवर्तनासाठी वचनबद्ध असलेल्या नव्या गतिशील समाजात परिवर्तित करणे हा होता. या दीर्घकालीन कार्यक्रमात पुढील गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. तेव्हा असलेली ३६ टक्के साक्षरता इसवी सन २००० पर्यंत वाढवून ५६पर्यंत नेणे, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे, उच्च माध्यमिक शिक्षणाला व्यावसायिक बनवणे, अशा प्रकारे १९९० पर्यंत दहा टक्के विद्यार्थी आणि १९९५ पर्यंत २५ टक्के विद्यार्थी तयार व्हावेत. उच्च शिक्षणात अशा सुधारणा

केल्या जाव्या की, ज्यामुळे अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणात व जागतिकीकरणात विद्यमान असलेल्या आव्हानांना पेलून धरण्यासाठी मनुष्यबळ प्रशिक्षित होऊ शकेल. शिक्षणात सामाजिक बांधिलकी असणे आवश्यक आहे. तसेच अभ्यासक्रम असे बनवले जावे की, विद्यार्थ्यांच्या मनात संविधानात दिलेल्या उच्च सिद्धांताविषयी श्रद्धा निर्माण व्हावी. राष्ट्रीय परंपरेविषयी अभिमान, धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्यायाच्या सिद्धांताप्रति वचनबद्धता, देशाचे ऐक्य व अखंडतेप्रति आंतरराष्ट्रीय जानीवेबाबत विश्वास निर्माण व्हावा. *(ग्रोवर आणि बेलेकर-आधुनिक भारताचा इतिहास)*

१९८४ नंतर शैक्षणिक क्षेत्राबाबत घेण्यात आलेले तीन मुख्य निर्णय म्हणजे १९८६ साली अंगीकृत केलेले नवे शैक्षणिक धोरण, नवोदय विद्यालयांची स्थापना व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना हे होत. हे विद्यापीठ राष्ट्रीय स्तरावर शिक्षण प्रसारणाचे मोलाचे माध्यम बनले.

### १६.३.१६. प्राथमिक शिक्षण :

१९४७ साली भारतात साक्षरतेचे प्रमाण जेमतेम १४% होते. ही टक्केवारी लवकरात लवकर वाढवण्यासाठी १४ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींना शिक्षण सक्तीचे व निशुल्क देण्याचा प्रयत्न राज्यघटना अमलात आल्यापासून दहा वर्षात केला जाईल अशी तरतूद राज्यघटनेच्या मार्गदर्शकतत्त्वात केली गेली. त्या अनुराधाने प्राथमिक शिक्षणाबाबत पावले उचलण्याच्या सूचना राज्य शासनांना दिल्या गेल्या. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत स्थानिक संस्थांना प्रोत्साहन दिले गेले. परिणामतः १९५० ते ६० च्या दरम्यान प्राथमिक शाळांची संख्या अडीच पटीने तर शाळकरी मुलांची संख्या तीनपटीने वाढली. परंतु झपाट्याने वाढलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात ही वाढ तोकडी होती. त्यामुळे सर्व भागात प्राथमिक शिक्षण निशुल्क व सक्तीचे उपलब्ध करून देण्यासाठी प्रारंभी घातली गेलेली दहा वर्षांची कालमर्यादा पुन्हा दहा वर्षांनी वाढवण्यात आली. ग्रामीण भागात शिक्षण प्रसार व साक्षरता प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय विस्तार योजना, प्रौढ शिक्षण योजना राबवण्यात आल्या. या क्षेत्रातील अनेक त्रुटीवर शिक्षण आयोगाने आपल्या १९६६ सालच्या अहवालात बोट ठेवले. त्यात शिक्षणाचे हात अनुसूचित जाती-जमाती, शेतमजुरांची मुले व मुली यांच्यापर्यंत पोहोचलेले नाहीत. शाळांना इमारती नाहीत, प्रशिक्षित शिक्षक पुरेसे नाहीत, शिक्षणाचा दर्जा सुधारलेला नाही, यावर विशेष भर होता. ह्या त्रुटी दूर करण्याच्या उद्देशाने पाचव्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेत तरतुदी करण्यात आल्या. परिणामत १९८५ पर्यंत प्राथमिक शिक्षण निशुल्क व सक्तीचे झाले. १९५० साली असलेली शाळकरी मुलांची संख्या १९८५ पर्यंत दहा पटीने वाढली व साक्षरतेचे प्रमाण १६.६% वरून ४० टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

### १६.३.५. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण :

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या जेमतेम १८हजार व त्यातील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ३० लक्ष होती. पंचवार्षिक योजनांद्वारे माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारावर आणि विशेषता ग्रामीण भागातील शिक्षण प्रसारवर लक्ष केंद्रित करण्यात आले. मद्रास, जम्मू काश्मीर यासारख्या राज्यातून माध्यमिक शिक्षण निशुल्क केले गेले. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक

त्या शिफारशी करण्याचे काम १९५२साली मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू व प्रख्यात शिक्षण तज्ञ मुदलियार यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सोपविण्यात आले. या समितीने १९५३ साली सरकारला सादर केलेल्या अहवालात शिक्षणाची मूलभूत उद्दिष्टे नमूद करून शालेय शिक्षण पद्धतीत बदल करण्याबाबत शिफारशी केल्या. मुलांमध्ये सामाजिक जाण आणि व्यवहारिक जीवनाला खंबीरपणे सामोरे जाण्याची कुवत निर्माण करावी, राष्ट्रीय चरित्र संवर्धन करावे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय केली जावी, त्यांना पुरेसे वेतन दिले जावे. शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असली तरी शाळातून मातृभाषेबरोबरच राष्ट्रभाषा व इंग्रजी भाषाही शिकवल्या जाव्यात. शालेय अभ्यासक्रम अद्यावत असावा व मुलांसाठी उत्तम पाठ्यपुस्तके तयार केली जावीत. शालांत परीक्षा नंतर मुलांना स्वतंत्र व्यवसाय करता यावा. यासाठी तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर भर देणाऱ्या बहुउद्देशीय शाळा स्थापन केल्या जाव्यात. शिक्षणाची गोडी मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी दृकश्राव्य साधनांचा वापर केल्या जावा, इत्यादी. मुदलियार समितीने केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार देशाच्या अनेक भागात बहुउद्देशीय शाळा स्थापन करण्यात आल्या. १९५९ ते १९८५च्या दरम्यान शालेय विद्यार्थ्यांची संख्या दहा पटीने वाढली. शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या कामी १९६१ साली स्थापित झालेली नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (एनसीईआरटी) ही संस्था मौलिक योगदान करते. अभ्यासक्र अद्यावत करणे, चांगली पुस्तके तयार करणे, प्रात्यक्षिकासाठी नवीन नवीन उपकरणे तयार करणे, शिक्षकांना अद्यावत ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे, त्यांना प्रशिक्षण देणे इत्यादी कामे ही संस्था करते.

### १६.३.६. विद्यापीठ स्तरावरील शिक्षण व संशोधन :

स्वतंत्र भारतात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विशेष लक्षणीय प्रगती झाली. विद्यापीठातील विद्यार्थ्यांची संख्या १९८५ पर्यंत चाळीस लक्षात गेली. त्या प्रमाणात विद्यापीठे, महाविद्यालय संशोधन संस्था, उच्च तांत्रिक शिक्षण संस्था यांच्या संख्येतही झपाट्याने वाढ झाली. देशातील उच्च शिक्षणातील दर्जाच्या दृष्टीने प्रचलित शिक्षण पद्धतीत बदल सुचवण्यासाठी १९४८ साली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. हे आपण बघितले आहेत. या समितीच्या शिफारशीनुसार १९५६ साली विद्यापीठ अनुदान आयोगाची निर्मिती केली गेली. विद्यापीठांची कार्यपद्धती व धोरणे यांच्यात समन्वय साधून पदव्युत्तर शिक्षण व संशोधन यांना प्रोत्साहन व मदत देण्याचे मोलाचे कार्य या आयोगाकडे सोपवण्यात आले. विद्यापीठांना द्यावयाच्या अनुदानासाठी मोठ्या रकमा विद्यापीठ अनुदान मंडळाच्या हाती सोपवण्यात आल्या. तसेच प्रत्येक नव्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी वाढत्या प्रमाणात रकमेची तरतूद करण्यात आली. या खर्चाच्या काही वाटा राज्य सरकारांना उचलावा लागतो. सर्वसाधारणपणे विद्यापीठे काही अंशी राज्य सरकारांच्या मार्गदर्शनाखाली असली तरी राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जाणारी विद्यापीठे मात्र केंद्र शासनाच्या अधिकाराखाली ठेवली गेली. अशा विद्यापीठात बनारस हिंदू विद्यापीठ, अलीगड मुस्लिम विद्यापीठ, १९६८ साली स्थापन झालेले जवाहरलाल नेहरू विद्यापीठ तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण व संशोधन संस्था यांचा अंतर्भाव होतो.

## १६.४ विज्ञान व तंत्रज्ञान

भारत स्वतंत्र झाल्यानंतर राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कृषी, वैद्यक इत्यादी महत्त्वाच्या ज्ञानशाखांवर लक्ष केंद्रित केले गेले. या दृष्टीने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे धोरण निर्धारित करून देणारा १९५८चा केंद्र सरकारने पारित केलेला ठराव महत्त्वाचा ठरतो. या ठरावाने विज्ञान व तंत्रज्ञान विकासाचा पाया घालून दिला. देशाच्या गरजा लक्षात घेऊन विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, संरक्षण, शेती इत्यादी महत्त्वाच्या क्षेत्रांची प्रगती घडवून आणणे, या क्षेत्रात उच्च श्रेणीचे प्रशिक्षित लोक तयार करणे, यासाठी बुद्धिमान विद्यार्थ्यांचा शोध घेणे, शिष्यवृत्ती देऊन संशोधनाला प्रोत्साहन देणे या मुद्द्यांचा त्यात समावेश होता. या क्षेत्रात होतकरू तरुणांना अद्यावत ज्ञान मिळवता यावे या हेतूने देशाच्या भिन्न भागात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स – बंगलोर, खडकपूर, पवई, कानपूर, मद्रास इत्यादी ठिकाणच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) यासारख्या संस्था स्थापित करण्यात आल्या. तसेच आधुनिक वैद्यक शास्त्रातील अद्यावत ज्ञान उपलब्ध व्हावे म्हणून दिल्लीच्या अखिल भारतीय वैद्यकशास्त्र संस्थेसारख्या (IIM) काही संस्था चंदिगड पांडेचेरी वगैरे शहरात स्थापन करण्यात आल्या. शास्त्रीय पद्धतीने कृषी उत्पादनाला चालना देण्यासाठी शेतकी संशोधन संस्था स्थापन करण्यात आल्या. या भिन्न क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना देशाच्या विकास योजनांची माहिती देऊन त्यानुसार त्यांना कार्य करण्यासाठी मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य देण्यासाठी इंडियन कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च, इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्च यासारखी राष्ट्रीय संस्था स्थापित करण्यात आल्या.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नव्या संशोधन कार्याचा लाभ प्रत्यक्ष व्यवहारात व्हावा म्हणून संशोधन संस्था, औद्योगिक संस्था व कारखाने यांच्यात परस्पर संपर्क प्रस्थापित करण्यास मदत करणाऱ्या राष्ट्रीय समित्याही स्थापित करण्यात आल्या. विज्ञानाचे उपयोग ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्याचे कार्य विज्ञान संस्थांच्या मार्फत करण्यात येऊ लागले. स्वातंत्र्याच्या उषा:काली विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अतिशय अविकसित राहिलेल्या भारताने या क्षेत्रात द्रूतगतीने विकासाचा पल्ला गाठला. आज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विकसित मानल्या जाणाऱ्या दहा राष्ट्रात भारताचा अंतर्भाव होतो. याचे श्रेय या विज्ञान शाखांचा भक्कम पाया घालून देणाऱ्या जवाहरलाल नेहरूंना व त्या पायावर विकासाचे पुढील टप्पे गाठण्यास वैज्ञानिकांना उत्तेजन देणाऱ्या इंदिरा गांधींना आहे. शासकीय स्तरावर होणाऱ्या प्रयत्नाबरोबर देशातील काही महत्त्वाच्या खाजगी संस्थाही विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासात मोलाचे योगदान करीत आहे. त्यांना शासकीय अनुदानाची व्यवस्था करण्यात आली. त्यात कलकत्त्याची इंडियन असोसिएशन फॉर कल्टिवेशन ऑफ सायन्स, मुंबईची टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, बंगलोरची रमण रिसर्च इन्स्टिट्यूट, कलकत्त्याची बोस इन्स्टिट्यूट या संस्था महत्त्वाच्या आहेत. *(कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६)*

**१६.३.१ ग्रामीण क्षेत्रातील विज्ञान व तंत्रज्ञान :** ग्रामीण भागात शेती हे अर्थार्जनाचे मुख्य साधन असल्याने देशाच्या दृष्टीने शास्त्रीय कृषी पद्धतीचा विकास होणे गरजेचे असल्याने ग्रामीण शेतीसंस्था स्थापन करण्याची शिफारस १९४९ सालीच करण्यात आली. अशा

संस्थांचा अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी १९५४ साली एक राष्ट्रीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार ग्रामीण विकास कार्यक्रमाला हातभार लावण्यास सहाय्यक ठरतील अशा रुलर इन्स्टिट्यूट स्थापन करण्यात आल्या. तसेच केंद्र व राज्य सरकारांना ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाबाबत सल्ला देण्यासाठी १९६६ साली 'नॅशनल कौन्सिल फॉर रुलर एज्युकेशन' स्थापन करण्यात आली. निरनिराळ्या कृषी विद्यापीठात चालणाऱ्या संशोधन कार्याचा समन्वय साधण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी पुसा येथे राष्ट्रीय कृषी संशोधन संस्था निर्माण करण्यात आली. शेती उत्पादनाचा दर्जा सुधारणे व अधिक पीक काढणे यासाठी या संस्थांमध्ये मोलाचे संशोधन कार्य केले जाते.

### १६.३.२ अणुसंशोधन :

अणुशक्तीचा वापर मानवी समाजाच्या भौतिक विकासासाठी करून घेता येईल याची जाणीव असल्याने नेहरूंना या विषयात विशेष रुची होती. तज्ञ मंडळीच्या मदतीने भारतात अनुशक्ती उत्पादित करून तिचा उपयोग विकासासाठी करण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय १९४८ साली अनुशक्ती समितीच्या स्थापनेने साकार झाला. जागतिक कीर्तीचे डॉ. होमी भाभा यांची या समितीच्या अध्यक्षपदी त्यांनी नियुक्ती केली. तसेच केंद्र शासनात अनुशक्ती खातेही निर्माण करण्यात आले. मुंबई नजीक ट्रॉम्बे येथे अणुभट्टी केंद्र स्थापित करण्यात आले. जीवशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, धातुशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स या पाच प्रमुख ज्ञानशाखात व त्यांच्या घटक शाखात मूलभूत संशोधनाची व्यवस्था येथे करण्यात आली. प्रारंभी अणुशक्ती निर्मितीसाठी लागणाऱ्या युरेनियम करता भारताला पाश्चात राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागे. ते पुरविण्यात हे राष्ट्र चालढकल करतात तसेच ते पुरविण्यासाठी परराष्ट्रीय धोरणाबाबत ते राष्ट्र भारतावर दडपण आणतात. असा अनुभव येऊ लागतात ह्या धातूचा देशात शोध घेण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. त्या प्रयत्नाला अंशतः यश मिळाले, बिहार राज्यात युरोनियमचा शोध लागल्याने हे परावलंबित्व काही अंशी कमी झाले. हळूहळू ट्रॉम्बेच्या अनुशक्ती केंद्रात परमाणु संशोधनासाठी लागणारी यंत्रसामुग्री व उपकरणे तयार होऊ लागली. महत्त्वाच्या औषधाबाबतही संशोधने होऊ लागली. कर्करोगासारख्या दुर्धर रोगावरील उपचारा संबंधित प्रयोग होऊ लागले. धान्याचा दर्जा व उत्पादनाचे प्रमाण सुधारण्यासाठी नवनवे प्रयोग होऊ लागले. ट्रॉम्बेप्रमाणे तारापूर, कल्पकम येथेही अणुसंशोधन संस्था अस्तित्वात आल्या. राष्ट्रीय अनुशक्ती समितीच्या अधिकार क्षेत्रात ट्रॉम्बे मधील भाभा आटोमिक रिसर्च सेंटर, कल्पकम येथील रिऍक्टर रिसर्च सेंटर, मुंबईचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, कलकत्ता येथील साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स, तारापूरचे ऑटोमिक पावर स्टेशन, हैदराबाद न्यूक्लिअर फ्युएल कॉम्प्लेक्स, मद्रास मधील ऑटोमिक पावर स्टेशन, नांगल, कोटा, तुतीकोरीन येथील हेवी वाटर प्लांट इत्यादी प्रकल्पांचा अंतर्भाव होतो. अनुशक्तीचा वापर विनाशकारी कार्यासाठी न करता शांततापूर्ण विकासासाठी केवळ केला जाईल या नेहरू काळात घेतलेल्या निर्णयापासून भारत आजही ढळलेला नाही. *(कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६)*

**१६.३.३ अवकाश संशोधन** :

अनुशक्तीच्या विकासाप्रमाणे अवकाश संशोधनाच्या कार्यात देखील भारत मागे राहिलेला नाही. भारतात अणुसंशोधन कार्याच्या पायाभरणीचे श्रेय डॉ. होमी भाभा यांना तर अवकाश संशोधनाचा भक्कम पाया देशात तयार करण्याचे श्रेय डॉ. विक्रम साराभाई यांना आहे. पाश्चात जगात उच्च शिक्षण घेतल्यानंतर हे दोन्ही प्रतिभावंत वैज्ञानिक आपल्या ज्ञानाचा लाभ देशाला करून देण्याच्या उदात्त हेतूने भारतात परत आले. विज्ञानाचा वापर देशाच्या विकासासाठी व जनतेच्या कल्याणासाठी करून घेण्याचे महत्व जाणणाऱ्या पंतप्रधान नेहरूंच्या पाठिंब्यामुळे या दोन अलौकिक वैज्ञानिकांना आपले स्वप्न प्रत्यक्षात साकारता आले. डॉ. विक्रम साराभाईंनी १९४७ पासून अहमदाबाद येथे आपल्या कार्याचा प्रारंभ केला. अवकाश संशोधनाचे महत्त्व जाणून केंद्र शासनाने हे कार्य १९६१ साली अनुशक्ती समितीकडे सोपविले. त्यापुढील वर्षी डॉ. साराभाईंच्या नेतृत्वाखाली अवकाश संशोधनासाठी राष्ट्रीय समिती गठीत करण्यात आली. या उपक्रमाच्या वाढत्या व्यापाबरोबर १५ ऑगस्ट १९६९ रोजी इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशनची (इस्त्रो) निर्मिती करण्यात आली व त्यानंतर स्वतंत्र अवकाश विभाग स्थापन करण्यात आला. दुर्दैवाने साराभाईंच्या अकाली निधनामुळे या कार्याला त्यांचे नेतृत्व फार काळ लाभले नाही. परंतु डॉ. भाभा व साराभाई यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या वैज्ञानिकांच्या पिढ्यांनी हे कार्य उत्साहाने व नेटाने पुढे चालविले. अशा वैज्ञानिकात डॉ. सतीश धवन, डॉ. कस्तुरीरंगण, डॉ. नारळीकर, डॉ. अब्दुल कलाम, जी माधवन नायर यांची नावे महत्त्वाची आहेत.

इस्त्रो या अवकाश संशोधन संस्थेचे मुख्य कार्यालय बंगलोरला असून हे कार्य करणारी आणखी तीन केंद्रे, थुम्बाचे साराभाई अवकाश केंद्र, आंध्र मधील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन केंद्र, तसेच ओरिसामधील बालासोर येथील केंद्र ही विशेष महत्त्वाची आहेत. याशिवाय इस्त्रोच्या कार्याशी निगडित असलेल्या सुमारे २५ संस्था देशाच्या वेगवेगळ्या भागात कार्यरत आहेत.

भारताने अवकाशयुगात यशस्वीरित्या पदार्पण केल्याचे पहिले प्रात्यक्षिक म्हणजे १९७५ मध्ये झालेले आर्यभट्ट या उपग्रहाचे प्रक्षेपण होय. त्यानंतर भास्कर, रोहिणी, ॲप्पल असे अनेक उपग्रह अंतराळात सोडण्यात आले. १९८४ मध्ये सोयुज या रशियन अवकाश यानातून अंतराळात रशियन अवकाश यात्रींच्या सोबत जाण्याचा विक्रम राकेश शर्मा यांनी केला. इस्त्रोने भारतीय यानातून भारतीय व्यक्तीला पाठवण्याची तसेच चंद्रावर यान पाठवण्याची महत्वकांक्षी योजना आखली आहे. अलीकडे अँट्रिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड या संस्थेमार्फत विकसनशील देशांच्या अवकाश संशोधन संस्थांना माहिती व तंत्रज्ञान पुरवणे, त्यांच्या उपक्रमांना सहाय्य करणे, सुट्या भागांची विक्री इत्यादी कामे केली जातात. अँट्रिक्स संस्था म्हणजे भारतीय अवकाश कार्यक्रम परदेशाशी जोडण्याचे माध्यम होय.

अवकाश संशोधन कार्याने देशाच्या प्रगतीला व कल्याण कार्याला मोलाचे सहकार्य केले आहे. उपग्रह व अवकाश याने तयार करणे, त्यांच्या प्रक्षेपणासाठी लागणारी यंत्रसामग्री बनविणे, उपग्रह अंतराळात सोडून त्यांच्या द्वारा देशभर संपर्क प्रस्थापित करणे, ज्ञान प्रसार करणे, भूगर्भातील खनिजांचा शोध घेणे, हवामानातील बदलांची व सागरी हालचालींची पूर्व सूचना देणे, शत्रू पक्षाच्या हालचालींची माहिती गोळा करणे इत्यादी नानाविध कामे

उपग्रहामार्फत अवकाश विभाग करीत आहे. पूर्वी भारतीय याने परक्यांच्या स्थानकावरून प्रक्षेपित केली जात असे. आज ही साधने भारताने निर्माण केली आहेत. उपग्रहामुळे रेडिओ, दूरदर्शन देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहेत. ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या आहेत. आपत्कालीन व्यवस्थापन शक्य झाले आहे. कृषी व उद्योग क्षेत्रालाही उपग्रहाद्वारा पुरवलेल्या माहितीचा उपयोग होतो. शिवाय हजारो वैज्ञानिकांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याचे कार्य अवकाश संस्थांद्वारे केले जाते. अणुशक्तीप्रमाणे अवकाश संशोधनाचा वापर शांततापूर्ण विकासासाठी व मानवी समाजाच्या कल्याणासाठी करणे या भारताच्या मूलभूत धोरणाला अवकाश संशोधनाचे कार्य मोलाचा हातभार लावीत आहेत.*(कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६)*

## १६.५ सारांश

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात देशात शिक्षणाचा प्रसार करून अद्यावत ज्ञानाचा उपयोग समाजजीवन समृद्ध करण्याचा व ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्याच्या दृष्टीने प्रयत्न स्थापित करण्यात आलेल्या शैक्षणिक संस्थांनी, समित्यांनी व आयोगांनी केला. प्राथमिक शिक्षणापासून ते मौलिक संशोधनापर्यंतच्या क्षेत्राचा भक्कम पाया तयार होऊन त्या आधारावर शैक्षणिक विकासाचा लांबचा पल्ला गाठणे भारताला शक्य झाले आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या बाबतीत व वैज्ञानिकांच्या पात्रतेच्या बाबतीत जगातील पहिल्या दहा राष्ट्रात भारताचा अंतर्भाव होतो. परंतु याचा अर्थ शैक्षणिक उपक्रम पूर्णतः सफल झाले अगर त्यामुळे पूर्णतः उद्दिष्ट सिद्धी झाली असे मात्र नाही. अजूनही ग्रामीण भाग पूर्णतः साक्षर झालेला नाही. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा शहरातील दर्जाच्या तुलनेत खालवलेला आहे. तत्त्वतः प्राथमिक शिक्षण सक्तीचे व निशुल्क असूनही सर्व मुला मुलींना याचा लाभ घेता येत नाही. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या गरजेपेक्षा अजूनही तोकडी आहे. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता व मानसिक कल लक्षात न घेता महाविद्यालयातून अनिर्बंधपणे प्रवेश दिला जात असल्यामुळे पदवीधरांची संख्या वाढली असली तरी, शिक्षणाचा दर्जा घसरत आहे. शिवाय सर्व पदवीधरांना नोकरी मिळणे शक्य नसल्याने व स्वतंत्र रोजगार करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण न झाल्याने सुशिक्षित बेकरांचा प्रश्न गंभीर बनत आहे. त्यामुळे सुशिक्षित पदवीधारात वैफल्याची भावना वृद्धिंगत होत आहे. राष्ट्रीयत्वाची भावना रुजवण्यात, राष्ट्रीय चारित्र संवर्धनात व जबाबदार नागरिक तयार करण्यात आजची प्रचलित शिक्षण पद्धती कमी पडत आहे.

एकूणच शिक्षण प्रसार व विकासाचे अनेक उपक्रम कार्यान्वित होऊन आणि उच्च शिक्षण संशोधनाच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती होऊनही जीवनाच्या व्यापक संदर्भात प्रचलित शिक्षण पद्धती पूर्ण अंशाने फलदायी ठरलेली दिसत नाही. राष्ट्राचे भवितव्य बऱ्याच अंशी शिक्षणावर अवलंबून असल्यामुळे शिक्षण पद्धती व अभ्यासक्रमाचे स्वरूप भारतीय जीवन पद्धतीशी, जीवन मूल्यांशी व राष्ट्रीय गरजांशी निगडित करण्यास अग्रक्रम देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याची जाणीव शिक्षण क्षेत्रात असूनही प्रत्यक्षात मात्र त्यानुसार आखलेले व अमलात आलेले उपक्रम उद्दिष्ट सिद्धीच्या दृष्टीने अपुरे पडत आहे. ही बाब भविष्याच्या दृष्टीने विचार करायला लावणारी आहे.

munotes.in

## १६.६ प्रश्न

१ स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घ्या.
२ भारतीय शिक्षण व्यवस्थेचा मुलाधार म्हणून १९६४ च्या कोठारी शिक्षण आयोगाचा आढावा घ्या.
३ स्वातंत्र्योत्तर भारतातील विज्ञान व तंत्रज्ञानाच्या मागोवा घ्या.
४ भारतातील अवकाश संशोधनाचे महत्त्व विशद करा.
५ भारतातील अणुशक्ती तंत्रज्ञानाची थोडक्यात माहिती द्या.

## १६.७ संदर्भ


१ **आधुनिक भारताचा इतिहास (** 1947 ते 2000) - डॉ. शांता कोठेकर

२ **आधुनिक भारताचा इतिहास -** ग्रोवर आणि बेल्हेकर

३ **आजादी के बाद का भारत -** बिपिन चंद्र

४ **आधुनिक भारताचा इतिहास –** डॉ. साहेबराव गाठाळ


❖❖❖❖

munotes.in